સંતની સંપતી અસલાં જ્યાંની ત્યાંની સદા
હરી ભજની
તો નર મુક્તચી ઝાંખો ત્યાળો ન લગે સ્મરણવા
સ્મરણી.

[illegible]

j. Ganpatharoapa Naidoo

गिरिवासी काव्य.

कवि

कै. बापूजी वैजनाथ पतकी

माजी नायब शिरस्तेदार कमिशनर ऑफिस, वऱ्हाड.

प्रकाशक

रामराव बापूजी पतकी

सन १९१५

श्रुतिबोध मुद्रा-मान्दिर

४७, काळबादेवीरोड.

मुंबई.



कै. गोविंदराव पत्की, बी. ए.

परमपूज्य

कै. वा. तीर्थरूप बापूसाहेब पतकी

यांचें

गिरिवासी काव्य

कै. वा. गोविंद रामराव पतकी

यानीं

अत्युत्कृष्ट उत्साहानें व ईशभक्तीनें प्रेरित होऊन प्रसिद्ध करण्याचें काम हातीं घेतलें होतें. पण त्यांच्या अकालीं निधनामुळें तें अपुरें राहिलें. आतां

उभयतांचें स्मारक

म्हणून मी आज हें सम्पूर्ण काव्य

प्रसिद्ध करित आहें.

रामराव बापूजी पतकी



श्री· जयराम केशव असनारे,

बी. ए. एल् एल्. बी. वकील उमरावती.

पदांचा वर्णानुक्रम.

सूची (नं. २)



श्री. दादासाहेब खापर्डे.

प्रस्तावना.

—— :*: ——

गीति.

कृत्याचि हें जीवाचें वाचेला नाम नित्य यावें गा ॥
भावें गातां ह्मणणें लागेना या दया करा वेगा १ ॥
वर्णिति बुधजन स्पष्ट प्रभुचा भावार्थ हाचि मज गावें ॥
नरतनुचें साधन हें केल्यावांचूनि व्यर्थ न जगावें ॥ २ ॥

(गिरिवार्य.)



ह्या काव्यग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचा मान मला मिळत आहे हें मी माझें मोठें भाग्य समजतों. ज्या कवींचें काव्य प्रसिद्ध होत आहे ते कवि माझें लहानपणीं हयातींत होते. त्यांचा व माझ्या वडिलांचा स्नेह असल्यामुळें दळणवळण पुष्कळ असे व त्यामुळें मला त्यांच्या सहवासाचा लाभ अनायासेंच घडला. माझ्या स्मरणाप्रमाणें त्यांची काठी मध्यम उंचीची, बांधा साधारण, अंगाचें वळण किंचित् रोडपणाकडेस, वर्ण गौर व रहाणी अत्यंत साधी असे. त्यांचा स्वभाव फार आनंदी व मनमिळाऊ असे. त्यामुळें ते बसले ह्मणजे त्यांचेभोंवतीं मुलें जमत व हे मुलांच्या लीलांचें कौतुक करीत, व त्यांना अरुचि उत्पन्न न होतां आवडतील अशा तऱ्हेनें सदुपदेशही करीत. त्यांची त्यावेळेस कवि ह्मणून ख्याति असे. गांवांत कोणी हरदास आले तर ते त्यांची भेट घेत व त्यांनीं आख्यानें करून मागितल्यास ज्याला जसें लागेल तशीं आख्यानें करून देत. त्यावेळेस आख्यानांत श्लोक, आर्या, दिंड्या वगैरे असून पदें कांहीं विशिष्ट चालींचींच घालण्याची पद्धत असल्यामुळें त्यांच्या आख्यानांत पदें बहुतेक एका चाली-

चींच आहेत, हें या ग्रंथांतील आख्यानें वाचून वाचकांच्या सहजच ध्यानांत येईल. वऱ्हाड व मध्यप्रांत यांत फार प्रसिद्धीस आलेले कैलासवासी बजाबा हरदास यांचा व या कवींचा फार स्नेह असे. बजाबा हे ह्या कवींचींच काव्यें ह्मणून फार रंग करीत व श्रोतेही तल्लीन होत. या कवीनें आपल्या काव्याच्या शेवटीं बहुतेक 'गिरिवासी' असें पद घातलें आहे. पण यांचीं काव्यें ह्मणणाऱ्या हरदासांनीं ज्या कडव्यांत गिरिवासी असें नांव आलें असेल तें कडवें ह्मणू नये अशी यांची इच्छा असल्यामुळें हरदास तें कडवें ह्मणत नसत व ह्मणून हरदासांनीं ह्मटलेली आर्या मोरोपंताची, श्लोक वामनपंडिताचा व कटाव तर अमृतरायजीचाच आहे असें श्रोतृवर्गास वाटत असे.

प्रस्तुत कवींचें नांव व्यंकट वैजनाथ पतकी हें होतें. व्यंकट या नांवास बापू असें उपपद सहज लागलें व तेंच पुढें बापूजी, बापूराव, बापूसाहेब, असें क्रमाक्रमानें परिणत झालें. त्यावेळची समकालीन आज जी कांहीं थोडी मंडळी आहेत ते त्यांना बापुजी वैजनाथ पतकी या नांवानें ओळखतात. या काव्यांत व्यंकटेश यांचें अपर पर्याय 'गिरिवासी' हें नांव कवीनें घातलें आहे. त्यांची वंशावळ खालीं लिहिल्याप्रमाणें—

१ काळोपंत.	२ मल्हारपंत.	३ विठ्ठलपंत.
४ दत्तोजीपंत.	५ शिवाजीपंत.	६ त्रिंबकपंत
७ लालाजीपंत.	८ वैजोपंत.	९ व्यंकटराव ऊर्फ बापुसाहेब.

हे मूळचे जोगाईचे आंब्याचे रहाणारे होते. नौकरीनिमित्त हे पुण्यास गेले. तेथें प्रस्तुत कवीचे आजे लालाजीपंत हे पर्वतीसंस्थानचे कारभारी होते. त्यांचे मागें त्यांचे चिरंजीव वैजोपंत यांनींही तेंच काम पाहिलें. प्रस्तुतचे कवि बापुसाहेब हे त्यांचे चिरंजीव. हे ह्यावेळीं अल्पवयांतच होते. यांचा जन्म इ. स. १८१५ त जोगाईचें आंबें येथें झाला. यांचा प्रथम विवाह पुणें येथें चिक्षे नांवाच्या परळीचे रहाणाऱ्या गृहस्थाच्या कन्येशीं झाला. कुटुंबाचें नांव लक्ष्मीबाई असें होतें. ह्या लग्न झाल्यावर थोडेच दिवसांनीं वारल्या. त्यावेळेस बापूसाहेबांचें वय १५।१६ वर्षांचें होतें.

याच सुमारास बापूसाहेबांचे वडील अल्पवयांतच ह्मणजे ३१।३२ वयाचे असतांनाच परलोकवासी झाले. त्या वेळेस बापूसाहेब जरी अल्पवयाचे होते तरी ते जात्या बुद्धिवान् असून अंगांत तरतरी असल्यामुळें त्या


वेळच्या मानानें लिहिण्यावाचण्यांत हुषार होते ह्मणून त्यांना वडिलांच्या मागें त्याचें काम मिळालें. पण बापूसाहेबांनी तें काम फार दिवस केलें नाहीं. ते परत जोगाईचे आंब्यास आले व तेथेंच आपलें वतनाचें काम पहात असत. त्याच वेळेस बापूसाहेबांचें दुसरें लग्न तेरखेडचे पाटलाची कन्या गयाबाई यांच्याशीं झालें. पण ह्याही लग्न झाल्यावर ३।४ वर्षांनींच वारल्या.

बापूसाहेब यांनीं आपले वतनाचें कामही फार दिवस केलें नाहीं. त्यावेळेस जोगाईचें आंबें येथें हैद्राबाद कंटिंजंट फौजेपैकीं रिसाला असे. त्यांत त्यांना बाजारमुत्सद्याची जागा मिळाली. तेव्हांपासून सन १८४१ पर्यंत बापूसाहेब आंबें येथेंच असत. पुढें तो रिसाला गुलबुर्गें येथें नेण्यांत आला. त्याबरोबर बापूसाहेब यांनाही गुलबुर्ग्यास जावें लागलें व तेथें ते इ. स. १८५३ पर्यंत होते. याच सुमारास त्यांचा तिसरा विवाह जोगाईचें आंबें येथील आत्मारामपंत कुळकर्णी यांचे कन्येशीं झाला. हें कुटुंब अद्यापि जिवंत आहे.

दुसरें कुटुंब वारल्यावर बापूसाहेबांचें चित्त संसारांतून उठलें व परमार्थाकडेस लागलें. गुलबुर्गा येथें असतांनाच त्यांनीं कांहीं स्फुट पदें व कांहीं आख्यानें केलीं, पण ह्या कविता त्यांनीं ज्या पुस्तकांत उतरून ठेविल्या होत्या तें पुस्तक कोणीं उतरून घेण्याकरितां मागून नेलें, पण परत आणून दिलें नाहीं. प्रभूच्या सेवेंत व नामसंकीर्तनांत आयुष्य घालविण्याचा त्यांचा संकल्प होता. तथापि मातोश्रीच्या आग्रहास्तव त्यांना तृतीय विवाह करावा लागला.

पुढें सन १८९३ मध्यें गुलबुर्गा येथील रिसाला मोडला व त्यावरील मुख्य अधिकाऱ्यास हैद्राबादेच्या रेसिडेंटाची जागा मिळाली. त्यांचेबरोबर बापूसाहेबांनाही हैदराबादेस जावें लागलें. हैदराबादेस असतांना एक गोष्ट झाली तीवरून बापूसाहेबांचा करारीपणा व दीर्घोद्योग दिसून येतो. बापूसाहेब हे मेहमीं कचेरींत बरोबर वेळेस येत असत व आपलें काम नीटपणें व व्यवस्थितपणें करीत असत. एके दिवशीं रेसीडेंट साहेब कचेरींत लौकर आले, त्यावेळीं कचेरींत बापूसाहेबांखेरीज दुसरें कोणी नव्हतें,

साहेबांस त्यावेळीं एका उर्दू शब्दाची अडचण पडली. तेव्हां त्यांनीं बापूसाहेबांस तो शब्द विचारला. बापूसाहेबांस उर्दू येत नव्हतें ह्मणून त्यांना 'मला उर्दू येत नाहीं' असें उत्तर द्यावें लागलें. तेव्हां साहेब ह्मणाले, 'तुह्मी इतके दिवस रिसाल्यांत नौकरी करीत असून तुह्मांला उर्दू येत नाहीं हें आश्चर्य आहे.' हे शब्द बापूसाहेबांस लागले व त्यांचें वय जरी ३७।३८ वर्षांचें होतें तरी त्यांनीं फारशी भाषेचा अभ्यास सुरू केला व दोन वर्षेंपर्यंत मेहेनत करून इतकी प्रवीणता मिळविली कीं त्यांची गणना फारशी विद्वानांत होऊं लागली. पुढें फारशी भाषेची जागा रिकामी झाली तेव्हां इतक्या थोड्या वेळांत बापूसाहेबांनीं निपुणता मिळविल्याचें साहेबांस आश्चर्य वाटलें व त्यांनीं ती बढतीची जागा त्यांना दिली. त्याच सुमारास वऱ्हाडप्रांत व धाराशीव व नळदुर्ग हे जिल्हे कंटिजंट फौजेच्या पगारासाठीं ह्मणून इंग्रज सरकारास पांच वर्षासाठीं मिळाले. तेव्हां जें कमिशनरचें ऑफीस निर्माण करण्यांत आलें त्यांत बापूसाहेब यांना नायब शिरस्तेदारीची जागा मिळाली. मध्यंतरीं सन १८६३।६४ च्या सुमारास बापूसाहेब एलिचपुर येथें असतांना त्यांना सर सालरजंग यांनीं मोठ्या जागेवर हैदराबादेस बोलाविलें. हैदराबादेस असतांना जोगाईचें आंबें येथें कोणीएक गोविंदबुवा रामदासी ह्मणून सत्पुरुष होते, त्यांचे दर्शनास बापूसाहेब गेले. त्यावेळेस रामदासी बुवा ह्मणाले, 'तुह्मी हैदराबादेस जातां, तर जावें; पण तुह्मांस पुन्हां परत यावें लागेल, कारण तुमचा अन्नोदकऋणानुबंध हैदराबादेस नसून वऱ्हाडांत आहे.' बापूसाहेब बुवांची आज्ञा घेऊन हैदराबादेस जाऊन कामावर रुजू झाले पण लवकरच कांहीं जरूरीच्या कामाकरितां रजा पाहिजे असून ती मिळाली नाहीं ह्मणून ते राजीनामा देऊन पुन्हां वऱ्हाडांत आपल्या जुन्या जागेवर परत आले व तीवरच ते अखेरपर्यंत राहिले. या ऑफिसाला आंबें-जोगाई, बुलडाणा, जालना, जानेफळ, एलिचपुर वगैरे बऱ्याच ठिकाणीं फिरावें लागलें, आणि त्याच्या अंतर्व्यवस्थेंतही बरेच फेरफार झाले. शेवटीं हें ऑफिस उमरावती येथें आलें. तेथेंच कमिशनर साहेबांच्या ऑफिसांत नायब शिरस्तेदार असतांना बापूसाहेब सन १८७५ चे मे महिन्याचे १९ वे तारखेस वारले. यांना फक्त ८।९ दिवस ज्वर आला होता. तथापि



श्री. रामराव अण्णासाहेब पतकी.

त्यांचा रामनामाचा जप चालूच होता. हा जप चालू असतांनाच कोणाच्याही मनोमानसीं नसतांना बापूसाहेबांनीं योग्यालाही दुर्लभ अशा सावधपणांत देहत्याग केला. त्यावेळेस त्यांचें वय ६० वर्षांचें होतें.

बापूसाहेब यांचेमागें त्यांचें कुटुंब व चार चिरंजीव राहिले. चिरंजिवांचीं नांवें रामराव, भुजंगराव, गणपतराव व भगवंतराव हीं होत. यांपैकीं गणपतराव खेरीजकरून आज सगळे हयात आहेत. रा. रा. रामराव यांचें वय बापूसाहेब ह्यांचे मरणसमयीं अल्पच होतें, पण त्यांनीं इंग्रजीचा अभ्यास केला, व सरकारी नौकरी पत्करिली. त्यांत त्यांच्या अंगच्या हुषारीमुळें उत्तरोत्तर बढती होऊन ते एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरचे जागेपर्यंत वाढले व त्या जागेवर असतांनाच त्यांनीं पेन्शन घेतलें व ते आज वऱ्हाडांत नांदुरा येथें सुखवस्तु रहात आहेत. दुसरे चिरंजीव रा. रा. भुजंगराव हे आज मोर्शी येथें सबरजिस्ट्रार आहेत. गणपतराव हे दिवाणीकोर्टांत असतांनाच एलिचपुर येथें वारले व भगवंतराव हे भुजंगरावाजवळ आहेत. रा. रामराव यांस गोविंदराव नांवाचा सद्गुणी व दीर्घोद्योगी मुलगा होता. तो बी. ए. होऊन सन १९१२ सालीं एल्. एल्. बी. च्या दुसऱ्या परीक्षेस अलाहाबादेस गेला असतां जगज्जननी जान्हवीनें त्यांजला आपल्या पोटांत घेतलें. रा. रामराव यांना वृद्धपणीं आपल्या सद्गुणी व सुशील व एकुलत्या एक पुत्राच्या वियोगाचा जबरदस्त धक्का बसला. पण ते विवेकाच्या बळावर प्रारब्धभोग भोगीत आहेत.

बापूसाहेब यांच्या ह्या कविता त्यांचे चिरंजीव रा. रा. रामराव यांचे जवळ लिहून ठेविल्या होत्या. बापूसाहेबांनीं कविता केल्या त्याकाळीं छापखाने या भागांत फार उपयोगांत आलेले नव्हते व पुष्कळ नवीन कवि, वामनमोरोपंतांच्या कविता वाचून ईर्षेनें आपणही कविता करून इतरत्र छापवीत असत. त्यांचे मासले तत्कालीन काव्यांतून अनेक पहावयास सांपडतात. बापूसाहेबांच्या कविता त्या कवितांपेक्षां जास्त सरस, सुलभ व उत्तम असूनही त्या छापून प्रसिद्ध करण्याचें त्यांचे मनांत येईना. हरदासांनींसुद्धां शेवटलें कडवें ह्मणूं नये अशी त्यांची इच्छा असे ह्मणून वर सांगित-

लेलेंच आहे. याचें कारण त्यांनीं केलेल्या एका आर्येंतच दिसून येतें. ती आर्या अशी—

" वामन मयूर कविंच्या पाहुनि करितात अन्य कविता कीं ॥
त्याही रसभरित तशा परि अमृताची न ये चवी ताकीं ॥ १ ॥

याप्रमाणें कवींनीं स्वतःच आपल्या काव्यास ताकाची व वामनमयूर कवींच्या कवितांस अमृताची उपमा दिली आहे व ह्मणूनच आपल्या कविता प्रसिद्ध व्हाव्यात अशी त्यांची इच्छा नसे. कवींचें हें मत श्रोतृवर्गास जरी मान्य नसलें तरी स्वतः कवीची तशी इच्छा, ह्मणून त्यांच्या कविता त्यांच्या ह्यातींत प्रसिद्ध झाल्या नाहींत. त्यांच्या मागें मात्र रा. रा. रामराव अण्णासाहेब पतकी यांच्या मनांतून त्या प्रसिद्ध करण्याचें आलें. पण सरकारी काम करून त्यांना हें काम करण्यास सवड मिळेना; तथापि त्यांचे सद्गुणी व दीर्घोद्योगी पुत्र गोविंदराव यांनीं लहानपणापासून आज्याच्या कविता प्रसिद्ध करण्याची इच्छा धरली; व ते जेव्हां बी. ए. झाले, तेव्हां त्यांनीं हें काम हातीं घेतलें व शुद्धाशुद्ध तपासून, योग्य ठिकाणीं टिपा देऊन, त्यांनीं छापण्यास सुरवात केली. पण त्यांचाही एल्. एल्. बी चा अभ्यास जेव्हां सुरू झाला, तेव्हां त्यांनाही हें काम करण्यास सवड मिळेना. ह्मणून त्यांनीं परीक्षा होईपर्यंत हें काम तहकूब ठेविलें. पण प्रभुसंकेत निराळा असल्यामुळें इष्ट हेतु साध्य होण्यापूर्वीच त्यांना इहलोकची यात्रा संपवावी लागली. असा दुर्योग आला नसता तर हा ग्रंथ यापूर्वीच, गुरुभक्तीनें तयार केलेला, तरुण उत्साहानें भूषित, आणि रसाळ वाणीनें पुरस्कृत, असा वाचकांपुढें आला असता. असो. गोविंदरावांचा अकालीं अंत झाल्यामुळें दुःखित झालेल्या अण्णासाहेबांच्या अंतःकरणास आपल्या पूज्य पित्याचें चिरस्थाई स्मारक व प्रिय पुत्राची दृढ इच्छा ह्या दोन्ही गोष्टी करण्याकरितां हें काव्य प्रसिद्ध करणें अत्यंत जरूर वाटूं लागलें. पण त्यांच्या कर्तृत्वशक्तीस वरील सांसारिक आपत्ति व वयोमान यांनीं क्षीण केलें असल्यामुळें त्यांच्या इच्छेवरून ग्रंथ तपासून व टिपा मारून सुलभ करण्याचें काम माझे मित्र, व अण्णासाहेब पतकी यांचे निकट संबंधी, रा. रा. जयराम केशव आसनारे ऊर्फ

भाऊसाहेब बी. ए. बी. एल्. यांच्याकडेस आलें व बापूसाहेबांचें चरित्र व प्रस्तावना लिहिण्याचें काम मजकडेस सोंपविण्यांत आलें आहे. परिस्थितीचा विचार बाजूस ठेविला तर मजवर जी कामगिरी सोंपविली गेली आहे तिज-बद्दल मला धन्यताच वाटत आहे.

बापूसाहेब यांच्या चरित्रांत विशेष अशा कांहीं गोष्टी नाहींत. तरी त्यांची गणना संतकोटींतच होते असें त्यांच्या कविता वाचून सहज दिसून येतें व त्यांच्या स्फुट पद्यांपैकीं कांहीं पदांवरून त्यांना आत्मसाक्षात्कार झाला असावा असें कांहीं तज्ज्ञ लोकांचें ह्मणणें आहे, व तें मला खरें वाटतें. इतर संतांप्रमाणें चमत्कार दाखविणाऱ्या गोष्टी जरी यांनीं केल्या नाहींत, तरी संतांचे ठिकाणीं असलेली बहुतेक गुणांची मालिका यांच्या ठिकाणीं होती. त्यांचा स्वभाव शांत असे हें मला स्वतः माहीत आहे व त्यांच्या बरोबरीचे स्नेही त्यांच्यासंबंधानें बोलत त्यावरून त्यांना भजनपूजनाचा व प्रभुस्मरणाचा व अध्यात्मज्ञानाचा फार नाद असे. सरकारी नौकरींत असतांनाही त्यांनीं कोणासही आपला अधिकार दाखविला नाहीं. इतकेंच नव्हे तर आपणांपा-सून दुसऱ्यास कोणत्याही प्रकारचा त्रास होऊं नये अशी ते खबरदारी घेत असत. नौकरीचें काम वेळचे वेळीं व व्यवस्थितपणें ते करीत असत. कचेरीचें काम आटोपून घरीं आल्यावर मित्रमंडळीशीं बोलत असत व रात्रीचा आणि प्रातः-काळचा वेळ प्रभुचिंतनांत व काव्य करण्यांत घालवीत असत. ज्या सत्समाग-माचें त्यांनीं आपल्या काव्यामधून महत्व वर्णिलें आहे, तो सत्समागम त्यांना लाभला होता असें दिसतें. त्यांनीं जें गुरुअष्टक केलें आहे त्यावरून त्यांना 'राघव' नांवाच्या कोण्या सत्पुरुषाचा उपदेश झाला असावा व त्या उपदे-शामुळेंच त्यांना ब्रह्मानुभव झाला असें दिसतें. हा सत्समागम त्यांना पूर्व वयांतच झाला असावा असें त्यांनीं अपराधनिवेदनपर ज्या आर्या केल्या आहेत त्यांतील पहिल्या आर्येवरून दिसतें. ब्रह्मप्राप्तीकरितां संसाराचा त्याग करून अरण्यांतच गेलें पाहिजे या मताचे हे कवि नाहींत असें दिसतें. त्यांनीं आपल्या एका स्फुट पदांत ("सोय धरुनि जानें" यांत) स्पष्ट सांगितलें आहे कीं, तुमची जशी सोय असेल त्याप्रमाणें लोकांत रहा अथवा अरण्यांत जा, पण भवनदीपार उतरून जाण्याकरितां हरिगुण, कीर्तन, श्रवण, मनन,

सत्संगति या नांवेचा आश्रय करा आणि खरोखर गोष्ट अशीच आहे. आणि इतकेंच नव्हे तर “ जेणें केला संसार निका । तोच जाणे परमार्थ-सुखा ” या रामदासांच्या उक्तीप्रमाणें ज्याला संसार चांगला करितां येतो तोच परमार्थसुखाचाही अधिकारी होतो आणि ज्याला परमार्थसुखाचा अधिकार प्राप्त झाला आहे; त्याला जर संसार करावयाचा प्रसंग आलाच तर तो फार उत्तम तऱ्हेनें संसार करितो ही गोष्ट प्रस्तुतचे कवीच्या चरित्रावरून स्पष्ट दिसून येते.

याप्रमाणें प्रस्तुतच्या कवीचें चरित्र व स्वभाव लेखन झालें. आतां यांच्या काव्यासंबंधानें थोडेसें विवेचन करितों.

मराठी भाषेंतील वाङ्मयाचा विचार केला असतां त्यांत फार पुरातनकालापासून आजपर्यंत जे कवि झाले आहेत त्यांचे तीन वर्ग होतात. पहिला वर्ग मुकुंदराय, ज्ञानोबा वगैरे कवींचा. त्यांनीं तत्त्वज्ञान शिकविण्यासाठींच कविता लिहिली. त्यांची कविता अप्रतिम व अत्यंत रसाळ आहे. तिच्या द्वारें तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष उपदेश करून त्यांनीं लोकांवर उपकार केला आहे. त्यांच्या कृतीला उपनिषदाची उपमा साजते. दुसरा वर्ग वामन-मोरोपंत वगैरेंचा, यांनींही तोच उपदेश प्रत्यक्ष न करितां पुराणादिकांतील रम्य कथांच्या द्वारें केला आहे. यांचीही कविता अत्यंत मधुर, रसप्रचुर व व मनोरंजक आहे. या वर्गांतील कवींचीं कांहीं काव्यें पहिल्या वर्गांतही येण्यासारखीं आहेत. तथापि त्यांच्या कवित्वाचा ओघ पुष्कळसा कथांच्या द्वारेंच उपदेश करण्याकडे वळलेला दिसतो. श्रीमत् भागवतांतील दशमस्कंध वामनपंडित यांनीं, व एकादशस्कंध एकनाथांनीं, जसा वर्णन केला आहे तसा आजपर्यंत कोणींहि केला नाहीं. हे मराठींतील पुराणकार होत. तिसरा वर्ग, रामजोशी, आनंदफंदी वगैरेंचा. यांच्या कवितेचा ओघ बहुतेक व्यवहारिक विषयाकडेस वळलेला आहे. पुराणांतील कथांकडे यांचा ओघ कमी असून, राजेलोकांचीं युद्धें, सणांचीं वर्णनें, वगैरे विषयांकडेस बहुतेक वळलेला दिसतो. याच वर्गाच्या एका पोटभेदांत शाहीर, भाट, वगैरे मंडळी येतात. या वर्गांतील बहुतेक कवींचा अंतिम हेतु प्रभुपदप्राप्तीचा

नसून राजेलोक, सरदार व धनिक यांना तुष्ट करणें हा होय. यांना प्राकृत किंवा सांसारिक कवि ह्मटलें असतां चालेल. प्रस्तुतचे कवि बऱ्याच अंशानें दुसऱ्या वर्गांत उंचें पदवीवर बसण्यालायक आहेत. यांचें अंतिम ध्येय ह्मणजे मथाळ्यांवर दिलेल्या दोन आर्यांत सांगितल्याप्रमाणें प्रभूचें नामसंकीर्तन सतत करून नरदेहाचें साध्यैक्य करावें हें होय असें मला वाटतें, व ह्मणूनच त्या दोन कविता मीं मथाळ्यावर घेतल्या आहेत.

या वर्गांतील कवींच्या कविता जरी लोकोपकाराकरितां केलेल्या असतात तरी पुष्कळ वेळां स्वतःला उपदेश करण्याचें बाह्य स्वरूप त्यांना दिलेलें असतें. आपणांस भजन घडावें, आपणांवर ईश्वरप्रसाद व्हावा व प्रभूच्या लीलांचें वर्णन करून तद्द्वारां आपल्याला नामसंकीर्तन घडावें, असा रोंख त्यांनीं दाखविलेला असतो. वस्तुतः यांना ईश्वरी साक्षात्कार पूर्वीच झालेला असतो व तो कवींच्या इच्छेविरुद्धच त्यांच्या काव्यांतून कोठें कोठें स्पष्टपणें दिसूनही येतो. पण तो प्रकट न करितां प्रभुसाक्षात्कार कसा करून घ्यावा व तो करून घेण्याकरितां ज्या अडचणी येतात, त्यांतून कसें पार पडावें हें लोकांना सांगण्याचाच त्यांचा मुख्य हेतु असतो व त्याकरितां त्यांनीं कित्येकदां स्वतःला उद्देशूनही कांहीं काव्यें केलेलीं आहेत. ह्यांपैकींच रामदासांचे मनाचे श्लोक, मोरोपंताची केकावलि, संशयरत्नमाला, वगैरे काव्यें होत. प्रस्तुतच्या कवींनींही अपराधनिवेदनस्तोत्र व मनाला उद्देशून कांहीं पदें केलीं आहेत.

या वर्गांतील कवींमध्यें दुसरा धर्म आढळून येतो तो असा कीं पूर्वींच्या कवींनीं ज्या आख्यानांवर काव्यें केलीं आहेत, त्याच आख्यानांवर हे कवि काव्यें करितात. नवीन आख्यानें शोधून काढण्याच्या ते भरीस पडत नाहींत. असें करण्यांत ‘ पूर्वीच्या कवींपेक्षां आपण चांगलीं काव्यें करीत आहोंत, ’ असा अहंकार यांना लेशभरही नसतो. असा अहंकार त्यांना असता तर पूर्वकवींविषयीं आदर व आपणांकडे लघुत्व यांनीं कधींहि घेतलें नसतें. प्रस्तुत कवीनें स्वतःच्या कवितेला ताकाची उपमा दिल्याचें वर सांगितलेंच आहे. मोरोपंत, वामनपंडित वगैरे कवींनींही आपल्या पूर्वकाळीं

होऊन गेलेल्या सर्व कवींविषयीं अत्यंत आदर दाखविला आहे. त्यावरून पूर्वीच्या कवींपेक्षां चांगल्या कविता मी करीन असा अभिमान धरून यांनीं त्याच आख्यानांवर काव्यें केलीं असें ह्मणणें मुळींच योग्य नाहीं. तर ज्या कथांच्या कीर्तनानें शुक, नारदादिक तरून गेले, त्याच कथांचें मनन व कीर्तन केल्यामुळें आपण व इतर लोकही तरून जातील, असा यांचा पूर्ण भरंवसा असतो. कथा जरी सारख्याच असतात, तरी त्यांची निरनिराळ्या कवींनीं केलेलीं वर्णनें परस्परांहून भिन्न असून त्यांतील प्रत्येक भाग मनोरंजकच असतो. मात्र त्यांतील रसास्वाद घेण्यासाठीं अंतःकरण सहृदय असलें पाहिजे. त्याशिवाय एकाच कथेच्या दोन कवींनीं केलेल्या वर्णनांतील भेद कळणें शक्य नाहीं. हा भेद ह्मणजे एक दुसऱ्यापेक्षां चांगला व दुसरा तिसऱ्यापेक्षां वाईट असा भेद नव्हे. तर प्रत्येक वर्णनांत जो कांहीं विशेष असतो तो होय. 'श्रीमंत सकलगुणालंकरण ' हा कित्ता एकच पण बिवलकरी वळणानें व बंडोपंती वळणानें अशा दोन वळणांनीं तो लिहिलेला असतो. हीं दोन्हीं वळणें प्रत्येकाहून निरनिराळीं आहेत, तरी दोन्ही चांगलींच आहेत. त्यांपैकीं प्रत्येक वळणांत जो कांहीं विशेष आहे, त्यावरून तो दुसऱ्या वळणावरून फक्त निराळा आहे असें दिसतें. हा विशेष ह्मणजे परस्परांतील उच्चनीचतर भाव दाखविणारा भेद नव्हे. त्याचप्रमाणें एकच कथा निरनिराळ्या कवींनीं आपआपल्या प्रतिभेनें लिहिली ह्मणजे त्यांपैकीं प्रत्येकांत असलेला विशेष हा परस्परांतील उच्चनीचतरभाव न दाखवितां केवळ स्वतःचें विशेषत्व दाखवून सरस हृदयास हलवून सोडतो. " जें ध्याइलें तेंचि ध्याइजे । जें विवरिलें तेंचि विवरिजे " या श्रेष्ठांच्या वचनाप्रमाणें गाइलेल्या कथेचेंच पुन्हां पुन्हां गायन केलें तर " अधिकस्याधिकं फलं " ह्या न्यायानें त्या कथेंतून निघणाऱ्या अमृताची धाराही वाढत जाऊन तिचें यथेच्छ पान करावयास सांपडतें.

शिवाय एकच कथा अनेक कवींनीं वर्णन केलेली वाचली ह्मणजे त्यांच्या चातुर्याकडेस लक्ष सहजच जातें. आणि प्रत्येकाचा उद्दिष्ट हेतु जरी एकच असला तरी तो साध्य करण्यांत त्यांनीं साधनें कोणतीं व कशीं

आपरली हें पहावयास सापडतें. यापासून मुमुक्षुला फायदा होतो तो निराळाच. पण काव्याचा अभ्यास करणारानांही मोठा उपयोग होतो. सारांश निरभिमान होऊन प्रभूची इतरांनीं वर्णन केलेलीच कथा पुन्हां वर्णन केल्यामुळें स्वतःस व वाचकांस वर सांगितल्याप्रमाणें हितावह होतें. ह्मणून या वर्गातील कवि नवीन आल्यानें शोधण्याच्या भरीस पडले नाहींत

या वर्गातील कवींत तिसरा धर्म आढळून येतो तो असा कीं, यांचे ठिकाणीं प्रेमळ भक्ति व गुरूविषयीं अत्यंत आदर दिसून येतो. त्यांच्या कवितेंत हे गुण प्रतिपदीं निदर्शनास येतात. " गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुः साक्षात्परब्रह्म " अशी याची दृष्टि असते व ही गोष्ट फार महत्वाची आहे, व विशेषतः सांप्रत आपला समाज विघटित होण्याचे बेतांत आलेला आहे या काळांत तर ही गोष्ट प्रत्येकानें शिकणें फार जरुरीचें आहे 'मीच काय तो शहाणा, बुद्धिमान्, कर्तृत्ववान् आहे, माझ्याशिवाय इतर सर्व मूर्ख आहेत' अशी बुद्धि ठेविल्यानें पारमार्थिक तर नाहींच, पण व्यावहारिक देखील उन्नति होणें शक्य नाहीं. ह्मणून गुरू विषयीं—मग तो गुरु व्यवहारमार्गातला असो, अथवा परमार्थमार्गातला असो—अत्यंत आदर व प्रेमळ भक्ति प्रत्येकानें आपल्या ठिकाणीं आणून घेतली पाहिजे व हें "सामान्य" आणि "लोकोत्तर" या दोन गुणांचा विचार करून मनन केल्यास साध्य आहे व हीच गोष्ट या वर्गातील कवि लोकांस शिकवितात.

प्रस्तुतचे कवि या वर्गात बऱ्याच उच्च दर्ज्याचे आहेत. तथापि कालानुक्रमानेंमात्र हे शेवटचेच दिसतात. यांच्यानंतर या वर्गात बसण्याला योग्य कवि निर्माण झाल्याचें दिसून येत नाहीं. चार पुरुषार्थांपैकीं धर्माचा उत्तरोत्तर ऱ्हास होत चालला असून अर्थ व काम यांचा उत्कर्ष होत आहे. ही परिस्थिति बदलून प्रभुकृपेनें पुन्हां पूर्वीची सुस्थिति प्राप्त झाली ह्मणजे अशा तऱ्हेचे कवि पुन्हां निर्माण होतील. पण तोंपर्यंततरी प्रस्तुतच्या कवींना कालानुक्रमानें 'शेवटचे' असा मान मिळत आहे.

या कवींच्या काव्याचें थोडक्यांत वर्णन करावयाचें ह्मणजे—" वाक्यं रसात्मकं काव्यं " या काव्यरसाच्या लक्षणाप्रमाणें यांचें काव्य रसात्मक आहे. यांच्या काव्याचे जे तीन भाग केलेले आहेत, त्या तिन्ही भागांतून भक्ति

हा रस मुख्य असल्याचें दिसून येतें. इतर रस त्याचे अंगभूत आहेत, तथापि शृंगार, वीर व करुण यांचींही वर्णनें कवीनें चटकदार रीतीनें केललीं आहेत. मल्लारिमहाळसाकांताचे चरित्रांत वीररस; लोपामुद्रा, व रामांनीं सीतेचें रूप घेतलें तें आख्यान, यांत शृंगार; व द्रौपदीचा धांवा व इतरही बहुतेक आख्यानें यांत करुणरसाचें फार सरस वर्णन आलेलें आहे. कवीचा आदर रामकथेवर फार दिसतो. सीतास्वयंवराच्या प्रसंगांत वाचकांस वाचतांना हीच भावना उत्पन्न होते. कवि नेहेमीं "आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदां" या श्लोकाचा जप करीत असत अशी आख्याइकाही आहे. कवींनीं आर्या, श्लोक, पदें, दिंड्या, साक्या, कटाव वगैरे बहुतेक वृत्तांत कविता केलेल्या आहेत. तथापि यांचा विशेष भर आर्या व कटाव यांवर दिसतो. यांच्या पहिल्या व तिसऱ्या भागांतील कविता स्वयंस्फूर्तीनें झालेल्य आहेत, व दुसऱ्या भागांतील आख्यानेंही कीर्तनांकरितां करून दिलेलीं आहेत. तथापि पहिला भाग सबंध आर्यावृत्तांत आहे व दुसऱ्या भागांतही बहुतेक कथाचा सारांश प्रथमतः आर्यावृत्तांत त्यांनीं दिलेला आहे. प्रत्येक आख्यानांत निदान एकतरी कटाव आला आहे व स्फुट काव्यांतही द्रौपदीवस्त्रहरणावर कटाव केलेला आहे. यांच्या कवितेंत प्रास उत्तम व सहज साधलेले आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं तर शब्दयोजना अगदीं रेखाटल्यासारखी दिसते. भाषा सोपी असून प्रौढ आहे. फारशी भाषेचा अभ्यास चांगला असल्यामुळें कांहीं हिंदुस्थानी पदें फार सुरस साधलीं आहेत. यांच्या कवितेंत मधून मधून अर्थालंकारही आहेत. तरी त्यांच्यीमुळें कविता दुर्बोध न होतां उलट जास्त सुलभ झाली आहे. क्वचित् प्रसंगीं मात्रागणांच्या चुका दिसतात, पण त्यांच्यायोगानें रसहानि होत नाहीं.

अशा तऱ्हेचें प्रासादिक काव्य आज रसिक विद्वानांपुढें ठेविण्यांत येत आहे. या स्तुत्य कामीं किंचित् हातभार लाविण्याचें श्रेय मला प्रभुकृपेनें मिळालें याबद्दल त्यांचें धन्यवाद गाऊन हा अल्प लेख पूर्ण करितों.

उमरावती.
ता. १७ सप्टंबर १९१९ } **गणेश श्रीकृष्ण खापर्डे.**

॥ श्री लक्ष्मीव्यंकटेश प्रसन्न ॥

भक्तिसुधारस.

गिरिवासि (व्यंकटेश) स्तव.

(यांत प्रभुचें गुणवर्णन व स्वतःची लघुता कवीनें वर्णन केलेली आहे. पण, कवीनेंच आर्या २४, २५ यांत म्हटल्याप्रमाणें, प्रभुच्या नामस्मरणाच्या स्फूर्तीनें कां होईना, काव्य प्रासादी व यमकयुत झालें आहे. कविता सोप्या व सरळ असल्यामुळें यांवर विशेष टीपांची जरूरी नाहीं.)

आर्या.

वाटति हरिगुण गावें, परि करुणाकर हरीच रसनेला[1] ।
वळविल, तरि लाधे जो कविंनीं कवनीं भरूनि रस नेला ॥ १ ॥
पार नसेचि गुणांचा, तरि विश्वासेंकरूनि जो गातो ।
होतो भक्तिबळें त्या भगवद्यशवर्णनाचि[2] जोगा[3] तो ॥ २ ॥
शीलचि आहे प्रभुचें तो मूकालागिं गीष्पती[4] करितो ।
ऐसें नसतें तरि मग करितां स्तुति स्वाननें[5] कसा करि तो ॥ ३ ॥
पंगुंहि[7] गिरि लंघुनियां जाय त्वरें ज्याचिया कृपालेशें ।
तो कां करिल उपेक्षा स्तविला जो साधुमुनिनृपालेशें ॥ ४ ॥
यास्तव यथामतिनें हरिगुणगणवर्णनासि लागावें ।
मुख चातकें उघाडिल्यावरि न लगे अंबुदासि[8] मागावें ॥ ५ ॥
कृत्यचि हें जीवाचें वाचेला नाम नित्य यावें गा ।
भावें गातां ह्मणणें लागेना या करा दया वेगा ॥ ६ ॥

---

१ जिव्हेला. २ भगवत्—यश—वर्णना=भगवंताचें यश वर्णन करण्याला. ३ योग्य. ४ बृहस्पति. ५ स्व—आननें—आपल्या मुखानें. ६ गजेंद्र. ७ लंगडा. ८ मेघास.

वर्णिति बुध जन स्पष्ट प्रभुचा भावार्थ हाचि ‘ मज गावें ’ ।
नरतनुचें साधन हें केल्यावांचूनि व्यर्थ न जगावें ॥ ७ ॥
व्हावें शरण प्रभुला निर्व्याजत्वें[1] अनन्यभावानें ।
नावानें[2] कां न करी प्रेक्षण करणार जो स्वभावानें ॥ ८ ॥
रामदयाघन वळल्यावरि भवतापासि ठाव[3] कां राहे ।
त्यावांचुनि दुःखप्रद वाटे सुजनांसि स्पष्ट कारा[4] हे ॥ ९ ॥
नामें तरले बहु जन गेले संसारसिंधुच्या पारा ।
सारासार विचारा[5], करितां अन्यत्र काय व्यापारा ॥ १० ॥
रामयशोमृतपानें जातो भवजन्य रोग सारा हो ।
सारा[6] हो संसारा उमगा ज्यांचा[7] असे पसारा हो ॥ ११ ॥
ध्यावें नित्य हरीला गावें गुण आननीं[8] सतत वाटें ।
दाटे प्रेम हृदब्जीं तरि मग लागेल भक्तिच्या वाटें ॥ १२ ॥
जों जों भाव दृढावें तों तों भगवत्कृपाचि समजावी ।
समजावी[9] देव तया कीं तन्मतिची[10] स्पृहा[11] विषम[12] जावी ॥ १३ ॥
देव दयाळू ऐसा दीनोद्धारार्थ काळजी वाहे ।
बाहे सन्निध तरि कां न भजावें सर्वकाळ जीवा हे ॥ १४ ॥
विनवावें नित्य असें वृत्ती सकळा वसोत तव चरणीं ।
स्मरणी हेचि मना दे होइन कृतकृत्य या शुभाचरणीं[13] ॥ १५ ॥
वाटो दे हेंचि मना कीं घालावीच नित्य कव[14] चरणीं ।
भवतरणीं[15] तेचि अम्हां रक्षक वीरासि जेविं कवच रणीं ॥ १६ ॥

---

१ निष्कपटपणानें. २ सर्व साक्षी असल्यामुळें ज्याला अगोदरच सर्व दिसत आहे, त्यालाच नांव घेऊन जर हांक मारली तर तो करुण दृष्टिनें पाहील यांत शंका नाहीं. वामन पंडित:— ‘ आधींच साक्षि सकळांसहि पाहताहे । जो नाम घे करुण होउनि त्यास पाहे ॥ ’ ३ जागा. ४ बंदीशाळा. ५ विचार करा. ६ दूर करा. ७ ज्या परमात्म्याचा. ८ मुखानें. ९ समजूत घाली. १० ज्याचा दृढभाव झाला त्याच्या बुद्धिची. ११ इच्छा. १२ दुष्ट वासना. १३ शुभ आचरणानें. १४ मिठी. १५ संसार तरून जाण्यास.

पडलों असे प्रवाहीं भवनदीच्या[1], त्वरित धांव बा पाहे ।
दीनजनावन[2] करणें होय न अन्यासि कार्य बापा हें ॥ १७ ॥
संकटकाळीं भक्तां पावसि हें ब्रीद ऐकिलें कानीं ।
सत्य करुनि दावावें नागविलें बंधुदारलेकांनीं ॥ १८ ॥
काकुलती नच करितों जरि भवपाशांत मी न सांपडतों ।
रडतों मनीं कशाला दीन जळावीण मीनसा पडतो ॥ १९ ॥
परि काय करूं देवा षड्रिपुनीं[3] स्पष्ट घात हा केला ।
बुडतों भवांबुडोहीं[4] तुजविण पावेल कोण हाकेला ॥ २० ॥
दृढतर निश्चय आतां प्रभुजी मन्मानसेंचि हा केला ।
कीं अळवावें तुजला भक्तांच्या गुंतलासि भाकेला ॥ २१ ॥
झालों त्रस्त ह्मणुनियां आठवितों नित्य याचि पायांस ।
सायास अन्य न घडे अनुसरलों सुलभ या उपायास ॥ २२ ॥
आहे हेत मनाचा पुरवाया तूंचि एक क्षम[5] अससी ।
वाणी तुझीच देवा अंतःकरणींहि स्पष्ट तूं वससी ॥ २३ ॥
भावें या गुण गातों तूंचि प्रासादि वर्ण सुचवीसी ।
सुचवीसी[6] घालुनियां प्रेमळजनमानसांसि रुचवीसी ॥ २४ ॥
यां[7] दृढ विश्वासावरि मग पडलें वांकुडेहि यमकास ।
नाम निरंतर वदनीं येतां घालील काय यम कास ॥ २५ ॥
ज्यांत हरीचे गुणगण दोष न त्या देति साधु कवनासी ।
भवनाशीं लक्ष सदा त्यांचें, करितील कां न अवनासी[8] ॥ २६ ॥

---

१ संसाररूपी नदीच्या. २ दीन जनांचें संरक्षण करणें. ३ काम, क्रोध, इत्यादि सहा शत्रूंनीं. ४ संसाररूपी पाण्याच्या डोहांत. ५ समर्थ. ६ सु-चवी—चांगली रुचि. ७ साहित्य शास्त्राचा असा नियम आहे कीं यमक प्रास इत्यादि दोषांनीं युक्त असी जर कविता झाली तर कवीला यमपुरी पाहावी लागते. त्याला उद्देशून कवीनें ही आर्या लिहिली, व मी तुझ्या वर निष्ठा ठेऊन कविता करीत आहे ह्मणून त्या कवितेंत जरी दोष असले तरी मला यमाची भीति नाहीं असें कवी ह्मणतात. ८ रक्षण.

कवनाची गति नेणें तरि मी लागेन साधुंच्या पायां ।
वायां हेतं न करितां देतिल दावूनि मार्ग सोपा या ॥ २७ ॥
वाटे पूर्ण भरंवसा मजला त्यांची कृपाच तारील ।
वारील भवजलातें भीति मनाचीहि दूर सारील ॥ २८ ॥
मग निर्भय चित्तानें गाइन हरिच्या गुणांसि बहुधा मी ।
सज्जनपदप्रसादें उद्धरले अज्ञ जनहि बहु धार्मी ॥ २९ ॥
आहे मन या वाटे तरि वाटेनाचि भरंवसा याचा ।
कीं याचा हा राहिल प्रभु चरणीं नित्य भरं वसायाँचा ॥ ३० ॥
चंचलता अति याची, याची विषयादि भोग भलतेची ।
चळतेंचि, प्रभु–चरणीं वसणें तरि या जिवासि बल तेंची ॥ ३१ ॥
कथिलें जरि बहुतर तरि बहु तरँतरि यां जिवासि विषयाची ।
याची तेंवि दिसे परि सांडुनि अमृतासि जेंवि विष याची ॥ ३२ ॥
याकरितां हे देवा हेवा न करोचि हा सदा साचा ।
साचा तूंचि कळाया, करि या दासासि दास दासाचा ॥ ३३ ॥
नाहीं तरी पतगसा धांवे दीपावरी मरायातें ।
यातें कोण निवारी सांगें तुजवीण रामराया तें ॥ ३४ ॥
बहुवार जन्ममरणा भोगुनियां कष्टला तरी गायें ।
विषयातेंचि, वळेना दे जैशी कष्ट लातरी गाय ॥ ३५ ॥
लावावें सुपथीं या, हीच असे हे दयाकरा विनती ।
प्रणतिप्रिय तूं भगवान् सांडुनि कवणास म्या करावि नती ॥३६॥
प्रभुजी द्याल हवाला सुजनांचा, तरि पडावया पायां ।
आहे सिद्धचि, तेही करितिल करुणार्द्र दूर तापा या ॥ ३७ ॥

१ इच्छा. २ घरीं (संसारांत राहून). ३ दृढ इच्छा. ४ राहण्याचा. ५ यांचा करी. ६ चलन पावतें. ७ तळमळ. ८ त्या चरणाचा अन्वय असा:–'याची तेंवि परि दिसे जेंवि अमृतासि सांडुनि विष याची.' याची अशी रीत दिसते कीं, जसें अमृताला टाकून विष मागावें. ९ पतंगासारखा. १० गायन करी. ११ नमन.

कवनाची गाति नेणें तरि मी लागेन साधुंच्या पायां ।
वायां हेतें न करितां देतिल दावूनि मार्ग सोपा या ॥ २७ ॥
वाटे पूर्ण भरंवसा मजला त्यांची कृपाच तारील ।
वारील भवजलातें भीति मनाचीहि दूर सारील ॥ २८ ॥
मग निर्भय चित्तानें गाइन हरिच्या गुणांसि बहुधा मी ।
सज्जनपदप्रसादें उद्धरले अज्ञ जनहि बहु [2]धामीं ॥ २९ ॥
आहे मन या वाटें तरि वाटेनाचि भरंवसा याचा ।
कीं याचा हा राहिल प्रभु चरणीं नित्य भर[3] वसायाँ[4]चा ॥ ३० ॥
चंचलता अति याची, याँ[5]ची विषयादि भोग भलतेची ।
चळें[6]तेंचि, प्रभु-चरणीं वसणें तरि या जिवासि बल तेंची ॥ ३१ ॥
कथिलें जरि बहुतर तरि बहु तरं[7]तरि यां जिवासि विषयाची ।
याँ[8]ची तेंवि दिसे परि सांडुनि अमृतासि जेंवि विष याची ॥ ३२ ॥
याकरितां हे देवा हेवा न करोचि हा सदा साचा ।
साचा तूंचि कळाया, करि या दासासि दास दासाचा ॥ ३३ ॥
नाहीं तरी पतगसा[9] धांवे दीपावरी मरायातें ।
यातें कोण निवारी सांगें तुजवीण रामराया तें ॥ ३४ ॥
बहुवार जन्ममरणा भोगुनियां कष्टला तरी गायें ।
विषयातेंचि, वळेना दे जैशी कष्ट लातरी गाय ॥ ३५ ॥
लावावें सुपथीं या, हीच असे हे दयाकरा विनती ।
प्रणतिप्रिय तूं भगवान् सांडुनि कवणास म्या करावि[10] [11]नती ॥३६॥
प्रभुजी घाल हवाला सुजनांचा, तरि पडावया पायां ।
आहे सिद्धचि, तेही करितिल करुणार्द्र दूर तापा या ॥ ३७ ॥

---

१ इच्छा. २ घरीं (संसारांत राहून). ३ दृढ इच्छा. ४ राहण्याचा. ५ यांचा करी. ६ चलन पावतें. ७ तळमळ. ८ त्या चरणाचा अन्वय असा:—'याची तेंवि परि दिसे जेंवि अमृतासि सांडुनि विष याची.' याची अशी रीत दिसते कीं, जसें अमृताला टाकून विष मागावें. ९ पतंगासारखा. १० सायत्न करी. ११ नमन.

परि अवधी अत्यल्पाचि ह्मणवुनि भीती मनासि बहुतर ती ।
वाटे, वाटेसि कसा त्या मी लागेन जन बहू तरती ॥ ३८ ॥
ठेवा अभयकरातें शिरिं याच्या, त्वरित कार्य साधेल ।
बाधेल भव कशाला ? सहजचि सन्मार्ग यासि लाधेल ॥ ३९ ॥
धरिली त्या समयाची आस मनीं पुरविणार तूंचि हरी ।
धरिशी रूपें बहुधा वात्सल्यें, भवभयासि त्वरित हरी[1] ॥ ४० ॥
दीनानें हीनानें विनवावें काय तुज तरी गावें ।
धांवे पावें द्यावें दर्शन दासासि वंदितों भावें ॥ ४१ ॥
टपतो काळ निरंतर ग्रासायाचा मनीं धरुनि भाव ।
होइल काय प्रभुजी दीनाचा या स्थळीं मग निभाव ॥ ४२ ॥
झाली अधीरता बहु ह्मणवुनि करितों पुनःपुन्हां नतिला ।
यावें, दर्शन द्यावें, पावें त्वत्प्रेक्षणें जगद्भ्रातिला[3] ॥ ४३ ॥
त्यांत तुह्मां हा भारी जड गमला कॉय काय ताराया ।
तरि गजपतिचें आणा वृत्त मनीं सकल–देवता–राया ॥ ४४ ॥
काळाचें भय पोटीं येतां होतोंचि घाबरा जीव ।
यास्तव दयार्द्रचित्तें दावावें त्वरित पादराजीव[6] ॥ ४५ ॥
काल जगद्भक्षक तो, यांची धरणार भीड काशाला ।
योजीलचि मत्कंठीं अवधी सरतांचि तूर्ण पाशाला ॥ ४६ ॥
धांवा, पद या दावा, भावानें विनवितों, नसे कावा ।
ठावा दास असावा, घेतों नांवा, न दूर टाकावा ॥ ४७ ॥
होईल कृपाचि जेव्हां नाहीं धरणार भीति यम कां ही ।
यमकांहीं[10] गुण वर्णिन जरि मज ठावा नसे नियम कांहीं ॥ ४८ ॥

---

१ हरण करी. २ हेतू. ३ चंचलगती, चतुर्थ चरणाचा भावार्थ—तुझ्या दृष्टीनें चंचल स्थिति नाहींशी व्हावी ह्मणून. ४ देह. ५ गजेंद्राचें. ६ पदकमल. ७ माशी. ८ ढोंग. ९ आर्या २४ वरील टीपेंतील नियम पाहावा. कवीनें ती कल्पना येथें जास्त स्पष्ट केली आहे. कवी ह्मणतो तुझी कृपा झाल्यावर यमच मला भिणार आहे. तेव्हां जरी मला काव्याचे नियम माहीत नाहींत तरी मी निर्भयपणानें वाटेल तशा यमकांनीं तुझे गुण वर्णन करीन. १० यमकांनीं.

तोंवरि[1] लावा सुपथीं देंउनि दीनासि या सुमति कांहीं ।
र[2]ति कांहीं उपजाया वाटचि देवा अनन्यगतिका ही ॥ ४९ ॥
मग कां तरि ही राहिल भीती मन्मानसांत जी भरते ।
भरतें प्रेमासि न कां येइल, नामीं अखंड जीभ र[3]ते ॥ ५० ॥
गिरिवासिस्त —आर्या झाल्या संपूर्ण याचि पन्नास ।
प्रभुनें स्वयें विरचिल्या गातां करितील भवविपन्नास[4] ॥ ५१ ॥
त्याचा तोचि वदवितो कैचें सामर्थ्य पामरा जीवा ।
करितो कृतार्थ दासा चित्तीं वसवूनि पाद[5]राजीवा ॥ ५२ ॥

---

१ या आर्येचा भावार्थ—यमाला माझी भीति वाटेंपर्यंत मला कांहीं सुमति देऊन सन्मार्गाला लावा. कारण तुझ्या स्तवनाची प्रीती मनांत उपजण्याकरितां देखील तुझी कृपा हीच केवळ एक वाट आहे दुसरी नाहीं. २ प्रेम. ३ रमते. ४ संसार-संबंधी विपत्तीचा नाश. ५ पदकमला.

P. Ganpat H. Malodia

श्रीहनुमंत प्रार्थना.

(यांत कवीनें शंका समाधान फार उत्तम तऱ्हेनें केलें आहे.)

आर्या.

बा मारुते दयाळा तारावें या भवाब्धिपतितासी[1] ।
घालिति औदार्ये बहु भोजन समयीं अल्यासि अतितासी ॥ १ ॥
श्रीरामें तरि तुजला जनकल्याणार्थ ठेविलें मागें ।
मागे[2] तें पुरवावें, भजका द्यावें न काय तो मागे ॥ २ ॥
घेसी नाम जयाचें त्यां रामाचीच नाममुद्रा[3] ही ।
वाहे दास मुखीं कीं उतरुनि देणार भवसमुद्रांही ॥ ३ ॥
मुद्रांकितासि[4] सत्वर तारावें हा निदेश रामाचा ।
आहेचि, तरी मग तो करणें बहु वेळ काय कामाचा ॥ ४ ॥
नामाचा महिमा जरी आहे अद्यापि, तरिच तार[5] कसा ।
तारक[6] सारे ह्मणती न दिसे यालाचि तो उतार[7] कसा ॥ ५ ॥
जरि[8] ह्मणसी भावानें नाम न घेईल तो कसा तरतो[9] ।
तरि तो नसेल कथिला. राम दयाळूच. दे न अंतर तो ॥ ६ ॥
पाहुनि मुद्रा प्रभुची तारावें तूर्ण[10] बहु बरें दिसतें ।
उपकृति घडे जनावरि मानावे कां न बहु बरे दिस[11] ते ॥ ७ ॥

---

१ भवसमुद्रांत पडलेल्यास. २ मागेल. ३ कवी अहोरात्र "**आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदां** × ×" हा प्रसिद्ध श्लोक नेहमीं ह्मणत असत. ४ नामस्मरण करणारास. ५ उद्धार कर. ६ तारणारा. ७ उतरून जाण्यास मार्ग. ८ भावार्थ—असें ह्मणशील कीं, जो नाम घेत नाहीं तो कसा तरावा? तर असा कोणाही रामप्रभुनें सांगितला नसेल. कारण तो दयाळू आहे आणि कधींही कोणाला अंतर देत नाहीं. ९ उद्धरून जातो. १० सत्वर. ११ दिवस—या आर्येचा अर्थ असा दिसतो कीं, ज्या दिवशीं जनांवर उपकार होतो ते दिवस चांगले कां बरें मानूं नयेत ? शिवाय प्रभुची मुद्रा 'आर्या ३ मध्यें सांगितलेली' पाहूनि तारावें हेंच ठीक आहे.

या भवपारावारीं मार्गचि दिसता, कशास मग नमितों ।
क्रमितों मार्ग सुखें, परि शक्य तरायासी बा असे न मि तो ॥८॥
यास्तव दया करुनियां तारावें या दिनासि, इच्छितसें।
इच्छित सेवन करविसि अन्यहि देईल काय इच्छि तसें ॥ ९ ॥
तुज वांचुनि इतरांतें प्रार्थुनि होणार काय सांग मला ।
विमलांतःकरणानें तारिसि ऐसाचि भरवंसा गमला ॥ १० ॥
परि लाविसी उशिर, याकरितां थाराहि संशयें धरिला ।
कीं तारुनि इतरांतें दीनाचि अद्यापि कां न उद्धरिला ॥ ११ ॥
आहे श्रुत रामानें तुजला या योजिलें असे कामीं ।
कामीजनासि तारिसि, सांगे त्यासमहि बा नसे कां मी ॥ १२ ॥
किंवा पापि मुखीं या बसली मुद्रा ह्मणूनि तिज लागीं ।
आली उणीवता तरि दिधली त्या प्रभुवरेंचि मजलागीं ॥ १३ ॥
नामचि घेतां प्रभुचें तरती सर्वत्र हें जगा ठावें ।
तरि उद्धरणा अपुल्या जाउनि कवणासि आजि गांठावें ॥ १४ ॥
वाटे या नामाला झाले बहु दिस ह्मणूनि गुण त्यजिला ।
तरि होईल व्यर्थ कसें नामचि वदनीं धरूनि प्रभु यजिला ॥ १५ ॥
नाम मुखीं असल्यावरि मग तो पापी असो नसो, सुकृती ।
विकृती होइल कैसी धरिली ज्यानें सुसाधुची प्रकृती ॥ १६ ॥

---

१ भवसागर तरून जाण्याला. २ तिसऱ्या चरणाचा भाव—मार्ग असला तरी मी तो तरावयास समर्थ नाहीं ३ कवीचें आडनांव पतकी आहे. पतकी व पातकी एकच, असें धरून कवी ह्मणतात कीं, यां मुखीं पापी मुद्रा—पतकी नांव आहे ह्मणून उणीवता आली असें ह्मणाल तर तें नांव मला प्रभुनेंच दिलें आहे. ४ उद्धार करण्याकरितां. ५ पूजिला. ६ या आर्येचा भावार्थ—मुखांत नाम असल्यावर मग तो पापी असो अथवा नसो त्याला सुकृतीच गणावा. चांगल्या साधूचें सोंग जरी आणलें तरी त्यापासून विकृती कशी होईल ? होणार नाहीं. त्यापासून त्या सोंगाड्याला फायदाच होईल. ७ पुण्यवान. ८ सोंग.

प्रभुचें नामचि तारी, वारी भवबंध, आपदा[1] हारी[2] ।
मारी रिपुषट्[3]कातें, बसवी नेऊनि सुरवरां[4]-हारीं ॥ १७ ॥
कां गेला नामाचा गुण, न कळे जाहलें कसें विरसं[5] ।
सुरसपणाही[6] त्यजिला, करितें दासासि कां असें विरस[7] ॥ १८ ॥
किंवा वदलों स्वमुखें 'घेतां नामासि रामरायाच्या'
गर्वोक्तिस्तव लपल्या तुमच्या युक्ती दया करायाच्या ॥ १९ ॥
तारि हें मन्मूर्खत्व, प्रभु तू दोषज्ञ[8] जरि असा असती ।
जगदुद्धारालागीं होउनियां सिद्ध मग कसा बससी ॥ २० ॥
आलों अनन्यभावें शरण तुला हा भवाब्धि उतराया ।
उतराया तूंचि क्षम तरीचें[9], ह्मणशी जनासि उतरा या ॥ २१ ॥
प्रभुनें अंतर न कधीं दिधलें भजकां असेंचि जन गाती ।
जाती[10] न पाहिली कीं गोष्टहि ठावी असेल तुज गा, ती ॥ २२ ॥
प्रभुला[11] जें प्रिय असतें त्याचा स्वीकार सूज्ञ जन करिती ।
तूं तरि प्रियपात्रचि कीं, त्यागावी काय सांग जनकरिती[12] ॥ २३ ॥
प्रभुचा भाव असा कीं सर्वांवरि सारखी दया करुनी ।
तारावें दीनजनालागीं भवसिंधुमाजि करें[13] धरुनी ॥ २४ ॥
या करितांचि चिरंजिव करुनि तुला ठेविलें असावेंची ।
वेंची[14] प्राणाचि अपुले, तरि तो जन-पातकें कसा वेंची ॥ २५ ॥

---

१ कष्ट. २ हरण करतें. ३ कामक्रोधादि सहा शत्रूंस. ४ सुरवरांच्या पंक्तींत ५ रसरहित. ६ गोडी. ७ खट्टू. ८ दोषज्ञ-विद्वान् विपश्चित् दोषज्ञः-अमरकोश. ९ समर्थ नौका. १० जात. ११ भावार्थ-प्रभुला जें आवडतें त्याचा स्वीकार शहाणे लोक करतात. तूं प्रभुला प्रियच आहेस ह्मणून आमच्या वाडवडिलांनीं तुझें अवलंबन केलें आहे. मग ती रीत मी आतां कशी सोडावी? १२ वडिलांची रीत. १३ हात. १४ आपले प्राणच जो वेंचूं लागतो ह्मणजे आपल्या प्राणांचीच जो पर्वा करतो तो दुसऱ्यांच्या पातकांचें निरसन कसें करील? जनांचीं पातकें वेंचून काढून टाकण्यांत प्राणांचीही पर्वा करणार नाहींस ह्मणूनच तुला चिरंजीव करून ठेवलें असावें-असा भाव.

जगतीवरि[1] या राहुनि दुरितें[2] जनांचें समस्त वारावें ।
तारावें पतितासी दिवस अशा सुकर्मेंचि सारावे ॥ २६ ॥
तरिहि उपेक्षा करिसी याचें मज फारसें नवल वाटें ।
कीं[3] वाटेवरि असतां जावें अनभिज्ञ[4] काय अडवाटें ॥ २७ ॥
रामप्रभुला ऐसी अलक्षता[5] काय गोड वाटेल ।
दाटेल प्रेम हृदयीं, तुज विषयीं मात्र चित्त फाटेल[6] ॥ २८ ॥
जरि ह्मणसी प्रियकर मी प्रभुचा, मज अन्य काय करणार ।
तरि तो असे दयाळू, करितां बोभाट हात धरणार ॥ २९ ॥
यापरि[7] वदतांचि घडे त्वदतिक्रम[8]–दोष काय सामान्य ।
निंदास्पद झाल्यावरि प्रभुला होइल तरी कसा मान्य ॥ ३० ॥
त्वदतिक्रमेंचि घडतें कारण प्रभुलागिं अंतरायाचें ।
याचें फल तेंचि सदन पहावें लागेल अंतरायाचें ॥ ३१ ॥
न वदावें म्यांहि असें परि झाली बहु अधीरता यासी ।
तव पदयुगुलीं व्हावें सुकृतचि निर्मळ अधीं रतायासी[10] ॥ ३२ ॥
उरली अवधी किंचित् यालागीं चित्त घाबरें होतें ।
हो[11] ते[12] उद्धरले जन, ह्मणतां वाटे न या बरें हो तें ॥ ३३ ॥
घडि घडि नाश वयाचा होतो, नाहींच भरंवसा याचा ।
तुझिया पायां वांचुनि ठाव दिसेनाचि मज वसायाचा[13] ॥ ३४ ॥

---

१ पृथ्वीवर. २ पातक. ३ भावार्थ–मी वाटेवरच असतांना, जसें काय ठाऊकच नाहीं अशा रीतीनें, आड वाटेनें निघून तूं जावेंस काय? ४ अज्ञानी. ५ हेळसांड. ६ बिघडेल ७ वरील आर्येमध्यें कवीनें हनुमंताला अलक्षतेबद्दल दोष दिला. पण, पुढें कवी ह्मणतो, हा दोष देण्यांतही मी तुमचा अतिक्रमच करीत आहे, आणि अशा त-ऱ्हेच्या अतिक्रमानें निंद्रास्पद झाल्यावर प्रभुची कृपा होणार नाहीं, व यमाचें घर प-हावें लागेल. तथापि कवी आर्या ३२ मध्यें ह्मणतो, मी तरी काय करूं? मी तुह्माला असें बोलूं नये, पण—८ अमर्यादा. ९ यमाचें. १० रममाण होण्यास. ११ अहो १२ पुष्कळ लोक. अन्वय—होते जन उद्धरले ह्मणतां या तें बरें न वाटे हो. अर्थ—अहो पुष्कळ लोक उद्धरले असें जर ह्मणाल तर तें मला बरें वाटत नाहीं हो. १३ राहण्याला.

तारिसि अन्य जनाला, दाखवि यालाहि तो उपाय बरें।
काय बरें ते तारिति एका अन्या न तेचि पाय बरें ॥ ३५ ॥
दोष[1] न तो पायांचा; याचा यालाचि भाव हा फळतो।
मळतो अंतःकरणें, त्या लागीं शोध, काय हा कळतो ? ॥ ३६ ॥
नसतों अपराधी मी अपराधी[2] कासया मनीं धरितों।
करितों चित्त विमल तरि तूंही ह्मणतासि आजि उद्धरितों ॥३७॥
काय करावें म्यां तरि, स्थिरता नाहींच या मना हो ती।
होती शुद्धी तरि मग सहजाचि संपूर्ण कामना होती ॥ ३८ ॥
चंचलता अति याची, झालों असमर्थ आवरायाला।
याला पुसतों हें कीं झालें तुज काय बावरायाला[3] ॥ ३९ ॥
ह्मणतों मनासि बा तूं जीवाला बंधमुक्तहेतुकर[4]।
हें तूं कर कार्य सख्या रामाच्या दर्शनासि हेतु[5] कर ॥ ४० ॥
होइल कृतार्थता तरि भेटहि देईल राम तो यातें।
मग तें काय अशक्याचि उतरुनि जाणें भवाब्धितोयातें[6] ॥ ४१ ॥
तरि निश्चलता न धरी मन, याचें पूर्व कर्म बळकट कीं।
बळ कटकीं[7] एकाचें चालेना, गोष्ट ही नसे लटकी ॥ ४२ ॥
या करितांचि सहाया सन्मति या लागिं दे दया-निलया[8]।
विलया[9] जाइल पातक होइल संशुद्धि मानसीं किलं[10] या ॥ ४३ ॥
अंतचि बघसी जरि तूं धीर नसे यास हें मनीं आण।
जाणसि अंतर तरि मग वाहुनि सांगूं कशास मी आण ॥ ४४ ॥

---

१ ही शंका स्थापित करणारी आर्या दिसते. कवी ह्मणतात तुह्मी ह्मणाल तर कवी उत्तर देतात कीं हा पायांचा दोष नाहीं. याचाच भाव याला फळतो. ' यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ' मनानें हा मळतो. त्याला अगोदर शोध. शुद्ध कर. तर कवि उत्तर देतात कीं ही गोष्ट याला काय कळते ? २ कुबुद्धि. ३ चंचल होण्याला. ४ बंधाला व मुक्तीला कारण. ५ इच्छा. ६ संसार समुद्राचें पाणी. ७ सैन्यामध्यें. ८ दयेचें आगर असा, ९ नाहींसें होईल. १० खरोखर.

जरि ह्मणसी " अधिर असा होउनि वदतोसि फार धीटपणें
तरि हा दोष न याचा काळाचें जाचतें मनीं टपणें ॥ ४५ ॥
या लागीं विनवीतों वदलों अतिरिक्त[1] तें क्षमा करिसी ।
धरिसी करीं[2] तसें या भगवंतें तारिलें जसें करिसी[3] ॥ ४६ ॥
दीनत्राणार्थ तुझा अवताराचि या जगीं असें गाती ।
गा[4] ती गोष्ट न लटकी सुरवरमुनिजनमुखीं असे गा[5] ती ॥ ४७ ॥
हरले यत्न सकल, हा झाला बहु दीन, दास सांभाळ ।
भाळलिखित[6] खोडाया शक्तचि तूं, ठेवितों पदीं भाळ[7] ॥ ४८ ॥
तारावें पतितासी या वांचुनि अन्य कामना[8] नाहीं ।
नाहीं अशक्य, तरि मग तुझिया येणार कां मना नाहीं ॥ ४९ ॥
दृढतर भाव असावा तव चरणीं हेंचि दान दे गा या ।
गा या मति बहु सरसी अनुदिनि भगवद्गुणासि दे गाया ॥५०॥
हनुमंतस्तवनाच्या झाल्या आर्या समग्र पन्नास ।
अनुदिनि गातां सत्वर तारिति भवसागरीं प्रपन्नास[9] ॥ ५१ ॥
गिरिवासी रामाच्या पदपंद्मीं[10] मारुति भ्रमर झाला ।
झाला पूर्ण मनोरथ नमितों मीं त्याचिया पदरजाला ॥ ५२ ॥

---

१ अधिक उणें. २ हातीं. ३ गजेंद्रास. ४ गातात. ५ अगा. ६ नशिबीं लिहिलेलें. ७ मस्तक. ८ इच्छा. ९ शरणागतास. १० पदकमलीं.

अपराध निवेदन व उद्धारार्थ ईश-प्रार्थना.

(हें प्रकरण कवीनें वृद्ध वयांत रचलेलें दिसतें. यांत कवीच्या चरित्राचे कांहीं कांहीं प्रसंग सुचित केलेले दिसतात. आर्या सोप्या व सरळ आहेत. या आर्या अपूर्ण असाव्यांत असें दिसतें. कारण कवीच्या पद्धती प्रमाणें ' गिरिवासी ' हें पद शेवटीं आलें नाहीं. पण आहेत त्याच कविता फार उत्तम आहेत.)

आर्या.

या सम हा अपराधी दुसरा कोणी नसेल आढळला ।
वळला, तथापि तव पद्प्राप्तीपासूनि पुनरपी ढळला ॥ १ ॥
पडलें श्रवणीं याच्या हरिगुण गानेंचि विश्व हें तरतें ।
परि तें सारुनि परतें ग्राम्य गितचि गाइलें निरंतर तें ॥ २ ॥
ऐसे अन्याय किती केले, त्याला नसे मिती[1] कांहीं ।
नाहींच मनीं धरिलें जरि मज उपदेशिलें कितीकांहीं ॥ ३ ॥
केला घात असा म्यां अपुला, कथितों पदासि धीटपणें ।
नीटपणें वदल्यावरि करिशिल तूं ही दया अवीटपणें[2] ॥ ४ ॥
विनवीतों यासाठीं तुजविण कोणी नसे दयाळु बरा ।
ह्मणसिल कदापि न असें 'वृद्धपणीं प्रार्थितो पहा लबरा' ॥ ५ ॥
झाला अपराध खरा तव पायीं हा निवेदितों सारा ।
सार असारा मानुनि भजलों मीं या अनित्य संसारा ॥ ६ ॥
कळलें स्पष्ट अतां मज कीं बुडतों या भवांबुडोहींच ।
नीच असुनि उद्धरिला हरिनें वार्ता जगीं उडो[3] हीच ॥ ७ ॥
तूं न उपेक्षा करिसी विनवीतों मोकळ्या मनेंचि पदा ।
सुपदासि पाववी मज वारुनिया जन्ममृत्युची आपदा[4] ॥ ८ ॥

---

१ संख्या. २ न कंटाळता. ३ प्रसिद्ध होवो. ४ कष्ट.

आंतर सर्वांचें तूं जाणसि तरि सांगणें हि काशाला ।
पाशालाचि यमाच्या भीतों, दावी पदप्रकाशाला ॥ ९ ॥
वय घालविलें वाया, न सुचे आतां उपाय तो यास ।
काळानें आंवंतिलें[1], उतरूं कैसा भवाब्धितोयांस[2] ॥ १० ॥
आठवतें मात्र मनीं देवा सेवा तुझी नसे घडलीं ।
पडली भ्रांति निरंतर क्षणिक सुखाची स्पृहा[3] असे जडली ॥११॥
लेश सुखाचाहि नसे तरि मन चरणाकडे न लागे हें ।
मागें हेंच अखंडित धन सुत दारा असो मला गेहें[4] ॥ १२ ॥
तरि ही चित्ता जोगें प्राप्त न झालेंचि फळ कधीं हो तें ।
तळमळ शमल्या वांचुनि हरि तव प्राप्ती उगी कशी होते ॥ १३ ॥
असतों अधींच सावध तरि भवपाशांत कासया पडतों ।
परि झालें आमिषानें[5] मीन जसा त्या गळांत सांपडतो ॥ १४ ॥
जरि मज कळलें होतें सत्सहवासें असंख्य जन तरले ।
तरि मोघाशा[6] बळकट यास्तव त्यांचेहि पाय अंतरले ॥ १५ ॥
यत्न न केलाच कधीं मन तव चरणाकडेस वळवाया ।
पळ वायाहि न जावें घालविलें म्यां असें सुवय वाया ॥ १६ ॥
देवा होसि दयाघन मन तव चरितामृतांत दे वाहो ।
लाहो हाचि पुरे मज केव्हां ह्मणसील सांग देवा हो ॥ १७ ॥
केले उपकार तुवां दीनावरि ते न काय मानावें ।
वानावें नित्य, परी स्मरलों नाहींच मीं तुझीं नांवें ॥ १८ ॥
सद्वंशीं जन्म दिला अति दुर्मिळ जें द्विजत्व तेंहि तसें ।
हित सेवन चरणाचें असतांही, मानिलें न तें हितसें ॥ १९ ॥

---

१ बोलाविलें. २ संसाररूपी समुद्राचें पाणी. ३ इच्छा. ४ घरें. ५ मांसाच्या गोळ्याचा लोभ. ६ पोकळ आशा. भावार्थ–सत्सहवासानें असंख्य जन तरले हें जरी मला कळालें तरी पोकळ गोष्टींचीं आशा मनाला बळकट लागलेली होती ह्मणून त्यांचेही पाय अंतरले.

पुर्वील कर्में देवा आलों उदरासि मी स्वजननीच्या ।
वांचविलें त्वां तेथें रक्षुनि प्राणासि याहि जन नीच्या ॥ २० ॥
सांगावें दुःख किती, उपमा नाहींच द्यावया जगतीं ।
करिसी दया सदय तूं ह्मणवुनि प्राणी अशा स्थळीं जगती ।२१॥
कां न कृतघ्न ह्मणावा मळमूत्रामाजिं वास जंव घडला ।
स्मरला नित्य कसा हो बाहिर येतांचि कां विसर पडला ॥ २२॥
काय स्वतंत्रपणा तयिं होता संप्राप्त जाहला यासी ।
केवळ लुलितवपुच कीं नव्हतें सामर्थ्यही हलायासी ॥ २३ ॥
तरिही मातेच्या स्तानिं पय निर्मियलें अशांसि वांचाया ।
मोहें माता पाजी, नसतां तरि सोसिती न जाचा या ॥ २४ ॥
समजावी बहु रडतां क्षणहि उपेक्षा करीच ना मांया ।
वायां श्रम कां करि ती वाटे संपूर्ण ही तुझी माया ॥ २५ ॥
मायेनें जग पाळिसि स्पष्टचि दिसतें समस्त लोकांस ।
जरि तव माया नसती पुसती माता कधीं न तोकांस ॥ २६ ॥
ऐसे अन्याय सकळ घालुनि पोटांत पाळिलेंस मज ।
झालों थोर क्रमानें आली कांहीं हळूं हळूं समज ॥ २७ ॥
तेव्हांहि हा न वळला भर तारुण्यांत कायदे वाची ।
सेवा वृद्धपणांतचि ह्मणवुनि निःशंक काय देवाची ॥ २८ ॥
सोडुनि पाय तुझे हरि भजलों कीं त्या धनांध लोकांस ।
वोकांस खर्चिलें धन पाळाया आप्त--दार--तोकांस ॥ २९ ॥
सद्व्यय नसेचि घडला देवातिथिपूजनाचिया कामीं ।
विन्मुख होऊनि सदा स्मरला वेश्यादिकांसि हा कामी ॥ ३० ॥

---

१ वांचतात. २ माता. ३ मुलांस. ४ कवी कमीशनरचे शिरस्तेदार होते. त्या वेळेस त्यांनां कायद्याचा अभ्यास करावा लागे. त्याला अनुलक्षुन हें आहे. ५ अन्वय,--देवाची सेवा वृद्धपणांतचि ह्मणवुनि काय निःशंक, अर्थ--देवाची सेवा ह्मातारपणींच करावी असें ह्मणून जणूं काय हा निःशंक बसला. ६ घरास. ७ स्त्री. ८ मुलांस. ९ कामातुर.

होती काय जरा बहु दूर, तिनें गांठिलेंचि मग या हो ।
अवधी सरतां नेतिल ह्मणातिल यमदूत काय मग याहो ॥ ३१ ॥
यासाठीं बहु भीतों देवा तुजला असो दया माजी ।
उरली अवधी किंचित् जप तप होणार काय या माजी ॥ ३२ ॥
दावी उपाय सत्वर नसतां बुडतोंचि पापडोहांत ।
उद्धरिले जन पुष्कळ या दीना तोंचि सांपडो हात ॥ ३३ ॥

पृथ्वी छंद.

जसा भ्रमर[2] सारसा[3] हुडकितो[4] तसा हा जन[5] ॥
प्रभो द्रवुनियां[6] करा स्वपद[7]–सारसा–भाजन ॥
असे न गति या दुजी पदरजीं[8] धरी आसरा[9] ॥
मरेल मिन[10] घातिल्या मधु दुधाचिया ही सरा[11] ॥ १ ॥

---

१ माझी. २ भिंगोटा. ३ कमलास. ४ शोधून काढतो. ५ हा दास. ६ दयार्द्र होऊन. ७ आपल्या पदकमलीं रहाण्यास पात्र. ८ चरण–धूलिकेंत. ९ आश्रय. १० मासा. ११ सरोवरांत. या चरणाचा अर्थ,–मधाच्या अथवा दुधाच्याहि सरोवरांत मासा टाकला तरी तो मरेल.

मल्लारि आख्यान.

कथा-सारांश.

मणी व मल्ल असे दोन राक्षस ब्रह्मदेवानें दिलेल्या वरामुळें पृथ्वीवर फार उन्मत्त झाले होते. त्यांनी गाई व ब्राह्मण यांनां फार त्रास दिला. तेव्हां ब्राह्मण त्रस्त होऊन इंद्राकडे गेले, व त्यास त्यांनीं आपली हकीकत सांगितली. इंद्र ब्राह्मणां-सह वैकुंठीं गेला. व त्यानें सर्व हकीकत श्रीविष्णूस सांगितली. विष्णूनें सांगितलें कीं, ते राक्षस महादेवाशिवाय मरावयाचे नाहींत. नंतर सर्व कैलासास गेले, व त्यांनीं सर्व प्रकार श्रीशिवास निवेदन केला. शिवानीं त्या राक्षसांचें पारिपत्य करण्याचें अभिवचन दिलें; व प्रेमपुरास, म्हणजे बिदरा नजीक मैलार म्हणून खंडोबाचें स्थान आहे तेथें, अवतार घेऊन त्या दैत्यांचा वध केला. ही कथा या आख्यानांत आहे.

आर्या.

आद्ययुगीं मुनिपुंगव[1] असती मणिचूल पर्वतां शिखरीं ।
तपती तीव्र, जयांची भीती होणार वासवासि[2] खरी ॥ १ ॥
ऐसें असतां समयीं आले मणिमल्ल यातुधान–पती[3] ।
आज्ञा करिति बळोतें[4] विप्र-च्छलनार्थ ते महाकुमती ॥ २ ॥
करिती घोष महा ते छेदिति निकुरें[5] महीरुहांस[6] तदा ।
झळकति शस्त्रें उज्वल मिश्रित अर्कांशु-मंडलें[7] शतदा[8] ॥ ३ ॥
पाश गळां घालुनियां भूसुर[9] वापींत[10] मज्जिले[11] सकल ।
तर्जुनि[12] तत्बाळांतें द्विजवनितालाहि ते करिति विकल ॥ ४ ॥
कर्म करुनियां ऐसें गेले चंडाळ ते दळासहित[13] ।
करिती विचार द्विज मग योजावें काय निजकुळास हित ॥ ५ ॥

---

१ मुनिश्रेष्ठ २ इंद्रास. ३ राक्षसाचे स्वामी. ४ सैन्याला ५ निकरानें. ६ झाडें. ७ सूर्य किरणांची मंडलें यांनीं ८ अनेक वेळ. सूर्य किरणाचें प्रतिबिंब व पुनः त्याचें एका शस्त्रांतून दुसऱ्या शस्त्रांवर पडलेलें प्रतिबिंब, याप्रमाणें अनेक प्रतिबिंबांनीं मिश्रित झाल्यामुळें त्यांचीं तीं शस्त्रें उज्वल दिसत होती. असा भावार्थ. ९ ब्राह्मण. १० विहिरींत. ११ बुडविले. १२ कापून टाकून. १३ सैन्यासह.

झाले कष्ट बहुतसे त्राता नाहींच कीं अहो जगतीं ।
इंद्रादिकां अनावर भूपाति समरांत काय हो जगती ॥ ६ ॥
शापुनि भस्म करावें हानि तपाची निशंक होणार ।
यास्तव भीतों चित्तीं अभय तरी आजि कोण देणार ॥ ७ ॥
झाले यापरि सारे भय-विव्हल मानसीं धरामर[1] ते ।
करिते कोण तयाला परते[2] जरि लंघुनि कडा[3], मरते ॥ ८ ॥
दुःखाकुल मुनिवर ते घेउनि स्वकुटुंब धेनु कळपाला ।
जाती स्थलांतरातें मिळविति काष्टें पळाशें मुळ-पाला[4] ॥ ९ ॥
घाला घालायाला येतिल मंडप उगाचि हो घाला ।
नव्हतें श्रुत दृष्ट कसें अणिलें विधिनें तसेंचि ओघाला ॥ १० ॥
तेथुनि अमरावतिला जाउनियां कळविती सुरेशांही[5] ।
कीं व्हावें अजि दर्शन भाळीं होती असी सुरेशा[6] ही ॥ ११ ॥
देव ह्मणे काय कसा झाला वृत्तांत तो अधीं कळवा ।
तप तेज बहु तुमचें झालिं शरीरें असीं कसीं पळवा[7] ॥ १२ ॥
ह्मणती मुनि अमरेशा काय वदों त्या श्रमां सिमा नाहीं ।
नाहीं घडलें ऐसें जगतीवरि गोष्ट तथ्य माना ही ॥ १३ ॥
येउनियां मणिमल्लें देवा संत्रासिलें[8] न तें कथवें ।
होते राक्षस पुष्कळ भीषणरूपीं सवें[9] अनेक थवे ॥ १४ ॥
व्हावा नाश तयांचा आलों प्रार्थावयासि या करितां ।
होइल सुकीर्ति देवा दीन जनांला करांबुजीं धरितां ॥ १५ ॥
बोले पुलोमजांपति[10] विधि-वरदानें अजिक्य ते असती ।
यास्तव श्रीहरिलागीं प्रार्थावें युक्तिही बरी दिसती ॥ १६ ॥

---

१ ब्राह्मण. २ निवारण. ३ कडेलोट करून घेऊन जरी त्यांनीं आपले प्राण दिले असते तरी त्यांना निवारण करणार होते. ४ इंधन, पळसाच्या मुळ्या आणि पाला. ५ इंद्राला. ६ चांगली रेघ. (सुरेषा) आपलें दर्शन व्हावें अशी आज आमच्या कपाळीं चांगली रेषा होती. ७ क्षीण. ८ फार त्रास दिला. ९ बरोबर. १० इंद्र.

मग ते द्विजवर तेथुनि जाती नारायणां कथायास ।
चित्तीं लगबग सर्वां मानी तरि कोण हो पथायास[1] ॥ १७ ॥
पाहति भूसुर[2] अवघे भद्रासनीं शोभला रमावर[3] हो ।
सृष्टिस्थितिलय कारण सत्ता करणार जो यमावर हों[4] ॥ १८ ॥
दुसरेहि मुक्तिभाजन[5] असती चक्री गदी कमल-धारी ।
अतसीकुसुमसमप्रभ[6] पीतांबर नेसले कनकधारी[7] ॥ १९ ॥
पाहुनि जगतिसुरांला[8] उठला सिंहासनावरील हरी ।
नमन करी साष्टांगें नयनीं प्रेमांबुच्या विपुल लहरी ॥ २० ॥
येणें किमर्थ केलें यातायातींत कष्ट बहु पडले ।
धरिलें असेल चित्तीं श्रवणीं तें तूर्ण[9] पाहिजे पडलें ॥ २१ ॥
देवा मणिमल्लांहीं दिधले जे कष्ट त्या तुंला[10] नाहीं ।
योग्य न तें कळवाया ऐकायातें तसेंचि कांनाहीं ॥ २२ ॥
देव ह्मणे ते यातुप[11] असती विख्यात हो जगाभिंतरीं[12] ।
वरदानबळें मानिती देव द्विज भूपही सकळ भिंतरीं[13] ॥ २३ ॥
आराधिलें विधीला तपः प्रभावेंकरूनि असुरांनीं ।
असती अवध्य सकळां करिल सदाशिव तयास व्यसु[14] रांनीं[15] ॥२४॥
जाउनि शिवासि गाठूं वळवूं वृत्तांत सर्व कळवूनी ।
येतों समागमें मी चित्त करा स्वस्थ भीति पळवूनी ॥ २५ ॥
यावरि श्रीहरि संगें गेले कैलास पर्वतावर ते ।
दिधलें अभय शिवानीं इतरांतें दैत्य काय आवरते ॥ २६ ॥

---

१ रस्त्याचे श्रम. प्रवासाचे श्रम. २ ब्राह्मण. ३ विष्णू. ४ होय. ५ मुक्ती ४ प्रकारची आहे. सलोकता त्या लोकास जाणें, समीपता जवळ राहणें, सरूपता विष्णूसारखें रूप प्राप्त होणें, सयोगता एकरूप होणें. यापैकीं सरूपता मुक्ती ज्यांना मिळाली ते विष्णूप्रमाणें चक्र, गदा, कमल धारण करणारे तेथें होते असा भावार्थ. ६ जवसाच्या फुलांप्रमाणें ज्यांचा वर्ण असे. ७ जरीकांठी. ८ ब्राह्मणाला. ९ लौकर. १० सीमा. ११ दैत्य. १२ जगांमध्यें. १३ भित्री, भ्याड. १४ प्राणरहित. १५ रणांगणीं.

बोले गिरिजावल्लभ जावें निर्भयपणें स्वसदनांसीं ।
येउनि सहसेना मी त्या दुष्टांच्या करीन कदनांसीं ॥ २७ ॥
पूजा करुनि यथोचित सन्मानें प्रेषिलें द्विजांला हो ।
लांहो त्यालाचि न तो झाला संपूर्ण ही प्रजाला हो ॥ २८ ॥
यावरि प्रभुनें केली क्रोधें निर्माण एक घृतमारी ।
भारी सर्व जगां ती दैत्यचमूला कसी न मग मारी ॥ २९ ॥
घेउनि सेना भारी आले मणिमल्ल ज्या स्थळीं हो ते ।
येती वार्ता ऐकुनि दैत्यहि एकेक वीर बलि होते ॥ ३० ॥
झालें युद्ध प्रबळ त्या उपमा नाहींच द्यावयालागीं ।
चालेल कसी मग तरि कविची विस्तर करावयाला गीं ॥ ३१ ॥
मणिकासुर अधि वधिला, मागे वरदान तो शिवाला हो ।
राहो प्रेत पदतळीं आहे संपूर्ण यांत मज लाहो ॥ ३२ ॥
मल्लासुर मग वधिला तोही वरदान द्या ह्मणे देवा ।
यावें मम नाम अधीं ऐसें अभिधान आपुलें ठेवा ॥ ३३ ॥
वर दिधले मग प्रभुंनीं तोषुनि स्तवनासि दैत्यराजाच्या ।
होत्या मति विपरीता झाल्या शिवदर्शनें विमल ज्यांच्या ॥ ३४ ॥
पंच कुमर मल्लाचे राज्यपदीं स्थापना करूं पाहे ।
परि ते नायकती जड केले पर्वत समस्त लवलाहे ॥ ३५ ॥
अवतार प्रभुचा तो ह्मणती मल्लारि देवही ज्याला ।
गोचर सकळांलागीं चंपाषष्ठीस संभ्रमें झाला ॥ ३६ ॥
यात्रार्थ येत सुरगण भूसुर अन्यत्रही प्रजा सकळ ।
भावें पूजिति ज्याचा महिमा ब्रह्मादिकांसही अकळ ॥ ३७ ॥
अज्ञस्थान तयाचें प्रेमें पालीस त्यावरी आला ।
गेला नळदुर्गा मग जेजूरीमाजिं तो प्रगट झाला ॥ ३८ ॥

---

१ सदाशिव. २ वधास. ३ सुख, आनंद. ४ या नांवाची एक कृत्या. ५ वाणी. ६ ज्यांच्या मती विपरीत होत्या पण शिवदर्शनानें त्या शुद्ध झाल्या असा भाव. ७ ब्राह्मण. ८ न कळणारा. याचा भावार्थ–त्याचें स्थान अज्ञ ह्मणजे माहीत नाहीं असें आहे तो प्रेमानें ह्मणजे भक्ताकरितां पाली नांवाच्या गावीं आला ह्मणजे तेथें अवतरला. तेथून नळदुर्गी आला व तेथून जेजुरीत प्रकट झाला. ९ पाली नांवाचें गांव आहे.

याच आख्यानाचीं पदें.

पद–राग जोगी–त्रिताल. (मजला वरिल सुभद्रा काय–या चालीवर.)

(ब्राह्मण खिन्न होऊन आपणांशीं विचार करितात.)

व्याकुळ झाले मुनिवर ते, करिती खेद बहू ॥ धृ० ॥ ह्मणती अतां करावें काय ॥ धरावें अह्मी कुणाचे पाय ॥ देइल कोण असा प्रभु ठाय[1] ॥ करील न्याय हा अमुचा ॥ १ ॥ रुष्टला[2] कां तरि तो यदुराय ॥ घडला काय असा अन्याय ॥ केलें ब्रीद आपुलें काय ॥ न दिसे ठाय जायासी ॥ २ ॥ दिधले कष्ट स्त्रियांसीं फार ॥ ओढिले धरूनि कबरी[3]–भार ॥ ताडिलीं मुलें अती सकुमार ॥ नाहिं विचार हो त्यांसीं ॥ ३ ॥ बुडाविलें कूपीं[4] अमुचे काय ॥ जीवित आशा होती काय ? ॥ रक्षिता गिरिवासी प्रभुराय ॥ भेटेल काय आजि बरें ॥ ४ ॥

पद–पिलू–त्रिताल. (उद्धवा शांतवन कर जा–या चालीवर)

(विप्रस्त्रिया विलाप करतात.)

कां देव क्षोभला नकळे, काय चुकलों आह्मि सेवेला ॥धृ०॥ किति तेज तपाचें यांच्या, मालवलें कैसें बाई ॥ काय सांगावी तरि प्रौढी, मृग व्याघ्रहि एका ठायीं ॥ जलपानालागीं करिती, नसे वैरपणा सहसाही ॥ चाल ॥ तें तप बळ गेलें कोठें ॥ आह्मि दुःख भोगिलें मोठें ॥ दिसे कर्म आपुलें खोटें ॥ पू० चाल ॥ लोटेल काळ तरि कैसा, नाहिं नाश तयांचा झाला ॥ १ ॥ ताडिलें किती बाळांसीं, नाहिं आली करुणा कांहीं ॥ वापींत बुडविले मुनिला, नाहीं भ्याले ते कवणांहीं ॥ केलें विकळ अह्मां सकळांतें, कांहिं धरिली शंका नाहीं ॥ चाल ॥ भस्मिलें[5] न कांहो त्याला ॥ सोडिलें कसें कितवाला[6] ॥ काय तप बळ नव्हतें याला ॥ पू०

---

१ थारा, आश्रय. २ कोपला, रागावला. ३ केश, वेणी. ४ विहिरींत. ५ जाळिलें, भस्म केलें. ६ दुष्टाला.

चाल ॥ झालाचि घात सर्वस्वीं, नाहीं कोणी त्राता उरला ॥२॥
पूजितों नित्य देवांसीं, सुमसुमनें सद्भावेंसीं ॥ काय विसर पडावा अमुचा, ओढितां धरुनियां केशीं ॥ व्यर्थ हो दयाघन ह्मणती, नाहिं सदयपणा त्यापाशीं ॥ चाल ॥ शयें जोडुनि नमिलें त्यासीं ॥ नाहीं आलि दया त्या कैसी ॥ काय नसे जगीं गिरिवासी ॥पू०
चाल ॥ नाशिल कोण दुष्टातें, कां निष्ठुर इतुका झाला ॥ ३ ॥

पद—त्रिताल.

(ब्राह्मण आपल्याच ठिकाणीं प्रभूची प्रार्थना करितात.)

मुकुंदा कशि करुणा त्यजिली ॥ पाउलें नित्य तुझीं यजिलीं ॥ धृ० ॥ जो भजेल मजला नित्य चालविन योगक्षेम त्याचा ॥ या वचनावरि राहिलों काय हा परिणामचि त्याचा ॥ अनुदिनीं मूर्ति तुझी पुजिली ॥ १ ॥ अह्मि ब्राह्मण बहुताचि दीन पीडिलें दुष्ट जनीं बापा ॥ काय कळलें नाहीं तुला पावलों अति दुर्घट तापा ॥ ही सृष्टि तुवां निर्मिली ॥ २ ॥ तूं ह्मणसी अपुल्या मुखें प्रतियुगीं अवताराचि धरितों ॥ रक्षितों संत सज्जना नाश मी दुष्टांचा करितों ॥ निष्ठुरता अजि कां आणिली ॥ ३ ॥ जरि होय अधर्माचरण स्थापना धर्माची करितो ॥ आहे नेम असा हरि तुझा दवडिला आजाचि कां तरि तो ॥ गिरिवासि आस तुझी धरिली ॥ ४ ॥

---

१ पुष्पें, शुद्ध मन व सद्भाव यांनीं. २ हात. ३ निर्दय. ४ पूजिली. ५ योग—नसेल ते, मिळवून देणें. क्षेम—मिळालेल्याचे, रक्षण करणें. " अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ॥ तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहं ॥ (भगवद्गीता अ. ९ श्लोक २२) या श्लोकास अनुसरून हें कडवें आहे. ६ " परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां ॥ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ (भ. गी. अ. ४ श्लोक. ८) या वचनाला उद्देशून हें व पुढील कडवें आहे. ७ आशा.

पद्–साकी

(ब्राह्मण आणखी खेद करितात.)

प्रभो तुह्मारी सुनी प्रतिज्ञा गोब्राह्मण–परिपालनकी ॥ वो आजि छांड दई तुम कैसी दुष्ट–जनन–संहारनकी[1] ॥ १ ॥ कौन हमारो वाली प्रभुजी तुम बिन इस जगतनमो ॥ जाय शरण हम किसे बतलावो देव–धरामर[2]–भूपनमों ॥ २ ॥ मत करियो महाराज उपेछा[3] ब्रीद न छांडो अपनारी[4] ॥ व्याकुळ होत प्राण अब हमको सूख भयो है सपनारी[5] ॥ ३ ॥

पद्–(गड्यांनो कृष्णगडी–या चालीवर)

(इंद्र ब्राह्मणास ह्मणतो.)

पूछत मघवा[6] मुनि जनसे ॥ भयो है अगमन अज कहांसे ॥ कहो जो कारन हो अपना ॥ काहेको छांड दियो तपना[7] ॥ मुखश्री म्लान भई सबकी ॥ गई सोभा क्यंवर्कर[8] तनकी[9] ॥ हुई पिडाजि न दुर्जनसे ॥ कहो मत डरियो तुम उनसे ॥ और जो इच्छा हो मनमें ॥ करूं पूरन एक लव पलमें[10] ॥ १ ॥

पद्–घनाक्षरी.

(ब्राह्मण इंद्रास ह्मणतात.)

सुनो बासव[11] महाराज ॥ सबहि भूपनके ताज[12] ॥
आये जिस कारन आज ॥ तुह्मे काज बतावूं ॥ १ ॥ असुर दोनों मणिमल्ल ॥ भये मस्त बडे मल्ले[13] ॥ हात जिनके है भल्ले[14] ॥ सदा फुल्ले[15] वदन है ॥ २ ॥ चढे पर्वत मणिचूल ॥ अये सेना संकूलें[16] ॥ किये हमको व्याकूल ॥ सबहि कूल हमारो ॥ ३ ॥ सबहि जज्ञके[17] अगार ॥ दिये तोड ताड डार ॥ कहि न बैठनको थार[18] ॥ नहि अधार किसीको ॥ ४ ॥

---

१ संहार करण्याची. २ ब्राह्मण. ३ उपेक्षा, हयगय. ४ आपलें. ५ स्वप्नासारखें. ६ इंद्र. ७ तप करणें. ८ कशामुळें. ९ शरीराची. १० एका क्षणांत, एका निमिषांत. ११ इंद्र. १२ सर्व राजांचे मुकुटमणी. १३ दांडगे. १४ भाल्याप्रमाणें. १५ प्रफुल्लित. १६ सेनेसहित. १७ यज्ञांचीं मंदिरें. १८ जागा.

पद–(गझ्यांनो कृष्ण गडी–या चालीवर.)

(ब्राह्मण व विष्णू यांचा संवाद.)

ब्राह्मण ह्मणती जगदीशा[1] ॥ पुरवि आलों धरूनी आशा ॥ धृ० ॥ असुर[2] मणिमल्ल जगीं असती ॥ इंद्रादिकांसि नावरती ॥ काय मग भूपांची गणती ॥ शर्म[3]–श्रवणें बहु घाबरती ॥ करि तूं हरि त्यांच्या नाशा ॥ १ ॥ पीडिलें प्रभु त्या असुरांनीं ॥ रक्षिलें तुवांचि असु[4] रानीं[5] ॥ पुरविलें लक्षहि न सुरांनीं[6] ॥ करणें काय भूसुरांनीं[7] ॥ प्रार्थितों ह्मणउनि कमलेशा[8] ॥ २ ॥ वर्तन तुला सकळ कळतें ॥ मनाहि तुझें कीं कळकळतें[9] ॥ जगीं या यातुप[10] अविकळ[11] ते ॥ कोण मग अशासि आकळते[12] ॥ विनवुनि काय सुराधीशा[13] ॥ ३ ॥ ह्मणे हरि जाउनि कैलासीं ॥ विनवूं प्रभु तो गिरिवासी ॥ त्याविण अजिंक्य सकळांसीं ॥ दिधला वर विधिनें[14] त्यांसी ॥ येइल करुणा सर्वेशा[15] ॥ ४ ॥

पद–(काफी–भोलानाथ दिगंबर–या चालीवर.)

(विष्णू शंकरास ह्मणतो.)

सुनियो बिनती हमारि ॥ नाथ तुम ॥ धृ० ॥ मस्त भये मणिमल्ल जगतमों उनको कौन संहारे[16] ॥ नाथ ॥ १ ॥ ब्रह्मानें वरदान दियो है मृत्यु नहीं औरनसे[17] ॥ नाथ ॥ २ ॥ गोविप्रनको दुःख भयो है कहि ये कौन निवारे ॥ नाथ ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभू नहि है तुम बिन त्राता तीनों[18] जगतमों ॥ ४ ॥

---

१ जगाच्या स्वामी, नारायणा. २ दैत्य. ३ नांव. ४ प्राण. ५ अरण्यांत. ६ देवांनीं. ७ ब्राह्मणांनीं. ८ लक्ष्मीपति विष्णो. ९ द्रवतें. १० राक्षस. ११ बलवान. १२ आवरतें. १३ इंद्राला. १४ ब्रह्मदेवानें. १५ शंकराला. १६ संहार करील. १७ दुसऱ्याकडून. १८ स्वर्गमृत्यु पाताळ या तीन लोकांत.

पद—कटिबंध.

(शंकर युद्धास निघाले त्याचें व युद्धाचे वर्णन.)

कोप अला शंकरासि भारी ॥ त्याचा त्याविण कोण निवारी ॥ जटा ताडिल्या भूपाठारीं[1] ॥ क्रोधें निर्मियली घृतमारी[2] ॥ अकाश भूमी व्यापुनि सारी ॥ उभी राहिली कराल[3]–वदना ॥ दुष्ट जनांच्या करील कर्दना[4] ॥ मदनारीनें[5] सर्वे घेतली ॥ चामुंडासहि आज्ञा दिधली ॥ गजानना आधि षडाननातें[6] ॥ नंदी भृंगीर[7]टादिकातें ॥ बाण रावणा चंडीशातें ॥ भूतगणातें पाचारुनियां ॥ सप्त कोटिगण मुख्य घेतले ॥ करितिल दुष्टावर ते घाले ॥ भाले[8] पट्टिश शक्ति कुंतले ॥ घेउनि सत्वर युद्धा आले ॥ कोण करिल वीरांची गणती ॥ भीषणरूपी अनेक असती ॥ नानाविध रणवाद्यें वाजाति ॥ रिपु सैन्यातें मारूं ह्मणती ॥ प्रतिपक्षाचे वीर धांवले ॥ येउनि शिव–सैन्यांत मिसळले ॥ भले भले विरें[10] असती गेंढे ॥ ह्मणती भेंटातें[12] घालूं दाढें ॥ रगडूं त्यांचे काय पवाडे[13] ॥ मुखद्वयाचे चतुरानन किति षडाननाचे ॥ दीर्घ–जिव्ह किति लंबोष्ट्राचे ॥ हेती[14] घेऊनि रणीं धांवती ॥ रथनागाश्व तसेचि पदाती[15] ॥ परस्परांतें घाव हाणिती ॥ चतुरंगदळ सेना मोठी ॥ वीर निमाले[17] अनेक कोटी ॥ युद्धाचें घनचक्र लागलें ॥ भीरू[18] त्यांतुनि कितिक पळाले ॥ सबळ शूर युद्धांत भागले[19] ॥ यापरि मणिमल्लांतें मारुनि सर्व जनां तोषवीलें ॥ श्रीमल्लारि–ह्माळसानाथें निजप्रणत जना वांचविलें ॥ १ ॥

---

१ पृथ्वीच्या पाठीवर. २ या नांवाची एक कृत्या. ३ विकाल तोंडाची. ४ संहार. ५ शंकरानें. ६ कार्तिकस्वामी. ७ हीं गणांचीं नावें आहेत. ८ हल्ले. ९ हीं शस्त्रांचीं नांवें आहेत. १० वीर, योद्धे. ११ प्रबळ. १२ योद्ध्यांला. १३ काय कथा. १४ तरवार. १५ पायदळ. १६ चार प्रकारची सेना, रथ, हत्ती. अश्व व पायदळ. १७ मेले. १८ भित्रे. १९ थकले.

श्री रामचंद्रांनीं मारुतीचा गर्व परिहार केला तें.

कथा-सारांश.

एकदां एका चातुर्मासांत दररोज एक हजार सुवर्णकमलें आणून श्रीरामचंद्राची पूजा करावी असें श्रीसीतेचें मनांत आलें. परंतु हीं कमलें फक्त बिंदु-सरोवरांत असल्यामुळें दररोज इतके दूर जाऊन कमलें कोण आणील अशी तिला चिंता उत्पन्न झाली. इकडे लंकेंत जो पराक्रम केला होता त्यामुळें मारुतीला गर्व झाला होता, त्याचा परिहार रामाला करावयाचा होता. तेव्हां रामांनीं सीतेस चिंतेचें कारण विचारून मारुतीची स्तुति करून त्यास कमलें आणण्याकरितां पाठविलें. मारुती त्या सरोवराचें काठीं गेला, व त्यानें कमलें तोडण्याकरितां कमलांस आपलें शेपटीचा वेढा दिला. रामानें मारुतीचें सर्व बळ आकर्षण करून कमलांचे देठांत घातलें होतें. त्यामुळें एकहि कमळ तुटलें नाहीं. उलट मारुतीचे शेपटीचा शेंडा मात्र तुटला. तेव्हां मारुती अगदीं निर्बल झाला. इतक्यांत भिल्लीणीचा वेष घेऊन व ब्रह्मदेवाला मूल करून जेथें मारुति होता तेथें राम आले व या मुलाला संभाळ म्हणजे कमलें तोडून आणून देतें, असें म्हणाले, मारुतीनें मुलाला मांडीवर घेतलें, पण तें मूल मारुतीला फार जड वाटूं लागलें. त्याचा भार सहन होईना व त्यामुळें त्याची मांडी मोडली. आतां अयोध्येला कसें जावें या चिंतेंत मारुति पडला. तेव्हां भिल्लीणीनें आपल्या डोक्यांतील एक ऊ काढून तिच्यावर मारुतीला बसवून अयोध्येला धाडिलें.

आर्या.

असतां प्रभु साकेतीं[1] सीता निजमानसीं असे भावी[2] ।
कीं हे मास-चतुष्टय दशमी पासाव[3] जे असे भावी ॥ १ ॥
श्रीमद्राम-प्रभुला सुवर्णकमळें अणूनि पूजावें ।
प्रारंभ उद्यापासुनि तरि हें व्रत सिद्धिला कसें जावें ॥ २ ॥
कंज[4] सहस्रदल[5] तीं एक सहस्राचे अणूनि नेमानें[6] ।
देईल कोण प्रत्यहि[7] भृत्य असा शेवटासि नेमा[8] नें ॥ ३ ॥

---

१ अयोध्येंत. २ विचार करी. ३ दशमीपासून जें पुढें येणारें तें. आषाढ शुद्ध १० ला चातुर्मासाला आरंभ होतो. ४ कमळें. ५ हजार पाकळ्यांचीं. ६ नियमानें. ७ दररोज. ८ नियमाला, व्रताला.

ऐसी सचिंत–मानस महिजा निजमंदिरीं विचार करी ।
कीं प्रेषावें कवणा घेइल हें कृत्य कोण चार करी[3] ॥ ४ ॥
राम पुसे आजि तुझा कांते वदनेंदु म्लान कां, गे, हा ।
गे हा तव सन्निध कीं उचित दिसे काय सांडणें गेहा ॥ ५ ॥
चाल गृहांतरि, पडलें संकट तरि आजि कायसें तुजला ।
बुजलों समुद्र प्लवगीं नाठविसी आज काय सेतु–जला ॥ ६ ॥
सीता ह्मणे प्रभुवरा आलें मन्मानसीं असें स्मरण ।
कीं पूजावें कमलें नाम–सहस्रें करूनि हे चरण ॥ ७ ॥
चिंताकुल यासाठीं नेइल सिद्धीस कार्य कोण पहा ।
सांगा असेल ठावा जरि या कीशांत कीश कोणप हा ॥ ८ ॥
तों पातले अकस्मात् नारदमुनि जेथ जनकजा होती ।
पूजा करुनि तयाची सांगे वृत्तांत आपुला हो ती ॥ ९ ॥
सीते वायुसुताचा विक्रम नाहीं तुला कसा ठावा ।
मानिति रक्षोगण या केवल वत्सरचि काय साठावा ॥ १० ॥
सांगावें मारुतिला तरि तो गर्वें करूनि हो फुगला ।
सुगलासि वदावें तों तो या श्रवणोंचि होतसे उगला ॥ ११ ॥
मग त्या वायुसुताचें लंकादाहोत्थ वृत्त आठवुनी ।
शंसेनें[11] पाठविलें गर्व[12] तयाचा मनांत साठवुनी ॥ १२ ॥

---

१ पृथ्वीची मुलगी सीता. २ दूत. ३ घर. ४ या चरणाचा अन्वय—प्लवगीं बुजला समुद्र सेतु जला काय नाठविसी. भावार्थ,–तुला संकट पडलें तेव्हां मी वानरांनीं समुद्र बुजवून टाकला. तो समुद्र, तो सेतु, व तें जल तुला आठवत नाहीं काय? मग तुला यावेळेस सचिंत बसण्यासारखें कोणतें संकट पडलें आहे? ५ वानर. ६ कोणाचे रक्षण करणारा. लढाईंत व्यूह बांधला ह्मणजे त्याचें कोण पाहून त्यावर रक्षक एक एक अधिकारी नेमलेले असतात. त्याला कोणप असें ह्मटलेलें आहे. ७ पराक्रम. ८ साठावा संवत्सर क्षय नांवाचा. ९ सुग्रीवाला. १० लंका जाळल्याचें वृत्त. ११ स्तुतीनें, १२ याला फार गर्व झाला आहे ही गोष्ट मनांत ठेऊन.

लंघुनि सप्त–समुद्रा गेला ह्मणताति बिंदु–सर जाला ।
काढी एक शतभरी कमलें तो कष्टवूनि करंजाला ॥ १३ ॥

बळ कर्षुनि मारुतिचें पंकज–नालांत घातलेंचि खरें ।
यास्तव त्या तैशाची खुडितां बहु दुखवलीं अहो नखरें ॥ १४ ॥

धाडी पुच्छ त्वरेनें कमलें आणावयासि तो सरेसीं ।
नाल न एकहि तुटलें तुटलें पुच्छाग्र कर्षणासरसीं ॥ १५ ॥

झाला सगर्व चित्तीं प्रभुला तो भक्त काय आवडतो ।
वागेल निरभिमानें तोचि सदा तत्कृपाचि सावँडतो ॥ १६ ॥

प्रभुनें बळ कर्षियलें पवनसुताचें समस्त होतें जें ।
तेजें भानु लपविता केलें ऐशासि हीन हो तेजें ॥ १७ ॥

न चलेचि वायुजाचा विक्रम ऐशांत पुच्छही तुटलें ।
फुटलें कपाळ यास्तव राम प्रभुचेंहि पद मला सुटलें ॥ १८ ॥

वायुज खिन्न मनानें बैसे मग त्या सरस्तटीं उगला ।
सुगलादिकासी स्वमनीं आठवि तैसेचि रामपद युगुलां ॥ १९ ॥

आली करुणा प्रभुला निज दासाचे हरावया क्लेश ।
ह्मणउनि धरिते झाले समयीं त्या वृद्धभिल्लिणी वेश ॥ २० ॥

बाळ करी द्रुहिणातें बाहे स्कंदावँरीच ती शबरी ।
आली सरस्तटीं त्या पाहे न्याहळूनि तीस कीशें बरी ॥ २१ ॥

वृद्धा ह्मणे असा कां खिन्न मनानें तटस्थ बसलास ।
सांग मला मी करितें कार्य तुझें तूं करीत नसलास ॥ २२ ॥

मारुति ह्मणे दयाळे कमलें देशील जरि सहस्र मला ।
जाईन साकेतपुरीं यातायातींत हा बहु श्रमला ॥ २३ ॥

---

१ ज्यांला. २ नखांला. ३ एवढा बलवान मारुती होता तरी त्याचीं. ४ नखें. ५ सरोवरांत. ६ ओढल्याबरोबर. ७ गोळा करतो. ८ जो तेजानें सूर्याला लपविणारा. ९ ब्रह्मदेवाला. १० खांद्यावर. ११ १२ मारुती वानर.

जरठा ह्मणे निजांक[1]-स्थित या बाळासि रक्षि[2]शील तरी ।
देतें आणुनि तुजला कंजें ह्मणऊनि ती तळीं उतरी ॥ २४ ॥
मारुतिनें अति प्रेमें उचलुनि बाळासि घेतलें अंकीं ।
शंकित[3] मनही झाला देऊं लोटूनि काय या पंकीं ॥ २५ ॥
वरचेवर हा बहु जड गमतो असमर्थ वागवायासी ।
सांगूं तरि कवणातें क्षणभरि तरि तुह्मिच वागवा यासी ॥ २६ ॥
भारानें या शिशुच्या जाइल वाटे रसातळा मांडी ।
ह्मणउनि उचलायाचा स्वबळें तो यत्नही तसा मांडी ॥ २७ ॥
परि न ढळेचि अणुहि तो-यास्तव अत्यंत घाबरा झाला ।
मारी हका तिला बहु चित्तीं अठऊनि रामराजाला ॥ २८ ॥
आली वृद्धा घेऊनि कमलें तों मारुती नयन[4] फिरवी ।
जिरवी गर्व असा ती अंगावरुनीहि हात मग फिरवी ॥ २९ ॥
केलें सावध जरि तरि उचलूं न शकेचि एक पाउल तो ।
आहे दूर अयोध्या चित्तीं स्मरतांचि ऊर हा उलतो ॥ ३० ॥
मग ती वृद्धा काढी निज केशांतूनि षट्पदा[5] ऊला ।
सांगे इजवर बैसुनि जावें जरि टाकवें न पाऊला ॥ ३१ ॥
वायुज[6] तिजवरि बैसुनि साकेतपुरी समीप जों आला ।
भेटे नारदमुनि त्या मार्गीं ह्मणऊनि खिन्न बहु झाला ॥ ३२ ॥
सांगे नारद जाउनि सत्वर हें वृत्त जानकीशातें ।
आले सीतेसह ते घेउनि सुगलादि सर्व कीशांतें ॥ ३३ ॥
लज्जित होय मनीं बहु वाटे पवनात्मजासि मरण बरें ।
माहित नव्हतें कवणा केला बोभाट याचि हो निंबरें[7] ॥ ३४ ॥

---

१ माझ्या मांडीवर असलेल्या. २ संभाळशील. ३ माझ्या मांडीवर घेतल्यावर तो जड वाटूं लागला ह्मणून त्याला वाटलें कीं याला या चिखलांत फेंकून द्यावें. सरोवराच्या काठीं बसला असल्यामुळें तेथें चिखल असणें साहाजिक आहे. ४ घाबरल्यामुळें डोळे फिरवूं लागला. ५ सहापायाची ऊ. ऊला सहा पाय असतात. ६ वायु पुत्र मारुती. ७ निबरानें, जरठानें.

सांत्वुनि राम ह्मणे त्या बा तूं श्रमलासि गर्व कां धरिला ।
केलें कृत्य सकल हें म्यांचि तुझा गर्व सर्व परिहरिला ॥ ३५ ॥

याच आख्यानाचीं पदें.

पद—साकी.

(सीता विचार करते.)

सोंचे करें सीता मनमें जब राम अजुध्याबासी ॥
कौन बरतसे जनम जनम मैं रामकी होऊं दासी ॥ १ ॥

पद २ जलद घनाक्षरी—दादरा.

(सीतेला राम चिंतेचें कारण विचारतात व सीता सांगते.)

प्रिये ऐशी कां तूं दंग ॥ आज आला काय प्रसंग ॥ आहे आम्हुचा तुला संग ॥ कांगे घाबरसी, शब्द न बोलसी, कोणी केला मनोभंग ॥ १ ॥ कोण ऐसा तो निःसंग ॥ सारे त्वत्पद-कमलीं भृंग ॥ खिन्न दिसतें अंतरंग ॥ सांगे मजपासि, त्वरीत नीवसि, जरी व्यथा करि अनंग ॥ २ ॥ प्रभो सांगतें तुह्मा वर्म ॥ आहे तुमच्या संगें शर्म ॥ मनिं उदेली माझ्या धर्म ॥ कमलें आणवावि, पूजा निवेदावि, चालो चातुर्मास हें कर्म ॥ ३ ॥ कोण पुरविल माझें वर्म ॥ तुह्मि जाणतां कर्माकर्म ॥ करिन उपानह हें चर्म ॥ जाईल कैसें सिद्धी, कुंठित हे बुद्धि, मनिं चिंता अंगीं घर्म ॥ ४ ॥

---

१ सांत्वन करून, समाधान करून. २ विचार. ३ सोबत, सहवास. ४ मनाला विक्षेप. ५ निर्भीड. तुझा मनोभंग करणारा असा कोण उर्मट आहे. ६ मदन. ७ सुख. ८ उत्पन्न झाला. ९ इच्छित. १० काय करावें काय करूं नये हें. ११ जोडा. या चरणाचा भावार्थ—तुमचे मजवर इतके उपकार आहेत कीं मीं आपल्या शरीराचें कातडें काढून त्याचा जोडा जरी करून तुह्माला दिला तरी ते फिटणार नाहींत. १२ घाम.

पद ३ (गड्यांनो कृष्ण गडी अपुला—)

(विषय तोच.)

पुसती राम जनकजेसी ॥ कां तूं म्लान वदन दिससी ॥ ॥ धृ० ॥ लागली चिंता काय तुला ॥ सांडिलें कां नग सीसफुला ॥ डोइचा भांग दिसे बुजला ॥ धम्मिलें विगलित कां स्वचला ॥ उचित हा शोक काय तुजसी ॥ १ ॥ वस्त्रें अमोलिक त्यजिलीं ॥ पातळ चोळी कशि रुचली ॥ टाकुनि दिव्य सेजें अपुली ॥ भूमिची शय्या कां सुचली ॥ घडिघडि उठोनियां बससी ॥ २ ॥ ठेउनि वनवासीं दृष्टी ॥ असावी अतां तुला तुष्टी ॥ आमुची त्यांत असे पुष्टी ॥ तरि कां अझूनिहि कष्टी ॥ असी कां क्षणोक्षणीं रुससी ॥ ३ ॥ विनवणी गिरिवासी रामा ॥ असे मी सुखी घनःश्यामा ॥ दशशत कमलें नित नेमा ॥ पुरविल कोण अशा कामा ॥ वाटते ही चिंता मजसी ॥ ४ ॥

पद ४—कटिबंध.

(मारुती कमळें आणण्यास कसा निघाला त्याचें वर्णन.)

श्रीरामें पवनसुताचा पहा कैसा गर्व हरीला ॥ धृ० ॥ वातात्मज तो गगनपंथानें ॥ जाय सवें निज मनोरथानें ॥ गर्वित जो बहु अंजनिथानें ॥ कशास मग तो राम कथा नें ॥ पहात पहात तो अनेक स्थानें ॥ बहुत त्वरेनें ॥ कधीं कधीं उतरूनि धरेनें ॥ जात लगबगा नगानगानें ॥ जळें तळें भरपूर खगानें ॥ पाहुनियां कधीं गात गाणें ॥ डगाडगानें ॥ ढगासि सांडुनि वरती जाणें ॥ उड्डाणाची चमक दाविणें ॥ विक्रम अपुला मनीं भाविणें ॥ नयन फिरविणें ॥ जळावरूनि कधिं स्थळावरी ये ॥ पळांत मग चपळासि गांठणें ॥ कळादावि बुबुळासि काढणें ॥ बळासि मानुनि करित गर्जना ॥ भुभुःकार करि उरुस तर्जना ॥ देखुनियां जल करित मार्जना ॥

---

१ डोकीवरचे फुलें वगैरे दागिने. २ वेणी. ३ अस्ताव्यस्त. ४ सुंदर बिछाइत. ५ संतोष. ६ नित्यनियम चालविण्याला. ७ यांतील वर्णन उत्तम असून अगदीं सोप्या शब्दांत आहे. ८ अंजनी—मारुतीची आई—इनें लहानपणीं पाजिलेल्या दुधानें.

जना विसर्जुनि विजना जावें ॥ क्षुधा लागल्या फळमुळ खावें ॥ कोप अल्या मणिबंधा चावे ॥ माकड चेष्टा करुनि प्रतिष्ठा ॥ भावी न गणी इष्टानिष्ठा ॥ कष्टावांचुनि कोण अरिष्टा ॥ मानि, वरिष्टा अवमानुनि तो बिंदुसरतटीं पावला ॥ श्रीरामें पवन सुताचा पहा कैसा गर्व हरीला ॥ १ ॥

पद ५.–घनाक्षरी.

(रामचंद्र भिल्लीण झाले तें वर्णन.)

होत भिल्लन रघुराज ॥ अपने भक्तनके काज ॥ दियो छांड सीसताज ॥ महाराज दयाल है ॥ १ ॥ उमर पोंहोची सैत साल ॥ भये पिंगट सब बाल ॥ लाठि हातमें चलि चाल ॥ साडिलाल पेहेनके ॥ २ ॥ किया ब्रह्मको बाल ॥ लियो खांधे जंजाल ॥ अई बिंदूसरपाल ॥ कमल नाल देखती ॥ ३ ॥

पद ६–अंजनी गीत.

(मांडीवर घेतलेल्या मुलाच्या भारानें घाबरून जाऊन मारुती शबरीस ह्मणतो.)

मारुती ह्मणे दिसतो बाळ ॥ परि हा ब्रह्मांडाचा काळ ॥ बाई तुझा तूं सांभाळ ॥ उचलुनि घे कडिये ॥ १ ॥ जरि मी वानूं याचे गुण ॥ तरि तूं काढीशि हंगुन ॥ नाहीं फळही सांगून ॥ राहो तें आतां ॥ २ ॥ गमतो तुजला हा चिमणुसा ॥ मी ही नव्हतों या मानुसा ॥ येवढ्या मुला परमाणु सा ॥ मानित मी होतों ॥ ३ ॥ पुष्कळ पाहीलीं म्यां बाळ ॥ कोठें न मिळें याचा ताळ ॥ एवढा वामन त्रिभुवनपाळ ॥ नसेल जड ऐसा ॥ ४ ॥ वाटे मज अवंतीलें काळें ॥ मांडी मोडीली या बाळें ॥ शिशु-लालनाचे चाळे ॥ पुरले गे बाई ॥ ५ ॥

---

१ डोक्यावरचा मुकुट. २ वर्षें १०० ची. ३ खांद्यावर. ४ एक प्रकारचें हत्यार. ५ बिंदु सरोवराच्या काठीं. ६ टोंचटोंचून बोलणें. ७ मलाहि याचें कांहीं वाटलें नाहीं. ८ जोडी. ९ बोलाविलें. १० यमानें. ११ हौस.

पद ७ (जोगी–माझा भरत देखिला काय.)
(मारुती रामाचा धावा करतो.)

रामा दावा पदयुगुलां, श्रमलों फारच कीं ॥ धृ० ॥ अजवारि केला तुह्मिं सांभाळ ॥ चरणीं ठेवित आलों भाळ ॥ अज हें कृपा–विहिन आभाळ ॥ असि आबाळ[1] कां माझी ॥ १ ॥ तुमच्या पायांचा प्रताप ॥ झाला नाहीं कधींच ताप ॥ येवढा आजिच कां संताप ॥ माझें पाप वडवडेंले[2] ॥ २ ॥ तुमची कृपाचि कीं बहुसाल[3]॥ वर्णिति कविजन सालोसाल[4] ॥ ती तुह्मीं आजिच कां नासाल ॥ येत असाल मजपासीं ॥ ३ ॥ धरिला आतां म्यां दृढभाव ॥ तरि कां कृपेचा अभाव ॥ दूजा कोण करिल नीभाव ॥ आहे स्वभाव मज ठावा ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु तरणोपाय ॥ दावी झालों गलित–उपाय ॥ होउं न द्यावा जी अपाय ॥ धरितों पाय मी आतां ॥ ५ ॥

पद ८ पिलु–त्रिताल.
(जाण्यास सामर्थ्य नाहीं असें पाहून सचिंत होऊन मारुति भिल्लिणीस ह्मणतो.)

बाई कैसा गे जाऊं आतां ॥ धृ० ॥ होतें बळ कांहीं बाहीं ॥ गेलें, उरलेंचि नाहीं ॥ आहे वेळ तरि कांहीं ॥ नाहीं मजला कोणि त्राता ॥ १ ॥ आलें संकट असें ॥ पुर[6] निकट नसें ॥ करूं बिकट दिसें ॥ बाई चुकवी या अघाता[7] ॥ २ ॥ राम कां न मज मारी ॥ झालें दुःख आज भारी ॥ गेली लाज होती सारी ॥ वारि माझि गे भय चिंता ॥ ३ ॥ गिरिवासी तूंचि माय ॥ पंकीं पडे जसि गाय ॥ दूर करुनि अपाय ॥ दावि माझि गे राम सीता ॥ ४ ॥

पद ९ (विडा घ्याहो नारायणा.)
(मारुती रामाचा धांवा करतो.)

धांवरे रामराया, किति अंत पहासी ॥ प्राणांत मांडिलासे, नये करुणा कैसी ॥ धृ० ॥ पाहीन धर्णि–वरी ॥ चरण झाडिन

---

१ उपेक्षा. २ उभें राहिलें, उतूं आलें. ३ पुष्कळ. ४ वर्षेंच्या वर्षे, निरंतर. ५ निरुपाय. ६ नगर, अयोध्या. ७ संकटाला. ८ तृप्त होईपर्यंत.

मी केशीं ॥ नयन शिणले बा ॥ अतां केधवा येसी ॥ १ ॥ अन्याय काय माझा ॥ देवा वाटला तुजसी ॥ म्हणूनि त्यजिलें त्वां ॥ तरि विनवूं कवणासी ॥ २ ॥ वाटे दुःख हें मजलागीं ॥ भक्तां इच्छिलें देसी ॥ कठोर इतुका कां ॥ मजविषयीं झालासी ॥ ३ ॥ गिरिवासि तूं असतांना ॥ व्हावी गति कां ऐसी ॥ धावूनि येई आतां ॥ दया सांडिली कैसी ॥ ४ ॥

पद १० पिलू–त्रिताल. (उद्धवा शांतवन कर जा.)

(रामाची भेट झाल्यावर मारुती सकरूण होऊन रामाची प्रार्थना करतो.)

कां रोष मजवरी ऐसा, श्रीरामा पूर्ण–परेशा ॥ धृ० ॥ अज इतुका कां बरें केला, अपमान माझा रामा ॥ बाळानें हट जरि धरिला, दे सांत्वुनि जननी आमा[1] ॥ अंतराय कधिं तरि पडला, मज पासुनि आपुल्या कामा ॥ चाल ॥ नसे दयाळ प्रभु तुज परता ॥ तूं त्रैलोक्याचा भर्ता ॥ कां कोप तरि मज वरता ॥ पू० चाल ॥ कर्ताचि विध्यंडांचा[2], होसी तूं धरणिसुतेशा[3] ॥ १ ॥ गर्विष्ठ असा तुज दिसला, कां शासन केलें नाहीं ॥ जरि चुकलों मी सेवेला, कां केलि उपेक्षा पाही ॥ मानिलें नसे वचनाला, कां बोध न केला कांहीं ॥ चाल ॥ निग्रहानुग्रह[4]–कर्ता ॥ ठेविली कुणाची उर्ता[5] ॥ नाहिं विचार केला पुर्ता[6] ॥ पू० चाल ॥ धूर्तासि आधिं शिक्षावें, हा धर्मचि सकलजनेशा[7] ॥ २ ॥ शिक्षणार्थ याच्या तुजला, जरि शंका होती पोटीं ॥ एकांतीं नेउनि मजला, नाहिं निषेधिलें कां ओंठी[8] ॥ नायकें असा धिट दिसला, कां कान न पिळिला बोटीं ॥ चाल ॥ तरि काय तुजपुढें ठरतां ॥ हा तत्कालचि कीं मरतां ॥ पाहिजे कशाला गेर्ता[9] ॥ पू० चाल ॥ संरतां[10] देहापासुनियां, हें करणें काय नरेशा ॥ ३ ॥

---

१ स्तन. २ ब्रम्हांडाचा. ३ धरणिसुता जी सीता तिचा पती. ४ शासन व पालन करणारा. ५ ओढ. ६ पूर्ण. ७ सर्व जनांचा स्वामी. ८ ओठांवर बोट ठेवून. ९ खळगा. १० निराळा झाला असतां.

गजगौरी आख्यान.

कथा—सारांश.

एकदां गांधारीनें मातीचा हत्ती करून त्याजवर बसून कुंतीला वायन दिलें. वायन दिल्यानंतर गांधारी कुंतीला ह्मणाली कीं हें वायन परत दिलें तर पुढचे जन्मीं इंद्राचा ऐरावत मिळतो. नाहीं दिलें तर अखंड वैधव्य प्राप्त होतें. हें ऐकून कुंती सचिंत झाली, व तिनें भीमाला सांगितलें. भीमानें हत्ती करण्याकरितां माती आणण्यास सुरवात केली, व गावांबाहेर जाऊन मातीचा एक एक गोळा गावांत फेकूं लागला. त्याच्या योगानें गांवांतील घरें पडूं लागलीं. तेव्हां अर्जुन ह्मणाला, मातीचा हत्ती कशाला ? याच जन्मीं ऐरावत आणून देतों; त्याजवर बसून वायन दे. असें त्यानें आपल्या आईला—कुंतीला सांगितलें. नंतर भीमाला इंद्राकडे पाठवून ऐरावत आणिला. त्यावर बसून कुंतीनें थाटानें गांधारीस वायन दिलें. ही गोष्ट कौरवांचे मनाला फार लागली. तेव्हां पासून कौरवपांडवात वैर उत्पन्न झालें. ही कथा या आख्यानांत आहे.

आर्या.

जनमेजय नृपति पुसे वैशंपायन मुनीस पद नमुनी ।
पडला द्वेष कशास्तव कौरव पांडव कुळां मुनीन[1]—मुनी ॥ १ ॥
त्यासि ह्मणे मुनि—पुंगव[2] ऐके वृत्तांत सांगतों तुजला ।
सौबालिनें[3] मृणमय गज काळीं एक्या करूनि तो पुजला ॥ २ ॥
तें व्रत गजगौरीचें केवल सौभाग्यवर्धना करितें ।
करितें[4] करूनि यास्तव देती वायन स्त्रिया घरोघरिं तें ॥ ३ ॥
शृंगारूनि गजातें बैसुनि त्यावरिच वायनें देती ।
उसणें त्वरिताचि द्यावें पावे वैधव्यतेसी नेदे ती ॥ ४ ॥
जरि सांगता व्रताची, जन्मांतरि पावती सुरेश—गजा[5] ।
दे सौभाग्य निरंतर होउनियां सुप्रसन्न ती नगजा[6] ॥ ५ ॥

---

१ ऋषींतील श्रेष्ठ ऋषे. २ मुनिश्रेष्ठ. ३ गांधारीनें. ४ हत्तीला. ५ ऐरावत. ६ पार्वती.

यापरि गांधारीनें दिधलीं वानें सुवासिनिस आधीं ।
मग जाउनि कुंतीच्या पारुषवचनें मनासि दे आधी ॥ ६ ॥
बोले निष्ठुरसी बहु उसणें द्यावें तुवांहि सत्वरतें[2] ।
परतें या काय वदूं न दिल्या येतोंचि दैन्य सत्वर तें ॥ ७ ॥
चिंताक्रांत पृथा[3] मग बैसे होऊनि खिन्न–मानस ती ।
आला कालविपर्यय[4] यावीं विघ्नें असींच हो नेसतीं ॥ ८ ॥
शतपुत्र त्या सतीचे माझीं बाळें समस्त पांच किती ।
करितिल केंवि गजातें केलों अजि त्यावरीहि जाच किती ॥ ९ ॥
भीम ह्मणे मातेला गमलें तुज कठीण कार्य कां गे हें ।
टाकिन गोल क्षितिचा ग्रामावरि पडतिं मग न कां गेहें ॥ १० ॥
फेकीं राजद्वारीं गोल तसा अन्य ग्राम–द्वारासीं ।
भ्याले पुरवासीजन ह्मणती अमुच्याचि विघ्न कां रासीं ॥ ११ ॥
करिती कोलाहल बहु परि गवसेनाचि वर्म तें कवणां ।
श्रवणां येतांचि कळें वार्सवितें मातृसुश्रुषप्रवणा ॥ १२ ॥
येऊनि मातेसि ह्मणे आणविली मृत्तिकाहि काशाला ।
तुझिया पदप्रसादें देणाराचि धीर हा अकाशाला ॥ १३ ॥
जन्मांतरहि नको घे ऐरावत देतसे अणूनि तुला ।
अमुच्या सामर्थ्याची आहे करणार सांग कोण तुळा ॥ १४ ॥
पत्र लिहुनि बाणाग्रीं[11] वासविनें[12] वासवासि[13] पाठविलें ।
आहे व्रत कुंतीचें यास्तव ऐरावतासि आठविलें[14] ॥ १५ ॥
श्रृंगारूनि गजातें सत्वर या गजपुरासि[15] धाडावें ।
होइल व्रत सांग, तरी सुज्ञांहीं कां उगेंचि भांडावें ॥ १६ ॥

---

१ दुःख. २ सत्वाची रति जिला आहे अशी तूं. ३ कुंती. ४ उलटा काळ. ५ नसलेलीं. मलतींच. ६ भावार्थ–आणि सांप्रत त्यांनां जाच ह्मणजे संकटही किती आहे. ७ राशाला, वाव्यांला. ८ अर्जुनाला. ९ आईच्या सेवेला तत्पर अशाला. १० बरोबरी. ११ बाणाच्या टोंक वर. १२ अर्जुनानें. १३ इंद्रास. १४ स्मरण केलें, मागितलें. १५ हस्तिनापुरास.

वाचुनि पत्र सुरगुरु सांगे उत्तर लिहावयासि असें ।
कीं न्यावें गजपतिला वांच्छा व्रतलोकेनीं अह्मासि असे ॥ १७ ॥

येतां उत्तर ऐसें बाणांचा सेतु बांधिला सघट[3] ।
मार्गें त्याचि वृकोदर जाय असा मनुज देखिला न घट ॥ १८ ॥

जाउनि अमरावतिला अमरपतीला स्ववृत्त तो कळवी ।
मळवी यश अमरांचें ऐरावतिचाहि गर्व मग पळवी ॥ १९ ॥

ह्मणती निर्जर[6] सारे नेतो गज नेउं द्यांच भूमिवर ।
परि ताडितो[7] कशास्तव, ऐसा कधिं पाहिला न भूमिवरं ॥ २० ॥

अवमानुनी गजातें नेणें तरि उचित हें दिसेना कीं ।
पूजिति देव सकळ या उदधिमथित रत्न हें असें नाकीं ॥ २१ ॥

चालेना सुपथानें भूमीवरि नागें[11] लोळणाच करी ।
यास्तव भीमें केला बांधुनि चरणासि झोळणा[12]च करी[13] ॥ २२ ॥

दिधला श्रृंगारुनि मग अमरांनीं नागराज भीमकरीं[14] ।
भीम करी ताडण त्या कांपे चळचळ असाहि भीमें[15] करी[16] ॥ २३ ॥

मार्गें त्याचि पुन्हां तो घेउनि ऐरावतासि गजग्रामीं[17] ।
आला, त्या ह्मणती जन भुवनत्रयिं हा अजिंक्य संग्रामीं ॥ २४ ॥

त्यावरि बैसुनि कुंती वानातें देत गजपुरीं फिरली ।
अवलोकुनि या कृत्या गांधारी निजमनीं बहु विरली ॥ २५ ॥

मग त्या दिवसांपासुनि वाढत गेलाचि द्वेष उभय कुळां ।
कौरव सर्पचि नाशूं ह्मणती त्या भीम अर्जुना नकुला ॥ २६ ॥

---

१ बृहस्पती. २ व्रत पाहण्याची. ३ मजबूत. ४ घोट. ५ इंद्राचा. ६ देव. ७ मारतो–भीम ऐरावताला ताडन करूं लागला ह्मणून देव ह्मणतात. ८ पृथ्वीवरील राजा. ९ समुद्रमंथन करून काढलेलें रत्न. १० स्वर्गांत. ११ हत्ती. १२ झोळी. १३ हातीं. १४ भीमाचे हातीं. १५ भयंकर, मोठा. १६ हत्ती. १७ हस्तिनापुरास.

याच आख्यानाचीं पदें.

पद (गडयानो कृष्ण गडी अपुला.)

(गांधारी कुंतीला वाण द्यावयास आली त्या वेळस दोघींचा संवाद.)

सौबळी सांगे कुंतीला ॥ उसणें देई वाण मला ॥ ध्रु० ॥ मानव–देहा जरि यावें ॥ व्रत हें सकृत आचरावें ॥ मृण्मय–गजासि पूजावें ॥ घरोघरीं वाण असें द्यावें ॥ पहा गज शृंगारूनि अ-णिला ॥ १ ॥ माझिया पुत्रांनीं माती ॥ अणुनि हा गज केला रातीं ॥ आलें मी बैसुनि या वरती ॥ वाद्यें वाजाति विविधगती ॥ जाहलें श्रुत हें अवघ्याला ॥ २ ॥ एकशें एक तनय माझे ॥ त्यांच्या योगें पुर साजे ॥ असती कोण असे राजे ॥ शत्रुंच्या मनांत यश डाजे ॥ वर्णूं काय प्रतापाला ॥ ३ ॥ कुंती ह्मणे एक बाई ॥ देइन उसणें तुज पाही ॥ बोलुनी अर्थ नसे कांहीं ॥ येईल प्रत्यय तुजला ही ॥ जाइ तूं आपुल्या सदनाला ॥ ४ ॥

पद (जलद घनाक्षरी.)

(कुंती विचार करते.)

मोठें संकट दिसें आज ॥ माझें करिल कोण हें काज ॥ कशि राखिल हरी लाज ॥ करूं गत कैसी, सांगुं कवणासी, पंडु-राजाची मी भाज ॥ १ ॥ असति पुत्रहि नसें वांझ ॥ काय तो वडील धर्मराज ॥ त्याला आवडे सत्समाज ॥ वरकड बाळें चारीं, पडति विचारीं, धावें पावें यदूराज ॥ २ ॥

दिंडी.

(भीम कुंतीला ह्मणता.)

भीम बोले मातेसि अशी कां गें । संचिंतचि तूं बसलीस मला सांगें ॥ करिन आतां जें कार्य तुझें पाही । नको होऊं व्याकूळ सर्वथाही ॥ १ ॥ व्यर्थ करणें हा घोर कशासाठीं । असे मजसम या कोण धरापाठी ॥ जरी ह्मणसी तूं इंद्र चंद्र आजी । आणि, येथें तरि अणिन क्षणामाजी ॥ २ ॥

---

१ माझें वाण मला परत दे. २ एकदां ३ एका रात्रींतून. ४ निरनिराळया प्रकारानें. ५ शोभतें. ६ खुपतें. ७ भार्या. ८ साधुसंतांचा समागम. ९ कृष्ण. १० चिंता. ११ पृथ्वीच्या पाठीवर.

पद—साकी.

(कुंती भीमास ह्मणते.)

माई पृथा कहे सुनो वृकोदर गांधारी गज लाईरे ॥ कियो बरत अज दियो बान मुझे गजपर वो चढ आईरे ॥ १ ॥ पलट दिजो फिर बान करो गज माटी[1] बहोत जमावोरी ॥ बरत करो यही और जनममों ऐरावत तुम पावोरी ॥ २ ॥ बान न दे तो विधवा होकर जनम जनम दुःख भोगोरी । तबसे भई हुं ब्याकुल क्या कहुं बहोत मोहे[2] डर लागोरी ॥ ३ ॥

पद-(उद्धवा शांतवन कर जा.)

(कुंती भीमास ह्मणते.)

ह्मणे कुंती अज बहु मोठें ॥ मज संकट गमतें भीमा ॥धृ०॥ एकशें एक सुत तिचे, गज केला रातोरातीं ॥ तुह्मी बाळें पांच कशी तीं, बरें अणाल सांगा माती ॥ वाटतें मनीं बहु चिंता पाहुनि ही कोमल कांती ॥ चाल ॥ म्यां काय करावें आतां ॥ कोणि दिसेचिना कीं त्राता ॥ बहु तळमळ वाटे चित्ता ॥ पू०चा०॥ सोडितां नये हें सहसा, जरि आयुष्याची सीमा ॥ १ ॥ मज चिन्ह दिसेना बरवें, झालि कुंठित मति बहु आजी ॥ जरि त्याग करूं देहाचा, तरि होईल अकीर्ति माझी ॥ वांचुनी वाण नच फिटलें, तरि फजिती दुसरी ताजी[3] ॥ चाल ॥ यासाठीं मनिं मी झुरतें ॥ बा पाहि विचारुनि पुरतें ॥ यश कोठुनि मग हें उरतें ॥ पू० चाल ॥ मरतेंच तरी कां छळिती, ही ईषणा[4] गुणधामा ॥२॥

पद—पिलू त्रिताल.

(नगरवासी जन आपसांत घाबरून विचार करतात.)

अजि दिसतें विघ्न कांहीं ॥ धृ० ॥ नाहीं जावयासि वाट ॥ जन करिती बोभाट ॥ किती लावूनि कपाट ॥ हॅट[5] केला बंद

---

१ माती. २ मला. ३ नवी. ४ इच्छा, वासना, भावार्थ मी मेलेंच असतें तर ही वासना कशाला छळती ? ५ बाजार.

त्यांहीं ॥ १ ॥ लोक घाबरले फार ॥ कोणि केली वार्‌तार ॥ कांहीं करिति विचार ॥ थार आतां कोठें नाहीं ॥ २ ॥ असे थवे जागोजाग ॥ जरि काढिताति माग ॥ कांहीं लागेनाचि लाग ॥ भाग आलें मरण काई ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धांव ॥ कांहीं न सुचे उपाव ॥ अह्मा धरणि न दे ठाव ॥ मावळल्या दिशा दाही ॥ ४ ॥

पद—(माझा भरत देखिला काय.)

(अर्जुनानें इंद्राला पत्रिका लिहिली, व भीमानें ऐरावताला आणिलें.)

धाडा सुरगज गजग्रामीं ॥ होइल आनंद मातेसी ॥ धृ० ॥ अर्जुनें पत्र लिहून ऐसें ॥ धाडिलें बाणाच्या सरिसें ॥ पाहुनि देवगुरु हांसे ॥ ह्मणे कैसे मानव हे ॥ १ ॥ सुचविलें गुरुनें इं-द्रासीं ॥ लिहावें उत्तर विजयासीं ॥ न्यावें तुह्मी गजेंद्रासीं ॥ आहे मानसीं हेत ऐसा ॥ २ ॥ ऐकुनि उत्तर हें कानें ॥ बांधिला सेतु सायकानें ॥ प्रेषिलें भीमासीं त्यानें ॥ बहु मानें सुरपुरिला ॥ ३ ॥ जाउनि आणिलें गजपतिला ॥ भीमें अनंद बहु झाला ॥ स्तविती किती अर्जुनाला ॥ वायुजाला पुरवासी ॥ ४ ॥

कटिबंध

(कुंतीनें वाणें दिलीं त्याचें वर्णन.)

भीमें आणिलें देवगजाला ॥ नागपुरीं मग अनंद झाला ॥ दानें दिधलीं सकळ द्विजांला ॥ उणें काय त्या बिडौजजाला ॥ नटउनि दिधलें इभराजाला ॥ रत्नभूषणें ज्या साजाला ॥ झूल झालरी मुक्तें ज्याला ॥ कोण वर्णितो कवि तेजाला ॥ नवल वा-टलें सकल प्रजांला ॥ अवलोकुनि जरतरी ध्वजाला ॥ गळां किती सुमनांच्या माळा ॥ बळासहित गज पळांत आणुनि ॥ अबलासह

---

१ पत्ता. २ अर्जुनाला. ३ बाणानें. ४ स्वर्गाला. ५ भीमाला. ६ नगरचे लोक. ७ हस्तिनापुरांत. ८ बिडौजा इंद्र, त्याचा पुत्र अर्जुन त्याला. ९ हत्तींतील राजा ऐरावत.

वरी कुंति बैसली ॥ वाद्यांची बहु झोड लागली ॥ दिनमणि जाउनि रजनी झाली ॥ तम नाशाया दीपा[1] आणिल्या ॥ सुगंध तैलें मग पाजळिल्या ॥ चंद्रज्योतिनें दिशा उजळल्या ॥ निशा असुनि किति पिशापरी दिनदेशा[2] भाविती ॥ अशा तशाची नसेचि गणती ॥ विशाल[3] शाला[4] पाहुनि ठरती ॥ सर्वें मशाला दुशाल जरिती ॥ खुशाल घेउनि अंगावरती ॥ घरोघरीं अशि शिरती झाली ॥ सुवासिनीला वाणें दिधलीं ॥ गांधारीच्या सदना आली ॥ थाट पाहुनी मनीं विराली ॥ गांठ घालितां पाट कशाचा ॥ नाट[5] भावि घरघाट भाविचा ॥ समजुनियां बहु खिन्न मनानें ॥ बाहेर येउनि तांबुलादि दिधलें ॥ वासविनें[6] सुरगज आणुनि गजगौरी–व्रत संपविलें ॥ १ ॥

---

१ मशाली. २ दिवस आहे असें मानूं लागलें. ३ विस्तीर्ण. ४ मंदिरें. ५ पुढें होणाऱ्या घराच्या नाशाचा नाट-वाईट शकुनच तिला वाटला. ६ अर्जुनानें.

द्वापरयुगांत गरुडाचा गर्व परिहार मारुतीनें केला तें आख्यान.

कथा–सारांश.

एकदां द्वापरयुगांत गरुडाला आपले बळाचा गर्व झाला होता. तो हरण करण्याचें श्रीकृष्णानें मनांत आणिलें. एकदां मारुति द्वारकेस आला, व सुवर्णाची नगरी पाहून ही लंकाच आहे असें त्याला वाटलें. इतक्यांत नारद तेथें आला. त्याला मारुतीनें विचारिलें कीं, येथें राजा कोण आहे, व ही नगरी कोणती ? त्यानें सांगितलें येथें बलीराम राजा आहे, व ही द्वारका आहे. आपल्या रामापेक्षां बलीराम कोण आहे, त्याचा समाचार घ्यावा ह्मणून 'आपलें नांव सोडून दे. नाहींतर युद्धाला ये' असा मारुतीनें नारदाहातीं बलीरामास निरोप पाठविला. बलीराम सैन्य घेऊन आला, त्याचा मारुतीनें पराभव केला. नंतर श्रीकृष्णानें गरुडास मारुतीला बोलावून आणण्याकरितां पाठविलें. गरुडानें त्याला उद्धटपणानें बोलाविल्यामुळें मारुतीनें गरुडाच्या तोंडांत चापट मारिली. तेव्हां गरुड कृष्णाजवळ येऊन पडला. कृष्णानीं पुन्हां गरुडास पाठवून मारुतीस बोलावून आणून रामरूप दाखविलें. ही कथा या आख्यानांत आहे.

आर्या.

पवन-तनय हा एका समयीं सोडूनि सेतुबंधातें ॥
आला द्वारवतीला रामाच्या गात सत्[1]प्रबंधातें ॥ १ ॥
निरखुनि बाह्य प्रदेशीं नगरीच्या विपुल धेनु कळपाला ।
तोषें जाय उपवनीं सेवन करि कंद मूळ फळ पाला ॥ २ ॥
आले नारदमुनि त्या स्थानीं जेथें कपी असा रमला ।
वंदुनि ह्मणे मरुत्सुत प्रभुविण सारेंचि हें असार मला ॥ ३ ॥
ही नगरी कवणाची भासे लंकाचि सागरामाजीं ।
शंका हीच निवारा, सत्वर कारुण्य[2]-सागरा [3]माजी ॥ ४ ॥
मुनि त्यासि ह्मणे येथें नांदतसे नाम ज्यासि बळिराम ।
आहे कीर्ति जगत्रायें यासम कैचा तुझाहि बाळि राम ॥ ५ ॥

---

१ पुण्यकारक कथा. २ करुणासागर. ३ माझी.

हें ऐकतांचि कोपें बोले मुनि नारदासि जा हो जा ।
सांगा नाम त्यजावें नसतां युद्धासि सिद्ध जा होजा ॥ ६ ॥
सांगे नारदमुनि तो बळिरामातें जसें हरी वदला ।
त्यागी नामचि अपुलें अथवा जाऊनियां हरीव दला ॥ ७ ॥
राम ह्मणे कपि भेणें सोडूं नामासि मी कसा वा, जी ।
ऐसें बोलुनि सांगे निजबळ पातें त्वरें कसा वाजी ॥ ८ ॥
आणिन बांधुनि येथें मर्कट लागेल एक पलही न ।
आहे तो एकाकी त्यांतहि वानर अशस्त्र बळहीन ॥ ९ ॥
होउनि सिद्ध बळासह गेला बळिराम वानरानिकट ।
तो टाकी नग त्यावरि केला ज्या सैनिका—नरांनिं कट ॥ १० ॥
पाहुनि युद्ध पळे तो सत्वर बळिराम निज दळासहित ।
जाय पुरीं लगबग करि मानी सर्वोपरी पळांस हित ॥ ११ ॥
कृष्ण ह्मणे हो दादा अणिलें बांधूनि काय त्या हरिला ।
धरिला, बराच वाटे गर्वहि त्याचा असेल परिहरिला ॥ १२ ॥
राम वदे तो केवळ वानर अज्ञान टाकितो शिखरीं ।
वरचेवर, यासाठीं न चले बळ युक्ति आजि त्याशि खरी ॥१३॥
श्रीहरिनें दूतकरीं सत्वर विनतासुतासि आणविलें ।
घेउनि ये कपीला जा आधीं, मग वृत्त सर्व जाणविलें ॥ १४ ॥
गरुड ह्मणे हें निंद्यचि कर्म तरी मोडवेल कशि आज्ञा ।
सूज्ञांहींच विचारुनि प्रेषावें, आणितों तया अज्ञा ॥ १५ ॥
बोलुनि सगर्व गेला पक्षिपे तो वानरा अणायाला ।
शंका धरील तरि कां, मर्कट ह्मणतां मुखीं हणायाला ॥ १६ ॥

---

१ वानर, मारुती. २ सैन्याचा पराभव करून घे. ३ पाते लवत नाहीं तोंच, एक क्षणांत. ४ घोडे. ५ पर्वत. ६ ज्या सैनिकांनीं समूह केला होता त्याच्यावर. कट—समूह. ७ एकेक क्षण महत्वाचा आहे असें मानी. ८ पर्वत. ९ गरुड. १० अन्वय—मर्कट ह्मणतां मुखीं हणायाला शंका तरी कां धरील.

णितांच मुखीं चडकण् पडला येउनि सभांगणीं हरिच्यां ।
वरिच्यावरि जरि सांवरि होती बहु वेदना परोपरिच्या ॥ १७ ॥

येउनि समीप श्रीपति फिरवी अंगावरुनियां कर तो ।
करितो दया प्रभू परि शिणवुनि दासासि बहु दयाकर तो ॥१८॥

प्रार्थी विगर्व विपती उचित तुह्मालागिं हें न देवा जी ।
सांगावी तीच तया वाटे सर्वांस योग्य सेवा जी ॥ १९ ॥

होतों मीच ह्मणुनियां आलों परतूनि आजि या ठायां ।
कथितों शपथपुरःसर प्रभुचरणीं सत्यसत्य वाटाया ॥ २० ॥

देव पुन्हां त्यासि ह्मणे 'जा वद दाशरथि राम बाहतसे ।
येइल सत्वर कपि तो तोंवरि येथेंचि मार्ग पाहतसें' ॥ २१ ॥

गरुड ह्मणे निःसंशय आलें कीं मरण वाटतें मजला ।
यास्तव प्रभुहि पुन्हां मजलागीं प्रेषावयासि तो सजला ॥ २२ ॥

जाय हळुहळू भीतचि पक्षिप तो वानराचिया जवळीं ।
बाहे तुज दाशरथी ह्मणतां तत्काल तत्पदां कवळी ॥ २३ ॥

आलिंगूनी ह्मणे बा दाखवि रघुराज आज लौकरि तो ।
कारि एवढी कृपा मजवरि तुज शतवार मी नमन करितों ॥ २४ ॥

इकडें सभेंत आधीं प्रभुनें भामेसि शीघ्र आणविलें ।
आला असे मरुत्सुत होई सीता असेंचि जाणविलें ॥ २५ ॥

जरि शृंगार करी बहु न दिसे सीतसमान रूप तिचें ।
रुक्मिणिला हो सीता ह्मणतां मन मोहिलें तिनें पतिचें ॥ २६ ॥

आला घेउनि सत्वर मारुतिला तो खगेंद्र परि दचके ।
कीं रामरूप नसतां तोडिल माझेचि हा पुन्हां लचके ॥ २७ ॥

झाले कृष्ण रघूत्तम सीता झालीच रुक्मिणी देवी ।
बळिराम होय लक्ष्मण यास्तव वायुज पदींच शिर ठेवी ॥ २८ ॥

---

१ कृष्णाच्या.

बाण धनू करि साजे लक्ष्मण सीताहि उभय बाजुकडे ।
पाहे नमन करुनि वरि देखे कृष्णाख्य दिव्य तें रुपडें ॥ २९ ॥
झाला चकित मनीं बहु मारुतिला ह्मणति राम बापा हें ।
द्वापरयुगांत दिधलें दर्शन तुजलाचि आजि बा पाहे ॥ ३० ॥

याच आख्यानाचीं पदें.

पद (गडयानो कृष्ण गडी या—च लीवर.)

(नारद व मारुति यांचा संवाद.)

नारद सांगे मारुतिला ॥ ह्मणती द्वारवती पुरिला ॥ ध्रु० ॥ ह्मणसी कनकमयी लंका ॥ ही तरि वृथा तुझी शंका ॥ वाजतो सर्वत्रीं डंका[1] ॥ वर्णिल कोण इच्या बंका ॥ दुसरी पुरी नसे सरिला[2] ॥ १ ॥ येथिल राजा बळिराम ॥ गाजतें जगत्रयीं नाम ॥ कोंढिना[3] काय तुझें काम ॥ आपुलें जवळ करि धाम[4] ॥ होइल सौख्य तरी तुजला ॥ २ ॥ सोडिल नाम कशासाठीं ॥ असतां सैन्याच्या थाटीं[5] ॥ त्यजावी त्वां अपुली घाटी[6] ॥ न लागे या कृत्या पाठीं ॥ भांडतां फल न दिसें मजला ॥ ३ ॥ वायुज कोप-भरें बोले ॥ उपडुनि नगरीला झोले ॥ देईन तत्पतिला टोले ॥ न कां मग मान तुझी डोले ॥ दावितों पहा विक्रमाला ॥ ४ ॥ गिरिवासी तो प्रभुराम ॥ पुरविल मम सकलहि काम ॥ नको यावेळ जरा थाम[7] ॥ स्मरतों पद अष्टहि याम[8] ॥ भरंवसा मी त्याचा धरिला ॥ ५ ॥

अंजनीगीत.

(नारद मारुतीस ह्मणतो.)

मारुतिराया तूं बळकट ॥ केली यातुपा[9] कटकट ॥ लंका करूनी जळकट ॥ तोषविली सीता ॥ १ ॥ शक्ती लागली लक्ष्मणा ॥ बा तूं गेलासी तत्क्षणा ॥ झडकरि अणिलें गिरिद्रोणा ॥

---

१ महत्व. २ तोंडीला, बरोबरीला. ३ तुझी खोड मोडणार नाहीं काय ४ घर. ५ समूह. ६ रीत. ७ थांब. ८ प्रहर. ९ राक्षसांस.

रक्षीलें त्यासीं ॥ २ ॥ ऐसे रामावरि उपकार ॥ झाले तूझेची कीं फार ॥ यांच्या गर्वाचा परिहार ॥ करिशिल तूं आतां ॥ ३ ॥ आहे नवलाशीं हें ठावें ॥ तूझें गुण तरि किति म्यां गावें ॥ जाउनि सांगलों त्यागावें ॥ बळिनाम आपुलें ॥ ४ ॥ वाटे येईल युद्धासी ॥ देइल पराभूती[१] त्यासी ॥ होइल आनंद रामासी ॥ करि एवढें काज ॥ ५ ॥

दीपचंदी

(श्रीकृष्ण व बाळराम यांचा संवाद.)

यदुवीर पूसतसे बळिरामा ॥ धृ० ॥ तो कपि केवळ मूर्खशिरोमणि, मानिल कां बरें सामा[२] ॥ १ ॥ युक्तीनें जरि त्यासि धरावें, साध्य न तें गुणं[३]--धामा ॥ २ ॥ यापरिचा तो अविनय वानर ॥ अणितां नवलाचि आह्मां ॥ ३ ॥ राम ह्मणे कपिटा किंतसे गिरी[४], आणुं कसा घन-श्यामा ॥ ४ ॥ गिरीवासी प्रभू ऐकुनि हांसत सोडुनि[५] द्या निज-धामा ॥ ५ ॥

पद (उद्धवा शांतवन कर जा– या चालीवर.)

(गरुड कृष्णास ह्मणतो.)

ह्मणे पक्षिप यदुवीरासी, कां केली घातळमाया ॥ धृ० ॥ हें काय तुह्मां बरें गमलें, पाठविणें कीशापासीं[६] ॥ मी जाउनि कांहिं तरि वदलों, वाटाया विपरित त्यासी ॥ व्यर्थ हो ताडिलें मजला, नाहिं झटलों मी शरिरासीं ॥ चाल ॥ किति कठोर कर हो त्याचा ॥ जरि असतां दुसरा कांचा[७] ॥ सोसिता कसा या जाचा ॥ पू० चा० ॥ वाचाळपणा नसे केला, प्रभु काथितों तुमच्या पायां ॥ १ ॥ जरि भाषण कांहीं तरि करितां, मी उत्तर देतों त्यासीं ॥ आहे रीत अशी या लोकीं, तें काय कळें मूढासीं ॥ मर्कट तो अविनय मोठा, समजेना हो बोलासीं ॥ चाल ॥ काकासि ह्मणेना काका ॥ ऐशासि मारिल्या हांका ॥ तो काय मानितो

१ पराभव. २ सख्य. ३ हे सद्गुण संपन्ना. ४ पर्वत. ५ गरुड. ६ वानर. ७ कच्चा.

धाका ॥ पू० चाल ॥ नाकांसि धरुनियां बसतां, तरि मरणें येते वायां ॥ २ ॥ हा विचार अधिं तुह्मि करितां, कां होतां मजला शीण ॥ पहा झाली किति तनु माझी, या योगे प्रभुजी क्षीण ॥ हें वर्म कळेना मजला, कां झालों इतुका दीन ॥ चाल ॥ हें करणें तुमचें देवा ॥ नसतें तरि घडती सेवा ॥ काय कपिचा तारि हो केवा ॥ पू० चाल ॥ खेवांसि देत गिरीवासी, प्रभु करुनि कृपेची छाया ॥ ३ ॥

पद-(जलद त्रिताल.)

(गरुड श्रीकृष्णाची प्रार्थना करतो.)

हरि मजला चालवेना ॥ ध्रु० ॥ मला वाटे येती भोंड ॥ पहा सुकलें किं तोंड ॥ कोठें निवाऱ्यांत कोंड ॥ धोंडें परि हीं साहवेना ॥ १ ॥ मज आलें मरण कळुन ॥ आतां जातें कसें टळुन ॥ गेले हातपाय गळुन ॥ पळुन सहसा जाववेना ॥ २ ॥ नाहिं करित मी सोंग ॥ घेऊं कशासाठीं कोंग ॥ तुज वाटों न हें ढोंग ॥ ओंगळा त्या पाहवेना ॥ ३ ॥ गिरीवासी प्रभु सांग ॥ कांहिं जीवनाचा थांग ॥ जसा खातो कोणि भांग ॥ अंग जड हें उडवेना ॥ ४ ॥

पद-(जलद घनाक्षरी.)

(श्रीकृष्ण गरुडाचें सांत्वन करितो.)

झाली गती अशी काय ॥ रडासि मोकळुनी धाय ॥ बाबा लागला कोठें घाय ॥ मोठा शूर पाही, कोणि तुजसम नाहीं, घडला कसा तूज अपाय ॥ १ ॥ आतां उठुनि कांहीं खाय ॥ घेई विश्रांति तरी जाय ॥ हात कुरवाळी, श्रम दुरवाळी, प्रभु खरा तो बाप माय ॥ १ ॥

---

१ माझें नाक धरून बसला असतां तर मला मरणच आलें असतें. गरुडाचें लांब नाक आहे. २ विशाद. ३ आलिंगन. ४ दगड, बोजा.

अंजनीगीत.

(नारद सत्यभामेला सांगतो.)

नारद बोलीले भामेसी ॥ कां तूं व्यर्थची शिणतेसी ॥ जें जें होतें त्या सीतेसी ॥ सांगतों तुजला ॥ १ ॥ कानीं घाली तूं बेसर[1] ॥ याचा न पडावा वीसर ॥ जरि म्हणती त्या हतसर[1] ॥ घालावे पायीं ॥ २ ॥ वाळे घालीगे हातांत ॥ बुगडी असों दे नाकांत ॥ बाळि एकची केशांत ॥ घालुनि ये बाई ॥ ३ ॥ वरकड तुजला सांगुं काई ॥ सीतेची त्या एकाचि बाही ॥ ऐशा सुंदर रूपा पाही ॥ लंकेश भुलला ॥ ४ ॥

कटिबंध.

(रामरूपाचें वर्णन.)

रतन मुकुट है शिरपर डाला ॥ भाल लगायो मृगमद[2] काला ॥ सोहत गले मोतनकी माला ॥ शाम तनूसे होत उजाला ॥ बांधे कटि पीतांबर पीला ॥ वोढे प्रभु भरजरी दुशाला ॥ पहेनलियो अंगा मखमलका ॥ सरलपटा सरपेंच बांका ॥ नोक झोंकसे लोक भुलावे ॥ ले धनु हातमें बान उठावें ॥ लछमन सीताकोभी बुलावे ॥ जग सारा हैरत[3]में डुबावे ॥ अजब तजेला भया उजाला ॥ चलो चलो रघुराज सजेला ॥ देख आवें दशरथ लाला ॥ सबही निकसे बाल गोपाला ॥ भई भीडतब गई सुध हरलई प्रभूनें ॥ कई बार अई सुरत नजरपर ॥ दई धई नहि हुई शांती ॥ फिर ताके मूरत ॥ ज्याकी कीरत बेद बखानत ॥ देख देख मनमों पछतानत ॥ यह रूप सुंदर ऐसो मंदर ॥ कंदर गिरिके बैठत अंदर ॥ उनको न मिले चंदर क्या है ॥ इंदरकोभी पारन जिसका ॥ मार लियो दस कंधर अज वो ॥ बंदर खातर रूप बनो है ॥ इतनेमें वो कपिसर आया ॥ सीस नमाकर देखलीया ॥ सब ठान मान प्रभुराम चरनपर ॥ मिठी मारजो देखा ऊपर ॥ किशनरूप महाराज दिखायो ॥ कहत अंजनी सुतसे द्वापरजुगमें तुमको दरसन दियो है ॥ महाराज जदुविर ऐसो रूपसुंदर राम बनो है ॥ महाराज ॥ १ ॥

---

१ हीं दागीनें आहेत. २ कस्तूरी. ३ आचंबा.

लोपामुद्राख्यान.

कथा—सारांश.

एका राजाचा मुलगा तरुण असून रूपानें फार सुंदर होता. तो मृगयेकरितां अरण्यांत गेला असतां फार श्रमला, व अगस्तीचे आश्रमांत आला. त्याचें रूप पाहून अगस्ती मोहित झाला, व राजपुत्रास ह्मणाला माझी बायको हो. राजपुत्र फार रागावला, व त्यानें अगस्तीचा उपहास केला. अगस्तीनें त्या राजपुत्राचें अंगावर पाणी मंत्रून टाकिलें, तेव्हां तो स्त्री बनला. नंतर त्याचा बाप तेथें आला त्यानें अगस्तीस 'शिक्षा करीन,' ह्मणून धाक दाखविला. 'तुलाही सासू करितों' असें ह्मणून अगस्तीनें हातांत उदक घेतलें. तेव्हां राजा घाबरला, व त्यानें त्या स्त्री बनलेल्या मुलाचें व अगस्तीचें लग्न लावून दिलें. त्या स्त्रीची पूर्वींची मुद्रा (रूप) लोपली. तेव्हांपासून तिचें नांव लोपामुद्रा असें पडलें. ती स्त्री फार पतिव्रता होती ही कथा या आख्यानांत आहे.

आर्या.

कांता कुंभजमुनिची लोपामुद्रा असे जगन्मोहित[1] ।
चरित तिचें अति पावन श्रवणें होईल कां न जन्माहित ॥ १ ॥
तीच कथा सुत सांगे शौनक-प्रभृती ऋषीस अदरानें ।
कीं तो रस हास्य बहु झांकाळचि निज मुखांसि पदरानें ॥ २ ॥
ह्मणती मुनिजन सारे तरि मग श्रवणासि येउं देच अधीं ।
सांगे समूळ कथन श्रवणें जावोत सर्वही आधी[2] ॥ ३ ॥
सांगे सुत सकलांतें सुरस कथा ही नमूनियां महिला ।
द्या चित्त एकदाची सारे आकर्णनासि याम[3] हिला ॥ ४ ॥
आद्ययुगीं मुनि कुंभज बैसुनियां काननीं तपासि करी ।
झालें भय अमरातें त्यांतहि चिंता बहूत पाशि[4] करी ॥ ५ ॥
प्राशिल नीर उदधिचें तरि मग यावेंचि दैन्य यादांसीं[5] ।
यास्तव चिंता वाटे प्रभुवर कां कोपलासि या दासीं ॥ ६ ॥

---

१ जगतांत पूज्य. २ दुःखें. ३ प्रहर. ४ वरुण. ५ जलांतील प्राणी.

भ्याले सुरगण अवघे ह्मणती तप-तेज काय हो याचें ।
पाठविल्या जरि युवती शक्रानें विघ्न काय होयाचें[1] ॥ ७ ॥
झालें तप प्रखर बहु मुनिचें लोकत्रयासि कांपवि तें ।
मग तोंहि निज पदासह नाहीं देणार इंद्र कां पवि[2]तें ॥ ८ ॥
इकडे भूमंडलिं हो काय चमत्कार जाहला परिसा ।
होइल कनक न कां तें तत्कालचि लोह लागल्यां परिसा ॥ ९ ॥
नगरी कुंभक नामा दक्षिण देशांत जी असे महित[3] ।
नांदे नृपवर तेथें बाहूबळ ह्मणति सर्व ज्या महित[4] ॥ १० ॥
भार्या रूपवतीला पुत्रहि सुकुमार तो सुतनु जाला ।
जाला मोहित मुनिवर पाहुनियां त्याच राजतनुजाला ॥ ११ ॥
वय वर्षे सोळाचें रुप सुंदर वर्णितां नये कविस ।
बहुधा नसेल दुसरा भुवनें जरि धुंडिलींच एकविस ॥ १२ ॥
ऐका अद्भुत हें किति जरि होता कुमर तो मदनसाच ।
ह्मणउनि काय तयाचें चुंबावें मुनिवरें वदन साच ॥ १३ ॥
तो एकदां नृपात्मज घेउनि निज सैन्य काननां गेला ।
मृगयार्थ श्रमला बहु अप्राप्तिस्तव मनांत रागेला[5] ॥ १४ ॥
हरिणामागें भ्रमला श्रमला ऐशांत दिन बहु क्रमला ।
गमला ताप अधीं मग पाहुनि दिव्याश्रमासि तो रमला ॥ १५ ॥
सोडुनि सेना मागें घेउनि निज भृत्य राज-नंदन तो ।
गेला एकाकीं त्या पाहुनि मुनिला करीत वंदन तो ॥ १६ ॥
देखुनि राजसुतातें झाला व्याकुळ मुनींद्र मदनानें ।
वदनानें स्तौत्यें[6] करी लालन-पर तो तसाचि सदनां ने ॥ १७ ॥
बोले मुनी हळुच मग कांता होतोसि काय तूं माजी[7] ।
मांजी कर्व[8] घालुनियां चुंबी परि तो न जाहला राजी ॥ १८ ॥

१ व्हावयाचें. २ वज्राला. ३ पूज्य. ४ पृथ्वींत. ५ रागावलेला. ६ स्तुति, तारीफ. ७ कमरेला. ८ मिठी.

झिडकारिलें तयानें रोषें त्या मुनिवरासि तरि तो ये ।
ऐकेनाचि असा जंव पाहे मंत्रूनि सिंचिलें तोयें ॥ १९ ॥

काय तपाचें बळ हो केलें तत्काल कामिनी–रत्न ।
भृत्यहि दासी झाल्या सरले त्यांचे समस्त मग यत्न ॥ २० ॥

गेलें सैन्य सकल तें नगरां परि तो कुमार कां नाहीं ।
ह्मणउनि शोधित फिरले आलें दुर्वृत्त घेत कानाहीं ॥ २१ ॥

भीती सेवक-जनही राजातें सर्व वृत्त कळवाया ।
कोणी ह्मणती सांगूं, जातें हें एक एक पळ वायां ॥ २२ ॥

मग ते सैनिक अवघे जाउनि भूपासि सांगती कथन ।
घडलें अघटित कीं हें व्हावें त्याचें अतां कसें मथन ॥ २३ ॥

भूपहि सचिंत झाला योजूं तरि कोणत्या उपायासीं ।
आहे कोण असा क्षम वंदूं त्याच्याचि आज पायासीं ॥ २३ ॥

कांता रूपवतींही ऐकुनियां बहु करी विलापातें[1] ।
समजेना कवणांही भूवरि प्राणांत दाविला पातें[2] ॥ २५ ॥

मग तो नृपाल सत्वर घेउनि निज सैनिकांसि कोपानें ।
गेला त्यासन्निध जो निज कुमराच्या तनूसि लोपा नें ॥ २६ ॥

भेटुनि तयासि बोले करणें तुज काय हें बरें घटंजा[3] ।
हो सावध ना तरि मी जाळिन तुज आणि या तुझ्या उटंजा[4] ॥२७॥

पलटवि रूप सुताचें आहे कल्याण यांत हें समज ।
करिशिल विलंब तरि मग स्थानीं रिपुच्याचि तूं अहेस मज ॥२८॥

कोपें बोले मुनिवर मूढा मज भिववितोसि कां वाया ।
करितों सासु तुलाही लवहि नको स्त्रीस्वरूप पावाया ॥ २९ ॥

ऐसें बोलुनि घेतां झाला निज हस्तकींच तोयास ।
अभिमंत्रुनि टाकावें आली इतुक्यांत स्फूर्ति तों यास ॥ ३० ॥

---

१ निरसन. २ संकट पडून. ३ कुंभज, अगस्ती. ४ झोंपडी. ५ शुद्धी.

नमुनि ह्मणे मुनिवर्या चुकलों अपराध हा क्षमा कर गा ।
झाली मम पुत्राची कन्या ती तरि असे तुझ्या करंगा ॥ ३१ ॥
बोले मुनिवर आतां द्यावी कन्या यथाविधान मला ।
इतरीं नसे मदात्मा ईच्या ठायींच हा असे रमला ॥ ३२ ॥
मग त्या भूपें मुलिच्या पाणिग्रहणासि करविलें विधिनें ।
होतें असेंचि लिहिलें भाळीं सुताच्या ह्मणे पहा विधिनें ॥ ३३ ॥
तें पासुनि हें झालें लोपामुद्रा तिचें असें नांव ।
गाती कीर्ति जगत्रयिं भवतरणाचीच ती असे नाव ॥ ३४ ॥

याच आख्यानाचीं पदें.

पद–(घनाक्षरी.)

(राजपुत्र अरण्यांत शिकारीस जातो.)

चली सेना सब सात ॥ लियो सायक धनु हात[1] ॥ भई शुद्ध जब प्रभात ॥ कुंवर जात बिपिनमो ॥ १ ॥ उमर सोलाकी साल ॥ कुटिल सिरमेके बाल ॥ बदन चांदकी मिसाल ॥ मोतन माल गलेमो ॥ २ ॥ रूप सुंदर सुकुमार ॥ नजर आवे जैसो मार[2] ॥ कमर लटके तलवार ॥ है दलभार संगमी ॥ ३ ॥

पद–(गडयानो कृष्ण गडी.)

(ऋषी मोहीत होऊन ह्मणतो.)

मुनिवर ह्मणे सुतनु आजी ॥ कांता होई तूं माझी ॥ धृ० ॥ रमलें चित्त तुझ्या ठायीं ॥ यास्तव ह्मणतों मी पाही ॥ पडेना न्यून कधीं कांहीं ॥ होइल आनंद तुजलाही ॥ सत्वर होउनियां राजी ॥ १ ॥ आश्रम पहा आहे कैसा ॥ नाहीं भूमंडलिं ऐसा ॥ इच्छित वस्तू दे जैसा ॥ पुरविना सुरतरूही तैसा ॥ हें तूं अणुनि मनामाजीं ॥ २ ॥ मी हीं तरुण अहे कसला ॥ देइन पदार्थ जो नसला ॥ दिससी मजलागीं रुसला ॥ असा काय राग मनीं

---

१ हातांत. २ मदन.

घुसला ॥ सांग रे मनांत जें डांजी ॥ ३ ॥ इच्छा नसे इतर कांहीं ॥ मोहलों रूप–ललामाही ॥ असे तूं स्वस्थचि या गेहीं ॥ आठवीं गिरिवासीलाही ॥ पुरविल वांछा तुज जी, जी, ॥ ४ ॥

पद–(जलद घनाक्षरी.)

(राजपुत्रानें झिटकारल्यावर मुनी ह्मणतो.)

नको होऊं ऐसा दंग ॥ घडो देई अक्षयीं संग ॥ कां रे करिसी मनोभंग ॥ राहे मजपाशीं, सुख तूं भोगिसी, सोडी अतां सारे ढंग ॥१॥ कळुं दे तुझें अंतरंग ॥ नको झिडकारू रे अंग ॥ कां रे नायकसी, हटची धरिसी, समजुं नको मज भणंग[२] ॥ २ ॥

पद–(घनाक्षरी.)

(राजपुत्र रागावून मुनीस ह्मणतो.)

करिन ह्मणसी मज नार ॥ चुंबन दिधलें शतवार ॥ तुवां केला अविचार ॥ क्षमा फार आमुची ॥ १ ॥ दिलें तुजला जिवदान ॥ क्षेम यांतचि तूं मान ॥ करुनि घेशिल अवमान ॥ नाहिं भान तुजमधें ॥ २ ॥ मुढा भ्रमलासी फार ॥ तुला न कळे नर नार ॥ झालासि जन्मुनि भूभार ॥ जननि फार श्रमविली ॥ ३ ॥ अहे मि राजाचा सूत ॥ पाहा माझे किति दूत ॥ तुला आणतिल हे मूत ॥ राहिल ऊत[३] मग कसा ॥ ४ ॥ कशी नाहीं तुज लाज ॥ ह्मणसि होई मज थाज ॥ किती विपरीत हें काज ॥ करिन माज दुर तुझा ॥ ५ ॥

पद–(जलद त्रिताला.)

(राजकुमार स्त्री झाल्यावर आपल्या स्त्री झालेल्या भृत्यास ह्मणतो.)

अतां येथें मी करूं काई ॥ धृ० ॥ होतों सुखी किती घरीं ॥ व्यर्थ आलों वनांतरीं ॥ येथें झालि ऐसी परी ॥ दुरि राहिली बाप आई ॥ १ ॥ माझें कर्म दिसे खोटें ॥ नाहिं मार्ग जाऊं कोठें ॥ कैसें अन्न-पाणी घोटें ॥ मोठें विघ्न हें आलें बाई ॥ २ ॥ हें मी सांगु कवणापाशीं ॥ कोण करितो काय या-

१ दुःख देते. २ दरिद्री. ३ माजोरेपणा. ४ बायको.

सीं ॥ आले वाटे होणें दासी ॥ ऋषी पडला असे डाईं ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धाव ॥ सत्वर तुं तरि अतां पाव ॥ नाहीं तिहीं लोकीं ठाव ॥ नांव अपुलें राख पाही ॥ ४ ॥

दीपचंदी–काफी–(भोलानाथ दिगंबर.)

(पुन्हा ह्मणतो.)

दुःख हें सांगूं आतां कवणासी ॥ पुरुषाची मी नार कशि झालें खंती हेचि मनासीं ॥ धृ० ॥ लज्जा वाटे मजला भारी ॥ तोंड कशी दाऊं जनासीं ॥ अंतरलें मी आईबापातें ॥ इतरहि गोतगणासीं ॥ १ ॥ मुकलें कीं मी राज्यपदातें ॥ अन्यहि मान धनासीं ॥ गिरीवासी प्रभू पाव अतां मज ॥ नमितें मी चरणासीं ॥ २ ॥

पद–(मजला वरिल सुभद्रा काय.)

(राजा देवाची प्रार्थना करतो.)

पडलें संकट हें भारी, रामा धांव फिरे ॥ धृ० ॥ होता मजला एकचि सूत ॥ कन्या झाली हें अद्भुत ॥ करिन हा देह अतां मी दूत ॥ वेळ बहूत राहवेना ॥ १ ॥ विधिनें लिहिलें कसें भाळीं ॥ सदोदित हेंचि मनीं जाळीं ॥ एवढें विघ्न अतां टाळी ॥ ये काळीं पाव मला ॥ २ ॥ सुचेना उपाय तो कांहीं ॥ जाहली असि गति तोकां ही ॥ सांगतों जरी सैनिकांहीं ॥ धिर नाहीं त्या लागीं ॥ ३ ॥ गिरीवासी तूं प्रभुराय ॥ दावी आतां तरणोपाय ॥ वंदिन अखंड तव मी पाय ॥ होसी माय तूं आमुची ॥ ४ ॥

साकी.

(राजाची स्त्री विलाप करते.)

सुनी खबर जब कुंवर बिपिनमों कांता रूप बनो है ॥ सोंच करे माता मनमों हे भाई दुःख घनो है ॥ १ ॥ अब मैं कैसी जाऊं बिपिनमों धुंडुं बालक अपनारी ॥ कहूं किसे दुःख अब सारा

---

१ इष्टाला. २ मुलांस.

मै हुवा मुझे सुख सपनारी ॥ २ ॥ अबतो जानो नही बचूं मै जहर खाय मर जाऊरी ॥ बालक मेरो परो बिपिनमो कौन जुगतसे लाऊंरी ॥ ३ ॥

पद–(उद्धवा शांतवन करजा.)

(राजाची स्त्री विलाप करतें.)

कां देव क्षोभला तरि हो, गति झाली बाळा कैशी ॥धृ०॥ मजलाही भुल काशि पडली, प्रतिबंधचि केला नाहीं ॥ काय मृगये वांचुनि होता, उपवास पडला गेहीं ॥ कसें करूं सुचेना आतां पुढें उपाय याचा कांहीं ॥ चाल ॥ बाई अनर्थ झाला मोठा ॥ या आग लागो दे पोटा ॥ काय मृग मांसाला तोटा ॥पू० चाल॥ खोटाचि काळ हा गमतो, झालि अघटित घटना ऐसी ॥ १ ॥ कोणतें पाप वडवडलें, मज विपाक नकळें पाही ॥ नसे घात कोणाचा केला, मन माझें देतें गाही ॥ कां बाळ मला अंतरलें, मुळ शोधुनि काढा कांहीं ॥ चाल ॥ मी वनासि कैसी जाऊं ॥ बाळाला कोठें पाहूं ॥ हें दुःख कसें हो साहूं ॥ पू० चाल ॥ बाहूंसि बळ कवणाच्या, करि सुटका पहिल्या ऐसी ॥ २ ॥ यासाठीं विचार पडला आहे प्रार्थूं मी कवणासीं ॥ कोण हो दयाळू ऐसा, सोडवितो त्या बाळासी ॥ मज चिन्ह दिसेना बरवें कोण शिक्षा करितो त्यासी ॥ चाल ॥ हें अरिष्ट आलें मोठें ॥ बाइ कर्मचि अपुलें खोटें ॥ गिरिवासि आहे तरि कोठें ॥ पू० चाल०॥ बोटेंच कानिं घालुनि कां बसला हें नकळें मजसी ॥ ३ ॥

पद–(काफी–दीपचदी.)

(राजाची स्त्री विलाप करत.)

अब मै कैसी करूं मेरी माई ॥ धृ० ॥ बालक ऊठा बन जा बैठा ॥ नहि मै उसे न्हलाई ॥ १ ॥ ना उसे बोली ना मै चाली॥ ना मै रोटी खिलाई ॥ २ ॥ लरका मेरा मुनिनें घेरा ॥ अबहि कांता बनाई ॥ ३ ॥ किस बन जाऊं कहां उस पाऊं ॥ बडी अफत सिर आई ॥ ४ ॥ गिरीवासीसे कोन जा बोले ॥ मुनिको करे मनाई ॥ ५ ॥

(कटीबंध.)

(राजाचा मुलगा—लोपामुद्रा—कसा दिसला.)

अजब रूप है इस कामिनका ॥ पडत उजाला सबही तनका ॥ माल नहीं उर्वशी मेनका ॥ कहां गुजारा फिर औरनका ॥ मारे जिनको बान नयनका ॥ घायल कर दे तन मन उनका ॥ कूच सघन घन चपला जैसी ॥ अगन गगनमें चमके वैसी ॥ कुटिल बाल है निटिल देसके ॥ उपमा इसको कौन दे-सके ॥ सीस फूल है सिरमें डाला ॥ हार गले मोतनकी माला ॥ वोढे अंगपर लाल दुशाला ॥ सोहे हात फुलोंका झेला ॥ पहेन लिई साडी जरतारी ॥ चोली कीमतमें है भारी ॥ नग सिरके सब सिरमे डारी ॥ नाक नथनिया हातों चूडा ॥ सोहत सिर बालोंका जूडा ॥ भाल तिलकसे चमके मुखडा ॥ रंग लाल पानोंका बीडा ॥ जडाव कंगन पावों पैंजन ॥ डार दियो है आंखों अंजन ॥ दांत मिसीका सोहे मंजन ॥ कंजनयन सब संज बनी है ॥ छांड दियो हाथी-दल भंजन ॥ बैठी करत मुनी-मनरंजन ॥ अजब नसीबेके है ताले ॥ इसी तऱ्हे पडते है घाले ॥ कछु नहि होता बोले चाले ॥ कोन पडे फिर इसके पाले ॥ डोले मुनि उस देख देखकर ॥ बोले मनमें सोंच सोंचकर ॥ रहो खुषीसे काम किसीसे ॥ नहि मत डरना धरना धीर ॥ भरोसा दे दे कामिनको समजाया ॥ देखो ये मुनिनें कैसी पुरखाकी नार बनाया ॥१॥

(अंजनी गीत.)

(राजा अगस्ती ऋषीस ह्मणतो.)

बोले भूपाळ मुनिवरा ॥ आहे अपराधी मीं खरा ॥ पडलें अंतर क्षमा करा ॥ वंदीतों पायां ॥ १ ॥ तुमच्या तपाचें हें बळ ॥ ठावें असतें मज सकळ ॥ करितों तरी कां मी छळ ॥ जाणूनि ऐसा ॥ २ ॥ पडला होता मज भ्रम ॥ तुह्मि तो निवारिला श्रम ॥ चालू केला राज्यक्रम ॥ उपकार तुमचा ॥ ३ ॥ केला बाळानें अन्याय ॥ मनीं धरीना ती माय ॥ तैसा केला तुह्मी न्याय ॥ रक्षिलें मजला ॥ ४ ॥ केला होता आपुला घात ॥ तुह्मिं टाळिला हातोंहात ॥ आतां मी झालों निवांत ॥ कृपेनें तुमच्या ॥ ५ ॥

श्रीशिवरात्र कथेचें आख्यान.

(कथा प्रसिद्ध असल्यामुळें सारांश दिला नाहीं.)

आर्या.

नरवर शशिदंत करी जगतीवरि राज्य निज–प्रियासहित ।
पंचशता जरि कांता वांछिति दोघी निजप्रियास हित ॥ १ ॥
वरकड असती साऱ्या परपुरुषीं रत सदा मदानें हो ।
ग्राह्य करी नच कोणी ह्मणती वश त्यास दामदानें हो ॥ २ ॥
त्या पापें नरपतिचें गेलें पुण्य क्षयासि होतें जें ।
नाहीं तरि लोपवितां शशिसूर्यांच्या कळांसि हो तेजें ॥ ३ ॥
पावे भूप मरण तो करिती सहगमन कामिनी हो त्या ।
ज्या पतिसेवेलागीं अति तत्पर दिवसयामिनी होत्या ॥ ४ ॥
पापें कुरंग झाला पति झाल्या त्या कुरंगिणी कांता ।
शांता दांता कांता परि रंजविती सुरंगिणी कांता ॥ ५ ॥
इन्द्रसभेमाझारीं सुमती गंधर्व गायनीं चुकला ।
हो व्याध असें ह्मणतां तत्कालचि निजवपूसि तो मुकला ॥ ६ ॥
होउनि व्याध धरेवरि विचरे धनुबाणही जवळ वसवी ।
पसरुनि वागुर विजनीं बहुधा हरिणांसि अनुदिनीं फसवी ॥७॥
माघीं कृष्णचतुर्दशिदिवसीं तो व्याध वनिं बहु श्रमला ।
श्रमला परंतु न मिळे मांस मृगाचें, अशांत दिन क्रमला ॥ ८ ॥
वागुर पसरुनि भूतळिं बिल्वतरुवरिं चढूनिया बसला ।
चित्तीं ह्मणे पहा अजि दैवें हा उगवला दिवस कसला ॥ ९ ॥
नेत्रांअडील तोडुनि बिल्वदळें भूतळासि तो टाकी ।
घडलें लिंगार्चन, त्या भक्ताचा प्रभुवरासि तोटा कीं ॥ १० ॥
उपवास दिवा पडला रात्रौ लिंगार्चनादि विधि घडला ।
झडला मळ पापाचा ह्मणवुनि यमधर्म दृष्टिला पडला ॥ ११ ॥

---

१ द्रव्य देऊन. २ जाळें. ३ अरण्यांत. ४ डोळ्या आड आलेले.

बोले यमधर्म तया बा ये बैसे विमान हें तुजला ।
आणिलें प्रभ्वाज्ञेनें पाहुनि तव पूजनासि तो रिझला ॥ १२ ॥

व्याध ह्मणे मी पापी शिव तरि मज कासयासि आणवितो ।
घडलें दर्शन तुमचें, द्या मज वर दोन हेंचि जाणवितों ॥ १३ ॥

भाषा कळो मृगाची, मृगमांसाचें अखंड भोजन हो ।
यापरतें जें कांहीं त्याचें मजला नसें प्रयोजन हो ॥ १४ ॥

पूर्वज्ञान मृगातें, करुनि उपोषण तृषार्त तोयास ।
आला सरस्तटीं त्या पाडी व्यसनांत व्याध तो यास ॥ १५ ॥

लागे वेळ बहुतसा ह्मणवुनि धुंडीत त्या प्रिया फिरल्या ।
आल्या सरोवरीं मग व्यसनीं[1] दयितासि पाहतां विरल्या[2] ॥ १६ ॥

ह्मणती निजपतिला त्या, या बाहिर व्याध तो जवळ नाहीं ।
जलपानातें करुनी जाऊं हळुं हळुं असेंचि वळणांहीं[3] ॥ १७ ॥

वृक्षीं बैसुनि लक्षीं कक्षीं धनुबाण सर्वदा रक्षी ।
पक्षी-मृग-पल[4]-भक्षी वक्षीं ताडावयासि ओपेक्षी ॥ १८ ॥

रडती प्रिया वियोगें हरिणी वर्णील कोण गहिंवर तो ।
भाषण ऐकुनि उतरे व्याधहि वृक्षांवरुनि महिवर तो ॥ १९ ॥

करुनि उपोषण आला सरतटिं त्या पारणा करायासी ।
घे पल[4] अमुचें देतों जाऊं दे आपुल्या घरां यासी ॥ २० ॥

वाटे भार तुला जरि मांसाचा न्यावयासि गेहातें ।
येतों चाल तुजसवें, मारीं सदनींच, शस्त्र घे हातें ॥ २१ ॥

मरती सुवासिनी ज्या पावति कैलास लोक त्या धन्या ।
अन्या गति आह्मातें देउं नको, समज आपुल्या कन्या ॥ २२ ॥

बाळे ह्मणती आह्मां मारुनि घे मांस कोवळें खारें ।
सोडी या जरठाच्या[5] मांसाचा यापुढें न लेखा रे ॥ २३ ॥

---

१ संकटीं. २ घाबरल्या. ३ वळणावळणांनीं. ४ मांस. ५ टपलेला आहे.

व्याध ह्मणे त्या सर्वां मानूं विश्वास केविं सांगा तें ।
सोडिन तरीच मृग तो शशांकस्थित[1] अणाल सांगातें[2] ॥ २४ ॥

ठेउनि साक्षी त्यातें मुक्त करिन निश्चयेंसि मग जाणा ।
त्यावांचुनि हें न घडें पुष्कळ जरि वाहिल्या तुह्मी आणा ॥ २५ ॥

ह्मणती मृगी तयासीं ठेवी विश्वास आमुच्या वचनीं ।
विश्वासघातकी जन पडती जाऊनियां नरक–पचनीं ॥ २६ ॥
वाटे आश्चर्य तया, पशुलाहीं धर्म हा सकळ कळतो ।
असतो सूज्ञ, अजवरी मीही पाहून यास कळकळतों ॥ २७ ॥
व्यर्थ जिणें हें माझें पशुतुल्यहि योग्यता नसे माजी ।
राजी देव कसा मग, केली हिंसाचि काननांमाजीं ॥ २८ ॥

जाळी वस्त्रें अपुलीं अयुधें टाकून देतसे धरणीं ।
प्रार्थी शिवासि मग तो प्रभु आतां ठाव दे ह्मणे चरणीं ॥ २९ ॥

असडुनि पाश मृगाचा सोडी तो जीवनार्थ कासारीं ।
होतां शिव-पद्-लीनाचि जातिल दुःखेंहि मग न कां सारीं ॥ ३० ॥
स्नान करुनियां मृग ते जलपानातें करीत जों होते ।
आलें विमान घणणण घंटा शिवदूत वाजवित होते ॥ ३१ ॥

आज्ञा असे शिवाची सत्वर बैसून पुष्पकांत चला ।
ह्मणती मृग ते येतों व्याधासहि घ्या सवें, चला, उचला ॥ ३२ ॥

वदती शिवदूत तया आलें होतें विमान यासि खरें ।
मागुनि पलमात्रचि[3] हो त्यजिलें मूढाचिया पहा शिखरें[4] ॥ ३३ ॥
मग ते ह्मणती व्याधा शिव-भजनीं तूं अखंड राहेच ।
येसिल कैलासातें अंतीं तुज सांगणें असे हेंच ॥ ३४ ॥

नेले मृगपंचक तें स्वर्गीं अद्यापि ऋक्ष-गणपाळीं[5] ।
पाहति सर्वांहि जन त्या शिव निजभक्तां असाचि प्रतिपाळी ॥३५॥

---

१ चंद्रावर असलेला. २ बरोबर. ३ फक्त मांसच. ४ शिरोमणी. ५ नक्षत्रसमुहांत.

अनुदिनिं गाती ध्याती प्रभुमृत्युंजय असाहि जरि यजिती ।
पावति पूर्ण-पदातें जन्मजरामृत्युच्या भया त्याजिती ॥ ३६ ॥

वदले शिव सकलांतें मजलागीं भक्त कोण आळवितो ।
श्रवण करूं द्या पुरतें सत्य असें कीं उगाचि चाळवितो ॥ ३७ ॥

मग त्या पंचमृगांनीं तत्कालाचि विनविलें शिवाला हो ।
उरला व्याध तसाची झाला पदप्राप्तिचा न त्या लाहो ॥ ३८ ॥

तोचि असेल तुह्मांतें चित्तापासून नित्य आठवित ।
वाटे मोह तयाचा, प्रभुच्या हृदयांत प्रेम दाटवित ॥ ३९ ॥

देव ह्मणे दूतांतें सत्वर आणाचि व्याध या ठायां ।
गेले विमान घेउनि, लागे त्या वेळ काय गाठायां ॥ ४० ॥

ह्मणती चाल विमानीं बैसुनि नेतों तुला शिवापाशीं ।
होइल दर्शन आजिच राहिल कोठूनि ठाव पापासीं ॥ ४१ ॥

नेलें शिवसन्निधची धरवुनियां रूपही भवाचें त्या ।
झाली कृपा भवाची करितें मग काय भय भवांचें त्या ॥ ४२ ॥

याच आख्यानाचीं पदें.

साकी.

(व्याधाचें पूर्ववृत्त.)

इंद्र सभामों एकदिन सुमती, गावें ताल बजावेरी ॥ भूल गयो गत गायनकी तब, इंदर शाप सुनावेरी ॥ १ ॥ व्याध होय विचरे धरनी मुढ, मस्त भयो मद गर्वनसे ॥ सुमती छांड देत तनु अपनी, व्याध बनगयो तबसेरी ॥ २ ॥ तरुन होय विचरे धरनी धनु, बानही हातमें लेवेरी ॥ धुंडत मांस मृगनका भटके, नित दिन बिपिन बसावेरी ॥ ३ ॥

---

१ पूजितात. २ लाभ. ३ शंकराची ४ संसाराचें. ५ या नांवाचा गंधर्व.

साकी.

(यम व्याधा समीप कसा आला.)

बिमान लेकर अंतक[1] आयो, घननन घाट बजावेरी ॥ कहे व्याध तुम चढो चलो अब, भोलानाथ बुलावेरी ॥ १ ॥ व्याध कहे जमराज हुं पापी, काहेकु नाथ बुलावेरी ॥ दर्शन भये तुमारे मुजको, ये दो बर मिल जावेरी ॥ २ ॥ भाखा समजपरे मृगन-नकी, मांस मृगन नित पाऊरी ॥ नही मुझें औरनसे, कारन काहेकुं सरग मैं जाउंरी ॥ ३ ॥

अंजनीगीत.

(यम व्याधास बोलतो.)

ह्मणे अंतक व्याधासी ॥ काल तुं होतासी उपवासी ॥ नि-शिथीं[2] करूनि पुजनासी ॥ तोषविलें देवा ॥ १ ॥ रात्रीं होतों मी कैलासीं ॥ प्रभुनें कथिलें हें सर्वांसीं ॥ पूर्णभक्त माझा त्यासी ॥ आणवितों आतां ॥ २ ॥ आज्ञा केली मजलागुनी ॥ आलों पुष्पका घेउनी ॥ सत्वर चलावें बैसूनी ॥ कैलासा लागीं ॥ ३ ॥ देव फारची तोषला ॥ ह्मणतो काय मि देउं त्याला ॥ एवढा उपकार वाटला ॥ बा तुझा त्यासीं ॥ ४ ॥ पुजितो अखंड शुनाशीर[3] ॥ नम्र करूनियां शिर ॥ तरि त्या लावितो उशीर ॥ फळ नाहीं ऐसें ॥ ५ ॥ कां तूं करितोसि मग वेळ ॥ चाले वि-मानाजवळ ॥ त्याच्या कृपा-तरूचें फळ ॥ घे आलें हातां ॥ ६ ॥

पद (जलद घनाक्षरी.)

(पुन्हां यम बोलतो.)

कारे झालासी तूं दंग ॥ कळुं दे तुझें अंतरंग ॥ कां तूं चोरीतोसी अंग ॥ सांग झडकारि, झालें काय तरि, घडतो प्रभूचा कीं संग ॥ १ ॥ याहुनि दुसरा कोण प्रसंग ॥ होई पदांबुजीं भृंग ॥ चाल लवकारि, विमानाभीतरि, सोडी वरकड सारे संग ॥ २ ॥

---

१ यम. २ रात्रीं. ३ इंद्र.

पद (गडयानों कृष्ण गडी या—चालीवर.)

(व्याध अंतकाला बोलतो.)

बोले व्याध अंतकाला ॥ करूं या काय विमानाला ॥धृ०॥ नलगे जाणें कैलासीं ॥ पाहूं कशास शैलासी[1] ॥ घालूं गांठचि बैलासी[2] ॥ पुसेल कां क्षुधित जेवलासी ॥ अंचवलों मृगमांसाला ॥ १ ॥ बाळें माझीं लहान घरीं ॥ कांता बहुतचि प्रेम करी ॥ करूं मी कैसा त्यांस दुरी ॥ असा काय तेथें लाभ तरी ॥ सोडूनि अशा प्रपंचाला ॥ २ ॥ जाहलें दर्शन अनयासी ॥ मागणें आहे तुमच्यापासी ॥ दोनचि वर द्या दासासी ॥ असेना दुसरी आसोसी[3] ॥ निवेदन करितों चरणाला ॥ ३ ॥ भाषण कळो श्वापदांचें ॥ भोजन मिळो मृगमांसाचें ॥ याहुनि कारण अन्याचें ॥ नसें मज कथितों हें साचें ॥ मानितो गिरिवासी तुजला ॥ ४ ॥

पद—(उद्धवा शांतवन कर जा— या चालीवर.)

(हरिणी विलाप करितात.)

बहु विलाप करिती हरिणी, पति सुटका होइल कैसी ॥ ॥ धृ० ॥ दैवाची गति पहा कैसी, वडवडलें पातक अमुचें ॥ हा नरपति होता कीं हो, आहे ज्ञानाहि पूर्व भवींचें ॥ जाहलें स्त्रियांच्या योगें, हें जन्महि यास मृगाचें ॥ चाल ॥ नसे गणती हो सैन्याची ॥ संपदा किती तरि याची ॥ शत्रुलाहि भीती ज्याची ॥ पू० चाल ॥ त्याचीच अवस्था अज ही ॥ दैवानें जाहली ऐसी ॥ १ ॥ पांचशें प्रिया कीं याच्या, राज्यही होतें भारी ॥ पुण्यही अचरला मोठें, धन दानें यज्ञागारीं ॥ वाटिलीं बहू विप्रांतें, व्रत नेमही याच प्रकारीं ॥ चाल ॥ तो पडला कीं आजि पाशीं ॥ कोण सोडवितो बरें यासी ॥ जाहला दीन गुणराशी ॥ पू० चाल ॥ रासीस कोण ग्रह याच्या, ये नकळे गति कां ऐसी ॥ २ ॥ अजि प्रार्थावें तरि कवणां, कोण करील मुक्त

---

१ पर्वताला, कैलासाला. २ नंदीशी. ३ इच्छा.

प्रियासी ॥ अलें संकट हें बहु मोठें, न सुचे उपाय कीं यासीं ॥ वाटतें दुःख शोकीं या, आहे मरणें आज आह्मासीं ॥ चाल ॥ नाहिं त्राता हो या काळीं ॥ पाडसें कोण सांभाळीं ॥ कसें लिहिलें विधिनें भाळीं ॥ पू॰ चाल ॥ टाळील कोण विघ्नातें, तुज वांचुनि या गिरिवासी ॥ ३ ॥

पद (गडयांनो कृष्ण गडी अपुला.)

(हरिणी व्याधास ह्मणतात.)

बोलती हरिणी व्याधासी ॥ सोडुनि दे पतिरायासी ॥ धृ॰ ॥ होता पूर्वी मृग राजा ॥ जाहलों आह्मि याच्या भांजा ॥ पावला मरण जयीं बीजा ॥ निघालों सति आपुल्या काजा ॥ ह्मणुनियां झालों कीं दासी ॥ १ ॥ अला हा जल—पानासाठीं ॥ धुंडित आलों या पाठीं ॥ केली बहुत अटाआटी ॥ धरिली पाशानें घाटी ॥ पाजी तूं तरि जिवनासीं ॥ २ ॥ उपोषण होतें शिवरात्रीं ॥ विकळता अली दिसे गात्रीं ॥ ठेवितों साक्षि सूर्य धात्रीं ॥ असूं दे पूर्ण तुला खात्री ॥ सत्वर येइल तुजपासीं ॥ ३ ॥ होसि व्याधा तूं सज्ञान ॥ वचन इतुकें अमुचें मान ॥ देइ पतिलागिं जीवदान ॥ पावसी कैलासीं सन्मान ॥ तोषेल तुजवर गिरिवासी ॥ ४ ॥

पद—(धरि मना साधुजनांचा संग.)

(मृगांचीं बाळें व्याधास ह्मणतात.)

वदतीं बाळें मधुर व्याधासी ॥ धृ॰ ॥ आईबापांनीं केलें उपोषण ॥ बोलवेना पाहा त्यांसीं ॥ १ ॥ उदकासाठीं व्याकुळ बहु तीं ॥ पाजि त्वरें जीवनासीं ॥ २ ॥ घे अमुचें हें मांस तूं कोमल ॥ सोडुनि दे जरठासी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु तोषुनि तुजला ॥ नईल निजधामासीं ॥ ४ ॥

दिंडी.

(व्याध मृगास ह्मणतो.)

व्याध बोले मी केविं पाश तोडूं ॥ नित्य अपुला व्यवसाय कसा सोडूं ॥ तुह्मां सोडुनियां पुण्याचि मी जोडूं ॥ मुल[illegible]

---

१ बायका. २ नरडें.

अशा कशी मोडूं ॥ १ ॥ क्षुधित असतिल तीं आजि घरीं बाळें ॥ येउनि बसतिल कीं पुढें घेउनि थाळें ॥ काय सांगूं मी त्यांसि तुह्मी सांगा ॥ नाहिं अणिलें अजि मांस येथुनि पांगा[१] ॥ २ ॥ टाकुं हातिचा हा लाभ जवळ आला ॥ घालुं बाळावरि आजि कसा घाला ॥ पुण्य जोडुनि मी काय करूं त्यासी ॥ व्यर्थ मरणें येईल ऊपवासी ॥ ३ ॥

पद–(जलद त्रिताल.)

(पुन्हा मृग ह्मणतात.)

कशि करुणा रे, तुला नाहीं ॥ धृ० ॥ देतों मांस तुजप्रती ॥ तुझि फिरेनाचि मती ॥ झालि कशि काय गती ॥ पति पडला विकळ पाही ॥ १ ॥ दोन्हि बाळें उपवासीं ॥ नाहिं चारा पाणी त्यांसीं ॥ प्रिती एकाची एकासीं ॥ फाशिं पडलीं असीं बा हीं ॥ ॥ २ ॥ झाले कंठ शुष्क आतां ॥ नको करूं पतिघाता ॥ नाहिं तुजविणें त्राता ॥ धाता आमुचा तूंचि पाही ॥ ३ ॥ गिरिवासि प्रभुराय ॥ होसि जगाची तूं माय ॥ रडतों मोकलुनि धाय ॥ काय पाहासी अंत तूं ही ॥ ४ ॥

पद–(जोगी.)

(व्याध पश्चात्तापानें बोलतो.)

हर हर पातक बहु केलें, केवळ मूढच कीं ॥ धृ० ॥ आहे या पशु-जातीला ज्ञान ॥ मानव होउनि मी अज्ञान ॥ शिणविली व्यर्थचि जननी जाण ॥ प्यालों थान दिवसनिशीं[२] ॥ १ ॥ ठाउकें या लागीं जे धर्म ॥ नकळे मज मूढातें वर्म ॥ कसें हें अघटित माझें कर्म ॥ होइल शर्म कोठुनियां ॥ २ ॥ अजवरि केली हिंसा फार ॥ नाहीं केला कधिंच विचार ॥ घेतला पापाचा शिरीं भार ॥ देईल थार प्रभु कैसा ॥ ३ ॥ गिरिवासी तूं प्रभुराय ॥ दाखवी मजलागीं निज पाय ॥ घालीं पोटीं हे अन्याय ॥ होसी माय तूं माझी ॥ ४ ॥

---

१ ताटें. २ निषा, पळा.

कटिबंध (विमानाचें वर्णन.)

शिवमूर्तीच्या करुनी ध्याना ॥ करीत होते मृगजलपाना ॥ गगनीं घंटा वाजे घनाना ॥ पाहती वरते करूनि माना ॥ घेउनि आले दूत विमाना ॥ ह्मणती करुनी बहु सन्माना ॥ चला नका करुं उशीर, माना ॥ दिव्य देह तत्काल धरविलें ॥ पन्नग भूषण भस्म चर्चिलें ॥ सर्वांगीं रुद्राक्ष शोभले ॥ गज-चर्मांबर ही पांघरलें ॥ केवळ ते शिवरूपी केलें ॥ स्त्रियांसहित त्या पूर्व-मृगातें ॥ आग्रह करिती बसावयातें ॥ ते ह्मणती आधिं घ्या व्याधातें ॥ तरीच येऊं आह्मि सांगातें ॥ जाणें त्याविण नसे स्वर्गातें ॥ वदले दूत शिवाचे त्यासीं ॥ आलें होतें विमान त्यासीं ॥ मागुनि या पलैमात्र यमासी ॥ या मूढानें व्यर्थ सोडिलें ॥ पापरुपि वरदान जोडिलें ॥ यासाठीं आह्मि ह्मणतों ऐका ॥ भवसिंधूची अणिली नौका ॥ बसा चला लागेना पैका ॥ श्रवण करुनि दूताची उक्ती ॥ मृग सारे व्याधासि बोलती ॥ शिव-पूजन तूं नित्य करित जा ॥ अखंड त्याचें ध्यान धरित जा ॥ नलगे खटपट दुसरी वाया ॥ सोडुनि दे तूं अवघी माया ॥ मांया प्रभुच्या येइल पाया ॥ उशिर नको मग स्वर्गा जाया ॥ असें बोलतां विमान गेलें ॥ झरझर तें मग गगनीं भरलें ॥ भरभर तें कैलासिं उतरलें ॥ मग ते सारे मृग त्या काळीं ॥ नमिति शिवाचें पदाब्ज भाळीं ॥ नेउनि ठेवी भर्गणा पाळीं ॥ पाहती जन सर्वदा त्रिकाळीं ॥ यापरि भक्तां तारिलें ॥ प्रभुनें त्या पंच मृगांचें पहा कैसें संकट हरिलें ॥ १ ॥

पद-(व्याधानें शिवाचा धांवा केला तो)

(विडा घ्याहो नारायणा)

पावरे चंद्रचूडा, कांरे अंत पहासी, नयन वेधले बा, मज कधवा नेसी ॥ ध्रु० ॥ आलें विमान मजलागीं, मी ऐसा अभागी,

१ मान्यकरा. ऐका. २ मांसच. ३ दया. ४ नक्षत्रांच्या पंक्तींत.

अन्हेर बहु केला, नाहीं कळलें मजसीं ॥ १ ॥ मृग ते पशुजाती, परि तुज ते गाती, ह्मणूनि निज-सदनीं, नेलें झडकरि त्यासी ॥ ॥ २ ॥ शरण तुजला मी, नेइ मजला धामीं, अखंड नमितों कीं, प्रभु तुझ्या पदासीं ॥ ३ ॥ गिरिवासी तूं प्रभुराय, झालों दिन मी गाय, नको उशीर लावूं, नये करुणा कैशी ॥ ४ ॥

(शिव दूतांचा आणि व्याधाचा संवाद.)

घनाक्षरी.

ह्मणति व्याधा शिवदूत ॥ बापा झालासी पूंत[1] ॥ केलें पाप तुवा हूतें[2] ॥ तरिच नूंत[3] आजि तुं ॥ १ ॥ नको लावूं तूं वेळ ॥ आहे प्रभू उतावेळ ॥ आह्मां होंइल आवेळ ॥ तरी मेळ कायसा ॥ २ ॥ व्याध बोले मी दीन ॥ मुळीं जातीचा हीन ॥ आहे तुमच्या आधीन ॥ जळीं मीन हा तसा ॥ ३ ॥ शासन घडलें एकवार ॥ कसें करिन वारंवार ॥ जसी नंगी तलवार ॥ तसा रहित संग मी ॥ ४ ॥ तया दिधलें शिवरूप ॥ दिसें भाग्याचि आमूप ॥ ह्मणुनि शिवचरणीं हूंप[4] ॥ धरी भूप मृग जसा ॥ ५ ॥ करुनि बहुतचि सन्मान ॥ घेउनि गेले विमान ॥ करित अवघे शिवध्यान ॥ सन्निधान तयाच्या ॥ ६ ॥

---

१ पवित्र. २ दग्ध. ३ स्तुत, स्तविलेला. ४ ईर्ष्या, हुरूप (?)

श्रीकृष्णांनीं अर्जुनाचें सारथ्य केलें तें आख्यान.

कथा–सारांश.

धर्मराजाचे घरीं पितृतिथि होती, ह्मणून त्यानें भीमास श्रीकृष्णाला बोलावून आणण्याकरितां पाठविलें. कृष्णांनीं भीमाची थट्टा केली, व मी येत नाहीं असें सांगितलें, तेव्हां भीम परत आला, व त्यानें झालेली हकीकत धर्मराजास सांगितली. नंतर धर्म राजानें नकुळास कृष्णाकडे पाठविलें, त्याच्याशींहि कृष्णानें भीमाप्रमाणेंच वर्तन केलें. यामुळें त्या दोघांचें युद्ध झालें. त्यात कृष्णाचा पराभव झाला. नकुळानें कृष्णास रथावर बांधून टाकिलें. तेव्हां कृष्ण, कांहीं वर माग, असें नकुळास ह्मणाला. नकुळही कृष्णास त्याच प्रमाणें ह्मणाला. तेव्हां कृष्णानें मी सांगितल्याखेरीज शस्त्र धरूं नको, ह्मणून नकुळास वर मागितला. नकुळानेंही अर्जुनाचें सारथ्य करीन असा कृष्णापासून वर मागून घेतला. ही कथा या आख्यानांत आहे.

आर्या.

वर्णी युद्धप्रसंगा वैशंपायन मुनी जया कालीं ।
सांगे सारथि होउनि कृष्णहि विजयास नित्य सांभाळी ॥ १ ॥
हें ऐकतांचि बोले जनमेजय नृप मुनीस सांगा तें ।
श्रीकृष्ण सारथी कां, मित्र असावाचि पृथक सांगातें ॥ २ ॥
बोले मुनिवर्य तया आहे इतिहास मी तुला कथितों ।
श्रीकृष्ण नकुळ दोघां झाला संकेत एकदां पथिं तो ॥ ३ ॥
होती पितृ-तिथी या साठीं तो धर्मराज सहदेवा ।
सांगे नागपुरां[1] जा आणी भीष्मादि-वृद्ध-गुरु-देवा ॥ ४ ॥
भीमहि मग पाठविला द्वारवतीला हरीस अणवाया ।
प्रार्थी जाउनि परि तो देव ह्मणे वाहतोसि अण[2] वाया ॥ ५ ॥
बोले देव विनोदें आली तिथि कोणत्या पित्याची[3] ती ।
तूं हि सुरापचि असती शाश्वत माति कोणत्या पित्याची[4] ती ॥ ६ ॥

---

१ हस्तिनापुराला. २ आण, शपथ. ३ भीम हा वायुतनय व पंडुतनय, ह्मणून कृष्णानेंही थट्टा केली. ४ पिणाऱ्याची. दारुबाजाची.

भीम ह्मणे यदुपतिला सांग तुझा बाप कोणता आधीं ।
देसी पारुष वचनें कां तरि आह्मांसि व्यर्थ तूं आधीं ॥ ७ ॥
ऐसें बोलुनि परते सांगे धर्मासि कृष्ण येत नसे ।
करितो हेलन बहुतचि मानी निज मानसांत हे तनसे ॥ ८ ॥
धाडी धनंजयातें आणाया हरिस यादवासहित ।
विनवी पुष्कळसा जरि, तोही झालाचि त्या दवास हित ॥ ९ ॥
येत नसे मी सांगे, जावें भीमें कशास रागानें ।
नाहीं शीत विमल जल तरि मग व्यर्थचि अशा सरां गानें ॥ १० ॥
नाहीं येत हरी तो धर्मासहि फाल्गुनाननें कळलें ।
कळलें वर्म तया मग प्रभुचें मन भक्तिनेंचि आकळलें ॥ ११ ॥
प्रेषी नकुळातें कीं युक्तीनें प्रभुवरासि आणावें ।
ऐकेनाचि तरी मग विहित अतिक्रम असेंहि जाणावें ॥ १२ ॥
तोही प्रार्थी बहुतचि देवा धर्में तुह्मासि आणविलें ।
घ्यावें यादव सारे वेळ न व्हावा असेंही जाणविलें ॥ १३ ॥
तरि देव ह्मणे नाहिं येत असें स्पष्ट ऐकिलें कानीं ।
नेइन बांधुनि तुमच्या, करणें तें काय बंधु-लेकांनीं ॥ १४ ॥
ऐसें वदतां चढला प्रभुलाहि कोप नावरे साच ।
सांगे यादव वीरां रक्षावें आजि नांव रे साच ॥ १५ ॥
झाले युद्ध प्रबळ तें उपमा नाहींच द्यावया कोठें ।
खेचर अस्त्रें नकुळें बाणांनें फोडिलेंचि हो कोठे ॥ १६ ॥
निघती बाणापासुनि बाण तयांची नसेचि हो गणती ।
लागति यादववर्मीं धनु नसतांहि उगेचि झणझणती ॥ १७ ॥
आला बळराम जरी चालेना युक्ति त्यापुढें कांहीं ।
झाला गतगर्व असा काय करावें तयासि आणिकांही ॥ १८ ॥

---

१ तन तृण, गवत गवतासारखे. तो आह्माला क्षुद्र समजतो, हा भावार्थ. २ दव थंडीच्या दिवसांत पडते ते. त्या दवाला हितकर, ह्मणजे थंड झाला. ३ भावार्थ-ज्या सरोवराचें पाणी थंड नाहीं त्याचें वर्णन करणें व्यर्थ होय. ४ योग्य मार्ग मोडला असें समजावें. ५ कोठारे.

सोडी सुदर्शनासहि प्रभु त्या वीरा अणावया जवळ ।
परि माहेश्वर योजुनि अणिलें तें चक्र आपणाजवळ ॥ १९ ॥
गेलें चक्रहि हतिचें पाहे प्रभु मग उगाचि वदनास ।
बांधी पाशीं हरिला वरुणाच्या, न्यावयासि सदनास ॥ २० ॥
नेत रथावरि घालुनि अवमानें नकुळ देवरायास ।
प्रेक्षक ह्मणती अनुचित मागति सुर नित्य दे वरा यास ॥ २१ ॥
मार्गी जातां भेटे नारद बोले कसें असें करिसी !
धरिसी पाय न कां तूं प्रभुनें या तारिलें असें करिंसी ॥ २२ ॥
नकुळ ह्मणे मुनिवर्या विनवीलें प्रभुस म्यांहि बहु आजी ।
राजी न होय यास्तव करणें आलेंचि यासवें आजी ॥ २३ ॥
धर्माज्ञेनें नेतों माझा अपराध काय सांगावें ।
सांगावें किति सांगा जो जैसा त्या तसेंचि वागावें ॥ २४ ॥
करणें अतिक्रम असा प्रभुचा तुजला नसेचि बा विहित ।
कर्महि तेंचि करावें अनुदिनिं होणार ज्यांत भावि हित ॥ २५ ॥
देव ह्मणे देव-ऋषे भक्ताधिन मी असें तुला ठावें ।
पुरुषार्थ पाहिला हें झालें विपरीतसें न वाटावें ॥ २६ ॥
भावी देव मनीं मग दिसतो पार्थापरीस बळकट कीं ।
अवतार कृत्य आमुचें होइल त्याच्या करीं कसें कटकीं ॥ २७ ॥
बोले नकुळातें हरि झालों मी सुप्रसन्न वर मागे ।
इच्छित देतों बा रे भजका द्यावें न काय तो मागें ॥ २८ ॥
नकुळ वदे देतों वर मागावें जें असें अभीष्ट तुला ।
देइन विशंक तें मी न मिळे कल्पांतिंहि शतक्रतुला ॥ २९ ॥
देव ह्मणे इतुकें दे कथिल्या वांचूनि शस्त्र न धरावें ।
यापरतें मज नलगे त्वां हें व्रत मनिं धरूनि अचरावें ॥ ३० ॥
दे वर तुझाहि देवा सारथि होऊनि पार्थ सांभाळी ।
हें इतुकेंचि पुरें मज लिखित विधीचें असों कसें भाळीं ॥ ३१ ॥

१ गजेंद्राची. २ युद्ध. ३ पुढच्याकाळीं. ४ सैन्यांत.

दिधलें परस्परांनीं वर मग ती पितृतिथिहि सारून ।
गेला देव निजपुरा कथिला इतिहास तुज पसारून ॥ ३२ ॥
यापरि सारथि झाला भक्ताधिनता पहा किती हरिची ।
होता निमित्त-मात्रचि अर्जुन सेना वधावया अरिची ॥ ३३ ॥

याच आख्यानाचीं पदें.

(भीम श्रीहरीस ह्मणतो.)

अंजनीगीत.

भीम बोले यदुवीरांसी ॥ धर्मे आणविलें तुह्मांसी ॥ सत्वर चला परिवारेसी ॥ आहे श्राद्धदिवस ॥ १ ॥ ह्मणउनि आलों मी विनवाया ॥ करणें तुह्मांविण तें वाया ॥ करितों नमस्कार पायां ॥ घ्या यादव सारे ॥ २ ॥ आहे दीवस उद्यांचा ॥ कथितों मीं ही सत्याचि वाचा ॥ शब्द धर्माच्या मुखींचा ॥ आण वाहतो तुमची ॥ ३ ॥ माझी ऐकावी ही वाणी ॥ उठा चला [1]चक्रपाणी ॥ धर्म होइल केविल-वाणी ॥ कां करितां वेळ ॥ ४ ॥

झुलना (श्री हरी भीमास बोलतो)

घनाक्षरी.

ऐकुनि भीमाचें बोल ॥ हरी मनचा बहु खोल ॥ पाहुनि नातें समतोल ॥ कसा बोल बोलतो ॥ १ ॥ जरी बोलसी प्रमाण ॥ खरें वाटेना जाण ॥ कां बरें वदनाची घाण ॥ मद्यपान करितसी ॥ २ ॥ यश धर्माचें धवल ॥ अशा कर्मानें [2]स्त्रवल ॥ पान करणें त्या भंवल ॥ याचें नवल कायसें ॥ ३ ॥ बाप तुमचे तरि फार ॥ वास स्वर्गीं करणार ॥ उद्यां कोणाचा वार ॥ कथी सार हें मला ॥ ४ ॥

---

१ चक्र आहे हातांत ज्याच्या तो. श्रीकृष्ण. हे कृष्णा. २ लोपेल

P Ganpat N Naidoo.

साकी (भीम बोलतो.)

कोप चढे वरकोदरको तब अखियां लाल बनायारी ॥ कहत जदुपती तुमही बोलो कौन तुह्मे जनमायारी ॥ १ ॥ पिता तुह्मारा मुझे बतलावो तबही बोलूं साचारी ॥ काहेकुं करो नयनमों उंगली आपहि हो जब काचारी ॥ २ ॥ पापैं बठो है यही मुरारे औरनको दुःख देनारी ॥ तुमही जानो नही किसीसे दुष्ट बचन कह सुननारी ॥ ३ ॥

दिंडी (अर्जुन देवास बोलतो)

धर्म धाडी बोधूनि अर्जुनासी ॥ जाउनि आणी प्रभु द्वारकोंनिवासी ॥ नमुनि प्रभुच्या तो पादनलीनासी ॥ कथी धर्माची लालसा तयासी ॥ १ ॥ देव बोल तो भीम कसा गेला ॥ कांहो नाहीं अणुमात्र वेळ केला ॥ जेणें आदराचा ठाव पुसुनि नेला ॥ अशा ठायीं नाहींच हा मुकेला ॥ २ ॥ नसे आतां मी येत तुला कथितों ॥ जरी आला वासँव हि या पथीं तो ॥ तुला ठावें दुष्टांसि मीच मथितों ॥ भक्तिधारक त्यांचीच माळ ग्रथितों ॥ ३ ॥ असें बोलुनि तत्काल तया फिरवी ॥ भक्ति-रहितासी जसा मनीं विरवी ॥ भीम विजयाचा गर्व असा जिरवी ॥ निराभिमानी या नित्य शिरीं मिरवी ॥ ४ ॥ जाय अर्जुन तेथूनियां उगाची ॥ प्रभू सदना कां नये हेंचि जाची ॥ होत प्रभुचा या नेमही असाची ॥ भक्त वाचा अखंड करी साची ॥ ५ ॥

झुलना– (अर्जून धर्मास बोलतो)

(घनाक्षरी)

कहत अर्जुन तब जाय ॥ नही आवत जदुराय ॥ उसे कौन जुगतं लाय ॥ ये समझ्याय मुझे कहो ॥ १ ॥ भयो रुष्ठ जदूनाथ ॥ नही सुनत कोई बात ॥ कैसो आवे फिर हात ॥ कहो तात क्या

१ भीम. २ कचा. ३ पापायपरपीडनम्. ४ द्वारकेंत राहाणारा. ५ पाद-नलीन, पदकमलास. ६ इच्छा. ७ इंद्र. ८ संहार करितो. ९ अर्जुनाचा. १० युक्ती.

करें ॥ २ ॥ नहीं बिनतीके काज ॥ कहो क्या करे इलाज ॥ कौन लावेगो आज ॥ गई लाज हमारी ॥ ३ ॥

पद– (धर्मराज ह्मणतो.)

जलदत्रिताल.

हरि कां बरें नये आजी ॥ धृ० ॥ नये भीमा अर्जुनासीं ॥ आतां धाडूं कवणासीं ॥ कोण शांत करी त्यासी ॥ कसि चिंता हरे माजी ॥ १ ॥ मग बोले नकुळासी ॥ बापा जाई हरिपासीं ॥ सांगे विनवणि त्यासी ॥ असि, झडकरी होय राजी ॥ २ ॥ जरी नायकेचि हरी ॥ हाव युद्धाचीच धरी ॥ करी पराभव तरी ॥ हरि आणसी करीं आर्जी ॥ ३ ॥ प्रभु झाला गिरिवासी ॥ तरि करितो काय तुजसी ॥ नको भिऊंरे मानसीं ॥ अशि अज्ञा दिली राजी ॥ ४ ॥

पद (नकुळ कृष्णाचा संवाद)

(उद्धवा शांतवनकरजा)

ह्मणें नकुळ यदूवीरासी, कां केली पातळ माया ॥ आजि धर्म विकळ बहु झाला, नाहिं भोजन केलें देवा ॥ ह्मणें देव असा कां रुसला, काय चुकलों तरि मी सेवा ॥ रक्षिलें आजवारे हरिनें, काय आमुचा होता केवा ॥ चाल ॥ धाडिलें मला विनवाया ॥ दिसें सर्व तुह्माविण वाया ॥ सांडिली कशी हो माया ॥ ॥ पू० चाल ॥ ठायासि चलावें अमुच्या, मीं नमितों प्रभुजी पायां ॥ १ ॥ प्रेषिलें अर्धीं भीमासी, अवमानवि केला त्याचा ॥ अशि काय तरी तो वदला, हरि सांगा निष्ठुर वाचा ॥ बरें अर्जुन त्यावरि आला, त्यासहि फाडा नन्नाचा ॥ चाल ॥ अशि काय अवज्ञा केली ॥ काशि दया मनांतुनि गेली ॥ ममता ही कोणी नेली ॥ पू० चाल ॥ ठेलीच उपोषित सदनीं, ती द्रुपद-सुता प्रभुराया ॥ २ ॥ मग देव वदे नकुळासी, नाहिं आदर जेथें कांहीं ॥ कां जाऊं अशा बरें सदनीं, अपमानें तेथें पाही ॥ नाहिं येत अतां मी

---

१ सामर्थ्य, पाड.

सहसा, तूं येथूनि सत्वर जाईं ॥ चाल ॥ नसे पहिलि रीत हो तुमची ॥ हेळणा करितसा अमुची ॥ बोलिला भीम परोपरिची ॥ पू० चाल ॥ अरिची न असी गिरिवासी, कां सोसूं वचनें वाया ॥ ३ ॥

झुलना. (नकूळ बोलतो.)

घनाक्षरी.

अह्मा देउनियां दोष ॥ आपण होसी निर्दोष ॥ बळें आणुनि मनिं रोष ॥ मोडिसि तोष आमुचा ॥ १ ॥ आज आहे मासिं गांठ ॥ तुझा चालेना काट ॥ धरी दावितो हि वाट ॥ व्यर्थ हाट[1] करूं नको ॥ २ ॥ नेइन बांधुनि मी आज ॥ होवो झाली तरि सांज ॥ करिन अपुलें मी काज ॥ घाली तोज[2] मस्तकीं ॥३॥ फार झालासी दांड[3] ॥ गर्व आपुला तूं सांड ॥ टाकि सत्वर पुढें पांड[4]॥ घरीं भांड आमुतें ॥ ४ ॥ भीम अर्जुन ते थोर ॥ करित बसले घरिं घोर ॥ नाहीं दाखविला जोर ॥ तसें पोर हें नव्हे ॥५॥

कटीबंध. (युद्धाचें वर्णन.)

नकुळ-यदुविरा युद्ध मांडलें । यादव ते सारेचि धांवले । रणीं एकटा पाहुनि सगळे । करिती कोलाहल ते अगळे । वाद्यांची बहु झोड लागली । सना[5] चढुनि तशांतचि आली । नकुळ बैसला होता खालीं । उठुनि रथावर उडीच घाली । बाण सोडिती यादव सारे । वीर-पणाचें अंगीं वारें । आणूनि ह्मणती यासि धरा रे । सत्वर मग भुज-बद्ध करा रे ।मुक्त करुनि अवघेचि फेरारे । रथिं [illegible] यासि फिरारे । पडातिल रिपुवरि सहज दृदारे । न्या मम प्रभुच्या अधीं धरा रे, मानीना तरि युद्ध करा रे । असेंचि सारे बडबड करिती । परस्परें माना डोलविती । यापरि हाव धराया धरिती । परि गति नकुळाची त्यांवरती । जों जों मार्गण[6] सोडुं लागला । तों तों त्यांसि विचाराचि पडला । बहुतेकांनीं पळहि काढला । बाणा

१ हट. २ मुकुट. ३ दांडगा. ४ पाऊल. ५ निशाणें. ६ बाण.

पासुनि बाणचि नीघती । करवेना कोणासहि गणती । कसें करावें यादव ह्मणती । श्रीकृष्णें मग चक्र सोडिलें । तेंही त्या वीरानें धरिलें । चक्र सुदर्शन हतिचें गेलें । यास्तव प्रभु उगलेचि राहिले । नकुळानें मग नवलचि केलें । श्रीकृष्णासी पाशिं बांधिलें । यादव टकमक पाहूं लागले । युक्ति न चाले यास्तव थकले । नारदमुनि मार्गींच भेटले । ह्मणती त्वां हें काय केलें । सोड सोड या ह्मणउनि प्रभुसी तत्कालचि सोडवीलें । किति नकुळें अघटित केलें । श्रीहरिला पाशीं खिळिलें ॥ १ ॥

पद–(नारद नकुळास ह्मणतात)

चाल–गव्यानों कृष्ण गडी अपुला.

नारद बोले नकुळासीं ॥ बांधिलें हरिला कां पाशीं ॥धृ०॥ सुरवर नमिती कीं याला ॥ तुला अजि कां बरें भ्रम झाला ॥ ठाउक नाहीं काय तुला ॥ जाळितें[1] नांम पातकांला ॥ विदित हें प्रखरचि जगतांसीं ॥ १ ॥ प्रगटला स्तंभीं हाचि हरी ॥ रक्षिलें प्रल्हादा कुसरीं[2] ॥ याची करितो कोण सरी[3] ॥ नाहीं प्रतिमा या दुसरी ॥ तारिलें पहा गजेंद्रासी[4] ॥ २ ॥ प्रभू हा चराचरीं[5] भरला ॥ भक्तालागीं अवतरला ॥ गोकुळीं अखंडित फिरला ॥ गोवर्धन गिरि उचलीला ॥ मानिलें नाहीं इंद्रासी ॥ ३ ॥ असा हा पुण्यश्लोक[6] हरी ॥ उचित हें तुजला काय तरी ॥ सांगतों अतांचि मुक्त करी ॥ नेई सन्मानेंसि घरीं ॥ करुनि घे प्रसन्न गिरीवासी ॥ ४ ॥

---

१ "अजितनाम वदो भलत्या मिसें, सकलपातक भस्म करीतसे" वामन पंडित. २ युक्तिनें. ३ बरोबरी. ४ गजेंद्राला नक्रापासून भगवंतानें सोडावलें व त्याचा उद्धार केला अशी कथा आहे. ५ " न तदस्ति विना यत्स्यान्मया भूत चराचर."(भ. गी. अ. १० श्लोक ३९) "न घडकों मजविणें कांहीं होय चराचर." वामन पंडीत. ६ चार पुण्यश्लोक आहेत. "पुण्य श्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः ॥ पुण्यश्लोको विदेहश्च पुण्यश्लोको जनार्दनः" नळ. धर्मराज, जनक आणि जनार्दन. पुण्य श्लोक पवित्र आहे कीर्ति ज्यांची.

पद–(नकुळ नारदास बोलतो)

जोगी.

सांगा माझा तरि अन्याय, नारदा काय बरें ॥ धृ० ॥ प्रभु हा विश्वंभर साचा ॥ नाहीं मज संशय याचा ॥ काढिन कां मी अशि वाचा ॥ आहे त्याचा दासाचि कीं ॥ २ ॥ जाणतों याचें मी महिमान ॥ परि मज धर्माज्ञाचि प्रमाण ॥ केला आधीं बहु सन्मान ॥ नाहींच भान यास किहो ॥ २ ॥ मजला निदेश धर्माचा ॥ मानिना हरि जरि तुझि वाचा ॥ पराभव करुनियां त्याचा ॥ आणि साचा त्यासि बरें ॥ ३ ॥ आला युद्धासी प्रभुराय ॥ करावें म्यां तरि हो मग काय ॥ धरिलें नाहिं तयाचे पाय ॥ हा अन्याय मज लावा ॥ ४ ॥ सोडितों गिरिवासीला मीं ॥ आज्ञा प्रमाण मज स्वामी ॥ नेतो सन्मानें धामीं ॥ करिन कां मी हेलना[2] हो ॥ ५ ॥

पद–(श्रीहरी नारदास ह्मणतात)

अंजनीगीत.

बोले यदुवीर नारदा ॥ माझी भक्ताधीनता सदा ॥ हरितों त्यांची मी आपदा ॥ तुज वर्म ठावें ॥ १ ॥ बा हें नसेंची विपरीत ॥ आहे माझी आसीच रीत ॥ भक्त-महिमान मी त्वरित ॥ वाढवितों ऐसें ॥ २ ॥ कां तुज गमलें हें अविहीत[3] ॥ करितों भक्ताचें कीं हीत ॥ पांडव सारेची भ्रम राहित ॥ प्रिय–भक्त[4] माझें ॥ ३ ॥ ह्मणउनि कथितों मी तुजलाही ॥ आवडतें मज दुसरें नाहीं ॥ एक्या भक्तीवांचुनि पाहीं ॥ सारेंची तुच्छ ॥ ४ ॥ माझी ममता[6] तुजला ठावी ॥ इतरांशीं काशि खरि वाटावी ॥ भक्ती सर्वांतरिं दाटावी ॥ असें वर्म[5] याचें ॥ ५ ॥ कुंती आत्याबाई खरी ॥ मजला माद्रीहि त्यापरी ॥ गोष्ट हि ऐसी आहे जरी ॥ जन करितिल कुच्छा[7] ॥ ६ ॥ अपुल्या

---

१ धरीं. २ अपमान. ३ अयोग्य. ४ "भक्ती जसा महात्मा देहीं हि तसा न दारुका रमला । या पार्थ वेद वचना यावा लागे सदा रुकार मला " मोरोपंत. ५ "भक्तिविना वश नोहे वीण्यानें वा मृदंग नादानें." ६ समोऽहं सर्व भूतेषु नमे द्वेष्योऽस्ति न प्रियः (भ. गी. अ. ९ श्लो. २९) सम मी सकळां भूतीं, न द्वेषी मज न प्रिय, वामन पंडित. ७ निंदा.

आतेचें महिमान ॥ वाढवि पुत्रा दे सन्मान ॥ दोघे माद्रीचे हे जाण ॥ अव्हेर यांचा ॥ ७ ॥ लांछन गमलें हें मजला ही ॥ ह्मणउनि केली युक्ती वा ही ॥ जिंकुनि घेतलें अजिपा ही ॥ कथिलें गुज आतां ॥ ८ ॥

यक्षप्रश्नाख्यान.

आर्या.

सरला वनवास तरी द्वैतारण्यांत पंडुसुत होते ।
विप्रांसि आधि दे त्या हरिणांच्या मारणीं टपत होते ॥ १ ॥
शृंगाग्रेंचि हरिण तो नेतो अरणी असेंचि पाहून ।
धांवति ते त्या मागें स्कंदीं धनु बाण सज्ज वाहून ॥ २ ॥
श्रमले उष्णांत अशीं दैवें मग लाधलाचि एक वट ।
बैसती छायेसी त्या पांचाहि होऊनि श्रांत एकवट ॥ ३ ॥
लागे धर्मासि तृषा ह्मणउनियां धाडिलें अधीं नकुळा ।
परि तो नयेचि जेव्हां धाडी सहदेव अर्जुना सकळां ॥ ४ ॥
फिरला नकुळ वनीं बहु धुंडित उदकासि सांपडे सरतें[1] ।
होतां यम धर्म जया स्थानीं पाहतांचि आयु[2] ज्या सर[3] तें ॥ ५ ॥
'न करी पान जलाचें' बोले नकुळा असेंचि प्रतिपादीं[4] ।
'द्यावें या प्रश्नाचें उत्तर आधीं' ह्मणोनि प्रतिपादी[5] ॥ ६ ॥
परि न गणुनि त्या वचना प्राशन करि नीर तो बळें नकुळ ।
मृत जाला तत्कालचि जग-भक्षक[6] पाहतो कशास कुळ[7] ॥ ७ ॥

---

१ सरोवर. २ आयुष्य. ३ संपतें. ४ प्रत्येक पावलीं. ५ सांगता झाला. ६ मृत्यु. ७ कुळ गोत्र वय वगैरे कांहीं पहात नाहीं.

त्या मागुनि ते सारे गेले एकेक त्याचि कासारीं[1] ।
प्याले नीर तसें ची झाली गति शेवटीं हि त्या सारी ॥ ८ ॥
पाहे मार्ग युधिष्ठिर परि परतेनाचि एक चवघांत ।
जाय सरीं त्या झाला जलपानें बंधुचाही अपघात ॥ ९ ॥
पाहुनि गतासु सारे धर्महि निज मानसीं विचार करी ।
न कळे कां सांपडले बंधु यमाच्या असेही चारे[2] करीं[3] ॥ १० ॥
बोले धर्म अहा म्यां मंदें चवघांसि व्यर्थ घालविलें ।
होते स्नेहायुभरित दुःखद वातें प्रदीप मालविले ॥ ११ ॥
जन्मापासूनि कधीं दिधलें नाहीं सुख स्वभावांस[4] ।
चाले उपाय सर्वा परि करितो काय तो स्वभावास ॥ १२ ॥
विष भरिलेंचि ह्मणावें उदकीं कमलें प्रफुल्ल कां असती ।
त्यजिती भ्रमर न कां त्या बंधूंचीं आननें मलिन दिसती ॥१३॥
अत्यद्भुत हें झालें विजयानें जिंकिलें शिवाला हो ।
पडलें तें वपु कैसें व्हाया अज काननीं शिवां[5] लाहो[6] ॥ १४ ॥
परि ती तृषा करी बहु व्याकुळ राहेचिना उपाय शतें ।
शोधूं जल प्राशुनि कां बुडतें प्रभुचें असें कृपा यश तें ॥ १५ ॥
ऐसें बोलुनि गेला प्राशाया जों जला तयां सरसी ।
बक रूपी यक्ष वदे मागें आजूनि कां न तूं सरसी ॥ १६ ॥
रे धर्मा म्यां केले अनुज तुझे प्रेतरूप हे चवघे ।
अवघेचि कसें मरतां जिविताची अल्प तूं तरी चव घे ॥ १७ ॥
दे उत्तर प्रश्नाचें आधीं जा मग जलासि सेवाया ।
त्या वांचुनि हें करणें स्पष्टचि मजला तुझें दिसे वाया ॥ १८ ॥
धर्म ह्मणे कां केलें कर्म असें; नाम आपुलें कळवी ।
पळवी शंका मानिची लोकोत्तर कर्म कोण हें टळवी[7] ॥ १९ ॥

---

१ सरोवरीं. २ चौघे. ३ हातीं. ४ आपल्या बंधूंना. ५ कोल्ह्यांना. ६ लाभ ७ टाळी.

मी यक्ष असें कळवी प्रकटी मग शरिर पर्वतासम जें ।
धर्म करी नमनातें चित्तीं हा दंडधर असें समजे ॥ २० ॥
धर्म ह्मणे जें पुससी सांगाया शक्य मी असेन तरी ।
सांगेन असुखसिंधू उतराया तुजविणें दिसे न तरी ॥ २१ ॥
यम धर्म पुसे बापा भानु कसा उगवतो बरें सांग ।
बोले युधिष्ठिर तया ब्रह्मापासाव निजकरें सांग ॥ २२ ॥
मावळतो कैसेनी कोण प्रतिष्ठा करी तयाची, तो ।
धर्मे होय प्रतिष्ठित अस्ता जाया अयुष्य यांची, तो ॥ २३ ॥
असतो कोण सवें त्या हेही शोधूनि सांग लवकरसा ।
बोले देव गणाचा पाळी सेवेंत नित्य नवकरसा ॥ २४ ॥
क्षत्रिय कुळिचें दैवत धर्म कसा मनुज भाव पाप कसें ।
धनु बाण, यत्न धीरहि शरण्य तरि मग नसेचि तापकसें ॥ २५ ॥
सर्वां जलांत पावन काय असें, अल्प तें बहू होतें ।
पावन जल जलदाचें, होतें बिप्रा दिल्या बहू हो तें ॥ २६ ॥
पूज्यांत पूज्य काई फळ सांगें श्रेष्ठ जें असें पाही ।
धेनू वंद्य पुराणीं, पुत्रापरतें दिसें न फळ कांहीं ॥ २७ ॥
कोण गुरूच्या स्थानीं दैवत, पवनापरीस चंचल तें ।
बाप गुरू दैवत ही माता, मन शतगुणें चपळ पळतें ॥ २८ ॥
पातें कोण न लावी उपजे निपजूनि कोण तें सांग ।
मत्स्य न लावी पातें, पुनरपि अंडजहि होतसे सांग ॥ २९ ॥
हृदय नसें कवणातें जल-वेगें वाढतें असें काय ।
हृदय नसें उपलासी जल नदिचा वाढवीतसे काय ॥ ३० ॥
मित्र कुटुंबा सांगे घरबारी रोगिया मरे त्यास ।
अर्थेचि मित्र सभार्या औषध धनदान इष्ट मरत्यास ॥ ३१ ॥
विचरे एकाकी तो जन्मुनि जन्मासि येतसे कवण ।
विचरे एकचि भानू शीतांशू जन्म तो करी श्रवण ॥ ३२ ॥

१ (यमधर्म) २ गाव. ३ त्या सूर्यास ब्रह्मापासून सर्व किरणें ह्म० तेज प्राप्त झालें आहे. ४ (तत्तेजोंवि द्भिमामकम् भ. गी.) ५ मागतो. ६ दगड. ७ वंद्य

हीमाचें औषधही सांगे सर्वांसि स्थानें जें असत ।
भेषज होय धनंजय धरणी वांचूनि काय हो दिसतें ॥ ३३ ॥
उत्तम धनासि सांगे धान्या लाभा सुखासि उत्तम जें ।
दक्षपणा तसि कृषिता[1] उत्तम आरोग्य तोषें[2] हें समजें ॥ ३४ ॥
यमधर्म ह्मणें राया झालों मी सुप्रसन्न वर मागे ।
तुजसम ज्ञानी भूवरिं झाला कोणी नसेंचि यामागें ॥ ३५ ॥
धर्म ह्मणें नकुळातें उठवी आधीं, तिघांसि त्या मागें ।
इच्छित हें पुरवावें द्यावें भजकासि कां न तो मागे ॥ ३६ ॥
बोले अंतक[3] धर्मा वर्णावें यश तुझेंचि लोकांहीं ।
परि ह्मणसी नकुळा कां नाहीं भावार्थ समजलों कांहीं ॥ ३७ ॥
धर्म वदे कुंतीचा एकचि उरलों असें मनीं समज ।
यास्तव आधीं नकुळा उठवी नाहींच इष्ट अन्य मज ॥ ३८ ॥
उठले तत्कालचि ते धर्माचे बंधु पाहतां चवघे ।
करिती नमन यमपदीं धर्मासह पंडु पुत्र ते अवघे ॥ ३९ ॥
आहे कृतांत[4] जातों गेलों अरणीस मीच घेऊन ।
बापा चरित्र तुमचें लोकन केलें धरेसिं[5] येऊन ॥ ४० ॥

---

१ शेतकीचा धंदा. २ संतोषवृत्ति. ३ यम. ४ यम. ५ पृथ्वी.

याच आख्यानाचीं पदें.

पद–(धर्मराज भावास ह्मणतात.)

जलद त्रिताल.

मज लागली तृषा पाही ॥ धृ० ॥ धर्म वदे नकुळासी ॥ नको लाऊं रे पळासी ॥ जाई झारी घे जळासी ॥ चव्ळासीं सांगु कांहीं ॥ १ ॥ होती व्याकुळ हे प्राण ॥ धीर धरवेना जाण ॥ बापा जाई जल आण ॥ पान करवी लवलाही ॥ २ ॥ वेळ लागे नकुळासीं ॥ जाय ह्मणें माद्रेयासी ॥ तया मागें अर्जुनासी ॥ धाडि जिवना आण जाई ॥ ३ ॥ बापा भीमा तिघ भाऊ ॥ गेले वाट किति पाहूं ॥ कसें दुःख हें मी साहूं ॥ पाजि तूं तरी जल कांहीं ॥ ४ ॥ ह्मणें झाला कांहीं घात ॥ नये कोणि चव-घांत ॥ कसा चुकेल आघात ॥ गिरिवासी तूंचि पाही ॥ ५ ॥

(नकुळ धर्मराजास ह्मणता)

(अंजनी गीत.)

नकुळ बोलतो धर्मासी ॥ कां तरी निंदीता कर्मासी ॥ पाहूं आपण शर्मासी ॥ हरि आहे आपुला ॥ १ ॥ जातो आणाया उदकासी ॥ तुह्मी असा बंधूपाशीं ॥ नका धरूं हो उदासी ॥ जळ अणितों आतां ॥२ ॥ सत्वर येतों मी परतून ॥ चिंता सांडा मनांतून ॥ जळ या अणितों वनांतून ॥ लागेना वेळ ॥ ३ ॥ आह्मी असतां चवघे जण ॥ नाहीं चिंतेचें कारण ॥ संकट होइल निवारण ॥ कां करितां घोर ॥ ४ ॥

(धर्मराज सहदेवास बोलतात.)

घनाक्षरी.

झालें नकुळातें काय ॥ पाहे सहदेवा जाय ॥ वाटे चुकला तो ठाय ॥ आणि प्रीय अपुला ॥ १ ॥ पाहात बसलों मी वाट ॥ वाटे धरिली अडवाट ॥ कशी आजची पहाट ॥ दिसे नाट ला-गला ॥ २ ॥ जाई याचिरे वनांत ॥ पहा कोठें लवंनांत ॥ असेल छाया भुवंनांत ॥ दिसेल तेथें धुंडिता ॥ ३ ॥ जरी न पडेची गांठ ॥ नको पाहूं मग वाट ॥ पाहुनि विहिर नदी पाट ॥ धरी वाट जळाची ॥ ४ ॥

---

१ सहदेव. २ मुखाला. ३ सखोल जागा. ४ भुवन, पाणी, पाण्यांत.

साकी. (अर्जुन बोलतो)

कहत धनंजय सुनो युधिष्ठिर नकुलहि धुंड मिलाऊं ॥ जल थंडा भरलाउं प्रभुजी तुमरी प्यास बुझाऊं ॥ १ ॥ अबहि जात हुं झारी भरके इतनमें फिर आऊं ॥ एक घडी मोहे अवसर दीजो काहेकु देर लगाऊं ॥ २ ॥

साकी. (भीम बोलतो)

भीम कहे अब सोंच न करियो एक पलख मै जाऊं ॥ भाई अपने धुंड धांडकर जलहीको भर लाऊं ॥ १ ॥

पद–(धर्मराज आपल्यास निंदितो.)

(उद्धवा शांतवन)

वदे धर्मराज बहु शोकें, कसें प्राक्तन फिरलें अमुचें ॥ धृ० ॥ असे मूळचि मी या तापा, नाहिं दिधलें सुख कवणासी ॥ तरि बंधु भले ते चवघे, नाहिं अंतर दिधलें यासी ॥ किति कृतघ्नपण हें माझें, नाहिं स्मरलों निजकर्मासी ॥ चाल ॥ मी काय करूं तरि आतां ॥ लागली मला बहु चिंता ॥ वारिल कोण या घाता ॥ पू० चाल ॥ त्राताचि दिसेना कोणी, आहे सामर्थ्यहि कवणाचें ॥ १ ॥ वारिलें जरी वृद्धांनीं, नाहिं वचन मानिलें त्यांचें ॥ खेळलों द्यूत अविचारें, तें कारण या असुखाचें ॥ जाहलों दीन कीं आतां ॥ कोण करितो साह्य अशाचें ॥ चाल ॥ होते बंधु वीर बहु मोठे ॥ पहा कर्म कसें तरि खोटें ॥ गेले उदकासाठीं कोठें ॥ ॥ पू० चाल ॥ लोटेल दिवस हा कैसा, मज नकळे धोरण याचें ॥ २ ॥ गेला नकुळ अधीं उदकासी, नाहिं परतुनि आला ठाया ॥ माद्रेय धाडिला दुसरा, त्या नकुळातें हुडकाया ॥ मग अर्जुन भीमही गेला, तो सत्वर उदक अणाया ॥ चाल ॥ लागली तृषा मज भारी ॥ कोण भरूनि आणिल झारी ॥ कोण दुःखांपासुनि[1] तारी ॥ पू० चाल ॥ हारीस यावया जोगे, ते बंधुहि नव्हते साचे

[1] दुःखाचें.

॥ ३ ॥ मग धर्महि तेथुनि गेला, जल धुंडित त्याचि सरांसी ॥ पाहिलें भीम नकुळातें, तसें अर्जुन सहदेवासी ॥ सारेंचि गतास दिसले, अलि मूर्छाही धर्मासी ॥ चाल ॥ काय जलांत विष या भरलें ॥ प्राशितां प्राण कसे गेले ॥ हें नवलचि येथें झालें ॥ ॥ पू० चाल ॥ सरलेंचि सरो आयु करितों, गिरिवासी पान जळाचें ॥ ४ ॥

पद.–(धर्मराज देवाची प्रार्थना करितो)

जोगी.

देवा कां रुसवा केला, मजवरि सांगा हो ॥ धृ० ॥ बंधू माझे हे गुणवान ॥ आले करावया जलपान ॥ झाले अवघेची गतप्राण ॥ न दिसें त्राण मज कोठें ॥ १ ॥ केला सर्वांचा सांभाळ ॥ केली आजचि कां आबाळ ॥ कुंता ह्मणेल कवणा बाळ ॥ कसें अभाळ कोसळलें ॥ २ ॥ देवा तुमचे कीं हे दास ॥ मोजित नव्हतेची कवणांस ॥ घालुनि अजवरि वदनीं घास ॥ आजिच निराश कां केले ॥ ३ ॥ कांहो गिरिवासी प्रभुराय ॥ तुमचे धरिले होते पाय ॥ व्हावा काय असा अन्याय ॥ तुह्मींच न्याय हा निवडा ॥ ४ ॥

पद–(धर्मराज यक्षास बोलतो)

जलद त्रिताल.

कसि तुजला रे दया नाहीं ॥ धृ० ॥ धर्म वदे निजबागा ॥ हाचि धर्म काय बापा ॥ कसा भीईनासि पापा ॥ आपा साठीं दिली दाही ॥ १ ॥ मज तृषा झालि फार ॥ बंधु पाठविले चार ॥ धुंडावया जलगार ॥ ठार केले कसें पाही ॥ २ ॥ वाटें नवल हें आजी ॥ ज्याणें शिव केला राजी ॥ असे निपुण युद्धांमाजीं ॥

१ सरोवरास. २ मृत, मेलेले. ३ हे गिरिवासी व्यंकटेशा, अयुष्य सरलें तर सरो ह्मणजे मरण येईल तर येवो, परंतु मी पाणी पितोंच. ४ यमास. ५ [illegible]

गांजी असतां दशा कां हीं ॥ ३ ॥ गिरीवासी प्रभुराय ॥ अशा कर्मे तुष्ट काय ॥ भूतदया केली काय ॥ कां रे नाहीं विचार कांहीं ॥ ४ ॥

पद (यम-धर्म धर्मास बोलतो)

गडयांनो कृष्ण गडी अपुला.

वदे यमधर्म धर्मराया ॥ कां जलपान करिसि वाया ॥धृ०॥ पडले बंधु तुझे चवघे ॥ टाकुनि शूरत्वहि अवघे ॥ अशा कर्मांचि कोण चव घे ॥ सांगतों विश्रांती लव घे ॥ आहे किति शीतल ही छाया ॥ १ ॥ ह्मणसी बंधु फार बरवे ॥ तरि न कां शस्त्र तया धरवें ॥ पुरतें वाक्य न ज्यां करवें ॥ कसें मजपुढें सांग ठरवे ॥ रक्षी तूं तरि निज काया ॥ २ ॥ पुसतों धर्माहि यम-धर्मा ॥ कळूं दे तुझ्या नाम-कर्मा ॥ प्रवर्तासि अशाही अधर्मा ॥ पावसिल कसा बरें शर्मा ॥ सोडुनि देई चेष्टा या ॥ ३ ॥ बोले अंतक धर्मासी ॥ सांगतों आपुल्या शर्मासी ॥ तूंही चतुरचि व-र्मासी ॥ जाणसिल सहजचि कर्मासी ॥ ह्मणती कृतांत धर्मा या ॥ ४ ॥ करितों प्रश्न तुला जे मी ॥ उत्तर दे कसे लाजे मी ॥ पावतों तुष्टि जसा जेवीं ॥ करिन मग कां बरें कज्जे मी ॥ आठ-विन गिरिवासी राया ॥ ५ ॥

(यमधर्म धर्मास बोलतो)

अंजनीगीत.

बोले अंतक धर्मासी ॥ झालों संतुष्ट वचनांसी ॥ असे हेत जो मानसीं ॥ निवेदी आतां ॥ १ ॥ बा तूं होसी काल-ज्ञानी ॥ कोण अन्यथा हें मानी ॥ यावरि नव्हेसी अभिमानी ॥ आजि कळलें बापा ॥ २ ॥ मागे तुजला देतों वर ॥ माहित नव्हतें कीं अजवर ॥ सांगे आतां मज सत्वर ॥ पुरवीतों वांछा ॥ ३ ॥ आधीं उठवूं मी कवणासी ॥ झडकरि सांगावें बा मजसी ॥ होसी फारची गुणरासी ॥ आलि करुणा मजला ॥ ४ ॥

---

१ शूर योद्धा. २ नांव. ३ भोजनांत, भोजनानें. ४ यम.

(धर्मराज यमास ह्मणतो)

घनाक्षरी.

करी सावध सकळांस ॥ त्यांत आधीं नकुळास ॥ करुनि पान जीवनास ॥ जाउं स्थळास आपुल्या ॥ १ ॥ झाला होता अजि घात ॥ परी वारीला अघात ॥ होतें लांछन चवघांत ॥ राहूं गात गुण तुझें ॥ २ ॥ तुझे झाले उपकार ॥ अठव देतिल हे फार ॥ उठवि बंधू तूं चार ॥ वारंवार नमितसें ॥ ३ ॥ करिसि सर्वांचा नाश ॥ घालुनि अपुले तूं पाश ॥ नाहीं केली नीराश ॥ हेंचि लक्ष आमुतें ॥ ४ ॥

(अतंक धर्मास बोलतो)

दिंडी.

बोले अंतकही ऐक धर्मराया ॥ एक शंका मोठीच उदेली या ॥ ह्मणासि नकुळासीं उठवि आधिं ऐसें ॥ आहे कारण यालागिं काय कैसें ॥ १ ॥ धर्म बोले तूं सुज्ञ तरी कथितों ॥ हीच ताता मी माळ मनीं ग्रथितों ॥ जसे कुंतीचे पुत्र आह्मीं तीघे ॥ तसे माद्रिचे हे हि जाण दोघे ॥ २ ॥ असे उरलों मी एक तिघां माजीं ॥ उठवि माद्रीचा सूत हाचि आजी ॥ अह्मां रक्षीसिल तिघांसही बापा ॥ नको माद्रीच्या सुता देउं तापा ॥ ३ ॥ नसे विपरित या माजि एक कांहीं ॥ अशय चित्ताचा निवेदिला पाही ॥ करी आतां हें कार्य त्वरें ताता ॥ करुनि जिवनाचें पान लावि आतां ॥ ४ ॥

P Ganpat N Naidoo.

मारुति अर्जुनाच्या ध्वजस्तंभीं बसला तें आख्यान.

कथा-सारांश.

अर्जुन एकदां रामेश्वरास गेला. तेथें रामांनीं समुद्रावर सेतु बांधिला, अशी कथा रामायणांत निघाली. तेव्हां रामानें बाणांचा सेतु न बांधितां दगडाचा सेतु कां बांधिला, असा प्रश्न अर्जुनानें काढला. तेथें मारुति वृद्ध ब्राह्मणाच्या वेषानें बसला होता, तो ह्मणाला एक एक वानर फार मोठा होता, त्याचे भारानें बाणांचा सेतु सहज मोडून गेला असता. यामुळें रामांनीं दगडाचा सेतु बांधविला. अर्जुन ह्मणाला ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. मारुति ह्मणाला पाहिजेल तर प्रचीति पहा. तेव्हां अर्जुनानें बाणांचा सेतु केला. त्या दोघांत असा पण ठरला कीं, मारुतीनें सेतु मोडिला नाहीं, तर मारुतीनें अर्जुनाचें दास्य करावें, व मोडला तर अर्जुनानें मारुतीचें दास्य करावें. मारुतीनें सेतु मोडिला तेव्हां अर्जुन चिंतेंत पडला. इतक्यांत कृष्ण ब्राह्मणाचा वेष घेऊन तेथें आला. त्यानें अर्जुनास पुन्हां सेतु करण्यास सांगितलें. अर्जुनानें तसें केलें, कृष्णानें सेतूच्या खालीं सुदर्शन घातल्यामुळें मारुतीच्यानें सेतु मोडला नाहीं. तेव्हां कृष्णानें आपलें रूप प्रगट करून मारुतीस अर्जुनाचे ध्वजस्तंभीं बसण्यास सांगितलें. अशी कथा या आख्यानांत आहे.

P Ganpat N Naidoo

आर्या.

जनमेजय प्रश्न करी वैशंपायन मुनीस तें कळवा ।
पार्थध्वजिं मारुति कां आहे शंका अशी मनीं, पळवा[1] ॥ १ ॥
सांगे मुनि पार्थानें बाणांचा सेतु एकदां रचिला ।
होता नेम[2] प्रभुचा दास्य करिल मारुती न तो खचिला ॥ २ ॥
तीर्थें हिंडत गेला अर्जुन रामेश्वरा नमायाला ।
पाहे तंव त्या स्थानीं होते जन लागले जमायाला ॥ ३ ॥
पौराणिकही येउनि लागे रामायणा कथायास ।
श्रवण करी अर्जुन तें झाला होता जरी पथायास ॥ ४ ॥

---

१ निवारण करा. २ नियम. प्रभुनें असें ठरविलें होतें.

झालें श्रवणीं त्याच्या श्रीरामें सेतु बांधिला उपलें ।
उतरी वानर दळ, हें पार्थांतरिं वचन बाणसें खुपलें ॥ ५ ॥
राम धनुर्धर कीं हो बाणांच्या सेतुनेंचि लंकेला ।
गेला कां न बरें तो, दूर करा या मदीय शंकेला ॥ ६ ॥
बोलति नानाविध जन कीं तरले दगडही जलांवरते ।
निजसामर्थ्य असें प्रभु दावी सर्वांस भूतलांवर तें ॥ ७ ॥
ह्मणती अन्य असें ही जल उदधीचें अशुद्धसें गमलें ।
केवळ मूत्राचि यास्तव टाकुनि पाषाण मार्ग आक्रमले ॥ ८ ॥
कोणी ह्मणती प्रभुनें निज नामाचें महत्व दाखविलें ।
वदती अन्य नळातें किर्ति–सुधेच्या रसासि चाखविलें ॥ ९ ॥
ऐकत होता मारुति बैसुनियां भिन्नविग्रहानें तो ।
बोले गर्जुनि स्पष्टचि, कथितों वृत्तांत निग्रहानें तो ॥ १० ॥
वानर बळिवंत कसे, बाणांचा सेतु काय हो करितो ।
या साठीं रघुरायें करवीला प्रस्तरें नळाकरिं तो ॥ ११ ॥
हास्य करुनि अर्जुन तो बोले आहेसि कोण सांग मला ।
वदसी स्पष्टपणें, तरि याचा तुज निश्चयो कसा गमला ॥ १२ ॥
बोले मारुति दासचि प्रभुचा ह्मणतात वायुसुत ज्याला ।
होतों समक्ष यास्तव अवघा वृत्तांत हा विदित झाला ॥ १३ ॥
अर्जुन वदे मि असतों बाणांचा सेतु बांधितों अगळा ।
शतवार वानरांचा उतरुनि नेतो समूहही सगळा ॥ १४ ॥
वायुज या वरि बोले बाणांचा सेतु बांधिसी बरवा ।
मोडिन उड्डाणें मी त्याची मजला गमेचि ना परवा ॥ १५ ॥
हें ऐकतां धनंजय बोले जरि मोडिशील सेतूतें ।
दास्य करिन मी, नसतां व्हावें लागेल दास ही तूतें ॥ १६ ॥

---

१ दगडांनीं. २ निराळ्या वेषानें. ३ निश्चयपूर्वक. ४ दगडांनीं.

मारुति वदे न मोडिन सेतु, तुझा निश्चयेंचि मग दास ।
वाटें कडुवट जरि तें गदशमनां सेवणेंचि अगदास ॥ १७॥
ऐसें वदोनि दोघे त्वरिताचि गेले समुद्र-तीरासी ।
वायुज पुन्हाहि बोले प्यावें विष कां त्यजूनि क्षीरासी ॥ १८ ॥
न पडावें या कर्मी होईल कुत्सा जनांत बहुतर ती ।
परि नायके धनंजय सेतू-विषयीं जया बहूत रैती ॥ १९ ॥
योजन-मात्रचि सेतू केला बळकट अमीत बाणानें ।
अर्जुन फारचि आग्रहि तो अपुला शेवटासि बाणा ने ॥ २० ॥
पाहुनि सेतु उडाला गेला गगनींच वाटला आधीं ।
येउनि मोडी जंव तो अर्जुन-चित्तांत दाटला आंधी ॥ २१ ॥
चित्तीं ह्मणे धनंजय दैव कसें आजि आमुचें फिरलें ।
जय सांबापासुनि तें येथें सामर्थ्य आवघें जिरलें ॥ २२ ॥
चिंताक्रांत बसुनियां अर्जुन निज-मानसांत भावितसे ।
कीं हें वपु त्यागावें कळतें होणार आजि भावि तसें ॥ २३ ॥
आली दया प्रभूला झाला निजमित्र कीं ह्मणें कँष्टी ।
यास्तव धांउनि आले ब्राह्मण वेषें करीं धरुनि यष्टी ॥ २४ ॥
देव पुसे ऐसा कां चिंतातुरसा उगाचि बसलास ।
करितों श्रवण सकल मी वृत्त तुझें कथीत असलास ॥ २५ ॥
पार्थ वदे बळकटसा बाणांचा सेतु या स्थळीं रचला ।
परि याचि वानराच्या उड्डाणें करुनि तो सकळ खचला ॥ २६ ॥
होता नियम असा कीं जरि सेतू भंगिलाच कीशानें ॥
व्हावें दास, तसेंची केलें मज आज जानकीशानें ॥ २७ ॥
यास्तव सचिंत-मानस स्थानीं या बैसलों असें उगला ।
वानर पहा कसा तो गर्वानें निज मनीं असे फुगला ॥ २८ ॥

---

१ रोग निवारणार्थ. २ औषधास. ३ निंदा., उपहास. ४ इच्छा, ५ चिंता. ६ पुढें होणारें. ७ पडला.

आहे साक्ष कवण या, वाटे मज सर्व कर्म हें खोटें ।
मोठें संकटहि नसें, सेतु करी, काय मोजिसी बोटें ॥ २९ ॥
बांधी सेतु धनंजय, कृष्ण सुदर्शन तयांतळीं योजी ।
चित्तीं ह्मणे न मोडो, कंदुकसा कपिच भूतळीं यो जी ॥ ३० ॥
मारुति गगनीं जाउनि पहिल्या परि मागुती उडी घाली ।
चेंडू उसळे जैसा पडला येऊनि सेतुच्या खालीं ॥ ३१ ॥
देव ह्मणे मारुतिला दास्य करावें, असें तुला विहित ।
मर्कटी रुपहि अपुलें जें होतें भिन्न-विग्रहें पिहितें ॥ ३२ ॥
भेटे वायुसुतातें दावी मग रामरूपही हरि तो ।
सांगे भक्तांलागीं अवतारांहि मी युगायुगीं धरितों ॥ ३३ ॥
आहे पार्थाकरवीं करणें मजलागि दुष्ट-संहरण ।
तूंही पार्थध्वज शिरिं बैसुनि याच्या भया करी हरण ॥ ३४ ॥
तैं पासुनि हा स्तंभीं राहे युद्धांत सर्वदा याच्या ।
याच्या साह्यें केलें पार्थें हननासि सर्व दायांच्या ॥ ३५ ॥

---

१ बोटें काय मोजिसी, असा चिंतातुर कां बसलास ? २ येवो. ३ झाकलेलें.
४ भक्ताकारितां, ५ भाऊबंदांच्या, कौरवांच्या.

याच आख्यानाचीं पदें.

हनुमंत अर्जुनास ह्मणतो.

(अंजनी गीत.)

बोले हनुमंत अर्जुना । कां करितोसी वलगना । होते वानर त्यांची गणना । करवेना शेषा ॥ १ ॥ अठरा पद्मांचीहि संख्या । पडली आहे ऐसी आख्या । परि जे आले होते संख्यां । मिति नाहीं त्यांची ॥ २ ॥ एकेकाचे महान कार्य । सेतु तुझा करितो काय । राम वेडा होता काय । करि कृत्य ऐसें ॥ ३ ॥ वानराचें फारचि दळ । वर्णूं त्याचें काय मी बळ । सेतु शराचा वरदळ । सोसीना बापा ॥ ४ ॥ सांडीना मी कधींच तथ्या । बोलुं कां मी आजचि मिथ्या । जरि हें पडेना तव पथ्या । कथितों तुज लागीं ॥ ५ ॥ जरि मी आहे एकचि पाहतां । सेतु मोडीन मी आतां । जरि हें घडेना तत्वता । आहे दास तुझा ॥ ६ ॥ या वचनाचा धरि भरंवसा । सेतु बाणाचा करि कसा । हातींच्या कंकणा आरसा । लागेना जाणें ॥ ७ ॥

कटिबंध.

मारुती रामाच्या सेतूचें वर्णन करतो.

वातात्मज सांगे ऐसा । श्रीरामें सेतू रचिला ॥ ध्रु० ॥ रामचंद्र जळ तटासि आले । नळ नीळादि कपी मिळाले । सुग्रिव अंगद तेहि धांवले । जांबवंत हनुमंत पावले । परि अवघेचि विचारीं पडले । ह्मणती उतरुनि जावें कैसें । शत गांवें जळ अपार भासें । त्यांत मूत्रही ऋषिचें ऐसें । बोलति वानर सुचेल तैसें । फिरती सर्व भ्रमिष्टचि जैसे । कांहीं त्यांत सचिंतहि बसले । श्रीरामें सर्वांसि बाहिलें । उपलें अणाया लागिं योजिलें । देशो देशीं मग ते गेले । प्रस्तर घेउनियां जरि आले ।

१ ह्मण. २ लढाईला. ३ शरीर. ४ सैन्य. ५ आदळ आपट. ६ सत्य, खरें बोलणें. ७ खोटें. ८ अगस्तीनें समुद्र प्राशन केल्यावर मूत्रद्वारें सोडला अशी कथा आहे. ९ बोलाविलें आहे. १० दगड.

ह्मणती त्यासि पुन्हाही जारे । पुष्कळसे पाषाण अणारे । यापरि वदती जारे यारे । जाती अन्य किती परभारें । करीं शिरीं पुच्छाग्रीं भारे । बांधुनि आणिलि वानर सारे । खेपा करिती अशा प्रकारें । प्रस्तर ते नामांकित केले । नळा करीं ते तसे जोडिले । उदकांवर ते तरूं लागले । सेतु रचाया अरंभ केला । दश योजन विस्तीर्ण योजिला । शत गांवें लंकेसि लांबला । चार दिवस अवकाश लागला । पंचम दिवसीं समाप्त झाला । एकेकाचा महान कांय । सेतु शराचा टिकेल काय । विचार आपुला केला काय । बापा व्यालि कुणाची माय । त्या प्रभुची सरि होइल काय । अलौकीक हा खेळ तयाचा । सहजाचि सिद्धिस गेला । वातात्मज सांगे ॥ १ ॥

झुलना. (अर्जुन मारुतीस बोलतो.)

घनाक्षरी.

करुनि हास्य वदे पार्थ । तुझें बोलणें अपार्थ । योजन शतभरि अर्पार्थ । नको अर्थ फारसा ॥ १ ॥ तुला फार वंदू काय । सेतु बांधितों मी जाय । करी त्यासि तूं अपाय । धरिन पाय निश्चयें ॥ २ ॥ नको यासि फार वेळ ॥ आहे घटिकेचा खेळ ॥ नको होऊं उतावेळ । वृथा वेळ नाशिला ॥ ३ ॥ चाल आतांची ऊठ । बरा काढिलासि बूट । नको ठेऊं हुट हुट । नसे कूट फारसें ॥ ४ ॥ जरी मोडिसील पूल । करिन दास्य नसे भूल । पुढें टाकी पाऊल । नव्हे मूल हा बरें ॥ ५ ॥

---

१ श्रीराम या नांवानें मुद्रित. दगड बुडूं लागले, पण रामनाम त्यावर खोदतांच ते तरले अशी कथा आहे. २ शरीर. ३ अर्थरहित व्यर्थ, फोल. ४ आप + अर्थ, पाण्याकरितां. ५ द्रव्य. भावार्थ, शंभर योजने पाणी तें काय, आणि त्याच्या करतां एवढा खटाटोप कशाला ? ६ विषय, प्रश्न.

मारुतीनें सेतु मोडल्यावर अर्जुन सचिंत होऊन
आपल्याशींच ह्मणतो.

(उद्धवा शांतवनकर जा)

मोडिला सेतु कीशानें गमें, नवलाचि हो या काळीं ॥ध्रु०॥ वदे अर्जुन निजमानिं ऐसें, किति अघटित घडलें आजी ॥ हा अशस्त्र वानर कीं हो, दिसे दुर्बळही त्या माजीं ॥ भंगिला सेतु तरि कैसा, चालेना बुद्धिच माझी ॥चाल॥ असें असतें माहित देवा ॥ कासयास करितो हेवा ॥ दिसे विचित्र संचित ठेवा ॥ पू०चाल ॥ सेवाचि करावी याची, असें लिहिलें विधिनें भाळीं ॥ १ ॥ वानरें बोध[1] मासिं केला, कीं न पडावें या छंदीं ॥ होणार प्राप्त यश कैसें, या पासुनि हें प्रतिपादी ॥ परि नाहिं श्रवण तें केलें, लागलोंच कीं या नादीं ॥चाल॥ जरि बळकट सेतू ऐसा ॥ वानरें मोडिला कैसा ॥ वरि चेंडु पडावा जैसा ॥ पू०चाल ॥ तैसाचि उडुनि हा जावा, परि भाळ-लिखित कोण टाळी ॥ २ ॥ मनिं गर्व असा हो धरिला, मोडेना सेतु कदापी ॥ बांधिलाचि तैं म्यां होता, भीम जाऊनि इंद्रापी ॥ इभराज[2] पहा किंहो अणिला, जो स्वर्गीं नित्य सुधा पी ॥ चाल ॥ तो धरुनि भरंवसा पाही ॥ निर्मिला सेतु लवलाही ॥ परि नचलें येथें कांहीं ॥ राहिला यत्न अवघाची, गिरिवासी तूं सांभाळी ॥ ३ ॥[3]

पद–पुन्हां अर्जुन ह्मणतो.

जलदत्रिताल.

हरि कां नये लवलाही ॥ ध्रु० ॥ आला कठिण प्रसंग । झालों पाहुनि मी दंग । कपि करि सेतु भंग । अंग संगें नवल पाही ॥ १ ॥ हें मी सांगु कोणा लागीं । कोण होतोया विभागी,

---

१ सांगूं लागला. २ ऐरावत. ३ मागच्या व या चरणाचा भावार्थ असा—मी सेतू बांधला त्यावरून भीमानें स्वर्गाला जाऊन ऐरावताला आणिले असा तो मजबूत होता. तसा हा सेतू असून या वानरानें कसा मोडला ?

नाहीं बुद्धी माझी जागीं। जागी होइना करुं काई ॥ २ ॥ हरि युक्ती सुचवितां। आलें विघ्न वाचवितां। प्रभु विश्व नाचविता। दाखविता मार्ग कांहीं ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभुराय। कोठें गुंतला कीं काय। कोण सांगेल उपाय। पाय दाविले ठायीं ठायीं॥४॥

पद—अर्जुन देवाची प्रार्थना करितो.

जोगी. मजला वरिल सुभद्रा काय.

देवा दावा पदयुगुला। गेली लाज बरें ॥ धृ० ॥ प्रभुजी तुमचे बहु उपकार। घडवा आजिच कां अपकार। प्रतिज्ञा केल्या वारंवार। त्यांतुनि पार मज केलें ॥ १ ॥ भरंवसा धरूनि तुमचा फार। करिताचि आलों वेडे चार। घेतला तुह्मीच माझा भार। नसे आधार कवणाचा ॥ २ ॥ जाणतां अंतरिचा तुह्मि भाव। ठावा मजला हा हि स्वभाव। त्याचा झाला आजि अभाव। होइल निभाव मग कैसा ॥ ३ ॥ धांव गिरिवासी प्रभुराय, नमितों शतदां तुमचे पाय। येवढा क्षमा करा अन्याय। हा आपाय दुर लावा ॥ ४ ॥

पद—भगवान् अर्जुनास ह्मणतात.

जलद घनाक्षरी.

कांरे अर्जुना तू दंग ॥ केला कोणी मनोभंग ॥ दिसे सोडिला व्यासंग। चिंता फार दिसे। आहे काय कसें। सांगे बापा तु निःसंग ॥ १ ॥ आला असा काय प्रसंग। कोणी सेतु केला भंग। कळुंदे झडकरी। वानर कोण तरी। याचें प्रफुल्ल अंतरंग ॥ कांरे० ॥ २ ॥

पद—अर्जुन उत्तर देतो.

जलद घनाक्षरी.

चित्तिं स्मरूनि श्रीरंग। तुह्मा कळवितों मनोरंग[1]। श्रवण केला अजि प्रसंग। वानर मेळविले। उपल आणविले। प्रभु झांकी

---

१ मनोगत.

जलतरंग ॥ १ ॥ मज तें गमलें सारें व्यंग । कथितों बुद्धीचे हे तरंग । राम धनुर्धर, बाणें सेतुवर, काय हें नव्हतें त्यासी अंग॥२॥ मध्यें वायुज दावी अंग । नव्हतें ह्मणे कांहीं व्यंग। जरि ते फळ–अहारि, वानर मोठ भारी, सेतू पावेना कां भंग ॥ ३ ॥ गेला बदलुनि माझा रंग । वदलों पुरे करी ढंग ॥ * सेतु रचियला, वानर उडियला, केला सेतू पाहा दुभंग ॥ ह्मणुनि झालों ऐसा दंग ॥ ४ ॥

पद–(भगवानू अर्जुनास पुसतात.)

गळ्यांनो कृष्ण गडी अपुला.

पुसे श्रीरंग अर्जुनासी । दाखवी साक्ष कोण यासी ॥ धृ० ॥ सांगसी सेतू बाणांचा । बांधिला योजन वरि साचा । पहाया विक्रम कीशाचा । मोडिला क्षणांत अशि वाचा । पाहूं जरि पुनरपि तूं करिसी ॥ १ ॥ बापा असाक्ष जें कर्म । ह्मणती अविहित तो धर्म । सांगतों त्याचें तुज वर्म । होइना प्राप्त कधीं शर्म । मानिना मीहि सत्य त्यासी ॥ २ ॥ बोले मारुति श्रीहरिला । पाहिजे साक्ष कासयाला । मोडिला दिसेंचि नयनाला । कोणतें प्रत्यंतरें याला । व्यर्थचि खटपट करवीसी ॥ ३ ॥ आहे अशि गोष्टहि सत्य जरी । करिल हा पुनरपि सेतु तरि । मोडिसिल तूं ही त्याचिपरि । असेना रित विपरित दुसरी । देइन साक्ष गिरीवासी ॥ ४ ॥

---

१ फळें खाणारे. २ ज्याला दुसरा साक्ष नाहीं असें. ३ बीज. ४ सुख. ५ पुरावा. ६ यापुढेंहि या आख्यानाचीं कांहीं पदें असावींत असें वाटतें. कृष्णांनीं मारुतीला रामरूप दाखवून त्याची समजूत घातली हा कथाभाग कवीनें पदात गोंवला असला पाहिजे असें त्याच्या पद्धतीवरून दिसतें.

* येथें असें घालावें काय ? "सेतू रचियेला अभंग ॥ वानर उडियला, सेतू भंगियेला, ह्मणुनी झालों ऐसा दंग ॥"

मुचकुंदाचें आख्यान.

कथा–सारांश.

गर्गाचार्यास एका यादवानें आपली मुलगी दिली होती. तिला मुलगा झाला नाहीं. एके दिवशीं यादवांनीं भर सभेंत गर्गाचार्यांचा अपमान केला. यामुळें यादवांचा समाचार घेईल असा मुलगा व्हावा म्हणून त्यानें तप केलें. सांबांनीं प्रसन्न होऊन, 'असा मुलगा तुला यवनीपासून होईल' असें सांगितलें. त्याप्रमाणें कालयवन उत्पन्न झाला. तो यादवांशीं युद्ध करण्याकरितां आला. त्याला पाहून कृष्ण पळाला. त्याच्यामागें कालयवन लागला. मुचकुंद ह्या गुहेंत निजला होता, तींत कृष्ण शिरला व त्यानें आपला पीतांबर मुचकुंदाचे अंगावर टाकिला. मागून काल यवन आला. त्याला वाटलें कृष्णच येथें निजला आहे; म्हणून त्यानें मुचकुंदास लाथ मारली. मुचकुंद जागा झाला व त्यानें कालयवनाकडे पाहिल्याबरोबर तो भस्म झाला. नंतर कृष्णानें मुचकुंदास दर्शन दिलें, ही कथा ह्या आख्यानांत आहे.

आर्या.

एक्या यादव-वीरें कन्या गर्गासी अर्पिली हर्षें ।
जाणों त्या जगतीवर कृष्ण-कृपा-घन-दयांबु बहु वर्षे ॥ १ ॥
श्रुत्यर्थ मनीं आणी पुत्राविण मानवा नसे स्वर्ग ।
यास्तव बहु काळ तिशीं रमला सुत-काम तेधवां गर्ग ॥ २ ॥
विपुलात्मजार्थचि भजे त्या स्त्रीतें परि न एकही जाला ।
यादव सर्व विनोदें म्हणति सभेंताचि नपुंसक तयाला ॥ ३ ॥
कोपें जाय वनातें तप करि पाहूनि एक शिव-सदन ।
प्रार्थी पुत्र-प्राप्तीस्तव तो मुनि दीन करुनियां वदन ॥ ४ ॥
इकडे फिरे घरोघर शोध करायासि बायको पतिचा ।
झाली त्रस्त, यदुकुळा वाटे जाळील काय कोप तिचा ॥ ५ ॥
हिंडे विलाप करि बहु मारितसे फिर फिरुनि हाकेला ।
चित्तीं म्हणे नसे कीं स्वामींनीं आत्मघात हा केला ॥ ६ ॥

१ गर्गाचार्याला. २ पुत्राची इच्छा करणारा. ३ पुष्कळ पुत्र व्हावेत म्हणून.

साध्वी गर्हिंवरूनि ह्मणें पाहूं जाऊनि कोणत्या गांवा ।
जरि विरह चिर असा तरि सत्वर आतांचि देह त्यागावा ॥ ७ ॥
मग ती निराश होउनि बाहे करुणास्वरें भवानीतें ।
वानी तेज तिचें बहु श्रवणीं आकर्णिलें भवांनीं तें ॥ ८ ॥
विनवी शिवा शिवातें सत्वर पुरवा मनोरथास तिच्या ।
झाली व्याकुळ फारचि नाहीं पोटांत अन्न त्या सतिच्या ॥ ९ ॥
देव ह्मणें देतों वर, सांगे प्रकटूनि जा सतीला गे ।
गेली वेळ न लागे ह्मणतां पायांस ती सती लागे ॥ १० ॥
माय जसी कन्येवरि प्रीति करी सर्व-मं[2]गला तेवी ।
दे सौभाग्य अभयवर देवी जी सर्व मंगलातें [3]वी ॥ ११ ॥
इकडे हिमगिरिवारि तो तपुनि तपातें शिव प्रसन्न करी ।
मागे पुत्र असा कीं हरि होउनि करिल यादवासि करीं ॥ १२ ॥
शंभु ह्मणे परहिंसक पुत्र असा क्रूर बा द्विजातीला ।
होय असा कोठें तरि झाले सुम कठिण काय जातीला? ॥ १३ ॥
तुज पासुनि जनुजाचें नीच कुळीं यादवासि तो भारी ।
होइल समरांत बुधा देवांसहि जेविं कंजनाभारी[4] ॥ १४ ॥
झाला वरहि शिवाचा होइल यवनीस पुत्र शूरवर ।
यास्तव तोषुनि खिन्नहि झाला दे धर्मि दृष्टि दूरवर ॥ १५ ॥
न चले उपाय यास्तव यवनी पण्यांगनेसि तो गांठी ।
सांगे हृत्गत अपुलें एकांतीं एकदां पडो गांठी ॥ १६ ॥
वेश्या ह्मणे मुनिवरा योग्य तुह्मांला नसेचि हें कर्म ।
धर्म बुडवितां कांहो ठावें असतां समस्त हें वर्म ॥ १७ ॥
तरि तो पुन्हाहि प्रार्थी द्यावें मजलागि हेंचि दान खरें ।
वेश्या ह्मणे तपाचें जातिल सारेचि एकदा नखरे ॥ १८ ॥

---

१ शंकराचें. २ सर्वमंगल भवानी. ३ विते, उत्पन्न करते देतें. ४ कंजनाभ, पद्म-नाभ, श्रीकृष्ण, त्याचा अरि ह्मणजे शत्रु; कृष्णाचा शत्रु.

गर्गापासुनि झाला यवनीला पुत्र काल-यवन खरा ।
कोण्याही वीराचा समरीं चालूं न देचि तो नखरा ॥ १९ ॥
असुरध्वंसक निजजनपालक वसुदेवसूनुतद्वैरी ।
बहु वेळ मागध चमू काळाग्नीच्या मुखांत जो वैरी[1] ॥ २० ॥
तो हा हरि यवन ह्मणे युक्तचि जो नारदोक्त चिन्हांहीं ।
एकाकीच धरावा जोंवरि यातें सहाय बल नाहीं ॥ २१ ॥
मुचकुंद भक्तराया द्याया दर्शन, वधावया यवना ।
सुरवर[2] सत्य कराया निघतां झाला मुकुंदराय वना ॥ २२ ॥
कपट्या, चोरा, जारा, गवळ्या, भ्याडा, अतां कसा पळसी ।
टळसील मजपुढें जरि या समरीं त्वरित दुर्यशें मळसी ॥ २३ ॥
मागें यवन हरि पुढें पळतो जो वाग्मनासि गवसेना ।
तो काय सांपडे या ज्या हृदयीं भक्तिलेशहि वसेना ॥ २४ ॥
हस्तांतरें[3] पळे तो-दूरचि सांडूनि शत्रु-सेनेला ।
सह्याद्रिकूट-शिखरीं मुचकुंदाश्रमपदींच तो नेला ॥ २५ ॥
पीतवसन[4] तें पाहुनि हरि-शंकेनेंचि ताडिलें त्याला ।
निज पादें मग त्याच्या नेत्रकटाक्षेंचि भस्म तो जाला ॥ २६ ॥
दिसतें पीत वसन हें श्रीहरिचें मजवरी कसें आलें ।
चित्तांत ह्मणे माझें अमृतघनें दह्यमान वपु न्हालें[5] ॥ २७ ॥
ज्याचें पीत वसन हें त्याचें दर्शन मला न कां घडलें ।
कींहरि दर्शन होइल निद्रांतीं सुर उगेंचि बडबडले ॥ २८ ॥
शोधी सर्व गुहे[6] ते तों कोनीं[7] देखिला रमाकांत ।
तत्पदपद्म विलोकुनि झाला मुचकुंद तेधवा शांत ॥ २९ ॥
राजा ह्मणे शुकातें कोणाचा कोण हा महाभाग ।
ध्वांतीं किमर्थ निजला जळला कां यवन हें मला सांग ॥ ३० ॥
राजा, इक्ष्वाकुकुळीं जन्मे मांधातृनाम जो राजा ।

---

१ टाकता झाला. २ देवांनीं दिलेला वर. ३ एक हाताच्या अंतरानें. ४ पीतांबर. कृष्णानें आपला पीतांबर मुचकुंदाचे अंगावर टाकला तो पाहून. ५ दह्यमान वपु अमृतघनें न्हाले असा अन्वय. ६ कोपऱ्यांत. ७ अंधारांत.

P. Ganpat N Naidoo

मुचकुंद पुत्र त्याचा हा नेती देव आपुल्या काजा ॥ ३१ ॥
दैत्य-पराभव करितां जागर बहुकाळ होय रामाला ।
सेनापति गुह होता देती आज्ञा नृपा निजायाला ॥ ३२ ॥
जावें स्वस्थ निजावें राया एकांत पाहुनी जागा ।
जा गाति सद्यशातें जळेल तुज नर करील जो जागा ॥ ३३ ॥
ऐकुनि देवां वंदुनि निद्रा घेऊनि दिव्य सांगाती ।
निजला गुहेंत मुनि तो जन हे अद्यापि तत्कथा गाती ॥ ३४ ॥

याच आख्यानाचीं पदें.

चाल—गड्यानों कृष्ण गडी अपुला.

पद–(यादव गर्गास ह्मणतात.)

यादव ह्मणती मुनिवर्या । तुमची कळुन आली चर्या ॥धृ०॥ मेहुण्या पहा विनोद करिती । भाउजी सदन सदां धरिती । खाउनि पोट बरें भरिती । दिसेना पुरुषाची रीती । पाहणें नकोचि मग धैर्या ॥ १ ॥ शालक तुमचे तेहि तसे । मानिती तुह्मा नपुंसकसे । वांचणें काय जगांत असें । कराना यमपुर जवळ कसें । दिसतो हाचि बरा पैर्या[2] ॥ २ ॥ कथणें आलें सभेमाजीं । नाहिंच बळ तुमच्या माजीं । असली अतुरहि कामाजी । ह्मणेलाचि तुह्मासि मामाजी । दिसेना काय बरें आर्या ॥ ३ ॥ वदतां असें मुनिवर्यासी ॥ चढला कोप बहू त्यासी । आठउनि मनिं गिरिवासीसी[1] । निर्मितो ह्मणे सुपुत्रासी । लोपविल निज तेजें सूर्या ॥ ४ ॥

(गर्ग तपश्चर्येला गेल्यावर त्यांची पत्नी)

(उद्धवा शांतवनकर जा-)

कां वियोग दिधला मजला, मुनिवर्या, एकाएकीं ॥ धृ० ॥ कोणतें असें बरें पडलें, मजपासुनि अंतर कामीं । त्यासाठीं मज तुह्मीं त्यागिलें, होउनियां निष्ठुर स्वामी । एकटी आतां मी कैसी,

---

१ कार्तिकस्वामी. २ मार्ग.

दिन कंठूं आपुल्या धामीं ॥ चाल ॥ हें काय तुह्मां बरें दिसलें। मी कधिंतरि होतें रुसले। कां नाहीं घरीं मज पुसीलें॥पू०चाल॥ पिसिंलेंचि कसें हो किटका, त्या गोधुमसंगे चाकीं ॥ २ ॥ वाटतें मला तुह्मीं करितां, कीं विनोद माझा आजी। हें तरी ह्मणावें कैसें, ही गोष्टचि दिसती ताजी। असो अतां कष्टलें भारी। प्रभु येउं द्या करुणा माझी ॥ चाल ॥ मी वंदिन तुमच्या पायां, छळुं नका अतां मज वाया। मी घेत नसे हो घाया ॥पू०चाल॥ जायासि प्राण हे पाहती, तरि भेटचि मज द्याना कीं ॥ २ ॥ असि विलाप ती बहु करुनि, निंदितसे वृष्णिकुळाला। कां केला पतिचा माझ्या, अवमान वेळोवेळां। गेला मज टाकुनि आतां, करुं कैसी गति मी याला ॥ चाल ॥ हें असुख सांगु कवणासी। आहे पात्र कोण श्रवणासी। कोण करील हो अवनासी॥पू०चाल॥ भवनासी मज जावेना, गिरिवासी तूंचि विलोकीं ॥ ३ ॥

पद–(गर्गमुनी शिवाची प्रार्थना करितो)

जोगी.

(माझा भरत देखिला काय-)

देतां वर तरि हा मज द्या, शंभो त्रिपुरहरा ॥ धृ० ॥ यादव प्रमत्त झाले फार। त्यांचा भूमीवरतां भार। करावा मम पुत्रें संहार। आहे निर्धार हा माझा ॥ १ ॥ आजवरि सुत नाहीं झाला ॥ ह्मणउनि अराधिलें प्रभुला। द्यावा सुत मजलागिं भला। करिल वाहिला नाश त्यांचा ॥ २ ॥ वदले भर्गहि गर्गासी ॥ देतों सुत जरि मी तुजसी। येईल निकृष्ट योनीसी ॥ यादवांसी निवटाया ॥ ३ ॥ यापरि बोलुनि गिरिवासी। आणवी त्वरितचि बैलासी। बैसुनि गेले कैलासीं। निज-दारांसी घेउनिया ॥४॥

---

१ गव्हा बरोबर जात्यांत किडेंहि रगडलें जावें असें मला झालें. २ यादवकुळाला. ३ रक्षणास. ४ वराका, शंकर. ५ शंकर. ६ नंदीस. ७ पार्वतीला.

 P Ganpat N Naidoo.

(घनाक्षरी)

(काळ यवन कसा आला त्याचें वर्णन.)

भया जबनीसे सूत । मानत सबही जन छूत । भेजे मथुरामें दूत । करे जुगत मारनें ॥ १ ॥ अया सेना सब सात । भई बानन बरसात । करूं नगरी झट हात । किशन नाथ बतावो ॥ २ ॥ सुनी इतनी जदुराज । पहेन लीयो सरताज[1] । दौरत जदुकुलके काज । दई लाज छांडके ॥ ३ ॥

पद-(वेश्या गर्गास ह्मणाली तें)

(गडयाचों कृष्ण गडी अपुला-)

वेश्या ह्मणें अचार्यातें । करिना या परिचर्यांते[2] ॥ धृ० ॥ जाणुनि वर्णाश्रमधर्मा । होणें उदित अशा कर्मा । पावले कोण कधीं शर्मा । पाहणें लागें यमधर्मा । सांडा तुह्मी अधैर्यातें ॥ १ ॥ मानव देहाचि दुर्मिळ तो । कसा मग श्रेष्ठ वर्ण मिळतो । पहाना बरें अजामिळ तो । असा[3] काय सर्वां अजा मिळतो ॥ सोडुनि धाया पर्यातें[4] ॥ २ ॥ त्यांतही वृद्ध दशा आली ॥ तुमची पत्नि काय झाली । कशी आजि व्रीडा[5] तुह्मीं त्यजिली । प्रभूची मूर्ति न कां यजिली । पहा त्या शुकादि आर्यांतें ॥ ३ ॥ ह्मणें मुनि यथार्थ तूं वदसी ॥ वसतों मीहि ब्रह्मसदसीं[6] ॥ परि जो वसतो कैलासीं ॥ देत तो आज्ञा गिरिवासी । सांडणें भाग स्वचर्यातें[7] ॥ ४ ॥

दिंडी.

(पुत्र नसल्यामुळें गर्गाचार्यांचे मनाची स्थिति)

गर्ग भावितसे मनीं व्यर्थ जीणें । नसे स्वर्गासी जाणें सुतावीणें । जरी कांतेसी बहुत काळ रमला । पुत्रकामें संतुष्ट न तो झाला ॥ १ ॥ अली मानसीं खिन्नता तयाला । ह्मणें योजूं मी कोण उपायाला । राखुं पुत्राच्या प्राप्तिनेंचि बाणी । कधीं त्यागावा देह असें मानी ॥ २ ॥

---

१ मुकुट. २ सेवा. ३ असें पूर्वज मिळणें सर्वांच्या नशिबी थोडेंच आहे ? ४ रीत ५ लाज. ६ ब्रह्मपदीं. ७ स्वधर्माला.

(नारद कालयवनास बोलतो.)

अंजनीगीत.

नारद ह्मणें कालयवनासी । जरि तूं कृष्णासि हुडकीसी । त्याची खुण तूजपासी । सांगतों ऐक ॥ १ ॥ शिरीं मुकुट घातिला । असे पीतांबर नेसला । गळां वैजयंती माळा । गांठावें त्यासीं ॥ २ ॥ शोभे कौस्तुभमणि गळां । भाळीं कस्तूरीचा टिळा । दिसे मेघापरि सांवळा । तोची रे कृष्ण ॥ ३ ॥ राहतो मथुरेमाजी खरा । न चले कोणाचा नखरा । बैसुनि हिंडतो पाखरा वरि अवघा वेळ ॥ ४ ॥ चारि भुजानें मंडित । सर्वां खळांसी दंडित । असे लक्ष्मी आखंडित । यदुवीरापासीं ॥ ५ ॥ आहे सुंदर त्याचें सद्म । शंख चक्र गदा पद्म ॥ वाहे हातीं हृदयीं छद्म । धरि ऐसी खूण ॥ ६ ॥

कटिबंध.

(यादवी सभेचें वर्णन.)

सभागार तें बहुत चांगलें । इंद्र सभेहुनि दिसें आगळे । भवतांली किति वृक्ष लागले । नारि केळ पोफळी आवळे । बकुळ मालती चंपक फुलले । पुष्पाचे त्या परिमळ वाहती । छाया शीतल, पक्षि बोलती । स्थळोंस्थळीं कारंजें उडती । स्फटिकांच्या किति भिंति बांधिल्या । कनक-रसानें संधि साधिल्या । शशि-कांताच्या भूमि घोटिल्या । हटकवल्लि त्यावरी रेखिल्या । वरते साधुनि दिव्य बैठका । खांब सरूचे दिव्य हिऱ्याचे । तुळवट दि-धलें इंद्रनिळाचें । मरकत मणिची दिली उथाळी । गरूड पाचुच्या कड्या घातिल्या । रक्तमणींच्या किलचा दिधल्या । रजताचा वरि पेंड घातिला । इंद्रनिळाच्या केल्या पुतळ्या । रत्न दीप करिं उभ्या राहिल्या । नृत्य गान त्या अलापें करिती । प्रेक्षक-जनमानसासि हरिती । दिवस-निशा त्या स्थळींच नसती । जळ

१ गरुडावर.

असतां तीं स्थळें भासती । स्थळशंकेनें त्यांताचि पडती । लज्जित होउनियां आड दडती । सिंहासन नवरत्नी मोठें । मध्य भागिं तें दिसें गोमटें । खणोखणीं पडदे मखमलिचे । किनखापी किति कार चोबिचे । रुगिर्द्यावरि काम जरीचें । लोड बनविले बहु परोपरिचे । यादव सारे सभेंत असती । देशोदेशिचे अनेक नृपती । उग्रसेन असे, मुख्य श्रीपती । सेवकजन बद्धांजलि होउनि लक्षीती । प्रभुच्या निदेशासही । यादवी सभे सम ऐसी त्रैलोकीं दुसरी नाहीं ॥ २ ॥

पद-(यादव कृष्णाची प्रार्थना करितात.)

(उद्धवा शांतवन कर जा-)

ते यादव ह्मणती सारे, हरि वांचवि आमुच्या प्राणा ॥धृ०॥ तो काळ यवन क्रुर मोठा, घेउनियां सेना भारी । अला मथुरापुर वेढाया, पाहा येउनि नगरद्वारीं । हरि संकट पडलें मोठें, तुज वांचुनि कोण निवारी ॥ चाल ॥ चतुरंग सेना मोठी । वीरही कोटिच्या कोटी । भय शिरलें यास्तव पोटीं ॥ पू०चाल ॥ खोटीच गोष्ट कां सांगुं, तुजपासीं जाण सुजाणा ॥ २ ॥ भीतिलाहि कारण दुसरें, आहे कथितों तें हरि तुजला । गर्गानें तप बहु केलें, शिवसांब तयावरि रिझला । वरदान असे त्या दिधलें, सुत यवनिज मारिल रिपुला ॥ चाल ॥ तो काळ आमुचा हाची । हरि सेना पडली कांची, हें मनांत बहुताचि जाची ॥ पू०चाल ॥ याचीच तोड तूं काढी, सांगितल्या खूणाखाणा ॥ २ ॥ श्रीहरी ह्मणें हो ऐका, काशि युक्ती करितों खासी । युद्धाची खटपट सहसा, लागेना करणें ज्यासी । निवडुनिया दुष्टालागीं, पळवीतो या सैन्यासी ॥ चाल ॥ पहा उगेचि कौतुक आतां ॥ योजितों तयाच्या घातां । कां ग्राम त्यजुनियां जातां ॥ पू०चाल ॥ त्राता हा सर्व जगाचा, गिरिवासी कां समजाना ॥ ३ ॥

१ प्रसन्नता. २ भीतींत, घोरांत.

पद्–(राजा मुचकुंद ह्मणतो)

जलद त्रिताल.

हरि मज कांहो भेट देइना ॥ धृ० ॥ दिसे पीतपट त्याचा ॥ येथें आला केंवि साचा । कोणी शोध लावा याचा । ज्याचा तोची कांहो नेइना ॥ १ ॥ आतां धुंडुं कोठें त्याला । केला झोपेनेंचि घाला । न कळे वेळ किती झाला । भ्याला तरि कां जवळ येइना ॥ २ ॥ स्वार्गीं देवा सकळांनीं । माझ्या घातिलें हें कानीं । निद्रा पूर्ण होतां क्षणीं । भेट, तरि कां धांव घेइना ॥३॥ गिरिवासी प्रभुराज । मूर्ति दाखवानि काज । करि भक्ताचें तो आज । तेज गगनीं समावेना ॥ ४ ॥

पद्–(भगवान ह्मणतात)

(जलद घनाक्षरी)

बापा मुचकुंदा तूं दीन । जैसा जळाविणें मीन । दिसासि कां रे बा तूं क्षीण । बैस क्षणभरि । मशीं बोल तरि । झाली तनू मलीन ॥ १ ॥ काय वेळ अशि कठीण । कोणी केलें निद्रे-विहीन ॥ चाल ॥ गुहांतरी । चिंता करि दुरि । होसी पहिल्या परी पीन ॥ २ ॥

---

१ पीतांबर. २ मावत नाहीं. ३ ब्द्ध, सतेज.

सत्यभामेनें श्रीकृष्णास दान केलें तें आख्यान.

कथा-सारांश.

नारद द्वारकेस आला असतां कृष्णाच्या परिवाराचा थाट पाहून आपण गृहस्थाश्रमी व्हावें असें त्यास वाटलें. त्यानें कृष्णास एक बायको मागितली. त्यानें कृष्णास एक बायको मागितली. ' जिच्या घरीं मी दिसणार नाहीं ती बायको तुह्माला दिली ' असें कृष्णांनीं त्यास सांगितलें. नारदानें सर्व घरें पाहिलीं, तेव्हां सर्व ठिकाणीं कृष्ण त्यास दिसला. नंतर श्रमून नारद सत्यभामेचे घरीं, बसला. सत्यभामेनें ' प्रतिजन्मीं कृष्ण पति मिळण्याकरितां कोणतें व्रत करावें असें नारदास विचारलें. त्यानें ' कृष्णदान कर ' ह्मणून सांगितलें. ळागलींच सत्यभामेनें तसें केलें. पुढें ' कृष्णाची सुटका व्हावी अशी इच्छा असेल तर त्याचे भारंभार मला सोनें द्या' असें नारदानें कृष्णाचे इतर बायकांस सांगितलें. सर्वांनीं आपले दागीने व इतर जडजवाहीर पारड्यांत घातलें, परंतु कृष्णाचें पारडें वर उचलेना. शेवटीं रुक्मिणीनें एक तुळशीचें पान पारड्यांत घातलें, तेव्हां कृष्णाचें पारडें एकदम वर गेलें. ही कथा या आख्यानांत आहे.

आर्या.

रहावें मास चतुष्टय ह्मणवुनि ये द्वारकेसि देवमुनी[१] ।
त्यांतचि रमला चित्तें जाणें इतर स्थळासि दे[२] वमुनी ॥ १ ॥
ब्रह्म*विणा करिं घेउनि श्रीहरिच्या गात[३] तो प्रबंधांस ।
आला प्रभु जेथें तो वारी स्मरणेंचि कर्मबंधांस ॥ २ ॥
होते प्रभु रुक्मिणिच्या सदनीं सवतींत मुख्य दारांजी[४] ।
पाहुनि इतरहि कांता मानी पति ईस सर्वदा[५] रांजी ॥ ३ ॥
पर्यंकास्थित होता उतरुनियां धांवला मुनी नमना[६] ।
पूजा सत्कार बहू करि प्रभु आनंद दे मुनीनमना[७] ॥ ४ ॥
पाहुनि वैभव प्रभुचें नारद निज मानसांत हें भावी[८] ।
कीं व्हावें गृहधर्मी, मग जें होणार हो सुखें भावी[९] ॥ ५ ॥

---

१ नारद. २ सोडून, ३ गाणीं. ४ बायको. ५ खूष. ६ मुनीला नमन करण्याकरितां. ७ मुनिश्रेष्ठाच्या मनाला. ८ विचार करी. ९ भविष्यकाळीं.

* नारदाच्या वीणेला ब्रह्मवीणा ह्मणतात.

यावरि प्रभुलाहि ह्मणें यांतुनि मज एक अंगना नामीं ।
कामीं कुशल असी दे करिन तिसीं केलि-रंगना नामी ॥ ६ ॥
देव ह्मणें ती दिधली ज्या सदनीं मी असेचि ना जागा ।
गुणवति सुंदर अवघ्या विगुण ह्मणाया दिसेचि ना जागा ॥ ४ ॥
ज्या ज्या सदनीं पाहे श्रीहरि आहेचि बैसला कोठें ।
कोठें मुलासिं खेळे मुलिचाही पुरवितो लळा कोठें ॥ ८ ॥
कोठें सुनेसि आणी कोठें कन्येसि लावितो वाटें ।
कोठें विप्रा जेवावि कोठें देतोचि दक्षिणा वाटे ॥ ९ ॥
कोठें व्रतबंधकरी कोठें व्रत उजवितो लहान मोठें ।
कोठें विवाह मुलिचा कोठें पुत्रासि दापितो ओठें ॥ १० ॥
पाहे मुनि नारद तो येउनि तत्काल सत्यभामेला ।
टेकें विश्रांतिस्तव श्रमतों उष्णांत फार घामेला[२] ॥ ११ ॥
होता मुकुंद तेथें बोलावी नारदासि याहो या ।
कांहो श्रमला इतुकें सांगा कारण असेल या होया[३] ॥ १२ ॥
नारद होय चकित बहु या प्रभुच्या किति अगाध लीला या ।
भामा वदे तशांतचि सांगा व्रतदान शंकलीला[४] या ॥ १३ ॥
वाटें मजलागिं असें प्रतिभविं[५] व्हावाचि हा हरी नाहो[६] ।
सांगाहो दान कसें द्या दूषण मग जरी करीना हो ॥ १४ ॥
अचरावें व्रत कैसें कळवा मजप्राति ह्मणेल जरि नाहो[७] ।
करिन यथोचित भावें दूषण द्या मग जरी धरीना हो ॥ १५ ॥
नारद बोले आहे दान तुला सांगतों प्रशस्त-पणें ।
आहे तव संन्निध तें नलगे व्रत-नेम-पुण्य जळ तपेणें ॥ १६ ॥
दिधला कश्यप मजला आदितीनें, दान पारिजातें[१०] नग ।
शक्र दिला शचिनेंही, रोहिणिनें निजपती तसाच मग ॥ १७ ॥
आहे अनुकूल तुला पति अणवी पारिजातनग तोही ।
दे दान त्वरित मला याता यातींत वळे न गेंतोंहि ॥ १८ ॥

---

१ उत्तम. २ घामानें भिजलेला. ३ असे होण्याला. ४ शंकित झालेल्या मला. ५ प्रतिजन्मीं. ६ नवरा, पती. ७ नाहीं हो. ८ पुण्यतीर्थ. ९ तपश्चर्या. १० पारिजातक नावाचें झाड. ११ जावो.

सांगुनियां मग प्रभुला आणवुनि सुरतरुस द्वारकां पुरिला ।
लावी निज सदनांतचि ह्मणतें तिस कोण द्वारिं कां पुरिला ॥१९॥
सिद्ध करुनि सामग्री दे ती पतिदान नारदा विधिनें ।
चित्तीं ह्मणे मुरारी लिहिलें भाळीं असेंचि कीं विधिनें ॥ २० ॥
होतें मनीं प्रभूच्या कीं मजला हा मुनीच सोडील ।
करितो अशा कुचेष्टा आहे याचा स्वभाव खोडील ॥ २१ ॥
परि तो ह्मणें चलावें करणें लागेल आमुची सेवा ।
हेवा सोडुनि ठेवा देवा तुमचा नसेचि मज केवा ॥ २२ ॥
होते छात्र इतर जरि दे दाटुनि हरिशिरीं गवाळ्यातें ।
टाळ्यांतें वाजविती मुनि सेवक करुनि बहु टवाळ्यांतें ॥ २३ ॥
दिसतें द्रव्य कारण आजि अह्मी ठकविलें द्विजाला हो ।
फिरला जरी घरोघर स्त्रीचा होऊं दिला न ज्या लाहो ॥ २४ ॥
घाबरला मग प्रभु तो हा तरि नेणार स्पष्ट मज कळतें ।
होइल सुटका कैसी आलें हें विघ्न अजि कसें टळतें ॥ २५ ॥
जार्य जरी त्या सांगे परि हरिमार्गांत तो उभा राहे ।
पाहे सकळांसि ह्मणें मुक्त करुनि पुण्यगुढि उभारा हे ॥ २६ ॥
मग त्या रुक्मिण्यादी सकळ स्त्रियांचा जमूनि एक गट ।
ह्मणती हो कैसी तरि प्रभु–सुटकेची कराच गे लगट ॥ २७ ॥
पुसती त्या भामेला तुजला अधिकार तरि कसा गे हा ।
झाला प्राप्त, द्विमूर्धां सर्वांच्या लाविला कसा गेहा ॥ २८ ॥
बाई तूंचि कसी गे देउनि बसलीस कृष्णदानास ।
हें न कसें कळलें कीं भावी होणार सर्वदा नास ॥ २९ ॥

१ आपुल्या द्वारांतच झाड कां लावलेंस असें तिला कोण ह्मणूं शकेल. २ विधिपूर्वक. ३ ब्रह्मदेवानें. ४ खोडकर. ५ शिष्य. ६ देवपूजेचें सामान बांधलेलें गाठोडें. ७ लाभ. ८ नारद कृष्णाला 'चल' ह्मणत असे पण कृष्णानें रस्त्यांतच अडून बसावें व लोकांना ह्मणावें मला सोडवून आपला पुण्याचा ध्वज उभारा. ९ समुद्र. १० अग्नि.

बोले देवकि माता नसतिल या कृष्ण–कामिनी अन्या ।
झालीस बरी त्रिजगीं देउनि पतिदान तूंचि गे धन्या ॥ ३० ॥
होता तुझाचि गे हा पति यांचा हरि नसेल तरिच असें ।
केलें, समज अतां तरि अणसिल यदुराज, क्षेम तरिच असे॥३१॥
या परि गांजिति साऱ्या पडली भ्रांतींत सत्यभामा ती ।
या ऐशा अपमानें होईना काय सत्य भा मोती ॥ ३२ ॥
ह्मणती देवकिला त्या जातों प्रभुलागिं सोडवायातें ।
सांगावें तरि कवणां होती बहु कष्ट सोडवा यातें ॥ ३३ ॥
येतों चाल तुजसवें ह्मणती जाऊनि नारदासीच ।
मानिसि हरिदास तशा याही मानी समस्त दासीच ॥ ३४ ॥
श्रीहरि वांचुनि आतां येथें तरि कोण नारदा पाळी ।
कोठें तरि जन्माची देणें आहेचि एकदा पाळी ॥ ३५ ॥
अथवा सुटकाचि करी सत्वर आतांचि देवरायाची ।
होसी सदय अखंडित होइल सौभाग्य दे वरा याची ॥ ३६ ॥
नारद ह्मणें समतुकीं कृष्णाच्या कनक घाल जरि अवघ्या ।
मुक्त करिन श्रीहरिला सुभगत्वाची तुह्मीहि मग चव घ्या ॥३७॥
मग त्या अवघ्याचि मिळुनि घालिति नग ताजव्यांत तोलाया ।
देउनि सर्वस्वातें भीतिल कां मग पतीस बोलाया ॥ ३८ ॥
केलें हें भामेनें झालों अह्मीच पात्र वाराया ।
दिधले नग होते जे करितिल याहून काय दारा या ॥ ३९ ॥
जरि घातिले स्त्रियानीं जे होते कनकमय समस्त नग ।
मुक्तांचे रत्नांचे देती अनमोल त्या समस्त मग ॥ ४० ॥
तरि पारडें हलेना ह्मणती हें कृत्य नारदानें च ।
केलें ठकवायातें मानी संतोष कृष्णदानें च ॥ ४१ ॥

---

१ खरें तेज. २ खऱ्या तेजाची माती कां बरें होणार नाहीं. ३ तूं स्वतःला हरीचा दास समजतोस तशाच आह्मीहि हरीच्या दासी आहोंत असें समज. ४ प्रार्थना करितों. ५ भारोभार. ६ दागिने. ७ बिनमोल.

ह्मणती कितिक असेंही काढावीं भूषणें सकल हरिची ।
होइल न्यून जडत्वें वस्त्रें तरि कासया अहो जरिचीं ॥ ४२ ॥
इतुक्यांत येइ भैमी घाली आणूनि तुळसिच्या पाना ।
सत्याचि वदत्या कविचे काय तुह्मी इतर दोष ढावांनां ॥ ४३ ॥
होता प्रभु ज्यामाजीं आलें उचलूनि पारडें वरतें ।
फुंदें नारद हळहळु होतें जणुं ठेविलें रडें वरतें ॥ ४४ ॥
यापरि अनंद सकळा झाला मुनि नारदासहि तसाच ।
परि वरि रोष तसा तो फणसाच्या अंतरांत हिंत साच ॥ ४५ ॥
बाइ रमे कथाया लोकां काहणीच ही कसी केली ।
केली या विप्राच्या कनका हानीच, हो कसी केली ॥ ४६ ॥
झालें सकल जनांला आनंदाचेंचि तें महापर्व ।
वर्णिति किति भामेला कृष्णाला भैमिलाचि मग सर्व ॥ ४७ ॥
दानोद्यम भामेचा हरिनें नेलाचि शेवटांलागीं ।
हृद्गत कविचें पुरवुनि तो प्रभु नेतोचि शेवटाला गी ॥ ४८ ॥

याच आख्यानाचीं पदें.

कटिबंध.

(द्वारकेचें वर्णन.)

नारद द्वारकेसि जंव पाहे । पद्मा सद्म करुनियां आहे । ऐसी शोभा नयनीं लाहे । सुंदर नीर गोमती वाहे । सरोवरें निर्मळ निरें ज्यांचें । मध्यें शोभे वन निरजांचें । सुवास जाती दुरवर त्यांचे । वर्णन करिती सुरनर ज्यांचें । भंवतालीं घनवृक्ष लागले । नारि केळ पोफळी आवळे । चूतनिंब दाळिंब शोभले । फळभारानें दिसती लवले । जाइ जुई पुन्नाग मालती । भ्रमर ज्यांवरी रुंजि घालिती । सुवर्ण चंपक बकुल शेवती । गुलाब फुलले सु-

---

१ जरतारी. २ सत्य बोलणाऱ्या कवीचें तुह्मी इतर दोष झाकणार नाहीं काय ? ३ झांकणें. ४ स्फुदूं लागला. ५ गोड. फणसाच्या वरून जरी कांटे असतात तरी आंत गोड असते त्याप्रमाणें नारद वरून जरी रोष दाखवी तरी आंतून आनंदित झाला होता. ६ या ब्राह्मणाचें सोनें बुडविलें. ७ थट्टा, विनोद, मजा. ८ वाणी. ९ लक्ष्मी. १० घर. ११ नीर, पाणी. १२ नीरज ह्मणजे कमळ १३ दार.

गंध देती । नानापरिचे पक्षि बोलती । पाहत पाहत तो नगरामाजीं । गेला हरि मंदिरा समाजीं । सुवर्णमय गोपुरें साजिरीं । हिरे रत्न माणिकें ज्यावरी । अन्य मंदिरें तसीच सारीं । खणोखणीं बैसुनियां नारी । हास्य विनोदें खेळती सारी । गाती गाणें कळा कूसरीं । नारद पाहुनि चकित जाहला । शिष्यासह हरिसदनीं आला । चित्तापासुनि तेथें रमला । ह्मणे किती वैभव या हरिचें । अन्य दिसेना स्थळ या सरिचें । व्यर्थ जन्म कीं अमुचें गेलें । अजवरि सौख्य नसे कधिं झालें । नानापरिचे कष्ट भोगिले । इष्ट काम कधिं नसती पुरले । मिष्टान्नांचें सेवन घडलें । नाहीं मन संतुष्ट जाहलें । यापरि चित्तीं चिंतित मग तो । हरिलागीं भेटला । नारद मुनि द्वारवतीला । पाहुनियां बहुतचि रमला ॥ १ ॥

पद-(नारद श्रीहरीस ह्मणतो)

गड्यानो कृष्ण गडी अपुला.

नारद बोले श्रीहरिला । कांता देई एक मला ॥ ध्रु० ॥ सोळा सहस्र वरि आठ । दिसे तव कांतांचा थाट । भरलें मंदिर घनदाट । फुटेना जायासहि वाट । असें तरि काय अशक्य तुला ॥ १ ॥ करावी नूतन जरि नवरी । करूं मी काय जरी न वरी । बरें ती लहान असें जंवरी । आहे घरिं कोण तिला आवरी । मी तरि शिकवुं काय तिला ॥ २ ॥ यास्तव ह्मणतों मी देवा । करिल जी आतांचि मम सेवा । द्यावी शोधुनि मग जेवा । करीना दुसरीचा हेवा । राखिन तुष्ट सदा तिजला ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी हास्य करी । ह्मणे मी नसेन ज्याच घरीं । त्यावा कांता तीच वरी । जाणती सर्व कळा कुसरी । पुसणें नकोचि इतराला ॥ ४ ॥

---

१ हरीचीं मंदिरें ज्या ठिकाणीं आहेत तेथें. २ सारीपाट, चौसर. ३ बरोबरीचें, ४ जोंपर्यंत.

पद–(नारदास भामा पुसते.)

गडयानो कृष्ण गडी.

भामा पुसे नारदासी । सांगा मज व्रत-दानासी ॥ धृ० ॥ कांता हरिला बहुत जरी । करितो मजवरि प्रेम तरी । असतो अनुदिनिं याच घरीं । नावडे मज सम त्या दुसरी । प्रति भवीं होइन मी दासी ॥ १ ॥ असावा अखंड पति हाची । करूं मी युक्ति काय याची । सांगा निश्चयरुप साची । असो मग असुलभ हो, याची । अनुकुळ असें सर्व मजसी ॥ २ ॥ झालें मन माझें पळवा । नका करुं वेळ त्वरें कळवा । चिंता मनिची ही पळवा । सांगुनि प्रभुलाही वळवा । आहे गुणरासी गिरिवासी ॥ ३ ॥

(भामा नारदास विचारते)

पुछत भामा नारद मुनिसे । मोहे जुगत बतलावो री । जनम जनम हो पती हमारो । जदुबिर, दान सुनावो री ॥ २ ॥ बोले नारद तुह्मे बतलाऊं । दान करो पति अपनारी । होते सुहांगकी जनम जनमों काहेका जतन करना री ॥ २ ॥

(नारद भामेला सांगतात.)

अंजनिगीत

नारद बोलीलें भामेसी । व्यर्थ चिंता कां करितेसी । दान आहे कथितों तुजसी । मग न करी वेळ ॥ १ ॥ जरि तुज व्हावा अखंड हरी । माझ्या वचनीं दृढता धरी । कृष्णदाना दे लौकरी । होइल तुज सौख्य ॥ २ ॥ जन्मोजन्मीं हरीच कांत । होइल तुजलागीं निश्चित । ऐके सांगतों वृत्तांत । पूर्वीचा तुजला ॥३॥ शचिनें केलें पतिचें दान । तैसें अदितीनें ही जाण । होती रोहिणी सुज्ञान । दे पति दानासी ॥ ४ ॥ हरि तुज आहेची अनुकूळ ।

---

१ अहो. २ प्रार्थना करितें. ३ चंचल, उत्सुक. ४ दूर करा. ५ सौभाग्य. ६ इंद्राची पत्नी. ७ देवमाता. ८ चंद्रपत्नी.

न दिसे बरकडही प्रतिकुळ । सुरतरु आणउनी समुळ । दे दान मजसी ॥ ५ ॥ मोठें पुण्य या दानाचें । होतें, तुजला कथिलें साचें । घेई अनुमत चित्ताचें । नसे आग्रह अमुचा ॥ ६ ॥

पद—(बरकड कृष्णकामिनी भामेस निंदितात.)

(उद्धवा शांतवन कर जा.)

त्या कृष्णकामिनी अवघ्या । बहु निंदिति भामेलागीं ॥ ॥ धृ० ॥ कां विचार पुसिला नाहीं, आह्मी जवळाचि होतों बाई । जरि मत्सरभावें तुजला मनिं गर्वचि होता कांहीं । देवकी आदि बहु वृद्धा, त्या सन्निध होत्या पाही ॥ चाल० ॥ नाहिं पुसिलें कां बरें त्यासी । कसें रुचलें हेंचि मनासी । आर्पिला कृष्ण दानासी ॥ पू०चाल ॥ मानासी हानि आजि अमुच्या, त्वां केली आपुल्या जागीं ॥ २ ॥ आह्मि असतां इतुक्या कांता, कधि शंका धरिली नाहीं । काय तुलाचि गे तो होता, पति अर्पण केला बाई । कसि बसलिस स्वस्थपणानें, कां उत्तर देसि न कांहीं ॥ चाल ॥ सांगतों अतां बरें तुजसी । आहों[३] कांता हरिच्या तुं[४]जसी । आणि सत्वर आतां प्रभुसी ॥ पू०चाल ॥ बससील असी जरि उगली । तरि होसिल दुःखविभागी ॥ २ ॥ घाबरलि मनीं बहु भामा, तिस विचार न सुचे कांहीं । ह्मणें काय करूं मी आतां, कसि पडली भुल मजलाही । दिस कंठूं मी तरि कैसी, प्रभु वांचुनि हो या ठायीं ॥ चाल ॥ अलें संकट अज बहु मोठें । दिसे कर्मचि आपुलें खोटें । नारदासी हुडकूं कोठें । बोटेंच मोडणें आलें, गिरिवासी प्रभु आपंगी[५] ॥ ३ ॥

साकी. (कृष्णाच्या इतर स्त्रिया भामेस ह्मणतात.)

किशन कामिनी सबही मिल अइ । भामाजीके मंदरमों । कहत तुह्मे पति दियो दान अब । जा बैठो गिरि-कंदरमों ॥ १ ॥

---

१ पारिजातक. २ मुळासुद्धां. ३ आहोंत. ४ जसी तूं आहेस. ५ अपंग. मी अपंग झालें आतां बोटें मोडण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

पति हमारा था जदुबिर नहीं । हमसे ब्याहा[1]नका नोरी । समजो अबही लावो प्रभु-तुमा छेम[2] इसीमें जानोरी ॥ १ ॥

पद–(देवकी ह्मणते·)

जलद त्रिताल.

हरिला मी कोठें पाहूं ॥ धृ८ ॥ ह्मणती भामेनें हें काम । केलें बुडविलें धाम[3] ॥ नाहीं अला मना घाम । याम[4] झाला कोठें जाऊं ॥ १ ॥ येतो मनीं बहु त्वेष । नाहिं मर्यादेचा लेश । करिती वडिलांचा द्वेष । यश बुडतें कशी साहूं ॥ २ ॥ आहे भामा मोठी दांड । तिचा सर्वांपुढें पांड । तसी तोंडाचिही भांड[6] । सोंड[7] करुनि किती राहूं ॥ ३ ॥ आला भामेचा या वीट । पाहा बरें कशि धीट । नाहीं कोणाशींहि नीट । कोठवरि हें दुःख वाहूं ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभुसाठीं । लागुं कोणाच्या मी पाठीं । नेलि वृद्धांची या काठी । भेटिसाठीं किती धाऊं ॥ ५ ॥

पद–(कृष्णाच्या स्त्रिया नारदास ह्मणतात.)

जोगी·

(माझा भरत देखिला काय.)

नारदा सोड पती अमुचा । झालों दीनचि कीं ॥ धृ० ॥ घेतलें त्वां तरि कैसें दान । ठेविला नाहीं अमुचा भान । पती हा सर्वांचा कीं जाण । कैसें भान तुज नाहीं ॥ १ ॥ एकट्या भामेचा अधिकार । नसे हा विदितचि सर्व प्रकार । कां बरें केला नाहिं विचार । काय आधार तुज दिसला ॥ २ ॥ न सुचे यासि करावें काय । सांगे आतां तूंचि उपाय । देइना धरणी आह्मां ठाय । होसी माय तूं आमुची ॥ ३ ॥ सोडी गिरिवासी प्रभुराय । त्याविण आह्मि करावें काय । द्यावें कृष्ण-पालटें काय । धरितों पाय सांग बरें ॥ ४ ॥

---

१ लग्न. २ क्षेम, कल्याण. ३ घर. ४ प्रहर. ५ तोरा, ताठा, अहंकार. ६ भांडणारी. ७ हेळसांड, उपेक्षा. ८ कृष्णाबद्दल. कृष्णाच्या मोबदला आह्मी काय द्यावें तें सांग.

पद—(नारद कृष्णपत्न्यांस ह्मणतो)

जलद घनाक्षरी.

कांगे झाल्या ऐशा दंग । जरी व्हावा श्रीहरिसंग । कां मी करिन मनोभंग । द्या गे कृष्णा इतुकें, तोलुनि सोनें निकें, देतों सोडुनि रमारंग ॥ १ ॥ काय असें तुझा व्यग । कळुं द्या तुमचें अंतरंग । नसें संकट कांहीं, तुह्मां उणें नाहीं । आणा सोनें तोलुं श्रीरंग ॥ २ ॥ नाहीं अवघड कांही प्रसंग । कां बरें करितां मग दिरंग । झडकरि जागे आतां, आणुनि सोनें हातां । व्हावें हरिपदकमलीं भृंग ॥ ३ ॥

झुलना. (कृष्णाच्या स्त्रिया ह्मणतात.)

घनाक्षरी.

कनक दिधलें किति भार । न ये कृष्ण भारंभार । असा याचा किति भार । नकळे पार आम्हांतें ॥ १ ॥ कोणी ह्मणता नग फार । काढा सकल अलंकार । होईल न्यून कांहीं भार । दिसे विचार हा बरा ॥ २ ॥ वस्त्रें जरिचीं जड फार । वाटे याचा ही भार । काढुनि दुसरीं द्या चार । करा न्यून भार हा ॥ ३ ॥

---

१ उणें. २ दिरंगाई, उशीर, टाळाटाळ. ३ जरतारी. ४ चार, थोडीं.

प्रभूंनीं नारदाचा गर्वपरिहार केला तें आख्यान.

कथा-सारांश.

एकदां ऋषींच्या सभेंत शुकासारखा कोणी होणार नाहीं, असें सर्वांचें मत पडलें. ही गोष्ट नारदाला आवडली नाहीं. नारद ह्मणाला 'ज्याला स्त्रीचा अनुभव नाहीं अशा शुकानें रंभेला परत पाठविलें यांत मोठेसें नवल नाहीं; मी सुद्धां तसें करीन.' असें ह्मणून नारद तप करण्यास गेला. कांहीं दिवस शुकाप्रमाणें त्यानें तप केलें. त्याचें तप पाहून इंद्र घाबरला. त्यानें रंभेस सांगितलें. तिनें आपल्या एका दासीस नारदाकडे पाठविलें. तिला पाहून नारदाची धांदल उडाली. नारदाची स्थिति पाहून ती दासी निघून गेली. नारदाला वाटलें कीं, आपण रंभेला परत केलें ही गोष्ट सर्वांना कळवावी. प्रथम तो ब्रह्मदेवाकडेच गेला, व त्याला ती गोष्ट सांगितली. त्याला ही गोष्ट ऐकून आनंद झाला नाहीं. नंतर नारदानें तीच हकीकत विष्णूला व शिवाला सांगितली. शिवानीं आपले दोन गण गुप्तरूपानें नारदाबरोबर दिले. जातांना नारदाला एक नगर दिसलें. तेथें पुष्कळ तरुण स्त्रिया पाणी घेऊन जातांना दिसल्या. त्यांनीं राजाच्या 'मुलीचें स्वयंवर आहे याजकरितां पाणी नेतों,' असें नारदानें विचारल्यावरून सांगितलें. ती राजकन्या श्रीविष्णूस वरणार आहे असें समजल्यावर, नारद विष्णूकडे गेला, 'व थोडे वेळां करितां तुमचें रूप द्या' असें त्यास ह्मणाला. विष्णूनें नारदाचें सर्व शरीर आपल्या सारखें केलें. परंतु तोंड मात्र माकडाचें केलें, व 'आरसा पाहूं नका' असें नारदास सांगीतलें. नारद राजकन्येकडे गेला, तिनें त्याला आरसा दाखविला. तेव्हां नारद आपले मनांत लज्जित झाला, व त्यानें विष्णूला व शिवाचे दोनी गणाला शाप दिला. ही कथा या आख्यानांत आहे.

आर्या.

गौतम कपिल महामुनि वसिष्ठ भृगु अंगिरा च्यवन राम ।
कश्यप भारद्वाजहि नारद देवल विशिष्ट–गुणधाम[1] ॥ १ ॥
उपराग[2]–पर्वकाळीं ऋषिगण संपूर्ण तीर्थ राजास[3] ।
आले स्नान कराया वंदिति सुरनरहि अप्सरा ज्यांस ॥ २ ॥

---

१ विशेष गुणांचीं आगरें. २ ग्रहण. ३ तीर्थश्रेष्ठ प्रयागास.

ह्मणति शुकासम नाहिंच दृष्ट श्रुत पुरुष अन्य कवणास ।
सांगा असेल ठावा येऊं द्या त्वरित शर्म[1] श्रवणास ॥ ३ ॥

सत्याचि योगींद्र तया ह्मणती, नाहींच अन्यथा बोलें[2] ।
कठिण-उरो-जा रंभा प्रार्थी, तरि काय अन्य थांबेल ॥ ४ ॥

कोपें बोले नारद यापरि येतांचि वाक्य श्रवणासीं ।
काय अशक्य असें हें सूज्ञ जना वेद[3]शास्त्र-प्रवणासीं ॥ ५ ॥

बा नारदा नसें हें सुलभ, अती कठिण जाण तूं बरवें ।
वार्तांबु प्राशी जो त्यालाही सर्वथा न धिर धरवे ॥ ६ ॥

इतरांची काय कथा सूज्ञा तुजलागि काय सांगावें ।
दिसला धवल ह्मणुनि कां सांडुनि हंसासि वायसा गावें ॥ ७ ॥

नारद ह्मणे अतां मी जाउनि करितोंच्चि कीं तपारंभा ।
पाहणें असेल प्रत्यय, सिद्ध करुनि पाठवा तुह्मी रंभा ॥ ८ ॥

सामर्थ्य काय तीचें फटविल या नारदासि निज-कुतुकें ।
जाइल व्यर्थ तिचें तें करणें हवभाव कृत्य जें तितुकें ॥ ९ ॥

यापरि बोलुनि नारद गेला तत्काल तो तपायासी ।
ह्मणती मुनिजन सारे कां हा पडतो वृथा तपायासी ॥ १० ॥

कांहीं काळ तपातें आचरला त्या शुकासमान मुनी ।
सुज्ञ कसें राव्यांतें ह्मणतिल हो त्या शुका समान मुनी ॥ ११ ॥

पडला इंद्र विचारीं आलें हें विघ्न तरि कसें टळतें ।
घेइल पद अमुचें तो नारद मजलागिं स्पष्ट हें कळतें ॥ १२ ॥

पाचारी रंभेतें कळउनि वृत्तांत हा वदे तीस ।
भंग तपाचा करणें अनुमत या लागिं काय देतीस ॥ १३ ॥

रंभा वदे सुरेशा जाणें नलगें मलाहि त्या ठायां ।
दासीच्या दासीसहि वेळ नको नारदासि गांठाया ॥ १४ ॥

---

१ नांव. २ शब्द. ३ वेदशास्त्रांत प्रवीण असाला. ४ वारा अथवा पाणी पिऊन च राहणारे. ५ फसवील. ६ तपाच्या आयासांत. ७ राघूला.

लघुतर कार्य असें हें वाहतसा व्यर्थ काय काळजिला ।
काय करीना सेवा रक्षण करितांचि सर्वकाळ जिला ॥ १५ ॥
रंभेनें पाठविलें सज्ज करुनि दासिच्याहि दासीस ।
झाला पाहुनि मोहित करिती सुरनम्र ज्या सदा सीस ॥ १६ ॥
कळलें दासीस असें कीं हा मुनि जाहला व्यथित-काम[2] ।
कां मग व्यर्थ बसावें पूरित जाल्यावरीहि निजकाम ॥ १७ ॥
आली पलटुनि दासी सांगे रंभेसि तीहि शक्रास ।
पोळे क्षीर ह्मणुनियां फुंकुनि प्यावेंचि काय तक्रास ॥ १८ ॥
दासी गेल्यावरि मग चढला बहु गर्व नारदालाही ।
शक्य न झाली रंभा अवलोकायास मत्तपालाही ॥ १९ ॥
प्रगट करावें ह्मणउनि गेला मुनि ब्रह्मयासि कळवाया ।
परि तो ह्मणे शुकासम कोण असे, बोलसी सकळ वाया ॥२०॥
पुत्रोत्कर्ष[3] पित्याला इष्ट, कळेनाचि, यास कां नाहीं ।
नाहीं ज्ञान ह्मणावें, कीं झाला हा बधीर कानींहीं[4] ॥ २१ ॥
कळवूं शिवासि जाउनि वाटे सन्मान तो करिल कांहीं ।
आहे सर्वज्ञ प्रभु शंका तरि मानसीं धरिल कां ही ॥ २२ ॥
सांगे वृत्त शिवातें रुचलें त्याच्याहि तें मना नाहीं ।
नच दुखवुनि मन मुनिचें चेष्टा करितो कशी पहानां ही ॥ २३ ॥
दूतद्वयासि सांगे गुप्त असावेंचि नारदा-निकट ।
कळवा येउनि मजला वृत्त सकळ कार्य हें नसें बिकट ॥ २४ ॥
मग तो वैकुंठातें गेला नारायणा कथायास ।
पूजा सत्कार बहू प्रभु करि, झाला ह्मणे पथायास ॥ २५ ॥
येणें कां अजि केलें सांगा आहेत कर्ण हे तृषित ।
नारद ह्मणे प्रभो म्यां केला होताचि पण असा ऋषिंत ॥ २६ ॥
कीं फिरविन रंभेतें अवमानुनि फिरविलें शुकानें हो ।
केलें तसेंचि तें म्यां ध्यावा वृत्तांत आशु[6] कानें[7] हो ॥ २७ ॥

१ मस्तक. २ कामानें पीडित. ३ नारद हा ब्रह्मदेवाचा मुलगा आहे ह्मणून नारद विचार करतो कीं,—४ कानांनीं. ५ पहा बरें! ६ शीघ्र. ७ कानानें.

देव ह्मणे धन्य तुह्मी यापरि राहवेल काय अन्यास ।
वेष्टुनि काषायांबर बसती घेऊन व्यर्थ संन्यास ॥ २८ ॥
नारद बहु संतोषें मागे आज्ञा प्रभूसि जायातें ।
देव वदे जाउनियां पुनरपि करितां कशास जा या तें ॥ २९ ॥
यापरि बोलुनि प्रभु तो मुनिच्या मार्गांत पुर नवें वसवी ।
वाटे दाउनि माया अज्ञ जना समचि नारदा फसवी ॥ ३० ॥
गेला मुनि त्या स्थानीं पाहुनि उद्यान रम्य रमला हो ।
श्रमला होताचि अधीं मानी चित्तांत तो परम लाहो¹ ॥ ३१ ॥
इतक्यांत एक दासी आली तेथें भरावया पाणी ।
मदनें व्याकुळ मुनिवर पाहे तीचा धरावया पाणी² ॥ ३२ ॥
वाटे मुनिलागिं असें पुनरपि रंभाचि काय ही आली ।
अथवा असेल दुसरी बहुधा गमतें तिचीच ही आळी³ ॥ ३३ ॥
सत्वर भरुनि जळातें दासी तेथूनि जावयां पाहे ।
बाहे नारद परि ती स्पष्ट वदे आपुल्या वयां पाहे ॥ ३४ ॥
नारद ह्मणे शुभांगे सांगे आहेसि कोण कवणाची ।
कां तूं जळासि आलिस इच्छा मजलागिं वृत्त-श्रवणाची ॥ ३५ ॥
दासी राजगृहींची उदका न्याया अले विवाहातें ।
करितो नृप कन्येच्या, आहे वरणार ती विवो⁴ हातें ॥ ३६ ॥
नारद जाउनि मागे कन्या भेटूनि त्या नृपा आधीं ।
आहे स्वयंवरीं, जा बोधुनियां कार्य आपुलें साधी ॥ ३७ ॥
गांठी कन्येलाही परि ती बोले हरीच मज नवरा ।
होइल सत्याचि जाणा मग मी कां हो वरीन अन्य वरा ॥ ३८ ॥
येइल हरि गरुडध्वज त्याच्या घालीन हीच माळ गळां ।
त्यावांचुनि मुनिवर्या त्याचि पित्यासम असोचि जन सगळा ॥ ३९ ॥
नारद येउनि पुनरपि स्तवनें नारायणासि तो वळवी ।
यामद्व्याचि पुरे, द्या सत्वर निजरूप मज असें कळवी ॥ ४० ॥

---

१ लाभ. २ हात. ३ सखी. ४ पती.

देव ह्मणे देइन परि मुख न पहावेंचि आरशामाजीं ।
जरिहि अवज्ञा केली केली ह्मणतील दुर्दशा माजी ॥ ४१ ॥
नारद पाहे निजतनु दिसली अनुरुप विष्णुची काया ।
चित्तीं ह्मणें अतां मज आहे भय काय तीस हटकाया ॥ ४२ ॥
आला नारदमुनि ज्या स्थानीं ती राजकन्यका होती ।
होती ध्यानीं हरिच्या सांडुनि नर वरिल अन्य कां हो ती ॥ ४३ ॥
नारद सन्मुख बैसे तरि ती अवलोकिनाचि वदनातें ।
वदनातें कीशाच्या केंवि भुले जी भुले न मदनातें ॥ ४४ ॥
तरि नारद सन्मुख ये आणविला मग अदर्श दासिकरी ।
दासिकरीं देउनियां सांगे, लज्जीत नारदासि करी ॥ ४५ ॥
पाहुनियां मुख अपुलें नारद निजमानसीं विरांला हो ।
चित्तीं ह्मणे अतां मी दावूं मुख केविं हें सुराला हो ॥ ४६ ॥
नारद बोले कोपुनि देवा तुज सम असेचिना कपटी ।
अवमानिलें मला कां, ह्मणउनी भूमीवरीच कर अपटी ॥ ४७ ॥
मर्कटमुख आवडलें येतिल मर्कट तुझ्या सहायासी ।
होइल स्त्रीचाहि तुला वियोग येईन मी पहायासी ॥ ४८ ॥
शापी शिवदूतातें ध्यान शिवाचें तुह्मां अखंड जरी ।
रावण घटकर्ण असे होउनि पावाल मृत्यु राम करीं ॥ ४९ ॥
आहे सुरस कथा ही तुलसी रामायणीं पहाल तरी ।
गाल तरीच तरुनियां इतरां तारावयासि व्हाल तरी ॥ ५० ॥
गिरिवासीकृत आर्या झाल्या परिपूर्ण आजि पन्नास ।
पठण श्रवणें गवसे सद्गतिचा मार्गही प्रपन्नास ॥ ५१ ॥

---

१ माझी दुर्दशा केली असें ह्मणाल. २ विचारण्यास. ३ माकडाच्या. ४ आदर्श, आरसा. ५ विरला, थंड झाला. ६ कुंभकर्ण. गायन कराल तर. ७ नौका. ८ सांपडेल. ९ लीन झालेल्यांना.

याच आख्यानाचीं पदें.

पद–(मुनि नारदास ह्मणतात.)

चाल. (गड्यांनो कृष्ण गडी अपुला.)

दिसेना यांत अर्थ कांहीं । प्रतिज्ञा करिसि व्यर्थ कां ही । ॥ धृ० ॥ ह्मणती मुनिजन ते सारे । जाणत मूढ तूं कसा रे । दिसेना भूवरि ऐसा रे । त्यागिल कामिनि पैसा रे । तुझें मन देत असेल गाही ॥ १ ॥ शुकासम कोण जगीं आहे । नारदा तूं शोधुनि पाहे । असूया[2] वागविसी कां हे ॥ कळेना तुला कसें बा हें । मानसी विचारुनि पाही ॥ २ ॥ जाणें दूर नको बापा । विचारी तूं आपुल्या बापा[3] । पावला इंद्र किती तापा । मारिल्या मदनानें टापा । विषय हा साधारण नाहीं ॥ ३ ॥ अशा या गोष्टि असुनि ठाव्या । कां बरें मग त्या विसराव्या । हरीच्या कीर्ति सतत गाव्या । मनाच्या वृत्ति आंवराव्या । आहे गिरिवासि सर्व ठायीं ॥ ४ ॥

अंजनीगीत.

(नारद ऋषीस ह्मणतो.)

बोले नारद मुनिजना । कां तुह्मि करितां हो वल्गना ॥ काय त्या शुकाची गणना । नारदापुढें ॥ १ ॥ अहो त्या रंभेची काय कथा । कां बरें भिववितां मज वृथा । आल्या वाटें लाविन पंथा । नसें संकट याचें ॥ २ ॥ शुकाचें त्या वर्णन काई । ज्याला स्त्रीचा अनुभव नाहीं । ऐसा स्थिरही राहे कांहीं । नवल नसें त्याचें ॥ ३ ॥ प्रमदासंगीं जो रातला । नाहीं निश्चयीं ढळला । वर्णू त्याच्या आह्मि कीर्तिला । नवल करूं कांहीं ॥ ४ ॥ नाहीं बोलूनियां फळ । येइल अनुभवा सकळ । जातो तपालागीं वेळ । कां करूं मी आतां ॥ ५ ॥

---

१ साक्ष. २ मत्सर. ३ ब्रह्मदेवाला. ४ लाथा. ५ रममाण झाला.

पद-(इंद्र रंभेस ह्मणतो.)

कालगडा त्रिताल-

जाई त्या विपिनासी, रंभे ॥ धृ० ॥ नारदमुनि बहु तीव्र तपे करि विघ्न त्वरें तपनासी । इंद्रपदातें घ्याया टपतो भीती हीच मनासी ॥ १ ॥ अजवरि ऐशीं विघ्नें टाळुनि सौख्य दिलें सकळांसी । याहि तपाचा भंग करुनि ये तोषवि गे अमरांसी[१] ॥२॥ जाउनि येई पुनरपि रंभे सत्वर या सदनासी । मार्ग तुझा आह्मि लक्षितसों गे लावुनियां नयनांसीं ॥ ३ ॥

झुलना—घनाक्षरी.

(रंभा शुकास ह्मणते)

अहो सांगा सुरराज । सोडुनि पुसतें मी लाज । काय दुर्घट हें काज । ह्मणुनि आज बाहिलें[२] ॥ १ ॥ कोठुनि नारदास धीर । होता कां तुह्मी अधीर । करा अपुलें मन स्थिर । करुनि दूर काळजी ॥ २ ॥ जाणें मज तरि कशास । कोण मानितें अशास । नको वेळ दुर्दशास । हा विश्वास दृढ धरा ॥ ३ ॥

पद-(चाल—गडयानों कृष्ण गडा.)

(रंभा पुन्हां ह्मणते.)

रंभा वदे दिवस्पतिला[३] । भ्याला काय नारदाला ॥ धृ० ॥ शुकासम तेज नसें याचें । कारण काय काळजीचें । व्यर्थ भय वागवितां त्याचें । असावें स्वस्थ मनीं साचें । प्रेषितें अतांचि दासीला ॥ १ ॥ नारद आहे अधिर भारी । येइल दासीच्या आहारीं । पाहुनी श्रीहरिच्या नारी । इच्छितो व्हाया घरबारी । मानितो कोण बरें त्याला ॥ २ ॥ रंभा आपुल्या दासीतें । पाठवी श्रृंगारुनि तीतें । सांगे जाउनियां मुनितें । करावें मोहित निजकृत्यें । गौरविन सत्य जाण तुजला ॥ ३ ॥ गेली त्वरित

१ देवांना. २ बोलाविलें. ३ इंद्राला. ४ तडाख्यांत.

मुनीपाशीं । बांधिलें मोहजंन्य पाशीं । अली मग पलटुनि रंभेसी । सांगे तीहि वासवासी । आहे कीं गिरिवासी अपुला ॥ ४ ॥

कटिबंध.

(रंभेच्या दासीचें वर्णन.)

अजब नार है छेलछबेली । बनमे कैसी अई अकेली । रुप रंगमे बहोत सजेली । है सोला सिंगार बनेली । सिंघ–कटीसम कमर पतेली । बांधेमेभी खूब गठेली । नहि पतिवर्ता किसे द-बेली । देख परे जस नार छटेली । गहिने गांठेसेभि लदेली । सि-रमे साहत फूल चमेली । नजर अवे रंभाकी सैली । उमक चम-कसे अइ नखरेसे । बोल चाल नहि कछु उससुनिसे । हावभावसे मोह लिया मन । तबही सुध गई मुनि तनकी । मनकी लहर भई कामिनपर । खूल गई कौपिन मुनितनसे । दैत्यगुरू फिर उसी रहासें । आनिकसें तब कामिन हासें । जाय हकीकत कहे रंभासे । वोहि सुनावत देवदेवसे । कार भयो है आप आपसें । चिंता मत करियो महाराजा । शुकयोगी सम नहि है दूजा । गनती कौन करे नारदकी । मांगत फिरे नार जदुबरकी । कोन डरे बतलावो इसको । धीर नही घडि पललव जिसको । अब कछु धोका नहि है तुमको । रहो खुषीसे चैन करो मंदरमें अपने । इस तऱ्हे वासवको समज्याया । कामिनने तप नारदका देखो ये सबहि डुबाया ॥ १ ॥

अंजनीगीत.

(नारद ब्रह्मदेवास ह्मणतो) .

नारद बोले कमलासना । आहे माझी ही प्रार्थना । आ-णुनि येथें संक्रंदर्ना । प्रश्न करा आर्धी ॥ १ ॥ नारद आहे शुका-सम । किंवा त्याहूनी उत्तम । रंभेचें तरि विफळ श्रम । उभयांनीं केलें ॥ २ ॥ जरि तो ह्मणेल तुह्मासी । नारद शुकाहुनि गुण-राशी । मग हे कळवा हो सकळांसी । कीर्ति जगीं व्हाया ॥ ३ ॥ होइल श्रमाचें या फळ । गातिल माझे गुण सकळ । मनही हो-ईल निश्चळ । नमितों यासाठीं ॥ ४ ॥

---

१ मोहापासून उत्पन्न झालेल्या पाशांत. २ शुक, रेत. ३ ब्रह्मदेवा. ४ इंद्राला.

पद–(रंभेला पाहून नारदाची स्थिति)
कालंगडा, त्रिताल.

तबही सूध गई मुनितनकी ॥ धृ० ॥ नार बिपिनमों जब आ निकली। अवाज अइ पैंजनकी ॥ १ ॥ गलित बसन जब जौवन देखे। आवत याद मदनकी ॥ २ ॥ तीर नयनका मोर खींचत। कमान जब भंवयनकी ॥ ३ ॥ नोक झोकसे करत इशारत। नार निकट आवनकी ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु करत अचंबा कौन गती औरनकी ॥ ५ ॥

पद–(ब्रह्मदेव नारदास बोलतात)
चाल–(गड्यांनो कृष्णगडी)

ब्रह्मा ह्मणे नारदासी। प्रशंसा कां अपुली करिसी ॥धृ०॥ सांडुनी श्रीहरिची सेवा। करणें व्यर्थ असा हेवा[1]। तुझा त्यापुढें नसे केवा। दिसेना शुभ संचित–ठेवा। सांगतों अभिमानें बुडसी ॥ १ ॥ होइल कुत्सा जगिं बा रे। तुला हें कसें कळेना रे। वल्गना करूं नको जा रे। नित्य श्रीहरिलागीं गा रे। यांतचि सौख्य असे तुजसी ॥ २ ॥ दिसेना यांत अर्थ कांहीं। बोलणें फोल गमें पाही। धुंडिल्या जरी दिशा दाही। शुकासम अन्य जनीं नाहीं। असें हें विदितचि सकळांसी ॥ ३ ॥ येथुनि जा सत्वर आतां। बोलवूं नकोचि यापरता। अजवरि भ्रम हा मज होता। नारदा आहेसि तूं ज्ञाता। ह्मणेलाचि मूर्ख गिरीवासी ॥४॥

पद–(नारद श्रीहरीस ह्मणतो)
(कालंगडा त्रिताल)

सुनो सुनो महाराज ॥ धृ० ॥ गहेनबिखे[2] सब मिलकर आये। मुनिजन प्रभू प्रयाग। भई प्रतिज्ञा हमसे तबही। कहन तुमहिसे लाग ॥ १ ॥ शुक जोगींद्र पलटाये रंभा। निकली उनमें बात। बोल दियो हमही सब मुनिसे। तपको अबही जात ॥ २ ॥

१ मत्सर. २ ग्रहणप्रसंगीं.

पद–(देव नारदाची स्तुति करितात)

जोगी.

नारदा बहु तुमची थोरी । वर्णू काय बरें ॥ धृ० ॥ केला कोळी[1] तो मुनिराय । वंदिति सुरनर ज्याचे पाय । असें बळ इतरीं आहे काय । व्यर्थचि काय[2] वागविती ॥ १ ॥ शुकानें केलें कवणा काय । ह्मणती त्याला योगीराय । वदला रंभेसी जरि माय । अघटित काय हें घडलें ॥ २ ॥ तुमचा पवित्र हा किति काय[2] । रंभा करित यासी काय । वेडा झाला तो सुरराय । करितो काय छळ तुमचा ॥ ३ ॥ तुष्टला गिरिवासी प्रभुराय । ज्याच्या आनंद पोटिं न माय । ह्मणे तो देऊं यातें काय । वंदी पाय बहु अदरें[3] ॥ ४ ॥

पद—(नारद आणि दासीचा संवाद)

चाल–(उद्धवा शांतवन करि जा)

कां झिडकारिशि तूं मजला, शशिवदने हे गुणसरिते ॥धृ०॥ जाहलों श्रांत ह्मणउनियां, आज आलों येथें पाहीं । बैसलों रम्य भुवनीं या, झालि विश्रांतिहि मज कांहीं । देखिलें तशांतचि तुजला, बहु अनंद झाला हाही ॥ चाल ॥ परि इष्ट न बोलसि वाचे । हें कृत्य काय मोलाचें । या आधिनें[4] मन बहु कांचें ॥ पू० चाल ॥ साचेंच सांग बरें मजला, तव मन कां त्रासचि धरितें ॥ १ ॥ तूं सभाग्य[6] दिससी नयनीं, कां आलिस उदकालागीं । हें चित्र[7] गमे बहु मजला, आहे भ्रांतिंत अंपुल्या जागीं । काय नसतिल दासी अन्या, या कार्याच्या उपयोगीं ॥ चाल ॥ तूं सांग कोण कवणाची । लालसा वृत्तश्रवणाची । जरि त्वरा असे गमनाची ॥ पू०चाल ॥ साचीच तरि अर्धीं कळवी, कां रोषचि गे मजवरतें ॥ २ ॥ ती ह्मणे अहो मुनिवर्या, वंदितसें तुमच्या पायां । मी दासी राजगृहींची, अजि आलें उदका न्याया । आहे

१ वाल्या नांवाचा कोळी मंत्र देऊन वाल्मीकि केला. २ शरीर. ३ आदरानें. ४ चिंतेनें. ५ घाबरलें. ६ भाग्यवती, श्रीमंत. ७ ि चित्र.

विवाह नृपकन्येचा, ह्मणं[1] तांतडं[2] करितें जाया ॥ चाल ॥ योजितां मला ज्या काजीं । मी राजि नसे मग कां जी । पाजितां बळें मज कांजी । कां जिचें मनीं जें नाहीं, करवावें कां तिज करि तें ॥ ३ ॥ नारदा असें हें करणें, बरें योग्य तुह्मां तरि दिसतें । योगींद्र ह्मणवितां अपणां, मज ढोंगाचि दिसतें लुसतें । या अशा अचरणें सांगा, मग कोण तरी हो पुसतें ॥ चाल ॥ मुनिवरांत तुमची कोटी । मिरवितां प्रतिष्ठा मोठी । अशिं कर्मं करितां खोटीं ॥ पू०चाल ॥ पोटींच कशीं गिरिवासी, घालितसें न कळें मज तें ॥ ४ ॥

१ ह्मणून. २ त्वरा.

हरिश्चंद्राख्यान.

आर्या.

क्षितिवरि संचार करुनि ये नारदमुनि सभेंत देवांच्या ।
जी कोप गाधिजा दे मोद वसिष्ठा अशी वदे वाचा ॥ १ ॥
एक हरिश्चंद्र जगीं; दुसरा कोणी न पाहिलाच कधीं ।
दारिद्र्यदुःख कैचें ज्याच्या राज्यांत तृप्त याचकधी ॥ २ ॥
श्रवणीं पडतांचि असे तुकवी माथा वसिष्ठ मुनिराय ।
विश्वामित्र ह्मणे, त्या स्तविसी निज शिष्य तो ह्मणुनि काय ॥ ३॥
बोले मुनि कोण असा झाला मनुजेंद्र या महीवरता ।
* वाटे प्रभु अवतरला जो कां शयना करी अहीवरता ॥ ४ ॥
इतरीं काय असे गुण वर्णिति जन पुण्यकीर्तिला ज्याच्या ।
शोभन नित्य सुवासिनि जेथें करितात वृष्टि लाजांच्या ॥ ५ ॥
नाहीं सत्त्वाढ्य असा झाला कोणी विलोकिला मागें ।
विपरीत कां गमे तुज आहे देणार जो जसें मागे ॥ ६ ॥
हरविन सत्त्व तयाचें तरिच ह्मणा यासि गाधिचा तनय ।
हांसति देव सकळही ह्मणाति कसा जन्मला अजातनय ॥ ७ ॥
मुनिवर ह्मणे जरी तो ढळला सत्त्वासि भूप छात्रवर ।
ब्राह्मण्य त्यजिन हें मीं; गोत्रहि त्यजिल्यासि कासया प्रवर ॥ ८ ॥
विश्वामित्र ह्मणे, मी जातों येथूनि छळ करायासी ।
वाटे न भेटला कधिं कोणी मजसमहि छळकरायासी ॥ ९ ॥

---

१ आनंद. २ याचकांचीं मनें. ३ वसिष्ठमुनि. ४ पृथ्वीवर. ५ शेषावर ६ लाह्यांच्या. ७ ज्याच्या ठिकाणीं नय ह्मणजे नीति मुळींच जन्मलेली नाहीं असा. नीति ह्मणजे बरें कोणतें व वाईट कोणतें हें सांगणारी. ८ छात्र–शिष्य

* येथें 'प्रभु' हें उपमान आणि 'हरिश्चंद्र' हें उपमेय ह्यांचा अभेद वर्णिला आहे ह्मणून हा रूपकालंकार आहे.

D Ganpat N Naidoo

परि न करावें श्रुत हें सहसा कोणीच वृत्त हो त्यासी ।
साधेल कार्य तरि हें यज्ञांतीं फल जसेंचि होत्यांसी ॥ १० ॥
ऐसें वदोनि गेला जेथें तो मनुजेराय[2] वास करी ।
'घेइन हिरूनि आधीं राज्य,' ह्मणे, 'मग तसेंचि वास[3] करीं' ॥११॥
सोडी व्याघ्रांसि वनीं; देती पीडा जनांसि ते भारी ।
धांवे ससैन्य भूपति लक्ष न देऊनि राज्यकरभारीं ॥ १२ ॥
हरिणांमागें लागे नेती ते लोभवूनि रायासी ।
दिव्याश्रमासि पावे; वंदन मुनिच्या करीत पायांसी ॥ १३ ॥
वेदपठण खग करिती; वैर न मृगव्याघ्र–उरग[4]नकुळांसीं ।
पाहुनि आश्चर्य करी परि न कळे विघ्न हेंचि स्वकुळासी ॥ १४ ॥
विश्वामित्र ह्मणे, त्या करिसी कां श्वापदांचिया हनना[5] ।
स्नेहें पाळितसें मी अदय कसा पावलासि रे जनना[6] ॥ १५ ॥
होतें एक शिवालय निजला तेथें श्रमूनि तो राजा ।
होता[1] टपूनि गाधिज[7] बघणें लागे कधीं न होरा[8] ज्या ॥ १६ ॥
स्वप्नींच वदे जाउनि, दे राया! दउत लेखणी खलिन[9] ।
चित्तीं ह्मणे, न देतां राज्य सकळ भूखलींच[10] मी खलिन[11] ॥ १७ ॥
जागृत होतांचि पुन्हां गांठी जाऊनियां नृपाळास ।
देउनि राज्य ह्मणे, त्वां आणिला वनवास निज कपाळास ॥१८॥
दे आतांचि नरेन्द्रा! सोडीं संकल्प दक्षिणेसहित;
सार्धत्रयाचि पुरे दे भार[12] कनक जें नसेल तव महितें[13] ॥ १९ ॥

---

१ होता=यज्ञकर्ता. २ राजा हरिश्चंद्र. ३ घर. ४ उरग=सर्प, नकुळ=मुंगुस. ५ वध. ६ जन्माला. ७ विश्वामित्र ८ मुहूर्त ९ लगाम. १० भूरूपी खलांत. ११ खल करीन. १२ चार तोळे ह्मणजे एक पल, शंभर पलें ह्मणजे एक तुला, अशा वीस तुलांचा एक भार असे साडेतीन भार (२८ हजार तोळे सोनें) १३ राज्यांत.

उसनेंहि त्वां न द्यावें, राज्य सकल हें प्रजा असे माजी[1]; ।
निर्दोष यश असें घे कोणी लावी न शब्द[2] ज्यामाजी ॥ २० ॥
राजा ह्मणे, दयाळा ! देतों द्या राज्य हें सकळ आजी ।
परि दक्षिणा नसे यासाठीं दिन सप्त अवधि द्यावा जी ॥ २१ ॥
आनंदवना[3] जाउनि मग तुमची दक्षिणाहि फेडीन ।
जाती[4] भलतीहि असो मी अपणातें विकूनि घेईन ॥ २२ ॥
हे वास[5]-कटक-भूषण नेतां तूं लाजसी न कां राया ? ।
देणें नव्हतेंचि तरी करणें होतें अर्धीं नकारा यां[6] ॥ २३ ॥
शय[7] जोडूनि ह्मणे, हो ! या दासाची अशी स्पृहा[8] नाहीं ।
वदतों गोष्ट खरी मीं चित्तीं शोधूनि कां पहाना ही ॥ २४ ॥
वल्कल[9] वेष्टुनियां मग जाती सत्वर निघूनि ते रानीं; ।
विश्वामित्रालागीं जाणविलें सकळ वृत्त हेरांनीं[10] ॥ २५ ॥
भूप हरिश्चंद्र पुढें तारामति रोहिदास त्यांमागें ।
सांगे, मातेसि ह्मणे, त्यजिलें त्वां आजि कां स्वधामा[11] गे ॥ २६ ॥
माता ह्मणे, शिशो[12] ! हें ! दिधलें विप्रासि राज्य बापानें ।
होऊं संतृप्त अतां गंगास्नानें तसेंचि बा ! पानें[13] ॥ २७ ॥
जातां जातां विपिनीं[14] झाला मध्यान्हकाळ तापविता ।
करिता सूर्य दया तरि मुनिवर त्याचाहि कायें[15] कांपविता ॥ २८ ॥
सांगे सूर्यासि, तपे पावति जेणें सुदीर्घ तापा हे[16] ।
निजरक्षणाचि[17] असे प्रिय, इतरांचें दुःख कोणता पाहे ॥ २९ ॥
द्वादश नयन[18] उघडिले रविनें नाहीं विचार हा केला ।
'कीं जंतु[19] यांचें वंशीं अपुल्या; पावेल कोण हाकेला' ॥ ३० ॥
केली संतप्त धरा रविनें, वरुणें[20]हि नीर आटविलें ।

---

१ माझी. २ बोल, दोष. ३ काशीला. ४ जात. ५ वस्त्रें, अलंकार. ६ मला. ७ हस्त. ८ इच्छा, वासना. ९ झाडांच्या सालीचीं वस्त्रें. १० जासुदांनीं. ११ आपल्या गृहास. १२ हे ! बाळा ! १३ प्राशनानें. १४ अरण्यांत. १५ देह. १६ हे त्रिवर्ग, हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास. १७ हा अर्थांतरन्यास नामक अलंकार आहे. १८ बारा कला. १९ जन्म. २० वरुण, जलदेवता.

समिरें[1] स्तब्धचि राहुनि कंठीं तत्काळ प्राण दाटविले ॥ ३१ ॥
माते! गंगा कोठें आहे एथूनि दूर किति काशी ।
नाशिल पाप कधिं ते न कळे ही[2] ग्रासिते[3] कितीकांशीं ॥ ३२ ॥
ऊर्वीतळ[4] बहु तापे, तापें या जाहलें असुख, पावे ।
धांवे देव न कां गे? आला जरि समय तो असु[5] खपावे[6] ॥ ३३ ॥
माता बाळासि ह्मणे, बापा! लपवूं तरी तुला कोठें ।
मोठें संकट पडलें; प्रभुनें श्रवणांत[7] घातिलीं बोटें ॥ ३४ ॥
आरडले बहु रडले झाले विगलीत काय हो! याचें ।
तरि पावला न कां हरि? उरलें याहूनि काय होर्याचें[8] ॥ ३५
छाया शीतल तरुंची, पक्षी मधुर स्वरेंचि बोभाती[9] ।
आश्रम रमणीय दिसे, वर्णिल तेथील कोण शोभा ती ॥ ३६ ॥
शीतल उदक सुगंधिक द्याया रायासि विनित[10] ज्या रमणी[11] ।
देवांगनाचि केवळ; स्तविता सोडील कोण जारमणी[12] ॥ ३७ ॥
भूप न पाहे तिकडे कळलें त्यालागिं वर्म जें त्यांचें ।
पाहुनि युवती सुंदर धांवे मन काय वृत्तिजेत्यांचें[13] ॥ ३८ ॥
घेतां उदक प्रपेचें[14] सुकृतहानी असेचि रायास ।
ठावें; तरि कां सेविल झाला याहूनि जरि चिरायास[15] ॥ ३९ ॥
तारामति ये मागुनि; दावी मुनि तीस, 'भूप हा पाहें ।
करितो उदपानातें[16] याहुनि तव नेम कोणता आहे' ॥ ४० ॥
ती त्यास ह्मणे, देवा! भूपति प्राशील नीर[17] हें काय ।
यावरि असो कसें तें; सहसा स्पर्शों न देचि हें काय[18] ॥ ४१ ॥
आलें मागुनि बाळक[19] दाखवि त्यालाहि जनक जननी ती ।
सेविति नीर निशंकेंचि[20] ठावी त्याला न काय जननीति ॥ ४२ ॥

१ वारा. २ ही गंगा. ३ नाश करते. ४ पृथ्वी. ५ प्राण. ६ नाश पावावे. ७ कानांत. ८ व्हावयाचें. ९ किलकिलाट करीत होते. १० नम्र. ११ स्त्रिया. १२ जारश्रेष्ठ. १३ जितेंद्रिय असतात त्यांचें. (ज्यांनीं आपल्या मनोवृत्ति आपल्या ताब्यांत ठेविल्या आहेत त्यांचें) १४ पाणपोईचें. १५ चिर आयास बहुत कांळेपर्यंत श्रम. १६ उद, उदक, पाणी. १७ उदक. १८ शरीर. १९ रोहिदास. २० निःसंशय.

बाळ ह्मणे, हें सहसा न घडे मजलागिं ठाउकें वर्म ।
अनु[1]चित करितील कसें जाणति जे शास्त्र[2]गत सकल धर्म ॥ ४३ ॥
जाती तेथुनि विजनीं[3] एकामागूनि एक सत्वर ते ।
मुनि-मा[4]यिक-उपचारा दिधलें नाहींच लक्ष *सत्वरतें ॥ ४४ ॥
मार्गीं जातां जातां पडला अंधार दिवस मावळला ।
सुटला प्रभंजन तयीं मेघहि कल्पांत[5]काळसा वळला ॥ ४५ ॥
चुकली मार्ग तशांताचि तारामति शोक बहु करी रानीं ।
धुंडी पतिपुत्रातें होती निःसत्व[6] जरि शरीरानीं[7] ॥ ४६ ॥
भेट न होय ह्मणुनियां मारिति हाका परस्परें शतदा ।
वारावें विघ्नहि तें परि तो लपलाचि हो! परेश तदा ॥ ४७ ॥
या संकटांत मुनिनें पेटविला अग्नि काननांत अशा ।
कोण सु[8]धी जिवना[9]ची या समयीं धरिल हो! मनांत अशा[10] ॥४८॥
घाबरली फारचि ती न कळे कर्तव्य काय तें तिजला ।
नव्हतें श्रुतीं[11]हि असें कधिं 'दीनाच्या रक्षणीं हरी निजला' ॥४९॥
पोळे कृशानु[12] शरिरीं, झाले व्याकूळ प्राण फार तिचे ।
तन्वी[13] कोमल अंगीं, रूपहि लावण्य कायसें[14] रतिचें ॥ ५० ॥
आलें मरण बरें हें परि मीं मुकलें सपुत्र कांतासी ।
हारविलें ब्रीद जयें तो हरि पावे कसा अकांतासी ॥ ५१ ॥
विझवुनि पावक मुनि तो दावी, 'पतिपुत्र हे तुझे काय ।
मेले जळुनि अतां गे! कैसें राहील हें तुझें काय' ॥ ५२ ॥
आक्रोश करी बहुतचि, 'ऐसा अन्याय काय तरि देवा ।
केला तुझा! कळेना चुकलें मी सांग कोणती सेवा' ॥ ५३ ॥
व्याघ्रें तशांत नेलीं उचलुनि प्रेतें तिच्या समक्ष वनीं ।

१ अयोग्य. २ शास्त्रांत वर्णिलेला. ३ अरण्यांत. ४ कपटाच्या. ५ प्रळयकाळ. ६ अशक्त. ७ शरीरानें. * सत्य–रत, सत्याचें ठिकाणीं ज्याची पूर्ण निष्ठा आहे असा–सत्यशील. ८ विद्वान्, पंडित. ९ जगण्याची. १० आशा. ११ ऐकिलें. १२ अग्नि. १३ सुकुमार स्त्री. १४ कितीसें.

नकळे विलापरव तो वर्णावा या स्थळीं कसा कवनीं ॥ ५४ ॥
सूर्योदय झाल्यावरि भेटाति एकासि एक मोदानें ।
पडले व्यसनीं[2] होते, नसतां देत अनेक गो-दानें ॥ ५५ ॥
आनंदवना[3] तेथुनि गेले मार्ग क्रमूनि बहु तापें[4] ।
निरखिति भागीरथिला स्पर्शें हरणार जी महा पापें ॥ ५६ ॥
झाले शीतळ तीच्या स्नानें आधीं तसेचि मग पानें ।
तों गाधिजमुनि गांठी, राया फिरलों तुझ्या प्रतापानें[6] ॥ ५७ ॥
दे दक्षिणा अतां तरि जातों येथूनि आपल्या गांवा ।
मजवरि केलासि बरा त्वां तरि उपकार काय सांगावा ॥ ५८ ॥
भूप ह्मणे, मज देणें आहे देईन दक्षिणा आजी ।
दारसुतासह लाविन, स्वामी हा देह आपुल्या कार्जी ॥ ५९ ॥
ऐसें वदोनि भूपें उचलुनि तृण घेतलें शिरावरते ।
रडती पुरवासी जन झालें बहु दुःख त्यां अनावर तें ॥ ६० ॥
भूप ह्मणे, मज कोणी घेइल द्यावें सुवर्ण द्वयभार ।
भारेक मोल सतिचें, पुत्राचें अर्ध हें नसे फार ॥ ६१ ॥
आल्या प्रथमचि कुंटिणि मागति तारामतीस द्या मोलें ।
तेव्हां कर जोडुनियां विश्वामित्रास ती सती बोले ॥ ६२ ॥
स्वामी ! अन्य गृहीं द्या, वेश्यासदनीं मला न वोपावें ।
मागतसें दान तुह्मां अन्वय जाणूनियां न कोपावें ॥ ६३ ॥
इतुक्यांत कालकौशिक-विप्रें देऊनि भार कनकास ।
नेलें तारामतिला, धर्माची धरिति जन सुजन कास ॥ ६४ ॥
विप्रासि ह्मणे राज्ञी, देउनियां अर्ध भार हेमातें ।
घ्यावें बाळालागीं, द्यावें इतुकेंचि दान हें मातें ॥ ६५ ॥
देउनि सुवर्ण तितुकें विप्रें बाळासि घेतलें मोलें ।

---

१ आनंदानें. २ संकटांत. ३ काशीला. ४ कष्टानें. ५ प्राशनानें. ६ या वाक्यांत बाहेरून स्तुति दिसते परंतु वस्तुतः निंदा आहे ह्मणून हा व्याजस्तुति नामक अलंकार आहे. ७ याचें ८ संबंध. ९ सोनें.

झालें बरें विहित हें, ह्मणउनियां भूप अंतरीं डोले ॥ ६६ ॥
भारद्वय कनक तयीं दिधलें आणूनि वीरबाहूनें।
वाटे सर्वांसि अस गिळिलें चंद्रासि आजि राहूनें ॥ ६७ ॥
देउनि सुवर्ण मुनितें गेला डोंबासवेंचि हो राजा।
प्रस्थानीं बहु सांगत होते शोधूनि विप्र होरा* ज्या ॥ ६८ ॥
मग तो भूपति जाउनि पाहे डोंबाचिया अगारा[3] हो।
कंटाळे मन त्याचें त्यासि ह्मणे, कृत्य हें अगा राहो ॥ ६९ ॥
होता अजिंक्य भूपति जरि तो संपूर्ण लोकपाळांस[4]।
परि करितो काय कसें विधिनें अणिल्या असें कपाळास ॥ ७० ॥
अणिला दास कसा हा? दिसतो सकुमार फार नाजुकसा।
पाक करावा कोणी? हा तरि ह्मणणार, हात भाजुं कसा ॥७१॥
ठेवा सदनीं यातें पूजुनि नैवेद्य दाखवायासी।
या भोगमूर्तिला मी काय करूं? मार्ग दाखवा यासी ॥ ७२ ॥
ऐसें निष्ठुर वदली जेव्हां ती वीरबाहुची कांता।
चिंतावला बहू नृप, 'धांव' ह्मणे, संकटीं रमाकांता ॥ ७३ ॥
वाटे देतिल मजला माघारें त्या मुनीस नेऊन।
काय करावें मग हो जरि तें याहून मोल येऊन ॥ ७४ ॥
मृण्मय घट त्या दिधला भागीरथिचें अणावया पाणी।
फोडी गुप्तपणानें गाधिजमुनि तो हणूनि निज पाणी ॥ ७५ ॥
दिधला घट मग दुसरा, तिसरा, चवथा, असे किती पाडी।
फोडी, यास्तव रागे ती कांता निजकरें तया ताडी ॥ ७६ ॥
दाखविला जो रांझण उदक भरायासि अंगणामाजीं।
केलें छिद्र तयासहि, झाली आतां ह्मणे सिमा माजी ॥ ७७ ॥
इतक्यांत वीरबाहू आला जेवावयासि निज सदनीं।
नीर नसे यासाठीं त्यानें भूपासि ताडिलें वदनीं ॥ ७८ ॥

---

१ योग्य. २ नामविशेष डोंब. ३ घर. ४ राजास. * मुहूर्त.

होता क्षुधार्त भूपति, त्यावरि बहु ताडिलोंचि हो डोंबें ।
व्याकुळ फारचि झाला, तें त्याच्या दुःख अंतरा झोंबे ॥ ७९ ॥
भूप ह्मणे, अनुकंपा करुनि मला शुष्क अन्न वोपावें ।
फावेल वेळ तेव्हां सेविन गंगातटीं, न कोपावें ॥ ८० ॥
गृहकृत्य नये करितां ह्मणउनियां ठेविलें स्मशानांत ।
रक्षी रात्रंदिन तें दैवें केली सिमा पहानात ॥ ८१ ॥
देती धान्य तया जें त्याचें तो दळुनि पानगे भाजी ।
मीठ न देती वर जे देतिल त्यालागिं काय ते भाजी ॥ ८२ ॥
काढुनि भाग अतिथिचा अर्ध दुजा आपणासि जरि ठेवी ।
तरि तो ब्राह्मणवेशें गाधिज संपूर्ण प्रत्यहीं सेवी ॥ ८३ ॥
ऐसें नित्य उपोषण घडतांही वर्ष लोटलें राया ।
खाया न मिळे यास्तव झाली त्याची बहूत कृश काया ॥ ८४ ॥
वदती चांडाळ असें, द्यावें याहूनि काय खायासी ।
त्यासि ह्मणावें आतां आहे अन्नचेंचि कोंय, खा यासी ॥ ८५ ॥
इकडे तारामतिला नेलें त्या कालकौशिकें सदनीं ।
करवी गृहकृत्यातें बोले बोलों नये तसें वदनीं ॥ ८६ ॥
एके दिनीं द्विजवरें समिधापुष्पें अणावयासाठीं ।
पाठविलें निज शिष्यां, बाळहि लागूनि जाय त्यांपाठीं ॥ ८७ ॥
माता बाळासि ह्मणे, बापा जाऊं नकोचि बाहेर ।
माता तात सुहज्जन तुजविण आतां नसेचि बा ! हेरें ॥ ८८ ॥
बाळ वदे मातेला, येतों यांच्यासवें पुन्हां गेहा ।
गे ! हां ह्मण, मी जातों मुनिच्या कार्या; नकार कां गे हा ॥८९॥
ऐसें वदोनि बाळक गेला शिष्यांसवेंचि तो रानीं ।
हुडाकिति समिधादि किती केलीं स्नानें कितीक पोरांनीं ॥ ९० ॥
बाळ ह्मणे, बहु केला वेळ, घरीं मारितील हाकेला ।

---

१ दया. २ खाई. ३ दररोज. ४ शरीर. ५ पहा.

धाकेलासि अतां जरि मार्गी तरि त्वां उशीर कां केला ॥ ९१ ॥
जाईं सत्वर आतां कमलें आणावयासि या सरसीं[1] ।
घेतों समिधा पुष्पें पर्णें मिळतील जीं हुतासरसीं ॥ ९२ ॥
बाळक जाउनि आणी कमलें जरि दाविल्याचि कांसारीं ।
तरि ते ह्मणती, थोडीं, आणिलीं तोडूनि तीन कां सारीं ॥ ९३ ॥
जाय पुन्हां बाळक तो कमलें तोडावयासि जंव सरसीं ।
केला दंश भुजंगें चरणीं पुच्छाग्र तुडविल्यासरसीं ॥ ९४ ॥
दुर्धर विष सर्पाचें, गेल तत्काल प्राण बाळाचे ।
गाधिज निर्दय मोठा धरिलें प्रत्यक्ष रूप काळाचें ॥ ९५ ॥
मग ते अवघेचि मिळुनि कथिती येऊनि वृत्त मातेसी ।
बाळ निमाला[2] विपिनीं जाउनि रजनींत काय करितेसी ॥ ९६ ॥
परि ती शोकाकुल बहु जाय तशी त्या शवासि[3] शोधाया ।
हिंडे आक्रोश करी विपिनीं[4] तरि तीस कोण बोधाया[5] ॥ ९७ ॥
* ध्वांतीं हिंडे अरडे रडे पडे अडखळोनि रानांत ।
प्रत्यय असतांहि तिच्या कृत्य मुनीचें नयेचि ध्यानांत ॥ ९८ ॥
इतुक्यांत विप्रवेशें भेटे गाधिज तिला निशाकाळीं[6] ।
सांगे दहन करी या जोंवरि आहेचि प्राक्दिशा[7] काळी ॥ ९९ ॥
सूर्योदय झाल्यावरि डोंबहि घेतील द्रव्य जाळाया ।
यास्तव करुणा आली कथिली तुज युक्ति विघ्न टाळाया ॥१००॥
गाधिज प्रेतासह तिज घेउनि आलाचि त्या स्मशानांत ।
घाली बाळ चितेवरि दहन कराया त्वरें कृशानांत[8] ॥ १०१ ॥
दीप्तानल[9] पाहुनियां भूप हरिश्चंद्र धांवला वेगें ।
देउनि द्रव्य कुणपं[10] मग जाळिति तुजला कसें न ठावें गे ॥१०२॥
विध्वंसिलें सरण तें फेंकी करचरण तेहि लातेनें ।

१ सरोवरांत. २ मेला. ३ प्रेतास. ४ अरण्यांत. ५ सांत्वन करण्यास. ६ रात्रीं. ७ पूर्व दिशा. ८ अग्नींत. ९ पेटलला अग्नि. १० प्रेत. * अंधारांत.

वर्णवतो काय बरें केला जो शोक बाळमातेनें ॥ १०३ ॥
हा दैवा! ऐसी ही व्हावी गति काय आज बाळाची ।
साकेताधिप[1] कीं हो! होता चर्या कळे न काळाची ॥ १०४ ॥
वळला पर्जन्य ह्मणुनि पुनरपि गाधीज पातला वेगें ।
कां गे श्रमसी व्यर्थचि नेतों तुज देउळीं चलावें गे ॥ १०५ ॥
आंतडिं घालूनि गळां नेलें तिजला शिवालयामाजीं ।
सांगे जनांसि हें कीं ग्रासित होतीच लावें[2] तनु माजी[3] ॥ १०६ ॥
आलों धावुनि येथें दाखवितों मी पहा चला वेगें ।
कोणी तिलाच ह्मणती गिळिलीं पोरें तुवांच लावे गे ॥ १०७ ॥
वदती कितिक असेंही ही होती कालकौशिकासदनीं ।
कळलें नाहीं कवणा बाळें बहु घातलीं जरी वदनीं ॥ १०८ ॥
सूर्योदय झाल्यावरि कळविति जाऊनि राजदरबारीं ।
आली लाव तिनें बहु केले अनपत्य[4] लोक घरबारी ॥ १०९ ॥
झाली आज्ञा तेथुनि शिर उडवावें अतांचि हो तीचें ।
परि तें एका घायीं, कारण ठेवूं नयेचि दों तीचें[5] ॥ ११० ॥
धांवति दूत त्वरेनें कथिती येऊनि वीरबाहूतें ।
ह्मणती जाउनियां किति सत्वर करितोसि कार्य पाहूं तें ॥१११॥
येउनि शिवालयीं त्या पाहे तों लाव बैसली होती ।
दाखवि सर्व जनांतें ह्मणती पूर्वींच पाहिली हो ती ॥ ११२ ॥
तत्काळचि डोंबानें भूप हरिश्चंद्र बाहिला निकट ।
सांगे मस्तक छेदीं एका घायीं नसेंचि हें बिकट ॥ ११३ ॥
घेऊनि असिलता[6] करिं आला सत्वर समीप तो सतिच्या ।
सांगे स्नान कराया अठवाया मुख्य देवतास तिच्या ॥ ११४ ॥
आली स्नान करुनियां प्रार्थी देवासि, याचि नेमातें ।

---

१ अयोध्येचा राजा. २ डाकीण ३ माझी.४ अपत्य–रहीत.५ दोन तीन दिवसांचे.
६ तलवार.

चालवि, प्रतिजन्मि हो पती हरिश्चंद्र, हेंचि दे मातें ॥ ११५ ॥
सुतहि असावा देवा जैसा आहेचि रोहिताश्व मला ।
विप्रहि गाधिजसा हो याचक जो आमुच्यामुळें श्रमला ॥ ११६ ॥
ऐकुनि वाक्य असें तो भूप हरिश्चंद्र फार गहिंवरला ।
परि करितो काय कसें परवशतेच्या मुळेंचि आवरला ॥ ११७ ॥
माराया हात करी धरिला प्रभुनें तसाचि तो वरते ।
हरिस्मरणीं मन जोंवरि नाहीं होताति कष्ट तोंवर ते ॥ ११८ ॥
विश्वामित्रें प्रगटुनि भूप हरिश्चंद्र पोटिशीं धरिला ।
बापा नसेचि दुसरा कोणी भुवनत्रयीं तुझ्या सरिला ॥ ११९ ॥
दिधलें तप तें तुजला आचरलों जें बहूत कष्टानें ।
षष्ठिसहस्राब्दवरी केला निर्वाह लोहपिष्टानें ॥ १२० ॥
सावध करूनि बालक दासपणांतूनि मुक्त नृप केला ।
आशीर्धन[1] देउनिया राजातें गाधिचा तनय गेला ॥ १२१ ॥
पुनरपि साकेतापुरिं येउनि सिंहासनीं बसे राजा !
शोभनकाळीं युवती उजळिति दीपांसी उधळिती लांजा[2] ॥१२२॥
षष्ठिसहस्राब्दवरी राज्यहि केलेंच मग यथानिगुती ।
* नेली स्वर्गासि पुरी पुनरपि होईल काय थांनिं[3] गुंती[4] ॥ १२३॥
गिरावासीकृत आर्या झाल्या हो एक शतहि तेवीस ।
गातां श्रवणहि करितां करितिल भवपार जरिहि ते वीस ॥१२४॥

---

१ आशीर्वाद हेंच धन. २ लाह्या. ३ स्तनीं. ४ गुंतणें. जन्ममरणाची फेरी

* राजानें सर्व नगरी स्वर्गाला नेली. अशाला पुनरपी थानीं गुती होईल काय म्हणजे अशाला पुनः स्तनपान करावें लागेल काय (जन्माला यावें लागेल काय), अर्थात् नाहीं, असा भावार्थ.

याच आख्यानाचीं पदें.

(मुनींच्या सभेंत विश्वामित्र ह्मणतो)

घनाक्षरी.

गाधिज मुनि कहत जात । ऐसी कौन बडी बात । करूं राज्य सबहि हात । कहो दांत गिरावुं ॥ १ ॥ हरिश्चंद्र नहीं माल । करूं अबहि बुरे हाल । मै हुं कालनका काल । लावुं बाल पकडके ॥ २ ॥

दिंडी.

गाधिज बोले ऐकाल वृत्त कानीं । राज्य हरुनी केलीच सत्त्वहानि । हरिश्चंद्राची काय कथा जाणा । प्रती-सृष्टी[1] करणार मनीं आणा ॥ १ ॥ * जरी नामोन्वय[2] असे तुह्मां ठावा । मनीं तुमच्या संदेह कां उठावा । नवल गमलें मजलागिं हेंचि आजी । कसा करिना तो पहा मला जी जी ॥ २ ॥

(राजा मृगया करीत विश्वामित्राचेआश्रमांत येतो.)

कटिबंध.

(आश्रमाचें वर्णन.)

पाहे दिव्याश्रमासि[3] राजा । सांगे निज सैन्यासि फिरा जा। जागा पाहुनि, जा उतरा जा । येतों तोंवरि पाक करा जा । ऐसें बोलुनि उपवनिं गेला । केला बहु संचार[4], निवाला[5] । पाहुनि शी-

---

१ विश्वामित्रानें ब्रह्मदेवाप्रमाणें सृष्टि निर्माण केली होती. २ विश्वं मित्रं यस्य- विश्वामित्रः ३ सुंदर अशा आश्रमास. ४ परिभ्रमण. ५ शांत झाला.

*विश्व + आमित्र, विश्वाचा शत्रु, असा सरळ अर्थ होतो, पण 'मित्रेचर्षौ' या पाणिनीय सूत्रामुळें विश्व + मित्र असा समास सोडवावा लागतो. ऋषिवाचक शब्दांत मित्र शब्द पुढें आला तर मागील शब्द दीर्घ होते असा त्याचा अर्थ आहे. पाणिनीनेंही जणूं काय विश्वामित्राच्या भीतीनेंच हें सूत्र केलें आहे.

तळ तरु छायेला होते बहु घनदाट लागले । आम्र फणस दाळिंब आवळे । नारिकेळ पोफळी जांबळें । फळभारानें दिसती लवले । बकुल मालती चंपक फुलले । अन्य तरू पुष्पानें भरले । सुगंध ज्यांचे दूर फांकले । असती वृक्षीं पक्षि बैसले । पाहे शिखि[1] [2] बक[3] हंस कोकिला । शुक-पारावत-समुह[4] देखिला । गाती सुस्वर हरिगुणमाला[5] । करिती पठण किती निगमाला[6] । अंतरिं ध्याती श्याम–तमाला[7] । राजा मनिं बहु चमत्कारला[8] । ह्मणे किती सुकृत[9] हो यांचें । जें नरदेहांत न होयाचें । कर्म काय हें याचि द्विजांचें[10] । वाचे वदती नाम हरीचें । साचें जन्म दिसे हो यांचें । सवेंचि पाहे सर[11] तोयांचें[12] । मध्यें शोभे वन निरजांचें[13] । सर्प नकुळें[14] ते एक्या ठायीं । वसती व्याघ्राजवळिच गायी । परस्परांशीं वैरचि नाहीं । कांहिं वेळ तो असाचि फिरला । तेथुनि मुनि-आश्रमांत शिरला । भावें वंदन करुनि तयाला । बद्धांजलि तो उभा राहिला । बहु सुंदर आश्रम ऐसा । मुनिवर्यें निर्मित केला॥२॥

(स्वप्नांत राज्य दिल्यानंतर जागें झाल्यावर दक्षिणा मागितली तेव्हां राजा देऊं लागला. त्यावर विश्वामित्र ह्मणतो.):—

पद–(गव्यांनों कृष्ण गडी अपुला.)

गाधिज बोले रायासी । माझें मजला कां देसी॥धृ०॥ दिधलें राज्य तुवां सारें । [15]वोपिलें हरिसि तुं जैसा रे । किमपी पापास न भीसी ॥ १ ॥ जाहलें राज्य अतां माझें । घेणें द्रव्य कसें साजे । कांहिं तरि मनिं आपुल्या लाजे । युक्त[16]चि कर अपुल्याला जें । देउनि पुन्हां कसा घेसी ॥ २ ॥ घेशिल करुनि प्रजा राजी । ती तरि धन दौलत माझी । लाविशिल जरि तूं या कांजीं[17] । घडेलचि

१ केकी. २ मयूर. ३ बगळे. ४ राघू व पारवे यांचे समुदाय. ५ हरीचे गुणानुवाद. ६ वेदाला. ७ श्याम आहे तमाल वृक्षाप्रमाणें जो म्हणजे श्रीहरी. ८ त्याला चमत्कार वाटला. ९ पुण्य. १० पक्ष्यांचें ११ सरोवर. १२ पाण्याचें. १३ कमलांचे. १४ मुंगुस. १५ दान केलेलें परत घेतोस. १६ योग्य. १७ कामीं.

पाप तुला आजीं । असा कां नय[1] विलया[2] नेसी ॥ ३ ॥ ऐकिली कीर्ति तुझी राया । परि तूं योग्यचि ठकवाया । दक्षिणा जरि नव्हती द्याया । सोडिलें कां जळ तरि वांया । वाटतें कोप करुनि घेसी ॥ ४ ॥ बोले भूप गाधिजाला । स्वामी उशिर तुह्मां झाला । तरि मी देइन द्रव्याला । तोंवरि द्या अवधी मजला । अहे प्रभु समर्थ गिरिवासी ॥ ५ ॥

(काशीला जावयास तिघे निघाले तेव्हां बाळ मातेस ह्मणतो)

जलद्–घनाक्षरी.

मातें कां गे ऐसी दीन । दिसे झाला बहू क्षीण । गमसि केवळ पराधीन । झालें काय तरि, कळुं दे लवकरि, झालिस कोण्या गुणें हीन ॥ १ ॥ होतें शरिर तुझें पीनं[3] । दिससी पाण्याविणें मीनं[4] । त्यजिलीं वस्त्रें कां गे, कोण काय मागे, सांगें पडलें काय कठीण ॥ २ ॥ बापा बापें तुझ्या आज । दिलें विप्रालागीं राज । सरलें अतां येथिल काजं[5] । जाउं वाराणसी[6] । पाहुं विश्वेशासी[7], राखिल तोची बापा लाज ॥ ३ ॥ त्यांनीं त्यजिला शिरतार्ज[8] । मी तरि त्यांची किं रे भार्ज[9] । जैसा प्राक्तन[10]योग, भोगुं तैसे भोग, पाहुं गंगा–तिरं[11]–समाज ॥ ४ ॥

(तिघांनां त्रास देण्याकरितां विश्वामित्राची योजना.)

दिंडी.

सांगे सूर्यासी तीव्र[12] तपे आतां । कर[13]स्पर्शें हो यांसि दुःखदाता । जरी करिसिल अनमान यांत कांहीं । तरि मजपासीं क्षमा दया नाहीं ॥ १ ॥ ह्मणे वरुणासी[14] नीर आटवावें करी वापी

---

१ नीति. २ शेवटास–नाशास नेतोस ह्मणजे सोडून देतोस. ३ पुष्ट. ४ मासा. ५ काम, कार्य. ६ श्रीक्षेत्र काशी. ७ श्रीकाशीविश्वेश्वर. ८ डोक्यावरील मुकुट. ९ भार्या. १० प्रारब्ध. ११ श्रीगंगेच्या तीरावरील जनसमुदाय. १२ कडक. १३ किरणांच्या स्पर्शानें. १४ जलदेवता वरुण ह्यास.

कूप धान्य सांठवावे । ह्मणे समिरा[2] मनिं हेंचि आठवावें । प्राण त्यांचे कंठींच दाटवावे[3] ॥ २ ॥

(तृषार्त होऊन बाळ मातेस ह्मणतो)

अंजनीगीत.

बोले मातेलागीं बाळ । जवळी आला अंतकाळ । केव्हां करील तो सांभाळ । विश्वेशॅ[4] तूझा ॥ १ ॥ कंठ शुष्क झाला जाण । जाउं पाहती माझे प्राण । केव्हां होइल जळपानें[5] । गंगेचें तूझ्या ॥ २ ॥ कां गे झालीस तूं भ्रांत । होइल अतांचि देहांत । कैचा पावतो तो कांत । गिरिजेचा[6] आह्मां ॥ ३ ॥ मजला येइना भरंवसा । धरिला निश्चय तरि त्वां कसा । शब्द फुटेनाची सहसा । व्याकुळ मी झालों ॥ ४ ॥ कैची गंगा कैचा शिव । वाटे जातो माझा जीव । कैची त्याला अमुची कींव । भ्रम झाला तुजसी ॥५॥

पद (माता बाळास ह्मणते)

जोगी.

बाळा काय करूं आतां । न सुचे यत्न मला ॥ ध्रु० ॥ न दिसे लपावयासी थाँर[7] । तपतो सूर्य किती अनिवार । जाहले कष्ट जिवाला फार । नसे आधार समिराचा[8] ॥ १ ॥ प्रार्थिलें देवासी म्यां जाण । रक्षीं आतां अमुचे प्राण । जाहलों दीन बहू निर्त्राण[9] तरि पाषाण काय द्रवे[10] ॥ २ ॥ नाहीं भूवरि कोठें नीर[11] । त्वां तरि किती धरावा धीर । जाहलें फाराचि मी अधीर । होइल थीर मन कैसें ॥ ३ ॥ होता गिरिवासी प्रभुराय । ह्मणउनि स्मरले त्याचे पाय । गेला कोठें झालें काय । होइल अपायें[12] दूर कसा ॥ ४ ॥

---

१ विहीरी व आड इतके कोरडे करावे कीं त्यांत धान्य सांठवितां येईल. २ वायूला. ३ अडवावे, कोंडावे. ४ श्रीविश्वेश्वर. ५ पाणी पिणें. ६ गिरिजेचा ह्मणजे पार्वतीचा कांत ह्मणजे पति महादेव. ७ ठिकाण. ८ वायूचा. ९ रक्षणकर्त्याविरहित. १० कींव येईल. ११ पाणी. १२ संकट.

(विश्वामित्राची आणखी योजना)

दिंडी.

सूर्यकिरणें संतप्त धरा केली । सकल उदकें वरुणेंहि आटवीलीं । कंठिं उरले जंव प्राण त्या तिघांचे । प्रपा[1] निर्मी मुनि मूळ जें अघांचें[2] ॥ १ ॥ छाया शीतल बहु रम्य स्थान केलें । उदक निर्मळ अति स्वच्छ तें हि ठेलें[3] । युवति सुंदर प्रार्थिती पांथिकांला[4] । उदक सेवुनि येथेंचि वेळ घाला ॥ २ ॥

घनाक्षरी.

जात आगू नरराजे[5] । पाछे आवत है भाज[6] । ताके पीछे सुतराज[7] । करे खोज[8] * उगरका ॥ १ ॥ बडी छाव मजेदार । झारि हातमें थंडगार । लिये ठाड[9] भई नार । सकुमार बदन[10] है ॥ २ ॥ कहत लीजो महाराज । ठांडे[11] तुमहीके काज । बडे भाग[12] आये आज । हो सरताज[13] हमारे ॥ ३ ॥ बहोत सुंदर वहै[14] रूप । नही लंछ[15] दियो भूप । जात आगे गुप चूप । धरे डूप बहोतसी ॥ ४ ॥ आई पीछूसे भाज । देखे बैठे पतिराज । पियो तुमही जल आज । ईमें[16] लाज कौनसी ॥ ५ ॥ आया तबही रोहिदास । बैठी जननी जनकपास । न करे दोनोंकी आस । धरे कासें[17] धरमकी[18] ॥ ६ ॥

(तारामतीला मायेनें हरिश्चंद्र दाखवून मुनि बोलतो)

पद—जोगी.

बाई निग्रह कां धरिसी । सांगतों ऐक आतां ॥ धृ ॥ अवघें जपतप पूजा ध्यान । कोणतें पतिव्रतेला आन । काय तो

---

१ पाणपोई. २ पातकांचें. ३ ठेवलेलें. ४ वाटसरूंना, रस्त्यानें जाणाऱ्यांना. ५ राजा हरिश्चंद्र. ६ भार्या तारामती. ७ पुत्र रोहीदास. ८ शोध. ९ उभी. १० देह. ११ उभी राहिली. १२ नशीब. १३ मुकुट. १४ तें. १५ कवडी. १६ यांत. १७ कमर. १८ धर्माची. * उदकाचा. १९ आग्रह. हट.

पतिच कीं प्राधान्य । मग अनुमान कां करिसी ॥ १ ॥ बैसला पती तुझा हा जाण । जाणुनि होसी कां अजाण । जाहले व्याकुळ दिसती प्राण । वचन प्रमाण हें मानी ॥ २ ॥ सेवितो उदक शीत पाहीं । जाहला शांत दिसे कांहीं । पतीहुन अन्य धर्म नाहीं । देति गांही[2] निगमांदी[3] ॥ ३ ॥ सोडी आग्रह हा आतां । श्रमसी फार पुढें जातां । नाहीं स्थळ ऐसें पाहतां । आलें हाता आजि तुझ्या ॥ ४ ॥ म्हणे ती घडेल ऐसें काय । वेढा झाला तो पतिराय । वंदिते गिरिवासी प्रभुराय । न घडो अपाय हा ऐसा ॥ ५ ॥

पद-(विश्वामित्र नंतर रोहिदासास म्हणतो.)

(गळ्यांनो कृष्ण गडी)

गाधिज म्हणे बाळकासी । भेटे जननी--जनकासी ॥ धृ ॥ जाहले कष्ट तुला भारी । माझें वचन तुं अवधारीं । सेवुनि शीतल हें वारी । रविचा तापहि नीवारी । छाया शीतळ पहा कैसी ॥ १ ॥ सेविती वीर उभयतांही । घेती बिश्रांती पाहीं । आमुचें वचन ऐक तूंही । बैसे क्षणभर या ठायीं । कां तूं डावलूंनी जासी ॥ २ ॥ बोले बाळ मुनीराया । करितों वंदन मी पायां । नका करुं आग्रह तुह्मी वाया । होतो उशीर मज जाया । शिवेना मी या सलिलासी[6] ॥ ३ ॥ सेवितिल नीर कसे तेही । रक्षिती धर्मशास्त्र गेहीं । वाटतें नसतिल आजि देहीं म्हणउनि घडलें त्यांस हेंही । राखो लाज गिरीवासी ॥ ४ ॥

(पति व पुत्र यांचा वियोग झाला तेव्हां तारामतीची स्थिति).

लावणी.

पतिसुतविरहें तारामातिला दुःख जाहलें किती । तयाची करिल कोण हो मिंती ॥ धृ ॥ किंचित येथें कथितों आतां सुचलें

---

१ वरिष्ठ, श्रेष्ठ. २ साक्ष. ३ वेदादिक. ४ ऐक. ५ टाकून, सोडून. ६ उदकास. ७ घरीं. ८ देहावर नसतील म्हणजे शुद्धीवर नसतील असें वाटतें. ९ संख्या, गणना.

जें या मती । कष्टली सती * चतुर्याम ती । अशा वनामधिं शिरली जेथें व्याघ्रचि किंकाळती । भावी सती अंतकाळ ती । निबिड नभांतचि फिरे अंतरीं घाबरली फार ती । विघ्नें कशीं ह्मणे वारती । नयनीं वाहे नीर जाहली शोकाकुळ तरि किती ॥ १ ॥ तशांत लावी अग्नि काननीं गाधिज मुनि येउनी । मरती पशु पक्षी अहाळुनी । मार्ग फुटेना तिला वाटलें तृणहि बहु त्या वनीं । नयनीं धूम्र भरे येउनी । झाडि दिसे घनदाट दाटली निघतां नये जेथुनी । पळावें कसें तिणें तेथुनी । राशि खगांच्या पडति जसें कां होमद्रव्य होमिती ॥ २ ॥ कांतारीं बहु श्रमली फिरतां दीन जाहली सती । सुचेना युक्ति काय तीस ती । मरण बरें हें ह्मणे परंतू अंतरले सुतपती । कळेना काय तयांची गति । नाशीं फिटलें द्रव्य द्विजाचें हाचि घोर संप्रती । येइना दया कशी त्यापती । गिरिवासी प्रभुलागिं गाइलें अजवरि म्यां हो किती॥ ३॥

पद्-(तारामती शोक करिते)

(मजला हें कळलें हें कळलें । ब्रह्म जगीं या भरलें)

देवा धांव अतां रे धांव अतां । लवकरि करिं दुर चिंता ॥ ध्रु० ॥ अग्नि पेटला भारी । तुजविण कोण अतां मज तारी ॥ वरचेवर हे घाले । येती बहुतचि मी दिन झालें ॥ २ ॥ मरण बरें मज आलें । परि ते पतिसुत मज अंतरले ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु तूं कीं । गाजलि कीर्ति तुझी तिहिं लोकीं ॥ ४ ॥

पद (व्याघ्रानें पति व पुत्र यांना नेलेलें पाहून तारामती शोक करिते)

(उद्धवा शांतवन करजा.)

हा धर्मा हा निज कर्मा, कसे पति सुत विलया नेले ॥ध्रु०॥ दैवाची गति तरि कैसी, मी चिंता करितचि होतें । वाटलें मनीं

---

१ बुद्धीस (कवीच्या) २ दाट. ३ निवारण होतील. ४ होरपळून. ५ धूर. ६ समूह. ७ पक्ष्यांच्या. ८ होमांत टाकण्याचे पदार्थ. ९ आहुति देतात. १० वनांत. ११ सांप्रत, हल्लीं. *चार प्रहर. १२ संकटें. १३ तिन्ही लोकांत. स्वर्ग, मृत्यु, पाताळ.

मज ऐसें, सूर्योदयीं येतिल हो ते । पहा कर्म कसें तें माझें, तीं नयनीं दिसलीं प्रेतें ॥ चाल ॥ अजि जळुनि कसे ते मेले । मज सोडुनि स्वर्गा गेले । असें काय पाप म्यां केलें ॥ पू०चाल ॥ नेलेचि तेहि वोढुनियां व्याघ्रानें, पाहातचि ठेलें ॥ १ ॥ म्यां काय करावें आतां, हें दुःख कसें सोसवतें । अरडती व्याघ्र विपिनीं या, पहा फिरती हो मजभंवतें । ग्रासिनात कां हे मजला, जरि संनिध जाउनि बसतें ॥ चाल ॥ हें काय जिणें तरि आतां । लागली मला बहु चिंता । नाहिं उरला कोणी त्राता ॥ पू०चाल ॥ आतांचि प्राण मी देतें, हरिनें हें अनुचित केलें ॥२॥ अशि विलाप करितचि कांता, विपिनीं जों हिंडत आहे । ऐकिला शब्द कोणाचा, ह्मणउनि ती मागें पाहे । देखिले पती–पुत्रातें, तो अनंद हृदयीं न माये । ह्मणे देव दयाळू मोठा । भक्तांचा त्याला तोटा । बाइ भावचि अपुला खोटा ॥ पू०चाल ॥ गोटाचि मानिला कीं हो गिरिवासी, नाहीं भ्यालें ॥ ३ ॥

(तिघांची भेट झाली त्या वेळेचें वर्णन.)

लावणी.

पति सुत करिती शोक सतीचा वर्णावा तो किती । वदनीं नाम तिचें घोकिती ॥ धृ० ॥ अग्नि जाहला शांत, काननीं जो होता पेटला । पित्यासी पुत्रहि मग भेटला । तारामतिचा वियोग दुःसह, उभयांसहि वाटला । अंतरीं गहिंवर बहु दाटला । शोध सतीचा करावया जरि वेळ किती आटला । फिरती संशय नच फीटला । श्रांत[२] जाहले फिरतां गहनीं[१] कष्ट बहू भोगिती ॥१॥ राज्य-वित्तही हरिलें विप्रें दुःख न त्याचें असे । जाहले सतिविरहीं हें जसें । पाहावें कोठें, जावें आतां, काय करावें कसें । सतीचा विपिनीं शोधचि नसे । हुडकायाची सीमा झाली जिव

१ अरण्यांत २ थकले.

व्याकुळ होतसे । आरडतां बसले कीं हो घसे । अति कोमळ पाउलें नसे हो हिंडायाजोगिं तीं ॥ २ ॥ सूर्योदय तितुक्यांताचि झाला तीहि भेटली सती । परस्पर वृत्तहि मग पूसती । अनंदाश्रु बहु गळती नयनीं जरि श्रमले असती । क्षुधेनें पीडितसे दीसती । मार्ग मिळेना अडवाटेनें काट्यांताचि घूसती । शरीरीं त्यांच्या ते भोसती । गिरिवासी प्रभु पहा बरें तो अदय जाहला किती ॥ ३ ॥

पद-[काशीचे जन ह्मणतात]

जोगी.

पाहिला विप्र नसे कोणी, निर्दय यापरिचा ॥ धृ० ॥ घेतलें राज्य हिरुनि सारें । तरि द्या ह्मणतो पैसा रे । घालवूं यासि पिटुन सारे । न बैसा रे स्वस्थ उगे ॥ १ ॥ कसा हा पुष्ट तरी झाला । पिडितो व्यर्थचि गरिबांला । करावें ताडण हो याला । बहु झाला मस्त पहा ॥ २ ॥ न पाहावें दुःख आह्मां यांचें । आधिनें मन आमुचें काचे । बोलतो अपशब्दहि वाचे । कसें याचें वर्तन हें ॥ ३ ॥ झांकिले हरिनेंही डोळे । घातले कानांताचि बोळे । लेंकरूं धुळींत कीं लोळे । तरि न वळे गिरिवासी ॥ ४ ॥ D Ganpat N Naidoo

(तारामतीस कुंटिणी मागतात)

लावणी.

रूपवती अति सुंदर युवती पाहुनियां धांवती । कुंटिणी[१] सतीस त्या मागती ॥ धृ० ॥ तारामतिला हैठीं[३] मांडिलें गाधिजमुनि बहु हैटीं । धांवले लोक तशा पाहटीं । शालु चौकटी जरिचा नेसे पाहतां जी हरिकटी । केली उभी अशी एकटी । येति कुंटिणी बहुत नेसल्या पितांबर ज्या धटी ॥ ह्मणती साधो येवढी

---

१ कचरतें. द्रवतें. व्याकुळ होतें. २ वेश्या ३ बाजारांत. ४ हट्टी. ५ सिंहकटी. (सिंहाच्या कमरेसारखी आहे कमर जीची)

भेंटी ॥ संसर्गानें जिच्या पावती बहु जन परमा गति ॥ १ ॥ ज्या त्या भाविति अपुलया ठायीं काय रत्न हें शिरा ॥ जाइल हृतिचें अंतरिं शिरा ॥ अमोल्य असतां अल्प धनानें मिळतो कीं हो हिरा ॥ पाहतां काय सख्यांनों हिरा ॥ कोणी वदती भार[6] कनक अह्मि दिधलें बाई, घरा ॥ चलावें, दुशाल ही पांघरा ॥ साध्वी असतां अशी तिची ही व्हावी चरमा गती ॥ २ ॥ वियोग पतिचा नसो ह्मणुनिया ताप जिनें साहिला ॥ समयीं तोहि न तिज राहिला ॥ गती कसी दैवाची हो त्या दासी शतशः जिला ॥ करणें सेवा आली तिला ॥ वेश्यांसदनीं मला न घावें ह्मणउनि मुनि प्रार्थिला ॥ नेलें काल–कौशिकें तिला ॥ गिरिवासी प्रभु दयाळ केव्हां होईल तिस मागंतीं ॥ ३ ॥

[तारामतीला विकत घेणारा घेऊन चालला तेव्हां रोहिदासाचें व तिचें भाषण.]

जलद घनाक्षरी.

माते जातिस कोठें आज ॥ कोण्या जागीं आहे कांज ॥ ताहन लागली पाणी पाज ॥ बैसे क्षणभरि, स्तन देई तरी, ॥ ह्मणतो काय हा मुनिराज ॥ १ ॥ होसी राजाची तूं भांज[12] ॥ यानें सोडिली कशी लाज ॥ थांब थांब आतां, जाउनि कथितों ताता, यासी आला कोठुनि माज ॥ २ ॥ बाळा सांगतें तुला वर्म ॥ माझा पतिव्रताधर्म ॥ केलें जैसें पूर्वी कर्म ॥ आलें भोगणें अतां, नाहिं कोणिच त्राता ॥ कैचें आतां बापा शर्म[13] ॥ ३ ॥ स्मरतां येतो अंगीं घर्म ॥ कोण चालवी माझें नर्म[14] । मुनिनें विकिलें मजला, मुकलें बापा तुजला, पाहे दुर्घट कैसें कर्म ॥ ४ ॥

---

१ येवढी मद्दी साधो ह्मणजे इतकें इष्ट कार्य होवो. २ मोक्ष. ३ उत्तम. ४ घुसा. ५ हिसकावून घ्या. ६ १२० शेर=१ पल्ला २००० पल्ले=१ भार. ७ सुवर्ण. सोनें. ८ शेवटची. ९ नामविशेष ब्राह्मण. १० पुनः ११ काम. १२जी. १३सुख. १४कौतुक

झुलना (डोंबाची बायको पतीस ह्मणते)

घनाक्षरी

कसा आणिला हा दास । केला द्रव्याचा नास[1] ॥ होइल पिशुनांमधिं[2] हांस[3] ॥ होत भास मज असा ॥ १ ॥ काय झाला भ्रम आज ॥ कशी वाटेना लाज ॥ आहे मोलकरिण भाज[4] । करिल काज गृहीचें ॥ २ ॥ दिसे नाजुक हा फार ॥ कसा घेइल शिरिं भार ॥ नीर पाहिजे अपार[5] ॥ पहा विचार आपुला ॥ ३ ॥ आतां सांगतें मी स्पष्ट ॥ करणें लागतलि कष्ट ॥ ह्मणाल मजलागीं नष्ट ॥ होइन इष्ट मग कशी ॥ ४ ॥

पद (हरिश्चंद्र ह्मणतो)

(जलद त्रिताला)

करूं कैसें मी काय आतां ॥ धृ ॥ मला सुचेनाचि काहीं ॥ कोणी गोत येथें नाहीं ॥ माझें मन देतें गाही ॥ नाहिं राहिला कोणि त्राता ॥ १ ॥ माझें कंटाळलें मन ॥ वाटे सेवुं काय वन[6] ॥ झालें जिणें पराधिन ॥ दिन जाहलों जळ[7] वाहतां ॥ २ ॥ गेले कांता पुत्र तेही ॥ वास चांडाळाचे गेहीं ॥ होती कष्ट बहु देहीं ॥ देई मरण तूं रमानाथा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभुराया ॥ आलों शरण तुझ्या पायां ॥ ऐसें जिणें नको वाया ॥ वाया गेलें जन्म पाहतां ॥ ४ ॥

दिंडी (डोंबाचे घरीं हरिश्चंद्राचा वेष)

कृष्ण दोरा बांधिला गळा त्याच्या ॥ शिरीं लपटाया देति एक काच्या ॥ दिली नेसाया चड्डि तेचि घाली ॥ इथुनि वसनाची अतां सिमा झाली ॥ १ ॥ एक दिधली घोंगडी फाटकीसी ॥ तीच शय्या रात्रीस हात ऊसी ॥ बहू यावी शोभाहि त्यासि तेव्हां ॥ शिरीं बैसे येऊनि कुंभ जेव्हां ॥ २ ॥

---

१ नाश. २ दुष्ट लोकांत ३ हंसें. ४ भाज ह्मणजे बायको मोलकरणीसारखी काम करण्यास आहे ह्मणुन का असा दास आणिला असा भावार्थ. ५ पुष्कळ. ६ अरण्य, ७ पाणी.

झुलना (हरिश्चंद्र म्हणतो)

जलद घनाक्षरी

करूं आतां मी कैसें काय ॥ मज अंतरले गुरुपाय ॥ झालों आतां निरुपाय ॥ देवा धांव तरि, पाव लवकरि, केला कोणता अन्याय ॥ १ ॥ त्यजिला कसा तुवां न्याय ॥ एवढा दुर करि अपाय ॥ गेली विप्रसेवा, कैसा संचित–ठेवा, झालों दिन मी जैसी गाय ॥ १ ॥ झाले मजला कष्ट फार ॥ नित्य खाउं मी किती मार ॥ नाहीं कोणाचाहि आधार ॥ वास चांडाळ–गेहीं, असतां सुखही नाहीं, यांतुनि देवा मला तार ॥ ३ ॥ कोठें दिसे-नाची थार ॥ घेई माझा तूंची भार ॥ पुत्र कांता गेलीं, नकळे काय मेलीं, किंवा आहेत कोठें गार ॥ ४ ॥

पद [हरिश्चंद्र म्हणतो]

जोगी

देवा पाव अतां मजला, पाहसि अंत किती ॥ धृ० ॥ गेलें राज्य सर्व पाहीं ॥ त्याची चिंता मज नाहीं ॥ सुकलों[1] सुत-कांतेलाही ॥ नसे तेंही दुःख बहू ॥ १ ॥ लागली खंती मजला ही ॥ पडलों डोंबाच्या गेहीं[2] ॥ बसतो मार नित्य देहीं ॥ कष्ट तेही बहु होती ॥ २ ॥ यांतुनि काढ अतां मजला ॥ अरडतां कंठ किती सुजला ॥ प्रस्तरीं[3] सिंधु त्वांचि बुजला ॥ कठिण तुजला काय असे ॥ ३ ॥ प्रार्थितों गिरिवासी राया ॥ असो हें वंदन तव पायां ॥ शिणली माझी बहु काया ॥ नको वाया हेत[4] करूं ॥ ४ ॥

पद (माता बाळकास म्हणते)

जोगी

बाळा जाउं नको विपिनीं, सोडुनि मजलागीं ॥ धृ० ॥ नाहीं गोत अतां मज जाण ॥ ठेविला तुजवरि अवघा प्राण ॥ माझें वचन एवढें मान ॥ घालितें आण मी अपुली ॥ १ ॥

---

१ स्वस्थचित्तानें. २ घरीं. ३ दगडांनीं. राम अवतारी रामानें समुद्रावर सेतु बांधला होता. ४ हेतु=इच्छा. हेत वाया करूं नको=इच्छा पूर्ण कर.

जाशिल विहिरीवर तूंही ॥ देतिल ढकलूनि पोरें हीं ॥ पोहणें येत तुला नाहीं ॥ कठिण तेंही मज वाटे ॥ २ ॥ चढशिल तरुंवरि एखाद्या ॥ असती ठिसुळ बहू खांद्या ॥ आरडशिल मला हात द्या द्या ॥ कोण खांद्यावरि तुज घे ॥ ३ ॥ बोले बाळक मातेसी॥ येतों त्वरिताचि तुजपासीं ॥ व्यर्थ तूं चिंता कां करिसी ॥ नसे गिरिवासी काय तुझा ॥ ४ ॥

(उशीर झाला ह्मणून रोहिदास इतर मुलांस ह्मणतो)

घनाक्षरी.

पाहा झाला किति वेळ ॥ चला पुरे करा खेळ ॥ होइल माय उतावेळ ॥ बहू वेळ लागतां ॥ १ ॥

पद (तारामती म्हणते.]

जोगी

बाळा कां झाला तुज वेळ, न कळे मजलागीं ॥ धृ ॥ वदलें जाउं नको रानीं ॥ चिथविलें परि तुज पोरांनीं ॥ तुडविलें असेल ढोरांनीं ॥ कीं रानीं फिरतोसी ॥ १ ॥ कळविति पोरें मातेला ॥ भुजंगें दंश पदा केला ॥ बाळ तो तात्काळचि मेला ॥ काय तुजला सांगावें ॥ २ ॥ बहुतचि दुर्धर विष पाहीं ॥ लागला क्षणहि त्यास नाहीं ॥ राहिला दिवस नसे कांहीं ॥ फळ नाहीं जाउनिया ॥ ३ ॥ ऐकतां घाबरली ती माय सुचेना तिला करावें काय ॥ रडतसे मोकलुनी धाय ॥ करीत हाय ती गेली ॥ ४ ॥ ह्मणतसे गिरिवासी प्रभुराय। करणें तुला उचित हें काय ॥ केली दया आजि ती काय । रक्षिलें कांय गजेपातिचें ॥ ५ ॥

लावणी. (तारामतीचा विलाप)

तारामति आक्रोश करितसे प्रेत पुढें घेउनी ॥ गेला सुत शोका देउनी ॥ ६ ॥ भूप हरिश्चंद्राचा सुत हा, काय जाहली दशा ॥ गेली विलया सारी अशा ॥ प्राक्तनयोगचि असा, व्रतांसी

देह. (जीव) २ गजेंद्राचे.

आचरलें कस कशा ॥ करितिल काय दुजा तरि अशा ॥ ईश्वर कां क्षोभला कळेना नित्य प्रार्थना जशा ॥ केल्या नसातिल कोणी तशा ॥ भावें केलें ध्यान तयाचें लक्ष पदीं ठेवुनी ॥ १ ॥ पाप तरी कोणतें उदेलें कांहिं न उमजे मला ॥ ज्यास्तव घात असा जाहला ॥ भावें[1]–गर्भंही काय असावा मज न कळे यांतला ॥ यमानें हात कसा घातला ॥ या जन्मीं तरि नसेचि सहसा दोष असा लागला ॥ वाटतो गतें[2]–भविंचा जागला[3] ॥ अनुचित केलें हरिनें बहुतचि अजि बाळा नेउनी ॥२॥ पतिविरहाचें दुःख तशांतचि हाहि समय पातला । तिला तो कल्पांताचि भासला ॥ विलाप करि बहु सती गहिंवरें कंठ तिचा दाटला ॥ ब्राह्मणवेशें मुनि भेटला ॥ चाल उगी कष्टसी कशाला दिवस नसे उगवला ॥ प्रभातीं द्रव्य पाहिजे तुला ॥ गिरिवासी प्रभु कसा जाहला अदय तीस पाहुनी ॥ ३ ॥

पद (तारामती म्हणते)

(उद्धवा शांतवन कर जा)

हा बाळा कशि गति झाली, नाहिं सार्थक झालें पाही ॥धृ॥ कोणतें दुःख तरि सांगूं, हें जन्मचि गेलें वाया ॥ किति वैभव तरि मम पतिचें, डोंबाघरिं विकिली काया ॥ घेतलें मलाही मुनिनें, असि केली ही तुझि माया ॥ चाल ॥ मारिलें अणुनि या ठायीं । अशि निर्दय दुसरी नाहीं नाहिं। उपाय केला कांहीं॥पू०चाल॥ गाहीच मला मन देतें, वाचतासि दुसऱ्या ठायीं ॥ २ ॥ कसें मरण अलें तुज बाळा, या अल्प वयांतचि पाही ॥ भोगिले कष्ट बहु त्वां कीं, नाहिं सौख्य दिलें तुज कांहीं ॥ वळखिलेंस गृह दुसऱ्याचें, कधिं ताप दिला मज नाहीं ॥ चाल ॥ ते काय तुझे गुण वाणूं ॥ आठवतें मनिं कशि नाणूं[4] ॥ कसें दुःख मनांतिल

---

१ आशय, हेतु. २ पूर्व जन्मींचा. ३ जागृत झाला, उभा राहिला. ४ न+आणूं. आणूं नको.

खाणू[1] ॥ पू०चाल ॥ जाणूनि घात म्यां केला, हें म्हणणें विपरित नाहीं ॥ २ ॥ जाहलें निधन[2] या जागीं, नाहिं झाली गति तुझि बाळा ॥ ठेवितें बोल मी आतां या कर्मं अपुल्या भाळा ॥ मज अणिलें ज्या विमानें तो देउनि गेला टाळा ॥ चाल ॥ हें सरण[3] कसें विसकटलें । करचरण तुझे हे तुटले । दिसे कपाळ माझें फुटलें ॥ पू०चाल ॥ सुटलें न देहापासुनिया आहे उरलें याचें कांहीं ॥ ३ ॥

धावा (तारामती धावा करिते)

(विडा घ्यावा नारायणा)

धांव रे दिनानाथा, पाहा कष्टलें भारी ॥ नसेचि मज त्राता कोण संकट निवारी ॥ धृ॥ मागणें हेंचि आतां । तुजलागीं अनंता ॥ प्रति–भवीं[4] हेंचि देई। मज हरिश्चंद्र भर्ता ॥ १ ॥ सुतही रोहिदास । असो गाधिज मागता ॥ वसिष्ठ गुरु राय । नित्य आशिर्वाददेता ॥ २ ॥ असें प्रार्थी तारामती । हरि पावला अंतीं ॥ प्रगट रूप केलें । खड्ग निवारिलें हांतीं[5] ॥ ३ ॥ दयाळु गिरिवासी । होतो निश्चय पाहिल्या ॥ स्मरणें जगा तारी केंवि उपोक्षि[6] गाइल्या ॥ ४ ॥

---

१ खणून काढूं, म्हणजे नाहींसें करू २ मरण. ३ चिता. ४ प्रति जन्मीं ५ हातानें ६ स्मरण तारी; गाइल्या केंवि उपेक्षा. जो नुसतें त्याचें स्मरण केलें असतां तारतो तो त्याचे गुणनुवावद गाइल्यास कसा उपेक्षा करील. (न जाणतांहि ये मुखा हरि तथापि पापें हरीं; हरि विषय मतीचा कीर्तनें होय जेव्हां। करतळगत त्याला चारिही मोक्ष तेव्हां " वामन पंडित)

D Ganpat N Naidoo

D Ganpat N Naidoo

श्रीदत्तचरित्र.

आर्या.

ये नारद मुनि एक्या समयीं मुनिवर्य अत्रिच्या भुवना ।
पूजा करुनि यथोचित वंदी तत्पाद मस्तकीं भुवना ॥ १ ॥
अनसूया सतिनेंही पुसिलें पादांबुजासि पदरानें ।
वाढूनि षड्रसान्नें जेवविलें मग यथेच्छ अदरानें ॥ २ ॥
होत्या गंगा यमुना तत्पर सेवेंत नित्य ज्या सतिच्या ।
करिती दास्य मुनीचें देतिल वचनासि कां न मान तिच्या ॥ ३ ॥
मुनिवर[2] ह्मणे न चळवा चित्त, अधीं वृत्त, आपुलें कळवा ।
तळवा[3] मग तुम्हि मळवा हस्ताचा, संशया अधीं पळवा ॥ ४ ॥
गंगा यमुना आम्ही असतों सेवेंत नित्य या सतिच्या ।
सर्वज्ञ तुम्ही पुसतां नाहीं महिम्यासि अंत कांहिं हिच्या ॥ ५ ॥
उमा रमा सावित्री त्रैमूर्तींच्या स्त्रिया अनादि सती ।
पायीं प्रतिमा त्यांच्या या सतिनें बांधिल्या पहा दिसती ॥ ६ ॥
वर्णावी किति ख्याती त्रिजगीं न दिसेचि हो हिच्या सरिलों ।
यास्तव आम्हीं मोहित होउनि आश्रय असे हिचा धरिला ॥७ ॥
नारद मुनि वैकुंठीं पाहे सस्त्रीक हरिहरा विधिला ।
आधीं स्त्रियांसि निंदुनि मग तो त्यांच्याहि बोल लावि धिलों ॥८॥
व्यर्थ जिणें हें तुमचें वागवितां कासयास देवपण ।
श्मश्रुच्छल काशाला पाचारा नापिका करा वपन ॥ ९ ॥

---

१ आदरानें २ नारद त्या गंगायमुनादिकांना विचारूं लागला ३ नंतर तुह्मी आपले तळहात मळशा. भावार्थ—गंगायमुनादि नद्या त्या सतीच्या येथें काम करीत होत्या, त्यांना नारद ह्मणतात, माझा संशय अगोदर पळवा व मग कामाला लागा. ४ बरोबरीला. ५ बुद्धीला. ६ भावार्थ—उगाच दाढीमिशा कशाला वाढवल्यात, काढून टाका. तुमच्यांत पुरुषार्थाचें कांहींच लक्षण नाहीं.

पुसती देव तयातें झाला वृत्तांत काय तो कळवा ।
दूषण कां हो देतां संशय मनिंचा समूळ हा पळवा ॥ १० ॥
बोले मुनि अनसूया अत्रि ऋषीची असे सती भार्या ।
त्रिजगीं नसेचि दुसरी पतिव्रता योग्य तीच सत्कार्या[1] ॥ ११ ॥
उमा रमा सावित्री प्रतिमा यांच्या पदींच ती मिरवी ।
न दिसे साध्वी ऐसी त्रिजगीं गर्वासि जी इच्या जिरवी ॥ १२ ॥
ऐसें वदतां नारद चढला बहु कोप त्या तिघीं जणिला।
ह्मणती मानवसातिचा या लोकीं पाड काय हो अणिला ॥ १३ ॥
नारद ह्मणे असत्यचि वाटे जाऊनि कां पहाना हो ।
सहजाचि कळेल महिमा तीचा मग तिजसवें पहा नाहो[2] ॥ १४ ॥
म्हणती निज पतिला त्या सत्वर जाऊनि सत्व हरवा हो ।
अनसूया कोण तिला त्रिजगीं असती असेंचि ठरवा हो ॥ १५ ॥
मग ते ब्राम्हणवेषें आले तत्काल अत्रिच्या सद्मीं[3] !
छद्मी[4] असतांहि सती भ्रमरी झालीच विप्र-पद-पद्मीं ॥ १६ ॥
मुनिवर ध्यानस्थ म्हणुनि इच्छा कळवा असें सतीच वदे ।
म्हणती भोजन घालीं स्वकरसमुत्पन्न पाक तो चव दे ॥ १७ ॥
पाक करुनिया सतिनें अणिलें वाढावयासि जंव पात्रीं !
ते म्हणती नग्नचि हो वर्णिति त्रिजगांत एक तूं दात्री ॥ १८ ॥
कळवी जाउनि पतिला विप्र न हे छळक भासती स्वामी ।
सिंची उदक तयांवरि बाळें होतील आपुल्या धामीं ॥ १९ ॥
दिधलें जळ अभिमंत्रुनि त्यावरि पडतांचि बाळकें झालीं !
मग निर्भय चित्तानें होउनिया नग्न ती सती आली ॥ २० ॥
मोहें पाजी पान्हा घालुनि हलवीत पालखामाजी !
चित्तीं ह्मणे प्रभूनें पुरवीली आजि कामना माझी[5] ॥ २१ ॥
पुनरपि नारद येउनि पाहे तों हालवीतसे बाळी[6] !
गुण गाउनि आनंदें अनुदिनिं संतोषवीतसे बाळां ॥ २२ ॥

---

१ सत्कार करण्याला २ नवरा ३ घरीं ४ कपटी. ५ माझी ६ अनुसूया

गांठी स्त्रियांसि त्यांच्या असती पतिराज कोणत्या गांवीं !
वाटे न कळे त्यांला सति असती कोण कोण त्यागावी ॥ २३ ॥
विनविति कर जोडुनिया लावा हो शोध अमुच्या पतिचा !
असतिल अनसूयेच्या सदनीं तरि शांतवाचि कोप तिचा ॥ २४॥
बाळें करुनि सतीनें निजवीलीं पाळे[1]खांत जा आणा !
सद्भावें शरणचि व्हा वाहणें तरि कासयास मग आणा ॥ २५ ॥
मग त्या तिघीहि सत्वर विनविति जाऊनि अनसुया सतिला;
द्यावे भ्रतार अमचे म्हणउनि करिती पुनःपुन्हा नतिला ॥ २६ ॥
ओळख न पुरे सहसा आंतुनि बाहेर त्या करिति जाया !
जाया त्वत्पुत्राच्या जालों पतिसह निरो दे जाया ॥ २७ ॥
सांगे पतीस यातें देउनि पतिदान बोळवावें हो ।
करिती अज्ञ अपकृती सुज्ञें तरि त्या न पोळवावें हो ॥ २८ ॥
पुनरपि उदकाचि टाकुनि केले विधि विष्णु आणि सदाशिव ते !
सृष्टिस्थितिलय कर्ते झाले सस्त्रीक मुनिपदा शिवते ॥ २९ ॥
म्हणती देवत्रय ते अनसूयेतें अभीष्ट वर मागे !
इच्छा नसोचि परि[2]धा खेळविलें म्या जसें तुम्हां मागें ॥ ३० ॥
दिधले अंश तयांनीं झाला तो योगिराज अवधूत !
त्रिजगीं सचार करी स्मरणें जन पातकें अ[3]नव धूत ॥ ३१ ॥
शुद्ध चतुर्दशि दिवशीं मार्गेश्वर मास विभु[3]ति देवाची !
झाला अवतार जगीं द[4]त्तचरित्रा विभूति दे वाची ॥ ३२ ॥

दिंडी—(देव नारदास विचारतात]

म्हणाति देवत्रय हेंचि नारदाला ॥ आलि शंका ही कळवितों तुम्हांला ॥ जशा अमुच्या या सत्या तिघी दिसती ॥ जगीं सांगा बरें कोण अशा असती ॥ १ ॥ मतें अमुच्या या पतिव्रता धन्या ॥ जगीं नसतिल यां समा कोणि अन्या ॥ जरी आढळली तुम्हां सती ऐसी ॥ तरी कळवा हो तिची स्थिती कैसी ॥ २ ॥

---

१ पाळण्यांत २ पूर्वीं. जुनीं ३ 'मासानां मार्गशीर्षोऽहं' या गीतावचनाला उद्देशून हें आहे. ४ दत्त चरित्र वाचील त्याला विरक्ती संपत्ती वगैरे देतो.

झुलना (नारद देवांस सांगतात—)

घनाक्षरी.

नारद मुनि कहत जात ॥ भूमंडलमें गई रात ॥
नजर आई जो बात ॥ कहुं वृतांत तूमसे ॥ १ ॥
सती जगतमों अनेक ॥ वामें अनसूया एक ॥
बडी पतिव्रता नेक ॥ राखत टेक पतीकी ॥ २ ॥

साकी

उमा रमा सावित्री तीनों दासी हैं उस कामिनकी ॥
गंगा जमुनाको मैं देखा, है बांदी[1] दिन यामिनकी ॥ १ ॥

अंजनीगीत—देवस्त्रिया नारदास ह्मणतात—

झाल्या कोपाकुळ त्या नारी ॥ निर्भर्त्सुनिया वदती भारी॥ नारदा वर्णु नका थोरी ॥ पाड किती तिचा ॥ १ ॥ बरवें विचारावें चित्तीं ॥ मानवसतिचा लेखा किती ॥ कां हो दावितां तुह्मि भीति ॥ अनसूया सतिची ॥ २ ॥ मिथ्या गमती तुमचे बोल ॥ तीचि अमुची कांहितरी जोल[2] ॥ पाहुनि वर्णिल्या समतोल ॥ मानूं वचनासी ॥ ३ ॥ साध्वी ह्मणावें कवणासी ॥ कळतें अवघें हें सुज्ञासी ॥ रंभा मानीलें दासीसी ॥ पुरे वर्णन तुमचें ॥ ४ ॥

पद—देवस्त्रिया नारदास ह्मणतात—

जोगी

नारदा शोध करा पतिचा, झालों दीनाचि कीं ॥ धृ० ॥ पडला भ्रम कसा मतिला ॥ धाडिलें छळावया सतिला ॥ केलें काय तिनें पतिला ॥ हें मतिला अकळेना ॥ १ ॥ पहावी किती तरि आह्मी वाट ॥ झाले दिवस वाटती साठ ॥ न कळे अनसूयेचा कांट[3] । नसे बोभाट आजवरी ॥ २ ॥ सांगा कसा धरावा धीर ॥ होइना क्षणभरि मन हें स्थीर ॥ सेविलें नाहीं कीं हो नीर ॥

---

१ बंदी, सेवेंत तत्पर. २ बरोबरी. ३ कवटाळपणा, कपट.

कसें रुचीर तें लागे ॥ ३ ॥ धांवें गिरिवासी प्रभुराय ॥ करावा यत्न कोणता काय ॥ नारदा धरितों तुमचे पाय ॥ शिणवा काय यासाठीं ॥ ४ ॥

लावणी—देवस्त्रिया विलाप करितात—

उमा रमा सावित्री ह्मणती येति न पति कां तरी ॥ जाळितो विरहानल अंतरीं ॥ धृ ॥ काय करावें अम्ही स्त्रियांनी वाट किती पाहवी ॥ कशीं हीं दुःखें तरि साहवीं ॥ शोध कसा लागेल पतीचा मार्ग कोण दाखवी ॥ सुखाची रुची कोण चाखवी ॥ करील सुटका कोण माउली चतुर सदय लाघवी ॥ कळेना कोण देह भागवी ॥ विलाप करिती तिघी जणी त्या दिवसनिशीं यापरी ॥ १ ॥ बहुधा पापें अम्ही अचरलों त्यांचें फळ हें असें ॥ भोगितों नाहिं म्हणावें कसें ॥ त्रयमुर्तींच्या भार्या आम्ही जगीं जाहलें हंसें ॥ स्मरतां जिव व्याकुळ होतसे ॥ स्त्रिया अशा त्रिजगांतहि नसती पडले होते ठसे ॥ मनाला कां न अतां तें डसे ॥ कोठें जावें काय वदावें समय कठिण किति तरी ॥ २ ॥ सदनीं होतों सुखें आपल्या दुष्ट बुद्धि पहा कशी ॥ अठवली पडलों आतां फशीं ॥ जाणत जाणत वेड्या झालों व्यर्थ लाविलें धसीं ॥ छळना केली हो भलतिसी ॥ त्याचा हा परिणाम पावलों केली करणी अशी ॥ ह्मणावें काय कोणा याविशीं ॥ गिरिवासी प्रभुराय धांवण्या धांव अतां लवकरी ॥ ३ ॥

लावणी—नारद देवस्त्रियांस ह्मणतात—

उमा—रमा—सावित्रीलागीं गांठी नारद मुनी ॥ बसलां स्वस्थ कशा आजुनी ॥ धृ ॥ ब्रह्माविष्णूमहेश बाळें केलीं सतिनें पहा ॥ तियेच्या चरणीं मस्तक वहा ॥ जरि कांहिं बोलली सतीचें वचन तुम्ही ते सहा ॥ यांतचि लाभ असे हो महा ॥ सती अशी त्रिज-

---

१ दांडगाई

गांत दिसना दिशा धुंडिल्या दहा ॥ छाळिलें तिजला कां तुम्हि अहा ॥ नित्य पालखीं निजवी बाळा स्तनपान्हा पाजुनी ॥ १ ॥ चमत्कार पाहिला दृष्टिनें ऐका तो यावरी ॥ सांगतों मूत्रविसर्जन परी ॥ धार मुखावरि परस्परांच्या पडे कोण आवरी ॥ भिजलीं गात्रें अवघीं जरी ॥ पुरीष करिती तिघे पालखीं निजवील्या ऊपरी ॥ मर्दिती अंगें विधि—हर—हरी ॥ रडती जंव आक्रोशें ये सति लगबग मग धांवुनी ॥ २ ॥ देवत्रयमूर्तिंच्या अवस्था केल्या यापरि जिनें ॥ कोठुनी इतरांचें मग जिणें ॥ पती न सुटती तुम्ही सतीचे पाय वंदिल्याविणें ॥ पडुं द्या, पडलें भाळीं किंणें ॥ धन्य माउली जगीं पाहिली अघटित केलें तिनें ॥ गोविले देव भक्ति-च्या रिंणें ॥ गिरिवासी प्रभु करील सुटका राहुं नका लाजुनी।३॥

पद—(नारद देवस्त्रियांस ह्मणतो)

(गझ्यांनो कृष्णगडीं)

इच्छितां जरि अपुल्या पतिला ॥ शरण जा अनसूया सतिला ॥ धृ ॥ पाहुनी अलों तिन्हीं बाळें ॥ वाजती पदिं खुळ-खुळ वाळे ॥ करिती इतरांसम चाळे ॥ खेळवी सति बहु लाडिवाळें ॥ करुनिया सद्भावें नतिला ॥ १ ॥ पालखीं निजवुनिया बाळां ॥ हलविते क्षणोक्षणीं बाळा ॥ लागला ह्याचि तिला चाळा ॥ करिल कां मग ती कंटाळा ॥ सोडवा तुह्मि आपुल्या पतिला ॥ २ ॥ यापरि रिझवी बाळांसीं ॥ गुंतलें तेही तिजपाशीं ॥ कसे पति तुमचे गुणराशी ॥ अशी ही अली दशा त्यांसी। परोपरि विनवावेंच तिला ॥ ३ ॥ प्रभू गिरिवासी करिल कृपा ॥ धरितां व्यर्थचि कांहो त्रपा ॥ अधीं या कार्यालागिं जपा ॥ लटिक्या वरकड सर्व गपा ॥ वळवा तुह्मि अपुल्या मतिला ॥ ४ ॥

---

१ वद्दे. २ ऋणानें, कर्जानें ३ लाज ४ गप्पा

श्रीकृष्णांनीं एका गोपीचा गर्वपरिहार केला तें आख्यान.

एक नवी गोपी गोकुळांत राहण्यास आली होती. सर्व गोकुळांतल्या गोपी भ्रष्ट आहेत असें ती ह्मणत असे. इतर गोपींनीं ही गोष्ट कृष्णास सांगितली, व तिचा गर्वपरिहार कर ह्मणून कृष्णास विनंति केली. कृष्णाचे धाकानें ती गोपी आपले माहेरास गेली. तेथें कृष्णानें तिचा गर्व फार चमत्कारिक रीतीनें हरण केला. ही कथा या आख्यानांत आहे.

आर्या

आली होती तरुणी अति सुंदर एक गोकुळांत नवी ।
पाहुनि चरित्र हरिचें लावितसे बोल गोकुळा तंन्वी ॥ १ ॥
झाल्या भ्रष्ट सकळही गोकुळिंच्या कामिनी असेंच वदे ।
हरिलाहि बोल लावी तरि इतरालागिं तें कसें चव दे ॥ २ ॥
घडि घडि असेंहि बोले हरिला येऊं न देचि सदनासी ।
दाखविना नख अपुलें तरि तो पाहील काय वदनासी ॥ ३ ॥
गोपी ह्मणती कृष्णा जरि तूं आहेसि सत्य पुतनारी ।
आणी वेढुनि तिजला ह्मणते सर्वांत मीच पुतं नारी ॥ ४ ॥
अभिमान तुज असों दे कृष्णा आम्ही समस्त फसलों की ।
न चले उपाय यास्तव तीचे ऐकूनि बोल बसलों की ॥ ५॥
देव म्हणे स्वस्थ असा गर्व तिचा सर्व मीच हरि हरिन ।
राहिल काय प्रतिष्ठा मत्तेभाच्या मदासि हॅरि हरि न ॥ ६ ॥
कळलें तिजलाहि असें किं हरि अपणा धरावया जपतो ।
झाली चिंतातुर बहु वदनेंदू काय तो तिचा लपतो ॥ ७ ॥
चित्तीं विचार करि मग जाऊं कोठें अतां करूं काय ।
आहे अन्याय जरी तरि कवणाचे कुसे धरूं पाय ॥ ८ ॥

---

१ सुंदरी २ पूत, पवित्र. ३ माजलेल्या हत्तीचा. ४ सिंह.

विहित पथें वर्तुनिया दैवें हा योग आणिला काय ।
न सुचे उपाय यास्तव अपघातें हारवीन हा काय ॥ ९ ॥
कळवी निज पतिलाही सांगा मजला उपया हो काहीं ।
नाहीं तरि देहांतचि[1], दिधली पीडा बहूत लोकांहीं ॥ १० ॥
वर्ता[2] स्वधर्ममार्गीं रक्षिन जो का असी वदे वाचा ।
साचा बोल तयाचा निजला तो काय देव देवाचा ॥ ११ ॥
चिंता कां करितेसी लाविन शिक्षा यथार्थ मी हरिला ।
धरिला हट तरि जाराचि नाहीं येणार कायगे हरिला[3] ॥ १२ ॥
कांता ह्मणे असें जरि आहे तरि तो प्रभूचि गोकुळिंचा ।
केलें भ्रष्ट व्रजातें ह्मणती त्याला समस्त दों[4] कुळिंचा ॥ १३ ॥
भीतो काय तुह्मांला धीटपणा हा नयेचि कामातें ।
सुचली युक्ति करावी धाडा ना मातृसदनिं कां मातें ॥ १४ ॥
राहिन मासचतुष्टय तोंवरि सारा कसाहि गृहधंदा ।
विसरेल नंदनंदन देइल सोडूनि आमुच्या छंदा ॥ १५ ॥
द्या एक वृषभ मजला जातें बैसूनि आजि माहेरा ।
हेरा[6] गृह निगुतीनें[7] माहेरीं पाठवीत जा हेरा[8] ॥ १६ ॥
ऐसा विचार योजुनि गेली गोपी त्वरीत त्या गांवा ।
कळलें अधींच हरिला गोपींनीं जो वृत्तांत सांगावा ॥ १७ ॥
नटणाराचि बहुरूपी तो हरि तीचा पतीच मग जाला ।
गेला श्वशुरगृहातें ह्मणतें अनपेक्ष[9] सर्व जग जाला ॥ १८ ॥
कांहो त्वरितचि आलां करमेना काय आपुल्या धामीं ।
जा मी क्षिप्रचि येईन ठेवितसां चित्त कां असें कामीं[10] ॥ १९ ॥

---

१ याला' देहांतच बरा, असें अध्याहृत घ्यावें २ स्वधर्मानें वागा ह्मणजे मी तुमचें रक्षण करीन असें अभिवचन ज्यानें दिलें तो निजला काय ? ३ हार जाणार नाहीं काय ? ४ दोन कुळांचा. "एक ह्मणती वसुदेवाचा ॥ एक ह्मणती नंदाचा ॥ ठाव नाहीं बापाचा" ॥ ५ करा ६ सांभाळा ७ काळजीनें ८ जासूद ९ ज्याला कशाची गरज नाहीं असा ' अनपेक्षः शुचिर्दक्षः विष्णुसहस्रनाम १० विषयाचे ठिकाणीं.

कृष्ण म्हणे होईना गृहकृत्यानेंचि कष्टलों कांते ।
जरि आहेत स्त्रिया बहु पाचारूं काय भ्रष्ट लोकांतें ॥ २० ॥
तीहि म्हणे स्वस्थ असा काढूं येथेंचि हो दिवस कांहीं ।
त्यजिलें गृह भृत्यावरि त्याचें आतां असो कसें कांहीं ॥ २१ ॥
चातुर्मास्य प्रभुनें क्रमिले तेथें बहू अंनदानें ।
घे स्वाद रतिसुखाचा भ्रमर जसा नलिनिच्या अमोदा ने ॥ २२ ॥
एके समयीं आला गोकुळिंचा ही भ्रतार त्या गांवीं ।
त्यागांवी कां त्याची झाली ती गोष्ट समुळ सांगावी ॥ २३ ॥
वंदनें करि सासूतें मग श्वशुरातें नमावया पाहे ।
ते म्हणती कां करितां वंदन अजि दिवस कोणता आहे ॥ २४ ॥
जामात ह्मणे आलों ग्रामाहुनि आज आपुल्या धामीं ।
यासाठीं पद नमितों कळलें नाहीं तुह्मां कसें मामी ॥ २५ ॥
झालें चकित उभयतां ह्मणती वंदन कशास जा वांया ।
प्यालेंत गमे हाला याहुनि वदतील काय जावाया ॥ २६ ॥
पुनरपि तो त्यासि ह्मणे पडला भ्रम कां तुह्मासि मामाजी ।
माझी कांता तुमची कन्या, विपरीत काय या माजीं ॥ २७ ॥
तरि ते नायकती वच ह्मणती कां व्यर्थ तोंड दुखवावें ।
जामातें निज सुगुणें आह्मां सर्वां न काय सुखवावें ॥ २८ ॥
परि दुर्घट दैवगती कन्येच्या दुर्दशा कपाळा ही ।
आली सांगूं कवणा सदनीं अपुल्या तुझीच पाळा ही ॥ २९ ॥
वेडावला ह्मणे तो पडला भ्रम एकदा कसा याला ।
पाचारितां स्त्रियेसी फाराचि ते लागले हंसायाला ॥ ३० ॥
कळतां वृत्तांत जनां आले धावूनिया पहायासी ।
जामाता गृहिं आहे दुसरा हा कोण हो पहा यासी ॥ ३१ ॥

---

१ भावार्थ—कोणाला मदतीला बोलावावें तर सर्वच गोकुळ भ्रष्ट झालेलें. २ सुपंथ नेतो ३ वगळाशी ४ येथून सारूप्यापासुन उत्पन्न होणाऱ्या भ्रांतिकृत चमत्कारास आरंभ होतो. ५ मादक पदार्थ.

झालें आश्चर्य जना ह्मणती नच पाहिलें असें कोठें ।
दिसती सम दोघेही वय तरि यांचें पहा लहान मोठें ॥ ३२ ॥
कोणी ह्मणती ऐसें अंगावरच्या खुणा अधीं पाहूं ।
कांहीं अंतर पडतां यांच्या स्त्रीला सवोंचि मग बाहूं ॥ ३३ ॥
कोणी वंशावळिचीं नामें याला पुसा असें कथिती ।
कोणी मांत्रीकातें आणायाचा विचारही ग्रंथिती ॥ ३४ ॥
झाल्या सर्व परीक्षा अंतर तिळमात्रही दिसेना हो ।
पुसती स्त्रियेसि त्याच्या सांग तुझा कोणता असे नौहो ! ॥ ३५॥
नामें वंशावळिचीं पुसतां सांगे भ्रतार बाप अजा ।
*पणजा पण ज्यासि नये कथितां सांगेल काय माप अजा ॥३६॥
श्रीकृष्ण म्हणे कथितों ऐका संपूर्ण वंश हा माजा ।
गेले श्रवण करुनिया जन, [4]म्हणणें लागलें न 'धामा जा' ॥ ३७ ॥
घालविलें दोघांतें कांतेला त्यांचिया तयांमागें ।
भेटे मार्गीं तिसरा तो कांता आपुली तयां मागे ॥ ३८ ॥
चौथा पुढेंचि होता तोहि दटावूनिया म्हणे कां रे ।
नेतां कांता माझी सत्वर येथें अतांचि टाका रे ॥ ३९ ॥
आधीं तंडुनि पुष्कळ मग त्यांनीं नेम हा उभा केला ।
ही कांता चवघांची सहसा सोडूं नयेचि भांकेला ॥ ४० ॥
प्रतिदिनिं एक हिचा पति रक्षावें या अशाहि नेमातें ।
यासाठीं कथिलें अधिं न ह्मणावें कां न सुचविलें मातें ॥ ४१ ॥
नेली कांता तेथुनि पलंगिं वाहूनि पांचवा वरती ।
बघती वर चवघे तों आहे भोगीत पांचवा वर ती ॥ ४२ ॥
ऐसे भ्रतार पुष्कळ बघतां वेडावलीच ती कांता ।
देह कसा वागे हा माझ्या पावेल कोण आक्रांता ॥ ४३ ॥

---

१ बोलावूं (ओळखण्याकरितां) २ करूं लागले. ३ पति, नवरा. ४ घरीं परत जा असें म्हणावें लागलें नाहीं. कारण श्रीकृष्णाच्या सांगण्यांत चूक होण्याचा संभव-च नाहीं. ५ भांडून ६ झालेल्या निश्चयाला. ७ पलंगावर ८ नवरा.

*पण त्यास पणजा सांगतां येईना, शेळीला वजनमाप सांगतां येईल काय ?

आली मग देहावरि कळलें हें कृत्य वासुदेवाचें ।
प्रभुजी क्षमा करावी नेणुनि दुःशब्द बोललें वाचें ॥ ४४ ॥
तो प्रभु दयाळ निजरूप दावुनियां अभयदान दे हातें ।
आवरिल्या मूर्ति सकळ गेली गोपी स्वकीय गेहातें ॥ ४५ ॥
भजतां अनन्य भावें जे देती लक्षही अशा चरितीं ।
प्रभु गिरिवासी त्यांचें संकट वारील हो अशाच रिती ॥ ४६ ॥

याच आख्यानाचीं पदें.

अंजनीगीत.

(गोपी कृष्णास सांगतात.)

कृष्णास गोकुळीं एक नारी ॥ आली तिजला ताठा भारी ॥ तिचा गर्व तूं परिहारी ॥ सांगतों ऐक ॥ १ ॥ ह्मणती भ्रष्टल्या कामिनी ॥ हरिसीं रतल्या दिनयामिनी[2] ॥ ऐशा कैशा गृहस्वामिनी ॥ वेश्यांहुन निंद्य ॥ २ ॥ नाहीं कोणाचाही धाक ॥ दिधली त्यांनीं हरिला भाक[3] ॥ ऐशी गाजली जरि हांक ॥ निर्लज्जा साऱ्या ॥ ३ ॥ तैसी नोहे मी भामिनी ॥ आज्ञा दिधली जरि स्वामींनीं ॥ अथवा दावीली हामिनी ॥ पाहीना तिकडे ॥४॥ येईल कृष्ण माझ्या घरीं ॥ तरि मी गोपी नाहीं बरी ॥ शिक्षा लावीन निज करीं ॥ सांगतें आतां ॥ ५ ॥ तिच्या तारुण्याचा भर ॥ ह्मणती मजहुनि कोण सुंदर ॥ लागो नेदी हरिचा कर ॥ अंगासी अपुल्या ॥ ६ ॥ मोडी हरि तूं तिची खोड ॥ अमुचें पुरवी इतुकें कोड ॥ अन्नपाणी आह्मां गोड ॥ लागेना पाही ॥७॥ बोले प्रभू तो गिरिवासी ॥ नलगे कांहीं विलंब यासी ॥ करितों तिजला अपुली दासी ॥ कां करितां चिंता ॥ ८ ॥

---

१ चरित्रावर. अशा चरित्राचा जे विचार करतील त्यांचें संकट प्रभु सर्व हरण करतो. २ रात्रंदिवस. ३ वचन ४ संतापी, कोपिष्ट, रागीट. ५ पैशानें भरलेली थैली. ६ इच्छा.

कटिबंध–गोपीच्या स्वरूपाचें वर्णन–

सुंदर नार गोकुळीं आली ॥ वाटे रंभेची ती आली ॥ मंथन-समयीं काय निघाली ॥ अमृत स्वर्गींचें ही प्याली ॥ न कळे कोण हिला अशि व्याली ॥ वस्त्रें कनक भूषणें ल्याली ॥ वर्णितां नये जिच्या स्वरुपाला ॥ न मिळ कल्पांतींहि नृपाला ॥ झाली प्राप्त कशी गोपाला ॥ वाटतें नवल हेंचि मोपाला ॥ विधिनें रत्न निर्मि-लें ताजें ॥ निढळीं कुंकुम बहुतचि साजें ॥ पाहुनि वदन चंद्र[1] लाजे ॥ पायीं पैंजण नूपुर वाजे ॥ पाहतां मदन शरीरीं डोंजे ॥ नासिका सरळ शुकांची सारी ॥ बिंबाधरी नितंबीं भारी ॥ नारी अशी नसे निर्धारीं ॥ सागों काय तुला गिरिधारी ॥ वाटतें तेज पडेल अंधारीं ॥ म्हणती सुंदर किति राधेला ॥ परि ती नये इच्या समतेला ॥ म्हणतिल कोण घृतासम तेला ॥ कठिनता कोठुनि असि बेलांची ॥ त्यांहुनि अधिक स्तनयुगुलाची ॥ धम्मिल[6] शिरीं नेटका पाहीं ॥ शोभती कर्ण बहू कांपांही ॥ वक्रता नसे जिच्या भांगातें ॥ असावा सुवासही अंगातें ॥ नसती सुंदर जन कां गाते ॥ असतां नार अशी सांगातें ॥ ढकालिल इंद्रपदासहि हातें ॥ लावि-लि लाज तिनें आम्हांतें ॥ कसांही[7] घालवितो दिन हातें ॥ रात्रीं लागेना हरि पातें ॥ सांगति गोपी हरिला ॥ श्रीकृष्णें त्या प्रम-देचा पहा कैसा गर्व हरीला ॥ १ ॥

(कृष्णाचा प्रश्न व गोपींचें उत्तर.)

जलद घनाक्षरी.

कां गे झाला ऐसा दंग ॥ आज आला काय प्रसंग ॥ आहे अमुचा तुम्हां संग ॥ कां गे घाबरलां, स्वस्थ कां बैसलां, केला कोणीं मनोभंग ॥ १ ॥ कोण ऐसा तो निःसंग ॥ कळुं द्या तुमचें अंतरंग॥

१ सखी. २ पुष्कळांना ३ कपाळीं ४ त्रास देतो. ५ राघूच्या नाकाप्रमाणें. ६ वेणी ७ कसातरी आम्ही दिवस घालवितों पण ८ रात्रीं मात्र डोळा लागत नाहीं. तिनें दिलेलें दूषण इतकें डाचतें की रात्रीं झोपसुद्धां येत नाहीं.

सांगा लवकरी, आहे काय तरी, काय घडलें ऐसें व्यंग ॥ २ ॥ कृष्णा सांगतों अह्मी वर्म[2] ॥ आहे तुझ्या संगें शर्म[3] ॥ परी उदेलें[4] अमुचें कर्म ॥ काय सांगों हरी, गति न दिसे बरी, राखीं अतां अपुलें शर्म[5] ॥ ३ ॥ कोण पुरविल अमुचें नर्म[6] ॥ तिनें काढिलें अमुचें वर्म[7] ॥ कथिलें तुज आतां, हिच आह्मां चिंता, पाहे दाटला अंगीं घर्म[8] ॥ १ ॥

पद–(गोपी आपुल्या भ्रतारास ह्मणते)

सांगे वृतांत निज पतिला ॥ करूं मी काय दैवगतिला ॥ धृ ॥ कळवितें तुह्मांसि ऐका मी ॥ गोकुळीं कोणि नसे स्वामी[9] ॥ वदलें सहजाचि परवा मीं ॥ हरिला येउ न दे धामीं ॥ समजलें कसें गोपंतीला[10] ॥ १ ॥ जपतो हरी धरायासी ॥ होणें येइल मज दासी ॥ कोणता उपाय करूं यासी ॥ तुह्मांविण सांगूं कवणासी ॥ पुसा हा विचार निज मतिला ॥ २ ॥ सोडिली लाज बाप आई ॥ पडल्या गोपी त्या डाईं ॥ करिती नित्य हरिसि घाई । अणावें तिजला लवलाही ॥ येउं दे येइल कोप तिला ॥ ३ ॥ बोले भ्रतार हें तिजसी ॥ कां तूं व्यर्थचि घाबरसी ॥ कळवितों वृत्तांत नंदासी ॥ लाविन शिक्षा मग हरिसी ॥ नसे गिरिवासी प्रभु निजला ॥ ४ ॥

लावणी–गोपी आपले भ्रतारास ह्मणते–

म्हणे सुंदरा ऐका स्वामी विचार सुचला बरा ॥ सत्वर धाडा मज माहेरा ॥ धृ ॥ जपतो हरि मज धरावयासी त्याचि गोपिकामुळें ॥ बुडविलीं ज्यांनीं अपुलीं कुळें ॥ धाक नसे कवणाचा, उरलें स्वर्ग द्वय अंगुळें ॥ लागल्या पाठीं हरिच्या बळें ॥ त्यजिले गृहसुत पती आपुले पापपुण्याहि न कळे ॥ अशांचें मन तरि कैसें वळे ॥ होइल कैसें काय गृहांचें[11] संशय हा नच धरा ॥ १ ॥

---

१ उणें. २ बीज, मूळ. ३ सुख. ४ उमें राहिलें. ५ नांव ६ कोड, कौतुक. ७ उणीव, गुह्य गोष्ट. ८ घाम. ९ मालक, राजा १० गोपाळकृष्णाला. ११ घराचें

P Ganpat N Naidoo.

क्षणोक्षणीं हरिलागीं कथिती सकळ गोपिका अशा ॥ भ्रष्टवीं तिज-ला आम्ही जशा ॥ अशा प्रसंगीं नसेचि सहसा नामकीर्तिची अशा[1] ॥ मळेवू[2] कांहो धवल कुलयशा ॥ नष्ट दुष्ट पापिष्ट अशा त्या राहातिल उगल्या[3] कशा ॥ करितिल माझी बहू दुर्दशा ॥ या-साठीं मी ह्मणतें आतां वेळ नका करुं जरा ॥ २ ॥ दुःख नसे हरिनें जरि नेलें दहिंदुध अमुच्या घरून ॥ परि या कर्मे जाऊं मरून ॥ होइल कांहीं सौख्य गोकुळीं आलों आशा धरून ॥ पाव-लों फळ हें त्याचें भरून ॥ काय करावी सुरि सोन्याची ने ती काळिज चिरून ॥ मरावें व्यर्थ अशा कां करून ॥ गिरिवासी प्रभुनेंचि सुचविली हीच योजना करा ॥ ३ ॥

लावणी– (सासूसासरे गोपीच्या नवऱ्यास ह्मणतात)

सासुसासरे ह्मणति लागलें काय तुह्मांला पिसें ॥ करितां वंदन कवण्या मिसें[4] ॥ धृ ॥ मासचतुष्टय क्रमिले येथें नाहिं वंदिले तर्धीं ॥ आह्मि काय नव्हतों सदनीं कधीं ॥ काय वाटलें आजि तुह्मांला सांगा होतें अधीं ॥ भ्रंशली अशी कशी काय धी[5] ॥ चतुर शाहाणे तुह्मांसि अजवर मानित होतों सुधी[6] ॥ दिसेना लेशहि तु-मच्या मधीं ॥ अह्मीच न ह्मणों पुसा भासतें सकळांसहि हें असें ॥ १ ॥ होती स्थिर धी परंतु गमतें मदिरा[7] अजि प्राशिली ॥ तिनें ही कृती तुह्मां दाविली ॥ करिती वेडेचार असे ही दुर्गतिची माउली[8] ॥ ह्मणुनियां सुजनांही त्यागिली ॥ आज तुह्मां ही अ-नर्घ्य[9] वस्तू कोठें काशि घोंवली[10] ॥ कराया पान बरी भावली[11] ॥ वारावें तरि किती अरडातां बसले अमुचे घसे ॥ २ ॥ जामाता बहु दंग जाहला ह्मणे सुचेना मला ॥ कसा हा घोर जिवीं लागला ॥ अलों व्रजोंहुनि[12] असें सांगतां कंठ जरी शोषला ॥ कळेना वर्म

१ आशा २ पांढऱ्या अशा कुलाच्या कीर्तीला. ३ गुपचिप. ४ निमित्तानें. ५ बुद्धि ६ बुद्धिवान् ७ दारू, मद्य. ८ दुर्गतीची आईदुर्गतीची माउली सुरा मार्ता—मो-रोपंत ९ अमोल १० मिळाली ११ आवडली १२ गोकुळाहून.

कसें यांजला ॥ श्रम झाले अज पथीं ह्मणुनिया देह बहू भागला ॥ क्षुधेनें जिव व्याकुळ जाहला ॥ गिरिवासी प्रभुवांचुनि येथें कोण अतां मज पुसे ॥ ३ ॥

पद- गोपी ह्मणते-

जोगी-(माझा भरत देखिला काय)

म्हणें मी काय करूं देवा, अघटित कर्म कसें ॥ धु ॥ गेलें रक्षाया निज धर्म ॥ होइल यांतचि मजला शर्म ॥ अडवें अलें कोणतें कर्म ॥ नसे हें वर्म मज ठावें ॥ १ ॥ पतीविण स्पर्श मला नाहीं ॥ देतें मन माझें गाही ॥ घडला दोष इतर नाहीं ॥ अशी कां ही दशा माझी ॥ २ ॥ होता एक पती मजला ॥ दुसरा कोठुनि हा सजला ॥ तिसरा चौथाही दिसला ॥ जन्म कसला हा माझा॥३॥ धांवे गिरिवासी प्रभुराय ॥ शतशः पतीच माझे काय ॥ होइल कैसा तरणोपाय ॥ कसें हें काय वागावें ॥ ४ ॥

पद-गोपी निज मनीं खेद करिते.

(उद्धवाशांतवन)

कां क्षोभ ईश्वरें केला, मजवरि हें वर्म कळेना ॥ धृ ॥ पावलें जन्म मनुजाचा, हा निश्चय सुकृतठेवा ॥ वागलें सतत सन्मार्गें, कां हें घडेल प्रभुची सेवा ॥ मानिला पती ईश्वरसा, नाहिं केला किंचित् हेवा ॥ चाल ॥ असें कर्म कसें वडवडलें, कोणतें पाप मज घडलें॥ काशि दुर्घट व्यसनीं पडलें ॥ पू०चाल ॥ रडलेंच निरंतर जरि मी, सहसा हें विघ्न टळेना ॥ १ ॥ वागती सतत दुर्मार्गें, त्या अखंड सौख्यामाजीं ॥ दुर्दशा अशी कां केली, प्रभुवर्यें न कळे माजी ॥ किति दुःखास्पद हें झालों, मज लांछन पिशुनसमा जी ॥ चाल ॥ म्यां काय करावें आतां ॥ कोणि दिसेच ना कीं त्राता ॥ आठवूं कशाला भ्राता ॥ पू०चाल ॥ माताच त्रासली जेथें, इतरांचा पाड कळेना ॥ २ ॥ हा विचार सांगूं कवणा, कोण राखिल आतां

---

१ पुण्याचा ठेवा. २ पिशुन हलकट, पिशुनसमा-हलकटासारखें. जी-अहो.

मजला ॥ सांडिलें मला स्वजनांही, कोणि नाहीं त्यांतुनि ध-
जला ॥ या समयीं पावे ऐसा ईश्वर ही नाहीं पुजिला ॥ चाल ॥
हरपले यत्न अज अवघे ॥ पुढें भ्रतार दिसती चवघे ॥ कोण
कर्माची या चव घे ॥ धवं घेच ह्मणे गिरिवासी, तरि आझुनि
शरिर जळेना ॥ ३ ॥

---

१ पति. भावार्थ प्रभु ह्मणतो जोंपर्यंत तुझें शरिर म्हणजे शरीरांतील अभिमान जळाला नाहीं तोंपर्यंत इतक्यानेंच झालें नाहीं तर आणखीहि पती तुला दिसतील.

श्रीकृष्णांनीं अर्जुनास माया दाखविली तें आख्यान.

कथा–सारांश.

कौरवपांडव यांचें युद्ध झाल्यानंतर धर्मराजास राज्याभिषेक झाला. सर्व काम आटपल्यामुळें 'आह्मांला घरीं जाण्यास परवानगी द्या' असें श्रीकृष्ण धर्मराजास ह्मणाले. श्रीकृष्णाचा वियोग होतो यामुळें धर्मराजास फार दुःख झालें. नंतर श्रीकृष्ण भीम व अर्जुन यांचा निरोप घेण्याकरितां गेले, व त्यांस ह्मणाले कीं 'तुह्मांला राज्य मिळवून दिलें आतां परवानगी द्या.' तेव्हां दोघेही ह्मणाले 'आम्हीं आपल्या पराक्रमानें राज्य मिळविलें, तुह्मी फक्त सारथ्याचें काम केलें; असें असून सर्व श्रेय तुम्ही घेतां हें मोठें नवल आहे, तेव्हां उभयतांसही गर्व झाला आहे असें श्रीकृष्णांनीं ओळखलें. नंतर श्रीकृष्ण नकुल व सहदेव यांकडे निरोप घेण्याकरितां गेले. ते ह्मणाले, आमचेकडे काय आहे? तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले, भीमाला व अर्जुनाला गर्व झाला आहे, याजकरितां मी थोडा चमत्कार दाखविणार आहें.' नंतर श्रीकृष्ण द्वारकेस निघून आले. थोडे दिवसांनीं श्रीकृष्ण गारुडी बनून आले. त्यांनीं समागमें एक लहानसा सर्प व एक लांकडाचा घोडा आणिला होता. तो सर्प भीमाच्यानें उचलला नाहीं. अर्जुन घोड्यावर बसला. त्या घोड्यानें त्याला समुद्रांत नेलें. तेथें त्याला शंखिनी नांवाची राक्षसीण भेटली. तिच्याशीं अर्जुनानें लग्न केलें. तिला पांचशें मुलें व तितक्याच मुली झाल्या. अर्जुनाला सर्व कामें करावीं लागलीं. अर्जुन पाणी आणण्याकरितां समुद्रतीरीं आला, तेथें तो लांकडांचा घोडा त्यास दिसला. त्यावर तो बसला, व पुन्हां खेळ चालला होता तेथें आला. लागलीच पाठोपाठ शंखिनी आपले परिवारासह तेथें आली व तिनें आपली सर्व हकीकत सभेंत धर्मराजास सांगितली अशी कथा या आख्यानांत आहे.

आर्या.

राज्याभिषेक सुदिनीं १विधिनें करवूनि धर्मराजाला ॥
झाला निवांत यदुविर स्तवनें संतोषवी धरा ज्याला ॥ १ ॥
देव ह्मणे मज पांडव होते प्रार्थीत संकटामाजीं ॥
आहे तीच मती कीं कांहीं करितात हेळणा माजी ॥ २ ॥

---

१ विधियुक्त.

 P Ganpat N Naidoo.

एके दिवशीं यदुविर विनवी येऊनि धर्मरायास ।
जावें द्वारवतीला आहे मानस, निरोप द्या यास ॥ ३ ॥
अजवरि अपुल्या धामीं केली सेवा मला जशी सुचली ।
झालें कार्य अतां परि न कळे प्रभुच्या मना कशी रुचली ॥ ४ ॥
धर्म ह्मणे देवाजी केलें रक्षण अखंड दासाचें ।
जा तरि ह्मणवेल कसें, चित्तीं आणूनि हें वदा साचें ॥ ५ ॥
अंतरिं गहिंवरुनि ह्मणे धर्मासम भक्त मज न आढळला ।
निर्वैर पृथ्विमंडळ आलें हातां तरी न हा ढळला ॥ ६ ॥
अन्य दिनीं भीमासहि गांठुनि मागे निरोप जायाचा ।
दिधलें राज्य तुह्मांला निशिदिनिं आठव करीत जयाचा ॥ ७ ॥
भीम वदे स्वबळानें मेळविलें सकळ राज्य देवाजी ।
केलें कार्य तुह्मीं तें खाजविले सतत जिष्णुचे वाजी ॥ ८ ॥
धरिलें शस्त्र कधीं तरि केलें युद्धांत काय तें कळवा ।
कळ वाढविली आह्मीं रिपु-गण केला रणांगणी पळवा ॥ ९ ॥
दिधलीं वस्त्रें उत्तम अन्नहि सुग्रास नित्यखायाला ।
झालें वपु दृढ ऐसें संकट इतरांसि ओळखायाला ॥ १० ॥
उपकार काय मग तो बोलुनियां स्पष्ट मजसि दावाना ।
इच्छा विशेष याहुनि तरि धर्मासचि विशंक जा वना ॥ ११ ॥
यावरि धनंजयातें एकांतीं यदुपती वदे काय ।
दिधलें राज्य किती हें प्रिय भक्तांलागिं मी न दे काय ॥ १२ ॥
केलें रक्षण अजवरि याचा स्मर अंतरीं सदा राहो ॥
समयीं सर्व पुरविलें ह्मणणें लागों दिलें न दारीं हो ॥ १३ ॥
पार्थ ह्मणे यदुवर्या ह्मणतां हें जरि असत्यसें नाहीं ।
सांगा तुह्मींच वधिली किंवा आह्मीं समस्त सेना ही ॥ १४ ॥

---

१ अर्जुनाचे. २ घोडे ३ दाणादाण ४ तुमचें शरीर इतकें पुष्ट झालें आहे कीं इतरांना ओळखावयास संकटच पडेल. ५ स्तुति करा. ६ स्त्री. अर्जुनाकरितां कृष्ण एकदां सुभद्रा झाले होते त्याला उद्देशून हें वचन आहे.

दिधलें राज्य कसें मग ? केला विक्रमहि काय तो दावा ।
कांहींच नसे, तरि हा कैसा चित्तांत बोल नांदावा ॥ १५ ॥
गेला मुकुंद तेथुनि माद्रीतनयांसही पुसायास ।
वडिलीं आज्ञा दिधल्यां, नाहीं कारण अह्मां रुसायास ॥ १६ ॥
आहोंत पांडवांतचि परि अमुचा सर्वथा नसे केवा ।
सेवा करुनि तिघांची असतों अपणांसि ठाउकें देवा ॥ १७ ॥
देव ह्मणे मज करणें आहे लीला तुह्मांसि कळवीतों ।
भीमार्जुन अति उद्धत झाले त्यांच्या यशासि मळवीतों ॥ १८ ॥
श्रुत कवणांहि न करितां स्वस्थपणें कर्म जरि विलोकाल ।
त्रिजगीं सुकीर्ति तुमची होइल मन्नाम नित्य घोकाल ॥ १९ ॥
वदती मार्¹य विभो वडिलांची जरि अकीर्ति करवाल ।
तरि ती घातक आह्मां होईल अपवादरूप करवा²ल ॥ २० ॥
यासाठीं न धरावा आग्रह प्रभुंनीं असेंचि विनवीतों ।
असतें मनींच अमुच्या तरि मग अपणां न काय शिणवीतों ।२१॥
देव ह्मणे स्वस्थ असा होइल तें तें उगेंचि अवलोका ।
भीमार्जुन अति दुर्बल हें श्रुत करणार मी सकळ लोकां ॥ २२ ॥
ऐसें बोलुनि यदुविर आला तत्काल द्वारकेमाजीं ॥
बळिरामासि ह्मणे हो या समयीं साह्यता करा माजी ॥ २३ ॥
करणें खेळ असें मज अजवरि कोणी विलोकिला नाहीं ॥
वर्णूं काय स्वमुखें श्रुतही कवणा नसेल कानांहीं ॥ २४ ॥
होइन मी गारोडी सर्पाकृतिनें तुम्हीहि पेटारा ॥
बैसुनि चला मजसवें दाविन मग खेळ हा तुम्हां सारा ॥ २५ ॥
लघुतर रूप असावें परि तें जड मेरु पर्वतासि तुं³के ।
इतकेंचि द्या पुरे मज वरकड पुरवीन न्यून जें जितुकें ॥ २६ ॥
राम ह्मणे अहिचें रूप धरणें मजलागिं काय अवघड तें ।
अप्रतिम खेळ तुमचा अनयासें पाहणें अह्मां घडतें ॥ २७ ॥

---

१ पराक्रम २ तरवार. ३ तुळना करील असें.

मग तो हरि गारोडी भेटे येऊनि धर्मरायाला ।
सांगे खेळ अपूर्वाचि लोक चतुर्दश जमा करायाला ॥ २८ ॥
पत्रें धाडुनि धर्में चवदा भुवनेंहि करविलीं गोळा ।
भोळा यदुवीर ह्मणे न दिसे यदुनाथ यामधीं डोळां ॥ २९ ॥
आहे मर्मज्ञ प्रभु जरि तो येईल द्वारकावासी ।
होइल कीर्ति जगत्त्रयिं त्याच्या योगें चढेन नांवासी ॥ ३० ॥
धर्में चार प्रेषुनि जाणविले वृत्त द्वाराकापतिला ।
येतांचि यादवांसह करिती संपूर्ण एकदा नतिला ॥ ३१ ॥
धरिलें रूप शिवाचें नाहीं तिळमात्र भेद ज्या माजीं ।
वाहे गंगाहि शिरीं ते जळ लागे जनांचिया माजीं ॥ ३२ ॥
आकंठ जळ जनाला होतां झालेचि घाबरे हो ते ।
ह्मणती खेळ कशाचा सदनीं असतों तरी बरें होतें ॥ ३३ ॥
आवरितां जळ झालीं वस्त्रें तत्काल शुष्क अवघ्यांचीं ।
आनंदले सकळ जन ह्मणती पाहूं विरामें लव घ्याची ॥ ३४ ॥
उघडुनि मग पेटारा हरिनें बाहेर काढिला नाग ।
सांगे धर्मासि अधीं वदतों याचा धरूं नये राग ॥ ३५ ॥
हो पांडवांत कोणी स्वबळें अहिला धरूनि फिरवावें ॥
अश्वावरि बैसुनियां अंबरमार्गीं तयासि थिरवावें ॥ ३६ ॥
जरि हें न घडेल तरी द्वादश वर्षें वनांत राहून ।
अज्ञातवास वर्षचि यावें भुवनासि कष्ट साहून ॥ ३७ ॥
तोंवरि राज्य करिन मी कळवावें वृत्त हें स्वभावांला ॥
करितिल यत्न तसा ते, मी त्यांच्या जाणतों प्रभावाला ॥ ३८ ॥

---

१ श्रीकृष्णांनीं गारुड्याचे रूप धरिलें होतें खरें, पण धर्मराजाच्या निमंत्रणावरून कृष्णरूपानेंहि आले. २ लोकांच्या कमरेपर्यंत पाणी लागलें ३ विश्रांति. ४ आकाशमार्गी ५ स्थिर ठेवावें. ६ आपल्या भावांना.

धर्म[1] म्हणे देवा हा सुयोधनाचा सखाचि मजवाटे ।
नलगे खेळ, पुरे हा, लावावें द्वारकोसि या वाटे ॥ ३९ ॥
देव वदे कां भीतां भीमार्जुन वीर काय सामान्य ।
हा तरि गारोडी कीं याचा मग बोल कायसा मान्य ॥ ४० ॥
बोले भीम सगर्वचि वामकरानें अहीस उचलीन ।
बहुधा फिरवुनि यातें मुष्टिप्रहारें करुनि कुचेलीन[2] ॥ ४१ ॥
नुचले अहिवर सहसा खिन्न–मनें मग उगाचि तो राहे ।
जन ह्मणती आजवरी मिरवित होते उगाचि तोरा[3] हे ॥ ४२ ॥
अर्जुनही बहु गर्वें बैसे येऊनियां हयावरतां ।
आवरितां धरणीवरि परि गगनीं जाहलाचि आंव[4] रितां ॥ ४३ ॥
फिरला दिवस–निशि त्रय क्षणलव विश्राम तो न दे वाजी ।
चित्तीं म्हणे असें मज पडलें संकट कधीं न देवाजी ॥ ४४ ॥
रविमंडळासि तो हय जाउनि उतरे समुद्रतीरास ।
बुडतां जळींच जरि तो सांपडता वृक्षवट न वीरास ॥ ४५ ॥
हरिनेंहि योगमाया बोधुनियां धाडिली तयाजवळ ।
राक्षस रूपीं प्रगटे गमली आतां करील ही कवळ[6] ॥ ४६ ॥
ती पार्थासि[7] ह्मणें मज वरिल्या निःशंक प्राण वांचवितें ।
आजवरि अनुच्छिष्टा विषयसुखाच्या हि नित्य घ्या चवितें ॥४७॥
पाणिग्रहणावांचुनि अन्य दिसेना उपाय हो कांहीं ।
यास्तव रुकार दिधला कीं देवें धाडिली सुनौका हीं ॥ ४८ ॥
होतां संभोग तिशीं मानी कृतकार्य जाहलें धन्या ।
धरिला गर्भहि तत्क्षणिं प्रसवे सुत पांचशत[8] तशा कन्या ॥ ४९ ॥

---

१ प्रेक्षकांत असलेल्या कृष्णाला धर्म म्हाणाला. २ टेंचून टाकीन. ३ घमेंड ४ ऐट, ५ पोकळ. ६ घास. ७ मी अद्यापि अभुक्त म्हणजे कुमारी आहें. ८ पांचशें मुलें व पांचशें मुली झाल्या.

P Ganpat N Naidoo.

सांगे प्रसूति होतां घ्या घट जा जीवनासि तांतडिनें ।
धान्य दळुनि पाकाचें कृत्य तुह्मावीण कोणता तडिं ने ॥ ५० ॥
जरि हें न कराल अहो पुसतें जाऊनि धर्मरायासी ॥
कां न करावीं कृत्यें पतिनें स्त्री लागली मरायासी ॥ ५१ ॥
शय जोडुनि पार्थ म्हणे करितों संपूर्ण मीच गृहधंदा ॥
आहे फळ हें त्याचें आलें राशीस नष्ट ग्रह यंदां[2] ॥ ५२ ॥
गर्भ प्रसूति जैसी बाळेंहीं वाढलींच त्यापरि तीं ॥
ओढिति पार्थासि बळें दे खाया ह्मणुनि रोदना करिती ॥ ५३ ॥
कांडी कुटी तदुपरी दश-शत बाळांसि भोजनें करवी ॥
भरवी पुनःपुन्हा तरि माया अन्नांस तत्क्षणीं जिरवी ॥ ५४ ॥
घाबरला पार्थ मनीं जाऊं कोठें अतां करूं काय ॥
पाय धरूं कवणाचे रक्षण होईल तरि कसा कांय[3] ॥ ५५ ॥
पुनरपि हय सिंधुतटीं येतां अर्जुन तयावरि चढला ।
आला सभांगणांतचि नाहीं कोठेंहि तो पर्थी अडला ॥ ५६ ॥
पार्थ ह्मणे जरि झाले कष्ट जिवाला नसेचि हो परवा ।
श्रुत नाहीं कवणातें दैवें हा योग साधिला बरवा ॥ ५७ ॥
झाला वेळ न कांहीं आली घेऊनि ती मुलें सारीं ।
झालें श्रुत धर्मातें हांसे चित्तांत फार कंसारी ॥ ५८ ॥
धर्म ह्मणे देवाजी आधीं अणवूनियां समाचारा ।
जरि दुःखाकुल बहुतांचे असेल तरि मग सभेंत पाचारा ॥ ५९ ॥
पार्थ ह्मणे काय त्वरा होतो हा खेळ होउंद्या सारा ।
बैसुनियां स्वस्थपणें असेल व्यवहार तो उद्यां सारा ॥ ६० ॥
देव ह्मणे दीनाचे कष्ट हराया विलंब कां तरि तों ।
जे जन पीडित त्यांच्या अखंड चित्तासि घोर कातरितो ॥६१ ॥
वदली कृष्णासि असें फाल्गुन आधीं भ्रतार कां झाला ।
झाली प्रजा ह्मणुनियां जन त्यजिती काय हो स्वकाजाला ॥६२॥

---

१ शेवटास. २ यासालीं ३ शरीर ४ श्रीकृष्ण. ५ कातरतो, तोडतो.

देव ह्मणे जो अर्जुन फाल्गुन त्यालाचि ह्मणति जन पाहे ।
चाल सभेंत तुझें मी कळवीतों वृत्त सर्व जनपा हें ॥ ६३ ॥
येतां सभेंत धरिती बाळें कित्येक अर्जुनास करीं ।
ही युवती पार्थाची ऐसें श्रुत देवही जनांस करी ॥ ६४ ॥
गिरिवासी प्रभुनें तो नकुळाकरवीं भुजंग उचलीला ।
सहदेव अश्व फेरी ऐसी अनुपम्य दाविली लीला ॥ ६५ ॥

याच आख्यानाचीं पदें.

पदें

दिंडी (द्वारपाळ धर्मास सांगतात)

चरण वंदुनिया वृत्त द्वारपाळें ॥ समुळ कथिलें रायासि[1] त्याचि वेळे ॥ उभा गारोडी एक द्वारदेशीं ॥ नसे त्याच्या कोणीच साम्यतेसी ॥ १ ॥ नाहिं नाहीं देखिला पुरुष ऐसा ॥ अती तेजस्वी रमाकांत जैसा ॥ करिन ह्मणतों मी खेळ दिव्य राया ॥ अलों कीर्ती ऐकूनि याचि ठायां ॥ २ ॥ राय बोले आतांचि अणा त्यासी ॥ लोक सारे येथील ग्रामवासी ॥ अला गारोडी त्वरित सभेमाजी ॥ धर्म झाला पाहूनि त्यास राजी[2] ॥ ३ ॥

साकी (गारुडी म्हणतो)

बाजीगर[3] हूं द्वारवतीका अजब खेल बतलावूं गा ॥ जैसी कीरत सुन आया हूं इनामभी फिर पावूंगा ॥ १ ॥ अरज हमारी सुनो महाराज लोक–चतुर्दश बुलवाना ॥ जिसमें नाम गरिबका होवे खिलात[4] वैसी दिलवाना ॥ २ ॥

---

१ राजाला. २ प्रसन्न ३ गारोडी. ४ इनाम.

पद (धर्मराज कृष्णास ह्मणतो) गझ्यानो कृष्ण गडीअपुला.

युधिष्ठिर वदे देवराया ॥ करविणें खेळाचि हा वांया ॥ धृ ॥ गारोडी म्हणों कसा यासी ॥ पाहातो राज्य हरायासी ॥ देउनि वचन कौरवांसी ॥ अला हा गमे छळायासी ॥ जाउ द्या येथुनि निजठायां ॥ १ ॥ त्यजुनियां कुलशिल नांवासी ॥ खेळलों द्यूत कौरवांसी ॥ जाहले कष्टहि जीवासी ॥ द्रौपदीसहित बांधवांसी ॥ होइल कारण हिणवाया ॥ २ ॥ पावलों राज्य सकल देवा ॥ हा तरि प्राक् संचित ठेवा ॥ नसे मज अतां तिळहि हेवा ॥ करूं कां व्यर्थचि निच-सेवा ॥ कष्टली अजवरि बहु कांया[1] ॥ ३ ॥ म्हणे मग गिरिवासी प्रभुराय ॥ भीतां भणगासी[2] या काय ॥ नाशिला कुरुपतिचा तुह्मी काय ॥ तसा हा बलाढ्य तरि हो काय ॥ बोलणें याचें हें वांया ॥ ४ ॥

दिंडी—(स्त्री पार्थास ह्मणते)

ह्मणे झाले कीं प्रसुत[3] प्राणनाथा ॥ कोण घेइल हा भार शिरीं आतां ॥ नसे दुसरें कोणीच हो बहार्यां[4] ॥ तुह्मां ऐसी इतरांसि कुठुनि माया ॥ १ ॥ दळण कांडण जा करा नीर आणा ॥ बहू झालें मी क्षीण मनीं आणा ॥ पहा दिसतीं लेकुरें केविलवाणीं ॥ असुनि खाया त्यां करूं नका वाणी ॥ २ ॥

(पार्थ उत्तर देतो)

अंजनीगीत.

फाल्गुन ह्मणे वो सुंदरी ॥ घट तरि कैसा घेऊं शिरीं ॥ नीराहि कूपीं सिंधुतिरीं ॥ आणूं मी कैसा ॥ १ ॥ जातें ओढीतां मज नये ॥ पेषण कैसें होइल प्रिये ॥ याचें वाटतें मज भय ॥

---

१ शरीर. २ दरिद्रयाला ३ प्रसूत, बाळंत ४ बोलावण्यास ५ कमती. ६ दळण

करूं तरी कैसें ॥ २ ॥ पांक करणें ठाउक नसे ॥ एकाएकीं येइल कसें ॥ संकट पडलें मजला ऐसें ॥ करूं गत मी कैशी ॥ ३ ॥ मुसळाचि धरितां नये आधीं ॥ कांडण तरि मग व्हावें कधीं ॥ व्यर्थाचि जाइल आवधी ॥ करूं तरि काय ॥ ४ ॥ सहसा होइचना मज करीं ॥ कामें आपुलीं तूं आवरीं ॥ बाळें पिडितिल मजला तरी ॥ करूं मग कैसें ॥ ५ ॥

झुलना (घनाक्षरी)

कांहीं कळो नदे कांट ॥ घेउनि निजली हो खाट ॥ पोरें करिती बोभाट ॥ धरिति हाट भलतसा ॥ १ ॥ काय ठेविल तो टूक ॥ ह्मणती क्षणोक्षणीं भूक ॥ माया लावी जरि चूक ॥ सोशि मूक बधिरसा ॥ २ ॥ वाढि पात्रीं दहिभात ॥ खाउनि ओडवितां हात ॥ इतर करिती आकांत ॥ पाहे तात घाबरा ॥ ३ ॥ ह्मणें करूं आतां काय ॥ धरूं कवणाचे पाय ॥ दाविल कोण मज उपाय ॥ चुके अपाय हा कसा ॥ ४ ॥

पद (अर्जुन म्हणतो) उद्धवा शांतवन कर जा

घातलें संकटीं धर्में, सांगावें कवणापाशीं ॥ धृ० ॥ हा खेळ कशाचा रायें, घेतला प्राणाचि अमुचा ॥ अह्मि व्यर्थाचि कीं हो भुललों, हा बंधु तरी कवणाचा ॥ असे विदित जना सकळांसी, म्हणती हा पुत्र यमाचा ॥ चाल ॥ मग दया कुठुनि हो त्यासी ॥ गुंतलों अह्मीं मोहपाशीं ॥ हरविली द्रौपदी खासी ॥ पू० चाल ॥ दासीच दुर्जनें गणिली, नाहिं आला घाम तयांसीं ॥ १ ॥ काय आठवावें गुण त्याचें, कंठिल दिवस वनवासी ॥ अज्ञातवासही तैसा, बहु झाले कष्ट जिवासी ॥ क्लीबत्व स्वीकारुनि नया, केली

---

१ स्वयंपाक. २ वेळ ३ कपट ४ बाज ५ हट्ट ६ व्यवस्था ७ द्रौपदी द्यूतांत हरविली त्याला उद्देशून हें आहे.

सेवा करुं नये तैसी ।। चाल ।। नाहिं सौख्य प्राप्त कधिं झालें ।।
घातलें रिपूंनीं घाले ।। परि मैंद न हा तिळ हाले ।। पू०चाल ।।
केलेंच हाल त्या सतिचे, कीचकें विदित सकळांसी ।। २ ।। हा
प्रसंग त्याहुनि खोटा, कोणि दिसेचना मज त्राता ।। काय समय
तरी युद्धाचा, योजावें रिपुच्या घाता ।। काहिं अंतर कामीं पडतां
राक्षसी मारिल लाता ।। चाल ।। दळ दळुनी थकल्या बाह्या ।।
लागलों सतत निरवाह्या ।। नसे दुसरें कोणी बाह्या ।। पू०चाल ।।
साह्यास कवण पाचारूं, धांवे पावे प्रभु गिरिवासी ।। ३ ।।

---

१ बोलावण्यास.

गोपीचंद राजाचें आख्यान.

आर्या.

राजा बंगालेका सबहि पुकारे तिलोकचंद जिसे ।
कांता मैनावती कुवर भया एक गोपिचंद जिसे ॥ १ ॥
दूजा मदन कहावे बारासे कामिनी विहोनीथी ।
सोलासे सैलींया *चंद्रबदानिया सभी[3] सुहोनी थी ॥ २ ॥
उसनगरीमें जोगी जालंदरनाथ नाम रेहता था ।
बभुत चढावे कंथा डारं गले, गुरु अदेस केहता था ॥ ३ ॥
सबदिन बेन[6] बजावे मृग छाला[7] कुर्वारि हाथले तुंबा ।
आसन जायं[10] मलिनपर कर बैठे, करत लोक आंचबा ॥ ४ ॥
लकरी लाय विपिनसे[11] सिरले[12] वह[13] अधर साथ चलि आवे ।
देखे मैनावंती माते अचरजतभी[14] चली आवे ॥ ५ ॥
घेउनि आली आली[15] आली[16] गुरु पाद पंकजी जाली ।
घाली रुंझि निघाली पुनरपि पडली न संसृती[17]–जाली ॥ ६ ॥
प्रार्थुनि गुरुसि ह्मणे हो बुडते भव सागरांत मज तारा ।
वारा संकट अवघें वाटे मजलागि हें भवन[18], कारा[19] ॥ ७ ॥
क्षणिकचि वैभव सारें शाश्वत कांहींच मज दिसेना हो ।
कथिते अनुभव अपुला पाहतां पहातांचि संपला[20] नो[21] हो ॥ ८ ॥
नाथ ह्मणे मज ठावा नाहीं उपदेश गुरु कसें करिती ।
गांठी जाउनि त्यांसाचि जे कां शिष्यासिं निज करीं घरिती ॥ ९ ॥

---

१ मुलगा २ लग्नाच्या होत्या ३ सर्वही सुदंर ५ घालून ६ वाद्यविशेष ७ चर्म कुवरी ९ भोपळा १० मळिन जागवर ११ रानांतून १२ शिरसे अधर डोक्यावर न टेकता १३ ते मोळी १४ आश्चर्य १५ सखी १६ भ्रमरी १७ प्रपंच्याच्या जाळ्यात *चंद्राप्रमाणें आहेत मुखें ज्यांची अशा. १८ गृह. १९ बंदीखाना. २० मृत्यु पावला २१ नवरा.

गोपीचंद राजाचें आख्यान.

आर्या.

राजा बंगालेका सबहि पुकारे तिलोकचंद जिसे ।
कांता मैनावती कुवर[1] भया एक गोपिचंद जिसे ॥ १ ॥
दूजा मदन कहावे बारासे[2] कामिनी विहानीथी ।
सोलासे सैलींया *चंद्रबदानिया सभी[3] सुहानी थी ॥ २ ॥
उसनगरीमें जोगी जालंदरनाथ नाम रहेता था ।
बभुत चढावे कंथा डार[5] गले, गुरु अदेस कहेता था ॥ ३ ॥
सबदिन बेन[6] बजावे मृग छाला[7] कुवरि हाथले तुंबा ।
आसन जाय[10] मलिनपर कर बैठे, करत लोक आंचबा ॥ ४ ॥
लकरी लाय विपिनसे[11] सिरले[12] वह[13] अधर साथ चलि आवे ।
देखे मैनावंती माते अचरज[14]तभी चली आवे ॥ ५ ॥
घेउनि आली आली[15] आली[16] गुरु पाद पंकजी जाली ।
धाली रुंझि निघाली पुनरपि पडली न संसृती[17]—जालीं ॥ ६ ॥
प्रार्थुनि गुरुसि ह्मणे हो बुडते भव सागरांत मज तारा ।
वारा संकट अवघें वाटे मजलागि हें भवन[18], कारा[19] ॥ ७ ॥
क्षणिकचि वैभव सारें शाश्वत कांहींच मज दिसेना हो ।
कथिते अनुभव अपुला पाहतां पहातांचि संपला[20] नाँ[21] हो ॥ ८ ॥
नाथ ह्मणे मज ठावा नाहीं उपदेश गुरु कसें करिती ।
गांठी जाउनि त्यांसाचि जे कां शिष्यासि निज करीं धरिती ॥ ९ ॥

---

१ मुलगा २ लग्नाच्या होत्या ३ सर्वही सुंदर ५ घालून ६ वाद्याविशेष ७ चर्म कुवरी ९ आपळा १० मलिन जागेवर ११ रानांतून १२ शिरसें अधर डोक्यावर न टेकतां १३ तें मोळी १४ आश्चर्य १५ सखी १६ भ्रमरी १७ प्रपंचाच्या जाळ्यात *चंद्राप्रमाणें आहेत मुखें ज्यांचीं अशा. १८ गृह. १९ बंदीखाना. २० मृत्यु पावला २१ नवरा.

तरि ती ह्मणे तुह्मांसचि आलें मी शरण अन्यथा नाहीं ।
मातेनें निज बाळक लावावें काय अन्यथानांहीं ॥ १० ॥
पाहुनि सद्भाव तिचा उपदेशामृत यथेच्छ पाजविलें ।
झाली भक्तशिरोमणि कलिच्या राज्यांत नांव गाजविलें ॥ ११ ॥
एके समयीं राजा उठोनि अंतः पुरांत जो गेला ।
पाहे स्त्रिया सकल परि माता न दिसे ह्मणूनि रागेला ॥ १२ ॥
कोणी अपमान तिचा केला हें वृत्त मज न कळवाल ।
तरि निश्चयेंचि अपुल्या सर्व सुखांलागिं आंजि पळवाल ॥ १३ ॥
विनविति कर जोडुनियां स्वामी तुमच्या कुळासि डाग अधीं ।
नव्हता परि मातेनें या योगें लाविलाच हो आधीं ॥ १४ ॥
जालंदर नाथाच्या एकांतीं रगडितात पायासी ।
गुरुमंत्र हें निमित्तचि केलें अपवाद ह्मा लपायासी ॥ १५ ॥
हें ऐकतांचि चढला रायासहि कोप, नावरे साच ।
झाला भ्रमित गमे तो कांहीं वेळांत बावरे साच ॥ १६ ॥
पाचारुनि निज मंत्री सांगे जालंदरासि आणाया ।
दे आज्ञा निज भृत्या–लागी तत्काल कूप खाणाया ॥ १७ ॥
प्रार्थी प्रधान गुरुसी रायें अपणासि त्वरित आणविलें ।
व्हावें दर्शन तुमचें आहे इच्छा असेंहि जाणविलें ॥ १८ ॥
नाथ गुरू जालंदर आले त्याच्या सवें नृपापासि ॥
वरि वरि वंदन करि जरि तरि अंतरि तो न भीच पापासीं ॥ १९
आशिर्वादें राया तोषावि तरि तोषला न तो मानी ।
कथिलें हित सुजनांहीं त्यासहि विपरीत हें असें मानी ॥ २० ॥
गुरु जालंदर होता मग्न समाधींत त्यासि कूपांत ।
घाली, लीद हि त्यावरि ऐसा कोणी न अन्य भूपांत ॥ २१ ॥

---

१ वेडा होईल कीं काय.

धुंड फिरी सब नगरी जालंदर नाथ की सुधं[1] न पायी ।
रोवे मैनावंती अब मि करु कौनसी जुगंत[2] मांयी[3] ॥ २२ ॥
सोवे नीद न आवे रौन[4] करे सोंचे[5] अन कहां जाऊं ।
गुरु पग बिना मुझे नहि चैन कहां नाथजी तुम्हे पांऊं[6] ॥ २३ ॥
एके दिवसी राजा मांडुनि चौरंग अंगणा माजीं ।
बैसे, तैल सुगंधिक लाविति शिरि कितिक अंगना माजीं ॥ २४ ॥
माता मैनांवाति हि पाहे पुत्रासि मदन सम काया ।
नेतो सर्व जगासचि विलया नेईल मग न यम कां या ॥ २५ ॥
व्हाया देह अमर हा योजूं तरि कोणत्या उपायासी ।
असते गुरु जालंदर करितें शत वार नमन पायासीं ॥ २६ ॥
होती अमरचि काया हा दैवा सद्गुरू कसा नेला ।
गेला कोठें नकळे कीं आहे गुप्त या स्थळीं ठेला[7] ॥ २७ ॥
या खेदें जननीच्या आलें तत्काल उदक नेत्रांसी ।
पडतां बिंदु शरीरीं वाटे आश्चर्य फार पुत्रासी ॥ २८ ॥
नसतां अभ्र कसें हे पडले बिंदू ह्मणून वर पाहे ।
तो देखे मातेतें दुःखें व्याकूळ जाहली आहे ॥ २९ ॥
पुसतां कारण सांगे दुःखाचें निज सुतासि ती माय ।
बापा सुंदर काया जाइल विलयासि तरि करूं काय ॥ ३० ॥
वाटे चिंता मजला आलें नयनासि नीर या साठीं ।
क्षणिकाचि वैभव सारें याच्या कां लागतोसि बा पाठीं ॥ ३१ ॥
सद्गुरुला शरणाचि हो होइल बापा तुझी अमर काया ।
या भव जळांत पुष्कळ मेले खाउनि अशाच गटकाया[8] ॥ ३२ ॥
भूप ह्मणे मातेला मज तो कोणी दिसे न या लोकीं ।
सारेचि मरणधर्मी[9] इतरां करितील काय अवलोकीं ॥ ३३ ॥

---

१ शोध. २ युक्ती. ३ आईग (शोक प्रदर्शक.) ४ रात्रीं ५ विचार. ६ कोठें भेटूं. ७ ठेवलेला. ८ गटांगळ्या. ९ मरणें हा धर्मच आहे ज्यांचा ह्म०नश्वर.

माय ह्मणे जरि असते गुरु जालंदर तुला करीं धरिते ।
करिते मुक्त भवांतुनि सोडविलें प्रभुवरें जसें कारितें ॥ ३४ ॥
नाथ गुरू जालंदर आले होते तुझ्याचि सदनासीं ।
तैं पासुनियां अजवर बा त्यांच्या लोकिलें न वदनासी ॥ ३५ ॥
हें ऐकतांचि नृपवर अंतरि बहु खोंचला न वदला हो ।
चित्तीं ह्मणे वृथा म्यां दवडीला सद्गुरु [2]प्रपदलाहो ॥ ३६ ॥
माता शोक करी बहु चित्तीं अठऊनि सद्गुरू पाय ।
जाऊं कोठें पाहूं यालागीं कोणता करूं उपाय ॥ ३७ ॥
धूंडत गिरि गव्हरमों जालंदर कीं कहीं न सुध पाया ।
एक दिन वह कानीफा देखे एक आम्रवृक्षकी छाया ॥ ३८ ॥
वृक्ष तले कानीफा ले उतरा छात्र[3] [4]सातसे अपने ।
आसन धुनी लगाकर ले माला हाथमें लगे जपने ॥ ३९ ॥
इतनेमें गोरक्षक जो चेला नाथ-गुरु-मछंदरका ।
आया सब चेलोंसे वृक्षतले भेस[6] ले कलंदरका[7] ॥ ४० ॥
गोरक्षक कानीफा बैठ रहे गुरु अदेस कर अपना ।
पूछे गुरु बतलाये पथ गुरुका तंत्र मंत्र जो जपना ॥ ४१ ॥
गोरख कहे कानीफा भूक लगी आम्रफल उतारोगे ।
देऊं उतार सबही फिर जहांके फल तहां बिठावोगे ॥ ४२ ॥
इतना कह कानीफा बिद्यासें फल सभी उतारलियो ।
खाये सबही मिलकर गोरख जहांके तहां लगाय दियो ॥ ४३ ॥
पूछत कानीफासे तीरथ अब कौन कोन कर आये ।
फिर जावोगे कहांपर है मेला कौन जो ने सुनपाये ॥ ४४ ॥
कानीफा जूं बोले धूंडत हूं देस गिरि गुहा बनमें ।
गुरु जालंदर न मिले अब पूरबकी [11]अई सफरमनमें ॥ ४५ ॥

---

१ पाहिले २ सद्गुरु चरणांचा लाभ. ३ शिष्य ४ सातसें. ५ शिष्यासह वर्तमान. ६ वेषघेऊन. ७ फकीरांतील एक विशिष पंथ ८ संतांचा मेळा ९ जो. १० ऐकलेला. ११ आली.

इतना सुन गोरक्षक कानीफासे बिनोद कर बोले ।
गुरुकी खबर न जिसको औरनंकी काहेको खबर बोले ॥ ४६ ॥
राजा बंगालेका कहते है सबहि गोपिचंद जिसे ।
जालंदरको डाला है कूवेमें भई न खबर किसे ॥ ४७ ॥
बारा वरस हुवे उस खाईमें डार लीद है गेरा ।
जालंदरको तबसे मानो किसिनें न आज लग हेरा ॥ ४८ ॥
पुछत गोरक्षकसे आये कहांसे कहावें जावो गे ।
तीरथ कौन कियेहो अब चेलोकों कहा न्हलावोगे ॥ ४९ ॥
धुंडत हूं मैं गुरुको नाथ मछंदर मिले कहीं तुमसे ।
कानीफा जूं बोले है ईस्त्रीराजमें मिलो उनसे ॥ ५० ॥
इस्त्री लंपट गुरुकी कौन बढाई करे कहो हमसे ।
वोही गुरु साचा है जो चेलोंको छुडाय ले जमसे ॥ ५१ ॥
यापरि संवादुनियां गेले तेथुनि गुरुसि धुंडाया ।
पाहुनियां जन ह्मणती आल्या कोठूनि काय झुंडा या ॥ ५२ ॥
दक्षिण दिशेसि गोरख विभूति चर्चूनि जाय अंगाला ।
गेला कानीफाही अनुलक्षुनि पूर्वदेश बंगाला ॥ ५३ ॥
शिष्यांसह कानीफा उतरे जाऊनि पुष्प-वेटिकेंत ।
कळवी मैनावातिला आली तत्काल त्याचि घटिकेंत ॥ ५४ ॥
जाउनि भेटे आधीं गुरुचाही मग पुसे समाचार ।
होइल भेटि सुनिश्चित अवधी कर दिवस अष्ट साचार ॥ ५५ ॥
मैनावाति संतोषें आली धाऊनि आपुल्या सदना ।
पाहे क्षणभरि न्याहाळुनि निज पुत्राच्या उगीच ती वदना ॥५६॥
बोले निज पुत्रातें बापा जाईल व्यर्थ ही काया ।
पुनरपि न मिळे सहसा अवघी लागेल कल्प हुडकाया ॥ ७ ॥

---

१ इलरांची. २ खोल. ३ पाहिलें. ४ व पर कोठें. ५ स्नानघालाल. ६ स्त्रीराज्य. ७ यमापासून. ८ मेळे ९ फुलांच्या बागेंत. १० मुदत.

माय ह्मणे जरि असते गुरु जालंदर तुला करीं धरिते ।
करिते मुक्त भवांतुनि सोडविलें प्रभुवरें जसें करितें ॥ ३४ ॥
नाथ गुरू जालंदर आले होते तुझ्याचि सदनासीं ।
तैं पासुनियां अजवर बा त्यांच्या लोकिलें न वदनासी ॥ ३५ ॥
हें ऐकतांचि नृपवर अंतरि बहु खोंचला न वदला हो ।
चित्तीं ह्मणे वृथा म्यां दवडीला सद्गुरु प्रपदलाहो ॥ ३६ ॥
माता शोक करी बहु चित्तीं अठऊनि सद्गुरू पाय ।
जाऊं कोठें पाहूं यालागीं कोणता करूं उपाय ॥ ३७ ॥
धूंडत गिरि गव्हरमों जालंदर कीं कहीं न सुध पाया ।
एक दिन वह कानीफा देखे एक आम्रवृक्षकी छाया ॥ ३८ ॥
वृक्ष तले कानीफा ले उतरा छात्रें सातसे अपने ।
आसन धुनी लगाकर ले माला हाथमें लगे जपने ॥ ३९ ॥
इतनेमें गोरक्षक जो चेला नाथ-गुरु-मछंदरका ।
आया सब चेलोंसे वृक्षतले भेस ले कलंदरका ॥ ४० ॥
गोरक्षक कानीफा बैठ रहे गुरु अदेस कर अपना ।
पूछे गुरु बतलाये पथ गुरुका तंत्र मंत्र जो जपना ॥ ४१ ॥
गोरख कहे कानीफा भूक लगी आम्रफल उतारोगे ।
देऊं उतार सबही फिर जहांके फल तहां बिठावोगे ॥ ४२ ॥
इतना कह कानीफा बिद्यासें फल सभी उतारलियो ।
खाये सबही मिलकर गोरख जहांके तहां लगाय दियो ॥ ४३ ॥
पूछत कानीफासे तीरथ अब कोन कोन कर आये ।
फिर जावोगे कहांपर है मेला कौन जो ने सुनपाये ॥ ४४ ॥
कानीफा जूं बोले धूंडत हूं देस गिरि गुहा बनमें ।
गुरु जालंदर न मिले अब पूरबकी अई सफरमनमें ॥ ४५ ॥

---

१ पाहिले २ सद्गुरू चरणांचा लाभ. ३ शिष्य ४ सातसें. ५ शिष्यासह वर्तमान.
६ वेषघेऊन. ७ फकीरांतील एक विशिष पंथ ८ संतांचा मेळा ९ जो. १० ऐकलेला.
११ आली.

इतना सुन गोरक्षक कानीफासे विनोद कर बोले ।
गुरुकी खबर न जिसको औरनकी काहेको खबर बोले ॥ ४६ ॥
राजा बंगालेका कहते है सबहि गोपिचंद जिसे ।
जालंदरको डाला है कूवेमें भई न खबर किसे ॥ ४७ ॥
बारा वरस हुवे उस खाईमें डार लीद है गेरा[2] ।
जालंदरको तबसे मानो किसिनें न आज लग हेरा[3] ॥ ४८ ॥
पुछत गोरक्षकसे आये कहांसे कहा[4] जावो गे ।
तीरथ कौन कियेहो अब चेलोंको कहा न्हलावोगे ॥ ४९ ॥
धुंडत हूं मै गुरुको नाथ मछंदर मिले कहीं तुमसे ।
कानीफा जूं बोले है ईस्त्रीराजमें[6] मिलो उनसे ॥ ५० ॥
इस्त्री लंपट गुरुकी कौन बढाई करे कहो हमसे ।
वोही गुरु साचा है जो चेलोंको छुडाय ले जमसे[7] ॥ ५१ ॥
यापरि संवादुनियां गेले तेथुनि गुरूसि धुंडाया ।
पाहुनियां जन ह्मणती आल्या कोठूनि काय झुंडा या ॥ ५२ ॥
दक्षिण दिशेसि गोरख विभूति चर्चूनि जाय अंगाला ।
गेला कानीफाही अनुलक्षुनि पूर्वदेश बंगाला ॥ ५३ ॥
[illegible] कानीफा उतरे जाऊनि पुष्प-वेटिकेंत[9] ।
कळवी मैनावातिला आली तत्काल त्याचि घटिकेंत ॥ ५४ ॥
जाउनि भेटे आधीं गुरुचाही मग पुसे समाचार ।
होइल भेटि सुनिश्चित अवधी[10] कर दिवस अष्ट साचार ॥ ५५ ॥
मैनावाति संतोषें आली धाऊनि आपुल्या सदना ।
पाहे क्षणभरि न्याहाळुनि निज पुत्राच्या उगीच ती वदना ॥५६॥
बोले निज पुत्रातें बापा जाईल व्यर्थ ही काया ।
पुनरपि न मिळे सहसा अवधी लागेल कल्प हुडकाया ॥ ७ ॥

---

१ इतरांची. २ खोल. ३ पाहिलें. ४ व पर कोठें. ५ स्नानघालाल. ६ स्त्रीराज्य.
७ यमापासून. ८ मेळे ९ फुलांच्या बागेंत. १० मुदत.

कानीफा गुरु-बंधू आला शिष्या सहीत या गावीं ।
चाल तुला भेटवितें विषय-स्पृहता[2] समूळ त्यागावी ॥ ५८ ॥
आला गोपीचंदहि निज सैन्यासह त्वरीत बागांत ।
नमन करीत यथोचित तरि तों भासे तयासि रागांत ॥ ५९ ॥
बोले कानीफा हे राया तूं नष्ट दुष्ट अति पापी ।
कष्टविलेंसि गुरुला तरि तूं येथूनि सतत नरका[3] पी[4] ॥ ६० ॥
घाबरला राय बहू नमुनि ह्मणे वाचवा कृपा-दानें ।
झालों लीन पदी या तुमच्या करणें न काय पादानें ॥ ६१ ॥
त्यागुनि संग सकलही होसिल योगी तरीच तरसील ।
मरसिल आन उपायें नचले, तरि यत्न काय करसील ॥ ६२ ॥
कांता कनक सुहृज्जन शक्य न तरि अन्य कोण ताराया ।
अवधी सरतां जाणें टाळिल हा नेम कोणता राया ॥ ६३ ॥
कर जा शोध गुरूचा कथिला तुजलागिं हा उपाया सुधा ।
न करी वेळ आतां तरी मरतां तुज लाधली अलभ्य सुधां ॥६४॥
आली मैनावतिहि सांगे तिजलागिं कर्म जें त्याचें ।
होईल भस्म आतां हा करितो तरि काय वृत्ति जे त्याचें ॥ ६५ ॥
घाबरली फार सति विनवी पुत्रासि वांचवायासी ।
लागे पाप क्षणांतचि वेळ बहू पुण्य सांचवायासी ॥ ६६ ॥
तेथुनि गृ[illegible] नेउनि पूजा सत्कार बहु तिनें केला ।
सद्भावें [illegible] नि उभयांनीं गोविलाच भाकेला[6] ॥ ६७ ॥
गुरुको [illegible] की कर सूरत वह तुझे बचावेगे ।
राजा [illegible] उस कुवेपर चलो खुदावेगे ॥ ६८ ॥
लीद [illegible] देखे है ध्यानमें लगे हरके ।
बैठे [illegible] सबही गुरुनाथको नमन करके ॥ ६९ ॥

[illegible]ध्य ह्मणून २ विषय तृष्णा ५ अमृत. ६ वचनाला. ७ खणून

कनकार्य ताम्रपीतल चार मुरत चार धातकी करना ।
कुवेपर जाँ—धरना डरना मत धीर बहोतसा सरना ॥ ७० ॥
मूरतले लोहेकी पुकारना गोपिचंद हूं आया ॥
करतां हूं नमन करो गुरुजी इस दासकी अमर काया ॥ ७१ ॥
जलजावे जब पहेली ले मूरत एक एक धातनकी ।
सबही जल जावेंतो फिर बचनेकी करूं फिकर तनकी ॥ ७२ ॥
राजानें बनवाया चार मुरत चार धात समतोला ।
ले मूरत लोहेकी हूं राजा गोपिचंद यों बोला ॥ ७३ ॥
जलजा पापी कहते लोहेकी खाक बनगई छिनमे ।
दुसरी तिसरी चौथी जलनेसे बहोत डरगया मनमें ॥ ७४ ॥
कुवेपर फिर बोला गुरुजी मै गोपिचंद हुं आया ।
अबलग जीता है तु बेटा होजावेगी अमर काया ॥ ७५ ॥
कूपा बाहिर गुरुला आणिलें काढूनि गोपिचंदानें ।
नेउनियां निज सदनीं केला सत्कार बहु अनंदानें ॥ ७६ ॥
झाला अनुताप असा क्षणिकचि हे विषय भोग त्यागावे ।
शाश्वत-पद पावाया या गुरु वांचूनि कोणत्या गावें ॥ ७७ ॥
यावरि गुरुलाहि ह्मणे आहे जरि मी अनंत अपराधी ।
सद्भावें लीन पदीं झालों आतां असे न अपरोधी ॥ ७८ ॥
नाथ ह्मणे फार कठिण योग तुला वर्म काय गा ठावें ।
होइल सुख-स्पृहा तरि पुनरपि सदनासि याच गांठावें ॥ ७९ ॥
भूप ह्मणे हो गुरुजी आधी मी त्रासलोंच विषयास ।
त्यांतहि दर्शन तुमचें आतां मी मानितोच विष यांस ॥ ८० ॥
विनवी मैनावतिही निज पुत्रावरि दया करा-यातें ।
झाला अनुताप खरा संरक्षावें दया करा, यातें ॥ ८१ ॥

---

१ कनक—सुवर्ण २ अय—लोखंड ३ जाऊन ठेव ४ धतूची ५ क्षणांत. ६ दुसरी बुद्धि. कुत्सित बुद्धि. ७ सुखाचाइच्छा

पाहुनि निश्चय त्याचा उपदेशामृत यथेच्छ पाजविलें ।
ज्ञानानळें नृपाचें जन्म-मरण-हेतु-बीज भाजविलें ॥ ८२ ॥
घेउनि निरोप आला मैनावतिचा गुरूसवें जाया ।
केला वेळ न कांहीं गृह-धन-प्रिय-कामिनीस वरंजाया ॥ ८३ ॥
जालंदर कानीफा भूपहि त्यांच्या समागमें गेला ।
द्वादश वर्षं गुरुपद सहवासें योग साध्यही केला ॥ ८४ ॥
आज्ञा घेउनि गुरुची आला तो गोपिचंद नगरासी ।
क्षणिक सुखातें विटला पाहुनि मोहेल काय नगरांसी ॥ ८५ ॥
भेटुनि मातेसि अर्धीं गेला भिक्षार्थ कामिनी सदना ।
पाहुनि रूप तयाचें ह्मणती हा लाजवीतसें मदना ॥ ८६ ॥
दिसतो योगी परि हा पति अपुला तरिच नांव नव सांगे ।
नवसा गे श्रीहरिला यत्न करुनियां अतांचि गवसा गे ॥ ८७ ॥
मोहिति कांता विषयीं परि तो सहसा न गुंतला कामीं ।
चित्तीं ह्मणे अतांही न विंचारू स्वहित आपुलें कां, मी ॥ ८८ ॥
नमन करुनि मातेला गेला गुरुराज ज्या स्थळीं होते ।
होतें सुख संसारीं त्यजिते संतहि उगेंचि कांहो तें ॥ ८९ ॥
इकडे गोरक्ष हि तो निज शिष्यांसह गुरूसि धुंडाया ।
हिंडे ह्मणे असेंही नेऊं आतां कशास झुंडा या ॥ ९० ॥
होते नाथ मछंदर प्रमिळा-राणी-प्रमूख राज्यांत ।
प्रतिबंध साधु संतां शिरवेना अन्यही नरा ज्यांत ॥ ९१ ॥
सांगे नाथ मछंदर गोरख मज न्यावयासि येतो कीं ।
झालें मोहित मानस तूझ्या ठायीं तसे प्रिये तोकीं ॥ ९२ ॥
जरि तो नेइल मजला तुज वांचुनिया प्रिये कसा राहूं ।
वाटे ग्रासाया मज येतो चंद्रासि त्या जसा राहू ॥ ९३ ॥

---

१ त्याग करण्यास. २ नग–डागिने अर्थात् द्रव्य त्याच्या राशीस. ३ संसारांत जर सुख असतें तर संतलोकच गीच कां टाकते? असा भावार्थ ४ तोक ह्मणजे मूल अर्थात् मैनीनाथा

P Ganpat N Naidoo.

आलें विघ्न टळाया योजूं मी कोणत्या उपायासी ।
स्थळहि दिसेना मजला त्या गोरक्षापुढें लपायासी ॥ ९४ ॥
प्रमिळा ह्मणे न भ्यावें करिते प्रतिबंध साधु-संतांस ।
येइल कोठुनि मग तो पावेना काय हो निजांतास ॥ ९५ ॥
आज्ञा दे निजदासां द्वादश गांवें प्रदेश रोधाया ।
अनमान नच करावा संतमहंतादिकांसि शोधाया ॥ ९५ ॥
येइल बळेंचि कोणी आज्ञा आहे जिवेंचि माराया ।
जरि हे विपरीत तरी, न शके कोणीच हो निवाराया ॥ ९७ ॥
वधिलें संत महतां केला अन्याय ही महा त्यानीं ।
परि न चले कवणाचें केली हळहळ बहू पहा त्यांनीं ॥ ९८ ॥
मारिति संत महतां झाला ऐसाचि फार बोभाट ।
याचक न येचि कोणी येतिल मग कासयास हो भाट ॥ ९९ ॥
या वृत्तश्रवणानें झाला गोरक्ष घाबरा हो तो ।
आलों वृथा ह्मणे मी अपुल्या ठायींच तरि बरा होतों ॥ १०० ॥
परि करणें सद्गुरुचा शोध म्हणुनियां मनीं असें भावी ।
कीं गांठू प्रमिळेतें मग जें होणार हो सुखें भावी ॥ १०१ ॥
मार्गींच भेटले त्यां जे कां अवतारचरित खेळविती ।
गीत विनोदें हास्यें मोहुनि सकळांसी वित्त मेळविती ॥ १० ॥
त्या नाटक समुदायीं जो कां होता मृदंग वाजवित ।
तो व्यापिला ज्वरानें म्हणउनि होतेच हाके गाजावित ॥ १०२ ॥
ते म्हणती वाजविल्या मृदंग नेऊं तुम्हांसि सांगा तें ।
आहे अवगत किंवा कैसें आतांचि स्पष्ट सांगातें ॥ १०४ ॥
गोरक्ष म्हणे येतों समागमें वाजवीन संगतिनें ।
प्रमिळा म्हणति कूशल तरि व्हावें ऐकतांचि दंग तिनें ॥ १०५ ॥
ऐसें बोलुनि गेला तो त्या संगेंचि राणिच्या गांवा ।
संगतिनें मग याच्या झाला उत्कर्ष तोहि सांगावा ॥ १०६ ॥

---

१ निज ह्म० आमलें अंत ह्म० मरण त्यास २ पाहणारानें. ३ हाकाटी करीत होते.

सांगावें काय किती ज्यात्या पौरांसि नित्य हा चाळा ।
टाळा न देचि कोणी ते म्हणति एक एक घर चाळा ॥ १०७ ॥
एके समयीं झाला राणीच्या खेळ मंदिरामाजीं ॥
गोरक्ष म्हणे आतां होइल परिपूर्ण कामना माजी ॥ १०८ ॥
खेळहि अनुपम्य तयीं झाला शंसा[2] समस्त जन करिती ।
देती द्रव्य तयातें वस्त्रें[3] नग भूषणें अनेक-रिती ॥ १०९ ॥
गोरक्षें त्या समयीं वाजविलीं अक्षरें मृदगांत ।
गुरुजी चला अलों मी रतलां कां या अनंग[4]–रंगांत ॥ ११० ॥
सुनरी प्रमिळा राणी गोरख आया मुझें लिजावेगा ।
मैनीनाथ बिना नही चैन उसे कौन अब खिलोवेगा ॥ ११ ॥
चलो मछंदर गोरख आया है कानमें भिनक[6] आई ।
रोवे प्रमिला राणी अब मै करु कौनसी जुगतँ, माई ॥ ११२ ॥
गोरक्षक नहि माने नाथ मछंदर तुह्मे लिजावेगा ।
यह चिंता है मुजको तुम बिन अब कौन हट चलावेगा ॥११३॥
इतनेमें गोरक्षक आन मिला नाथ गुरु मछंदरसे ।
आई प्रमिला राणी तबही सुनले आवाज अंदरसे ॥ ११४ ॥
दिधलें क्षेम तयांनीं चित्तापासूनि दान अभयाचें ।
ह्मणती स्वस्थ असावें वंदी गोरक्ष पाय उभयांचें ॥ ११५ ॥
गुरुच्या सेवेंत सदा जरि तो गोरक्ष नित्य मग राहे ।
तरि ह्मणती जन त्यातें आले कोठूनि विघ्न नगरा हें ॥ ११६ ॥
गेले दिवस असे किति नाथ मछंदर निमग्न विषयांत ।
गौरक्ष म्हणें कैसें नकळे भावी समग्र विष यांत ॥ ११७ ॥
एके समयीं [9]निशिथीं राणीच्या नाथ मंचकीं होते ।
मेनीलाथ म्हणे न्हा होईल शौच्यासि मज असें हो तें ॥ ११८ ॥

---

१ नागरीक लोकांस. २ प्रशंसा स्तुति ३ दागिने ४ रति विलासांत ५ प्रमिळेचा मुलगा. ६ शब्द ध्वनी, ७ युक्ति ८ अगआई ९ रात्री

गोरक्षातें कथिती न्यावें शौच्यार्थ यास बाहेर ।
परि भय वाटेल असें नकरी, राहूनि निकट बा हेरे ॥ ११९ ॥
नेउन बाहेर त्या बसवी शौच्यासि परि असेंच वदे ।
ताडीन मूत्र येतां ह्मणणें बाळासि हें कसें चव दे ॥ १२० ॥
शौच न करितां येउनि बाळ भयानें पुन्हा तसा निजला ।
करि मलमूत्र पलंगीं यास्तव मंचक सचैल तो भिजला ॥१२१ ॥
यावरि गोरक्षातें ह्मणती आणी धुऊनियां बाळा ।
आज्ञा प्रमाण गुरुजी देइल वचनासि कोण या टाळा ॥ १२२ ॥
ऐसें वदोनि गेला घेउनि बाळासि त्या नदीवरता ।
आपटिलाचि शिळेवरि रजकहि वस्त्रासि फार सांवरता ॥ १२३ ॥
अणिलें चर्म धुउनियां घाली उष्णांत मग सुकायास ।
नव्हते माहित कवणा ह्मणउनि ह्मणती उशीर कां यास ॥१२४ ॥
आला गोरक्ष तया पुसती बाळासि सोडिलें कोठें ।
येरु ह्मणे सुकतसें तरितें सकाळांसि वाटलें खोटें ॥ १२५ ॥
पुसतां पुनः पुन्हाही सांगे उष्णांत घातलें वाळूं ।
आहे आज्ञाधारक गुरुच्या वचनासि मीं कसा टाळूं ॥ १२६ ॥
पाहति जाउनि तेथें चर्म असें घातलें सुकायाला ।
बाळासि मारिलें हो समयीं आली दया न कां याला ॥ १२७ ॥
प्रमिळा आक्रोश करी वधिलें बाळासि या कसाबानें ।
जन ह्मणती मायेनें धीर धरावा तरी कसा बानें ॥ १२८ ॥
गाहिंवरुनि रडे प्रमिळा तीस वदे नाथें तूं प्रिये न रडे ।
मेनीनाथ न येतां या दुष्टाचें चिरीन मीं नरडें ॥ १२९ ॥
ह्मणती गोरक्षातें द्यावें आणून आजि बाळासी ।
हें जरि न घडेल तरी सत्यचि तुज भेटवीन काळासी ॥ १३० ॥

---

१ बा–गोरक्षा. २ पहात रहा. ३ बापानें ही माये मुळें धीर कसा धरावा. ४ मत्स्येंद्रनाथ,

कळलें स्पष्ट आतां मज गुरुलाहीं लागलें विषय ध्यान ।
जरि मी गोरक्ष तरी या करवीं सोडवीन हें स्थान ॥ १३१ ॥
मग त्या गोरक्षानें अत्यद्भुत दाविला बहू न चमत्कार ।
त्या योगें जन त्याचा करिती तेथें सत्कार ॥ १३२ ॥
बाळें अनुरूप सकळ आणिलीं निर्मूनि एकशें आठ ।
ध्या मेनिनाथ पाहुनि करितां कां तरि उगाच बोभाट ॥ १३३ ॥
रूपें वयें समाचि कीं बाळें देखूनि जाहले दंग ।
ह्मणती देव चि केवळ रहावें याचा धरूनियां संग ॥ १३४ ॥
प्रमिळा म्हणे कळेना दे माझा मेनिनाथ बा मजला ।
दिधला एकचि आणुनि पूर्वीं होता जसा तसा सजला ॥ १३५ ॥
झाला आनंद जनां ह्मणती सामर्थ्य काय हो याचें ।
धरिला द्वेष बहू जरि आहे होणार काय हो याचें ॥ १३६ ॥
गोरक्ष म्हणे गुरुजी आतां येथें तुम्हीं नका राहूं ।
विनती मान्य करा ही द्यां सोडुनि सर्वथा नकारा हूं[३] ॥ १३७ ॥
ह्मणती नाथ मछंदर बा माझें चित्त गुंतलें कामीं ।
धामींच सौख्य वाटें सोडुं तरि कैंवि दार-लेकां मी ॥ १३८ ॥
क्षणिक सुखाची इच्छा धरणें अपणासि हें नसें विहित ।
साधावें कार्य असें आहे होणार ज्यांत भावि हित ॥ १३९ ॥
नेइल गोरक्ष मला वाटे आतां कधीं न सोडिल ।
भीतों मी या साठीं कीं हा चौघांत धरुनि कोढिल ॥ १४० ॥
विरह तुझा मज दुःसह होइल तैसाचि याहि बाळाचा ।
आलें संकट मोठें कैसा हा भोग तरि कपाळाचा ॥ १४१ ॥
जाणें प्राप्ताचि येथुनि देई मजला निरोप गे जाया ।
वायां आग्रह न धरि आहे क्षम[६] कोण यासि वरजाया[७] ॥ १४२ ॥

---

१ वस्त्रप्रावरणा दिकांनीं अलंकृत. २ सर्वथा नकार सोडूनया २ हूं चला तयार व्ह ४ स्त्री. ५ मुलाला. ६ समर्थ ७ निवारण्यास.

प्रमिळा नाथासि म्हणे सौख्यानंदांत सर्वदा होते ।
कंठुं काळ कसा हो घडि घडि अठवेल कीं मना होते ॥ १४३ ॥
देतें मी सामग्री मार्गानें उभयतां तुम्हीं सेवा ।
बा गोरक्षा तूंही नित्य गुरुची करीत जा सेवा ॥ १४४ ॥
मग अणिल्या प्रमिळेनें गुप्तपणें कनकमय विटा दोन ।
घालुनि झोळींत ह्मणें घ्या सत्वर या अतांची बांधोन ॥ १४५ ॥
नाथ मछंदर गोरख जाती तेथूनियां स्वदेशाला ।
देहाची तापद गमला प्रमिळेला दुःख कां न दे शाला ॥ १४६ ॥
जातां जातां मार्गी अढाळलें एक वन महा घोर ।
नाथ मछंदर भ्याले म्हणती जाईल हेमं हा घोरं ॥ १४७ ॥
बेटा घोर विपिन है डर होवे तो हमें बतादेना ।
गोरख सोंचे मनमें क्यौं डरते है गुरु पता लेना ॥ १४८ ॥
एक दिन नाथ मछंदर धर झोलीको गये दिसा फिरनें ।
गोरखनें जो देखा दो लुंडे कनकके लगे गिरने ॥ १४९ ॥
डारदिया गोरखनें जलभारीथा जहां भरा पाया ।
दो पथ्थर झोलीमें गेरौं सम तोल हेमके लाया ॥ १५० ॥
आगू निकल गये तब नाथ मछंदर पुकार यंव पूछे ।
ह्या कछु डरहै बेटा गुरुजी अब डर कहां, रहा पीछे ॥ १५१ ॥
धूंडे हेम न पाये झोलीमें बहोत नाथ घबराये ।
पुछे गोरच्छकसे ले पथ्थरको तभीहि पटकाये ॥ १५२ ॥
निर्दय शिष्य तुझ्या सम दुसरा कोणी नसोचि या लोकीं ।
घोकित होतों अनुदिनिं त्या कनकावीण दीन झालों कीं ॥१५२॥
दुष्टा आली नाहीं तुजला माझी दया कशी रानीं ।
या वृत्त श्रवणानें उगली राहील ती कशी राणी ॥ १५४ ॥

---

१ सोन्याच्या. २ सुंदर गृह. ३ सोने ४ घ्यास. ५ विटा ६ सोन्याच्या. ७ गहेरा म० बरोबर ८ पुढें ९ खालींटाकून दिले. ९ प्रेमका

गोरक्ष ह्मणे गुरुजी करितां कनकासि काय सांगा तें ।
स्पर्श नसावा याचा अंतीं येईल काय सांगातें १५५ ॥
जरि पाहिजे तुह्मांला देतों पुष्कळ सुवर्ण घ्यावेंच ।
मग चिंता वाटेना नित्य तयाचा करीत जा वेंच[1] ॥ १५६ ॥
गोरक्षें निज मूत्रें कनकाचल निर्मिला दुजा जगती ।
प्रार्थुनि गुरुसि ह्मणे घ्या यांतुनि लागेल जे त्वरीत गती ॥१५७॥
नाथ मछंदर विस्मित झाले पाहूनि हा चमत्कार ।
ह्मणती क्षमा करी बा केला नेणूनियां असत्कार ॥ १५८ ॥
मग तें गुरु-शिष्य मिळुनि जाती तेथूनिया स्वदेशाला ।
सांडोनि संग सकलहि भजले सद्भक्तिनें परेशाला ॥ १५९ ॥
गोरच्छक कानीफा था[2] राजा गोपीचंद भी आया ।
उतरेथे चेलासे उसी जगे आम्र बृच्छ की छाया ॥ १६० ॥
नाथ मछंदर गोरख चेलोंसे बृच्छके तले आये ।
कीये अदेश गुरुका बातोंसे एक एक के धाये[3] ॥ १६१ ॥
बृत्त सुनाये अपना अपना गोरच्छ कानिफा सबसे ।
चेले दोनों गुरुके होवे विख्यात जगतमों तबसे ॥ १६२ ॥
भगवत् भक्त शिरोमणी याच्या गातील जे प्रबंधास ।
गिरिवासी प्रभु त्यांच्या सत्वर तोडील कर्मबंधास ॥ १६३ ॥

याच आख्यानाचीं पदें.

पदे

पद–(लोक ह्मणतात) दीपचंदी

कैसा जोगी अमंगल[4]–काय हो ॥ धृ० ॥ अंतर बाह्य मलीनाचि भासे वंदिति कां जन पाय हो ॥ १ ॥ कुत्सित जागीं[5] वास

---

१ खर्च २ आया था–ह्म० आला होता ३ संतुष्ट होते झाले ४ ओंगळवाणा आहे देह ज्याचा ५ अमंगलजागीं

P Ganpat H Naidoo

करी हा पूजिति जन वेडे काय हो ॥ २ ॥ आणुनि काष्ठें उदर भरीतो तळमळ याचि न जाय हो ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभुलागि न भजती हाचि गमे नवलाय हो ॥ ४ ॥

दिंडी–(मैनावति गुरुस ह्मणते)

करी मैनावति नमन गुरूपांया ॥ व्यर्थ घालविलें ह्मणे सुवंय[1][2] वांया ॥ अतां बुडतें या भवांबुधी[3] मांजी[4] ॥ त्वरे सुटका येथूनि करा माजी ॥ १ ॥ क्षणिक वैभव हें वेळ नसे जायां ॥ तशी विलेया[5] जाईल गमे काया ॥ करा अनुकंपा[6] उशिर नका लावूं ॥ अतां सोडुनि हे पाय कुठें जाऊं ॥ २ ॥

दिंडी

कहत जालंदर सुनो मेरी माई । मै क्या जानूं उपदशेकी बढाई ॥ माता मैनावंती तुं काहेकु आई । कहो किसने यह जुगत बतलाई ॥ १ ॥

साकी. (गोपिचंद स्त्रियास विचारतो व त्या सांगतात)

मैनावंती मोहे बतलावो कहां गई अज मंदरसे ॥ कौन दियो है दुख माताको जबाब देव कोई अंदरसे ॥ १ ॥ हात जोर बिनती कर कांता सबही बोलत राजासे ॥ क्या कहि एक छुनही कहे सकते बात भई जो मातासे ॥ २ कीरत नाम डुबाकर सबही जालंदर गुरु कीनो है ॥ उस जादुगर जोगीनें मन उनका छीन लिनो है ॥ ३ ॥ नाता उपर गुरू चेलोंका अंदरसे कछु न्यारा है॥ सब दिन पाव दबावत भया रात गुरू वोहि प्यांरा[7] है ॥ ४ ॥

पद (मैनावंती गुरुचा शोक करिते.)

अब मै कैसे करूं मेरि माई ॥ ध्रु ॥ देशभी धूंडी, नगरभी धूंडी, गुरूकि खबर न पाई ॥ १ ॥ नाथ गुरूको, नाहि मै न्हलाई

---

१ नवल २ चांगले वय ३ संसार समुद्रामध्यें ४ माझी ५ नाश होईल ६ कृपा. ७ प्रिय.

ना मै कभू खिलाई ॥ २ ॥ कीनि[1] नही कभू सेवा गुरुकी नहि पूजा बनआई ॥ ३ ॥ गिरिवासी गुरु नाथ चरनपर नहि मै सीस[2] नमाई[3] ॥ ४ ॥

साकी–(मैनावती मनांत विचार करिते)

सोचत[4] मैनावंती मनमों कहां गुरू को पावूंगी ॥ जोहि मुझे गुरुनाथ दिखावे गुन उसके नित गाऊंगी ॥ १ ॥ नही गुरू बिन चैन मुझे अब, इसी जगे मर जावूगी ॥ नाथ गुरूकी सुध[5] मिल जावे सीस नमाकर लावूगी ॥ २ ॥ कहूं किसे मै यह दुख अपना कौन गुरू बतलावेगा ॥ घडि घडि याद गुरूकी आवे इसको कौन मिटावेगा ॥ ३ ॥

पद–(मैनावती गोपीचंदास ह्मणते)

ऐसी सुंदर तेरि काया एक दिन जल जावेगी बेटा रे ॥ धृ० ॥ अतर मोतिया गुलाब अंबर काम न आवे कांता रे ॥ सेज फुलोंकी हार गलेमें येही काम है खोटा रे ॥ १ ॥ बाग बगीचे देस मुलुख सब महेल हवेली कोठा रे ॥ हाथी घोडे ऊठ पालखी सबहि पसारा झुटा रे ॥ नग नगीना भरा खजीना एक दिन आवे तोटा रे ॥ है मोतनकी झुल झालरा हाथ न आवे लोटा रे ॥ ३ ॥ लत्ता कपडा सबहि तऱ्होंका दुशाल मंदिल फेंटा रे ॥ गिरिवासीको मत भुल जाना मिले नही लंगोटा रें ॥ ४ ॥

पद

(बेटा हुशार रहनाबे)

कानीफा जालंदराचा शोध करितो

पूछत कानीफा सबको ॥ मिले गुरु जालंदर तुमको ॥ धृ ॥ धूंडत देस गिरीगव्हरमों, प्रयाग मथुरा कासी ॥ द्वारवतीमें देखे जाहांपर[6] जपी तपी सन्यासी ॥ १ ॥ गोकुळ वृंदावन सब आवध,

---

१ केली. २ शीर ३ नमलेले. ४ विचार करीत होती ५ शोध पत्ता ६ जाहीशी कहीक.

धूंडलई पुरिमाया ॥ गंगासागर हरिद्वारमें, नही ठिकाना पाया ॥ ॥ २ ॥ बद्रिनाथसे अया पलटकर मारवाड बुंदेला ॥ धूंड फिरा नगरी उज्जनपर जंह्वा साधुका मेला ॥ ३ ॥ खानदेस मानदेस सबही, बराडकी सुध लीया ॥ नही पता जब कहीं मिला तब दख्खनमें पग दीया ॥ ४ ॥ रामेसर गोकरन महाबल सबही पुकार लीया ॥ शेषा चल पर चढे पुछना गिरिवासीसे कीया ॥ ५ ॥

दिंडी (गोरख कानीफास ह्मणतो.)

बहोत धूंडा मै गिरी गुहा बनमें ॥ नही ताकत अब रही कछु तनमे[1] ॥ देखलीया सब पूर पटन बस्ती॥ नही कीया एक दीन जरा सुस्ती॥ १॥ नही पाया मै कहीं पता गुरुका ॥ कहो कानीफा कछू खोज उनका ॥ मुझे गुरुबिन नहि चैन कहां जाऊं ॥ नाथ मच्छंदर कहां तुमे पाऊं ॥ २ ॥

अंजनी गीत.

(मैनावंती ह्मणते बापा गुरुकर.)

माता मैनावंती रोवे ॥ बेटा ऐसे दिन मत खोवे ॥ किरपा[2] सद्गुरुकी होवे ॥ कर साधन ऐसा ॥ १ ॥ धन दौलत सब रहे जावेगी ॥ कांता कोइ न संग आवेगी ॥ एक दिन काया जल जावेगी ॥ नहिं अपना कोई ॥ २ ॥ मेरा कानीफा गुरु भाई ॥ आया उसकी मै सुध पाई ॥ अपने घरको भी बुलवाई ॥ करले गुरु अपना ॥ ३ ॥

पद (बेटा हुषार रहे नावे या० चा०)

(कानीफा रागानें गोपीचंदास बोलतो.)

जगतमें मू कीया काला ॥ गुरुको कूवेंमे डाला ॥ धृ ॥ धन दौलतसे मस्त भया है, छल साधूका कीया ॥ जलजावेगी

---

१ शरीरांत. २ कृपा.

तनू पलखमें, बुरा काम करलीया॥ १ ॥ दान धरमसे कछु नहि होगा घटं तूनें भरलीया ॥ पूजा पत्री कामन आवे जम मंदिर[3] घर कीया ॥ २ ॥ रावन मारागया सुना है सज्जन को दुख दीया ॥ कौन हकीकत फिर औरनकी दुर्जन कोइ न जीयों[4] ॥ ३ ॥ गिरिवासीकी मेहर[5] होजावे काम न ऐसा कीया ॥ गुरू बिन काच्या रहा जगतमें मुफत[6] उमर खोदीयाँ[7] ॥ ४ ॥

दिंडी (कानीफा मैनावंतीस ह्मणतो.)

कहत कानीफा सुनो मैनामाई ॥ किई बेटेनें साधुसे बुराई ॥ गुरू जालंदर–नाथ–साँ,न जोगी ॥ मुरख समझा उनको ये बडा ढोंगी ॥ १ ॥ डार दीया है गुरूको कुवेमें ॥ नहीं लाया कछु खोपं खतर मनमें ॥ तनू इसकी जल जावेगी पलखमें ॥ तभी बदनामी उठेगी खलकमें ॥ २ ॥

(गोपिचंद जालंदर यांचा संवाद.)

(गडयानो कृष्णगडी–या० चालीवर)

गमाई मुफत उमर सारी ॥ तुह्माविण कोण आतां तारी ॥ किया मै सब पातक भारी ॥ भोगिल्या किंतिक शतें नारी ॥ नही कछु साधन बनआया ॥ टपतसे काळ तनू खाया ॥ तुह्मारे अब दरसन पाया ॥ करूं कां मग चिंता वांया ॥ डुबा हूं भवजल[11]- में सारा ॥ गुरूजी लावा परपारा[12] ॥ पैरमें हुं मुंडी[13] डारा ॥ दिसेना या वांचुनि थारा ॥ १ ॥

पद (गोपीचंदानें ऐश्वर्याचा त्याग केला.)

(बेटाहुषार रहना बे–या० चा०)

गोपीचंद बडा भोगी ॥ पलखमे बनाहि गया जोगी ॥धृ ॥ बारासो कामिनी सुहानी[14] सोलासो सैलीयाँ[15] ॥ गरम बिछोंने सेज फुलोंकी जल मंदिर तज दीया ॥ १ ॥ तऱ्हेंतऱ्हेंके महेल

---

१ पळांत. २ पापाचा घडा भरून घेतलास. ३ यमाचें घर आपल्या करितां करून ठेविलेंस. ४ दुष्टकोणी वाचला नाहीं. ५ कृपा- ६ व्यर्थ. ७ गमाविलीस ८ सारखा. ९ भय. १० दुनियेंत, जनांत. ११ संसाररूपीं पाण्यांत. १२ पैलतीरास. पायांत डोकें घातलें आहे ह्मणजे शरण आलों आहे. १४ सुंदर. १५ सख्या.

P Ganpat N Naidoo.

बगीचे जितने था बनवाया ॥ हाथी घोड ऊंठ पालखी सबाईसे हात धोया ॥ २ ॥ माल खजाना कई तऱ्होंका अंबारे लुटवाया ॥ छन भंगुर है यही समजकर गांड लंगोटा दीया ॥ ३ ॥ ऐसा राजा नही जगत मे अजलग कोई आया ॥ गिरिबासी की मेहर हुई तब जरा नही ललचाया ॥ ४ ॥

पद. (गोपीचंदाच्या स्त्रिया ह्मणतात.)

(गड्यानो कृष्णमडी–या० चा०)

सख्यांनों दिसतो हा राजा ॥ मोहुनि मानस हारा[1] जा ॥ धृ० ॥ बाहुनि[2] त्वरित मांत्रिकांला ॥ गड्यांनों मोहन तरि घाला ॥ बरा हा आला सदनाला ॥ येथुनि जाउं न द्या याला ॥ लागल्या द्रव्यहि सारा[3] जा ॥१॥ सुनंदे प्रियकर तूं भारी ॥ असे ह भूप तुझ्या द्वारीं ॥ वचनें प्रेमभरित सारीं ॥ वदुनिया करि नृप संसारी[4] ॥ असूं दे समीप हा राजा ॥२॥ भोगिले कष्ट बहू बाई ॥ पतीविण सुख सहसा नाहीं ॥ देतें मन तुमचें गाही ॥ करा गे यत्न कोणि कांहीं ॥ पाहिजें दिशाहि भारा[5] जा ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी यश दाता ॥ जाहल्या पति येईल हातां ॥ त्याविण कोण दुजा त्राता ॥ सोयरा सखा तोचि भ्राता ॥ विभूती[6] मंत्रुनि चारा जा ॥ ४ ॥

साकी. (मैनावंती गोपीचंदास ह्मणते.)

बेटा चंपावति जो अपनी बहेन उसे जा मिलना ॥ कर बातें मोहबतकी देवे राज कभू मत भुलना ॥ १ ॥ एक दिन भिछा लेकर खाना अपने गुरुका है बाना ॥ ज्यादा दस्तदराजि[7] न करना, बेटा गुरुके गै बाना ॥ २ ॥

---

१ हरण करा. २ बोलावून. ३ द्रव्यही सारा ह्मणजे खर्चकरा. ४ गृहस्थाश्रमी ५ मंत्रांच्या योगानें दिशा रोखून टाका. ६ भस्म, राख. ७ ज्यास्त हात पसरूं नये ह्मणजे ज्यास्त भिक्षा मागूंनये.

दिंडी–(चंपावती ह्मणते.)

ह्मणे चंपावति ऐक बंधुराया ॥ कोणे दिधला हा जोग तुला वांया ॥ गृहीं करितिल आकांत तुझ्या जायां ॥ जाइ आपुल्या सदनासि बा रमाया ॥ १ ॥

दिंडी–(चंपावती ह्मणते.)

कहत चंपावति सुनो गोपिचंदा ॥ तुने छोडा काहेको राज-धंदा ॥ प्रिया[1] रोवेगी दिया दुःख भारी ॥ कौन कारण हो गया बन–बिहारी[2] ॥ १ ॥

पद. (गोपीचंद ह्मणतो.)

माई भिछा फकीरी लावना री ॥ धृ० ॥ धन दौलतकी कौन हकीकत एक[3] दिन सभी डुबावना री ॥ १ ॥ झुठीं काया झुठी माया झुठा जग भुलावना री ॥ २ ॥ अलख[4]-निरंजन की खुन पाया फिर जगतमें काहेको अवना री ॥ ३ ॥ गिरिबासीगुरु-नाथ चरनपर सब दिन सीस नमावना री ॥ ४ ॥

साकी.

ले भिछा अपने घर, माके पग पर सीस नमाया ॥ आज्ञा लेकर गया गुरुके दर्सनसे सुख पाया ॥ १ ॥

साकी–(गोरक्षक विचार करितो.)

सोंच करत गोरछक मनमें कहां गुरू को मै पावुं ॥ साध संतका नही गुजारा केंवकर बस्तीमे जाउं ॥ १ ॥ कौन हमारा वाली तुमबिन प्रभुजी राह दिखावो ॥ नाथ मछंदर कौन जुगुतसे आवे हात जतावो ॥ २ ॥

---

१ स्त्रिया. २ अरण्यांत फिरणारा. ३ एके दिवशीं सर्व सोडून जावें लागेल असा भावार्थ. ४ परब्रम्हाची खूण पटल्या नंतर पुनः जन्म कशाला घ्यावा.

P Ganpat N Naidoo.

श्रीरामांनीं मारुतीस चुटकी वाजविण्यास सांगितलें, तें आख्यान.

कथासारांश.

श्रीराम लंकेहून परत आल्या नंतर त्यांनां राज्याभिषेक झाला. रामांनीं सर्वांनां त्यांचे योग्यतेप्रमाणें देणगी दिली, परंतु मारुतीला मात्र कांहीं दिलें नाहीं. यामुळें तो जीव देण्याकरितां शरयू तीरीं गेला. सीतेला ही गोष्ट आवडली नाहीं. तिनें मारुतीला बोलावून आणिलें, व आपला अमूल्य हार त्याला दिला. मारुतीनें तीं रत्नें फोडून पाहिलीं, व त्यांत 'राम' नाहीं ह्मणून तीं फेकून दिलीं. नंतर कांहींतरी सेवा सांगा, अशी विनंती मारुतीनें रामास केली. रामांनीं त्यास 'मला जेव्हां जेव्हां जांभई येईल तेव्हां तेव्हां तूं चुटकी वाजीव' असें सांगितलें. राम सीतेसह अंतःपुरांत गेले तरी मारुती त्यांचे मागें गेला, वगैरें चमत्कारिक कथा या आख्यानांत आहे.

आर्या.

राज्याभिषेक सुदिनीं विधिनें साकेतिं रघुविरा जाला ।
तो प्रभु वस्त्राभरणें देउनियां बोळवीत राजांला ॥ १ ॥
वानरसमुहीं रामें जें जें ज्यां उचित अर्पिलें सारें ।
सारे ह्मणती उरला मारुति हा प्रीति-पात्र कैसा रे ॥ २ ॥
अपमान दुःख दुःसह ह्मणउनि शरयू तिरीं मरायास ।
गेला कथितीं वानर सत्वर हें वृत्त राम रायास ॥ ३ ॥
राम ह्मणें बा सुगला जा ये घेऊनि वायुतनयांसि ।
तेव्हां गमलें सकळां देतिल कांहीं तरी नुतन यासी ॥ ४ ॥
बोले सुकंठ जाउनि श्रीरामें बाहिलें तुला अदरें ।
रुसणें योग्य कसें हें गमलें बापा अधीं मला वदरे ॥ ५ ॥
वायुज ह्मणे जिणें हें नलगे आतां मरेन डोहींच ।
राम कृतघ्न खरा हा वार्ता [1] जगांतरां उडो हीच ॥ ६ ॥
सुगलें समजाउनियां अणिलें वातात्मजासि गेहातें ।
तरि पाहिलें न रामें देणें मग उचित कायसें हातें ॥ ७ ॥

१ सुग्रीवा.

झाला खिन्न बहुतसा आलों तरि कासयास मी मागें।
वदलों सुगलासि असें कीं सहसा उचित ही न मी मागें ॥ ८ ॥
परि नायकेचि आतां काय करावें अशा प्रसंगास।
झाली आकिर्ति बहुताचि गात्रेंही पावती न भंगास ॥ ९ ॥
पुनरापि जावें परतुनि तरि होणारी दहांत मम कुत्सा।
रहतां ह्मणतिल आला भषकासम हालवीत निज पुच्छा ॥ १० ॥
कळलें सीतेसि असें कीं रामें उचित वायुतनुजाला।
द्धिधलें नाहीं यास्तव तो निज चित्तांत खिन्न बहु जाला ॥ ११ ॥
महिजा ह्मणे प्रभुवरा मारुति आजि बैसला उदास कसा।
वाटे कष्ट करुनिया अंतीं हा उतरला न दास कसा[1] ॥ १२ ॥
राम ह्मणे या जोगें आहे तरि सांग काय देयासी[3]।
उरलें एक अतां हें देतों ह्मणसील काय[4] दे यासी ॥ १३ ॥
तेंही देऊनि यातें कांते होईन काय उतराई।
उपकार फार याचे वाटेलचि गिरि पुढें जसी राई ॥ १४ ॥
देतें नव.रत्नांचा अमोल्य काढूनि हार हो यासी।
त्या वांचुनि मारुतिला न दिसे कारण प्रमोद होयासी ॥ १५ ॥
तत्कालचि सीतेनें कंठीं आणूनि घातिलाहार।
पाहे रत्नें फोडुनि निघतो कीं काय नामउद्गार ॥ १६ ॥
सीता ह्मणे अहाहा होतीं रत्नें अमोल्य कीं सारीं।
कां नाशिलीं अरे हीं ज्यापाशीं तोचि धन्य संसारीं ॥ १७ ॥
राम ह्मणे जाऊं दे अणिलीं रत्नें कशास त्वां आधीं।
या ऐशा उचिताचा चित्तीं याच्या नसेल गे आधी ॥ १८ ॥
रवि अस्तंगत होता झाले बहु लखलखाट दीपाचे।
मारुतिसह सकळांहीं नमिले पदयुग दयानंदीपाचे[6] ॥ १९ ॥
रामा न देववे तरि दृढतर बांधूनियां उचित ठेवा।
हेवा न करी परि मज सांगा कांहीं तरी नुतन सेवा ॥ २० ॥

[1] मागें. २ कसोटिला. ३ देण्याला. ४ शरीर. ५ चिंता. ६ दयासागराचें,

राम ह्मणे मज जृंभा येइल तेव्हांचि वाजवी चुटकी ।
कथिलें कार्य तुला हें न मिळे यावरि कपर्दिका फुटकी ॥ २१ ॥
झाली निशा ह्मणुनियां गेले सर्वत्र आपुल्या गेहा ।
परि मारुती न हाले मुर्ख ह्मणावा तरी कसा गे हा ॥ २२ ॥
सीता ह्मणे बहुदिसां आला कीं समय हा अनंदाचा ।
बसला राशीस कसा अमुच्या हा अनुज काय मंदाचा[1] ॥ २३ ॥
सीता दृक्संकेतें वरचेवर रघुविरा असें कळवी ।
कीं घालवाच याला कोण तुह्माविण अरिष्ट हें पळवी ॥ २४ ॥
सीते चाल गृहांतरिं गेल्यावरि कासयास हा मागें ।
येइल, राहिल सहजचि होता गे सुज्ञ हाहि बहु मागें[2] ॥ २५ ॥
केलीगृहांत गेलीं तरि मारुति हा अहेचि बालक-सा ।
सीता शंकित झाली पाठीं अमुच्याचि सर्वकाळ कसा ॥ २६ ॥
राम ह्मणे बा वत्सा जा आतां कक्षलासि बाहेर ।
कोणी संन्निध असतां निद्रा मजला नयेचि बा हेर[3] ॥ २७ ॥
बाई उठा चला हो होतो निद्रेंत भंग रामाच्या ।
येऊं प्रातःकाळीं उठुनी समयींच नित्य नेमाच्या ॥ २८ ॥
राम ह्मणे राहूं दे सीता रगडील हात-पायांस ।
आयास फार झाले बा तूंही जाणतोसि समयास ॥ २९ ॥
रामा मी बळकट कीं सीता, निज मानसीं करा सर्वदा[4] ।
कारण असेल दुसरें, या गोष्टी सर्वहि परास वदा ॥ ३० ॥
वायुज बाहिर जाउनि क्षणोक्षणीं वाजवीत चुटक्यांतें ।
आ केला रामांनीं घ्याया अवसर नयेचि घुटक्यांतें[6] ॥ ३१ ॥
घाबरली बहु सीता अणिलें बाहूनि वायुतनयासी ।
करितो सेवा अपुली त्यजिल्या ह्मणतील काय जन यासी ॥३२॥

---

१ शनी, सीता यानावानें कुंभ राशी होतें. कुंभेचास्वामी मंद ह्मणजे शनी आहे. सीता ह्मणाली हा शनीचा भाउच आमच्या राशीला आला २ पूर्वी. ३ पहा. ४ निवाडा. ५ दुकऱ्याला. ६ श्वास.

राम म्हणे राहूं दे बा सेवा पावली मला सारी ।
सेवक असेचि असतां होईना काय सौख्य संसारीं ॥ ३३ ॥
झाला विनोद या परि मग सीतेलाहि सुखविलें धामीं ।
गिरिवासी प्रभु म्हणतो गात्या देईन स्वच्छ मेधा मी ॥ ३४ ॥

याच आख्यानाचीं पदें.

कटिबंध (देणगीचा)

झाला समारंभ बहु मोठा, वर्णिल कोण तेथिंच्या थाटा, राबे कुबेर मग कां तोटा, येइल, विप्र चोळिती पोटा, दक्षिणा वाहक नेती मोटा, उघडूनि वस्त्राभरणी कोठा, कवणा देत दुशाला फेटा, कवणा मंदिल लाल दुपेटा, अंगा किनखापी जरिबुट्टा, भूषणें करांगुळीं आंगोठया, कंठीं बहुत जनांच्या कंठ्या, शोभति कडे चौकडे पेट्या, हळदी कुंकुम वसन नगं दाही, सीता देत बायकांलाही, नाहीं न्यून म्हणाया कांहीं, पात्रें नाचति ठायीं ठायीं, तेव्हां गमली एकचि घाई, ज्यात्यां म्हणती येतों बाई, बोलायाची सोयचि नाहीं, रात्रीं होती बहुत जागली, हो हो म्हणतां नाहिं भागली, निद्रा त्यांतचि येउं लागली, वांजत्र्यांनीं झोड लाविली, बहुतांनीं हरिसभा भाविली, वानरसमुहीं याच रीतिनें, वस्त्रें नग भूषणें प्रीतिनें, दिधलीं रामें तसी सतीनें, जरि हें झालें यथा-गतीनें, परि अजवरि वागला भीतिनें, उचित तया गिरिवासी प्रभुनें सहसा नच देवविलें ॥ मारुतिविण सकळ जनांला श्रीरामें बहु मोदविलें ॥ १ ॥

पद—सुग्रीव मारुतीला म्हणतो.
(गडयानो कृष्णगडी अपुला)

कसा अजि भ्रम तुजला झाला ॥ म्हणसी कृतघ्न रामाला ॥
धृ० ॥ विसर कां पडला ये काळीं ॥ मारिला मद् बंधू वाळी ॥

---

१ गाणारांला. २ बुद्धि ३ दाहा प्रकारचे अलंकार. ४ जाणाऱ्या. ५ इंद्रसभा. ६ मानिली. ७ व्यवस्थितपणें ८ आनंदित केलें.

येतां विघ्नें तो टाळी ॥ राम निच भक्तां प्रतिपाळी ॥ अहिल्या दिली गौतमाला ॥ १ ॥ वधिलें राक्षसकुळ रामें ॥ सुखविलें देव दयाधामें ॥ केली अघटित बहु कामें ॥ उद्धरी जनासि निज नामें ॥ बिभीषण लंकापति केला ॥ २ ॥ निंदिसी भक्तामरतरुतें[1] ॥ इच्छिलें फळ जो दे त्यातें ॥ जिंकिलें सकल वदान्यांतें[2] ॥ नसतां कां तरि जन गाते ॥ दिधलें निजपद शबरीला ॥ ३ ॥ असे हें विदित तुला सारें ॥ जाणत मूढ तूं कसा रें ॥ बाहिलें[3] अतांचि तुज बा रे ॥ करिसी वेळ तरी कां रे ॥ शरण हो गिरिवासी प्रभुला ॥ ४ ॥

झुलना. (मारुती म्हणतो.)

अंजनीगीत.

मारुति म्हणे त्याच्या मनीं ॥ असतें देता तेंचि क्षणीं ॥ आतां गेल्या होइल जनीं ॥ उपहास पाही ॥ १ ॥ मजवरि त्याचा प्रेमा जरी ॥ तोही कामा पुरता, वरी ॥ आतां बसला राज्याव-री ॥ उपेक्षा सहज ॥ २ ॥ चित्तापासूनी कष्टलों[4] ॥ अंती उचीता भ्रष्टलों ॥ आतां तेथूनि निष्टलों ॥ अपकीर्तीसाठीं ॥ ३ ॥ कां तूं आग्रह करिसी मला ॥ अपमानानळ[5] बहु चेतला ॥ आतां देहांताचि भला ॥ गमतो मजलागीं ॥ ४ ॥ केला निश्चय हाची बरा ॥ आतां येइना मी घरा ॥ जरी तो गिरिवासी खरा ॥ पाहील त्यासी[6] ॥ ५ ॥

दिंडी. (सुग्रीव म्हणतो.)

सुगल बोले हें उचित काय तुजला । कसा नाहीं चित्तांत शोध केला । स्त्रिया त्यजिती प्राणासि जगीं ठावें । मरण शूराचें शूरपणें

---

१ भक्तांना जो कल्पद्रुम त्याला. २ स्तुत्यांना उदारांना. ३ बोलाविलें. ४ निसटलों, निघालों. ५ अपमानरूपी अनळ म्हणेज अग्नी. ६ प्रभुव्यंकटेश जर खरा असेल तर रामाला त्याच्या या कृत्याबद्दल पाहून घेईल असा भावार्थ.

न्हावें ॥ १ ॥ व्यर्थ अपकीर्ती करुनि घेसि कां ही । कशी वाटेना लाज तुला कांहीं । अशा दुर्मरणें गती कुळां नाहीं । अधोगतिला होशील पात्र तूं ही ॥ २ ॥ चाल सत्वर येथूनि ऊठ आतां । श्रवण करितां कोपेल तुझी माता । ज्यांत नाहीं भुक्ती न मुक्ति[१] कांहीं । अशा साहसें ह्मणतील मुर्ख पाही ॥ ३ ॥

पद (मारुती खेद करितो.)

जोगी-(मजला वरिलसुभद्रा काय)

पडलें संकट अजि भारी, करूं मी काय अतां ॥ धृ० ॥ जाहला जगांत या अपमान ॥ सरलें कष्टांचें महिमान ॥ गळला सहजचि मग अभिमान ॥ राहिलें मान शौर्याचें ॥ १ ॥ करविलें सख्य सुग्रिवाचें ॥ वदुं मी काय अतां वाचें ॥ रक्षिलें प्राण राघवाचे ॥ फळ त्याचें हें झालें ॥ २ ॥ सीता-शुद्धि करुनि आलों ॥ यशस्वी सर्वांमधिं झालों ॥ अतां या अकीर्तिनें न्हालों ॥ आंचवलों सर्वस्वा ॥ ३ ॥ सांगा गिरिवासी प्रभुराय ॥ केला असा काय अन्याय ॥ शेवटीं हाच निवाडिला न्याय ॥ स्मरलों पाय कीं तुमचे ॥ ४ ॥

(सीता रत्नहार मारुतिला देऊं इच्छिते)

-साकी-

राजा जनकनें हार रतनका अमोल सीतामाईको ॥ दिया ब्याहामें[३] बहोत प्रेमसे पूछ पाछले भाईको ॥ १ ॥ वही हार ले आई सीता झट जा अपनें मंदरसे । कहो नाथ अब देऊं पूछत प्रसन्न कर दिल अंदरसे ॥ २ ॥ कहत राम तुम जानों अपना नहीं हमारा कछु हीलां[४] ॥ वोह लेवेगा तुम देवोंगे कौन करेगा फिर [illegible]ला ॥ ३ ॥

---

१. ज्यांत-स्वार्थ ना परमार्थ असें. ३ लग्नांत. ४ हरकत, तकरार.

पद.-(सीता मारुतीच्या चुटक्यांनीं रामाचें तोंड एकदारखें उघडलेलें पाहून घाबरून ह्मणते।)

—जलद त्रिताल—

आतां कैसें मी करूं काई ॥ धृ ॥ काय झालें एकाएकीं ॥ तोंड मिळेंनाचि कां कीं ॥ सीता उष्ण श्वास टाकी ॥ झाकीं पदरानें करुनि घाई ॥ १ ॥ रात्र झाली दिसे फार ॥ कोणा कळवूं समाचार ॥ कोण सांगेल विचार ॥ फार व्याकुळ होती गाई ॥ २ ॥ रामें खुणाविलें तिसी ॥ येथें आणि मारुतिसी ॥ कांगे व्यर्थ घाबरसी ॥ कशि मूढ तूं त्वरें जाई ॥ ३ ॥ येतां संकेतिलें त्याला ॥ बंदकेलें चुटकीला ॥ गिरिवासी संतोषला ॥ नाहीं लागला वेळ कांहीं ॥ ४ ॥

श्री रामास जनकानें बोलावून मेजवानी केली तें आख्यान.

कथा–सारांश.

एकदां सर्व वानरसेनेसह श्रीरामचंद्रास जनकराजानें मेजवानीस बोलाविलें. जनकाचा फारच आग्रह पडल्यामुळें श्रीराम सर्व मंडळीसह मिथिलेस गेले. जनकानें त्यांची व्यवस्था उत्तम ठेविली. मेजवानीचे दिवशीं वाढलेल्या पदार्थांत लोणचें होतें त्यांत भोकरें होतीं. एका वानरानें भोकरांत काय आहे तें पाहण्याकरितां एक भोकर दाबलें. त्यांतून भोकराची आठोळी उडाली ती उडाल्याबरोबर तो वानरही उडालाहि असें पाहून सर्व आपआपल्या शक्ति प्रमाणें उड्डाण करूं लागले अशी तेथें मोठी धांदल उडाली. अशी कथा ह्या आख्यानांत आहे.

आर्या.

राज्याभिषेक सुदिनीं विधिनें साकेतिं रघुविरा जाला ।
तो प्रभु वस्त्राभरणें देउनिया बोळवीत राजाला ॥ १
प्रार्थी जनक तशांतचि रामप्रभुलागिं न्यावया धामीं ।
घ्यावे सुगल–बिभीषण होइन संतुष्ट यांत बहुधा मी ॥ २ ॥
नाहीं मज ह्मणवेना तरि मी आहेचि संकटामाजीं ।
या साठीं प्रभुवर्यें मान्य करावीच विनवणी माजी ॥ ३
शंका असेल पोटीं सोडावें इतर वानरां काय ।
तरि नेणें सकळांतें ह्मणणें कीशांसि वानरा काय
राम ह्मणे सत्यचि हें परि न दिसे यांत अर्थ हो कांहीं ।
मर्कट अविचारी बहु करितिल भलतेंचि कर्म हो कांहीं ॥ ५
मग संकट सकळांसचि होइल दाटूनि कां असें करितां ।
धरितां आग्रह तरि कां सुगलमुखाचेंहि कान कां भरितां ॥ ६
जनक ह्मणे रामा या आपण तरि सर्वकाळ वागवित ।
पोसेना काय अह्मा यांना दिनरात्र एक भागवितां ॥ ७ ॥

---

१ सुग्रीव.

काय कठिण अपणासहि आहे पुष्पक विमान बैसाया ।
अवधी पुरे दिनत्रय मार्गी नलगे एक पैसा या ॥ ८ ॥
प्रभुचा रुकार जाणुनि जनकहि तेथूनि जाय नगरासी ।
साहित्य मेळवी बहु वस्त्राभरणें अनेक नग–रासी ॥ ९ ॥
पाचारणासि येतां गेलें बैसूनि पुष्पका–माजीं ।
जनक ह्मणें हो झाली आतां परिपूर्ण कामना माजी ॥ १० ॥
शिबिरें बहु उतराया दिधलीं सर्वांसी सारखीं धामें ।
दासी दास यथोचित करिती संपूर्ण लागलीं कामें ॥ ११ ॥
मंडपही बहु दिधले स्थित व्हाया वानरासि जनकानें ।
न पडो न्यून कदापी ऐकुनि ह्मणतील काय जन कानें ॥ १२ ॥
स्नानें करूनि बसले होते सारूनि नित्यनेमातें ।
सेवक कथिती जाउनि पाचारण वृत्त शीघ्र रामातें ॥ १३ ॥
सेवक जनकाचे ही प्रार्थिति येऊनि जानकीशातें ।
ह्मणती त्वरें चलावें घेऊनि सुगलादि सर्व कीशातें ॥ १४ ॥
होउनि सिद्ध निघाले शिबिराहूनि राजमंदिरा जाया ।
वाद्येंहि लागलीं बहु जनक निदेशेंकरूनि वाजाया ॥ १५ ॥
पाहति जन त्या रामा ध्याय जयातें अखंड मदनारी ।
वानरवृंदीं निरखुनि मानिति आश्चर्य फार नरनारी ॥ १६ ॥
ग्रामद्वारापासुनि जे जे पथ मंदिराकडे होते ।
मृगमद-चंदन-केशर-मिश्र करुनि घातिले सडे हो ते ॥ १७ ॥
तरुणाम्रपल्लवें बहु मंडप विस्तीर्ण साधिले बरवे ।
सफलितरंभातरुचे खांबहि त्यांतुनि शोभती हिरवे ॥ १८ ॥
बहु-वर्ण रंगमाळा स्थळोंस्थळीं घातिल्या अती रुचिर ।
प्रेक्षक जन त्या भंवतें दृष्टी देऊनि पाहती सुचिर ॥ १९ ॥

---

१ दागिन्यांचें. २ गंज, समुदाय. ३ घरें ४ इच्छित. ५ सुग्रीवादीकरून. ६ वानरांतें. ७ आज्ञेनें. ८ मदनाचा शत्रु ह्म० महादेव. ९ जनकराजाचा वाडा. १० कस्तूरी. ११ आंब्याचीं कोंवळीं पानें. १२ फळां सहित केळीचें.

पुष्पें सुगंधिक बहू अणवुनि त्यांचे हि गुंफिले हार ।
द्रव्यें इतर तशीं निजगंधें करिती श्रमासि परिहार ॥ २० ॥
आले रघुनाथ निकट जाणविती वृत्त हेर जनकास ।
हडबंड[1] महानसीं[2] बहु घालिति संपूर्ण सूदेजन[3] कासे[4] ॥ २१ ॥
पंक्ती बहुत नरांच्या तैशा बहु बानरांचिया हारी ।
बैसाविल्या एकसरें करिती भोजन यथेच्छ नर हारी[5] ॥ २२ ॥
सीता–तारादि सकळ ज्या कां नर-वानर–स्त्रिया होत्या ।
त्यांच्याहि पंक्ति जनकें बैसविल्या करुनि वेगळ्या हो त्या ॥ २३ ॥
वानरसमुही मोठा झाला तो कलकलाट जन कानें ।
ऐकुनि ह्मणती अणिलें प्रार्थुनि सदनासि विघ्न जनकानें ॥ २४ ॥
आहे काय पहाया पाठविले दूत शीघ्र राजानें ।
परि तें वर्म कळेना झाला उत्पन्न हा कलह ज्यानें ॥ २५ ॥
आयकिलें मग ऐसें सिंधुजशाखेंत[6] भोंकरें होतीं ।
निरखुनि एका कपिनें फोडुनिया पाहिलीं करें हो तीं ॥ २६ ॥
तेंव्हां एकाएकीं आंठोळी ह्या फळा मधुनि वरती ।
उडतां कपिहि उडाला गेली त्याची उडीहि त्या वरती ॥ २७
दुसरा संनिध होता तोहि उडाला तसाचि तिसरा हो ।
या परि पुष्कळ उडती ह्मणती अन्याचिया गतिस राहो ॥ २८
रामासहि कळलें कीं वन्यांनीं[7] जातिधर्म हा केला ॥
गेला ताळचि यांचा जनकाच्या मानिती न हाकेला[8] ॥ २९
रामनिदेशें वानर बसले येऊनि स्वस्थळावर ते ।
करिती भोजनही परि बहुतांचें लक्ष त्या उडीवरतें ॥ ३०
भोजन झाल्यावरि मग दिधले तांबूल हार बहु गजरे ।
द्रव्यें तसीं सुगंधिक वस्त्रें नग भूषणें बहू गजरें ॥ ३१

---

१ गडबड. २ स्वयंपाक घरांत. ३ स्वयंपाकी. ४ कास घालिती.. धोतरें पचांग घालून बसले. ५ वानरें. ६ सिंधुज लोण सिंधुजशाख लोणशाख, लोणचें. ७ वनांत राहणारी–वानरें त्यांनीं. ८ मोठ्या धाकानें.

सीता तारादि सत्या वस्त्राभरणें करूनि तोषविल्या ।
सुमनांच्या माळा बहु परिमळ द्रव्यें तशाचि लोभविल्या ॥ ३२ ॥
गिरिवासीरामाचा केला सत्कार फार जनकानें ।
या चरित–श्रवणानें झालें होतिल पवित्र जन–कानें ॥ ३३ ॥

याच आख्यानाचीं पदें.

पद

दिंडी (जनक ह्मणतो)

जनक बोले हो काय कठिण याचें । सतत वागवितां वृंद[1] वानरांचे । वदो वदतिल तें सहन करूं साचें । नसे कारण हें सबल निग्रहाचें ॥ १ ॥

पद. (सीता रामचंद्रास विनविते.)

(मजला वरिल सुभद्रा काय) जोगी.

सीता बहु विनवी रामा, द्या हो रुकार जनकासी ॥ धृ० ॥ भूषण यांत असें माझें ॥ पहातिल वैभव हें राजे ॥ पडले श्रम जरि या काजें ॥ येउं सांजें परतुनियां ॥ १ ॥ प्रार्थना व्यर्थचि[2] जनकाची ॥ होइल अपकीर्ती साची ॥ प्रभो मम हेंचि मनीं जाची ॥ करा याची तोड बरी ॥ २ ॥ कठिण तरि यांत काय बोला ॥ मानितीं नरवानर बोला[3] ॥ देतां व्यर्थचि कां झोला[4] ॥ कोण तोलीं जनकाच्या ॥ ३ ॥ सुग्रिव अंगद हे सारे ॥ बिभीषण कशास येणारे ॥ सरमा तारा परभारें ॥ निजभारें जातिल कीं ॥ ४ ॥ सुचवितें गिरिवासी रामा ॥ योजा पुष्पक या कामा ॥ अपुल्या खर्च नसे दामा ॥ कां वामा नव जावें ॥ ५ ॥

---

१ समुदाय. २ निःश्चयाचें. ३ आज्ञेस. ४ टाळा. ५ बरोबरीला. ६ बिभिषणाची स्त्री. ७ वाळीची नंतर सुग्रिवाची स्त्री. ८ सैन्यासह. ९ पैशाला.

कटिबंध. (भोजनाचे वेळचा थाट)

कीश नरांच्या पंक्ति बैसल्या, रांगोळ्या त्यां मधुनि घातिल्या, पाट बसाया ताट कांचनी, वाट्या दिधल्या, चटण्या कोशिंबिरी वाढिल्या, मग तिं रायतीं स्वादआयती, देती सर्षप नाकीं भरती ॥ सेवन केल्या रुची कायती, वर्णिल ज्याचा तोचि कायती, पालेभाजी बहु त्यामाजीं, घोळ चमकुरा मेथी ताजी, चरारीत फोडणि ही माजीं, पात्रस्थातें ह्मणती खा जी, वटक साजिरे बोंड गोजिरे, पंचामृत कढि तक्र आमटी, फुरके घेतां लागे गोमटी, पक्वान्नें बहु रुचिर वाढिलीं, मोतिचूर दळ जिलबि चांगली, पात्रीं ओदन-मूद घातली, वरान्नाची शोभा दिसली, पायस घृत शर्करा वाढिली, सांगाया मी मनीं विसरलों, शाखा बहु उपशाखा पाहुनि शाखामृग चाखाया पाहती, राखाया धिर सन्मति कैंची, एकानें भोकरें फोडिलीं, आंठोळी त्यांमधुनि उडाली, त्यानें जंव ती उडी मारिली, दुसऱ्याची मग त्यावर गेली, ऐसी केली होतां होतां लांब लांबली, मुख्य यूथ त्यांमाजीं शिरली, रामाज्ञेनें कपी बैसले, जेवण झाल्या त्वरित पातले ॥ श्रीरामें निज आगमनें, जनकासीं बहु तोषवील ॥ १ ॥

झुलना. (जन जनकास ह्मणतात).

घनाक्षरी.

सुनो जनक महाराज ॥ भली बात नही आज ॥ इसी वानर के काज ॥ करे इलाज कोनसो ॥ १ ॥ करत सबही भुभुःकार ॥ कुदन लागे अनिवार ॥ कही बैठनको थार, नहि अधार बच रहे ॥ २ ॥ कहो कौन इन समान ॥ कुदी मारे असमान ॥ रहे काहेको मकान फिर ठिकाण कहांसे ॥ ३ ॥

पद (जनकाच्या येथील बायका बोलतात.)

जलदत्रिताला.

अतां न दिसे हो गती बरवी ॥ धृ० ॥ होत ताटीं बैसविलें ॥ नाहीं अझुनी जेविले ॥ नकळे कोणीं काय केलें ॥ गेले

१ वानर

कैसे कोण फिरवी ॥ १ कैसे बैसतील ताटीं ॥ कोण लागे यांच्या पाठीं ॥ काय मानिती हे हंठी ॥ तठिं पडेल कोण विरवी ॥ २ ॥ सारे मोडितिल घरें ॥ वाटे पाडिती गोपुरें ॥ कोण म्हणे आलि पुरें ॥ उरे कैसी जनकपदवी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धांव ॥ करि यांचा तूं उपाव ॥ अम्हां दिसेनाचि ठाव ॥ नांव रघुनी हेतें पुरवी ॥ ४ ॥

(जनकाच्या घरच्या बायका सीतेस ह्मणतात.)

अंजनीगीत.

पंक्ती वाढिल्या परिकर ॥ जेवीताती नारी नर ॥ कां हे उडाले वानर ॥ नकळे आह्मांसीं ॥ १ ॥ बाई तुमच्या घरची रीत ॥ ठावी नव्हती हो किंचित ॥ आज आली ही प्रचीत ॥ शोभतें तुह्मां ॥२॥ कैसे सांभाळितां यांसीं ॥ हे तरि असती बहु गुणराशी ॥ युक्ती तुमची तुह्मांपाशीं ॥ दंगचि आह्मि झालों ॥३॥

दिंडी. (सीता ह्मणते.)

सीता बोले उपकार फार यांचे ॥ पति न दुखवीती कधीं यांस वाचें ॥ काय विक्रम ते सांगु मी तुह्मांसीं ॥ मला सोडविलें वधुनि राक्षसांसीं ॥ १ ॥ सुगल अंगद मारुती प्राण, नांथां ॥ म्हणुनि आवडती बहु प्राणनाथां ॥ अलीं विघ्नें सर्वहीं दूर केलीं ॥ काय नवलाचि सोशिल्या अशा केली ॥ २ ॥ कोण शकती हें कर्म जन कराया ॥ इतर भेटविते काय जनकराया ॥ स्वामि आज्ञेनें क्षणें शांत होतीं ॥ पहा, अवलंबा तुह्मीं शांति हो ती ॥३॥

दिंडी

जनकराया वाटलें चोज भारी ॥ वधुनि आले रावणा रावणारी ॥ साह्य केलें वानरीं युद्ध—कामा ॥ वनीं झाले वश

---

१ हट्टी. २ कट केला. ३ मोडील. ४ वेशी. ५ हेतु, इच्छा. ६ गाल, व्यवस्थित रीतींच्या ७ गुणी. (ही व्याजोक्ति आहे.) ८ वाणीनें, शब्दानें. ९ पराक्रम. १० स्वामीचे. ११ रामचंद्राला. १२ लीला.

कोपी त्वरित रामा ॥ १ ॥ मनुज, वानर, पाहतां भक्ष साचें ॥ कसें झालें त्या काळ राक्षसांचे ॥ बरें वधिलें ते धेनु विप्रतापी ॥ नसे रामासम जगीं या प्रतापी ॥ २ ॥

श्लोक-

जगीं सर्वही मानिती वैभवातें ॥ विपत्तींत कांता पुसेना धवातें ॥ सखे सोयरे आप्त सारे धनाचे ॥ पथीं लागती सर्वदा शोधनाचे ॥ १ ॥

---

१ गाई व ब्राह्मण यांना ताप देणारे. २ पतीला, नवऱ्याला. ३ हुडकण्याचे.

श्री रामचंद्रांनीं सीतेचें रूप घेतलें तें आख्यान.

कथा-सारांश.

श्रीरामचंद्र व सीता अंतःपुरांत असतां रामाचें रूप घेऊन क्रीडा करावी असें सीतेचे मनांत आलें. सीतेनें आपली इच्छा श्रीरामास कळविली. त्यांनीं असें करणें चांगलें नाहीं वगैरे पुष्कळ सांगितलें परंतु सीता ऐकेना. तेव्हां श्रीरामांनीं सीतेचें व सीतेनें रामाचें रूप घेऊन क्रीडा केली. प्रातःकाळीं हीं उभयतां निजलीं असतां वसिष्ठांनीं श्रीरामाचें ध्यान केलें, तेव्हां त्यांनां स्त्रीरूप दिसलें. नंतर ते हा काय प्रकार आहे म्हणून श्रीरामाचे दर्शना करितां आले. श्रीराम व सीता हे दोघेही फार लज्जीत झालें अशी कथा ह्या आख्यानांत आहे.

आर्या.

असतां प्रभु साकेतीं सीतेसह केलिमंदिरांमाजीं !
प्रार्थुनि पतिस ह्मणें हो पुरवा इतुकीच वासना माजी ॥ १ ॥
प्रभुजी मद्रूप तुह्मी अवलंबुनि रामरूप मज द्या हो !
होईल अतिक्रम तरि अनुकंप्या मी, अवश्य मज द्या हो ॥ २ ॥
कांतांच नसल्यावरि कैसें मज बोलवेल हो तेजें !
यामद्वयाचि पुरें, मग घ्यावें अन्योन्यरूप होतें जें ॥ ३ ॥
राम ह्मणे आजि तुला झाला भ्रम काय गे प्रिये कळवी !
केवळ अनुचित कैसें वदसी जें सतत सद्यशा मळवी ॥ ४ ॥
गुरुजी वसिष्ट आधीं श्रवण करुनि क्षोभतील पावकसें !
जन निंदावाग्बाणें पडलें तर सोससील घाव कसे ॥ ५ ॥
हा छंद काय बरवा सीते सोडूनि दे अतांच कसी !
निंदास्पद झाल्यावरि चित्तीं अपुल्याचि तूं पहा चर्कसी ॥ ६ ॥

---

१ अयोध्येंत २ क्रीडा मंदिरांत ३ दया करण्यास योग्य ४ रुकार. ५ तुमच्या तेजामुळें. ६ दोन प्रहर. ७ रामाबरोबर. ८ लगीसारखें. ९ फजीत होशील, फसशील.

सीता वदे 'प्रभुजना आहे तरि कोण हो अशा जागीं !
पूर्ण न केल्या सहजाच राहिल ही सदिच्छा अशी जागी ' ॥ ७ ॥
' आग्रह भलता हि तरी वाटेना मोडणें मना नीट !
या साठीं सांग प्रिय अंतरिं होऊनिया बरी धीट' ॥ ८ ॥
' अन्योन्य-रूप घेउनि क्रीडावें अन्य कामना नाहीं !
आहे निवांत हें स्थळ प्रभुच्या येणार कां मना नाहीं' ॥ ९ ॥
झाले सीता आपण दिधलें तिजलाहि रामरूप तसें !
क्रीडाति यथेच्छ बहुपरि नाकीं नथ प्रभुजिच्या हि रुचते ॥ १० ॥
सीतेसि हर्षभारी घेउनिया रामरूप जंव रमली !
गमली निशा पळ तसी सार्द्धद्वययाम जरि असे क्रमली ॥ ११ ॥
नाकीं नथ बहु साजे भाळीं कुंकुम शिरींहि धंम्मिल तो !
मंदील जरिदुपेटा जोडा अनुरूप कां न संमिलतो ॥ १२ ॥
होउनि श्रांत उभयतां निजलीं एकाच मंचकाव ती !
नयनीं निद्रा भरली होती आधींच काय सावरती ॥ १३ ॥
अरुणोदयींच गुरुजी साहुनि अजपाजपासि समाचें !
करिती ध्यान तरी ये चित्तीं स्त्रीरूप जें न कामाचें ॥ १४ ॥
भांबावलें गुरुहि मग ह्मणता ' विपरीत कां असें घडलें !
स्त्रीरूपाचि ये ध्यानीं, अंतर तरि कोणतें असें पडलें' ॥ १५ ॥
यावरि कळलें गुरुला सीतेचें रूप रामचंद्रांनीं !
धरिलें, कोणींहि असें पूर्वी न कधींच इंद्र चंद्रांनीं ॥ १६ ॥
सुर्योदयीं प्रभुजिचें आले जंव पाहण्यासि वदन मुनी !
असती क्रीडास्थानीं कथिती सेवक विशंक पद नमुनी ॥ १७ ॥
' आले वासिष्ठ गुरुजी पाचारिति आपणासि रामा तें ॥
ह्मणती निद्रा कां बहु झाला वृत्तांत श्रुतकरा मातें' ॥ १८ ॥

---

१ अशा अतृप्त राहल्यामुळें नेहमीं जागृत राहील. २ खुपू लागली. ३ अडीच प्रहर. ४ वेणी. ५ जरीचा दुपट्टा. ६ शोभतो. ७ वसिष्ठ. ८ आश्चर्य इंद्र चंद्र हलके जो लंपट आहेत तरी त्यांनींहि पूर्वी कधीं असें केलें नाहीं.

गडबडले राम बहू ह्मगती ' आतां कसें करावें गे ।
कथिलें परि नायकिलें नमन करायासि तूंचि जा वेगें ॥ १९ ॥
सुटला कंप शरीरीं प्रभुला नव्हतीच गोष्ट ही रुचली ।
' आणिला समय कठिण हा बुद्धी कोठूनि मज असी सुचली' ॥२०
' करिसी खेद वृथा कां वस्त्रें नग भूषणें हि घाल कसी ।
दृष्टी पडल्या स्पष्टचि ह्मणतिल नियमा विरुद्ध चाल कसी ' ॥२१॥
घेती अन्योन्य वचन तों गुरु आलेचि मंदिर–द्वारीं ।
वारि कोण तयातें दिसले प्रभु साजनाक्ष तद्द्वारीं ॥ २२ ॥
' रामा चित्र गमें मज नयनीं अयनीं किमर्थ हें कळवा ।
मळवाल सद्यशा कां मूज्ञ तुह्मीं संशयासि या पळवा' ॥ २३ ॥
ऐकुनि स्तब्धचि झाले कीं हे सर्वज्ञ सर्वदा साचे ।
तरि कळलेंचि असावें गुरुला हें वृत्त सर्व दासाचें ॥ २४ ॥
' रामा काय बरें हें अकीर्तिकर कोण हो तुह्मां शिकवी ।
लघुतरआचरणें या वर्णिल तरि कोण हो तुम्हासी कवी ॥ २५ ॥
गुरुजीं ऐसे वदतां रामासहि तो सुबोधसा गमला ।
' पुरली स्पृहा सकळ कीं उरली सीते विशंक सांग मला' ॥२६॥
सीता लज्जित होउनि गेली सदनीं पुन्हा न ये मागें ।
ह्मणती राम यथास्थित झालें शासन पुन्हा नये मागें ॥ २६ ॥
यावरि सीतेसी बहु मृदुतर वचनें अनंद मय केली ।
गिरिवासी प्रभुच्या या वर्णावा किति अनंद–मय केली ॥ २८ ॥

याच आख्यानाचीं पदें.

श्लोक–सीता आपले मनांत विचार करिते.

सीता विचारी निज मानसांत ॥ केलें कधीं कोणि न माणसांत ॥
जरी असें हें अघटीत काम ॥ करीन, माझ्या वचनांत राम ॥ १ ॥

---

१ वाळ्यापरी २ डोळ्यांत काजळ घातलेले (डोळ्यासारखे) ३ शंका.

[illegible] होइन राम साच ॥ स्त्री-वेष हाही प्रभुला तसाच ॥ देईन, ऐसें स्वमनांत भावी ॥ परि कळेना अपमान भावी ॥ २ ॥

दिंडो.

मनीं सीतेच्या राम अपण व्हावें ॥ रामचंद्रांनीं मद्दिय रूप घ्यावें ॥ असें क्रीडावें अर्ध-निशा माजीं ॥ कधीं होइल ही पूर्ण अशा माझी ॥ १ ॥

-साकी-

सोच करे सीता मनमें अब राम रूप बन जाऊं ॥ आपहि राम बनेगे सीता इसी तऱ्हे समजाऊं ॥ १ ॥

पद-(सीता रामचंद्रास ह्मणते.)

गडयानो कृष्णगडी अपुला-या चालीवर

सीता विनवी रघुवीरा ॥लालसा माझी पूर्ण करा ॥ धृ० ॥ ऋतु हा कुसुमाकर आहे ॥ फुलल्या पुष्प-लता पाहे ॥ सुखकर मलयानिल वाहे ॥ चंद्रिका अतिशर धवला हे ॥ समय हा वाटे सुखद बरा ॥ १ ॥ शोभा सद्नाची भारी ॥ त्यांत या रत्न-दीप-हारी ॥ द्रव्यें सुगंधमय सारीं ॥ देती मोद मना सारी ॥ नसों या कामीं अळस जरा ॥ २ ॥ शय्या क्रिति तरि मृदुला ही ॥ गुंफिल्या माळा कुसुमांहीं ॥ न दिसे इतर वेथें कांहीं ॥ रमात्रें यथेच्छ या ठायीं । दासी दास नको तिसरा ॥ ३ ॥ व्हावें मज सम तुह्मि रामा ॥ द्यावें निजरुप मज रामा ॥ पुरउनि यामद्वय कामा ॥ सेवूं अपअपल्या नामा ॥ प्रभु गिरिवासी द्या असरा ॥ ४ ॥

(राम उत्तर देतात)

जलद घनाक्षरी

काय तुं वेडी झालिस आज ॥ कशि वाटेना तुला लाज ॥ नव्हे उचित असें काज ॥ कां गे हटावे धरिशी, कथिलें नायकसी

१ वसंत २ मलयपर्वतावरून येणारावारा. ३ चांदणें ४ शुक, ५पंक्त ६चिता ७ स्त्री

असलसि कोणाचि तूं भाज ॥ १ ॥ जन ह्मणतिल आला माज ॥ मनीं विटतिल गुरुराज ॥ कोणी कथिली बुद्धी, कशि गेली शुद्धी, अह्मां हसतिल जनकराज ॥ १ ॥

कटिबंध. (पुन्हा सीता म्हणते)

श्रीरामें जनक–सुतेचा अति प्रेमें हेत पुरविला ॥ धृ० ॥ ऋतु कुसुमार प्रियंकर भासे, चंद्र चंद्रिका धवल प्रकाशे, सुखदानिल मंजुळ वाहतसे, पुष्पलता तरु फुलले खासे, मोदविती बहुवार सुवासें, गुलाब चंपक बकुल मालती, गुलछबो गुलबहार शेंवती, अन्य लताही बहुविध असती, गुच्छ गुच्छ किति अच्छ शोभती, प्रतिक्षणीं बहु उत्सव देती, इंद्रोद्याना तुच्छ दाविती, फळ–भारें तरु नम्र जाहले. आम्र फणस दाळींब आवळे, नारिकेळ पोफळी जांभळे, मातुलिंग अंजीर चांगले, द्राक्षाचे बहु घोंस लोंबले, सरोवरीं अति दिव्य सारसें, जलमंदिर त्यांमधीं आरसे, रत्न दीप दिसताति फारसे, पाहतां लोचन होति गारसे, मृदुल सेज मंचकीं फुलांची, सुगंध द्रव्यें बहु मोलाचीं, निजगंधें तोषविती साची, चित्तीं माझ्या काम उदेला. तो प्रभुंनीं पाहिजे पुरविला, राम-रूप मज अगत्य द्यावें, स्वामींनीं मद्रूप धरावें, यामद्वय–पर्यंत रमावें, त्या नंतर मग निज–रूप ध्यावें, प्रभुनीं आग्रह जाणुनि सतिचा बोल अंगिकारिला, श्रीरामें जनक. सुतेचा, ॥ १ ॥

दिंडी. (राम लक्ष्मणास ह्मणतात.)

राम वदती लक्ष्मणा बैस द्वारीं ॥ असो कोणीही त्यांसि तूं निवारी ॥ नको सोडूं कवणासि गृहामाजीं ॥ असी तुजला, वाग्वी, शपथ माजी ॥ १ ॥

दिंडी (लक्ष्मण हेरांस सांगतो)

कथी लक्ष्मण हेरांसि तुह्मी जागा ॥ अल्या कोणी प्रथमला

मला सांगा ॥ असा सावध या स्थळीं सर्व आतां ॥ कारिन शिक्षा तिळमात्र उणें होतां ॥ १ ॥

लावणी (दाधांनीं वेषांतर केल्याचें वर्णन)

रुप धरुनि सीतेचें रमले रामराय मंदिरीं ॥ वाटतें नवल बहू अंतरीं ॥ धृ० ॥ आग्रह बहु सीतेचा जाणुनि स्त्री-रुप अवलंबिलें ॥ निढळीं कुंकुम हि रेखिलें ॥ नाकीं नथ बहु साजे कंठीं रत्नहार शोभले ॥ मस्तकीं नग सुंदर गुंफिले ॥ बाजुबंद जडिताचें कंकण हतिं हतसर चांगले ॥ पांयीं पैजण ही घातले ॥ भरगची पैठणी नारळी पदर रंग अंजिरी ॥ १ ॥ रामरूप शोभलें सतिनें शिरीं मंदिल बांधिला ॥ अंगरखा किनखापी घातिला ॥ लाल दुपेटा जरि बुट्यांच्या अंगावरते भला ॥ पितांबर कासेसहि चांगला ॥ कानिं चौघडा द्विजमोत्यांचा अति सुंदर वाटला ॥ कंठिनें कंठ बहू शोभला ॥ करिं मुद्रा मणगटीं हिऱ्याची पौची अति साजिरी ॥ २ ॥ परस्परें क्रीडती दंपती नुपजे नवल कायसें ॥ केलें प्रथमचि त्यांनीं तसें ॥ शंका येथें ह्मणाल कळलें एकांतीचें कसें ॥ करिचें कंकण नयनीं दिसे ॥ पूर्ण मनोरथ होता सीता अनंद मानीतसे ॥ प्रभूचा विनोदही करितसे ॥ गिरिवासी प्रभु क्रीडा सरल्या निजले पलंगावरी ॥ ३ ॥

श्लोक— वसिष्ठ रामास ह्मणतात.

रामा मला एक असे अपेक्षा ॥ त्यावांचुनी सर्व जगीं उपेक्षा ॥
आयुष्य एक क्षण दे मला हो ॥ मिळेल कोठें तरि फार लाहो १॥

श्लोक-

केला शोध परंतु एक लवही आयुष्य कोणी न दे ॥ होता एक गलीत-कुष्टशरीरीं तो रामचंद्रा वदे ॥ देतो आयु यथार्थ

---

१ हातचें कंकण डोळ्यानींच दिसते. त्याला पाहावयास आरसा नको.

आजि तुजला ही दिव्य काया करी ॥ झालें दिव्य शरीर, त्यावरि बहु तो जीविताशा धरी ॥ १ ॥

श्लोक—राम वसिष्ठास म्हणतात.

बोले वसिष्ठा-प्रति हेंचि जाण ॥ कोणी न दे आयु लव-प्रमाण ॥ झालें मला शासन आजि देवा ॥ करीन आतां तव पाद-सेवा ॥ १ ॥

पद—वसिष्ठ रामास ह्मणतात.

जोगी.

ह्मणती वसिष्ठ मुनि रामा, करणें अविहित कीं ॥ धृ० ॥ शिकावितां नयेचि कीं आतां ॥ तुह्मा-सम कोण दुजा ज्ञाता ॥ जगाच्या स्थिति रितिला पाहतां ॥ कां त्यजितां सन्मतिला ॥१॥ असती वडील पुसायासि ॥ कळल्या गति होइल कैसी ॥ वाटली ही चिंता मजासि ॥ आलों तुह्मासि कळवाया ॥ २ ॥ जरी हें नच वदलों रामा ॥ होइल प्रबलचिकीं रामा ॥ अंतर सहज इतर कामा ॥ ह्याचि आह्मां खेद बहू ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी मौन धरी ॥ ह्मणें ही वदतां गोष्ट खरी ॥ सहसा पुन्हा असें न करी ॥ ह्मणुनि धरी चरणातें ॥ ४ ॥

श्लोक—वसिष्ठ रामास म्हणतात.

गुरु वसिष्ठ ह्मणती प्रभु राघवा ॥ कर्म हें अखिल देइल लाघवा ॥ कवण तो शिकवी तुजला गती ॥ गतिवरार्थि तुझ्या पदिं लागती ॥ १ ॥ बापा तुला हें हित कां कळेना ॥ विचारती बुद्धिस आकळेना ॥ गेलें आयू येइल काय रामा ॥ देणार ऐसी तुज काय रामा ॥ २ ॥

---

१ स्त्री. २ लघुत्व, हलकेपणा. ३ श्रेष्ठगती प्राप्त व्हावी म्हणून.

हनुमंत सीता शुद्धीस गेला तें आख्यान.

आर्या.

सोडुनि महेंद्र गिरिला गेला हनुमंत सायकांसारा ।
थारा न घेचि कोठें त्याचा वृत्तांत आयका सारा ॥ १ ॥
लंका-पुर-प्रदेशीं भेटे मैराळ[2] गणपती देवी ।
ठेवी बोल ह्मणें कां सेवा अवलंबिली तुह्मी देवीं ॥ २ ॥
ते ह्मणती तुज ठावें देवां सकळांसि घातलें बंदीं ।
वंदी सुरनाथ सदा कीं तो रावण असे महाद्वंद्वी ॥ ३ ॥
सरला उपाय यास्तव आह्मीं सर्वत्र जाहलों दास ।
चुकतां कृत्य समर्पित[3] घेतो निर्दय करीं प्रतोदास ॥ ४ ॥
बुडतों क्लेश—समुद्रीं दीना तारावयासि नौका हो ।
सीताहि दुःखिता बहु ह्मणते अझुनी नयेचि धव कां हो ॥ ५ ॥
शिरला लंकेंत कपी वेळ न करितांचि वात—रूपानें ।
नयनीं धुळ जनांच्या पाडी हलवूनि बहु तरू पानें ॥ ६ ॥
वेदाध्ययन घरोघरीं ऐके परि ते महा अदय पापी ।
निंदक हिंसक यास्तव वायुज[6] त्यांतें मरा असें शापी ॥ ७ ॥
राक्षस सुरापि[7] सारे राक्षिति सदनींच अग्नि-होत्रास ।
चित्तीं ह्मणें तुह्माला कां देईनाचि अग्नि हो त्रास ॥ ८ ॥
चर्चा वेदांताच्या, मारिति शोधूनि धेनु विप्रांसीं ।
प्राशिति रक्तें घटघट भीती पाहूनि धेनु विपासी ॥ ९ ॥
ह्मणविति ब्रह्मज्ञानी आपण, जार स्त्रिया सकल असती ।
बसवी परसद्मीं त्या कीं त्यांच्या अंतरि सदा असती ॥ १० ॥
जाती नरयानीं जन त्यांतें ढकलूनि वाहकां मारी ।
ह्मणती समय कठिण अजि संपवितो काय देह कोमारी[12] ॥ ११ ॥

---

१ बाणासारखा २ मल्हारि. ३ नमलेलें ४ चाबुकास. ५ नवरा—राम. ६ हनुमंत. ७ दारूपिणारे. ८ दुष्ट. ९ आस—आशा, पर भोगाची. १० मनुष्यानीं वाहून नेण्याचीं वाहनें ह्म० पालखी, मेणा इ० येथून मारुतीच्या क्रूरांचें वर्णन सुरू झालें. ११ स्कंधावर घेणारास १२ रुद्र.

घेउनि पूर्णघट शिरीं जाती बहु अंगना स्वगेहास।
पायीं लांगुलं[2] घालुनि पाडी तैं होय बहु जना हास ॥ १२ ॥
बाळें देत झुगारुनि गगनीं तरि कोण हो तया वारीं।
पुरवासी लोकांतें गमला कल्पांत तो तया वारीं[3] ॥ १३ ॥
गज रथ तुरंगमावरि जाती बैसूनि जे स्वगेहातें।
त्यांतें अपटुनि मारी मुकती तत्काल कितिक देहातें ॥ १५ ॥
निजलीं दंपत्यें जीं एकांतीं नेसलीं न वसनांहीं।
आणी देवद्वारीं कीं फेडा फेडिला नवस नाहीं ॥ १५ ॥
रत्नें भांडारींचीं पडतीं येऊनि राज–मेंढीला[4]।
ह्मणती नगळेचि अम्हा कवणाची ही पिशाचवंळीला[5] ॥ १६ ॥
वस्त्रें हि फाडिलीं बहु दशाननाचीं क्षणांत कीं शंबरें[6]।
न कळे कां कवणासीं पीडितसें हें पिशाच कीं शव[7] रें ॥ १७ ॥
बैसे श्मश्रु कराया नापित भलतीं कडेचि क्षुरें[10] फिरवी।
फिरवी नयन तयावरि रोषें तन्मानसांत भय शिरवी ॥ १८ ॥
दाढी अर्ध मिशांसह नाहीं ऐसें दशाननीं पाहे।
वाहे चिंतोसि बहू अंबरें[11] शरिरीं न एक धड राहे ॥ १९ ॥
बाहूं[12] तरि कवणां मी सांगू वृत्तांत काय हानीचा।
वाणीचा मी असतां गमतो आजि समय काय हा नीचा[13] ॥ २० ॥
रावण निज भृत्यांतें मारी हनुमंत रावणाला ही।
गुप्तपणें बहुमर्दी[14] रडवी तैशाही रावणालाही ॥ २१ ॥
यातुप[15] निज सदनातें गेला हनुमंतहि तया मार्गें।
सांगे मंदोदरिला वृत्त असें वर्त्तलें न या मार्गें ॥ २२ ॥

---

१ क्रिया. २ शेंपूट. ३ दिवशीं. ४ राजरस्ता. ५ पिशाचवत् ह्म० पिशाचाप्रमाणें लीला ह्म० खेळ. ६ वानरांचा स्वामी मारुति. ७ प्रेत. ८ हजामत. ९ हजाम. १० वस्तरा. ११ वस्त्र. १२ बोलावूं १३ हलका–अपमान कारक. १४ मर्दन ह्म० ताडन करितीं झाला. १५ राक्षसांचास्वामी रावण.

चित्तीं ह्मणें मरुत्सुत जरिही सीता असेल तरि कां मी ।
आणूं व्यर्थ रघुविरा येथें आतां वधीन हा कामी ॥ २३ ॥
साध्वी पतिस ह्मणें हो द्यावी सीता नमूनि रामातें ।
यांतचि कल्याण पहा नसतां पावेल कुळ विरामातें[2] ॥ १४ ॥
दुःस्वप्न–दर्शनानें आहे चिंतेंत आजि बहुधा मी ।
दिसतें चिन्ह तसें मज होइल कल्पांत आजि बहु धामीं ॥ २५ ॥
क्षणदाचरी बहुतशा धाडी सीतेसि वश करायातें ।
वधिल्या त्या हनुमंतें चित्तीं मानूनि मशकें रायांतें ॥ २६ ॥
उरल्या दोघी सत्वर कथिती जाऊनि वृत्त हें राया ।
वानर एकचि परि त्या नाहीं कोणी समर्थ हेरांया[6] ॥ २७ ॥
मुद्रा दे; मग सांगे क्षेमसमाचार रामरायाचा ।
वधितों रिपुसि अतां मीं परि तो प्रभुच्या करीं मरायाचा ॥ २८ ॥
माते दे खुण जातों अर्पिन प्रभुच्या करींच वळखाया ।
परि लागली क्षुधा बहु दे कांहीं कंद मूळ फळ खाया ॥ २९ ॥
सीता ह्मणें अरे बा जीं पडलीं तींच घे फळें रानीं ।
विध्वंसिलें सकल वन कथिलें रायासि[9] वृत्त हेरांनीं ॥ ३० ॥
चवदासहस्र राक्षस रक्षक होते वनासि जे राया ।
वधिले एका कपिनें धजलें कोणी न त्यास घेराया ॥ ३१ ॥
मेले रक्षक अवघे जंबूमाळीहि त्यात सांपडला ।
वधिला पादाघातें[12] भुमीवरता गिरि[13] तसा पडला ॥ ३२ ॥
ऐंशीसहस्र राक्षस वधिले जें कां आले धरायासी ।
अक्षयें[14] त्यांत निमाला[15] वेळ न बहु लागला मरायासी ॥ ३३ ॥
पुच्छें बद्ध करुनियां आविलंबितें[16] अर्पि[17] तो समुद्रास ।
तिळहि उणा मज न गमें राया कंल्पात–काळ रुद्रास ॥ ३४ ॥

---

१ मारुति. २ नाश. ३ राक्षसस्त्रिया ४ माशी प्रमामें क्षुल्लक. ५ राजा, रावणाला. ६ पाहण्याला. ७ श्रीरामचंद्रानें ओळखण्याकरितां खुणे दाखल दिलेली आंगठी. ८ उपवन–बगीचा. ९ राजारावणास. १० दूतांनीं. ११ या नांवाचा राक्षस. १२ लत्ताप्रहारानें. १३ पर्वत. १४ अक्षयें (अखया) नांवाचा. १५ मारला गेला. १६ सत्वर. १७ अर्पण करिता झाला.

इन्द्रजितांसहि जर्जर केलें त्या वानरें क्षणांमाजीं ।
पाहिल कोण तयातें राया वळलीच बोबडी माजी ॥ ३५ ॥
ऐसें कळतां रावण प्रार्थी जाऊनि ब्रह्मदेवास ।
दिधलें वरदान कसें ठायीं अपुल्या आज्ञासि दे वास ॥ ३६ ॥
सांगे मरुत्सुतातें होई क्षणमात्र बद्ध बा पाशीं ।
आहेसि वज्रदेही याच्या भीणार तूं न बापासी ॥ ३७ ॥
नेला बांधुनि कपि तो तत्कालाचि रावणाचिया निकट ।
टपती मारायातें केला होता अधीं जयांनिं कट ॥ ३८ ॥
मारिति शस्त्रें बहुविध परि तीं सहसा न लागतीं हरिला ।
थकले राक्षस अवघे ह्मणती येईल हा कसा हरिला ॥ ३९ ॥
बोले लंकेश अरे आहे त्वन्मृत्यु वानरा कोठें ।
चित्तीं ह्मणे मरुत्सुत वस्त्राचे रिक्त करवितों कोठे ॥ ४० ॥
स्नेहें स्निग्ध करुनिया वस्त्रें वेष्टाल लांगुलीं माझ्या ।
दीप्तानलेंचि मृत्यू होइल रात्रिंचराचिया राजा ॥ ४१ ॥
सरलीं वस्त्रें अवघीं तरि लांगुल राहिलें असेच रितें ।
अणवा चीरें सितेचें ह्मणतां तत्काल आवरी हरि तें ॥ ४२ ॥
पुच्छ न पेटे ह्मणउनि स्वमुखें लंकेश फुंकिता जाला ।
झाला श्मश्रुविहिन तो उठतां पुच्छाग्निच्या महा-ज्वाला ॥ ४
लंकातृतीयभागा दग्ध करुनि वानरेश गेला हो ।
पुच्छानल सिंधु-जळीं विझवुनि प्रभुदर्शनेंहि घे लाहो ॥ ४४ ।
गिरिवासी रामाच्या पदपद्मीं मारुति भ्रमर जाला ।
होतिल कृतार्थ जनही घडतें तच्चरित हें श्रवण ज्याला ॥ ४५ ॥

---

१ रावणाचा पुत्र इंद्रजीत. २ ज्यांनीं. ३ एकमत. ४ वानराला. ५ पराभव. ६ रिकामें. ७ भांडारें. ८ तेलानें. ९ भिजवलेलें. १० शेंपटास. ११ प्रदीप्त, अग्नीनें पेटविलेल्यानें. १२ राक्षसांच्या. १३ शिल्लक. १४ वस्त्र. १५ वानर. १६ दाढ्या मिशा विरहित, कारण त्या जळून गेल्या. १७ शेंपटास लागलेला अग्नि. १८ समुद्राच्या उदकांत. १९ श्रीरामाच्यादर्शनानें.

याच आख्यानाचीं पदें.

पद (हनुमंत मल्लारीस ह्मणतो.)

गड्यानो कृष्णगडी अपुल्या–या चालीवर

त्यजिलें कां हो प्रेमपुरा ॥ हिंडतां घेउनि कां मुकुरा[2] ॥धृ०॥ ह्मणावें तुह्मासि काय कसें ॥ भीतां कां हो क्षुल्लकसे ॥ होइल जनांत फार हसें ॥ करितो रावण काय असें ॥ जिरवा याचा गर्व जरा ॥ १ ॥ वधिले दैत्य प्रबळ मोठे ॥ गेला विक्रम तो कोठें ॥ सदनीं वस्त्रांचे कोठे ॥ शिरीं कां मळकट पागोटें ॥ आहे तरि विचार काय खरा ॥ २ ॥ तुमची लहान काय कोटी[3] ॥ असती भृत्य सप्तकोटी ॥ वाटती हळहळ ही मोठी ॥ मिळेना काय भरितें रोठी ॥ कांहि तरि ईर्षा जीविं धरा ॥ ३ ॥ तुमचा धाक जनांवरतां ॥ असें कां घरोघरीं फिरतां ॥ धोकटी किमर्थ वागवितां ॥ कशास्तव मनीं अपुल्या झुरतां ॥ अतां तरि जा अपुल्या नगरा ॥ ४ ॥ ऐकिलें तुवां सकल कानें ॥ पुससी विनोद-भावानें ॥ रावण मस्त दुर्मदानें ॥ रखती सुरवर नांवानें ॥ करि गिरिवासी प्रभुसि त्वरा ॥ ५ ॥

दिंडी. (गणपतीस ह्मणतो)

कशी वाटेना लाज गणपराया ॥ त्यजुनि वैभव रक्षितां कां खरा या ॥ असें संकट तरि काय तुह्मां मोठें ॥ विघ्ननाशन बुडविलें नांव कोठें ॥ १ ॥

साकी–(मारुति देविस ह्मणतो)

अइ जगदंबे विश्वकदंबे सेवा रुचली कां याची ॥ वधिले दैत्य तुवां बहु मोठे भीसी कां मग वायाची ॥ १ ॥

---

१ मैलार. २ आरसा. ३ शौर्य, सामर्थ्य. ४ वांग्याचेंभारित खंडोबाला प्रिय असतें त्याला उद्देशून हें आहे. ५ न्हाव्याची धोपटी. खंडोबा रावणाचे घरी न्हावी होते. ५ गाढवाला. रावणानें गणपतीला गाढवें राखण्याचें काम दिलें होतें.

कटिबंध-(देवी मारुतीला देवांची स्थिती सांगते.)

बासव[1] निशिदिन हार बनावे ॥ ब्रह्मा ले पंचांग सुनावे ॥ पावक[2] नित उठ बसन धो लावे ॥ जाय प्रभंजन[3] अजिर[4] झडावे ॥ वरुण समार्जन, जल भर लावे ॥ सुरज निशामें दीप जलावे ॥ शशांक[5] शिरपर छत्र धरावे ॥ गनेस रासभ[6]समुह चरावे ॥ मल्लारी नित सिस मुंडावे ॥ मुकुर[7] दिखावे ॥ नारद तुंबरु गान करे ॥ नित बासर वाक्पति[8] मौन धरे ॥ सब देव उसीको देख डरे ॥ कुवेर संपत होगइ चंपत[9], कंपत नाहि दिल, दंपतमें नित भेद करे ॥ सब लोकपाल हात जोर खरे ॥ मस्त भया, कभु अस्त नहीं, नित दस्त दराजी[10], तीन लोकमें गस्त करे, सब बस्त[11] मानकर खस्त[12] किया है, नाहि कोई वाली ॥ खाली त्रास देत है भारी ॥ सारी रैन[13] करूं रखवाली ॥ काली[14] होकर पांव परत हुं ॥ रामचंद्रसे कहो जाय कर, छुडाव, हमको सबको जेर किया इसखातर ॥ कातर[15] होकर बैठ रहे दुख भारी ॥ जब लावो रघुनंदनको होवेगी छूटें[16] हमारी ॥ १ ॥

दिंडी—(मारुती बोलतो.)

जरी झाला बहुतसा तुझां ताप ॥ पहा रामाचा तयावरि प्रताप ॥ सकल लंकेची करिन आज होळी ॥ अतां देतों अक्षता अग्नि भाळी ॥१॥ इतर कृत्यें ही पहा करिन कैसीं ॥ कधीं दृष्ट-श्रुत[17] जनांमधिं न ऐसीं ॥ सकल मोडिन अजि माज रावणाचा ॥ तरिच माना हा पोर्ते[18] अंजनीचा ॥ २ ॥

श्लोक--(राक्षसांची स्थिति)

करीती जप ध्यान, रुद्राक्ष माळा ॥ गळा घालिती, लाविती भस्म भाळा । वरी मैंदसे[19] बोलती आर्द्रवाचा[20] ॥ परी अंतरीं लेश नाहीं

---

१ इंद्र २ अग्नि. ३ वायू ४ अंगण ५ वरुण ६ गाढवें. ७ आरसा. ८ बृहस्पति. ९ नाहींशी. १० हात पसरणें ११ बोकड समजून. १२ कत्तल. १३ रात्र १४ काली-होकर+देवीअसून. १५ मित्र. १६ सुटका. १७ पाहिलें ऐकिलें. १८ पुत्र. १९ दांभिकासारखे. २० भक्तीच्या जिव्हाळ्यानें युक्त अशी.

द्रवाचा ॥ १ ॥ पहा लिप्त नाहींच आत्मा कशाला ॥ कसे बाधतीं इंद्रिय स्पर्श त्याला । असी मुक्तता आपुली दाखवीती ॥ परी नित्यशा पातकें लाख वीती ॥ २ ॥

पद–(पुरवासी लोक ह्मणतात.)

जोगी.

शंभो पाव अह्मा दीना, श्रमलों आजि बहू ॥ धृ० ॥ सरलें अयुष्य अमुचें काय ॥ घडला काय असा अन्याय ॥ वंदितो नित्य अह्मीं तव पाय ॥ दावि उपाय तूंचि अतां ॥ १ ॥ जाहला पुरींत हलकल्लोळ ॥ उठती दुःखाचे कल्लोळ ॥ वाटे बुडेल पृथ्वीगोळ ॥ सरेल घोळ हा केंव्हां ॥२॥ कळेना कवणासाचि कांहीं ॥ नयनां गोचर ही नाहीं ॥ गमतो कल्पांतचि पाही ॥ त्राहि पाही बा सदया ॥ ३ ॥ शंभो गिरिवासी शंभो धांव ॥ लपाया नाहींच कोठें ठाव ॥ साधिला न कळे कोणी डाव ॥ आहे भाव तव चरणीं ॥ ४ ॥

(मारुतीनें त्रेधा उडविल्यामुळें दंपत्यें बोलतात)

अंजनीगीत.

जावें येथुनि कैसें तरी ॥ बद्धाचि केलें पलंगावरी ॥ नसुचे युक्ती आह्मां बरी ॥ संकट बहु मोठें ॥१॥ निजलों होतों अपुल्या घरीं॥ आलों येथें कवण्यापरी ॥ होइल कैशी गति यावरी॥ नकळे आह्मांसी ॥ २ ॥ पाहातां आम्हीं दिगंबर ॥ शरीरीं नाहींच कीं अंबर ॥ कैसे कोसळलें अंबर ॥ धांव विभो सांबा ॥ ३ ॥ जाती येती जनहे किती ॥ लज्जा वाटे आह्मांप्रती ॥ यास्तव झाली कुंठित मती ॥ सुचेचिना कांहीं ॥ ४ ॥ आतां काय करावें याला ॥ गृहकृत्यांला उशीर झाला ॥ येथें विनवावें कवणाला ॥ सोड वितो कोण ॥ ५ ॥

---

१ उत्पन्न करितात. २ डोळ्याला दिसतही नाहीं. ३ नग्न. ४ वस्त्र. ५ आकाश.

झुलना

सुनों रावनकी मात ॥ करे चिंता दिनरात ॥ रिपू आवे नहि हात ॥ मारे लात भृत्यको[1] ॥ १ ॥

पद मंदोदरी ह्मणते.

(गड्यानो कृष्णगडी अपुला.)

साध्वी बोले पतिराया ॥ आणिलें सीतेसी वांया ॥ धृ ॥ आजिचा दिवस मात्र कमला ॥ पडलें दुर्घट स्वप्न मला[2] ॥ वानरें कल्पांताचि केला ॥ जाळिलें समग्र लंकेला ॥ निमाला सुत अपुला अखया ॥ १ ॥ जाइल कुळ ही विलयांसी[3] ॥ होतिल दुःखाच्या रांसी ॥ गमतें हेंचि उचित मजसी ॥ द्यावी सीता रामासी ॥ वंदुनि सद्भावें पायां ॥ २ ॥ करितां वेळ आतां कां जी ॥ विनवणी ऐका ही माझी ॥ प्रभुची दयालुता ताजी ॥ होईल यांतति तो राजी ॥ करिल तो सहज अमर काया ॥ ३ ॥ आमुचे नरवानरखाणें ॥ त्याचें किति गाशिल गाणें ॥ माझें वर्म मीच जाणें ॥ मुकतिल क्षणांत प्राणानें ॥ करिल गिरिवासी सांब दया ॥ ४ ॥

श्लोक.

तमिस्रांचरी[6] गांजिती जानकीतें । नसे वैभवा या तुला[7] जाण की तें ॥ धरीतो मनोहार रूपें सदा गे । स्त्रिया सुंदरा मोहती कामदागें[8] ॥ १ ॥ तुझें हीत तूंतें कसें आकळेना । वृथा प्राण जातील हें कां कळेना । भजे भीति सोडूनि लंकापतीला । अशा शब्दबाणें सुटे कांप तीला ॥ २ ॥

पृथ्वी छंद (मारुति ह्मणतो)

मनीं हळहळे बहू कठिण वेळ त्या वाटली । ह्मणे वधिन यातुपा[9] प्रबळता[10] नसे आटली ॥ परंतु चुकलों बहू रिपुवधार्थ आज्ञा नसे । कळूनि घडलें पहा सकळ कर्म अज्ञानसें[11] ॥ १ ॥

---

१ सेवकाला. २ मेळा. ३ लयाला शेवटाला. ४ राशी, ढीग. ५ खुण. ६ राक्षसी. ७ जोडी. ८ मदनव्यथेनें. ९ राक्षसांना १० बळ. ११ अज्ञानासारखें.

पद-(सीता सांगतें.) दिपचंदी

अगे बाइ सांगु मि काय तुला ॥ धृ ॥ कांचनमय मृग पाहुनि भुललें, वाटे सत्य मला ॥ १ ॥ देवर लक्ष्मण निष्ठुर बचनें, अंतरिं दुखवीला ॥ २ ॥ रावण मेला कपटें आला, घेउनिया मजला ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभू राम दयाघन, सहजचि अंतरला ॥ ४ ॥

पद (सीता मुद्रेस ह्मणते.)

जोगी

मुद्रे कां त्याजिलें रामा, उचित हें काय तुला ॥ धृ ॥ असें कीं सुखी राम राजा ॥ देवर लक्ष्मणही माझा ॥ येथें आलिस कोण काजा ॥ हें वोजा मज कळवी ॥ १ ॥ आणिला निरोप सखये काय ॥ कथिलें रामांनीं तुज काय ॥ अठवितें नित्य मीं त्याचे पाय ॥ स्मरतो काय राम मला ॥ २ ॥ सांग तें मुद्रे अवधारी ॥ जाहले कष्ट मला भारी ॥ प्रभुविण कोण दुजा वारी ॥ कधिं मारील या रिपुला ॥ ३ ॥ काढी चित्तांतील अनमान ॥ होती व्याकुळ माझे प्राण ॥ प्रभु गिरिवासीकथामृतपान ॥ करवी जाण मज आतां ॥ ४ ॥

श्लोक

उतरला तरुच्या जरि खालता । तरि न वाजवि पाउल चालतां ॥ करुनि वंदन जानकिला हरी । सकल संशय तो मनिंचा हरी ॥ १ ॥

साकी

चूडामणि देउनिया सांगे सत्वर आणी रघुनाथा । रावण मारुनि न्यावें मजला झाली अजवर बहुत व्यथा ॥ १ ॥

---

१ ऐक. २ निवारण करील ३ शत्रुला. ४ शंका. ५ कथा+अमृत. ६ सेवन करीव ७ वानर. ८ दूरकरी ९ कंकण

वन मोडले ह्मणून भृत्य रावणास सांगतात

घनाक्षरी

बडा बाग मजेदार ॥ ज्यामें फूलोंकि बहार ॥ किया लंगुरनें पार ॥ नही थार बैठनें ॥ १ ॥ सबाहि मेवेंके झार ॥ बडे अंगुर खुबिदार ॥ किया लंगुरनें पार ॥ नाहि अधार छूपने ॥२॥ डुबा मंदरका खोज ॥ किये सबही जमींदोज ॥ आप बैठे उस रोज ॥ नहीं खोज हौजकां ॥ ३ ॥

साकी

इंद्रजीतके बुरे हाल है नहि बानर वह, काल दुजा । क्या कहे महाराजा ऐसा नहि है कोई बज्रभुजा ॥ १ ॥

ब्रह्मदेव मारुतीला ह्मणतात.

श्लोक-

भीतोसि कां तुं वद यांतुपांसी । हो बद्ध याच्या क्षणमात्र पाशीं ॥ साधूनि घे तूं निजकार्य बा रे । तों बैस येथें धरुनी दबारे ॥ १ ॥

मारुति मनांत विचार करतो,

दिंडी.

मरण अपुलें मी काय सांगु यांसी । सत्य बोलावें सत्यवादि यांसी ॥ नसे कल्पांता विना मृत्यु पाही । अनृतें वदतां पापियां दोष नाहीं ॥ १ ॥

अंजनीगीत

(ग्रामवासी जन बोलतात)

सरल्या चिंध्या वस्त्रें जीर्ण ॥ नुतन गुंडाळिलीं तूर्ण ॥ तरि होईना लांगुल पूर्ण ॥ वाटे नवलाव ॥१॥ अटलीं वस्त्रें नूतन जुनी ॥

---

१ बानर २ पत्ता, मागमूसां ३ जमिनदोस्त ४ हौदांचा ५ वज्राप्रमाणें ज्याचे बाहू आहेत असा ६ राक्षस. ७ तोंपर्यंत. ८ खोटें बोलले असतां ९ लवकर.

अणिली ग्रामांतील धुंडुनी ॥ तींही पाहीलीं गुंडुनी ॥ तरि वोल रीतें ॥२॥ वसनें वेटाळिलीं पुच्छा॥ तरि नच पवतीं लांगुलगुच्छा॥ करिती रावणाची कुत्सा॥ पुरवासी लोक॥३॥ ह्मणती अमुचें अंतर भंग[३] ॥ केले आह्मां सकळां नग्न ॥ लागो याच्या पुरिला अग्न ॥ श्रमवीलें भारी ॥ ५ ॥

मारुती अग्नीला ह्मणतो,

साकी.

वार्यू[४]—सख तूं पुत्र तुझा हा रक्षी यातें या काळीं । लंकेमाजीं शिरतां यानें दिधली अक्षत तेंव भाळीं ॥ १ ॥

---

१ वातिभर २ निंदा ३ विदारण. ४ वाऱ्याचा मित्र अग्नी

भीष्मांनीं निःपांडवी पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा केली तें प्रकरण.

आर्या.

कुरु[1]प ह्मणे गांगेया[2] झालें नव दिवस आजि समरा हो ॥
हें मी प्रथमचि वदलों इकडे तिकडेंहि चित्त सम राहो ॥ १ ॥
शमले मद्बंधु बहू एकहि माद्रीपृथासुत न शमला ॥
गमला संशय यास्तव अजवरि जय प्राप्तिचा न लेश मला ॥ २ ॥
सेनापतित्व दिधलें समरीं रक्षाल सर्वदा मातें ॥
द्रव्यहि समर्पिलें बहु कीं वश होतात सर्व दामांतें[3] ॥ ३ ॥
राया आजिंक्य पांडव वर्म तुला हें अधीं च म्यां कथिलें ॥
समता होईल कैशी केली रजतासवें जरी कथिलें ॥ ४ ॥
परि नायकिलेंचि तुवां आतां बोलूनि अर्थही नाहीं ॥
जय पाक्षिक ह्मणसीतरि मिळवावा कोंवि दैवही नाहीं ॥ ५ ॥
कथितों हेचि अतां मी करीन निःपांडवी उद्यां धरणी ॥
अथवा मरेन समरीं लक्षित असतां समस्त योध रणीं ॥ ६ ॥
हेरमुखें आयकिली करीन निःपांडवी अशी वाणी ॥
बंधूसह धर्मातें कृष्णासहि लागली असी-वांणी[6] ॥ ७ ॥
देव ह्मणे बहु आतां वेळ नको पांडवा मरायासी ॥
तरुणाहुनि बळकट कीं कोण सुधी जन ह्मणे जरा यासी ॥ ८ ॥
दिसतें संकट मोठें योजावें कोणत्या उपायासी ॥
अंगी शूरत्व कसें होतील हे योग्य तरि लपायासी ॥ ९ ॥
देवव्रतें प्रतिज्ञा केली होईल काय हो लटकी ॥
आहे कोण असा क्षम टाळाया पिडवाचिया कटकीं ॥ १० ॥

---

१ दुर्योधन २ भीष्मा ३ पैशाला. ४ चांदी ५ योद्धे. ६ तरवारीप्रमाणें तीक्ष्ण. ७ ख्यातारपण. ८ भीष्मानें, ९ सैन्य ंत.

भीष्मादिकही जेव्हां सिद्धचि झाले तुम्हासि माराया ॥
तरि मग येथुनि आतां झाली युद्धाचि या सिमा राया ॥ ११ ॥
पांडव ह्मणती देवा या शरिराचें रणांत हो कांहीं ॥
परि द्रौपदिचा पुरला नाहीं अद्यापि हेत हो कांहीं ॥ १२ ॥
यदुप म्हणे स्वस्थ असा सुचली युक्ती करुनिया पाहूं ॥
द्रौपदीला भीष्माच्या चरणीं नेऊनि एकदां वाहूं ॥ १३ ॥
भीष्में अभय दिल्यावरि होइल कल्याण हें मला कळतें ॥
सर्वा साधूचें मन परिसुनि धर्मा श्रमासि कळकळतें ॥ १४ ॥
ऐसें वदोन हरि तो झाला तत्काळ भृत्य[2] साच गडी ॥
स्कंधीं वाहूनि तिला गेला बांधूनि फाटकी पगडी ॥ १५ ॥
उतरी शिबिर-द्वारीं निशिथीं[3] नेऊनि द्रौपदी सतिला ॥
पाहुनि रक्षक ह्मणती नाहीं प्रतिबंध यास्थळीं सतिला ॥ १६ ॥
परि हा सेवक ह्मणती नाहीं आज्ञा नसेचि त्या जा या ॥
बाई वेळ नका करुं नमन कराया तुह्मीच हो जया ॥ १७ ॥
द्वारीं स्थापुनि हरिला गेली भिष्माकडे नमायास ॥
प्रार्थी मृदुतर वचनें कोप तयाचा मनीं शमायास ॥ १८ ॥
द्यावें पतिदान मला यावांचुनि अन्य कामना नाहीं ॥
हितकर साधुजनातें तुमच्या येणार कां मना नाहीं ॥ १९ ॥
बाई एकाकी तूं कैशी आलीस सत्य सांग मला ॥
हरिविण गति कवणातें नाहीं, संशय अशामुळें गमला ॥ २० ॥
कथितां सत्य हरीच्या होइन क्षोभासि पात्र बहुधा मी ॥
भीतें याच्याहि तशी झालें लोभासि पात्र बहु धामीं ॥ २१ ॥
रोष हरीचाचि बरा नबरा यांचा असें मला कळतें ॥
साधो कार्य कसें तरि कळतां करितील घात हो खळ ते ॥ २२ ॥
वदली विनीतवचनें यदुवीरें आणिलें निशंक मला ॥
आहे द्वारींच उभा ध्वांतीं[6] मजकारणें बहू श्रमला ॥ २३ ॥

कृष्ण २ नौकरासारखा ३ मध्यरात्रीं ४ भयकांता ५ इच्छा ६ अंधारांत

श्रवणीं पडतांचि असें आले दोघे तसेचि बाहेर ॥
बाई दावी कोठें निजभक्तांचें अखं. माहेर ॥ २ ॥
ध्वांतीं न दिसे यास्तव धुंडिति तरि त्या हरी न तो गवसे ॥
नवसेंहि सांपडेना पांडवसद्नीं दयादीन वसे ॥ २५ ॥
पाहिल अंत कसा हो सद्भक्तचि ते, हरीहि सांपडला ॥
पडला गळांचि मग तो, होता क्षणमात्र मात्र जो दडला ॥ २६ ॥
कृष्णेनें वळवीला होता, हरिनेंहि हेतु कळवीला ॥
पळवीला शोक तिचा शुभ वर-दानें अनर्थ टळवीला ॥ २७ ॥
बालक विश्वासि हरी तरि निजदासासि देतसे मान ॥
तो तुज अनुकूल सदा विन्मुख नाहींच गे असें मान ॥ २८ ॥
कथिलें धर्मासि जसें त्यानेंही त्यासमान वागावें ॥
रक्षक हरीच आहे याहुनि तुज अभय काय सांगावें ॥ २९ ॥
नाहीं भय मजपासुनि चित्तीं आणूं नकोचि भीतिला ॥
कां हरि उपेक्षिल तुह्मां त्यजिलें नाहीं कधींच नीतीला ॥ ३० ॥
यापरि अभय दिल्यावरि आली तत्काल अपुल्या शिबिरा ॥
गिरिवासी प्रभु रक्षक आहे विश्वास आपुल्यासि बरा ॥ ३१ ॥

---

१ अंधारांत २ दयासागर ३ समज.

गोपींचीं गाऱ्हाणीं

आर्या.

श्रीहरि गोप मुलांसह घालितसे नित्य गोरसा घाला[1] ।
यास्तव गोपी साऱ्या ह्मणती बांधूनि चोरसा[2], घाला ॥ १ ॥
परि सांपडे न ही तो गाऱ्हाणें सांगती यशोमतिला[3] ।
"बाई थकलों आम्हीं वळवी तूं निजसुताचिया मतिला" ॥ २ ॥
सरसावली[4] कथाया गाऱ्हाणें गोपि सर्व आयकती ।
सांगूं काय यशोदे कृत्यें सारींच नवल–दायक[5] तीं ॥ ३ ॥
करितो कर्म असें हा निजलीं बाळें धरूनि उठवीतो ।
आपण गोरस भक्षुनि गोपमुलांच्या करींहि लुटवीतो ॥ ४ ॥
पाट रचुनि पाटांवरि तिवई त्यावरि गड्यासि चढवीतो ।
आपण खाय, मुलांतें "स्वस्थपणें खा" असेंहि पढवीतो ॥ ५ ॥
वाहक[6] श्रीकृष्णाचा गोरस न मिळे ह्मणूनि वर पाहे ।
दहिं दुध पुष्कळसें दे सांगे इतरां 'तुह्मीहि वरपा[7] हें ॥ ६ ॥
पुसतो गर्भवतीला 'कां झालें उदर सांग गे मोठें' ।
तथ्याहि कथिलें तरि हा लाउनि बघतो उरस्थळीं बोटें ॥ ७ ॥
'ह्मणती गर्भ कशाला' 'कृष्णा उदरांत या असे बाळ' ।
'गेलें कवण्या द्वारें, दावी मज' ह्मणुनि घेतसे आळ[8] ॥ ८ ॥
झिडकारितां न राहे काय करावें अशा अगुणपात्रा[9] ।
चालेल काय बाई इतरांची सांग या पुढें मात्रा ॥ ९ ॥

---

१ डाका,लूट,चोरी. २ चोरासारखा बांधून टाका. ३ यशोदेला. ४ एक गोपी गाऱ्हाणें सांगण्यास पुढें आली. ५ आश्चर्यकारक. ६ श्रीकृष्णाचा शिक्याला हात पुरावा ह्मणुन त्याला खांद्यावर घेणारा. ७ सेवन करा. ८ हट्ट. ९ दुर्गुणी मुलास

ह्मणतो वयस्क झुलिला ' हृदयावरि हें गलांडयुग दिसतें ।
भेषज[2] कां न करिसे तूं सांग मला कितिक जाहले दिसते[3]?॥१०॥
किंवा व्यथा न करिती कळवी यांतील वर्म तें काय' ।
उत्तर काय वदावें सांगें[4] दया करुनि वंदितें पाय ॥ ११ ॥
शिरला गोपीच्या गृहिं वत्सें सोडूनि काननां लावी ॥
गोरस मट मट भक्षुनि जाय सुनेच्याहि आननां[5] लावी ॥ १२ ॥
कळवी सासूस तिच्या आहे भक्षीत गोरसा सून ॥
जा सत्वर सदनातें निजहित लक्षील कोण सासू न ॥ १३ ॥
रागें भरे ह्मणे तूं नष्टे खातेस नित्य नवनीता[6] ॥
आह्मीं ह्मणतों कृष्णाचि खातो येऊनि नित्य, न वनीतां ॥ १४ ॥
तिहि वदे मामीसे कृष्णें नवनीत माझिया वदनीं ॥
सारविलें सत्यचि हें नव्हतें कोणीच अन्य या सदनीं ॥ १५॥
मग ती कृष्णासि ह्मणे खाउनि ह्मणतोसि गोरसा नाहीं ॥
काय तुझे गुण लपले बापा माहीत थोरें, सानां ही ॥ १६ ॥
यावरि विचार करि बहु वत्से येतील केविं सदनासीं ॥
बाहूं तरि कवणासी पसरूं जाऊनि आजि वदनासि ॥ १७ ॥
वत्से[10] वळावया जरि धाडूं जाईल काननां सून ॥
मी तरि अशक्त बहुतचि गोरस जाईल कां न नासून ॥ १८ ॥
लागेल वेळ बहु तरि कोण करिल पाक हेंहि संकट कीं ॥
दृष्टी मंद दिसेना त्यांतहि सदनांत मीच एक ठकीं ॥ १९ ॥
बहु त्रासल्या यशोदे गोपी तुजलागिं काय सांगावें ॥
येतो क्रोध असा कीं या कृष्णाला तरूसि टांगावें ॥ २० ॥

---

१ बेंडें अथवा टेंगळें. २ औपधोपचार. ३ दिवस. ४ हे यशोदे सांगा. ५ तोंडास. ६ लोणी. ७ स्त्री. ८ मामी–ह्म० सासूस ह्मणतात. ९ मोठ्यांस व लहानांस ह्म० सर्वांस. (येथें गोपीनें काय चमत्कारीकपणें स्तुति केली आहे. बापा–सर्व चराचराचा पिता–पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः (भ० गी०) परमेश्वर कोणास माहीत नाहीं ? व त्याचे गुण ह्म० त्रिगुण–सत्व, रज, तम–अथवा सगुणरूपाची कीर्ति हीं स्पष्टच आहेत. १० गाईचीं वासरें.

एके गोपीस पुसे वत्सें अजि कां न काननां गेलीं ॥
होती चिंतेंत बहू मंथनसमयीं मनांत रागेली ॥ २१ ॥
पुनरपि पुसे तरी ती गोपी नाहींच बोलली हरिसी ॥
यास्तव सोडुनि दिधलीं वत्सें पाहूं ह्मणे कसीं धरिसी ॥ २२ ॥
गेलीं वत्सें पुच्छें बाहुनि गोपीहि धांवली मागें ॥
लागे करीं न एकहि ह्मणउनि अन्यासि धर धरूंमागे ॥ २३ ॥
इकडे गोरस भक्षुनि वसरीवरताहि बहु सडा केला ॥
गेला पात्रें फोडुनि नाहीं बाई मनांत धाकेला ॥ २४ ॥
पाहे गोपी सदनीं केला हरिनेंचि गोरसा नास ॥
विदित असो हें सकळां ह्मणउनि दावीत थोर सानास ॥ २५ ॥
एक्या सदनीं हरिनें गोरस संपूर्ण नाहिंसा केला ॥
शिंकीं शेजींच्या गृहिं नकळे बांधूनि तो कसा गेला ॥ २६ ॥
गेली वन्हि अणाया प्रातःकाळींच शेजिच्या गेहा ॥
आणिलीं शिंकीं कशिं हीं तुमचा शेजार तरि बरा गे हा ॥ २७ ॥
आह्मीं कृष्णावर त्या घालित आलों उगाचि गे आळ ॥
बाळ यशोमातिचें त्या पडला अजि काय नवानिता काळ ॥ २८ ॥
दोघींत झोटेंधरणी होता झाले समस्त जन गोळा ॥
भोळा कृष्ण तुझा हा पाहत होता करूनि वर डोळा ॥ २९ ॥
सासू नसतां सदनीं तीची परसांत एकटी सून ॥
होती नाहन नग्नचि पाहे तें कृत्य आड बैसून ॥ ३० ॥
युवती निःशंक मनें बसली न्हाण्यासि केश घासून ॥
गेला एकाएकीं बाई ठग हा मनांत हांसून ॥ ३१ ॥
झाली बहु लज्जित परि नव्हतें कोणीच वसन टाकाया ॥
काया उघडी यास्तव शंके अबला उभीहि ठाकाया ॥ ३२ ॥
चेंडू हुडकित आलों दावी धरिलेंसि पोटेंसीं काय ॥
कां उठवेना तुजला कळवी आहेसि पोटेंसी काय ॥ ३३ ॥

---

१ शक्षारणाच्या. २ भांडण. एकमेकींच्या झिंज्या ह्म० केंस धरून. ३ पोटाशीं. ४ गर्भिणी.

याहे शपथ ह्मणे मजपासीं कंदूक सर्वथा नाहीं ॥
तरि चोढीत कर तिचा स्वकरें लाऊनि अन्य थानांही॥ ३४ ॥
आली सासू सदनीं धावें कृष्णासि ती धरा यातें ॥
पातें लवतां गेला सांगे अन्यासि मग धरायातें ॥ ३५ ॥
रक्षी गोरस गोपी नित्य वदे मी न येउं दे हरिला ।
धरिला हटही पुष्कळ तरि मी येणार कायगे हरिला ॥ ३६ ॥
वंचुनि श्रीहरिलागीं गोपी नवनीत सांचवी धामीं ।
चित्तीं ह्मणें विकुनि हें विशंक आणीन द्रव्य बहू धामीं ॥ ३७ ॥
होता हट्ट मथुरेचा यास्तव निशिथीं भरूनि कावडिला ।
ठेवी दृढतर बांधुनि न सुटे कृष्णाचिया ह्मणे वडिलां ॥ ३८ ॥
बाई कृष्ण तुझा हा तत्कालचि युवतिच्या गृहा गेला ॥
भक्षी नवनित मटमट चित्तीं होता अधींच रागेला ॥ ३९ ॥
नवनित भक्षुनि अवघीं या हरिनें भार्जनें रितीं केलीं ।
नवलाचि गमतें बाई वर्णू याच्या अशा किती केली ॥ ४० ॥
त्या पात्रीं मग भरिलें हरिनें वृश्चीक उरंग बहु-साल ।
माटे मज इतरांतें मिळवाया लागतील बहू साल ॥ ४ ॥
पाली सरड तसे ते भरिले मंडूक कावडीमाजीं ।
देऊनि खुण गांठ ह्मणे पुरली बहुतेक आवडी माजी ।
प्रातःकाळीं गोपी गेली घेऊनि कावडी गांवा ।
मथुरेच्या बाजारीं झाला वृत्तांत तोहि सांगावा ॥ ४३ ॥
सांगे चोहटीं बैसुनि आणिलें नववीत म्या बहू ताजें ।
द्रव्य अणा जा देतें मोजूनि पडणार मान्य बहुतां जें ॥ ४४ ॥
पाहूं नवनीत कसें आहे सोडूनि दाखवी बरवें ।
दृष्टीं पडल्यावांचुनि इतरासी मोल तरि कसें करवें ॥ ४५ ॥

---

१ चेंडू २ हार जाईन काय. ३ श्रीकृष्णाच्या चोरून. ४ बाजार. ५ रात्रीं ६ बापाला. ७ सर्व. ८ भांडीं. ९ रिकामीं. १० क्रीडा-लीला. ११ विंचू १२ सर्प. १३ पुष्कळ. १४ वर्षें. १५ चवाठयावर

सोडी बहु रागानें या नवनीतासि पाहतां काय ।
पाहुनि सर्प ह्मणति जन सटका येथूनि पाहतां काय ॥ ४६ ॥
पाली सरड तसे बहु बेडुक वृश्चीक धांवती वाटें ।
फाटे धैर्य जनांचें केवळ कल्पांतसा तयां वाटे ॥ ४७ ॥
हिंडति सर्प बिदोंबिदिं परि गवसेनाचि एक माराया ।
कोणी ह्मणती सत्वर आणावें मांत्रिकासि भारा[3]या ॥ ४८ ॥
वृश्चिक दंश करिति बहु यासाठीं मारिती अशा हाका ।
कैंची गवळिण कोठुनि आली मारा धरा पिटा हाका ॥ ४९ ॥
घाबरली फार मनीं गोपी अरडे रडे पडे वाटें ।
सुटका होईल कैशी ऐसें तिजला प्रतिक्षणीं वाटे ॥ ५० ॥
हरिसी विन्मुख झाल्यां येती विघ्नें अशीं घरा नसतीं ।
भजती अनन्य भावें गोपी तरि कासयास हो फसती ॥५१॥
सांगे भ्रतार सदनीं ठेउनि अनसूट दुग्ध देवाचें ।
नवनीत सांचवित जा या विषयीं वचन मात्र दे वाचें ॥ ५२ ॥
कांता ह्मणे बहु बरें धरितें अनसूट आजपासून ।
तिळमात्र न दे कवणा जाइल जावो विशंक नासून ॥ ५३ ॥
नवनीत सांचलें जें अर्ध तयांतूनि शेजिंच्या गेहीं ।
ठेवि ह्मणें असो दे घागर नेईन लागल्या गे ही ॥ ५४ ॥
करुनि महोत्सव पतिनें केला परिपूर्ण नवस देवाचा ।
'आहे अपराधी मी पूर्ण करुनि घे' असी वदे वाचा ॥ ५५ ॥
कळलें श्रीरंगातें घृत तें अद्यापि शेजच्या धामीं ।
आहे तरि पुरवूं द्या नवस 'उपेक्षा करूं ह्मणें कां मी' ॥ ५६॥
गोपमुलांसह जाउनि घृतघट तितुकाचि सारिलो हरिनें ।
हरिनेंचि इतर घटही होते तरि त्या न सर्वथा हरि ने ॥ ५७ ॥

१निसटा. २रस्तों रस्तीं. ३ मंत्रसामर्थ्यानें अडवून टाकण्या करितां. ४ हें कवीचें ह्मणणें ५ देवास नैवेद्य समर्पण केल्यावांचून कोणास देतां येत नाहीं तें. ६ शेजारच्या. ७ श्रीकृष्णास. ८ तुपाची घागर. ९ जो नवसाचा अनसूट ठेवलेला होता तेवढाच. १० इतर घागरी ही ओळीनेंच ठेवल्या होत्या पण त्या श्रीकृष्णानें घेतल्या नाहीं.

ती गोपी अन्यदिनीं जाउनि शेजारणीस घट मागे ।
झालें निवांत बाई दे आतां राहिलें न झट मागें ॥ ५८ ॥
पाहे घरांत गोपी अपुलीं संपूर्ण भाजनें भरलीं ।
न दिसे घट सेजीचा नकळे कां मन्मती ह्मणे हरली ॥ ५९ ॥
कळला वृत्तांत तिला सांगे मिळवूनि बायका चवघीं ।
कां नाहीं घट माझा हीचीं आहेत भाजनें अवघीं ॥ ६० ॥
त्याही ह्मणती साऱ्या बाई विपरीत कां असें वदसी ।
कळतें अबालवृद्धा नेल्या वांचुनि हलेल काय दसीं[2] ॥ ६१ ॥
नेला हरिनें ह्मणतां मोगहि[3] कोठें दिसेचिना वहिला ।
गोपी सूज्ञ सुशीलहि ठेवावें कां उगोचि नांवें हिला ॥६२ ॥
गेलें नवनीत जिचें भ्याली पतिला कळेल यासाठीं ।
झालें कृष्णार्पण तें मिळतिल मज घागरी अशा सोठी ॥ ६३ ॥
रक्षी गोरस गोपी कांत तिचाही तसाचि सांभाळी ॥
देव ह्मणे कां करितां श्रम तुमच्या सर्वथा नसे भाळीं ॥ ६४ ॥
नवनीत सांचवा बहु मींही येऊनि घालितों घाला ॥
तिळमात्र उरों नेदी अणिलें तुमचें तुह्मींच ओघाला[6] ॥ ६५ ॥
एके समयीं निशिथीं निजली गोपी विशंक[7] गेहांत ॥
देव ह्मणे दाखवितों भक्षुनि नवनीत आज गे हात ॥ ६६ ॥
ऐसें वदोनि हरि तो गेला घेऊनि मुंगसास करीं ॥
सोडी गृहांत उकरीं धान्याचा बहु तसाचि नास करी ॥ ६७ ॥
देवांतीं न दिसे कवणा उकरी मुंगुस घरांत फिरफिरुनि ॥
आले धांवत बाहिर भीरू[10] बसतील केविं धिरें[11] धरुनि ॥ ६८ ॥
आहे भूत विशंकचि बसलें येऊनिया शिरावर तें ॥
आधीं तळीं पहा जा नसतां तैसोचि मग शिरीं[12] वरतें[13] ॥ ६९ ॥

---

१ नाहींशी होईल. २ वस्त्राचे शेवटीं दशा असतात त्या. ३ धरलेला रस्ता. रस्त्याची खूण. ४ दोष. ५ साठ ह्म०अनेक. ६ या धराला तुह्मीच आणलें. ७ निःशंक-निर्भय. ८ चमत्कार दाखवितो. ९ अंधारांत. १० भित्रे. ११ धैर्य १२ प्रवेश करा. १३ वरच्या माडींत.

तरि कोणीहि न धजती भीती जायासि गोप ते अवघे ॥
ह्मणती सुखांत असतां कोण विषाची कशास हो चंव घे ॥ ७० ॥
तोंवरि नवनीत हरी भक्षुनि झालाचि सिद्ध जायासी ।
परि क्षण राहे पाहे धजती तरि कोण गे धरा यासी ॥ ७१ ॥
आणले पंचाक्षरि जन विभूति मंत्रूनि टाकिती गेहीं ।
अघटित कर्मे हरिचीं सांगावीं काय तरि किती गे हीं ॥ ७२ ॥
मग कां धीट यशोदे गेले घेऊनि कांकडे हातीं ।
पाहति घरांत शोधुनि कोणी द्वारांत ही उभे रहती ॥ ७३ ॥
दिसलें नकुळ जनांला ह्मणती सारेचि हरिविना नाहीं ।
वर्णावीं काय कितीं कृत्यें त्याचीं अशींच नाना, हीं ॥ ७४ ॥

---

२ धैर्य करितात. ३ गे येशोदे. ३ धरण्यास. ४ मांत्रिकलोक. ५ सर्वकांहीं हरी वांचून पडलें नाहीं; हरी वाचून कांहींच नाहीं.

सीतास्वयंवर.

कथासारांश.

श्रीरामचंद्रांनीं शिवधनुष्याचा भंग केल्यानंतर जनकानें आपल्या प्रधानासमागमें पत्र देऊन त्यास अयोध्येस राजा दशरथास बोलावूं पाठविलें. दशरथ राजा मंत्रिमंडळीसह मिथिलेस गेला. तेथें श्रीरामचंद्र, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांचीं मोठ्या थाटानें लग्नें झालीं. तो प्रकार या आख्यानांत वर्णन केला आहे.

आर्या.

निज मंत्री पाठविला—आणाया दशरथासि जनकानें ।
पत्रश्रवणानें बहु—झाले संतुष्ट सर्व जन कानें ॥ १ ॥

पद—(गड्यांनो कृष्ण गडी आपुला.)

विनवी प्रधान रायासी ॥ चलावें मिथिला[1] नगरासी ॥धृ०॥ देउनि पत्र दशरथातें ॥ ह्मणे मी आलों न्यायातें ॥ करावें विश्रुत सकळातें ॥ सर्वे घ्या निजपरिवारातें ॥ दिधली सीता रामासी ॥ १ ॥ सिद्धता सर्व तया ठायीं ॥ न्यूनता अणुमात्रहि नाहीं ॥ घ्यावी समस्त सेना ही ॥ सोयरे आप्त पिशुन[2] तेही ॥ राहों नये दासदासी ॥ २ ॥ राजे त्वरा करिति जाया ॥ जातिल अपअपुल्या ठायां ॥ प्रार्थितों यासाठीं पायां ॥ करणें वेळ अतां वाया ॥ आज्ञा द्या निज भृत्यांसी[3] ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी—रामाला ॥ निजमनहर्षित[4] पिता झाला ॥ बाहुनि त्वरित सुमंताला ॥ कथियलें वृत्त सकळ त्याला ॥ निघावें निज दल-भारेसीं ॥ ४ ॥

साकी

विश्वामित्रें पत्र धाडिलें—राजा दशरथ जो ज्ञातें । वरिली सीता श्रीरामानें भव—धनु[5] भंगुनि निजहातें ॥ १ ॥ यावें पुत्रासह

---

१ जनक राजाची राजधानी. २ निंदक. ३ सेवकांला. ४ आनंदीत. ५ शिवाचें धनुष्य.

परिवारें सेना घेउनि जनक पुरा । होइल लग्न यथाविधि मंगल झालें ऐसें कधिं न पुरा ॥ २ ॥

दिंडी.

पत्रबोधें आनंद दिग्रथाला, ॥ प्रेम दाटे, नावरे असा झाला ॥
म्हणे भीती संपूर्ण नाग ज्याला । त्वरें घाला पाखरा त्या गजाला २

आर्या.

द्यावे रथ अति सुंदर अश्वहि तैसेचि वीर पायाचे ।
यामद्वयांत सत्वर जे कां मिथिला पुरासि न्यायाचे ॥ १ ॥
सांगुनि निज प्रधाना दिधली अक्षत समस्त नगरासी ।
साहित्य घेतलें बहु वस्त्राभरणें अनेक नगरांसी ॥ २ ॥

साकी

सेना घेउनि त्वरें निघाला राजा नगरा बाहेरीं ।
वाद्यें वाजति नानाविध, तो नाद दिशा अंबरें घेरी ॥ १ ॥

आर्या.

गज रथ हय शिबिकादिक यानीं बैसूनि अंगना जाती ।
गाती यश रामाचें म्हणती पाहूं चला जनकजा, ती ॥ १ ॥

कटिबंध.

राजा दशरथ सेनासमिंदर, ले निकला डर मानत इंदर, अवाज पहुंची सब गिरिकंदर, सबही हाथी मिसल गजंदर, मोती जिनके दांतों अंदर, झूल रेसमी बडी धुरंधर, है मोतनकी झाला सुंदर, गले साज सोनेके लंगर, बडी अमारी है एक मंदर, सुफेद घोडे बडे बिलंदर, देख छुपे अंबरमें चंदर, सुरंग मुषकी कुमेद गरे,

१ मार्गे, पूर्वी. २ दिग्+रथ=दशरथ. दिशा दहा असल्यामुळें दशशब्द कवीनें दिग्वाचक धरला आहे. ३ हत्ती. ४ पांघरूण, पडदा. ५ पायदळ ६ दोन प्रहरात. ७ अलंकाराच्या राशी. ८ आकाश. ९ शिबिका=पालखी. १० वाहनांत. ११ स्त्रिया. १२ अलंकार. १३ अंबारी जशी कांहीं एक घरच [illegible]. १४ खंद. १५ घोडे इतके शुभ्र होते कीं त्यांना पाहून चंद्र आकाशांत लप[illegible] [illegible]हिला.

कूरे नीले, अरबी, गरबी ताजे बहोत आंगमें चरबी, कितने घोडे मोतल कोतल, जोत लिये है रथ को धवतल, जीन सुनेरी सब के ऊपर, घुटनेमें है पैंजन नूपर, अवाज निकलत चलने ऊपर, साज सुनेरी ऊपर डाला, सवार जिनके हाथमें भाला, सरमंदिल सरपेंच बाला, गले रतनकी सोभत माला, सुरज किरनसें पडत उजाला, कैंक अवरतें हाथी ऊपर, कितनी बैठीं रथमें जाकर, कपडे एक एकसें बेहतर, जडावके है भूखन अंगपर, बहोत पालकी और नालकी, जिनके आगू सिंग हालकी, नौबत बाजा झुमर सांजकी, जात देखने जनक जानकी, सबहीको बडि आस मानकी, आ पहुंचे सिम मिथिला नगरकी, ले सेना दसरथ आया बडि धूम भम लागनकी ॥ १ ॥

आर्या

जनकपुरा गेल्यावरी आला सह सैन्य जनक सामोरा ।
झाला हर्ष बहु तया होतो घनदर्शनें जसा मोरा ॥ १ ॥

झुलना

बडी सेना ले साथ ॥ आया दसरथ नृपनाथ ॥ आई कानमें यह बात ॥ जनक जात सामने ॥१॥ चली फौज बेसुमार ॥ अंगुनेंकिब चोबदार ॥ पडी शहरमें पुकार । आये पौर देखने ॥ २ ॥ कहत जनक महाराज । भये दर्शन जो आज ॥ हुवे सुफल सबही काज ॥ राखी लाज हमारी ॥ ३ ॥

आर्या

मिथिला पुर प्रदेशीं दिधलीं शिबिरें अनेक उतराया ।
तरि नच पुरलीं ह्मणती या हो या मंदिरांत उतरा, या ॥ १ ॥

---

१ घोड्यांच्या जाति. २ ज्यांच्यावर स्वार बसले नाहींत असे. ३ उत्तम. मिसल=सारखे. गजेंदर=ऐरावत. ४ भूषणें, अलंकार. ५ वाहनविशेष. ६ हीं वाद्यांचीं नांवें आहेत. ७ मानाची. ८ शींव. ९ मेघ. १० भालदार. ११ पुरवासी लोक १२ तंबू, शामियानें वगैरे.

सानुज भरत बिलोकुनि सानुग हे रामसे गमे राया ।
विश्वामित्र ह्मणें हो कैकेयीचे सुपुत्र हेरा या ॥ २ ॥

दिंडी.

ह्मणे माता रामासि अरे बाळा ॥ कशी वरिली भंगूनि धनू बाळा ॥ मला गमतें बहु नवल हेंचि पाही ॥ जगीं कोमल तूं एक, दुजा नाहीं ॥ १ ॥ किती दुर्धर हें चाप कठिण बारे ॥ जया पहातां भूपाल चकित सारे ॥ असें करणें सामान्य काय केलीं ॥ कशीं शकलें हीं सांग तुवां केलीं ॥ ३ ॥

साकी.

राम लछीमन भरत शत्रुघन च्यारों भाई है सौरिसे ।
कन्या च्यारों इन च्यारोंको देऊं मनमें है तबसे ॥ १ ॥
रामचंद्रको सिता, उर्मिळा लछमनजीकी है नारी ।
भरत मांडवी, शत्रुघनको श्रुतकीर्ती सोहे भारी ॥ २ ॥

श्लोक.

पाचारुनी बहु सुवासिनि बायकांतें ॥ राजांगना कथितसे तुम्हि आयका तें ॥ मांडूनिया कलशकुंकमयुक्त सूत्रें ॥ न्हाणा मुलीस करिं घेउनि हेमपात्रें ॥ १ ॥

पद.

सुभगा न्हाणिती सीतेला ॥ धृ० ॥ हेम कलश अति सुंदर ज्यांच्या न्यून न समतेला ॥ १ ॥ परिमळद्रव्यें उटणें लाविंते सुगंधमय तेला ॥ २ ॥ वाद्यें वाजाति नानाविध तैं आनंद मातेला ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम निरंतर करील ममतेला ॥ ४ ॥

आर्या.

केलें [illegible]न गोभू रत्नें सुवर्ण धन दानें ।
दिधलीं विप्रांसि बहू अजवरि ऐसी कधीं न धनेदानें ॥ १ ॥

---

१ क्रीडा. २ तुकडे. ३ एकसारखे, समरूप. ४ शोभते. ५ कुबेरानें.

घाटे नवल मुनिजना, येतां उच्छिष्ट हळद रामासी ।
ह्मणती ब्रह्म सगुण हें, गाती याच्या समस्त नामासीं ॥ २ ॥

साकी

उभय मंडपीं पुजन मातृका देवकस्थापनही झालें । नांदि-श्राद्धें करुनि दक्षिणा देतां विप्र सकळ धाले ॥ १ ॥ आलि सुमेधा राणी रुखवत घेउनि संगे बहु सुभंगा । वाजत गाजत मिरवत अणिल्या वस्त्रें सुंदर युक्त नगा ॥ २ ॥

आर्या

घटिका भरतांचि सकळ कथिती येऊनि विप्र जनकास ।
आणा वरासि ह्मणतां गेले घालूनि बहु सुजन कासे ॥ १ ॥

पद.

अगे बाइ पाहुं चला रघुवीर ॥ धृ० ॥ कोमल कांती अति शरिराची परि मोठा रणधीर ॥ १ ॥ भवधनु भंगुनि शकलें केलीं कोण असा खंबीर ॥ २ ॥ भार्गवरामें छळिलें तरि तो अंतरिं बहु गंभीर ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु वरुनि सीतेतें केली चिंता दूर ॥ ४ ॥

पद.

राम लक्षुमण भरत शत्रुघन आले जनकाच्या धामीं ॥ धृ० ॥
शिरिं मंदिल भरजरी दुशाला अंगा किनखापी नामी ॥
कासे पीतांबर बहु शोभे हार पाचुचा हृद्पद्मीं ॥ १ ॥
राजमंडपीं दाटि जनांची झाली यास्तव बहु गरमी ॥
व्यंजना-निल वरि घालिति परि ते कितिक दाटले जन घर्मी ॥२॥
गिरिवासी प्रभु राम पातले आनंद सकळा नृपसद्मीं ॥
भाविक जन ते सहज विलोकिति दुःसाध्यचि जे नच छद्मी ॥३॥

आर्या

अक्षत अक्षत मोत्यें वाटिति सकळांसि भृत्य रायाचे ।
वाद्याचे नाद बहु स्थळोंस्थळीं थाट नृत्य गायाचे ॥ १ ॥

---

१ क्रिया. २ पञ्चांग मारून. ३ व्यजन=पखा, अनिल=वारा. ४ उकाडा ५ कपटी.

मंगलतर अति मंगल रामयशोंकित प्रबंध बहु गाती ।
कल्याणप्रद ऐसीं पदें अमितही जयांत बहु गातीं ॥ २ ॥

साकी

ब्राह्मण ह्मणती मंगलाष्टकें शुभतर वेळा त्या काळीं । हर्षयुक्त शेवटीं जनांनीं वाजविली एकची टाळी ॥ १ ॥ ॐपुण्याहं वाचन होता बसले वधुवर स्वस्थानीं । वानिति बहुजन नृपभाग्यातें कितिक सितेच्या ध्यानीं ॥ २ ॥

आर्या

झालें चित्र जनां हें विधिहरें ह्मणती पदा नमो त्यांच्या ।
त्यांच्या शिरीं वधुकरीं घालविती अक्षता सुमोत्यांच्या ॥ १ ॥

श्लोक

प्राची दिशा जसिच सन्मुख नोवऱ्यातें ॥ तैसी अशा वरुन सन्मुख नोवऱ्यातें । येणें रिती वधुवरें बसवूनि स्थानीं ॥ सूत्रत्रयें वलय बांधियलीं द्विजांनीं ॥ १ ॥

आर्या

पूजन गौरीचें मग पाणिग्रहणादि विधिहि तो केला ।
दशरथ निजपुत्रांसह तेथुनि तत्काल स्वस्थळा गेला ॥ १ ॥
संसारदुःख कैचें, विसरावे पहातांचि सर्व पायघडी ।
ह्मणती स्त्रिया सकल त्या येइल ऐसी पुन्हांहि काय घडी ॥ २ ॥

पद

सीता पूजा गौरि हराला ॥ धृ ॥ गंध पुष्प धुप दीप अक्षता, अर्पी बेल शिवाला ॥ १ ॥ कुंकुम हळदी खाद्य समर्पुनि, वंदी पदयुगुलांला ॥ २ ॥ मंगल अरती करूनि यथोचित, मागे हेंचि तयाला ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु रामची पती दे प्रतिभवीं वराला ॥ ४ ॥

श्लोक

राजांगना चालति मध्यभागीं । पौरांगना त्या भंवत्या विभागीं । येती अशा त्या जनकगृहासी । धावे सुमेधा पदधावनासी ॥ १ ॥ दारू नळे तुबक आणिक चंद्र ज्योती । झाडें अनेकविध

---

१ गीत, गाणें. २ विधि=ब्रह्मदेव, हर=शिव. ३ पूर्व. ४ तीन. ५ कडे.

रंग दिसोन येती । नक्षत्रपुंज जन त्यांताचि ते पहाती । गोळे फुटू-
नि जंव शब्द महा करीती ॥ २ ॥

आर्या

सुनमुख पहावयातें कौसल्येनें मुलींस आणविलें ।
हें वृत्त सुमित्रेला कैकयीला समक्ष जाणविलें ॥ १ ॥

ओंवी

कौसल्येनें अपुल्या अंकीं । उचलुनि घेतली जानकी । घालुनि शर्करा-
ही मुखीं । कुरवाळी प्रेमें ॥ १ ॥ रत्नांचे बहु अलंकार । सीता
ल्याली हो सत्वर । भासे रतिहुनि अति सुंदर । रूप जिचें
नयनीं ॥ २ ॥

आर्या

मांडुनि पाट रजतमय दिधलीं ताटें समस्त कनकाचीं ।
अणिकाची काय कथा वाढी जेथें प्रियाहि जनकाची ॥ १ ॥
नित्यानित्य बहु द्विज जेविति त्यांची कळेचि ना गणती ।
ह्मणती यथेच्छ जेवा प्रार्थिति शतदां करूनिया प्रणती ॥ २ ॥

श्लोक

जनकें दिधले आंदण जावयांसीं ॥ ते प्रार्थिती स्वसदना-
प्रति जावयासी । राजा बहू विनित होउनि मार्ग दावी । तें प्रेम
काय सुरिती कि तिहो वदावी ॥ २ ॥

आर्या

झाले साडे सुदिनीं गेले घेउनि वरात नगराशी ।
वांटी नृपवर सकळां वस्त्राभरणें तशाच नगराशी ॥ १ ॥

भरतभाव

कटिबंध

निघती रामचंद्र वनवासा, सोडुनि सत्वर सुखद निवासा,
करीत होते निर्जर नवसा, आला प्रसंग तो बहु दिवसां, चित्तीं
त्यांच्या अनंद बहुसा, यास्तव धरिला वेश नवासा, मानुनि
राज्याहुनि बहु खासा, टाकुनि मंदील जरी दुपेटा, वेटाळुनि शिरि
जटा बांधिल्या, लपटाया वरि न राहिच फेटा, भंवताल्या किति
जटा मोकळया, छटा नील घन घटा परिस, अंग नग चांगला,

१ नम्र.

मुदी नसे कारिं कैची, पौंची रत्नहार तट तटां तोडिले,वसन कटीचें तेंहि सोडिलें, बाण धनू कारिं कैंचा लोटा, जना वाटला समयाचि खोटा, वनासि जाती अवळुनि पोटा, झाला नगरींतहि बोभाटा, रोधिल्या बहुत जनांनीं वाटा, झाला तइ कलकलाट मोठा, तटा-वरुनि तळवटा उतरल्या, स्त्रिया सीतेला पाहुनि रडल्या, चित्तीं अपुल्या बहु गडबडल्या, किति मार्गांतचि अडल्या पडल्या, कैकयी-वर बहु कडकडल्या, चित्ता येइल तें बडबडल्या, किती मनांतचि त्या कुडकुडल्या, लक्ष्मणही त्यासवें चालिला, साकेतपुरीं अकांत झाला, सिताकांत रघुनाथ निघाला, बंधूसह वल्कलें नेसला, दुःख नावरे, रडती सारे, पुरवासी जन पाठिं धांवले, गिरिवासी रामाच्या पदपद्मीं, लोळुं लागले ॥ श्रीराम वना जंव गेला पुरवासी बहु हळहळले ॥ १ ॥

पद (भरत आपुले जागीं विचार करितो)

(माझा भरत देखिला काय)

अयोध्या गतंभा कां दिसती, न कळे हें मजला॥धृ॥ देखिले बहुतांतें सदनी ॥ तयांच्या कांति नसे वदनीं ॥ वाटतें अपूर्व हेंचि मनीं ॥ असोनी धनी कां ऐसे ॥ १ ॥ देखिल्या गतप्रभा नारी। होत्या जरी कुंकमधारी ॥ चहोटा लोकाहि बाजारी ॥ प्रजा सारी प्रेतवत ॥ २ ॥ असती गज हय पशु सारे । पाहिल तरि चित्तीं घोरे ॥ पडती दिवसा कां तारे ॥ अभ्रवारें भय सुचवी ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासि कसा रुसला ॥ उगवला दिवस तरी कसला ॥ मजला कां दचका बसला ॥ सुचला विचार नच कांहीं ॥ ४ ॥

पद (कैकयी भरतास ह्मणते)

(गड्यानो कृष्णगडी आपुला)

बोले भरतासी माता—करी तूं राज्य सुखें अतां ॥ धृ ॥ वचनीं गोवुनि रायाला ॥ धाडिलें वनासि रामाला ॥ लक्ष्मण तोहि सवें गेला ॥ नेलें त्यांनिंच सीतेला ॥ अलें हें राज्य सकळ हातां ॥ १ ॥ जाता वनासि लवलाही ॥ घेतलीं वसनें म्यां पाहीं ॥ राहिला रिपूच तुज नाहीं ॥ बारे स्वस्थपणें राही ॥

होईल अभिसिंचन[1] माथा ॥ २ ॥ ऐकुनि जननीचे हे बोल ॥ सोडि मर्यादेचा तोल[2] ॥ वदे वचनें बहु अनमोल[3] ॥ ज्यांचा अर्थ बहुत खोल ॥ मारिला सकळांचा भर्ता ॥ ३ ॥ गेला राम वनामाजीं[4] ॥ वल्कलें वेष्टुनिया मांजीं[5] ॥ कामना हीच काय माझी ॥ गेली सीता ही मांजी[6] ॥ जी कां अधार या जगता ॥ ४ ॥ प्रभु गिरिवासि प्राण माझा ॥ करिल हें काय कुणप[7] काजा ॥ ह्मणतो माय रामराजा । रक्षिलें यासाठीं बोजा[8] ॥ करितो कधींच तव घाता ॥ ५ ॥

साकी. (भरत ह्मणतो)

दसरथ भूप जगतका वाली, मारलियो एक छनमें ।
रंडा होकर बैठी घरमें कौन भलाई इस जगमें ॥ १ ॥
मैं हुं पूत तिहारो पापी नहीं कालनें इस खाया ।
बडो दुःख अज भयो मुझे कब राम करे सीतल छाया ॥ २ ॥

घनाक्षरी.

कैसो राम मिले आज । बडी लागत मोह लाज । सबो बिघडगयो काज । करुं इलाज कौनसो ॥ १ ॥ गयो बिपिन रामराज । भइ कठन बात आज । कहूं किनसे यह काज । करुं इलाज कौनसो ॥ २ ॥

पद. (कौसल्या ह्मणते.)

बा समय कठिण हा मोठा, कोणतें पाप बडबडलें ॥ धृ० ॥ वासरा काय तुज सांगूं, पहा झाला घात कसारे ॥ ही करणी तव मायेची, तें बोलचि घातक सारे ॥ नृप गेला पुत्र वियोगें, सोडुनि हे मोह पसारे ॥ १ ॥ चाल ॥ भोंवलें अह्मां सकळांला ॥

---

१ राज्याभिषेक. २ सीमा. ३ अमूल्य. ४ अरण्यामध्यें. ५ कंबरेस. ६ माझी. ७ प्रेत. (राम माझा प्राण, तो गेला आतां हें प्रेतवत शरीर काय करील असा भावार्थ) ८ भावार्थ—राम तुला आई ह्मणतो ह्मणून तुला सोडलें, नाहींतर तुला केव्हांच मारलें असतें.

वृत्तांत जनासि कळला ॥ लाविला डाग स्वकुळाला ॥ पू. चाल ॥ बाळासि धाडिलें विपिनीं, कोणतें यश मिळवीलें ॥ २ ॥

अंजनीगीत.

बोले कौसल्या माउली ॥ होती सकळांसचि साउली ॥ गेली नेत्रांतिल भाउली ॥ रघुराज माझा ॥ १ ॥ ज्याची लीला अति पावनी ॥ पाहुनि संतृप्त आवनी ॥ कोठें बसला नकळें वनीं ॥ रघुराज माझा ॥ २ ॥ मिळेल कोठें काय अशना ॥ मागेल कवणा जलप्राशना ॥ करील कोठें क्षुत्नाशना ॥ रघुराज माझा ॥ ३ ॥ सीता सुंदर अति कोमला ॥ जरि वदनेंदु अति कोमला ॥ ह्मणेल कैसी हें नको मला ॥ श्रम झाले भारी ॥ ४ ॥ नकळें जाइल काय चुकून ॥ अथवा राहे जरि थकून ॥ वेणीफणी करिल कोण ॥ ही चिंता मजसी ॥ ५ ॥

दिंडी.

राम माझा सकुमार फार बापा । वनीं सोशिल केंवि तो प्रखर तापा । जनक कन्या कोमला अती धन्या । कशी विपिनीं राहील जगन्मान्या ॥ १ ॥

पद. जलदत्रिताला.

कधीं भेटेल राम आतां ॥ ध्रु० ॥ बाळ माझा सुकुमार ॥ कसा करिल संचार ॥ वनिं श्वापदाचे भार ॥ फार लागली मज चिंता ॥ १ ॥ नाहिं जेविलाचि घरीं ॥ नसे दाम त्याच्या करीं ॥ काय मिळे वनांतरीं ॥ बरि न दिसे गती पाहतां ॥ २ ॥ चीर भूषणें टाकिलीं ॥ कटिं वल्कलें वेष्टिलीं ॥ अंगिं विभूती चर्चिली ॥ गेलि संगें जनक दुहितां ॥ ३ ॥ गिरिवासीं प्रभु राम ॥ अंगिं

---

१ पावन करणारी. २ पृथ्वी. ३ खाण्याला. ४ क्षुधा हरण करण्यास. ५ नाजुक, सकुमार. ६ सुकला, म्लान झाला. ७ अरण्यांत. ८ जगत्+मान्या. जगताला मान्य अशी. ९ पैसा. १० वस्त्रें. ११ कन्या.

येइल त्याच्या धाम ॥ कोठें घेइल विश्राम ॥ झाले कष्ट हे तुझ्या करितां ॥ ४ ॥

पद.

करुं मी गति कैशि, रे बा ॥ गेला राम सखा विपिनासी ॥ ध्रु० ॥ कोण तया सांभाळी ॥ लिहिलें कसें विधीनें भाळीं ॥१॥ सीतातप घन-वारी ॥ नकळे वनीं कसें निवारी ॥ २ ॥ चैन पडेना कांहीं ॥ पाहिन मूर्ति कधीं नयनांहीं ॥ ३ ॥ पळपळ युग सम जातें ॥ लोटुं दिवस मग कैसे हातें ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु कां रे ॥ केलें विपरीत हें तूं सारें ॥ ५ ॥

दिंडी. (भरत बोलतो.)

नसें ठावें हें वृत्त मला कांहीं ॥ असा दुर्बुद्धी कुटिल मीन पाही ॥ जरी वाटे ना सत्य तुला माते ॥ भस्म करितिल हे पाय तुझे मातें ॥ १ ॥ शपथ गुरुची वाहतों अशा साठीं ॥ ब्रह्महत्या मजलागें तशा साठीं ॥ घडो जरि हें मज कृत्य असें ठावें ॥ अजुनि तुजला कां सत्य न वाटावें ॥ २ ॥

साकी. (कौसल्या भरताला ह्मणते)

कहत कौसल्या प्रेम तिहारो रामचरनपर है बैठा ।
क्या करुं मोहे दुःख बडो यह, नहीं रामके सिर फेटा ॥ १ ॥
नहीं तुझे कछु काम किसीसे, राम बिना सबही फीको ।
कीरत माकी तोह बतलाई मानत यह सबही नीको ॥ २ ॥

आर्या.

ह्मणती वसिष्ठ भरता राज्य करावें तुवां बरें दिसतें ।
गेले सुखांत जरि तरि मानावे कां न बा बरें दिस, ते ॥ १ ॥

---

१ ब्रह्मदे-ानें. २ थंडी, ऊन, पाऊस. ३ दुष्ट. ४ मला. ५ खाठ. ६ फिकें. ७ चांगलें.

दिंडी.

चला जाऊं कैकयी विना सारे ॥ नसें मजला गुरुचाहि भरंवसा रे ॥ राम पायीं वाहीन शीर आतां ॥ नको कर्णीं सह- साहि विभवं[1] वार्ता ॥ १ ॥

श्लोक.

व शिष्टासि घेऊनि सर्वत्र माया[2] ॥ त्वरें चालिल्या शोक चित्तीं निमाया[3] ॥ प्रजा त्याच मार्गीं प्रभुसि नमाया ॥ निघाल्या अशा पाश सोडूनि माया ॥ १ ॥

दिंडी.

भरत गेला कानना त्यासि वाटे ॥ अतां भेटेल रघुराज याचि वाटें ॥ शोक चित्तीं नावरे असा जाला[4] ॥ तरी वदनीं श्रीराम नाम ज्याला ॥ १ ॥

आर्या.

धुंडित वनासि गेला, गेला प्रभु राम ज्या वनामाजीं ।
पाहिन पदद्वयातें, आहे जरि शुद्ध भावना माजी ॥ १ ॥
भेटे गुहक तशांतचि, सांगे वृत्तांत रामरायाचा ।
कांहीं स्थिरावला मनिं, होता संकल्प जरि मरायाचा ॥ २ ॥
पाहुनि तृणशय्येतें, चित्तीं अत्यंत घाबरा जाला ।
केला शोक स्वधिःकृत, धरवे ना धीर मम जरा ज्याला ॥ ३ ॥
पद चिन्हित भूमीचे, रज घेउनि मस्तकीं भरत टाकी ।
गुहकें उतरुनि नेला, सैन्यासह भरत तो पर तटाकीं[5] ॥ ४ ॥

दिंडी.

भरत पाहे दृष्टिनें राम राया ॥ करी धांउनि तत्काल नमन पायां ॥ क्षेम देउनि बैसवी प्रभु हातें ॥ बहु झाले संतुष्ट उभय भ्राते ॥ १ ॥

---

१ मोठेपणा, ऐश्वर्य. २ माता. ३ नाहींसा होण्याकारितां. ४ झाला, ५ पैल तिरीं.

श्लोक.

तों देखिले गुरु वशिष्ट तशाचि माया ॥
धांवे प्रभु त्वरित त्यां सकळां नमाया ॥
त्या उपरी पुसत क्षेम असे पित्याला ॥
त्या सांगती रडुनि वृत्त समस्त त्याला ॥ १ ॥



श्रीराम सन्यास घेतात असें समजून हनुमान सीताशुद्धीस न जातां परत आला तें आख्यान.

आर्या. (राम लक्ष्मणाप्रं म्हणतात.

होतों समदुःख ह्मणुनि परस्परें नेमही तसा केला ।
झाला कृतकार्य तरी मर्कट चित्तीं नसेचि धाकेला ॥ १ ॥
सरले मास चतुष्टय वर्षाकालहि समग्र तो सरला ।
झालें निरभ्र नभही बा, पाहे घनसमूह वोसरला ॥ २ ॥
शिखिंसाक्ष सख्य केलें परंतु मर्कट कशास आठवितो ।
सीताशुद्धि कशाची वानरसमुदाय काय पाठवितो ॥ ३ ॥
चुकलों मीच प्रथम हें नर वानर सख्य काय हो होतें ।
तरि सत्य मानिलें कीं कीशाचें बोल व्यर्थ हो हो, ते ॥ ४ ॥

साकी.

यासाठीं तूं जाई वत्सा शरधनु घेउनिया हातीं ।
वधुनी येई, कळलें मजला कृतघ्न कीशाची जाती ॥ १ ॥

श्लोक.

धनू घेऊनी धांवला शीघ्रकोपें ॥ ह्मणे मर्कटा वाटलें कर्म सोपें । आतां मारितों, वारितो कोण मातें ॥ ह्मणुनी धनुष्या करि सज्य हातें ॥ १ ॥ टणत्कार तो ऐकुनी कीश भ्याला ॥ करावें कसें हें सुचेनाचि ज्याला ॥ ह्मणे हें दिसें पातलें विघ्न मोठें ॥ अला मृत्यु आतां कसा काळ लोटे ॥ २ ॥

---

१ सुग्रीव व रामचंद्र यांचें अग्निसाक्ष सख्य झाले कीं रामानें वालीला मारून सुग्रीवाला राज्य व बायको तारा द्यावी. व सुग्रीवानें सीतेचा शोध लाऊन तिला परत मिळविण्याविषयीं रामाला साह्य करावें. त्याप्रमाणें रामानें आपलें काम केलें? पण सुग्रीव आपल्या नगरांत ४ महिने स्वस्थ राहिला ह्मणून राम लक्ष्मणाला ह्मणतात. २ अग्नि.

दिंडी.

झणे तारा भ्यावें न लक्ष्मणातें ॥ त्वरें अणितें वाहूनि वायुजातें ॥ करिल त्याचें तो समाधान आतां ॥ व्यर्थ वहतां कासया मनीं चिंता ॥ १ ॥

साकी.

कहत अंजनापोत[1] सुगलेसे[2] धीर धरो मत घबरावो ।
मै समझाऊं लछमनजीको सबही वानर बुलवावो ॥ १ ॥

आर्या.

वायुज[3] कीशांसि[4] ह्मणें, जा सत्वर राम ज्या स्थळीं असती ।
पुसतील हेंचि कळवा, आह्मां अद्यापि भेटली न, सती ॥ १ ॥

दिंडी.

मास जाला संपूर्ण अह्मां लागीं ॥ शोध करितों ग्रामांत इतर जागीं ॥ परी नाढळली सती जानकी ती ॥ पुढें नकळे लागती मास कीती ॥ १ ॥

आर्या.

लक्ष्मणही मग तेथें, आला कोपें करूनियां सुगळा[5] ।
पाहे, घाबरला बहु, आले त्याचे समग्र आसु[6] गळा ॥ १ ॥

झुलना.

क्यंवरे भूल गया बोल ॥ मारूं थपड और धवल ॥ तबही याद अवे कौल[7] ॥ मुफत डौल दिखाया ॥ १ ॥

साकी,

सुनो सुनो लछमन महाराजा सुग्रिव गाफिल मत जानो ।
भेज दिया है कपिगण कितने मास भया सच कर मानो ॥ १ ॥

---

१ मारुतेला. अंजनीचा मुलगा मारुती. २ सुग्रीव. ३ मारुती. ४ वानरास. ५ सुग्रीव. ६ प्राण कंठीं आले. ७ वचन.

दिंडी.

ह्मणें लक्ष्मण कासया वधूं यातें । कपी पाठविले शोधं करायातें । कथिन रामासी वृत्त सकळ आतां ॥ सवें नेइन सुग्रीव हनूमंता ॥ १ ॥

आर्या.

आले कपिगण पुष्कळ, तत्कालचि राम ज्या वनीं होते ।
मोडिति तरु शाखांतें, पाडिति हसडूनि भूतळीं हो ते ॥ १ ॥
करिती मर्कट चेष्टा, दाविति रामासि वांकुल्याहि तशा ।
फिरती वनांत निर्भय, करिती कोल्हाळ एकदां शतशा ॥ २ ॥
राम पुसे कोणाचे, आलां कोठूनि कार्य कळवा हो ।
विध्वंसिलें सकल वन, किमर्थ संशय समूळ पळवा हो ॥ ३ ॥

अंजनीगीत.

सीताशुद्धी करायासी ॥ सुगलें पाठविलें आह्मासी ॥ वानर गेले देशोदेशीं ॥ मासावधि क्रमली[1] ॥ १ ॥ आहे रामाची ती जाया ॥ ह्मणउनि झटतों बहु राजा या ॥ सुग्रिव तोही सिद्धचि जाया ॥ सीतेच्या शोधा ॥ २ ॥ अणखी वानर पुष्कळ तेही ॥ जातिल शोधाया दवळाही[2] ॥ त्यांची निष्ठा रामपायीं ॥ दृढतर हें जाणा ॥ ३ ॥ परि तो रामचि न दिसे वनीं ॥ पुष्कळ शोधिली अवनी ॥ बसला जाऊनि कवण्या भुवनीं[3] ॥ नकळे आह्मासी ॥ ४ ॥

दिंडी.

राम ह्मणती तो हाचि पहा डोळा ॥ सिता विरहें जाहले प्राण गोळा । ह्मणुनि रोषें धाडिलें लक्ष्मणासी ॥ हीच चिंता तो वधिल सुग्रिवासी ॥ १ ॥

---

१ पुष्कळ. २ पक्षी. ३ घरीं, ठिकाणीं.

आर्या.

लक्ष्मण पुढेंचि होता मागें सुग्रीव वायुचा तनय ।
आला कपिगण घेउनि, अंगद ह्मणतात ज्यासि मूर्त नय[१] ॥ १ ॥
वंदुनि लक्ष्मण सांगे, झाला वृत्तांत तो समुळ सारा ।
सुग्रिव तत्पर चरणीं, चिंता मग कासया समुळ सारा[२] ॥ २ ॥
सुगलें कपि पाठविले, मासावधिच्या करूनि नेमातें ।
प्राच्योत्तरपश्चिमदिक्[३], शोधुनि वृत्तांत जाणवा मातें ॥ ३ ॥
दक्षिण दिशेसि हनुमान्, प्रेषाया सिद्ध सुग्रिवें केला ।
गेला मुद्रा घेउनि, चित्तीं तिळमात्र जो न धाकेला ॥ ४ ॥
कापिनें मुद्रा स्वमुखीं, घालुनि गिळिली क्षणांत, रामा ती ।
पुनरपि प्राप्त कशाची, वाटे होइल अतां तिची माती ॥ ५ ॥

पद (लक्ष्मण ह्मणतो.)

मुद्रिका दिधली हनुमंता ॥ ह्मणावें काय तुह्मां आतां ॥धृ०॥ सोडुनि राज्यपदालाही ॥ अलों या वनांत लवलाही ॥ नाहीं द्रव्य इतर कांहीं ॥ होती एकचि मुद्राही ॥ दवडिली कशि पहातां पहातां ॥ १ ॥ त्यांतही असता मानव तो ॥ तरि मग मी हा मानवतों ॥ त्यावरि विश्वासही धरितों ॥ असा हा निषेधँ नच करितो ॥ परि ती गिळिली करीं येतां ॥ २ ॥ सुचेना उपाय मज कांहीं ॥ जाहलों दंगचि निज ठायीं ॥ केला विचार कां नाहीं ॥ करितिल बहुजन कुत्साही ॥ लागली मजला ही चिंता ॥ ३ ॥ बोले राम गिरीवासी ॥ चुकलों बहु या समयासी ॥ करावें काय अतां यासी ॥ सुचविलें कां नाहीं मजसी ॥ येइल मुद्रा कशि हाता ॥ ४ ॥

---

१ मूर्तिमंत नीति. २ नाहींशी करा. ३ प्राच्य (पूर्व) + उत्तर-प्राच्योत्तर ४ दिशा. ५ पाठविण्याकरितां. ६ मान्य केलें असतें. ७ मनाई. ८ निंदा.

आर्या.

यापरि लक्ष्मण वद्‌ला, तरि रामाच्या मनीं नसे रोष ।
वरि वरि ह्मणती चुकलों, हा सारा मजकडेचि बा दोष ॥ १ ॥
यास्तव चित्तीं आणिलें, घ्यावा संन्यास हें बरें दिसतें ।
जातिळ सुखांत बहुधा, मानावें कां न बा बरें दिसतें ॥ २ ॥
साहित्य मेळउनियां, पूर्ण करी तूर्ण कामना मांजी ।
गमतें हेंचि उचित मज, तुझिया न रुचेचि कां मनामाजी ॥३॥
रामा विहित नसें हें, सोडावा यत्न काय धीरांनीं ।
होइल गति मग कैशी, जरि दृढतर राहिली न धी रानीं ॥४॥
सहसा आग्रह न धरी, वत्सा पूर्वींच मीं बहुत चुकलों ।
यास्तव राज्यपदाला, स्त्रीला संपत्तिलाही बा मुकलों ॥ ५ ॥
दंडकमंडलु वस्त्रें, घेउनि परिधान राम जों करिती ।
कळलें हनुमंतातें, ध्यानीं पाहे जरी अनेक रिती ॥ ६ ॥

दिंडी.

खिन्न झाला अंतरीं वायुतनय । ह्मणे केला रघुविरें फार अनय । सिताशुद्धी कासया करूं आतां । राम झाले यतिवर्य हीच चिंता ॥ १ ॥

आर्या.

श्रीरामाच्या मतिला, केला कोणीं विशंक विभ्रम हा ।
निर्मलहृदयाकाशीं, कैसें येइल उगेंचि अभ्र महा ॥ १ ॥

साकी.

सोंच किया तब दिलमें, अपने फिसाद लछमनजुका है ।
नहिं अंदेसा करलेउंगा इलाज मेरे करका है ॥ १ ॥

---

१ दिवस. २ त्वर. ३ माझी. ४ बुद्धि. ५ अन्याय. ६ निःसंशय. ७ भ्रम. ८ गडबड.

घनाक्षरी.

नजर तेढी अखें लाल ॥ खडे अंगपर सबबाल[1] ॥ पिछे फडकत हैं बाल ॥ जानों काल खडा है ॥ १ ॥

आर्या.

लक्ष्मणही बहु भ्याला, वाटे आतांचि हा करील गट[2] ।
ह्मणउनि श्रीरामाच्या, संनिध जायासि तो करी लगट ॥ १ ॥
राम ह्मणे जा वत्सा, आणी बाहूनि वायुतनयासी ।
दिसतो रागांत बहु, कारण तरि कोण तें नुतन यासी ॥ २ ॥

श्लोक.

प्रार्थीतसे लक्ष्मण रामराया ॥ कां धाडितां हो मजला मराया ॥
भीती मनीं फारचि वानराची ॥ तैसी नसे हो सुर[3] वा नरांची॥१॥

दिंडी.

जरी आला हनुमंत त्याच ठायीं ॥ करी वंदन दूरूनि राम- पायीं ॥ मुखीं मुद्रा अंतरीं कोप वाहे ॥ क्रूरदृष्टी लक्ष्मणालागिं पाहे ॥ १ ॥

साकी.

दंड कमंडलु वस्त्रें भगवीं होतीं संनिध जीं पडलीं ।
अच्छादुनियां बोले न करी गोष्ट प्रगट जी घडली ॥ १ ॥

आर्या.

श्रीरामें पालवितां[4], आला धाऊनि वानरेश तदां ।
कोठें दंड कमंडलु, वस्त्रें ह्मणऊनि न्याहळी शतदां ॥ १ ॥

दिंडी.

राम ह्मणती आलासि कासयातें ॥ मनीं धरिलें कोणत्या संशयातें ॥ सांग मजला तें वृत्त सकळ बारे ॥ क्रोधपूरित हे नयन तुझे कां रे ॥ १ ॥

---

१ पुच्छ. २ खाऊन टाकील. ३ देव अथवा मनुष्य यांची. ४ ह्मणेजे बोलाविलें तेव्हां

ओंवी

बोले हनुमत रामासी ॥ आह्मां पाठविलें शोधासी ॥ होउनि वसता तुह्मि संन्यासी ॥ अयुक्त हें सारें ॥ १ ॥ जरी न सुचती युक्ती असी ॥ तरि मीं पडतचि होतों फसीं ॥ जाउनि आणितों मी सीतेसी ॥ गति कैसी रामा ॥ २ ॥ झाला संन्यासी निजपती ॥ हें जरि कळतें सीतेप्रती ॥ जाळुनि भस्मचि करिती सती ॥ मुकतों मी प्राणां ॥ ३ ॥ कारण दुसरें तेंही तसें ॥ मुद्रेचें या मोलचि नसें ॥ मर्कट हरवीता तरि कैसें ॥ करितां तुह्मि रामा ॥४॥

पद—(राम ह्मणतात.)

(माझा भरत देखिला काय)

ह्मणसी कां मज सन्यासी, नसतां चिन्ह तसें ॥ धृ० ॥ कथिलें कोणीं तुज विपरीत ॥ नाहीं विदित कशी जनरीत ॥ अपुलें करिल कोण अनहित ॥ कष्ट अमीत भोगुनिया ॥ १ ॥ पाहिजे संमत स्त्रीचें यास ॥ घेणें उचीत मग संन्यास ॥ असतां ठावें कोण कशास ॥ व्यर्थचि त्रास सोशिल हा ॥ २ ॥ असावीं वस्त्रें भगवीलाल ॥ हातीं दंड कमंडलु माळ ॥ त्यजावें शिखासूत्र तत्काल ॥ सर्व काळ निस्पृहता ॥ ३ ॥ बोले गिरिवासी प्रभु राम ॥ जाउनि तुजला झाला याम ॥ होईल तरि हें कैसें काम ॥ व्यर्थ दुर्नाम कां करिशी ॥ ४ ॥

दिंडी.

तयीं लक्ष्मण घाबरा फार झाला ॥ ह्मणें कळला वृत्तांत कसा याला ॥ अतां होईल यावरी गती कैसी ॥ करी चिंता अंतरी फार ऐशी ॥ १ ॥ ह्मणें आतां वाचवा रामराया ॥ फार चुकलों निंदिलें कपीवर्या ॥ पुन्हां ऐसें न करीन सर्वथाही ॥ ह्मणुनि सत्वर घातली मिठी पायीं ॥ २ ॥

---

१ भाइसीवत, ३ प्रहर.

पद—दादरा.

रामा दे अभयदान रक्षी प्राणासी—॥ धृ० ॥ गेला जव नमुनि पाय, ॥ वानर, हा करिल काय ॥ हाचि धरुनि अभिप्राय ॥ निंदियलें त्यासी ॥ १ ॥ भासतसे काळसाच ॥ ग्रासिल कीं काय साचें ॥ प्रसंगही हा तसाच ॥ नमितों पायांसीं ॥ २ ॥ पडला हा विचार ॥ मुद्रेचें मोल फार ॥ केल्या कपिनेंचि पार ॥ होईल गति कैशी ॥ ३ ॥ बोले गिरिवासि राम ॥ करि यासी तुं प्रणाम ॥ तरि होईल सकल काम ॥ वेळ न करि यासी ॥ ४ ॥

आर्या.

नमन करुनि सांष्टागें, अपुला अपराध हा क्षमा करवी ।
यांतचि कल्याण पहा, नसतां न दिसेचि बा गती बरवी ॥१॥
केलें वंदन कपिला, तोही आलिंगनें तया सुखवी ।
दुखवील काय धीमान्, श्रेष्ठाचि तो वर्णितात ज्या सुकवी॥२॥
मुद्रा स्वमुखीं घालुनि, तत्कालचि वानरेश गेला हो ।
गिरीवासीप्रभुस्मरणें, मार्गीं जातां अखंड घे लाहो ॥ ३ ॥

---

१ काळासारखा. २ खरोखर. ३ बुद्धिमान. ४ सु—चांगले कवी. ५ लाभ.

नळाख्यान.

पद—(द्वापर कलीस ह्मणतो.)

(गझ्यानो कृष्णगडी)


द्वापर ह्मणे कलीराया ॥ करिसी कां तूं श्रम वायां ॥ ध्रृ०॥
जाणत मूढ कसा तूं ही ॥ कळेना गोष्ट तुला कां ही ॥ राजा
पुण्य[1]—कीर्ति पाही ॥ विदित हें जग[2]त्रयालाही ॥ पडाया योग्यचि
हा पायां ॥ १ ॥ चाल रे पुरें करीं आतां ॥ होइल सौख्यगृहा
जातां ॥ इच्छिसी कां तूं परघाता ॥ दोष न परपीडेपरता ॥
अजवरि कष्टविली काया ॥ २ ॥ वदे कलि कां बरें घाबरसी ॥
व्यर्थ भय मनांत वागविसी ॥ थांबरे तूंचि यश वरि[3]सी ॥
होइल गोष्ट तुझी सरशी ॥ घेसी उगाचि कांघां[4]या ॥ ३ ॥ नको
बहु वेळ यासि आतां ॥ पाहसिल वनासि हा जातां ॥ रडेलचि
ह्मणत तात माता ॥ चुकेना आला जरी घातां ॥ आठविल
गिरीवासी पायां ॥ ४ ॥

पद (पुष्कर नळास ह्मणतो.) चालः—गझ्यानो कृष्णगडी

पुष्कर ह्मणे नळा आजी ॥ खेळूं द्यूत अणुनि *बाजी ॥ध्रृ०॥
हरविलें त्वां जरि आपणासी ॥ द्यावें त्वरितचि स्वपणा[6]सी ॥
असतो लोभ कृपणासी ॥ सांडिसिल कां तूं स्व पणा[7]सी ॥ द्यावी
वस्तु जशी बाजी ॥ १ ॥ हरलों मी जरि भाकेला ॥ आहे हा
जसा उभा केला ॥ देऊं कोठुनि पण केला ॥ होइन दासची

---

१ नळ, धर्मराज, जनक व परमेश्वर जनार्दन. (पुण्यश्लोका नलो राजा, पुण्यश्लोको युधिःष्ठि पुण्यश्लोको विदेहश्च, पुण्यश्लोको जनार्दनः ॥) हे पुण्यश्लोक (पुण्यकीर्ति) आहेत. २ तिनी जगांला स्वर्ग, मृत्यु, पाताळ. ३ तूंच यश मिळविसील. ४ कागाळ्या. ५ ब्रह्मदेव. ६ स्व—पणासी राजेपणास. ७ आपण केलेल्या पणास. ८ पुष्कर ह्मणतो मी जर हरलो तर माझा देह हजर आहे दुसरें मजजवळ कांहीं नाहीं. परंतु राजा तूं पण हरलास तर त्वां मात्र सर्वस्व दिलें पाहिजे. * चौसर.



अंकियला ॥ जरि तूं होसिल या राजी ॥ २ ॥ वदे नळ याहुनि काय बरें ॥ असे मनरंजन बा दुसरें ॥ अणवितों खेळहि तूं बस रे ॥ पुरवूं अपअपुली अस रे ॥ सुचविली गोष्ट बरी आजी ॥ ३ ॥ अणउनी पाशे[९] बळें नळ तो ॥ पेटवी सभेंत आनळें[१०] तो ॥ ह्मणे कां मंत्रि उगा जळतो ॥ काय हा विचार या कळतो ॥ नसो गिरीवासी या काजीं ॥ ४ ॥

---

९ द्यूत खेळण्याचे फासे. १० उनल=अग्नि. येथें वृत्त सुखार्थ "आ" अक्षर योजिलें आहे.

पद (दमयंती खेद करिते) दीपचंद काफी.

पहा किं हो गती कशी दैवाची ॥ ध्रु० ॥ पुष्कर आला कोठुनि बाई ॥ मोहिली मती नळाची ॥ १ ॥ हरिला त्यानें कोशही सारा ॥ गेलि कळाचि राज्याची ॥ २ ॥ या वरि भूमी दिधली अवघी ॥ केलि धुळधाणी प्रजाची ॥ ३ ॥ हय गज यानादिक ते ही ॥ नेली हिरुनीया साची ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु रुष्टचि झाला ॥ तरि मग आशा नसे जिवनाची ॥ ५ ॥

पद (मुलें दमयंतीस ह्मणतात.)

माते कां गे ऐसी दंग ॥ कां तूं सोडिसि आमुचा संग ॥ आज आला काय प्रसंग ॥ सांगे झडकरि, आहे काय तरी, ॥ कळुं दे आह्मा अंतरंग ॥ २ ॥ नको लावूं पळ दिरंग ॥ केला कोणी मनो-भंग ॥ झालें काय कसें, वेळ कठीण दिसे, आहे राज्याचा कांहीं भंग ॥ २ ॥ पिता बैसला निःसंग ॥ त्यजिला प्रजांनीं हि संग ॥ कोठें धाडिसि आह्मा, काय केला गे प्रेमा, कां बरें काढुनि घेसी अंग ॥ ३ ॥

दिंडी.–(माता मुलांस ह्मणते.)

ह्मणे माता बाळांसि काय सांगूं ॥ तुह्मां घेउनि मी वनीं कशी वागूं ॥ आजि पतिनें विपरीत कर्म केलें ॥ द्यूत खेळुनियां राज्य घालवीलें ॥ १ ॥ ह्मणुनि पाठवितें तुह्मां माहेराशीं ॥ रहा तेथें सुखरूप आजिपाशीं ॥ बहु बोलुनियां अर्थ नसे एव्हां ॥ कृपा हरिची होईल भेट तेव्हां ॥ २ ॥

---

१ खजाना. २ वाहनादिक. वाचण्याची आस, इच्छा.

पद. (पुरवासी जन रडतात.) जोगी-मुजला वरिल.

रडती पुरवासी जन ते, पाहुनि भूपतिला ॥ धृ० ॥ कसा हा राजा पुण्यश्लोक ॥ प्रजाजन पाळी जैसे तोक[1] ॥ होते राजी सारे लोक ॥ दिधला शोक सकळांसी ॥ १ ॥ होता राज्याचा किती शौक ॥ दावितां रिपुला किंचित नोक[2] ॥ यावा करभारहि एक[3] ठोक ॥ पिडिंतिल लोक ते आतां ॥ २ ॥ वाटे माय जनां ही कीं ॥ उघडें पडतां ही झाकी ॥ करिल तें कर्म कशी काकी ॥ नच टाकिल दुर कशी ॥ ३ ॥ ह्मणती गिरिवासी प्रभु नाथ ॥ झालों आजि आह्मीं अनाथ ॥ घडला प्रपंच ना परमार्थ ॥ करि तूं सनाथ या भूपे ॥ ४ ॥

पद.–(दमयंती नळास ह्मणते.) जलद त्रिताल.

अतां मजला हो चालवेना ॥ धृ० ॥ पायीं रुतति खडे ॥ पुढें दिसति कडे ॥ कशी जाउं तिकडे ॥ पद जिकडे घालवेना ॥ १ ॥ झाडी दिसे घनदाट ॥ मज सुचेनाचि वाट ॥ कसे डोंगर अचाट ॥ पाट वाहती लंघवेना ॥ २ ॥ कसें करूं वाटे भय ॥ व्याघ्र फिरती निर्भय ॥ कोणीं देईना अभय ॥ भयभीता मी हालवेना ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धांव ॥ करुं कोणता उपाव ॥ आह्मां धरणि न दे ठांव ॥ द्युत भंगलें सांगवेना ॥ ४ ॥

पृथ्वीछंद–(दमयंती बोलते.)

कडे दिसती चौंकडे ह्मणुनि सांकडें[6] वाटतें ॥ सुचेल कशि जावया पलिकडे कडे वाट ते ॥ पहा फिरति माकडें कशि वनांती ॥ अशांत भलतीकडे विफळ घेतली धांव ती ॥ १ ॥

पद—[दमयंती शोक करिते.]

शोक करी दमयंती, पति विरहें विपिनामाजीं ॥ धृ० ॥
। मज त्यजिलें, कसें निष्ठुर जाहला पोटीं ॥ काय
ंगा पडली, मजपासुनियां अशि मोठी ॥ दापिलें

शारत, सुचना. ३ पुरा, सर्व. ४ पृथ्वी. ५ चहुंकडे. ६ कठीण.

मला कधीं नव्हतें, प्रभुवर्या आपुल्या होंठी[1] ॥ चाल ॥ मी धुंडुनि कोठें पाहूं ॥ एकटी वनीं कशि राहूं ॥ हें दुःख कसें हो साहूं ॥ पू० चाल ॥ पाहूनि झांकिले कैसे, तुह्मी नेत्र मनीं हें डाजी ॥ १॥ कां मोकलिलें[2] मज येथें, दिधलें कीं भाष्य[3] विवाहीं ॥ कसें विसरलांत तें आजी, नसें अंतर पडलें कांहीं ॥ काय म्यां मरावें ऐसें, अलें तुमच्या चित्ताला ही ॥ चाल ॥ कसें बरें तुह्मां हें दिसलें ॥ नाहीं मजला कां हो पुसलें ॥ कधिं होते सांगा रुसले ॥पू०चा०॥ घुसलेंचि मनीं हें कैसें, मज सांडुनि जाणें आजी ॥२ ॥ आक्रोश करुनि आशि कांता[4], कांता ते धुंडित फिरली ॥ सकुमार पाऊलें सतिचीं, कांतारीं[6] फिरतां चिरलीं ॥ नसे भेट पतिची झाली, मनिं आपुल्या बहुतचि विरली ॥ चाल॥ ते कष्ट काय सांगवती ॥ उपवास कसे वर्णवती ॥ करि फेरे शाळें भवतीं ॥ स्रवतीच लोचनीं बाष्पें[10] गिरिवासी नसल्या राजी ॥ ३ ॥

पद.–[दमयंती संकटीं पडल्या वेळीं म्हणते.]

माधवा ! कशि व्यसनीं पडलें ॥ तव पदीं चित्त किं रे जडलें ॥ धृ० ॥ अजगरें ग्रासिलें आज, विदित हें काय तुला सारें ॥ कशि करुणा त्यजिली हरी, पाव लवकरी करीसा[12] रे ॥ वाटे नभाचि आज कडकडलें ॥१॥ जाहले वनीं बहु कष्ट, लागला नष्ट कली मागें ॥ नसे दृष्टहि[13] जगतांमधीं, असा दुष्टधी[14], कधीं

---

१ ओठानें. २ सोडून दिलें. ३ वचन. [अर्थे च कामे नातिचरामि] ४ स्त्री. ५ पतिला. ६ अरण्य. ७ गळतात. ८ डाळ्यांतून. ९आसू. १०अनुकूल. ११प्रभु व्यंकटेश. देव होतां पाठिमोरा, नसतां विघ्नें येती घरा. तुकाराम. १२ गजेंद्राकरितां जसा धांवला होतास तसा. १३ पाहिला. १४ दुष्टबुद्धि.

मार्गें ॥ कोणतें पाप वडवडलें ॥ २ ॥ लाविला तुंवां किति वेळ, प्रार्थुं किति वेळ, सांग मजला ॥ दे प्रभुवर्या जिवदान, नको अनुमान कंठ सुकला ॥ नसे व्यर्थ कधीं बडबडलें ॥ ३ ॥ ह्मणे गिरिवासी प्रभुराय न आन्[1] उपाय तूज परता ॥ यासाठीं नमितें पाय करी दुर अपाय हा आतां आज फाराचि मी गडबडलें॥ ४ ॥

कटिबंध—(ऋषि आश्रमाचा.)

पुण्याश्रम पद बहुत चांगलें ॥ भंवतालीं घन[2] वृक्ष लागले फळभारानें असती वांकले ॥ आम्र फणस दाळिंब शोभले ॥ नारिकेळ पोफळी जांभळें ॥ मातुलिंग जंबिर आवळे ॥ द्राक्षाचे बहु गुच्छ लोंबले पहातां सतिचें चित्त लोभलें ॥ जाई जुई पुंनाग सेवती ॥ बकुळ मोगरा सुगंध देती ॥ गुलाब फुलले बहुत शोभती ॥ अन्य किती पुष्पांच्या जाती ॥ इंद्रोद्यानां[3] माजीं नसती ॥ मंजुरवें[4] कोकिला बोलती ॥ हंस पारवे वृक्षीं डोलती ॥ मधुर हर्षें कितिक नाचती ॥ भ्रमर सुमां[5] गुंजारव करिती ॥ पुष्पा वळितुनि पाट वाहती ॥ वत्सें धेनूलागें बाहति ॥ बघत बघत ती तसीच ठेली ॥ चिंता सर्व लयासचि गेली ॥ केली[6] मानुनि करित विहारा ॥ कुसुमें[7] तोडुनि गुंफित हारा ॥ जावें येथुनि जरि परभारा ॥ थारा न दिसे ह्मणवुनि वारा ॥ घेत, पावली आश्रमद्वारा ॥ शर्य[8] जोडुनि या नमन-द्वारा[9] ॥ पुसे, मुनीला वृत्तांत सारा ॥ ऐकवि त्यास आपुला दुबारा ॥ आशिर्वाद ते देउनि ह्मणती ॥ कशास करिशी दीन मेंणती[10] ॥ कालेंन कष्ट दिले हे सारे ॥ गेलें त्याचें येथुनि वारें ॥ दुष्ट जनाचे असेचि धारे ॥ किंचित काळ असे गे उरला[11] ॥ सरला जाण हरी अनुसरला ॥ पतिसह त्वरिताचि निजपदा पावसी ॥ ॥ कां व्यर्थ करुनियां चिंता माते तूं गहनीं[12] फिरसी ॥ १ ॥

१ अन्य, दुसरा. २ दाट. ३ इंद्र—उद्यान. इंद्राचा बाग. नंदन वन. ४ मंजूळ स्वरानें. ५ फुलांस. ६ फीदा. ७ फुलें. ८ हात. ९ नमनाच्या योगानें. १० प्रेमळ. ११ अनुकूल काळ. १२ वनांत.

पद्—(मावसी दमयंतीस बोलते.)

बाई, कां गे झालिस दंग ॥ तुजवरि आहे काय प्रसंग ॥ झालें मलिन सारें अंग ॥ नाहूं घालिन आतां ॥ देई सोडुनि चिंता ॥ करिना कधीं मनोभंग[1] ॥ १ ॥ आहे सुनंदेचा संग ॥ नको दुखवुं अंतरंग[2] ॥ सुखी राहा दोघी, नित्य स्नेह ओघी, चित्त न द्या होवुं दुर्भंग ॥ २ ॥ अक्षइ प्रिती जडो अभंग[3] ॥ देश शोधूं अंमवंग ॥ पति भेटल तुजला, काळ अल्पचि उरला, कृपा करिल रमारंग[4] ॥ ७ ॥

पद्—(भीमक आपल्या जागीं विलाप करितो.)

आतां कोठें मी पाहुं तुजला ॥ धृ० ॥ झालि कशि काय गती ॥ केवडा सार्वभौम पती ॥ गेली कशी ती संपत्ती ॥ मती- लाही भ्रंश घडला ॥ १ ॥ गेलें राज्य कसें सारें ॥ अंगि शूर- त्वाचें वारें ॥ कोणी केले काय मारे ॥ हरे कैसा क्षीण जाहला ॥ २ ॥ गेला नळ कोणीकडे ॥ केला शोध चहूं कडे ॥ कोठें शुद्धि न सांपडे ॥ घडे कैशी भेटी मजला ॥ ३ ॥ गिरिवासी आतां पाव ॥ मज सुचेना उपाव ॥ धुंडुं कोणता मी ठाव ॥ गांव न दिसे मज वहिला ॥ ४ ॥

पद्—राग जोगी. (मावशी बोलते).

बाई अजवरि कां नाहीं, कळविलें मजलागीं ॥ धृ० ॥ सु- देवें सांगितलें माहमान ॥ होशी भीमक कन्या जाण ॥ अतां तूं झालिस गे सज्ञान ॥ नाहीं भान मज कळलें ॥ १ ॥ कन्या भगि- नीचि नसे आन ॥ होतिस फार तंइ अज्ञान ॥ स्वयंवरा नाहीं आले जाण ॥ नसें मज भान या साठीं ॥ २ ॥ पाठविन माहे- रासि तुला ॥ भोगिले कष्ट असे न तुला[6] ॥ भेट गे जाउनियां तुं मुलीं ॥ शत्रु[7] तुला काय करी ॥ ३ ॥ ह्मणें गिरिवासी तूं प्रभुराय ॥ शोधी नळराजाचा ठाय ॥ होऊं देउं नको आपाय ॥ वंदितें पाय मीं आतां ॥ ४ ॥

---

१ मनाचा भंग. २ अंतःकरण. ३ भग न पावणारी. ४ भगवार. विष्णु रमा=लक्ष्मी इच्यावर अनुरक्त आहे तो. ५ पत्ता. ६ साम्य. ७ शत्रु=कली.

अंजनागीत (मावशी बोलते).

भीमा म्हणें गे सुंदरी ॥ होतिस अमुच्या तूं मंदिरीं ॥ वाटे मजला गिरिकंदरीं[2] ॥ पडलें मी आतां ॥ १ ॥ कैसें करमावें या घरीं ॥ चित्तीं भरली गे हुरहुरी ॥ केलें आह्मासी त्वां दूरी ॥ बहु वाटे चिंता ॥२॥ परि तूं जातीस माहेरा ॥ पुढें पाठविलें हेरा ॥ देउनि चुकलें मी आहेरा ॥ कशि राहउं आतां ॥ ३ ॥ असो भेटे आइ बापासी ॥ आहे चित्त गे तुजपासीं ॥ नको विसरुं तूं आ-ह्मांसी ॥ दे देणें इतुकें ॥ ४ ॥

पद—(नळ कर्कोटकास बोलतो).

कां रे झालासि तु दीन ॥ गमसि केवळ पराधीन[3] ॥ दिसतें शरीर तुझें पीनें ॥ कां रे उगा अससी, प्राण न रक्षिसी, कां तुज झाला एवढा शीण ॥ १ ॥ काय झाल्या शक्ती क्षीण ॥ सर्प सारे पदविहीन ॥ परी गति त्यांची भारी, जाती पळुनि दूरी, होसी कोण्या गुणें हीनें ॥ २ ॥ कां रे झा० ॥

पद—जोगी. (कर्कोटक नळास ह्मणतो).

दयाळा संकट हें भारी जाहलों दीनच कीं ॥ धृ० ॥ अला हा वणवा मज भवतीं ॥ लागली होती बहु चिंता ॥ रक्षिल कोण मला आतां ॥ परि त्राता तूं दिससी ॥ १ ॥ व्याकुळ झाले माझे प्राण ॥ राहिल्या शक्ती अवघ्या जाण ॥ हरानें केलें तुज निर्माण ॥ दे जीवदान मजलागीं ॥ २ ॥ तुजविण बाहू कवणासी । पावलें अकांतासी ॥ वाटे तूंचि दया करिशी ॥ नमन तुजसी मी करितों ॥ ३ ॥ आणिलें मनीं असें देवा ॥ करीन मी कांहीं तव सेवा ॥ चित्तिं दृढ निश्चय ठेवा ॥ नसे केवां जरि माझा ॥ ४ ॥ होसी मद् भला गाजी ॥ रक्षी या दीना आजी ॥ होइल गिरिवासी राणी ॥ विनंती माझी मान्य करी ॥ ५ ॥

---

१ ब्राह्मणी बाई. दमयंतीची मावशी. २ पर्वताचे गुहेंत. ३ पर—आधीन. परतंत्र. ४ स्थूल. ५ उणा. ६ संकटसमई. ७ योग्यता, दरजा, ८ शूर योद्धा.

D Ganpat N Naidoo

धनाक्षरी.–(बाहुक ऋतुपर्णास ह्मणतो.)

अलों मनीं धरुनि काम ॥ असे बाहुक मम नाम ॥ होसि राया गुणधाम[1] ॥ पुरवि काम एवढा ॥ १ ॥ असे सारथि मी जाण ॥ नसे अन्य मज समान ॥ असे अश्व-हृदय-ज्ञान ॥ कळे मन हयांचें ॥ २ ॥ तुझी करावया जोड ॥ अलों पुरवी हें कोड ॥ करिन पाक बहू गोड ॥ अशी होड बांधितों ॥ ३ ॥ जाणें कविता आणि गीत ॥ नित्य बसेन रंजवीत ॥ तुला कळलें इंगीत ॥ नको नीत[2] सांगणें ॥ ४ ॥ स्वगुण बोलूं नये जाण ॥ असे गोष्ट ही प्रमाण ॥ कळेल तुजला महिमान ॥ नको आन[3] बोलणें ॥५॥

अंजनीगीत.—(ऋतुपर्ण बाहुकास म्हणतो.)

बोले भूपाळ बाहुका ॥ वाटे भेटावें भीमका ॥ परि मज गमते ही बहु शंका ॥ आहे दूर जाणें ॥ १ ॥ विदर्भदेशांमाजीं दूरी ॥ आहे कुंडीननगरी ॥ जाणें होइल कैशापरी ॥ मज वाटे चिंता ॥ २ ॥ आहे भैमीचें स्वयंवर ॥ आले ह्मणती बहु नृपवर ॥ पाहूं जाऊनी सत्वर ॥ मनीं धारिली आशा ॥ ३ ॥ परि तें स्वयंवर आहे उद्यां ॥ मार्गी असती बहुताचि नद्या ॥ जाणें उल्लंघोनी सद्यां ॥ होईल कैसें ॥ ४ ॥ पडिलों विचारीं या मुळें ॥ हंसातिल राजांचीं मज कुळें ॥ इतरां सांगूं तरि मज खुळें ॥ लागलें ह्मणती ॥ ५ ॥ धरिला तुझाचि भरंवसा ॥ सांग विचार करूं कसा ॥ नेशिल उद्यां जरी दिवसां ॥ उपकार तूझा ॥ ६ ॥ नाहीं तुजपरता या गुणें ॥ पडो देऊं नको उणें ॥ आहे इतुकेंचि मागणें ॥ दे मजला आतां ॥ ७ ॥

पद–(बाहुक रायास बोलतो) गड्यांनो कृष्ण०

बाहुक ह्मणे ऐक राया ॥ नेइन उद्यांचि त्या ठायां ॥धृ०॥ लागली चिंता कां एवढी ॥ नसे या गोष्टीची प्रौढी[4], सिद्धता असो

---

१ गुणधाम. गुणांचें घर. २ नीति. ३ दुसरें. ४ वेड. ५ महत्व.

असो तुझी तेवढी ॥ येइन रात्र ह्मणसी जेवढी ॥ सांगणें नकोचि मज राया ॥ १ ॥ वाटेल तुला प्रशंसा[1] ही ॥ कथितों वचन मात्र साही ॥ असो तो मार्ग कठिणसा ही ॥ तुटेना मद्रथ सहसा ही ॥ नसो मज वेळ किं, हे जाया ॥ २ ॥ घडित रथ शत गावें नेतों ॥ सांग मज कोण असा ने तो ॥ जरी या कार्या मी भीतों ॥ तुला मग अभय कसा देतों ॥ जुंपू काय आतांचि हया[2] ॥ ३ ॥ प्रभू गिरिवासी दक्ष कसा ॥ उगवूं देइल कां दिवसा ॥ धरिसिल मनिं तूं हेतु जसा ॥ पुरविल निःसंशयचि तसा ॥ वाहसी चिंता कां वाया ॥ ४ ॥

पद—(भामक दमयंतीस बोलतो.) जलद धनाक्षरी.

कथितों तुला खरें जाण । कंठिं ठेवुनि होतों प्राण ॥ होतें लागलें तुझें ध्यान ॥ काय सांगु बाई, वाटे करूं काई, गेलें होतें सारें भान ॥ १ ॥ दिलें तुवां हें जीवदान ॥ नसे अन्यथा खरें मान ॥ बरें झालें आतां, करित होतो चिंता, झालें पाहुनि समाधान ॥ २ ॥

दिंडी—(नळाचे शोधास ब्राम्हण पाठविले त्या वेळेस.)

भिमें शोधाया विप्र धाडियेले ॥ तयांलागीं हें वचन शीकवीलें ॥ ह्मणें दमयंती त्वरित आतां जारे ॥ वदा वदतें मी वचन तसें सारें ॥ १ ॥ दिली सोडुनि निजल्याच ठायीं कांता[3] ॥ कसें गमलें हें विहित तिच्या कांता[4] ॥ कोण देइल प्रतिशब्द[5] याचि बोला ॥ तरी मजपाशीं त्वरित तसें बोला ॥ २ ॥

पद—(नळ विलाप करतो. व अन्योक्तिनें बोलतो.) उद्धवा शांतवन कर०

तो विलाप नळ मनिं करितां, अन्योक्ती दावी ऐसी॥धृ०॥ दचकला भूप मनिं अपुल्या, ऐकुनिया वचन द्विजांचें ॥ ह्मणे कोण असा हो पापी, किति निर्दय हृदय तयाचें ॥ दुष्टानें त्यजिली कैसी, नाहीं द्रवलें चित्त जयाचें ॥ चाल ॥ वनीं निजली असतां

१ स्तुति. २ घोड्यांस. ३ स्त्री. ४ पतिस. ५ उत्तर.

कांता ॥ नाहीं दया कशी त्या कांता ॥ पावेल कोण आकांता ॥ ॥ पू. चाल ॥ कांतारीं टाकुनि गेला, पाहिली नसे रित ऐसी ॥ १ ॥ कापिलें वस्त्र तुह्मि ह्मणतां, नाहिं जागृत केलें तिजला ॥ विपिनांत त्यागिलें मंदें, नसे अंतरिं कांहो खिजला ॥ वागतो जनामधिं कैसा, नाहिं दुःखें तिळ ही झिजला ॥ चाल ॥ मुखिं घेतां नाम तयाचें ॥ अघ यावें निश्चय वाचें ॥ तो अझुनि कसा हो वाचे ॥ पू. चाल ॥ साचेंच कथा मजपाशीं, अशि लज्जा त्यजिली कैशी ॥ २ ॥ निरविली व्याघ्र सिंहासी, कशि त्यानें अपुली दारा ॥ काय वदला नव्हता लग्नीं, चालवीन मी संसारा ॥ विसरला कसा मूढ न कळे, नाहीं दाखविला तिस थारा ॥ चा. ॥ अदयता किती हो त्याची ॥ जाहली सिमा वचनांची ॥ नसे प्रतिमा त्रिजगीं याची ॥ पू. चाल ॥ त्याचीच गोष्ट मनिं आणितां, कोपेलचि तो गिरिवासी ॥ ३ ॥

पद–(दमयंती बोलते.)

सुदेवा सांगे ऋतुपर्णासी ॥ धृ० ॥ नळ तुमँगे या भावें करितें, भैमी स्वयंवरासी ॥ १ ॥ आले राजे राजकुमर बहु, जाणें योग्य तुह्मांसी ॥ २ ॥ परि तो आहे उद्यांचि कीं हो, पाहा निज शक्ती बळासी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु भेटि करिल मग, आणुनि येथें नळासी ॥ ४ ॥

लावणी.—(नळ ह्मणतो.)

दमयंतीची वार्त्ता ऐकुनि हर्ष वाटला नळा ॥ स्वयंवरें खेद गमे आगळा ॥ धृ० ॥ अजवरिं नव्हती शुद्धी आणिली विप्रें बहुतां दिशीं ॥ जावें काय कसें भेटिसी ॥ प्राप्त किती यत्नानें झटले इंद्रादिक ही जिशीं ॥ केली सिमा तिनें मजविशीं ॥ [illegible] हकाळीं वदलों वचनें काय काय हो तिशीं ॥ न [illegible] दिननिशीं ॥ त्याचें फळ हें म्यांचि [illegible]

---

१ स्त्री. २ पति. ३ [illegible]

७ सांप्रत [illegible]

॥ १ ॥ यथार्थ वदती निजल्याठाईं काय त्यजावें मला ॥ मंदधी क्षणहि न हा थांबला ॥ प्रयत्न केला परंतु, तिजला शोध नसे लागला ॥ ह्मणुनियां स्वयंवरविधि योजिला ॥ यांत तिचा अपराध काय हो खेद मनीं वागला ॥ खरा हा निर्दय तिस भासला ॥ धिग धिग माझें जिणें सतीचा नाहीं पाळिला लळा ॥ २ ॥ मी जरि गेलों कुंडिन नगरा, अपमानाचि अखिला ॥ परि मज कोण ह्मणे वळखिला ॥ चमत्कार तरि पाहुं जाऊनि कोण पर्णितो तिला ॥ वांछित होते सुरनर जिला ॥ जन्म जाहला वृथा सतिचा नाहीं काम पुरविला ॥ हरीनें प्रसंग आज दाविला ॥ गिरिवासी प्रभु आतां कुणाच्या तीस बांधितो गळा ॥ ३ ॥

लावणी—(दमयंती बोलते.)

दमयंती ह्मणें तुह्मीं ऐकिलें वृत्त असावें अर्धीं ॥ त्यजिली कांता विपिना मधीं ॥ धृ० ॥ यांत नसे विपरीत जाहलें युक्तचि मज भासतें ॥ उगें कां नळासि जग हांसतें ॥ स्त्रीच्या संगें जरी तयाला सौख्य वनीं आसतें ॥ चिरिता कां हो तिचें वांस तें ॥ नसतें तरि मग कां ते योगी जन त्रासते ॥ करिते विजनीं कां वास ते ॥ कामिनि संगें शर्म पावले कोण असे ते कधीं ॥ १ ॥ कांता त्यजिली वनीं ह्मणुनियां शब्द नळा लाविती ॥ स्त्रियेचे गुण दोष न दाविती ॥ केरसुनीचा सदनीं अणितां पायगुण भाविती ॥ चिन्हें हिचीं न कां पाहावि तीं ॥ रूप चांगलें ह्मणुनि सुरनरीं मुखीं मात्र गावि ती ॥ कशि संपत्ति उगी जावि ती ॥ विवाह काळीं घटित तियेचें नाहीं पाहिलें अधीं ॥ २ ॥ इतकें मात्र ह्मणावें असो कशी ती सती ॥ रक्षणें योग्य स्त्रीच्या पतिस ती ॥ पदरीं पडल्या पवित्र ह्मणणें रीत जगीं दीसती ॥ नळें ती रक्षावी आसती ॥ परंतु दिधले कष्ट बहुतसे पतिस कसे सोसती ॥ त्यागणें युक्तचि मग त्यास ती ॥ गिरिवासी ह्मणें भाग्य तुझें हें वधिलें नाहीं तधीं ॥ ३ ॥

---

१ मंद आहे बुद्धि ज्याची असा. २ वस्त्र. ३ अरण्यांत. ४ सुख. ५ पाहातात. ६ सुर=देव, नर=मनुष्य.

भाग चवथा.

D Ganpat N Naidu

स्फुट पदें.

पद १ ईशस्तवन नरहरी.

नरहरिराया ॥ दे स्फूर्ती निजगुण गाया । ध्रु० ॥ शिणले वेद वर्णितां चारी ॥ पडला शेषहि त्याचि विचारी ॥ तेथें मन्मति काय बिचारी ॥ गुणांसि गणाया ॥ १ ॥ ऐकिला बोल असा व्यासाचा ॥ देसी मूकासहि तूं वाचा ॥ धरिला निश्चय तो मनिं साचा ॥ (नमितों) पाया ॥ २ ॥ करिशिल तूंचि दया जरि कांहीं ॥ तरि मग कांहिंच अघटित नाहीं ॥ शिकले ध्रुव प्रल्हाद न पाहीं ॥ कृपेची छाया ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी तूंचि दयाळा ॥ सहसा देउं नको मज टाळा ॥ लावीं निज भजनाचा चाळा ॥ यश वर्णाया ॥ ४ ॥

पद २ ईशस्तवन शंकर.

गिरिजापति शंभो त्रिपुरारी ॥ भवदुरितें नीवारी ॥ ध्रु० ॥ त्रिशूलडमरूधर मदनारी गजचर्मांबरधारी ॥ गरलदाहशमना शिरिं धरिसी उडुपति[1] गंगावारी ॥ १ ॥ भुजंगांचीं भूषणें शरीरीं लेपन भस्मचि भारी ॥ नरकपाल परशांकुश धरिसी खट्वांगादिक[2] सारीं ॥ २ ॥ कर्पुरगौरा भाललोचना झडकरि पतिता तारीं ॥ पंचवदन करुणाकर शंकर स्मशानभूम्यधिकारी ॥ ३ ॥ प्रदोषकाळीं नित्य देवता पूजिति बहु उपचारीं ॥ कैलासीं स्तव करुनिं नाचती गिरि-वासी पदधारी ॥ ४ ॥

पद ३ उपदेश.

हरिचें नाम मुखीं नित गा रे ॥ झडकरि सुजनपथीं लागा ध्रु० ॥ बांधुनि करितां काय अगारें[3] ॥ देतिल दारासुत

---

१. चंद्र. २ शिवाचें एक अयुध. ३ घरे.

गुंगारे ॥ गारे गुण हरिला उमगा रे ॥ यमहि कुणाचा काय सगा रे ॥ १ ॥ भीतां कां तरि व्यर्थ जगा रे ॥ सोडा मंदिल पेंच झगा रे ॥ गारेपरि[2] मानूनि नगां[1] रे ॥ भगवद्भजनें सतत जगा रे ॥२॥ पहातां गगनीं तुह्मिच ढगां रे ॥ क्षणिकचि तैसी तनु उमगा रे ॥ गारेसम विधराल बघा रे ॥ यापरि गाजति निगम[3] नगारे ॥ ३ ॥ शीतल मानुं नका भुजंगा रे ॥ डंखितसे तो काळ जगा रे ॥ गारेंतचि लोटिल्या भुगा रे ॥ होइल, संशय काय उगा रे ॥४॥ गिरिवासी प्रभुला बिलगा रे ॥ होउनियां नत चरणें तगा रे ॥ गा रे यश अनुदिनिं गुंगा रे ॥ देइल कां मग तोहि दगा रे ॥५॥

पद ४ उपदेश.

राम दयाघन कां हो भजाना ॥ गेलें आयु मनीं उमजाना ॥ धृ० ॥ दाराधनाचा लोभ मुलांचा ॥ कां विषयाचा संग त्यजाना ॥ १ ॥ लक्ष चौऱ्यांशीं सांडुनि येथें ॥ देह नराचा प्राप्त न जाणा ॥ २ ॥ ब्रह्मसनातन मूर्ति प्रभूची ॥ नित्य निरंतर त्यासि पुजाना ॥ ३ ॥ लौकिक लज्जा टाकुनि दूरी ॥ भक्तिरसामधिं कां हो भिजाना ॥ ४ ॥ वासि गिरीचा करिल कृपा मग ॥ मुक्तिसुखासह स्वस्थ निजाना ॥ ५ ॥

पद ५ उपदेश.

हरि तुझी जेउनि सेवा गोड ॥ धृ० ॥ क्षुद्रिकळानें काय करावी तव चरणाची जोड ॥ १ ॥ अन्नमय प्रभु कोश असे हा न सुटे याची खोड ॥ २ ॥ या उदराची करितां चिंता जाहले जन बहु रोड ॥ ३ ॥ अभ्यासेंही साध्य दिसेना ह्मणतें मन हें सोड ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु काढिं अतां तूं कांहीं याची तोड ॥ ५ ॥

पद ६ (राधेचा धांवा. कथा कृष्ण च०

यदुकुलभूषण वारिजलोचन कां रे न येसी अजूनि हरी ॥ विरहानळें तनु तापतसे[5] करिं शांत दयाघन वर्षं[4] वरी ॥ धृ० ॥

---

१ अलंकार. २ वितळाल. ३ वेदरूप नगारे. ४ खड्यांत, खांचेंत. ५ शरीर.

P Ganpat N Naidoo.

माळ गळ्यांतिल व्याळ गमे गमे शीतल चंदन तापद हा ॥ मंद अमंद सुगंधित ये सुमनानिल देताचि ताप महा ॥ सुखकर प्रिय-कर ह्मणति सुधाकर तोहि करी शरिरासि दाहा ॥ जाचितसे मक रध्वज तूं गरुडध्वज ध्वंसन शीघ्र करीं ॥ १ ॥ आंतरभाव निरंतर जाणसि कां मग अंतर आजिच रे ॥ मंचक सिद्ध असे मी अवं-चक पंचप्राण पदीं विचरे ॥ भाव असा तरि धांव न घेसि तूं हाहि स्वभाव नवीनच रे ॥ प्रार्थितसें तुजला यदुराज पदांबुज दाखुनि धन्य करीं ॥ २ ॥ काय करूं घडि जाय युगासम पाय तुझे मनिं आठवितें ॥ दिनरजनीं मज नीज न ये निजदुःख मनां-तचि सांठवितें ॥ तुजविण कोणि नसे मजला मन दूतचि मी आजि पाठवितें ॥ अंकज दे सुख पंकजलोचन संकटमोचन तूर्ण करीं ॥ ३ ॥ यापरि आळविता व्रजपाळ ये धांवुनि आळ तिची पुरवी ॥ सुखशयनीं हरिचें मुख पाहुनि दुःख समूळ मनीं नुरवी ॥ वांछित दे भजकास हरी जनमानस प्रेमरसीं मुरवी ॥ गिरिवासी प्रभु दे मति सुंदर किंकर चिंतन हेंचि करी ॥ ४ ॥

पद ७ उपदेश.

कशी मग राम करील दया ॥ धृ० ॥ जन्मापासुनि पाप आचरलों धरिलें नाहिं भया ॥ १ ॥ विषयसुखांतचि लंपट झालों नेलें वय विलया ॥ २ ॥ द्रव्यासाठीं भूपति यजिले जोडुनि नित्य श्रेया ॥ गिरिवासी प्रभु राम दयाघन स्मरलें नाहिं तया ॥ ४ ॥

पद ८ ईशस्तवन राम.

रामा मज दाखावें तूं निजपाय ॥ धृ० ॥ भवदवतापें ताप-तसें बहु न सुचे आन उपाय ॥ १ ॥ प्रणतजनावन ह्मणति तुला जगिं सुजनांचे समुदाय ॥ २ ॥ निज बिरुदातें रक्षिसि जरि तुं होइल तरणोपाय ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु तूंचि दयाघन चातक तकाय ॥ ४ ॥

१ कर. ३ संसाराग्नीच्या तापानें. ४ शरणागतांचें रक्षण करणारा.

पद ९ ईशस्तवन हरी.

सख्याहरी शेवट गोड करी ॥ धृ० ॥ भवजल भारी नाहिंच नौका बुडतों हातें धरीं ॥ १ ॥ धनसुतदारा आप्त सहोदर पडलों यांचे भरीं ॥ २ ॥ पतित मी पापी शरण आलों तुज दे गति मजसि बरी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु होसि कृपाघन स्मरलों नाहिं तरी ॥ ४ ॥

पद १० उपदेश.

धरि मना साधुजनांचा संग ॥ धृ० ॥ सुतदारादिक वंचक सारे काढीं यांतुनि अंग ॥ १ ॥ विषयसुखाची धरिसि स्पृहा तरि होय कसा भवभंग ॥ २ ॥ भजन पुजन करिं चिंतन हरिचें दाविल तो निजरंग ॥ ३ ॥ गिरिवासीं प्रभु आत्मा जलसा जग भासेल तरंग ॥ ४ ॥

[1]लावणी ११ उपदेश.

सोय धरुनि, जनिं विजनिं वसा परि, भवनदि पार तरा ॥ हरिगुणकीर्तनश्रवणमनन—सत्संगति तुह्मी नाव करा ॥धृ०॥ अघसलिलें परिपूर्ण दाटली, चलन-वलन मिटलें ॥ विपयवासना उसळति लाटा विवेकतट फुटले ॥ मीन अहंकृतिचे जलिं शिरुनी धष्ट पुष्ट थाटले ॥ मोह लव्हाळे संसृतिजीवानिं पोसुनियां उठले ॥ चाल ॥ किति आशामगरी फिरती सैराट ॥ कितिकांसि बुडविति दाउनिं अड्बाट ॥ कितिएक सुदुनियां करिती बोभाट ॥ यत्न सुचेना मार्ग फुटेना जाहलें मन वारा ॥ मोघें आवर्तामाजि फसे तो न पवे पैल तिरा ॥ १ ॥ कामिक होउनि साधनलोभें भवडोहीं बुडती ॥ कर्म घडेना सांग, पडेना पदरीं मग रडती ॥ योग याग किति भाग अर्पिती आग्रहजाळिं दडती ॥ आत्मसाधनाविण सुज्ञांनी ह्मणुनि उगे उडती ॥ चाल ॥ परि देव राहिला दूर तया न कळे ॥ जरि भावरहित तरि देव कसा आकळे ॥ या

1 हें पद फार सुंदर असून यांतलि उपमा फार पूर्ण आहे. २ संसाररूपी जलांत. ३ वाऱ्यासारखें. ४ अनंत.

P Ganpat N Naidoo.

क्षुद्रसाधनें केंवि भवासि टळे ॥ कलियुगिं हरिचें नाम, दिसेना यावांचुनि थारा ॥ तरले किति तरतिल यावरि, व्रतनेमा विसरा ॥ २ ॥ गुरुपद नौका करुनि भवनदीमाजिं किती तरले ॥ भक्तिरसामधिं चित्तशुद्धीच्या योगें मन मुरलें ॥ वस्तुविचारें[1] देहिं विरक्ती होतां मन विरलें ॥ आत्मा ईश्वर समान सर्वांठायीं असें स्फुरलें ॥ चाल ॥ सर्वगतीं[2] समरूप चित्त पुरलें ॥ राहिला बोल कर्तव्य सर्व हरलें ॥ नासला भास परिपूर्ण भरलें ॥ गिरिवासी गुरुनाथपदीं अद्वैतभाव सारा ॥ जलभिन्ना त्या नसोनि दिसती जेवीं जलिं गारा ॥ ३ ॥

पद १२ उपदेश.

भ्रमरसम हरिपदकमलीं बसा ॥ ध्रु० ॥ नरतनुचा या लाभ सुदुर्मिळ प्राप्त बहू दिवसां ॥ १ ॥ गृहसुतधनकामिनिच्या योगें शेवट होय कसा ॥ २ ॥ सत्संगाची नाव करुनियां भवजल हें निरसा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु पावतसे बहु भजकाऱ्या नवसा ४

पद १३ उपदेश.

प्राण्या राम भजावा रे ॥ अवघा लोभ त्यजावा रे ॥ ध्रु०॥ सुतदारादिक मायिक सारे ॥ सारे क्षणिकचि मोहपसारे ॥ अनुदिनिं करितां माझें माझें तरसिल हा भवसिंधु कसा रे ॥ १ ॥ वय घालविसी व्यर्थचि कां रे ॥ कां रे न करिसी निजसुटका रे ॥ पळ पळ पळ आयु सरल्यावरि मग प्राप्त न ही घटका रे ॥ २ ॥ क्षणिक सुखाची काय कथा रे ॥ लागे झडकरिं सुजनपथा रे ॥ थारे मन हरिचरणीं बा रे चुकती जन्ममरणचळथा[3] रे ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु करिल कृपा रे ॥ पावसि तूंही निजस्वरुपा रे ॥ पारे ब्रह्मसुखाची खुण मग नाठविसी तूं दिवसक्षपा[4] रे ॥ ४ ॥

---

१ नित्य वस्तूचें ज्ञान. २ सर्वव्यापी–सर्वभूतांतर्गत–असा जो परमात्मा त्याचे ठायीं. ३ राबी. ४ रात्र.

पद १४ उपदेश.

मनुजा नाम हरीचें गोड ॥ धृ० ॥ न कळत ये जरि नाम मुखासी उपडी किल्मिषमोड ॥ १ ॥ हरिनामें प्रतिमेस हरीपण; संशय मनिंचा सोड ॥ २ ॥ जन्म जराभय मरण निवारुनि पुरविल वांछित कोड ॥ ३ ॥ मी देही हा भास तुपावा सकल उपाधी तोड ॥ ४ ॥ विश्वासें भज भक्तिरसानें देव दयाघन जोड ॥ ५ ॥ गिरिवासी प्रभु कां न करी मग उद्धरणाची होड ॥ ६ ॥

पद १५ उपदेश.

हरिचे पद वंदा ॥ पद वंदा ॥ सांडुनि सकलहि धंदा ॥ धृ० ॥ जन्मा येउनि तिंदा ॥ करणें काय जनाची निंदा ॥१॥ धनसुतदाराबंदा ॥ पडलां काय तुह्मी या छंदा ॥ २ ॥ अठवुनि परमानंदा ॥ उपडा कुवासनेच्या कंदा ॥ ३ ॥ गिरिवासी यम खंदा ॥ करितो पापिजनाचा चेंदा ॥ ४ ॥

लावणी १६ (गोपींचीं गाऱ्हाणीं) कथा कृष्णा०

या कृष्णाच्या संगतिनेंग बाई ठकलों साऱ्याजणी ॥ निवेदुं काय तुला साजणी ॥ धृ० ॥ अशा गुणाचा हा जरि कळता प्रथमचि सरतों दुरी ॥ वाहिल दुःख कोण गे शिरीं ॥ अति ठगडा बाइ सुत नंदाचा नकळे याची परी ॥ ह्मणुनियां भुललों आह्मि लौकरी ॥ बाळपणींच्या लीला हरिच्या सांगूं मी किति तरी ॥ शिरला मोहाचि अभ्यंतरीं ॥ भ्याला पाहुनि कृष्ण एकदां जल भरले रांझणीं ॥ १ ॥ यशोदेसि आह्मि वदलों याचीं गाऱ्हाणीं जसजसीं ॥ नविच एक गोष्ट करी भलतिसी ॥ मोहक वचनें हरिचीं श्रवणीं ऐकुनियां मग कसीं ॥ त्यजावीं अमृताहुनि गोडसीं ॥ यासाठीं भ्रम पडला जाहली तदाधीनता असी ॥ नसेग बाई

---

१ तीनवेळ=अनेकवेळ.

ठाउक याची द्सी ॥ नित्य राहिलों पाशीं हरिच्या सोसुनियां गांजणी ॥ २ ॥ त्यानें आह्मां सुख दाखविलें रासमंडळीं अधीं ॥ क्रीडला सकल गोपिकांमधीं ॥ देहधर्म या अबलांचा जरि गर्व दाटला तधीं ॥ ह्मणुनि काय सोडावी आत्मधी ॥ अदयपणानें गुप्त जाइला नित जो प्याला दधी ॥ जणुं ग बाइ वळखचि नव्हती कधीं ॥ त्यावरि हरिनें केली होती अमृताची पाजणी ॥ ३ ॥ अक्रुर मेला घेउनि गेला निमित्य झालें जरी ॥ हरीच्या मनींच व्हावें दुरी ॥ विश्वासानें बसलों त्याचें फळ दिधलें यापरी ॥ ह्मणावें काय कुणाला तरी ॥ प्राक्तन आपुलें उलटें हरिला कुब्जा दासी खरी ॥ आवडली तसींच मथुरापुरी ॥ गिरिवासीच्या नामें करितों सुकृताची मोजणी ॥ ४ ॥

पद १७ ईशस्तवन–हरी.

हरि मज देई आतां पदिं थार ॥ धृ० ॥ ताप त्रिविध हे मी किति सोसुं जड वाटे संसार ॥ १ ॥ भजन पुजन हें कांहिं न घडलें विषयस्पृहा मनिं फार ॥ २ ॥ आप्तसहोदर जरठपणीं या मानिति बहु जोजार ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु होसि दयाघन करिं यांतुनि मज पार ॥ ४ ॥

पद १८ कथा कृष्ण०

हरीला कशि तरि मी आवरूं ॥ खोडी करितो राहिचना घरिं किति तरि मागें फिरूं ॥ १ ॥ नवनीताची करितो चोरी कुठवर रागें भरूं ॥ २ ॥ गोपमुलींला अडवितो वाटे, कसें बाइ हुड लेंकरूं ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु दे गुण यासी सांग कसें काय करूं ॥ ४ ॥

---

१ रीत. २ आपली बुद्धि. ३ रासमंडळांत गुप्त झाल्यानंतर प्रकट झाल्यावर अमृतसुख दिलें असा याचा अर्थ आहे. ४ ओझें.



पद १९ उपदेश.

ध्या कथामृताचा घुटका हो ॥ काय भवाचा खटका हो
॥ धृ० ॥ तनुधनदारा क्षणिक पसारा प्रपंच अवघा लटका हो
॥ १ ॥ उपार्जनाचा हेतु धरुनियां देशोदेशिं न भटका हो ॥ २ ॥
लौकिक लज्जा सांडुनि सकळा नित्य हरीला हटका हो ॥ ३ ॥
गिरिवासी प्रभु तोचि करिल मग भवबंधातुनि सुटका हो ॥ ४ ॥

पद २० उपदेश.

कां नाम हरीचें गाना हो ॥ सुजनपथीं लागाना हो ॥धृ०॥ हरिल हरी हा ताप भवाचा विषयस्पृहा त्यागाना हो ॥ १ ॥ हरिप्रतिमेसी नामें हरपिण कां हें मनिं उमगाना हो ॥ २ ॥ हरि हरि ह्मणतां हरिमय होतो हरिस्मरणीं जागाना हो ॥ ३ ॥ हरि-मूर्तीचें ध्यान धरुनियां हरिचरणीं लागाना हो ॥ ४॥ हरि गिरि-वासी करिल कृपा मग अक्षय सुख भोगाना हो ॥ ५ ॥

पद २१ (द्रौपदीचा धांवा.) कथा पांडव०

ये सत्वर यदुनंदना दुष्टदंडना दयाधामा ॥ धृ० ॥ ओ-ढितो दुष्ट पदरास धरी न दरास मनीं कांहीं ॥ कुरुवृद्ध बैसले स्तब्ध निघेना शब्द मुखीं पाहीं ॥ पाहतें केव्हांची वाट पुरांविली पाठ दुर्जनांहीं ॥ विनवितें तुला मी हरी पाव लवकरी करीं घाई ॥ आज समय दिसेना हाय प्राण घाबरा पुरविं कामा ॥ १ ॥ पांडवीं हरविलें राज्य ह्मणुनि हें प्राज्य दुःख मजला ॥ जाहलें प्रभो अति दीन जळाविण मीन अशा गतिला ॥ पावलें; करूं तरि काय सुचे न उपायचि मन्मतिला ॥ नको वेळ करूं यावरि प्रार्थितें हरी करुनि नातिला ॥ करीं ब्रीद आपुलें साच निवारीं

---

१ भीतीस. २ मोठें.

जाच घनःशामा ॥ २ ॥ ऐकतां अशी विनवणी यदुप निजमनीं बहु द्रवला ॥ लोटिलें ताट तत्क्षणीं, क्षणहि भक्षणीं न तो रमला ॥ धांवला अती लगबगां नावरे खगाचिया गतिला ॥ खळसभें पातला हरी अभय वैखरी अशी वदला ॥ हा आलों पाहें द्रौपदी लागली पदीं पुरितकामा ॥ ३ ॥ ओढिलें वसन तत्क्षणीं त्यांत पैठणी असे हिरवी ॥ दिसे क्षीरोदक त्यांतुनी दिव्य कांचनी प्रभा मिरवी ॥ दे वसनें अशिं दुर्जना शेवटीं सुदर्शना फिरवी ॥ झांकिली तनू पितपटीं त्यावरी दिठी[1] कवण पुरवी ॥ प्रभु गिरिवासी महाराज राखिली लाज करुनि सीमा ॥ ४ ॥

पद २२ उपदेश.

वद वद वद मनुजा हरिनामसुरसमाला ॥ जनन मरण हरुनि करिल दूर अघतमाला ॥ धृ० ॥ करिसिल जरि चित्त अमल ॥ प्रभुचरणीं तेंचि रमल ॥ मग न कधीं विषयिं भ्रमल ॥ भिवविसी यमाला ॥ १ ॥ हरिभजनीं काल क्रमल ॥ दृश्य सकल क्षणिक गमल ॥ तरिच ऐक्य स्वरुपिं जमल ॥ सांडिसी भ्रमाला ॥ २ ॥ संचित–क्रियमाण–यमक[2] ॥ पाप पुण्य तेंहि शमल ॥ इंद्रियगण विषय वमल ॥ न गणिसी श्रमाला ॥ ३ ॥ गिरिवासी–पादकमल–॥ स्मरणीं रत स्पृहा दमल ॥ अन्य नको चित्त श्रमल ॥ साधिं या क्रमाला ॥ ४ ॥

लावणी २३—रासक्रीडेची. कथा कृष्णा०

करि निशा अयनसदृशा, गोपिंची आशा पुरवि रतिदानें ॥ तें अनुपम सुख वोपिलें जगद्रतिदानें ॥ धृ० ॥ श्रीरंग गोपिकोत्संग वांछि, निज रंग वेणुच्या ध्वानें[3] ॥ करि प्रगट, लगट याव-

1 दृष्टी. 2 जोडी. 3 ध्यान=शब्द. (शब्दे, निनाद, निनदध्वनि, ध्वान, रवः स्वनः ॥ अमरकोश.

यासिं तीव्र जेवानें ॥ तो राव भवाची वाव करी, दृढभाव ऐकतां कानें ॥ प्रभुलागिं शरण जाहल्या शुद्ध भावानें ॥ टाकिती मुलें त्या, किती सधन गृहपती, मुरलिच्या पानें ॥ अति विकळ सकळ मोहिल्या पुष्पचापानें ॥ चाल । राहिले देहाशा दुरि हो ॥ मग पती चरणा कोण चुरि हो ॥ दृढ भक्ति तयांची खरि हो ॥ पातल्या युवति रातल्या गोकुळांतल्या हरिसि, वरदानें ॥ त्या उद्धरिल्या कामिनी पतितकरदानें ॥ १ ॥ करि रास नदीतीरास, हरीशरिरा सभोंवत्या बाला ॥ जशि पुनवेच्या चंद्रासि उडुगणी माला ॥ रंगल्या, पाहुनी दंगल्या, वृत्ति भंगल्या विसरल्या तनुला ॥ परि अभिमानें गांठिल्या पुन्हां त्या अबला ॥ राधिका जि शरारीधिका गुणाबाधिका ह्मणुनियां तिजला ॥ हरि घेउनियां जाहला गुप्त तिशीं रिझला ॥ चाल ॥ ती गर्व धरी कामिनि हो ॥ सांडिलें तिलाही वनिं हो ॥ हरि विटला बहुधा मनिं हो ॥ पाहिजे भाव राहिजे शांत, लाहिजे भक्ति सुरसानें ॥ त्यावांचुनि न घडे प्राप्ति लक्ष वर्षानें ॥ २ ॥ पाहती उभ्या राहती पादसंहती उमटल्या ठायां ॥ बहु यत्न करिति कामिनी हरिसि गाठाया ॥ कष्टल्या कितिक रुष्टल्या हरिसिं, भ्रष्टल्या सुखा लाहुनियां ॥ त्या रडती वारंवार स्मरुनि हरिपायां ॥ धुंडुनी देह दंडुनी गर्व खंडुनी सकलही जाया ॥ शरणागत होउनि सिद्ध वपुसि निवटाया ॥ ॥ चाल ॥ करि रोष मनींचा दुरि हो ॥ धरि अनुकंपा त्यांवरि हो ॥ धिर देउनियां सांवरि हो ॥ धांवला त्वरित पावला मेघ सांवळा बहुत नवसानें ॥ मिरवावी कांती काय पुष्पजवानें ॥ ३ ॥ प्रति प्रति गोपिकाप्रती कृष्ण-आकृती धरूनियां रमला ॥ त्या सौख्यानंदें स्वल्पकाळसा गमला ॥ श्रीहरी काम संहरी गोपिकांवरी दयाघन वळला ॥ करि शांत, प्रभु चिद्रूप तयांसीं कळला ॥

---

१ वेगानें. २ मदनानें. ३ अभिमानानें गांठिलेली नाहीं अशी, गर्वरहित.

कामिनी हंसगामिनी जगत्स्वामिनीपरिस त्या हरिला ॥ अ-
प्रियकर, त्याच्या कोण दुजी मग सरिला ॥ चाल ॥ झालि प्रभात
मग त्यावरि हरे ॥ जाति आप अपुलाल्या घरिं हो ॥ पति चुं-
बिति नानापरि हो ॥ परि वोक नावडे तोक त्यजुनि जनलोक
सांडिलीं भानें ॥ गिरिवासि प्रभूचरणांसि शरण भावानें ॥ ४ ॥

पद २४ (रतरे रत सखा राघवता... या चा.) उपदेश.

भजरे भज मनुजा हरिच्या नामा ॥ कां भ्रमसि रिकामा ॥
जोड जोड ही खोड, सोड जरि गोड विषय तुज दिवसत्रियामा[1]
॥ धृ० ॥ बहुता जन्मींचीं पापें सरलीं ॥ बा नरतनु धरिली ॥
कारे भ्रमलासी मति कां हरली ॥ कशि दृष्टि न पुरली ॥ धाम
धरुनि करि काम निरंतर नाम मुखीं घे न धरुनि कामा ॥ १ ॥
गेलें वय पळ पळ पळासिल कोठें ॥ यम मारिल सोटे ॥ खोट्या
कर्मीं फळ दुर्घट मोठें ॥ कां कानीं बोटें ॥ धांव धांव धरिं भाव
हरिपदीं ठांव न देतिल काका मामा ॥ २ ॥ बारे ह्मणसिल तूं
निजसुत दारा ॥ तरि क्षणिक पसारा ॥ थारा स्वसुखाचा तोंवरि
थारा ॥ धरितिल ह्या धारा ॥ तोड तोड हे पाश तुला बिनतोड
बुडवितिल श्यामा[2] रामा[3] ॥ ३ ॥ नामें हरिच्या या बहुजन तरले ॥
भवसिंधु उतरले ॥ सरले देहत्रयापासुनि उरले ॥ निज स्वरुपीं
मुरले ॥ वासि गिरीचा नाशिल हा भव पावसि तूंही निज-सुख-
धामा ॥ ४ ॥

पद २५ उपदेश.

राघवनाम जपा । सतत तुह्मी राघवनाम जपा ॥ धृ० ॥
पळ पळ पळ आयु व्यर्थचि गेलें हरिगुणश्रवणिं त्वपा ॥ १ ॥ सुत

---

१ दिवस रात्र. २ सीतेसुखस्पर्शसर्वांगी ग्रीष्मे तु सुखशीतला । तप्तकांचनवर्णाभ सा स्त्री श्यामेति कथ्यते. ३ रूपवती स्त्री.

D Ganpat K Naidu

दानादिक परमार्थाचीं करितिल हानि जपा ॥ २ ॥ दूत यमाचे येतिल जेव्हां ह्मणतिल कोण लपा ॥ गिरिवासी प्रभु रामचि तारिल लटक्या अन्य गपा ॥ ४ ॥

पद २६ (गोपी यशोदेस कृष्णाचें गाऱ्हाणें सांगतात.) कथा कृष्ण च०

यशोदे कृष्ण तुझा ठगडा ॥ करितो नित्य व्रजीं झगडा ॥ धृ० ॥ करणी काय वदों याची ॥ भलतें भलतीला याची ॥ धरुनियां वाटचि तोयाची ॥ मागतो जकात द्या याची ॥ पडला किति याचा पगडा ॥ १ ॥ न मिळे गोरस ज्या सदनीं ॥ मारितो मुलांसि त्या वदनीं ॥ निघतें रुधिर ह्मणुनि रदनीं ॥ करिती सीमा ते रुदनीं ॥ येइल घामाहि गे दगडा ॥ २ ॥ एकट्या पाहुनियां मुलिला ॥ ओढुनी आणितो गल्लीला ॥ सांगे कंदुक उचलीला ॥ धरुनियां करि कंचुकी लीला ॥ गोपींचा मग होतो रगडा ॥ ३ ॥ अशा जरि गोष्टि परोपरिच्या ॥ कथाया कोण तुझ्या सरिच्या ॥ जातिल गोपी घरोघरिंच्या ॥ भेणें गिरिवासी हरिच्या ॥ कथिला अर्थ करुनि उत्रडा ॥ ४ ॥

लावणी २७ नारदाची. इतिहास कृ०

श्रीहरी द्वारकापुरीं नवल बहु करी नारदा ठकवी ॥ तें चरितामृत अनुपम्य, भवगदा हटवी ॥ धृ० ॥ सुरमुनी विचारी मनीं, कृष्णकामिनी बहुतशा असती ॥ जरि देइल एकचि करिन गृहामधिं वसती ॥ श्रीकांत बैसला शांत, बघुनि एकांत करितसे विनती ॥ द्या यांतुनि मजला एक सुलक्षण युवती ॥ कष्टलों, कधिन तुष्टलों, सुखा भ्रष्टलों नको ही वृत्ती ॥ गृहधर्मांचीं कौतुकें मला प्रिय गमती ॥ चाल ॥ नसे कठिण तुह्मां तिळभरी ॥ क्षमा

१ मागतो. २ संसाररूप रोग.

वेळ करितसा तरी ॥ द्या रुकार मज लौकरी ॥ सुकृता नसे न्यूनता सकल धन्यता बरावर पदवी ॥ हें चित्तापासुनि मन माझें मज वदवी ॥ १ ॥ श्रीरंग जाहला दंग ह्मणे निःसंग असुनि, हा चळला ॥ लय ब्रह्मानंदीं, क्षणिक सुखा कां वळला ॥ यासर्थी कोण असिं सुधी त्यजुनि सुखनिधी वारिल जगठाला ॥ जा ह्मणतां, येइल कोप न कां मग तिजला ॥ नाहिं असें ह्मणावें कसें स्त्रियांचा दिसे संघ भेंवताला ॥ बहु संकट गमतें काय करूं मीं याला ॥ चाल ॥ नारदें स्मरावें मनीं ॥ बहु निंद्य कर्म हें जनीं ॥ कां अकीर्ति करुं जाणुनी ॥ परि लोभ करितसे क्षोभ, उगवतो कोंभ सुमतिचा सुकवी ॥ तें काय अलिक[1] वर्णिती निरंतर सुकवी ॥ २ ॥ यदुराज ह्मणे जरि आज पाहिजे भाज तुह्मां गुणराशी ॥ तरि कथितों इतुके मात्र श्रम करायासी ॥ जा त्वरें सकल मंदिरें पहा एकसरें अणा लक्षासी ॥ ज्या सदनिं नसे मी तीच तूमची दासी ॥ निजक्षेम गणुनि, सप्रेम वरिल हा नेम येइल सदनासी ॥ त्या वांचुनि न दिसे यत्न दुजा मग यासी ॥ चाल ॥ त्या चिंतातुर सुंदरी ॥ जाति अपुलाल्या मंदिरीं ॥ हरि करिल कुणा आज दुरी ॥ हा घोर लागला थोर, कसा शिरजोर स्वामिच्या करवीं ॥ स्त्रीदान इच्छितो, रीत काय ही बरवी ॥ ३ ॥ मुनिवरें बहुतशीं घरें धुंडिलीं त्वरें परी सहसाही ॥ हरिवांचुनि दिसला ठाव रिता ज्या नाहीं ॥ करि स्नान कुठें जपध्यान कुठें व्रतदान नित्य नेमांही ॥ कुठें जेववितो ब्राह्मणां आदरमानांहीं ॥ सुतसुता खेळवी स्वतां चालवी हातां धरुनि सुपथाही ॥ कुठें आणवितो निजसुना स्वकिय दुहिताही ॥ चाल ॥ व्रतबंध मुलाचा करी ॥ दे विवाहमंडप घरीं ॥ कुठें गृहकृत्याच्या भरीं ॥ यापरी नारदा हरी वंचना करी चरित्रें दावी ॥ गिरिवासि प्रभूची कीर्ति सतत ही गावी ॥ ४ ॥

---

१ असत्य.

P Ganpat N Naidoo.

लावणी २८ अपदेश.

पंचभुतात्मक देह प्राणिया आणिलासी उसणा ॥ होय वायदा पूर्ण अर्पणें स्मशानभूमि तुझा ॥ धृ० ॥ आप आपिं भू तेज वायु आकाश आकाशीं ॥ मिळतां राहे सांग तदुपरि काय तुज पासी ॥ कर्मविपाकीं दंड तसे यमदंड करिल तुजसी ॥ सावध होई यास्तव जोंवरि पाशबद्ध नससी ॥ चाल ॥ देव वसे सन्निध पाहि उगला ॥ जें कर्म करिसि त्या साक्षि असे पहिला ॥ मग चित्रगुप्त ते घेति हातीं वहिला ॥ पू० चाल ॥ सूचक सर्वांठायिं असे परि अव्हेरुनि वचना ॥ पूर्व-शुभाशुभ कर्म प्रसंगें वर्तसि स्वैर-मना ॥ १ ॥ तूं ह्मणासिल जरि देव निकट तरि गोचर कां नाहीं ॥ देइल दर्शन नित्य तसा तूं अधिकारी होई ॥ निजल्या उठवी सुप्तें पुनः करि कोण असा देहीं ॥ चलन वलन दे स्फूर्ति निरंतर वागवितो पाही ॥ चाल ॥ दे स्वप्निं सूचना कर्म जसें पहिलें ॥ तें येत प्रत्यया तुवांचि अनुभविलें ॥ कां विस्मृति माजीं शयन तुझें घडलें ॥ पू० चाल ॥ अधिकारी जरि होसि अवस्था-त्रयिं तुज सुज्ञाना ॥ होय गती ती तूर्यावस्था ऐक्य मिळाणे जाणा ॥ २ ॥ यालागीं तुज कथितों होई शरण सद्गुरूसी ॥ सत्सहवासें दोष-खंडणीं साधी सन्मतिसी ॥ मग ती नुपजे दुष्ट वासना, शिक्षक गुरुसंदसी ॥ करुनि अवज्ञा कोण तरे या दुस्तर-भवनदिसी ॥ चाल ॥ मग सहजचि लाभे चित्त शुद्धिबापा ॥ त्या भक्तिबळें भवमार्ग होय सोपा ॥ अद्रोह तितिक्षा येतिल तव समिपा ॥ पू०

---

१ हें पद फारच अप्रतिम आहे. पंचदशी, योगवाशिष्ठ इत्यादि ग्रंथांतून ज आत्मज्ञान सांगितलें आहे तें या पदांत फार थोडक्यांत व सुलभ रीतीनें सांगितलें आहे. आत्मसाक्षात्कार झाल्यावांचून अशारीतीनें उपदेश करतां येणें शक्यच नाहीं. २ कर्मविपाक नांवच्या ग्रंथांत सांगतल्याप्रमाणें. ३ निद्रित. ४ जागृत, ५ प्र व सुषुप्त या तीन अवस्था. ५ तीन अवस्थेच्या पलीकडील अवस्था. ६ गुरु हेच एक उत्तम खड्ग असत,नो. ७ द्रोहरहित स्थिती. ८ क्षमा.

चाल ॥ सर्वांभूतीं समतों योगें पूर्णब्रह्मभुवना ॥ पावुनियां गिरिवासी प्रभुपदिं ठेवि एक भाना ॥ ३ ॥

२९ लावणी –उपदेश.

लक्ष चौऱ्यांशी फेर फिरुनिया शिणलासी भारी ॥ या नरदेहीं साधन करितां सरेल भववारी[1] ॥ ध्रु० ॥ जल बुद्बुदवत् देह अशाश्वत मानुनि हेंचि करी ॥ सुत-दारा-धन-गेह-दुराशा सांडुनि होइ दुरी ॥ याच उपाधीसाठिं वासना पुनरपि देहधरी ॥ सत्संगीं मन योजि निरंतर भगवद्भजन वरी ॥ चाल ॥ किति वेळ करावी यातायात असी ॥ बा कां रे नुमजसि यम दंडिल तुजसी ॥ कां कष्टसि दाटुनि भारवाह होसी ॥ पू० चाल ॥ उत्पत्तिस्थल, कोण अलों कोठूनि, असें विवरीं[2] ॥ व्यर्थ अहंकृतिमाजि गुंतल्या भ्रमसिल कलवरी ॥ १ ॥ काम क्रोध मद दंभ अहंकृति मत्सर हे साही ॥ निवडुनियां धरि शांति दया समबुद्धि सर्व ठायीं ॥ बंध मोक्षणा हेतु असे मन शोधुनियां पाही ॥ देहिं विरक्ती होतां होइल साध्य सर्व कांहीं ॥ चाल ॥ जरि भावें गुरुपदिं शरण होसि आधीं ॥ तरि सुटतिल सहजचि संसृतिच्या[3] आधी[4] ॥ मग होइल दर्शन तोचि योग साधी ॥ पू० चाल ॥ जनन मरण किति वार भोगिसी अपदा या वारी[5] ॥ अल्पायासीं लक्ष पुरविल्या तुटेल भव दोरी ॥ २ ॥ शोध मुळाचा करुनि पाहिल्या सुजाण तूं होसी ॥ येइल प्रत्यय सगुण रुपाला निर्गुण गुण पोशीं ॥ त्वं पद नाशें तत्पद प्राप्ती होतां सुख घेसी ॥ पुन-

---

१ संसार हेंच पाणी. २ विचार कर. ३ संसाराचीं. ४ दुःखें. ५ आवृत्ती. ६ निवारण कर. ७ पुनर्जन्म. अथवा वृत्तींचें पुनः उत्थान.

टीप—सगुण ध्यानानेंच निर्गुणप्राप्ती कशी होते व नंतर वृत्तीचें उत्थान नाहींसें झाल्यावर तत्त्वमसि या महावाक्याचा अनुभव निर्गुणप्राप्ती कसा होतें हें या पदांत फार थोडक्यांत व सुलभपणें सांगितलें. अशा रीतीनें सांगणें हें आत्मानुभवावांचून शक्य नाहीं.

रावृत्ती मावळल्या वरि " असि " पदीं राहसी ॥ चाल ॥ हे बंध-मोक्ष तूं अनुभविशिल सारे ॥ अनुपम्य तृप्तिचा लाभ घडे वारे ॥ अनिर्वाच्य सुखामधिं शब्द समुळ हारे ॥ पू० चाल ॥ गिरिवासी गुरुनाथ पदीं ठेवूनि वृत्ति सारी ॥ नित्य-तृप्तिच्या योगें भोगी अखंड सुख लहरी ॥ ३ ॥

३० लावणी—उपदेश.

नरदेहाची प्राप्ति सुदुर्मिळ अवचट तुज लाभली ॥ तरिं[2]च ही भवतरणाला भली ॥ धृ० ॥ [3]बा माळेचा मेरु तसा नर-देह हतां लागला ॥ अतां तरि हो सावध चांगला ॥ लक्ष चौऱ्यांशी मणि फेराया कष्ट जाहले तुला ॥ पाहवां नाहिंच कीं ज्यां तुला[4] ॥ आरंभ येथुनि शेवटही मग होतो त्याचा भला ॥ सदोदित हरि-भजनीं जागला ॥ नवं रंध्रेंहीं[5] मात्र रोधुनि करि दृढतर चांगलीं ॥ १ ॥ विषयोदक परिपूर्ण त्यांत ही घालुनि फुटकी तरी ॥ उतरशिल कसा भवांबुधि तरी ॥ तूं नावाडी खरा तथापी सावध नसल्यावरी ॥ बुडेलचि विशंक मग लौकरी ॥ काम क्रोध मद लोभ त्यजुनिया दूर वासना करी ॥ पावशिल अनयास त्या

---

१ हरपतो, नाहींसा होतो. २ नांव, नौका. ३ या कडव्यांत फार उत्तम तत्व मोठ्या रीतीनें सांगितलें आहे. जपाच्या माळेची उपमा फार समर्पक व समजण्याला सोपी आहे. माळेला मेरू ह्मणून मणि असतो व त्याचें उल्लंघन करूं नये असें शास्त्र आहे. मेरूपासून माळ फिरवावी व मेरूपर्यंत आले ह्मणजे पुनः उलट जाऊन मेरुपर्यंत जावें असा नियम आहे. कवीनें नरदेहाला मेरूची उपमा दिली आहे. पंचदर्शींत सांगितल्याप्रमाणें चैतन्य हें मायेमध्यें प्रतिबिंबित झालें ह्मणजे ईश्वर होतो व तेथून सार्वभौतिक सृष्टीला प्रारंभ होतो व शेवटीं नरदेह उत्पन्न होतो. नरदेह उत्पन्न झाला ह्मणजे ज्ञानप्राप्तीचे साधनांचा त्याला उपयोग करतां येतो व तो तसा उपयोग करू लागला ह्मणजे मग अखेरीस जन्ममरणाची माळा सुटून तो मुक्त होतो. त्या मार्गाला न लागतां व कवीनें सांगितल्याप्रमाणें 'नवरंध्र' ह्मणजे हीं ज्ञानकर्मेंद्रियें जर सोडिलीं नाहींत तर पुनः उलट माळ जपावी लागते ह्मणजे पुनः अधःपतन पावतो. ४ शक्यता, तुलना. ५ नेत्र, कर्णादि नवरंध्रें ह्मणजे यांच्याठिकाणीं असलेलीं इंद्रियें.

तिरीं ॥ हरि भक्तीचे[1] नवविध बोळे घालुनि मग हांकली ॥ २ ॥ विमळ[2] मनाचें शीड उभारुनि घालि जला भीतरीं ॥ हरीचें नाम समिर[3] हितकरी ॥ वेळ काय भव तरावया असि युक्ति साधिल्यावरी ॥ दिसेलचि मृगजळ भानूकरीं[4] ॥ अल्पायासें महल्लाभ हा टाकुनि देशिल जरी ॥ पुन्हा ही प्राप्त कशाची तरी ॥ भवभीतांनीं प्रथम पाहिजे सत्संगति जोडिली ॥ ३ ॥ धेनू पासुनि दुग्ध असे हें पुष्कळ ठावें जरी ॥ क्रियेविण तेंहि न ये निजकरीं ॥ जग-व्यापक हरि तसा असें हें ज्ञान जांहलें तरी ॥ पाहिजे उपासना दृढ बरी ॥ सर्वांभूतीं समता, तरि मग हरीच सर्वांतरीं ॥ स्वात्मता अनुभव घे त्यावरी ॥ गिरिवासी प्रभु दयाळ वरती करिल कृपा माउली ॥ ४ ॥

पद ३१. ईशस्तवन—परमेश.

हरि-हर-विधि देव सकल तूंचि जगपसारा ॥ मायामय दृश्यपणें करिसि खेळ सारा ॥ धृ० ॥ वासनादि-रूप कर्म ॥ करिति तेचि चुकति वर्म[6] ॥ प्राप्त तयां केंधि शर्म[7] ॥ कवळिती[8] असारा[9] ॥ १ ॥ करिति कर्म जसें जसें ॥ देसी त्यां फलहि तसें ॥ मूर्तित्रय याचि मिसें ॥ तूंचि अरुप सारा[10] ॥ २ ॥ नेणुनि तुजलागि हरी ॥ विवश कर्म फलावरी ॥ स्पृहा धरुनि घेति शिरीं ॥ जन्म-मरण-भारा ॥ ३ ॥ निर्निमित्तें[11] भजन धरी ॥ धरिसी त्या अभय करीं ॥ बिरुदातें सत्य करी ॥ दाखवि निज-थारा ॥ ४ ॥ गिरिवासी तूंचि हरी ॥ करिसी कां वेळ तरी ॥ भवजलांत होय तरी[12] ॥ उतरवि परपारा ॥ ५ ॥

---

१ श्रवण कीर्तनादि भक्तीचे नवप्रकार. २ शुद्ध, मल म्हणजे रज व तम यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष. ३ वारा. ४ सूर्यकिरणाच्या योगानें. ५ सत्संगतीचें महात्म्य या कडव्यांत सांगितलें आहे. ६ बीज, मुद्दा. ७ सुख. ८ चिकटून राहतात. ९ ज्यांत अर्थ नाहीं अशाला. १० सर्व. ११ निष्काम. १२ नाव, नौका.

पद ३२ उपदेश.

रमानाथ-पदीं भाव तुह्मी कां हो धराना ॥ धृ० ॥ हेमीं नगें[1] भिन्न नसे ॥ हरिस्वरुपीं जगहि तसें ॥ होयें[2] तसी सोय धरुनी ॥ अनुदिनिं हरि-स्मरण कराना ॥ १ ॥ चालक विश्वासि हरी ॥ निज सूत्रें खेळ करी ॥ भजन करुनि विजन[3] धरा ॥ सुजन पथा नित्य वराना ॥ २ ॥ सर्वांतर्यामिं वसे ॥ परि सहसा लिप्त नसे ॥ जाणुनि हरिलागि असे ॥ त्वरितचि भवसिंधु तराना ॥ ३ ॥ करिती जे कर्म जसें ॥ देतो हरि फलहि तसें ॥ सदाचरण वृत्ति धरुनि, जगतीवरि सतत फिराना ॥ ४ ॥ प्रभु गिरिवासीच हरी ॥ पावन पतितासि करी ॥ ध्यानिं धरुनि मूर्ति सगुण, पुजन करुनि हृदयिं धराना ॥ ५ ॥

पद ३३. उपदेश–आत्मानुभव.

मजला हें कळलें, हें कळलें ॥ ब्रह्म जगीं या भरलें ॥धृ०॥ प्रलयिं[4] सुषुप्तीं काळीं ॥ न उरे जीवदशा नीराळी ॥ १ ॥ तमोलीनता चित्तीं ॥ यास्तव नाहिंच आत्मप्रचीती ॥ २ ॥ तूर्या समाधि जेव्हां ॥ अनुभव पूर्ण असे मग तेव्हां ॥ ३ ॥ गिरिवासी-प्रभु-भक्ति ॥ करितां कळूनि सहजचि मुक्ति ॥ ४ ॥

---

१ दागीने व सोनें भिन्न नाहीं. २ होईल तसी सोय करून दररोज हरिस्मरण करावें. ३ एकांत सेवन करा. ४ प्रलयकाळीं, सुषुप्ती म्हणजे गाढ झोपेंत जीवाचा निराळेपणा नाहींसा होतो पण त्यावेळेस तमोगुणप्रधान असल्यामुळें जीव हा आत्म्याहून निराळा नाहीं असा अनुभव येत नाहीं. पण तूर्यावस्थेंत समाधिकाळीं तमोगुण नसल्यामुळें आत्मा व जीव यांचें ऐक्य परिपूर्ण अनुभवाला येतें, आणि याला सुलभ मार्ग कोणता, तर कवी चौथे कडव्यांत सांगतात गिरिवासी प्रभूची भक्ती केली म्हणजे सहजच मुक्ता ह्मणजे जीव व आत्मा यांचें ऐक्य अनुभवाला येतें. या पदावरून कवीला जीवात्मैक्यानुभव आलेला दिसतो.

पद ३४. उपदेश.

जसि कां न मानवा ॥ शरण, तरिच तरण भवीं ॥
र्थ वानवा[१] ॥ धृ० ॥ सगुण अगुण तोचि हरी ॥ लक्षु-
नन करी ॥ विषयांच्या पडुनि भरी ॥ जन्म घेसि कां
१ ॥ स्थिरचरांत तोचि हरी ॥ व्यापुनिया खेळ करी ॥
का न धरी ॥ तेंचि तेज भानवा[२] ॥ २ ॥ विधि-हरि-हर
ी ॥ सृष्टिस्थिति विलय करी ॥ उद्धरिला पशुहि करी[३] ॥
दानवा ॥ ३ ॥ गिरिवासी तोचि हरी ॥ चिंतुनिया
री ॥ होइल तुजलाहि तरी[४] ॥ प्रभु अनादि आनवा[५] ॥४॥

पद ३५. उपदेश.

बघा हरि भरला, हरि भरला ॥ त्याविण ठाव दिसेना
धृ० ॥ प्रल्हादें हट धरिला[६] ॥ नरहरि स्तंभांतचि अव-
१ ॥ विधिचा संशय हरला ॥ वत्सप वत्सरूप जंव
२ ॥ ज्याचा निश्चय पुरला ॥ त्याला स्थिरचर-व्यापी
॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु वरिला ॥ ज्यानें, तोचि भवांबुधि
४ ॥

पद (अभंग) ३६. प्रार्थना—ईशस्तवन.

हिला संसार देवासी ॥ नाहीं कारण तयासी ॥ धृ० ॥
आणखी दारा ॥ अवघा त्याचाचि पसारा ॥ १ ॥
दौलतही कांहीं ॥ हरिचें नाम पुरें मज पाही ॥ २ ॥
मी हरिचे वाचें ॥ देइ नित्य प्रेम भजनाचें ॥ ३ ॥
गिरिवासी राया ॥ वंदिन नित्य तुझ्या पायां ॥ ४ ॥

का २ सूर्यामध्यें. ३ हत्ती, गजेंद्र मोक्ष केला. ४ नाव. ५ पुरातन,
ह. ७ गोपाळकृष्ण.

D Ganpat N Mainkar

लावणी ३७—उपदेश.

देखत भुल ही कशी कळेना वय घालविलें वृथा ॥ अतां तरी अवलंबी सत्पथा ॥ धृ० ॥ काका गेला मामा मेला बाप अजाही तसा ॥ तथापि तुमजसि बारे कसा ॥ माय मावशी काकी मामी होती तुजला स्वसा ॥ पडावा भ्रम तरि कां मग असा ॥ इष्टमित्र किति अमित्र मेले रात्रिं तसें बहु दिसां ॥ मानिसी तूंचि कसा भरंवसा ॥ गात्रें झालीं शिथिल, कोणती काय राहिली तथा ॥ १ ॥ पुत्र कलत्रासाठि जोडिसी कनकं-नगा जोंवरि ॥ ह्मणतिल बसा पलंगावरी ॥ जर्जर झालया कोणि पुसेना काय कसें क्षणभरी ॥ पडावें काय अशांच्या भरी ॥ पाश यमाचे कंठीं सूदल्यां कोण सोडविल तरी ॥ हरीचें नाम भवांबुधिं तरी ॥ आजवरि नाहीं तुवां सेविली हरि-चरितामृतकथा ॥ २ ॥ क्षण-भंगुर ही काया विलया जाईल बा लवकरी ॥ करीरे साधन नि-जहित करी ॥ क्षणिक सुखाच्या स्पृहा धरुनियां जन्म घेसी कां तरी ॥ जिवाला होतील या कातरी ॥ "मी माझें" हें घातक तुजला कळवावें किती-तरि ॥ नको हा भार शिरीं उतरी ॥ गिरि-वासी-प्रभुलागिं न भजतां जाहली तुज भवव्यथा ॥ ३ ॥

पद ३८. उपदेश.

कालंगडा—बारी संकट हरी रामाजींचें.

वद रे वद मनुजा नाम भवांचें ॥ भय न धरि भवाचें ॥ क्षणभंगुर तनु जाइल विलया मिरविसि भूषण कां विभवांचे ॥ बारे, अभिमानें बुडसिल वाया ॥ दे सोडुनि बा, या ॥ काया काळाची इस अटकाया ॥ जगिं कोण असा या ॥ चाल ॥ "मी माझें"

---

१ अर्थ. सार, तत्व. २ सोनें, दागिने. ३ पलल्यावर. ४ नाव, नौका. ५ कातर, कापणाऱ्या कैच्यां. ६ संसाराचा रोग. ७ शंकराचें. ८ संसाराचें ९ वैभवाचें, संपत्तीचें.

: सोडुनि नाम सतत घे या शुभ वाचें ॥ १ ॥ कांरे भु-
या विषयाला ॥ मानी विष याला ॥ झाला बहुतचिरे
ाला ॥ यम घालिल घाला ॥ चाल ॥ हो सावध, धरि-
ागम, कथितों गुज हें स्वानुभवाचें ॥ २ ॥ गर्भीं बहु
ट तुलाही ॥ नाठवती कांहीं ॥ ठायीं मूत्राच्या वास स-
दुर्गंधच पाही ॥ चाल ॥ या नरदेहीं साधन केल्या हो-
न पुनर्भवाचें ॥[१] ॥ सांगूं, किति हित हें मी तुज आतां ॥
ममता ॥ श्रमतां संसारीं दुःखाचि पाहतां ॥ कां धरिसि
। चाल ॥ गिरिवासी प्रभु चरणीं लोळे ध्यान धरी त्या
चे ॥ ४ ॥

पद ३९. उपदेश.

सने, नाम हरीचें गाई गे ॥ धृ० ॥ लौकिक-वार्ता सांडुनि
हेंचि करी तूं बाई गे ॥ १ ॥ घडि घडि नाश वयाचा
कारित असे तुज घाई गे ॥ २ ॥ भव-जल भारी नाहिंच
रण प्रभूला जाई गे ॥ ३ ॥ प्रार्थितसें मी याचि निमित्तें
सुस्थिर राहीगे ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु भेटविसी जरि
ड़ा मिठाई गे ॥ ५ ॥

पद ४०. उपदेश.

कलियुगीं नाम हरीचें सार ॥ धृ० ॥ जपतप साधन कां-
घडे, मन चंचल अनिवार ॥ १ ॥ उदराची बहु चिंता
वसायी जन फार ॥ २ ॥ जातां येतां उठतां बसतां,
रंवार ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु करिल कृपा मग, देइल
धार ॥ ४ ॥

पुनर्जन्माचें. २ अजन्मा जो ईश्वर त्याचें. ३ हे जिव्हे. ४ लहान मुलाप्रमाणें
ड खाण्याची चटक लागली आहे म्हणून तिला लालूच दाखवून करा

पद ४१. उपदेश.

धरि मना हरिचरणीं विश्वास ॥ धृ० ॥ नरतनुचा या लाभ सुदुर्मिळ, विष मानी विषयास ॥ १ ॥ तरले बहु जन नामें हरिच्या, नलगे योगाभ्यास ॥ २ ॥ भजन पुजन करि ध्यान निरंतर, सोडि इतर हव्यास ॥ ३ ॥ गिरिवासी-प्रभु-देव दयाघन, देतो गति भजकांस[1] ॥ ४ ॥

P Ganpat N Naldas

पद ४२ उपदेश.

हरिचें नाम मुखीं गरजारे ॥ झडकरि विषय सुखा वर्[2]जारे ॥ धृ० ॥ गेला पहातां बाप अजारे ॥ पडली भ्रांति कसी तुमजारे ॥ जारे हरिला सतत भजारे ॥ सोडविना जगिं कोणि दुजा रे ॥ १ ॥ त्यागुनि दारा सुत अ[3]नुजारे ॥ सत्संगीं मन योजित जारे ॥ जारे हरिस अ[4]काम पुजारे ॥ चित्तीं आणुनि चारि-भुजारे ॥ २ ॥ उद्धरिलें पशुमाजि गजारे ॥ भ्रष्ट अजामिळ नाम द्विजारे ॥ जारे भक्तिरसांत भिजारे ॥ अन्य साधनें समुळ त्यजारे ॥ ३ ॥ करणें गोष्पद भवाब्धि ज्यारे ॥ कथिलें सारचि हें समजारे ॥ जारे प्रभु गिरिवासि यजारे ॥ भीतो फारचि रविसुतें ज्यारे ॥४॥

४३ उपदेश.

प्रीति धरी हरि पायीं मना ॥ धृ० ॥ गृहसुतधन कामिनिच्या योगें भीसी काय जना ॥ १ ॥ क्षणिक सुखाच्या धरिसि स्पृहा बहु सांडुनियां भजना ॥ २ ॥ हरि मूर्तीचें ध्यान धरित जा नित्य करी पुजना ॥ ३ ॥ भवभयहरणासाठीं निरंतर प्रार्थित जा सुजनां ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु करिल कृपा मग जाणें नच विजना ॥ ५ ॥

---

१ भजणारास. २ सोडा. ३ भाऊ. ४ निष्काम, स्वार्थरहित. ५ यजन करा ६ अरण्यांत, एकांतांत.

पद ४४. उपदेश.

होइ मना सावध यासाठीं ॥ ध्रु० ॥ नरतनुचा लाभचि दुर्मिळ, बहु दिवसा गांठी ॥ १ ॥ पळ पळ पळ आयु जाइल वाया काळ असे पाठी ॥ २ ॥ सुतदारादिक काय मिळविली भंवताली दाटी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम दयाघन आळवि परिपाठीं ॥ ४ ॥

पद ४५ उपदेश.

मनुजा प्रीति धरी हरिपायीं ॥ ध्रु०॥ पळ पळ पळ आयु जात असें हें अनुदिनि हरिगुण गाई ॥ १ ॥ तनु-धन गृह सुत दार सकळही राहिल ठायिंचे ठायीं ॥ २ ॥ क्षणिक सुखाच्या याचि वासना प्रति भविं पडती डाई ॥ ३ ॥ जनन मरण कितिवार भोगिसी सांडिसि कां न धिटाई ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभुलागिं करित जा उद्धरणाची घाई ॥ ५ ॥

पद ४६. उपदेश.

अब मुझे रामबिना नहिं काज ॥ ध्रु० ॥ जोरू लडके आप्त सहोदर मानत [1]जरसे आज ॥ १ ॥ इस [2]जर खातर उमर गमाई भूप किये [3]सरताज ॥ २ ॥ भजन पुजन नहिं ध्यान प्रभूको मारेगो जमराज ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम दयाघन राखे वोही लाज ४

पद ४७ उपदेश.

मना क्षणिक सुखालागिं कसा होसि बावरा ॥ ध्रु० ॥ सुजन संग नित्य वरी ॥ हरि चरणिं भाव धरी ॥ कथिलें बहुधाहि

१ खेळांत २ पैशामुळें. ३ डोक्यावर बसविलें.

तरी ॥ कां रे हावरा ॥ १ ॥ नरतनुचा लाभ किती ॥ कष्टें त्यां नाहिं मिती ॥ तरि धरिसी कां न भीति ॥ भज रमावरा ॥ २ ॥ शिकवूं तुज काय कसें ॥ क्षणभंगुर कां न दिसे ॥ गुणश्रवणीं वदसि असें ॥ " त्वरित आवरा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभुसि ' नमी ' ॥ ह्मणतां ह्मणतोसि न मी ॥ यम सदनीं नरक तमीं ॥ पचसी पामरा ॥ ४ ॥

पद ४८. उपदेश.

करि मना राम पदाची जोड ॥ धृ० ॥ "मी माझें" हें घातक पाहीं, सोडि अतां ही खोड ॥ १ ॥ क्षणिक सुखाची त्यागि वासना, जरि वाटे तुज गोड ॥ २ ॥ जन्मुनिया किति वार मरावें भवबंधन हें तोड ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम दयाघन भजनें पुरविल कोड ॥ ४ ॥

पद ४९. उपदेश.

हरी–भजन धरुनि सुजनपथीं घुसाना, रे ॥ काम क्रोध लोभ रिपू त्यजुनि असाना, रे ॥ धृ० ॥ वाल्हा कोळि वाल्मिक झाला ॥ उलट्या नामें प्रताप केला ॥ उक्त जपुनि नाम–माला ॥ भावें कसानारे ॥ १ ॥ अजामेळ पापी भला ॥ पुत्रस्नेहें झळंबला ॥ अंतकाळीं मुक्त केला ॥ हरिनें पुसानारे ॥ २ ॥ व्रजनारींचें सां-कडें ॥ निवारिलें हो रोकडें ॥ भक्तिबळें हरी पुढें ॥ तुह्मिही रुसानारे ॥ ३ ॥ पुत्र दारा धन गेहे ॥ शरिर तेंहि क्षणिक आहे ॥ ध्यास दूर करुनिया हे ॥ प्रचितिं घसाना रे ॥ ४ ॥ मग सुखा

---

१ प्रभुचें गुणवर्णन ऐकलेंस ह्मणजे हावऱ्याप्रारखा ' माझें संकट दूर करा ' ह्मणून ह्मणतोस, पण पुढच्या कडव्यांत म्हटल्या मार्गे, जोंपर्यंत गिरिवासी प्रभुला ' नमी ' (नमस्कार कर) असें ह्मटलें ह्मणजे ' न मी ' (मी नाहीं नमस्कार करणार) असें ह्मणतोस. तोंपर्यंत नरकांत पडावें लागेल.

काय उणें ॥ अपणीया आप जाणें ॥ अनुभवुनी याचि गुणें ॥ स्वरुपीं वसानारे ॥ ५ ॥ गिरिवासी तोचि हरी ॥ आटवील भव वारी ॥ गुरूपद सेवा शिरीं ॥ तरिच फसानारे ॥ ६ ॥

पद ५०. उपदेश.

अब मोहे रामचरनकी आस ॥ धृ० ॥ कांता बोले नाथ हमारो, जबलग पैसा पास ॥ १ ॥ कौन किसीका भाई बेटा, सबही माने त्रास ॥ २ ॥ जोहि मुझें कोइ राम दिखावे, पकडूं उसकी कास ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम जगतका, वाली मैं हूं दास ॥ ४ ॥

पद ५१. उपदेश.

हा रे, पंढरिनाथ पहारे ॥ या भीमेंत नहारे ॥ पुंडलिकासि बहारे ॥ पुलिनीं याचि रहारे ॥ द्रव्य बहुतसें गाठीं नलगे तुळसी अबिर वहारे ॥ १ ॥ कांरे, संसारीं भटकारे ॥ देहचि हा लटकारे ॥ यम देइल झटकारे ॥ उमजाना झट कांरे ॥ “ मी माझें हें घातक प्रभुविण कोण करिल सुटकारे ॥ २ ॥ जारे, विषय सुखा वरजारे ॥ करितां कां गमजारे ॥ हित अपुलें समजारे ॥ तारक नाहिं दुजारे ॥ संत समागम धरुनि विठूचें नाम मुखीं गरजारे ॥ ३ ॥ यारे होतो नाश वयारे ॥ कां धरितां निलयारे ॥ काशी हीच गयारे ॥ दर्शन होय जयारे ॥ गिरिवासी प्रभु विठ्ठल त्यावरि करितो पूर्ण दयारे ॥ ४ ॥

पद ५२. ईशस्तवन—राम.

अब मोहे राम भजनसे काम ॥ धृ० ॥ धन दौलत मुझें कछु नहि होना, कांता सुंदर धाम ॥ १ ॥ येहि अपेछा जनम

---

१ स्नान करा. २ वाळवंटांत. ३ घर.

P Ganpat H Haldar

लेत है, मुख नहि प्रभुको नाम ॥ २ ॥ धुंडत हुं मै विमल साधको, बतलावे घनःशाम ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु रामचरनपर, नमन करूं अटंजाम ॥ ४ ॥

पद् ५३. ईशस्तवन–हरि.

अतां मज भेटेल केविं हरी ॥ धृ० ॥ जन्मापासुनि हित नच केलें, कळलें होतें जरी ॥ १ ॥ विषयसुखात्मक भोग बासना, धारिली नित्य खरी ॥ २ ॥ हरि-भजनीं विश्वास न धरिला, सरलें आयु तरी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु करिल कृपा कशि, आहे सदय परी ॥ ४ ॥

पद ५४. उपदेश.

निशिदिनी हरिला भजा भजा हो ॥ जप तप साधन कांहिंच नलगे यांतचि हरिलाभ जा भजा हो ॥ धृ० ॥ पहातां नाहींच सुख संसारीं ॥ देहसंबंधीं, मायिक सारीं ॥ चित्तीं आठवा प्रभु कंसारी ॥ विषयसुखा द्या रजा रजा हो ॥ १ ॥ पुनरपि नरदेह प्राप्त कशाचा ॥ व्यर्थचि कांहो नाश अशाचा ॥ यम सदनीं बहु मार कशांचा ॥ मार्ग सुलभ जा भजा भजा हो ॥ २ ॥ सत्संगाची प्रीति असावी ॥ गोडी हरिच्या गुणीं वसावी ॥ शुद्ध मती हरिचरणीं ठसावी ॥ मूर्ती हरीची पुजा पुजा हो ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु धरिल करी तो ॥ निज भक्तावरि प्रेम करितो ॥ पहा उद्धरिला पशुहि करी तो ॥ भक्तिरसांत भिजा भिजा हो ॥ ४ ॥

पद ५५ ईशस्तवन–विठ्ठल.

विठ्ठल निज नयनीं पाहूं जाउनि पंढरिला ॥ धृ० ॥ रा-
ीं भक्त मिळोनि फार ॥ करिती एकचि जयजयकार ॥ वाहुनि

पुष्पांचे संभार ॥ जगदाधार तोषविती ॥ १ ॥ करिती भजनाचा बहु थाट ॥ गाती गुण प्रभुचे आचाट ॥ बहुतचि नामाचा बोभाट ॥ धरिती हाठ हरिपायीं ॥ २ ॥ भक्ताधिनता प्रभुची खरी ॥ पुनरपि आला पंढरपुरी ॥ दुरितें भजकांचीं संहारी ॥ दावी वरी निज लीला ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी विठ्ठल पाय ॥ वंदू दाविल तरणोपाय ॥ सहजाचि होतिल दूर अपाय ॥ पंढरिराय सदय बहु ॥ ४ ॥

पद ५६. उपदेश.

काफी—भोलानाथ दिगंबर या चालीवर.

मनारे कसि गति होइल स्मरसी न हरिच्या पदा ॥ धृ० ॥ क्षणभंगुर तनु जाइल विलया पुनरपि न मिळे कदा ॥ १ ॥ क्षणिक सुखाची धरिसी स्पृहा तरी भोगिसि भव आपदा ॥ २ ॥ संतसमागम करिसि न यावरी ताडिल यम शतदा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु राम भजाना नेइल तो सुपदा ॥ ४ ॥

पद ५७. उपदेश.

[भोलानाथ दिगंबर.]

अतां मज भेटेल राम कसा ॥ धृ० ॥ जन्मापासुनि त्यासि न स्मरलों पापी कोण असा ॥ १ ॥ विषय सुखाची आशा यास्तव झालों फार पिसा ॥ २ ॥ स्वार्थ नसुनि परमार्थ दवडिला नागवलों दिवसा ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु नाहिंच यजिला पावेल कां नवसा ॥ ४ ॥

पद ५८ ईशस्तवन—नरहरी.

त्राहि पाहि बा नरहरि राया ॥ मी नमितों पायां ॥ शांत शांत हो प्रांत गोड करि दांत तुझ्यासम कोण जगीं या ॥ धृ० ॥

कथिलें गुरुचें मज नाहीं रुचलें ॥ तव नामचि सुचलें ॥ कुचलें बहुतचि परिवपु नच खचलें ॥ मग विषही पचलें ॥ पाय तुझे मनिं, काय यमाची माय प्रसवली नाश कराया ॥ १ ॥ बा हीं वंदितसे पाय रमा ही ॥ धरि शांतिस कांहीं ॥ नाहीं विबुधामधिं शक्तिच पाही ॥ तव नयना पाहीं ॥ पाव पाव, दे ठाव निजपदीं भाव तुझी नकळे कवणा या ॥ २ ॥ ताता, गति दिधली पाहातां पाहातां ॥ जरि होति अहंता ॥ समता तुझि सत्यचि लक्ष्मीकांता ॥ तूं सत्पद दाता ॥ रोष कशास्तव दोष मुक्त रिपु झाला तोष जगीं सुजनाया ॥ ३ ॥ वासी, गिरिचा प्रभु शांतचि झाला ॥ सुख दे सकळाला ॥ बाळा पाहुनिया बहुतचि द्रवला ॥ सुरसंघहि लवला ॥ जयजयकारें विजय वर्णुनी सुरवर वर्षति सुमससुदाया ॥ ४ ॥

D Ganpat N Naidoo

पद ५९. ईशस्तवन—देवी.

धांव पाव दे ठाव निजपदीं भाव धरुनिया नत निर्धारी ॥ ध्रु० ॥ माया तूं त्रिजगाची आदिमाया ॥ नकळे महिमा या ॥ माया मति कैची तव गुण गाया ॥ न पुरे महिमा या ॥ खेळ करिसि बहु वेळ निवटिसि ब्रह्मांडें द्रुत सारीं ॥ १ ॥ झाला त्रिजगासहि तापद मोठा ॥ महिषासुर खोटा ॥ तोटा, विप्रांचा करि बहु मोठा ॥ बांधुनि करी धोटा ॥ प्राशी निशीदिनीं बहु रुधिरासी रासी कुणपाच्या भारी ॥२॥ स्तविलें, देवांनीं तुज त्यासाठीं ॥ जाहली बहु दाटी ॥ आटी असुरासी पाडुनि गाठी ॥ अंबे बहु हाटी ॥ क्रुद्ध होउनि अति शुद्ध यशास्तव रुद्ध करुनि वधिला देवारी ॥ ३ ॥ हर्षें सुमवर्षें तुज अमरांनीं ॥ तोषविलें रानीं ॥ कानीं सैन्याचा नाद भवानी ॥ जातां असुरांनीं ॥ त्यजती पडती किती अडखळती ॥ गिरिवासी प्रिय जय पुतनारी ॥ ४ ॥

पद ६०. इशस्तवन कृष्ण.

गोकुळवासी प्रभु कंसारी ॥ तारी बुडतों भवसंसारी ॥धृ०॥ संचित जें का जन्मांतरिचें ॥ प्राप्त भोगणें त्या त्या परिचें ॥ सुख नसतां अनुभवलीं भारी ॥ नित्य निरंतर दुःखें सारीं ॥ १ ॥ यातायातीं कष्ट भोगिलें ॥ जन्ममरण हें कवच जोडिलें ॥ अभेद्य वाटे मज पुतनारी ॥ या नरदेहीं लावी थारी ॥ २ ॥ गुण गावें हें पडलें कर्णीं ॥ परि दैवाची अघटित करणी ॥ विषयमदें मद भरला अंगीं ॥ मंगि कोण तुजवीण मुरारी ॥ ३ ॥ वय गेलें संपूर्ण श्रीपती ॥ पाश यमाचे जवळिच दिसती ॥ प्रणतजनावन वचन रक्षुनि ॥ लावि दिनासी भवपरपारी ॥ ४ ॥ गिरिवासी हा चरणीं लोळे ॥ पाहि कृपेचे उघडुनि डोळे ॥ जगिं उद्धरिलें बहु जन पापी ॥ त्यांत नसे मी तुजला भारी ॥ ५ ॥

पद ६१. ईशस्तवन राम.

रामा मज देशील भेट कधीं ॥ धृ० ॥ संसाराची करितां चिंता सरली कीं अवधी ॥ १ ॥ भजन पूजन मज कांहीं न घडलें दुस्तर भवजलधी ॥ २ ॥ संतसमागम कोठुनियां मग मुळचा हा खळधी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु शरण अतां मी तारी यास अधीं ॥ ४ ॥

पद ६२. ईशस्तवन.

दीनदयाळा पूर्ण कृपाळा दावी पद युगलासी रे ॥ पडलों मी भव पाशीं रे ॥ केल्या पातक राशी रे ॥ धृ० ॥ बाळपणीं अतिकोमल काया सेज सदा वमनाची रे ॥ होय क्षुधा तरि देति भेषजें त्वरित व्यथा शमनाची रे ॥ नाहीं सिमा रुदनासी रे ॥ केलें त्वां अवनासी रे ॥ १ ॥ प्राप्त दशा पौगंड त्यावरी

यौवन भरलें अंगीं रे ॥ विवेकत्यागें नित्य निरंतर रतलों प्रमदा संगी रे ॥ नाम नये वदनासी रे ॥ झालों वश मदनासी रे ॥ २ ॥ वृद्धपणीं सुत दार धनाची मोघ अशा सदनाची रे ॥ वय गेलें संपूर्ण ॥ विस्मृती झालि असे निधनाची रे ॥ नाहीं केली काशी रे ॥ नेइल यम नरकासी रे ॥ ३ ॥ अठऊनिया अपराध आपुले शरण तुला गिरिवासीरे ॥ नाशी भवदुस्तरतर भारी पावसी तूं भजकांसी रे ॥ विदित असे जगतासी रे ॥ पावन करि पतितासी रे ॥ ४ ॥

पद ६३. ईशस्तवन–राम.

रामा मज तारि मज तारि भवजल हें भारी ॥ धृ० ॥ क्षणभंगुर असुनि काय ॥ स्मरलों नाहींच उपाय ॥ क्षमा करुनि मदन्याय ॥ लावी परपारी ॥ १ ॥ विषयांची धरुनि कास ॥ झालों मी धनिकदास ॥ केला तव भजनिं त्रास ॥ श्रमलों संसारी ॥ २ ॥ कन्या सुत आप्तदार ॥ होतें गणगोत फार ॥ वृद्धपणीं तेचि थार ॥ देति न अवधारी ॥ ३ ॥ रामा गिरिवासि धांव ॥ सत्वर मजलागिं पाव ॥ निजचरणीं देईं ठाव ॥ जन्म मरण वारी ॥ ४ ॥

पद ६४. ईशस्तवन–राम.

रामा मज तारी मज तारी ॥ पडलें संकट भारी ॥ धृ० ॥ होऊनि नरतनु धारी ॥ भजलों नाहीं तुज निर्धारी ॥ १ ॥ सौख्य न या संसारीं ॥ वंचक रांडा पोरें सारी ॥ २ ॥ या भव पारा वारीं ॥ लाविल कोण दुजा परपारी ॥ ३ ॥ क्षणिक [illegible]व भारीं ॥ पडलों दुष्ट दशे माझारीं ॥ प्रभु गिरिवासि तिष्ठें दूर न येथुनि सारी ॥ ५ ॥

पद ६५. ईशस्तवन–राम.

क्षितिजापति रामा मज तारी ॥ भवभय दुःख निवारी ॥ ॥ ध्रु० ॥ लक्षचौऱ्यांशीं फेर फिरुनिया झालों नरतनुधारी ॥ पुत्र कलत्रामाजि गुंतलों लावी त्वरें परपारी ॥ १ ॥ भजनपुजन मज नाहिंच घडलें वय गेलें संसारीं ॥ स्नानपान गंगाजालिं कैंचें ॥ चित्तसदा व्यभिचारी ॥ २ ॥ सत्संगाची वाट मोडिली दंभाचि लोकाचारीं ॥ उपरातिची वरी वार्ता नेणें निरयाचा अधिकारी ॥ ३ ॥ गिरिवासी तुझी आस धरितसे दावी पद-रज थोरी ॥ उद्धरिलें बहु पापि तुवां परि त्यांहुनि हा अवि-चारी ॥ ४ ॥

पद ६६. ईशस्तवन–कृष्ण.

कधिं भेटसि मंगल धामारे ॥ ध्रु० ॥ देवाध्यक्षा ॥ कमल-दलाक्षा ॥ रुक्मिणीरमणा ॥ भवभयहरणा ॥ पुरविसी निजजन कामा ॥ १ ॥ आह्मी हीन याती ॥ धरिलेंसी हातीं ॥ दुष्ट मर्दुनी तुष्ट द्रौपदी केली जगविश्रामा ॥ २ ॥ जा ह्मणवेना ॥ स्थिर करवेना ॥ कल्पपादपा करि अनुकंपा सत्वर ये घनश्यामा ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी रक्षिसी आह्मां ॥ दीनदयाळा पूर्ण कृ-पाळा दावी निजपद पद्मा ॥ ४ ॥

पद ६७. ईशस्तवन–शंकर.

धांवे पावे बा त्रिपुरारी पन्नग भूषणारे ॥ ध्रु० ॥ भवसा-गरीं या बुडतों पाही ॥ तारूं तुजवीण दुसरा नाहीं ॥ यास्तव नमितों अनुदिनी सन्मन तोषणारे ॥ १ ॥ ह्मणती देवाचा तुज देव ॥ निजस्वरूपाची दाखवि ठेव ॥ सृष्टिस्थितीलय कारण हल-हल शोषणारे ॥ २ ॥ त्रैमूर्तीचा तूं निज ठांव ॥ जाणसि सर्वां-

तरिचा भाव ॥ पूर्ण शुभाशुभ कर्म फळातें देसी मन्मथदुषणारे ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु हा नत काय ॥ होऊनि वंदितसे तव पाय ॥ जन्म जरा भय मरण नाशुनि वारी लौकिक इषणारे ॥४॥

पद ६८. ईशस्तवन—दत्त.

धाव अतां त्वरित मला अत्रिनंदना ॥ धृ० ॥ विधिहरिहर त्रिदशवरा ॥ त्रिगुणमूर्ति त्रिशुलधरा ॥ भक्तजनानंदकरा पाप मोचना ॥ १ ॥ करिं धरिसी चक्र वरा ॥ डमरू भस्मांग भरा ॥ मौनि जटी दिगंबरा पतित पावना ॥ २ ॥ कमंडलूधर चतुरा ॥ उद्धारिसी जनातुरा ॥ दे दर्शन परात्परा ॥ भवाधि नाशना ॥ ३ ॥ योगियांत होसि शिरा ॥ माला दर चर्मधरा ॥ नमितों जोडूनि करा ॥ विश्वभावना ॥ ४ ॥ गिरिवासी तूंचि खरा ॥ वोपी शिरीं अभय करा ॥ करि तरणोपाय वरा ॥ जगद्वंदना ॥ ५ ॥

पद ६९ ईशस्तवन—राम.

राम कधिं भेटल तो मजला ॥ धृ० ॥ बाळपणातचि मख रक्षुनियां तोषविलें मुनिला ॥ १ ॥ चरण रजानें पाषाणाची केलि असे अबला ॥ २ ॥ भवधनु भंगुनि सीता वरिली सुखवी जनकाला ॥ ३ ॥ प्रस्तर उदकीं तारुनि नेले कपिगण लंकेला ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु राम दयाळू ह्मणती जन ज्याला ॥ ५ ॥

पद ७० ईशस्तवन—राम.

रामा मज दावी तूंचि उपाय ॥ धृ० ॥ धनसुत दारा यांतचि रमलों बहु केलें अन्याय ॥ १ ॥ या संसारीं दुःखचि —— कुठवर काय ॥ २ ॥ असें जरि मजला प्रथमचि कळतें त्र पाय ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु अपराधी मी, झालों

पद ७१. ईशस्तवन—राम.

माझी आस पुरवि रघुराया ॥ धृ० ॥ शिणलों बहु मी या संसारीं दाखवि तूं निज पायां ॥ १ ॥ भवजलभार्टी नाव दिसेना येइं त्वरें उतराया ॥ २ ॥ दे भजनीं मज प्रेम निरंतर घालविलें वय वायां ॥ ३ ॥ वाटे मनिं गुण गाइन आवडि सन्मति दे गुण गाया ॥ ४ ॥ गिरिवासी प्रभु तूंचि दयाघन घालि कृपेची छाया ॥ ५ ॥

पद ७२. ईशस्तवन—देवी.

अंबे जगदंबे विश्वकदंबे जगदांकुरस्तंभे ॥ पाहि मला मी दास तुझा या चरण दावि अविलंबित अंबे ॥ धृ० ॥ राही अमराही धाक अशाही, असुरांतें पाही ॥ त्वरा करुनियां बरा मर्दिला भीषणरूप कचलंबित अंबे ॥ १ ॥ रामा गुणधामा जगविश्रामा दाउनि रूप रामा ॥ वरदानें बहु तोषविले त्वां सुंदररूप अवलंबित अंबे ॥ २ ॥ नाशी जननासी करि अवनासी दुःखद भव नाशी ॥ शरण तुला संसरणा वारी व्योम केश परंभित अंबे ॥३॥ माते आपदांतें वारी पदातें, दावी सुखदाते ॥ गिरिवासी प्रभु ध्याय निरंतर विमल चरित जगलंघित अंबे ॥ ४ ॥

पद ७३. कथा—द्रौपदीचा धांवा.

करुणाकर श्रीकृष्ण मुरारी॥ पावे संकट पडलें भारी ॥धृ०॥
कुरुवंशोद्भव दुष्ट अंधसुत ॥ ओढिती वसनें करिती अनुचित ॥
लज्जा गेल्या कज्जा करुनी ॥ अर्थसाध्य तरि काय श्रीहरी ॥१॥
सभेंत आणुनि छळिती मजला ॥ परि वृद्धांतुनि कोणि न धजला ॥
व्यर्थ प्रार्थना कां करूं त्यांची ॥ तूंचि पदरजें त्वरित उद्धरी ॥२॥
पांडव आपण हरलों ह्मणुनी ॥ असनिं बैसले दीन होउनी ॥

नच रे कांहीं युक्ति राहिली ॥ मुक्ति शक्तिची सहजाचि दूरी ॥ ३ ॥ करितां अंतर या समयासी ॥ भगिनी जाइल अजि विलयासी ॥ ब्रीद तुझें तूं हरि सांभाळी ॥ करुणा येऊंदे प्रभु कंसारी ॥ ४ ॥ मूर्ति आविर्भुत झालि तेथें ॥ सुदर्शन चक्र फिरवि भोंवतें ॥ वस्त्रें वोपी अमित साजिरीं ॥ गिरिवासी धरि चरण या वरी ॥ ५ ॥

पद ७४.कटिबंध- द्रौपदीचा धांवा.

गोविंदा वेगीं धांव धांव धांव ॥ गोपाळा वेगीं धांव धांव धांव ॥ धृ० ॥ अंध तनय वश असन्मदासी ॥ बोले गर्जुनि सभा-सदासी ॥ मुकले पांडव राज्यपदासी ॥ झाली द्रौपदि अमुची दासी ॥ अपथ्यकारी रुग्ण गदासी ॥ न गणी त्यापरि तो विदुरासी ॥ निर्भय वदला निजानुजासी ॥ जा जा सत्वर आण तियेसी ॥ दावी नग्न करूनि सभेसी ॥ चाल ह्मणावें कां तूं भिसी ॥ दासी झाल्या लाज कायसी ॥ हट करितां ओढावी केशी ॥ सहसा मानुं नको वृद्धासी ॥ ऐसी आज्ञा होतां त्यासी ॥ धांवत आला द्रौपदिपाशीं ॥ अधींच दुर्जन दुर्मद राशी ॥ चित्तीं न धरी पापदरासी ॥ झोंबे सतिच्या तो पदरासी ॥ कळवूं जातां वृद्ध स्त्रियांसी ॥ जाऊं न दे अडवुनियां तिजसी ॥ ओढी निकरें कच-भारासी ॥ पाडी असडुनि भूमितळासी ॥ वदली मंजुळ शब्दें ऐसी ॥ एकांबर मी येऊं कैसी ॥ त्यांत असें स्त्री-धर्म दुरसी ॥ गांधारीसम पूज्य तुह्मांसी ॥ या वचनें चढला कोपासी ॥ चाल ह्मणे कां गे बडबडसी ॥ रडसी पडसी जरि तूं अडसी ॥ नेइन ओढुनि कोठें दडसी ॥ टाक पाऊलें गे पडद-डसी ॥ नसतां पाठ असो दे धडसी ॥ ऐसें बोलुनि सभेसी हंसी ॥ आणितां कौरव करिती काव काव काव ॥ १ ॥ कौरव सभेसी पांचजाया ॥ छळितां कोणि नये वरजाया ॥ भीष्मा- ॥ भीतो अंधसुता वर्जाया ॥ होते भीमा-सि त्यजाया ॥ अक्षम शक्ति नसे

गर्जाया ॥ आंतुनि बाहेर करिति जाया ॥ दुसरा कोण धजे काजा या ॥ नाहीं हरिविण ठाव भंजाया ॥ तरि मी सांगूं कवणा जाया ॥ अवधी तिळहि नसे मोजाया ॥ हरिला वृत्त अखिल सम-जाया ॥ कोण मनासम दूत दुजा या ॥ ऐसें बोलुनियां हरिपाया ॥ स्मरली हृदयांतरि प्रभुराया ॥ येइं सत्वर विघ्न हराया ॥ पायां पडतें दावि उपाया ॥ दुर्जन करितिल उघडी काया ॥ करणें वेळ बरा मग कां या ॥ लज्जा गेल्यावरि या ठायां ॥ येऊनि कज्जा करासिल वायां ॥ व्यसनीं मजला रक्षीं बा या ॥ नसतां भगिनि जाइल विलया ॥ तुजाविण कोणि नसे विनवाया ॥ पावे सत्वर मज या समया ॥ येऊं दे हरी तुजला माया ॥ उभीच आहें मी यदुराया ॥ दुर्जन सिद्ध वसन फेडाया ॥ बुडवूं पाहाति हरि नांव नांव नांव ॥ २ ॥ ऐसी करुणा ऐकुनि कानीं ॥ धावरला हरि, मन न ठिकाणीं ॥ केलें चंचल चित्त हांकांनीं ॥ हरिणी धरिली दुष्ट वृकांनीं ॥ केली हळहळ बहु लोकांनीं ॥ मजविण सोडविता जिस नाहीं ॥ सहजचि शून्य दिशा मग दाही ॥ दे तें मन माझें ग्वाही ॥ नलगे उशिर अतां हो कांहीं ॥ पाहणें वेळ नको घटकाही ॥ ऐसें बोलुनि त्वरित धांवला ॥ गेला सांडुनि मन-पवनाला ॥ सभेंत ह्मणती बुध जन आला ॥ आनंद झाला याज्ञसेनिला ॥ ना भी ना भी ऐसें वदला ॥ असुडी दुःशासन वसनाला ॥ त्यांत देखिलें क्षिरोदकाला ॥ तोहि ओढितां दिसे मिराणी ॥ चंद्रकळा पैठणी फुाटणी ॥ शालू भरजरी अनारदाणी ॥ लाल गुलाली सुवर्णवर्णी ॥ खंबाइत दोरिया दुखाणी ॥ साडी हिरवी लाल पोंचळीं ॥ रंग अंजिरी शुद्ध सोंवळी ॥ काळी गुजरी भडक जांभळी ॥ बऱ्हाणपुरची पदर नारळी ॥ हुमनाबादी तडप चारुळी ॥ देशदेशिचीं प्रसाद वसनें बहु गोलांचीं ॥ अनेक रंगी बहु मोलाची ॥ कुजना मात्र न त्या तोलाचीं ॥ दिसलीं साच परी झोलाचीं ॥ दिधलीं हरि गिरिवासी प्रभूचीं ॥ नकळे कवणासी मांव मांव मांव ॥ ३ ॥

लावणी ७५. कथा–द्रौपदीचा धांवा.

एकटी परम संकटीं बहिण धाकटी तुझी मी सखया ॥ ये सत्वर माझी लाज तुला यदुराया ॥ धृ० ॥ हा दुष्ट दांडगा पुष्ट फुटेना कु: कसा मेल्याला ॥ ओढितो पहा दुःशासनकर वसनाला ॥ कुरुवृद्ध तिहीं तरि शुद्ध वदावें क्रुद्ध होउनि कुजनाला ॥ परि भीती घालूं भीड कशास्तव त्याला ॥ पतिराज रक्षिते लाज परी ते आज स्वकिय वचनाला ॥ गुंतले ह्मणुनि बहु कष्ट जाहले मजला ॥ चाल ॥ प्रार्थितें जोडिल्या करीं ॥ ये धांवत बा लौकरी ॥ हें व्यसन अतां दुर करी ॥ करूं काय पंकीं जशि गाय वंदूं मी पाय कुणाचे सखया ॥ नसे इतरालागीं शक्ति शत्रु दंडाया ॥ १ ॥ कुरुकुळीं जन्मला कली भक्तजनछळीं उदित मन याचें ॥ अति निंद्य वचन बोलिला अमंगल वाचे ॥ निज अंक दावी निःशंक ह्मणे पति रंक तुझे हे साचे ॥ कां व्यर्थ श्रमसी घे भोग अखंड सुखाचे ॥ हा कर्ण पहा हिनवर्ण असुनि हिन वर्ण ऐकिले त्याचे ॥ ह्मणे असति, असति वर पांच हिला नित्याचे ॥ चाल ॥ गेलें हृदय सख्या हें फुटून ॥ नये जातां मजला उठून ॥ कसें नभ पडलें आज हें तुटून ॥ कुठें थार नसे आधार कष्टलें फार आजि या समया ॥ मज दीनाची येऊंदे तुला हरि माया ॥ २ ॥ किति वेळ प्रार्थूं किति वेळ जाहला खेळ दुर्जना पाहीं ॥ हरि लज्जा गेल्या येइल काय पुन्हा ही ॥ जरि अंत पहासि निभ्रांत होइल देहांत अन्यथा नाहीं ॥ कसि माता लाविल बाळ अन्य थानाही ॥ यदुवरा करावी त्वरा प्राण घाबरा सुचेना कांहीं ॥ यासाठीं दिधले कष्ट तुला हांकांहीं ॥ चाल ॥ ओढितो दुष्ट हा निरी ॥ काय अवधि राहिली तरी ॥ तूं स्वस्थ कसा अंतरीं ॥ …न हरी मज पाव बुडतसे नांव येइ लवलाया ॥ या कौरव …ण दजा ताराया ॥ ३ ॥ विनवणी ऐकतां क्षणीं त्यजुनि … ॥ करि लगबग मनिं भगिनिचें कार्य

साधावें ॥ करि सभा सुगंधित उभा पाठिसी प्रभा चरण वंदावे ॥ ह्मणे ना भी आलों दीन तुज न वाटावें ॥ बुधजनीं वळखिलें मनीं जया त्रिभुवनीं ह्मणति मुनि गावें ॥ त्या हरिपदपद्मा क- रिति नमन सद्भावें ॥ चाल ॥ असुडिली निरी त्या खळें ॥ दिसे आंत वसन वेगळें ॥ गमे चरित तया आगळे ॥ धरि हांव ओढि पाटाव कळेना भाव हरीची माया ॥ ह्मणे कुटिल बहू अजि नग्न करिन ही जाया ॥ ४ ॥ पोंवळी शुद्ध सोंवळी त्यांत जांभळी पैठणी हिरवी ॥ अति सुंदर शालू हेमकांतीला मिरवी ॥ असि किती वसनसंहती जयाची मिती होईना बरवी ॥ नेसवी हरी किति भगिनिस प्रमुदित करवी ॥ शेवटीं तनू पितपटीं झांकिली दिठी सुदर्शन फिरवी ॥ प्रभु दीनाचा कैवारि दुर्जना विरवी ॥ चाल ॥ दुःशासन बसला तळीं ॥ गडबडालि कुजनमंडळी ॥ तव कुरुपासन डळमळी ॥ द्रुपदजा वंदि पदरजां उभविली ध्वजा शत्रु निवटाया ॥ गिरिवासी प्रभुची तप्त जनांवरि छाया ॥ ५ ॥

पद ७६. कथा—द्रौपदीचा धांवा.

दुर्घट हें व्यसन आजि रक्षि पूतनारी ॥ ध्रु० ॥ दुःशासन दुष्ट फार ॥ ओढितसे कबरि-भार ॥ श्रम देतो मज अपार संकट हें वारी ॥ १ ॥ आणिलें मजसी सभेंत ॥ केला तें बहु अकांत ॥ भीष्मादिक तेहि अंत ॥ पहाति निर्धारीं ॥ २ ॥ फाडिल हा वसन पाहि ॥ क्षणभर अवकाश नाहिं ॥ न करी तूं वेळ कांहिं ॥ पावे अवधारी ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु पदास ॥ नामितें मीं पुरवि आस ॥ कवणाची धरुं मि कांस ॥ होसी कैवारी ॥ ४ ॥

पद ७७. कथा-ब्रह्मदेवानें वत्स नेले.

भोवतिं गोपमुलें सारीं ॥ पुलिनीं खेळे कंसारी ॥ ध्रु० ॥ करुनिया भात दहीकाला ॥ कवल दे वदनीं गोपाला ॥ लोणचीं

शाक इतर पाला ॥ शिदोऱ्या वाटी सकळांला ॥ वासुरें दुरावलीं भारी ॥ १ ॥ विधिला ब्रह्म असुनि ठावें ॥ अविद्येलागिं धरूं धांवे ॥ गमलें गोपवत्स न्यावे ॥ प्रभूचें चरित विलोकावें ॥ हरी जो जगत्रया तारी ॥ २ ॥ विनटला रुपें अवघ्यांचीं ॥ उपानहशिंकिंशिदोऱ्यांचीं ॥ लोटलीं अयनें द्वय साचीं ॥ करणी विश्वशरण्याची ॥ वाजवी मुरलि पूतनारी ॥ ३ ॥ धाता पाहुनियां चरिता ॥ निघाला शरण रमानाथा ॥ प्रभु गिरिवासि असें पहातां ॥ वर दे झाला तोषविता ॥ अंतरिं ध्यातो मदनारी ॥ ४ ॥

पद ७८ कथा--जगन्नाथ.

हरि तो दासरूप झाला ॥ वंदिती सुरवर मुनी ज्याला ॥ धृ० ॥ वसतो चराचरीं भगवान् ॥ बोलिला पित्यासि हे महिमान ॥ स्तंभीं होऊनिया निर्माण ॥ भक्त प्रल्हाद रक्षियेला ॥१॥ जाहलें जनन काष्ठ उदरीं ॥ ह्मणुनि त्या दिधली मातृसरीं ॥ वाहे उपकृतीस शिरीं ॥ बुडविल उदक कसें त्याला ॥ २ ॥ वामनें धरिला दंड करीं ॥ दंडिलें बळीस त्या अवसरीं ॥ वागवी परशुराम स्वकरीं ॥ आवडे धनु त्या रामाला ॥ ३ ॥ कृष्णे मुरली निज अधरीं ॥ धरिली मधुर ध्वान करी ॥ फिरवुनि निजांगुलीस वरी ॥ सुखवित अनुवादानें हरि तिजला ॥ ४ ॥ फिटेना उपकाराचे हारेला ॥ शेवटीं तद्रूपाच झाला ॥ पहा त्या जगन्नाथाला ॥ प्रभु गिरिवासी नमुं त्याला ॥ ५ ॥

पद ७९. कथा—कृष्ण रडत असतां त्याचो समजुन.

तान्हुल्या रडूं नको व्रजनाथा ॥ धृ० ॥ मा रुद साकर साय दुधाची देतें काढुनि आतां ॥ १ ॥ दुधभाताचा करितें काला, झोपचि येईल खातां ॥ २ ॥ आज गजानन येतिल सदनीं

मोदक देइन हाता ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु खोडी नको करुं गातिल बहु जन गाथा ॥ ४ ॥

लावणी ८०. कथा--कृष्णाची

या हरिनेंग ग बाई सारें गोकुळ चंवढाळिलें ॥ काय सांगु मात तरि माततात भुलविले ॥ धृ० ॥ दह्या दुधाचि करिनाका चोरी त्याला कोण पाहुं गेलें ॥ आहे देवाचि दया त्यानें काय बरें आह्मां उणें केलें ॥ नाहिं गोरसाचि खंति त्यानें किति जरी चोरुनि नेलें ॥ वाटतें दुःख हें फार नांव बुडविलें ॥ १ ॥ यानें गवळ्याच्या पोरिसाठीं घर ना घर चाळिलें ॥ काय याच्यामुळें याला आईबापानिंग पाळिलें ॥ निरुपाय झाला यानें घाण्यांतचि गाळिलें ॥ सांगावें कवणा अह्मा फार जाचिलें ॥ २ ॥ पहा बळीराम कसें लेंकरूं आहे गुणिजन ॥ कोणि पाहिनाच त्याकडे कसे हे जन ॥ कोणी पुसेनाचि त्यास उपवासि केलें भोजन ॥ आहे मर्यादशील फार म्यांहि पाहिलें ॥ ३ ॥ किति उघडुनि सांगूं काय लपले याचे गुण ॥ होतो ल्हानाचा थोर याची उठली असी गुणगुण ॥ कशि अघटित करणी नवलचि वाटे ऐकुन ॥ गिरिवासी प्रभुनें कांहो नयन झांकिले ॥ ४ ॥

पद. ८१ कथा-कृष्णाचीं गाऱ्हाणीं

कृष्णा थांब थाब थांब ॥ सांगतें मातेला तुझ्या थांब ॥ धृ० ॥ निजलीं बाळें उठविसी हातें ॥ नाहिं कोणि कथिलें मीच पहातें ॥ वाईट हरी हें तुझें काम काम काम ॥ १ ॥ अडविसी मुलिला यमुनेच्या वाटे ॥ हरि तुझी लीला तुज गोड वाटे ॥ शिरिं घागर अंगिं घाम घाम घाम ॥ २ ॥ चेंडू नेला ह्मणसी हिरुनि ॥ ओढिसी मुलिला कंचुकि धरुनि ॥ नाठवे तयांसी निज धाम धाम धाम ॥ ३ ॥ गिरिवासी प्रभु कां रे न भीसी ॥

नाहिं दिन तुजला नाहिं हरि निशी ॥ छळिसी सकळां अष्ट याम याम याम ॥ ४ ॥

पद ८२. कथा—राधेचा धांवा.

घेउनि ये यदुवीर अतां सये ॥ धृ० ॥ हरिविण वाटे पळहि युगापरी ॥ धीर कसा धरुं होतसें घावरी ॥ १ ॥ भोग सकलही रोगचि भासति ॥ काय करुं गडे न दिसे बरी गती ॥२॥ अन्नपाणि मज विषचि गमे सये ॥ सुखशयनीं क्षण नीज मला नये ॥ ३ ॥ गिरिवासी हरि भेटविसी जरी ॥ वाहिन नित्य मी उपकृतिला शिरीं ॥ ४ ॥

पद ८३. कथा—कृष्ण मथुरेस जातात तेव्हां गौळणींचें दुःख.

हरीगमन केंवि सहन होय अह्मां बाई ॥ एकाएकिं दुःख भागि झालों कशापाही ॥ धृ० ॥ हरिविणें काय जिणें ॥ व्रज आजी झालें सुनें ॥ अक्रुरानें क्रूरपणें ॥ घात केला गाई ॥ १ ॥ बाळपणीं खेळ खेळे ॥ नवनीताचे चोरी गोळे ॥ गोप मुलिस दापी बळें ॥ नवल वदों काई ॥ २ ॥ विषनीर प्राशियलें ॥ गाई आणि गोप मेले ॥ त्यांसी त्वरें जीवाविलें ॥ घालविला आह्मी ॥ ३ ॥ सप्त अहोरात्रवरी ॥ वज्रपाणि वृष्टि करी ॥ नखाग्रींच गिरी धरी ॥ रक्षि गोपगाई ॥ ४ ॥ षण्मासाचि क्षपा करी ॥ तोषविल्या व्रजनारी ॥ तोचि स्मर अभ्यंतरीं ॥ दुःख कोण साही ॥ ५ ॥ गिरिवासी प्रभु हरी ॥ कृपा करिल निर्धारीं ॥ तरीच दुःख होय दुरी ॥ भेटे लवलाही ॥ ६ ॥

पद ८४. कथा—उद्धवाला गौळणी सगुण कृष्ण दाखीव ह्मणतात.

उद्धवा तें सगुण ब्रह्म दावी लवलाही ॥ धृ० ॥ नित्य वर्ते गोकुळांत ॥ दिसे सर्वांठायिं पळांत ॥ मर्दि कालिया जलांत ॥

तेंचि ब्रह्म पाहीं ॥ १ ॥ क्षणें दावी बाळलीला ॥ क्षणें राधिकेचा लळा ॥ पुरवी ठायीं ठायीं ॥ २ ॥ उद्धवा ती सुखगोडी ॥ जरी वर्णी शेष थोडी ॥ तरी ब्रह्मानंद जोडी ॥ पावे सर्वदाही॥३॥ ऐसें ब्रह्म सोडुनियां ॥ कैंवी आठवावें तया ॥ दृश्य जाइना का लया ॥ भास मात्र जोही ॥ ४ ॥ असो कर्मातीत अकर्ता ॥ कोण जाणें त्याची सत्ता ॥ मूर्तीविणे विश्वासतां ॥ अह्मां नाहीं नाहीं ॥ ५ ॥ गिरिवासी तोचि असे ॥ सर्व रूपीं नटलासे ॥ ह्मणती सदा जवळी वसे ॥ न गमे सत्य तेंही ॥ ६ ॥

८५. कथ.

(गौळणी कृष्णला उद्धवाच्या हातीं निरोप पाठवितात.)

उधोजी सांगा यदुवीरा ॥ धृ० ॥ गोपि मराया उदिताचि ऐसें, जाउनि विदित करा ॥ १ ॥ घडि पळ लव ज्यां युगसम भासे, दर्शन दे चतुरा ॥ २ ॥ कुब्जा दासी कंसगृहींची. जोडा काय बरा ॥ ३ ॥ अह्मि अपराधी काय अशा हरि, केला निकुर खरा ॥ ४ ॥ यावरि अमुचें माक्तन जैसें, तुह्मी तरि कान भरा ॥ ५ ॥ गिरिवासी प्रभु भेटे अह्मां, तरि गणुं उपकारा ॥ ६ ॥

लावणी

कथा—सुभद्राहरण प्रसंगीं रुक्मीणीसि सुभद्रेचे उत्तर.

ह्मणे सुभद्रा रुक्मिणि वहिनी काय त्रपा सांडिली ॥ पत्रिका कोठें म्यां धाडिली ॥ धृ० ॥ वडिलपणाचें वारें अंगीं ह्मणाल तें साजतें ॥ असें मी वदलें तरि काय तें ॥ शोध करा हें एकांतींचें ह्मणणेंही जाचें ॥ तरी कां न वदावें साच तें ॥ विवाहकाळीं बाई अपुल्या फारच मी ऐकतें॥ कळवा पुसतें मज एक तें॥ शिशुपाळासी निश्चय होतां कांहो धृति त्यागिली ॥ १ ॥ ब्रह्मसूत्र जरि प्रमाण ह्मणतां कां न राहिला तसें ॥ धाडिलें त्वरित सुदेवा कसें ॥ वृत्त मुखोद्गत कथुनि भरंवसा कांहो मानिला नसे ॥ लिहिले पत्र प्रखर कां असें ॥ कीं प्रभुजी मज धीर न धरवे या

लवकर फारसे ॥ तुह्मांविण जिव व्याकुळ होतसे ॥ देउं पाहती वैद्यालागीं असे हळद लाविला ॥ २ ॥ दादाला तुह्मि दा दा ठरवुनि केली निंदा तधीं ॥ दिधल्या मनास त्याच्या अधीं ॥ कांहींतरि मी वदलें सांगा बळिदादाची कधीं ॥ निंदा अपुल्या आली मधीं ॥ गिरिवासी प्रभुनेंचि विनोदें कथिलि कथा मागिली ॥ ३ ॥

लावणी ८७.

(लक्ष्मीचें स्वयंवर.)

धन्वंतरि वर दाउनि सांगे नामें त्यांचीं बरीं ॥ बाइगे हा याची नोकरी ॥ ध्रु० ॥ ब्रह्मा ह्मणसी समर्थ परि तो वृद्ध जरठ फारसा ॥ अशाचा काय तरी भरंवसा ॥ सद्‌गुण बहु सांगसी परंतु कन्येवरि लालसा ॥ वरूं मी काय वर असा ॥ रुद्र ह्मणावा योग्य तरी तो स्मशानवासी तसा ॥ दरिद्री पंचानन विरूपसा ॥ भिक्षा मागे नित्य घरोघरिं पसरी तो करपसा ॥ योजिसी सवती वर मज कसा ॥ दुर्वासामुनि फार चांगला दिसतो सर्वोपरी ॥ १ ॥ अतितर कोपी काय करावा क्षुधा यास फारसी ॥ वाटतें भय माझ्या मानसीं ॥ मिळेल खाया तोंवरि बरवा नाहींतर तामसी ॥ भक्षिल मजही एका दिसीं ॥ इंद्र असे परदारागमनी पराधीनता तसी ॥ घालूं माळ अशाला कसी ॥ परशुराम हा धर्मपरायण ज्ञानवान बहु तरि ॥ २ ॥ भूतदया अंतरीं असेना काय अशाला करूं ॥ कांता होउनि कां मी मरूं ॥ वधिली माता क्षणांत ज्यानें असें तिखट लेकरूं ॥ भरंवसा याचा कैसा धरूं ॥ सनकादिक हे निरापेक्ष तरी चित्त कसें आवरूं ॥ घडल्या पातक कोठें भरूं ॥ मार्कंडेया ऋषी असे हा दिर्घायू पति करी ॥ ३ ॥ युवती सोशिल इतर सर्वही सोसेना तिजमती ॥ मिळाला षंढचि दैवें पती ॥ इंद्रियदमनी असा तापसी करिल काय ती सती ॥ सहजचि होइल कुंठित मती ॥ इंद्रियलालन परि दैत्यांचा काळ फिरे भोंवतीं ॥

अशांची कैची बरवी गती ॥ सुरगुरु शुक्रादिक हे ज्ञानी यांत
पहा कुणितरी ॥ ४ ॥ शोधुनि पाहतां तिला वाटला पुरुषोत्तम
हरि बरा ॥ असेना याहुनि वर दूसरा ॥ आत्मरत प्रभु असो
तयाच्या पदिं वाहिन मी शिरा ॥ द्रवेलाचि आहे दयाळु खरा ॥
माळ गळा घातली प्रभूच्या भ्याली नाहिं जरा ॥ ह्मणे मी नवरी
हा नोवरा ॥ गिरिवासी प्रभु वरिला श्रीनें मंगलरूपी हरी ॥ ५ ॥

लावणी ८८.

(कथा—स्वर्गपुष्प रुक्मणीस दिलें ह्मणून सत्यभामेचा कोप.)

कुसुम दिलें रुक्मिणिला ह्मणउनि कोपाकुळ बहु भामा ॥
शांत नव्हे सर्वथा सूचवी आत्मघात परिणामा ॥ ध्रु० ॥ स्वर्ग
पुष्प नारदें सुगंधिक अणुनि द्वारके मधीं ॥ समर्पिलें श्रीभगवंतातें
रुक्मिणीला दे तधीं ॥ सांगति वार्ता सत्यभामेला दासि तिच्या
त्या अधीं ॥ ह्मणुनि कोप संचरे असा तिज अळाच नव्हता
कधीं ॥ अक्षमसारें, प्रभुविण तिजला कोण शांतवी सुधी ॥ धांव
घेतली दयाघनें ज्या वंदिती सुरवर विधी ॥ चाल ॥ धरणीवरि
लोळते गडबडा कोण तिला सांवरी ॥ अधोवदन बैसली करीना
मस्तक सहसा वरी ॥ रत्नहार तोडिलें घातली धूळ स्वकेशावरी
॥ चाल ॥ अति चढली कोपा अधर चाविते रदनीं ॥ ती ह्मणे
हरीला येउं न द्यागे सदनीं ॥ बाइ करा असें तुह्मि शब्द न
बोला वदनीं ॥ चाल ॥ राहुं द्या सदनिं सवतीच्या प्रियकर
हरिला तुह्मि सहसा अपुल्या मनिं संशय धरूं नका ॥ वाटलें गोड
कसें कुसुम द्यावया तिजला पाहवेना मुख अशाचें रागे भरूं नका ॥
सवतिच्या सख्याची भिड कायसी मजला जरि येइल सदनीं
तरि त्याला भिउं नका ॥ चाल ॥ घडि घडि मूर्च्छित होतां
सांवरूनि सख्या धरिती ॥ व्यजनानील घालुनि वर त्या सिंच-
नही करिती ॥ मंचकीं निजविली भामा करि नकार बहु जरि
ती ॥ अशांत सदनीं हरि येउनि जरि पुरवि सवीच्या कामा ॥
शांत नव्हे सर्वथा सूचवी आत्मघात परिणामा ॥ कुसुमादिलें ॥ १ ॥

गुरुअष्टक—८९

(ईशस्तवन)

शोधिती जडाजडें उदंड या धरातळीं ॥ आत्मभ्रांति श्रुति प्रोक्त ह्मणति तनुसि वेगळी ॥ परंतु दाखवील सकळ स्वात्मि विश्व तें तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ १ ॥ उपादान मृत्तिका घटासि काय वेगळी ॥ ब्रह्म जगीं तेविं असे तरंग भासतो जळीं ॥ ह्मणति सर्व असे परी प्रत्यया नये तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ २ ॥ प्रपंच हा न वेगळा असोंचि ब्रह्मकार्य तें ॥ ताम्र खरें मात्र त्यांत पात्ररूप भासतें ॥ परंतु याहि विविध गोष्टि कळति काय अज्ञ मुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ अकार होय नष्ट तरी ब्रह्मता असेचि तसी ॥ नश्वराजडासी तें वियोग्यता घडे कसी ॥ चित्सुवर्ण नगीं खरें ह्मणुनि दाखविल तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ ४ ॥ ब्रह्मपाद विलोकिती न दिवांध सर्व ज्यापरी ॥ उघड दृष्टि आसतां न ब्रह्मता कळे खरी ॥ दाखवील हाचि पहा ब्रह्म तें दुर तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥५॥ भास हा दिसे खरा उपाधिच्या मुळें जरी ॥ जागविता बुद्धि तीच सुविद्यता असे खरी॥ भजन पुजन नित्य करी देवगुरुचि तो तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ ६ ॥ स्वप्न सर्व मिथ्य तरी असत्य भास नये जसा ॥ प्रपंच हा खरा तरी असत्य मानि तूं तसा ॥ रामनाम जपे सदा चित्तशुद्धि घडे तुला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ ७ ॥ फार काय वदों अतां अनन्यभाव जरी खरा ॥ वदेल हा सुनिश्चयेंच या भवांबुधी तरा ॥ सतत पाठ अष्टकास करुनि धरी समाधिला ॥ नमन करी राघवाख्य गुरुसि या नसे तुला ॥ ८ ॥

पद ९२.

(ईशस्तवन–विठोबा.)

पंढरिराया ॥ करि तूर्ण कृपेची छाया ॥ ध्रु० ॥ वाटलें सुख होइल संसारीं ॥ परि मज भवलीं दुःखें सारीं ॥ तुजविण कोण दुजा दुर सारी ॥ ताप शमाया ॥ १ ॥ मानिलें शाश्वत तनुचें पाहीं ॥ मिळविले आप्त सोयरे व्याही ॥ परि परिणामीं कोणिच नाहीं ॥ कास धराया ॥ २ ॥ स्मरलों नाहिंच कीं तव चरणा ॥ कोठुनि साधन मग भवतरणा ॥ अवधी स्वल्प राहिली मरणा ॥ वंदितों पाया ॥ ३ ॥ प्रभु गिरिवासी हा नत पायीं ॥ झाला आश्रय दुसरा नाहीं ॥ गमती शून्य दिशा मज दाही ॥ ने निजठाया ॥ ४ ॥

